# "पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे राजकारण: एक तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ – पुणे व सातारा जिल्हा"
## (२००२ चा परिसीमन आयोग)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

श्री.आवाळे ज्ञानेश्वर शामराव

एम.ए.,बी.एड.,एम.फिल.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार

एम.ए.,पीएच.डी.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,

जि.सातारा


जून, २०१९

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **“पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे राजकारण : एक तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ–पुणे व सातारा जिल्हा” (२००२ चा परिसीमन आयोग)** हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ.एस.डी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी शोधप्रबंध सादर केला आहे. शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : सातारा संशोधक

दिनांक :

(श्री.आवाळे ज्ञानेश्वर शामराव)

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. आवाळे ज्ञानेश्वर शामराव यांनी **“पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे राजकारण : एक तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ–पुणे व सातारा जिल्हा” (२००२ चा परिसीमन आयोग)** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : सातारा
दिनांक :

मार्गदर्शक

प्रा. डॉ.एस.डी.पवार

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच.डी. प्रबंध 'पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे राजकारणएक तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ - पुणे व सातारा जिल्हा (२००२ चा परिसीमन आयोग)' या विषयावर विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करीत आहे. पुणे व सातारा या जिल्ह्याचा मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच्या बदलांची माहिती प्रकाशात यावी या हेतूने हा विषय पीएच.डी साठी निवडलेला आहे.

माझे मार्गदर्शक आदरणीय प्राचार्य डॉ.एस.डी.पवार(बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण) यांनी मला विषयाच्या निवडीपासून संपूर्ण प्रबंध पूर्ण होईपर्यंत बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांच्यामुळेच हा प्रबंध लिहिण्यास प्रेरणा मिळाली. त्यांच्या स्नेहपूर्वक सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

माझ्या संशोधन कार्यात डॉ.प्रकाश पवार विभागप्रमुख शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच डॉ.विजय देठे यांनी सुद्धा मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील व सातारा कर्मचारी वर्ग यांनी संशोधनासाठी माहिती उपलब्ध करून दिली याबद्दल त्यांचे आभार मानतो. तसेच डॉ. माणिक सोनावणे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे त्यांचे आभार मानतो.

माझा संशोधनासाठी लालबहादूर शास्त्री कॉलेज सातारा ग्रंथालय, बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण ग्रंथालय, पुणे ग्रंथालय या ठिकाणी मला जी माहिती उपलब्ध झाली त्याबद्दल ग्रंथपाल व सेवकांचे आभार.

आमच्या लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.व्ही शेजवळ तसेच डॉ.दीपक जाधव, प्रा.डॉ.दत्तात्रय सावंत, प्रा.वामन सरगर, प्रा.संतोष निलाखे, डॉ.दत्तात्रय कोरडे, प्रा.सुनिल गुरव, ग्रंथपाल दामले सर यांचे आभार

त्याबरोबर माझी पत्नी रंजना यांच्या प्रोत्साहनामुळे व सहकार्यामुळे संशोधन कार्यपूर्ण होऊ शकले. या प्रबंधाचे टंकलेखन अचूका व सुबक करून त्यास मोहक रूप देऊन या शोधप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल समृद्धी टाईपरायटरचे प्रोप्रा.वैशाली कोरडे व त्यांचे सहाय्यक कु.पूजा गायकवाड यांचे आभार मानतो.

अभ्यासक

श्री.आवाळे ज्ञानेश्वर शामराव

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ● | प्रतिज्ञापत्र | I |
| ● | प्रमाणपत्र | II |
| ● | ऋणनिर्देश | III |
| १. | संशोधनाची ओळख(Introducton) | १ ते ५६ |
| २. | संदर्भ साहित्यांचा आढावा | ५७ ते ७९ |
| ३. | संशोधनाची कार्यपद्धती | ८० ते ८९ |
| ४. | तथ्य विश्लेषण आणि अर्थ निर्वचन | ९० ते ३१२ |
| ५. | निष्कर्ष | ३१३ ते ३६० |
| | संदर्भग्रंथ | ३६१ ते ३६५ |

# प्रकरण पहिले
# संशोधनाची ओळख(Introducton)

## १.१ प्रस्तावना –

आपल्या देशाने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. आधुनिक लोकशाही ही अप्रत्यक्ष किंवा प्रतिनिधिक लोकशाही आहे. प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये जनतेला आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. जनतेच्या वतीने निवडलेला लोकप्रतिनिधीमार्फत देशाचा राज्यकारभार चालविला जातो. राज्यातील जनतेला निवडणुकीद्वारे प्रतिनिधी निवडण्याची संधी मिळते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२५ मध्ये अशी तरतूद केली की, संसदेच्या किंवा राज्यकायदेमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक प्रादेशिक मतदार संघाची एक सर्वसाधारण मतदार यादी असेल या मतदार यादीमध्ये कोणत्याही कारणावरून कोणत्याही भारतीय व्यक्तीला समाविष्ट होण्यास अपात्र समजले जाणार नाही. भारतीय राज्यघटनेत लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीसाठी प्रौढ मताधिकाराची तरतूद करण्यात आलेली आहे. अठरा वर्षे पूर्ण असणाऱ्या व्यक्तीस मतदानाचा अधिकार दिलेला आहे.[१]

राष्ट्र, घटकराज्य व जिल्हा अशा पातळ्यांवर राजकारण घडते. भारतात या पातळ्यांवरील राजकारणात शिरकाव करण्यासाठी प्रादेशिक मतदारसंघ हा आखाडा आहे. विशिष्ट भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या लोकसंख्यनुसार मतदार संघ तयार केले जातात. त्यास प्रादेशिक मतदारसंघ संबोधले जाते. भारतीय लोकशाहीच्या राजकीय प्रक्रियेसाठी प्रादेशिक मतदारसंघ हा एक महत्त्वाचा आधार आहे. इतके महत्त्व प्रादेशिक मतदार संघाचे आहे.[२]

लोकसभा व विधानसभा या सभागृहांची सदस्य संख्या निश्चित केली जाते. सदस्य संख्येनसार समान लोकसंख्येचे लोकसभा व विधानसभा मतदारसंघ तयार केले जातात. लोकसंख्येतीला वाढ देशातंर्गत स्थलांतर, वाढते शहरीकरण इत्यादी कारणांमुळे मतदार संघाचे स्वरूप बदलते. दर दहा वर्षानी जनगणना केली जाते. जनगणना अहवालांच्या आधारे मतदार संघाची पुनर्रचना केली जाते.

## १.२ अ)विषयाची प्रस्तावना –:–

स्वातंत्र्यापूर्वी भारतामध्ये मतदानाचा अधिकार नव्हता. काही थोडया लोकांनाच हा अधिकार प्राप्त झालेला होता. सर्व लोकांना हा अधिकार मिळण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९१८ मध्ये एक निवडणूक हक्क समितीची स्थापना केली. या समितीने संपत्तीच्या आधारावर मतदानाचा अधिकार दिला जावा अशी शिफारस केल्यामुळे अनेक लोकांना या अधिकारापासून वंचित रहावे लागले. या समितीने काही प्रमुख शिफारशी केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे–

१) संपत्तीच्या आधारावर सर्व लोकांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा.

२) महसूल विभागवार मतदारसंघ निर्माण करण्यात यावेत.

३) प्रांतातील जास्त लोकसंख्येची व कमी लोकसंख्येची शहरे यांचे एकत्रिकरण करून शहरी मतदारसंघ निर्माण करण्यात यावेत.

४) ज्या ठिकाणी अल्पसंख्यांकांची संख्या विरळ आहे त्या ठिकाणी त्यांचे एकत्रीकरण करून त्यांच्यासाठी मतदारसंघ निर्माण केला जावा.[३]

## १.३ मतदारसंघ पुनर्रचना आयोग –अर्थ

लोकसभा व घटक राज्यांच्या विधानसभांच्या मतदारसंघाची रचना ही प्रादेशिक व लोकसंख्येच्या प्रमाणात पुनर्रचित करणे म्हणजे मतदारसंघ पुनर्रचना होय. मतदारसंघ पुनर्रचना आयोगालाच Delimitation Commission किंवा Boundary Commission किंवा परिसीमन आयोग असे म्हटले जाते.

भारतीय घटनेने ८२ व्या मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची तरतूद केली आहे. या आयोगाने सादर केलेल्या अहवालाविरूद्ध कोणालाही आव्हान देता येऊ शकत नाही. या आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावणीची घोषणा राष्ट्रपती करीत असतात.[४]

ब्रिटिशांच्या काळात भारतात १९१९ च्या कायद्यानुसार प्रथम मतदार संघाची पुनर्रचना करण्यात आली. साधारणपणे एका मतदार संघामध्ये पाच विभाग निर्मण केले. मतदारसंघ पुनर्रचनेमुळे भौगोलिक क्षेत्रातील वाढीप्रमाणे मतदारांची संख्या मात्र तेवढ्या प्रमाणात वाढू शकली नाही. पुनर्रचना करतना शहरी व ग्रामीण असा भेद न करता सर्व एक मानून मतदारसंघ निर्माण केले.

१९३५ च्या कायद्यानुसार दुसरी मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली. या कायद्याने केंद्र व प्रांतिक सरकार यांच्यामध्ये अधिकाराची विभागणी करण्यात आली. १९३७ च्या निवडणुका मात्र पुनर्रचनेनुसार घेण्यात आल्या. या कायद्याने अनुसूचित जातीच्या लोकांसाठी वेगळ्या मतदार संघाची निर्मिती करण्यात आली. तसेच शहरी व ग्रामीण असा भेद केला गेला नाही.[५]

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५१-५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. मुख्य निवडणूक आयुक्तंच्या नियंत्रणाखाली मतदर संघ, पुनर्रचनेची प्रक्रिया पार पडली. परंतु या मतदारसंघ पुनर्रचनेमध्ये अनेक दोष दिसून आले. या पुनर्रचनेमध्ये भौगोलिक बाबीबाबत आक्षेप नोंदविण्यात आला. तसेच या पुनर्रचनेमुळे राजकीय प्रतिनिधींना डावलले गेल्याचा आक्षेप घेण्यात आला. या सर्व बाबींचा विचार करून निवडणूक आयोगाने जिल्हावार जागा वाटून दिल्या होत्या. तसेच मुख्य निर्वाचन आयुक्तवर मतदारसंघ निर्मितीची जबाबदारी देण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षामध्ये हा अधिकार राजकीय पक्षांना मिळाल्यामुळे त्यांनी त्यांच्या पद्धतीने मतदारसंघांची निर्मिती केली. संसदीय सल्लागार समितीने केवळ राजकीय बाजू विचारात घेऊन मतदारसंघ निर्माण केले आणि निवडणूक आयोगाने यालाच आक्षेप घेतला आणि त्यातूनच परिसीमन आयोगाची निर्मिती झाली.[६]

## १.४ मतदार पुनर्रचना आयोगाची रचना-

भारतीय संविधानाच्या कलम ८२ नुसार परिसीमन आयोगाची स्थापना करण्यात येते. परिसीमन आयोगाची रचना पुढीलप्रमाणे-

१) सर्वोच्च न्यायालयाचा विद्यमान किंवा निवृत्त न्यायाधीश हे या आयोगाचे पद्सिद्ध अध्यक्ष असतात.

२) केंद्रिय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त पद्सिद्ध सदस्य असतात.

३) घटकराज्याच्या निवडणूक आयोगाचे निवडणूक आयुक्त हे पद्सिद्ध सदस्य असतात.

४) सहयोगी सदस्य म्हणून १० सदस्य असतात.

त्यापैकी संबंधित घटकराज्यांच्या लोकसभेचे व विधानसभेचे प्रत्येकी ५ सदस्य असतात. लोकसभेतील ५ सहयोगी सदस्यांची नियुक्ती लोकसभेचे सभापती करतात, तर

विधानसभेतील ५ सहयोगी सदस्यांची नियुक्ती संबंधित घटकराज्यांच्या विधानसभेचे सभापती करतात.

परिसीमन आयोगाचे कार्य संसदेच्या कायद्याच्या चौकटीत चालते. तरीसुद्धा परिसीमन आयोगाला राष्ट्रीय पातळीबरोबरच राज्यांतर्गत मतदार संघाची फेररचना स्वातंत्र्य दिलेले आहे. आतापर्यंतच्या परिसीमन आयोगावर संसदेचे नियंत्रण राहिलेले दिसून येते. मतदारसंघाची पुनर्रचना करताना लोकसंख्या हा घटक अतिशय महत्त्वाचा मानला जातो. लोकसंख्येच्या सरासरीनुसार प्रत्येक मतदारसंघातील समान लोकसंख्येच्या आधारावर त्या मतदार संघाची पुनर्रचना करण्यात येते.[७]

भारतीय संसदेने आतापर्यंत १९५२, १९६३, १९७३ व २००२ असे परिसीमन (Delimitation) आयोग स्थापन केले आहेत.

## १.५ मतदारसंघ पुनर्रचनेसंबंधी भारतीय संविधानातील तरतुदी :–

भारतामध्ये २९ घटकराज्ये व ६ केंद्रशासित प्रदेशामध्ये लोकसभा व विधानसभेच्या मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे.

भारतीय संविधानाच्या कलम ८१ व ८२ मध्ये कलम ८१ (३३१ कलमाच्या आधीन राहून) रचना स्पष्ट केलेली आहे.

कलम (१) पोटकलम (अ) साठी

१) अ. घटक राज्यातील लोकसभेच्या मतदार संघातून जास्तीत जास्त ५३० सभासद निवडले जातील.

ब.संसद कायदा करून त्याप्रमाणे केंद्रशासित प्रदेशातून जास्तीत जास्त २० सभासद निवडले जातील.

२) अ. प्रत्येक घटक राज्याला इतक्या जागा ठरवून दिल्या जातील की त्या जागा व त्या घटक राज्याची लोकसंख्या यांच्या प्रमाणात सर्व घटकराज्यांसाठी सारखे असेल.

ब. घटकराज्याची प्रादेशिक विभागणी अशाप्रकारे केली जाईल की प्रत्येक विभागाची लोकसंख्या साधारणपणे सारखी असेल.

३) या कलमासाठी 'लोकसंख्या' प्रमाण मानली जाईल.[८]

## १.६ मतदारसंघ पुनर्रचनेची मार्गदर्शक तत्त्वे/ निकष–

१) मतदारसंघाची निश्चिती करताना भौगोलिक एकसंघपणा, प्राकृतिक रचना, सध्याच्या सीमा, प्रशासकीय युनिट, जनतेची सोय व दळणवळणाची साधने याला प्राधान्य दिले जावे.

२) विधानसभा मतदारसंघ संपूर्णतः एकाच लोकसभा मतदार संघात समाविष्ट असावा.

३) ज्या मतदार संघात अनुसूचित जातीची संख्या जास्त आहे ते मतदारसंघ राखीव करावेत व ते मतदारसंघ राज्यभर विखुरलेले असावेत.

४) ज्या मतदारसंघात अनुसूचित जमातीची संख्या जास्त आहे. ते मतदारसंघ राखीव करावेत.

मतदारसंघाच्या पुनर्रचनेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या सत्ता समीकरणाचा उदय झालेला दिसून येतो. मतदारसंघ पुनर्रचना ही अघोषित राजकीय क्रांती असते. कारण मतदारसंघ पुनर्रचना घडल्यामुळे विविध पातळ्यांवरील राजकारण बदलते व नवीन सत्ता समीकरणे आकार घेता प्रत्येक निवडणुकीच्या वेळी पक्ष आघाड्या व नेते यांच्यातील सत्ता समीकरणे बदलणार आहेत. मतदारसंघ पुनर्रचनेमुळे आर्थिक, भौगोलिक व सामाजिक समीकरणे आकाराला आली ती कमीतकमी २०१६ पर्यत बदलणार नाहीत.[९]

महाराष्ट्रातील मतदारसंघात पुनर्रचना ही अघोषित राजकीय क्रांतीच झाली आहे. राजकीय सत्तेचे केंद्रिकरण मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, जळगाव, नागपूर, यवतमाळ, अहमदनगर या बारा जिल्ह्यातील मतदार संघाना विकासाच्या मर्यादा पडल्या आहेत. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, धुळे, नंदुरबार, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, औरंगाबाद, बीड व उस्मानाबाद या जिल्ह्यामध्ये १९७८ ते २००९ दरम्यान सर्वात कमी मंत्रीपदे मिळाली. त्यामुळे हे जिल्हे सत्ता व अधिकारापासून वंचित होते. सत्ता व औद्योगिक क्षेत्राचा विकास झाला नाही. विकासाचा अभाव असल्यामुळे जिल्ह्यामध्ये लोकसंख्येत घट झाली. त्याचा थेट परिणाम होऊन मतदारसंघांची संख्या कमी झाली. ग्रामीण भागातील मतदारसंघातील घट म्हणजे हितसंबंधाची भूमिका दुय्यम ठरली व शहरी हितसंबंधाचे महाराष्ट्राचे अर्थकारण व राजकारणावरील नियंत्रण वाढले. ग्रामीण संघाचे जुने आधार साखर कारखाने,

सूतगिरण्या, जिल्हा मध्यवर्ती बँक, कृषी–उत्पन्न बाजार समित्या इत्यादी आहेत ते आर्थिक व संस्थात्मक राजकीय सहभागाच्या पातळीवर राजकीय असंतोषाची निर्मिती करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील मतदार संघाची जुनी बलस्थाने राजकीयदृष्ट्या प्रभावी नाहीत. मात्र ग्रामीण भागातील राजकीय असंतोष हाच येथील मतदारसंघातील राजकीय आधार आहे.[१०]

## १.७ मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे व सातारा विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे बदललेले स्वरूप –

### १.७.१ पुणे जिल्हा –विधानसभा मतदारसंघ –

पुणे जिल्ह्यातील एका विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्या ३ लाख ४४ हजार राहिल. असे सूत्र या जिल्ह्याचे असल्यामुळे विधानसभेच्या १८ मतदार संघाऐवजी विधानसभेचे २१ मतदारसंघ तयार झाले. अर्थात तीन विधानसभा मतदारसंघ वाढले.

चिंचवड, पिंपरी, भोसरी, वडगाव शेरी, खडकवासला व हडपसर हे विधानसभेचे मतदारसंघ नव्याने उदयास आले आहेत. जुन तीन विधानसभा मतदारसंघ रद्द झाले. (मुळशी, हवेली व भवानीपेठ) जुन्नर, आंबेगाव, दौंड, बारामती, पुरदंर, मावळ, शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, पुणे कॅन्टोन्मेंट व कसबा या ११ विधानसभा मतदारसंघात २५ टक्के फेरबदल झाले. विधानसभा मतदारसंघात जवळ–जवळ ५० टक्के बदल झाला. भोर मतदारसंघात ७५ टक्क्यापेक्षा जास्त बदल झाले. खेड, आळंदी व इंदापूर या दोन विधान सभा मतदारसंघामध्ये बदल झाला नाही.

पुणे जिल्ह्यात अनुसूचित जमातींची लोकसंख्या संपूर्ण जिल्ह्याच्या लोकसंख्येत कमी दिसते. (३.६२टक्के) परंतु अनुसूचित जमातीची २ लाख ६१ हजार लोकसंख्या जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी व भोर या केवळ पाच तालुक्यामध्ये आहे. अनुसूचित जातींची लोकसंख्या ७ लाख ६१ हजार असल्यामुळे या लोकसंख्येच्या प्रमाणात दोन विधानसभा मतदारसंघ राखीव झाले.[११]

### १.७.२ लोकसभा मतदारसंघ

**१) मावळ –**

या लोकसभा मतदारसंघामध्ये पनवेल, कर्जत व उरण हे विधानसभा मतदारसंघ रायगड जिल्ह्यातील व मावळ, चिंचवड व पिंपरी हे तीन मतदारसंघ पुणे जिल्ह्यातील आहेत.

**२) पुणे –**

या लोकसभा मतदारसंघात वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, पुणे कॅन्टोन्मेंट आणि कसबा या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो.

**३) बारामती –**

या लोकसभा मतदारसंघामध्ये दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर आणि खडकवासला या विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

**४) शिरूर –**

या लोकसभा मतदारसंघामध्ये जुन्नर, आंबेगाव, खेड, आळंदी, शिरूर व हडपसर या सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो.[१२]

## १.८ सातारा जिल्हा

### १.८.१ विधानसभा मतदारसंघ –

सातारा जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचनेमुळे विधानसभेचे आठ मतदारसंघ तयार झाले. खटाव व जावळी हे जुने दोन मतदारसंघ रद्द झाले आहेत. त्यामुळे सातारा जिल्ह्यात सातारा हा एक लोकसभा मतदारसंघ तयार होऊन दोन विधानसभा मतदारसंघ शिल्लक राहिले. त्यांचा समावेश सोलापूर जिल्ह्यातील माढा या लोकसभा मतदार संघात करण्यात आला. त्यामुळे कराड लोकाभा मतदारसंघ रद्द झाला. सातारा जिल्ह्यातील केवळ फलटण विधान सभा मतदार संघात कमी बदल झाले. माण, वाई, कराड उत्तर, फलटण, पाटण या चार विधानसभा मतदार संघात जवळपास ५० टक्के बदल झाले. कराड दक्षिण, कोरेगाव व सातारा या विधानसभा मतदार संघात ७५ टक्क्यापेक्षा जास्त बदल झाले.

सातारा जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात तीन लाख ५१ हजार लोकसंख्या राहील असे मुख्य सूत्र होते. सातारा जिल्ह्यात केवळ १४.१७ टक्के शहरी लोकसंख्या असल्यामुळे जवळपास सर्व मतदार संघात ग्रामीण स्वरूपाचे असल्याने सातारा जिल्ह्यामध्ये शहरीकरण होऊ शकले नाही. त्यामुळे विधानसभा मतदार संघाची संख्या वाढू शकली नाही. सातारा जिल्ह्यात सातारा शहर (१ लाख) फलटण व कराड (५० हजार) अशी लहान शहरे आहेत. जिल्ह्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या कमी आहे. फलटण हा विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव झाला आहे. मुस्लिम समाजाची

लोकसंख्या नवबौद्ध समाजापेक्षा कमी आहे. मुस्लिम समाजाची लोकसंख्या ४४७ टक्के आहे. ती जिल्ह्यामध्ये विखुरलेली आहे.[१३]

### १.८.२ माढा लोकसभा मतदार संघातील दोन विधानसभा मतदारसंघ –

**फलटण (अ.जा.) २५५**

फलटण विधानसभा मतदार संघामध्ये फलटण तालुक्याखेरी कोरेगाव तालुक्यातील वाठार स्टेशन महसूल मंडलाचा समावेश केला गेला. या मतदार संघात मुख्य तीन बदल झालेले दिसून येतात.

**१) खंडाळा –**

खंडाळा तालुक्यातील भादे व लोणंद ही दोन महसूल मंडळे नव्या मतदार संघातून काढण्यात आले.

**२) कोरेगांव –**

कोरेगाव तालुक्यातील वाठार स्टेशन महसूल मंडळाच्या नव्याने समावेश केला आहे. या मतदारसंघात मुख्य तीन बदल झालेले दिसून येतात. ते खालीलप्रमाणे

१) खंडाळा तालुक्यातील भादे व लोणंद ही दोन महसूल मंडळे नव्या मतदारसंघातून काढण्यात आले.

२) कोरेगाव तालुक्यातील वाठार स्टेशन महसूल मंडळाचा नव्याने समावेश केला. कोरेगाव तालुक्यातील वाठार स्टेशनची लोकसंख्या फलटणच्या तुलनेने फारच कमी आहे. यापैकी ४३,२२८ (१३.८ टक्के) लोकसंख्या अनुसूचित जातीची आहे. त्यामुळे हा मतदारसंघ त्यांच्यासाठी राखीव झाला आहे. फलटण मतदार संघाचे स्वरूप ग्रामीण प्रकारचे दिसून येते.

या मतदारसंघातून मराठा समाजाचे उमेदवार सातत्याने निवडून आले होते. जनता पक्षाकडून हा मतदारसंघ काँग्रेसकडे (१९८०) काँग्रेसकडून अपक्षाकडे (१९८५), अपक्षाकडून काँग्रेसकडे (१९९०), काँग्रेसकडून अपक्षाकडे(१९९५) व अपक्षाकडून राष्ट्रवादी काँग्रेसकडे (१९९९, २००८) तो सरकला होता. या मतदार संघात मराठा जाती अंतर्गत स्पर्धा असल्याने हा बदल सातत्याने होत राहिलेला दिसून येतो.[१४]

## माण(२५८) –

माण विधानसभा मतदार संघात माण तालुक्याखेरीज खटाव तालुक्यातील औंध, वडूज, कातरखटाव व मायणी या महसूल मंडळाचा समावेश केला आहे. या मतदार संघामध्ये प्रमुख दोन बदल झाले आहेत. – १) खटाव तालुक्यातील औंध, वडूज, कातरखटाव आणि मायणी यांचा नव्याने समावेश केला आहे. परंतु माण तालुक्याची लोकसंख्या खटाव तालुक्याच्या तुलनेत जास्त आहे. परंतु या मतदारसंघामध्ये माण व खटाव अशी राजकीय स्पर्धा राहील असे दिसून येते. माण तालुक्यामध्ये १० टक्के शहरी लोकसंख्या आहे. खटाव तालुक्यातील औंध, वडूज, कातरखटाव आणि मायणी हा भाग ग्रामीण असल्याने या मतदार संघाचे स्वरूप ग्रामीण आहे.

माण या विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसचे नियंत्रण होते. (१९७८ ते १९९५) काँग्रेसकडून हा मतदारसंघ अपक्षाकडे (१९९०–१९८५) काँग्रेसकडून हा मतदारसंघ अपक्षाकडे (१९९०, १९९५) व अपक्षाकडून राष्ट्रवादीकडे (१९९९, २००४) २००९ ला अपक्षाकडे सरकला आहे.

### १.८.३ सातारा लोकसभा मतदारसंघ –

या मतदार संघात वाई, कोरेगाव, कराड उत्तर, कराड दक्षिण, पाटण व सातारा या सहा विधानसभा मतदार संघाचा समावेश होतो.

या लोकसभा मतदार संघामध्ये प्रमुख चार बदल झाले. ते पुढीलप्रमाणे –

१) फलटण व माण हे लोकसभा मतदारसंघ वगळण्यात आले.

२) जुन्या कराड लोकसभा मतदार संघातील कराड उत्तर, कराड दक्षिण व पाटण हे तीन विधानसभा मतदारसंघ सातारा लोकसभा मतदारसंघाला जोडण्यात आले.

३) वाई, कोरेगाव व सातारा हे तीन विधानसभा मतदारसंघ जुन्या सातारा लोकसभा मतदारसंघातील नव्या मतदारसंघात राहिले.

४) या बदलामुळे जुना कराड लोकसभा मतदारसंघ रद्द झाला.[१५]

## १.९ ब) परिसीमन आयोगाची ओळख–

**प्रस्तावना :–**

भारतीय राज्यघटनेने प्रतिनिधिक लोकशाही शासनपद्धती स्वीकारलेली आहे. अठरा वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक भारतीय स्त्री–पुरुषाला मतदानाचा अधिकार राज्यघटनेने दिलेला आहे. भारत हे संघराज्य आहे. केंद्रपातळीवर लोकसभा आणि राज्यपातळीवर विधानसभा ही प्रतिनिधीगृहे असून या सभागृहामध्ये मतदारांनी आपले प्रतिनिधी निवडून द्यावयाचे आहेत.[१६]

१९९३ च्या घटनादुरूस्तीने ग्रामीण भागांसाठी ग्रामपंचायत/जिल्हापरिषद आणि शहरी भागांसाठी नगरपालिका/महानगरपालिका ही लोकप्रतिनिधींची सभागृहे असून मतदारांनी तेथे आपले प्रतिनिधी निवडून द्यावयाचे आहेत. त्या–त्या प्रदेशातील सर्व लोकसंख्येचा प्रतिनिधी मतदार असून त्याला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिलेला आहे. मतदारसंघ परिसिमित करण्यासाठी लोकसंख्या हा आधार मानला असून भारतात लोकसंख्येची गणना दर दहा वर्षांनी केली जाते. म्हणून लोकसंख्या आधारभूत मानावी अशी तरतूद केलेली आहे.

भारतामध्ये निवडणुकांच्या राजकारणाचा इतिहास जवळ–जवळ एक शतकाचा आहे. निवडणूका राजकीय पक्ष, मतदारसंघ, विधीमंडळ या लोकशाही घटकांची पायाभरणी ब्रिटिश काळातच झालेली दिसून येते. भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात श्रेष्ठ समजली जाते. त्यामुळे या निवडणुकांचे श्रेय निवडणूक आयोगाला जाते. लोकशाही राज्यव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे निवडणुका होय. निवडणूक आयोगाच्या शिफारशीनुसारच भारतामध्ये परिसीमन आयोगाची निर्मिती झाली. कारण निवडणूक आयोगाने स्वतंत्र परिसीमन आयोग नेमावा. अशी केंद्राकडे शिफारस केली होती. सन १९५२ मध्ये निवडणूक आयोगाने केलेली शिफारस केंद्राने मान्य करून १९५३ साली संसदेत कायदा करून पहिल्या परिसीमन आयोगाची नियुक्ती केली.[१७]

भारतीय संसदेने पारित केलेल्या कायद्यानुसार परिसीमन आयोगाला आपले कार्ये करावे लागते. मतदारसंघाचे प्रतिनिधी त्यांना मतदान केलेल्या नागरिकाच्या प्रतिनिधीत्वाबरोबरच त्या मतदारसंघातील भौगोलिक क्षेत्राचेही प्रतिनिधीत्व करतात. लोकसभा व राज्यांची विधानसभा संख्या किती असावी हे ठराविण्याचा अधिकार संसदेला आहे. १९५१ साली लोकसभेची सभासदसंख्या ४९७ होती ती वाढवून १९७५ च्या घटनादुरूस्तीने जास्तीत

जास्त ५५० ठरवली. ५३० सभासद घटकराज्यातून व २० सभासद केंद्रशासित प्रदेशातून निवडता येतील.

## १.१० परिसीमन आयोग– उदय व विकास

निवडणूक आयोगाच्या शिफारशीवरून संसदेने १९५२ साली मतदारसंघ आखणीचा परिसीमन कायदा केला. त्यानुसार तयार करण्यात आलेला मतदारसंघ आखणी आयोग मतदारसंघाची आखणी करतो. पण पहिल्या निवडणुकीच्यावेळी ही जबाबदारी राष्ट्रपतीवर टाकण्यात आली होती. निवडणूक आयोगाने जिल्हावार जागा वाटून दिल्या होत्या आणि मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यावर प्रत्यक्ष मतदारसंघ पाडण्याचे काम सोपवले होते. पण प्रत्यक्षात तो अधिकार सत्ताधारी पक्षालाच मिळाला आणि त्यांच्या सोयीनुसार मतदारसंघाची आखणी झाली. संसदीय सल्लागार समितीने केवळ राजकीय दृष्टिकोनातून मतदारसंघ पाडले. मतदारसंघ पुनर्रचनेची प्रक्रिया समाधानकारकपणे झाली नाही. मतदारसंघ पुनर्रचनेच्या प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी राहिल्या होत्या. या पुनर्रचनेत अनेक आक्षेप घेण्यात आले. तसेच काही समाजातील सामाजिक गटांनी राजकीय प्रतिनिधित्वाबाबत जाणीवपूर्वक डावलले गेल्याचा आक्षेप नोंदविण्यात आला. यातूनच परिसीमन आयोगाचा जन्म झाला.[१८]

**परिसीमन आयोगाचा विकास :–**

प्रौढ मतदारावर आधारलेला लोकसभा व विधानसभांच्या निवडणुका १९५२ मध्ये घेण्यात याव्यात असा सरकारचा प्रयत्न होता. १९५१ च्या जनगणनेचे आकडे प्रसिद्ध व्हायला वेळ लागणार होता. म्हणून १९४१ च्या जनगणनेचे आकडे देशाची फाळणी, संस्थानाचे भारतीय राजकारणात विलीनीकरण, त्यामुळे राज्यांच्या सीमांचे निर्धारण व महसूली यंत्रणेतील तळचे एकक निश्चित करणे या सगळयांचा परिणाम झालेले प्रमाण मानून, मतदारसंघाचे परिसीमन करण्यात आले. त्याआधारे १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यावेळी राखीव जागा या अगदी स्वतंत्र न ठेवता शेजारची सर्वसाधारण राखीव मिळून द्विसदस्य मतदारसंघ बनवण्यात आले. मुंबई राज्यात एक त्रिसदस्य (सर्वसाधारण + अनु.जाती राखीव + अनु.जमाती राखीव) असा मतदारसंघ विधानसभेला बनवावा लागला तसा प.बंगालमध्येही एक झाला.[१९]

द्विसदस्य मतदारसंघ हे मतदार व प्रशासन या दोघानाही गैरसोयीचे आहेत. असे अनुभवायला आल्यानंतर १९६२ पासून सर्व मतदारसंघ एक बनवण्याचे सुरू झाले.

मतदारसंघाचे परिसीमन १९५१ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार परिसीमनाचे काम झाले. लोकसभेच्या १९७१ च्या मध्यावधी निवडणुका त्याच परिसीमनच्या आधारावर झाल्या. १९७१ साली जनगणना झाली. परंतु १९७५ पर्यंत आकडे प्रसिद्ध होऊ शकले नाहीत. मतदारसंघ पुनर्परिसीमनाचे काम दर दहा वर्षांनी करणे अवघड आहे, असे जाणवल्याने १९७५ साली संसदेने घटनादुरुस्ती केली. जिच्यामुळे पुढील परिसिमन सन २००० नंतरच्या जनगणनेचे आकडे प्रसिद्ध झाल्यानंतरच करावे. सन २००१ साली जनगणनेचे काम पूर्ण झाले व लोकसंख्यचे महत्त्वाचे आकडे वर्षभरात प्रसिद्ध झाले. मतदारसंघ पुनर्परिसीमनाची प्रक्रिया लवकर सुरू करावी म्हणून संसदेने डिलिमिटेशन कायदा २००२ साली पास केला.[२०]

## १.११ मतदारसंघ पुनर्रचना :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ व ८२ मध्ये मतदारसंघ परिसीमन आयोगाची तरतूद केली आहे. मतदारसंघाची निर्मिती करताना भौगोलिकदृष्ट्या सलग भूप्रदेश असतील आणि त्यांचे परिसीमन करताना प्राकृतिक रचना, प्रशासकीय घटक, भागाच्या विद्यमान सीमा, दळणवळणाच्या सुविधा व सार्वजनिक सोयी यांच्याकडे लक्ष दिले जाईल अशी तरतूद केली आहे.

“लोकसभा व घटकराज्यांच्या विधानसभांच्या मतदारसंघाची रचना ही प्रादेशिक व लोकसंख्येच्या प्रमाणात पुनर्रचीत करणे म्हणजे मतदारसंघ परिसीमन होय. मतदारसंघ पुनर्रचना आयोगालाच Delimitation Commission किंवा Boundary Commission किंवा परिसीमन आयोग असेही म्हणतात.” प्रत्येक जनगणना पूर्ण झाल्यावर लोकसभेतील जागांची राज्यांना दिलेली वाटणी आणि प्रत्येक राज्याची क्षेत्रीय मतदारसंघामध्ये केलेली विभागणी यांचे संसदेमार्फत नियुक्त केलेल्या पुनर्रचना आयोगाकडून पुन्हा निश्चिती केली जाईल. मतदारसंघ पुनर्रचनेबाबतची ही सर्वोच्च संस्था आहे. आयोगाच्या शिफारशीच्या अहवालाच्या अंमलबजावणीची घोषणा भारताचे राष्ट्रपती करतात.[२१]

## १.१२ मतदारसंघ पुनर्रचनेसंबंधी संविधानिक तरतूदी :-

भारतातील सर्व घटक राज्यांमध्ये व केंद्रशासित प्रदेशामध्ये लोकसभेच्या व विधानसभेच्या मतदारसंघाची पुनर्रचना करून त्या सर्व मतदारसंघामध्ये लोकसंख्या

सर्वसाधारणपणे सर्वत्र सारखी असावी. अशी कलम ८२ मध्ये तरतूद आहे. मतदारसंघ पुनर्रचना आयोगाने सरकारसमोर सादर केलेल्या अहवालाविरूद्ध कलम ३२९ नुसार न्यायालयामध्ये आव्हान देता येत नाही.

## १.१३ मतदारसंघ पुनर्रचना आयोगाचे कार्ये –

संसदेच्या नियमानुसार चालते. संसद परिसीमन आयोगाला स्वातंत्र्य देते. परिसीमन आयोगावर संसदेच्या कायद्याचे नियंत्रण असते. हे अगदी पहिल्या परिसीमन आयोगापासून दिसून येते. संसदेने आजपर्यत १९५२, १९६३, १९७३ व २००२ असे चार परिसीमन आयोग स्थापन केले आहेत. या चार आयोगांनी १९५१, १९६१, १९७१ व २००१ च्या जनगणना अहवालानुसार मतदारसंघाची पुनर्रचना केली. लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची दर दहा वर्षानी पुनर्रचना केली जावी. अशी तरतूद आहे. १९७६ मध्ये घटनादुरुस्ती करून २००० पर्यत लोकसभा सदस्यांची व राज्यांच्या विधानसभांच्या सदस्यांची संख्या न बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. या घटना दुरुस्तीनुसार २००१ पर्यत लोकसभा व विधानसभा मतदारसंघ १९७३ च्या मतदारसंघ पुनर्रचनेप्रमाणे राहतील अशी तरतूद करण्यात आली. त्यामुळे १९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यासाठी संसदेमार्फत परिसीमन आयोगाची नियुक्ती केली गेली नाही. २००१ मध्ये संसदेने कायदा करून २००१ च्या जनगणनेनुसार २०१६ पर्यत मतदारसंघाची संख्या कायम तीच राहिल. अशी तरतूद केली. त्यामुळे २०११ व २०२१ च्या जनगणनेनुसार मतदारसंघाची पुनर्रचना केली जाणार नाही.[२२]

## १.१४ परिसीमन आयोग पद्धती :–

मतदारसंघाची पुनर्रचना करण्यासाठी पुढीलप्रमाणे काही पद्धती आहेत.

### १.१४.१ जेफरसन पद्धती :–

थॉमस जेफरसन यांनी ही पद्धत १७७० मध्ये सुरू केली. ही पद्धत १७९० ते १८४० पर्यत अमेरिकेत अस्तित्त्वात होती. जेफरसन पद्धती एकूण लोकसंख्येला एकूण सदस्य संख्येने भागले जाते आणि त्यानुसार प्रत्येक घटक राज्याच्या प्रतिनिधीसाठीची लोकसंख्या निश्चित केली जाते.

### १.१४.२ हॅमिल्टन पद्धती :–

ही पद्धती अमेरिकन अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी सुचविली होती. या पद्धतीनुसार प्रथम घटक राज्याच्या मतांच्या कोट्यानुसार प्रतिनिधींची संख्या निश्चित केली जाते.

### १.१४.३ हिल आणि हॅटिंग्टन पद्धती :–

ही पद्धती सद्यःस्थितीत अमेरिकेमध्ये अस्तित्त्वात आहे. घटक राज्याच्या लोकसंख्येला सध्याच्या सदस्य संख्येने विभाजले जाते आणि त्या नंतरच्या संख्येचे वर्गमूळ काढले जाते.

### १.१४..४ कोटा पद्धती :–

प्रथम घटक राज्याच्या कायदे मंडळाची सदस्य संख्या निश्चित केली जाते. त्यानंतर घटक राज्यांच्या लोकसंख्येला त्या सदस्य संख्येने विभाजीत केले जाऊन तो व राष्ट्रीय पातळीवर सरासरी पद्धतीन कोटा ठरविला जातो.

### १.१४.५ वेबस्टर पद्धती :–

एक व्यक्ती एक मत या तत्त्वानुसार वेबस्टर पद्धती आधारलेली आहे. या पद्धतीमध्ये छोट्या–मोठ्या घटक राज्यांचा कोटा असा भेदभाव केला जात नाही.

वरील पद्धतीपैकी कोटा व वेबस्टर या दोन पद्धतीचा वापर करून परिसीमन आयोग मतदारसंघाची पुनर्रचना करते.[२३]

## १.१० स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील परिसीमन आयोग :–

भारतामध्ये १९४७ पूर्वी मतदानाचा अधिकार सार्वत्रिक नव्हता. फार कमी लोकांना हा अधिकार प्राप्त होता. मतदानाचा अधिकार कोणाला असावा याबाबत ब्रिटिश सरकारने १९१८ साली निवडणुक हक्क समितीची नियुक्ती केली. निवडणुक हक्क समितीने संपत्तीच्या निकषावर मतदानाच्या अधिकाराची शिफारस केली. त्यामुळे फार कमी लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला. या समितीच्या शिफारसी पुढीलप्रमाणे–

१) संपत्तीच्या निकषावर मतदानाचा अधिकार

२) महसूल विभागावर आधारित मतदारसंघ तयार करण्यात यावे.

३) प्रांतातील जास्त लोकसंख्या असलेली शहरे व काही प्रांतातील कमी लोकसंख्या असलेली शहरे यांना एकत्र करून शहरी मतदारसंघ तयार करण्यात यावे.

४) अल्पसंख्यांकांची संख्या जिथे कमी असेल त्या ठिकाणी जिल्ह्यातील अल्पसंख्यांकांचे भाग एकत्र करून त्यांच्यासाठी मतदारसंघ तयार करण्यात यावे.

१९४७ पूर्वी दोन वेळा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली.

### १.११.१. १९१९ च्या 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' ॲक्ट मधील तरतूदीनुसार मतदारसंघ पुनर्रचना :–

सर्वप्रथम भारतामध्ये ब्रिटिश कालखंडामध्ये १९१९ च्या कायद्यानुसार मतदारसंघाची पुनर्रचना झालेली दिसून येते. ब्रिटिश राजवटीत भारताचे अनेक विभाग होते. कमिशनरच्या अधिपत्याखाली जिल्ह्याचा समावेश होता. कौन्सिल ऑफ स्टेटचे ५ मतदारसंघ होते. एका मतदारसंघात ५ विभागाचा समावेश करण्यात आला होता. तर एक मतदारसंघ दोन विभागाचा मिळून तयार करण्यात आला होता. तसेच तीन मतदारसंघ प्रत्येकी ४ विभाग एकत्र करून तयार करण्यात आले होते. या सर्वाचा एकत्रित परिणाम असा झाला की मतदारसंघाचा भौगोलिक आकार मोठ्या प्रमाणात वाढला. मात्र त्या मतदारसंघातील मतदारांची संख्या फारच कमी होती. तसेच या मतदारसंघामध्ये ग्रामीण व शहरी असा फरक करण्यात आला नव्हता.

मतदार अधिकार मर्यादित ठेवण्यात आला होता. वार्षिक दहा हजार रूपये उत्पन्न असणाऱ्या व त्यावर आयकर देणाऱ्या व्यक्तीस मतदानास पात्र ठरविण्यात येत होते. १९२० मध्ये भारताच्या २४ कोटी लोकसंख्येपैकी फक्त १७,३६४ लोकांनाच मताधिकार होता. १९१९ च्या मतदारसंघ पुनर्रचनेत मतदारसंघाची दोन गटात विभागणी झाली होती. एक गट म्हणजे मुस्लिम मतदारसंघ व दुसरे म्हणजे बिगर मुस्लिम मतदारसंघ होय.[२४]

### १.११.२ १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टमधील तरतुदीनुसार मतदारसंघ पुनर्रचना

१९२५ च्या कायद्यानुसार दुसरी पुनर्रचना करण्यात आली. १९३५ च्या कायद्याने भारतामध्ये संघराज्य व्यवस्थेचा पाया घातला. या कायद्यात प्रांतीय स्वायत्तता निवडणुकांचा समावेश केला गेला. द्विगृहीय कायदेमंडळाची निर्मिती करण्यात आली. १९३५ च्या कायद्याने 'परिसीमन समिती' नियुक्त करण्यात आली होती. या समितीने मतदारसंघाची पुनर्रचना करण्यासाठी विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित केली की जी १९४७ नंतर परिसीमन आयोगासाठी मार्गदर्शक ठरली. या समितीने एकापेक्षा आधिक प्रतिनिधी असलेले मतदारसंघ व अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघाचाही विचार केला होता. १९३५ च्या कायद्याने

मताधिकाराचा विस्तार केला. जवळपास १० टक्के लोकांना (एकूण लोकसंख्येच्या) मतदानाचा हक्क प्राप्त झाला.

या पुनर्रचनेत प्रशासकीय युनिटनुसार मतदारसंघाची सीमा निश्चिती केली होती. यामध्ये तहसिल, ठाणे, जिल्हा किंवा विभाग या प्रशासकीय युनिटचा विचार करण्यात आला होता. लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्र, मतदारसंख्या दळणवळणांच्या सुविधांची उपलब्धी अभाव या सर्व बाबीकडे समितीने लक्ष दिले होते. वरील बाबींचा पूर्ण अभ्यास २००२ च्या परिसीमन समितीने केलेला दिसतो. १९३५ च्या परिसीमन समितीच्या बऱ्याच शिफारशींचा कमी–अधिक प्रमाणात चौथ्या परिसीमन आयोगाने स्वीकार केलेला दिसतो. उदा. लोकसंख्या हा मुख्य निकष मतदारसंघाची पुनर्रचना करताना दिसतो.[२५]

## १.१२ स्वातंत्र्योत्तर काळातील परिसीमन आयोग :–

### १.१२.१ पहिला परिसीमन आयोग(१९५३) :–

संसदेमध्ये संमत झालेल्या कायद्याला अनुसरून १९५१ च्या जनगणनेच्या आधारित लोकसभा व विधानसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी १९५३ मध्ये स्वतंत्र भारतातील पहिला परिसीमन आयोग नेमण्यात आला. स्वतंत्र भारतामध्ये आतापर्यंत चार वेळा परिसीमन आयोगाची निर्मिती अनुक्रमे १९५३, १९६३, १९७३, २००२ मध्ये झाली.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या राज्यांचा गट अ,ब, क या वर्गवारी पहिल्या मतदारसंघ पुनर्रचना आयोगाने रद्द केल्या. केंद्रशासित व घटकराज्ये असे दोन गट निर्माण केले. दोन गटांमध्ये १३ घटकराज्ये व ४ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश केला. या आयोगाने एक प्रतिनिधी व दोन प्रतिनिधी मतदारसंघाची पुनर्रचना केली.

### १.१२.२ दुसरा परिसीमन आयोग(१९६३) :–

संविधान तरतूदीनुसार दर दहा वर्षानी लोकसभा व विधानसभा पुनर्रचना करण्यात यावी. १९६२ च्या परिसीमन आयोगाने १९६१ च्या जनगणनेवर आधारित मतदारसंघाची पुनर्रचना केली. दोन प्रतिनिधी मतदारसंघ बरखास्त करण्याचा कायदा करण्यात आला. १९६३ च्या पुनर्रचनेनुसार एक मतदारसंघ एक प्रतिनिधी हे तत्त्व अंमलात आले. त्यामुळे द्विप्रतिनिधी मतदार संघाचे रूपांतर एक प्रतिनिधी मतदारसंघात झाले.[२६]

### १.१२.३ तिसरा परिसीमन आयोग (१९७३)

मतदारसंघ पुनर्रचनेच्यादृष्टिने हा कायदा महत्त्वपूर्ण मानला जातो. या कायद्यामध्ये मतदारसंघ पुनर्रचना निकष व तत्त्वांचा विचार करण्यात आला. तिसऱ्या परिसीमन कायद्यात अनेक महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले.

उदा. राखीव जागांची निश्चिती, आयोगावरील सहयोगी सदस्यांचा मुद्दा, प्रशासकीय सीमांचा निकष, मतदारसंघानुसार लोकसंख्येचा निकष इ.बाबींचा विचार केलेला दिसतो.

## १.१३ मतदारसंघ पुनर्रचनेची मार्गदर्शक तत्त्वे/निकष

भारतीय संसद वेळोवेळी कायदे करून आयोगासंबंधीचे निकष किंवा मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करते. त्याचप्रमाणे १९७२ च्या परिसीमन कायद्यात अशा स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित केलेली असतात. परिसीमन आयोगामार्फत मतदारसंघाची पुनर्रचना करताना काही निकष पाळण्याची गरज असते.[२७]

### १.१३.१ परिसीमन कायद्यातील मार्गदर्शक तत्त्वे :-

१) मतदारसंघाची निश्चिती करताना भौगोलिक एकसंघपणा, प्राकृतिक रचना, सध्याच्या सीमा, प्रशासकीय युनिट, जनतेची सोय व दळणवळणाची साधने याला प्राधान्य द्यावे.

२) विधानसभा मतदारसंघ संपूर्णतः एकाच लोकसभा मतदारसंघात असावा.

३) ज्या मतदारसंघात अनुसूचित जातींची संख्या जास्त ते मतदारसंघ राखीव करावेत. ते मतदारसंघ राज्यभर विखुरलेले असावेत.

४) ज्या मतदारसंघात अनुसूचित जमातीची संख्या जास्त आहे. ते मतदारसंघ राखीव करावेत.

## १.१४ चौथा परिसीमन आयोग(२००२)

संसदेने २००१ मध्ये ८४ वी घटनादुरूस्ती करून २००२ मध्ये कायदा करून चौथ्या परिसीमन आयोगाची स्थापना केली. १९७३ च्या परिसीमन कायद्यातील निकष व मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये बदल करून २००२ चा परिसीमन कायदा संमत केला.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८२ नुसार मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची स्थापना लोकसभेमार्फत करण्यात येते. या समितीची रचना पुढीलप्रमाणे –

१) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश (हे पदसिद्ध अध्यक्ष)

२) केंद्रिय निवडणुक आयोगाचे मुख्य निवडणुक आयुक्त(पदसिद्ध सदस्य)

३) सर्व घटक राज्यांच्या निवडणुक आयोगाचे आयुक्त (पदसिद्ध सदस्य)

४) सहयोगी सदस्य म्हणून १० सदस्य असतात.

## १.१५ रचना :–

### १.१५.१ पहिला परिसीमन आयोग – १९५३

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या राज्यांचा गट अ,ब,क या वर्गवारी पहिल्या मतदारसंघ पुनर्रचना आयोगाने रद्द केल्या. केंद्रशासित प्रदेश व घटकराज्ये असे दोन गट तयार केले. या दोन गटांमध्ये १३ घटकराज्ये व ४ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश केला. तसेच या परिसीमन आयोगाने एक प्रतिनिधी व दोन प्रतिनिधी मतदारसंघाची पुनर्रचना केली. परंतु प.बंगाल राज्यामधील तीन प्रतिनिधी असलेला मतदारसंघ रद्द केला.

पहिल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर दिल्ली घटकराज्यातील लोकसभा मतदारसंघाची विभागणी पाहिली असता असे दिसून येते की, बॉम्बे घटकराज्यातंर्गत ५८ मतदारसंघात एक प्रतिनिधी मतदारसंघात ४६ सर्वसाधारण गटासाठी तर ४ एस.टी.साठी जागा राखून ठेवलेल्या आहेत. तसेच दोन प्रतिनिधी मतदारसंघात सर्वसाधारणसाठी ८, एस.सी.साठी ७ व एस.टी. साठी १ अशा एकूण १६ जागांची विभागणी झालेली दिसून येते.[२८]

### १.१५.२ दुसरा परिसीमन आयोग (१९६३)

पहिल्या परिसीमन आयोगानंतर दुसऱ्या परिसीमन आयोगात काही बदल केलेले दिसून येतात. पहिल्या परिसीमनाच्या वेळी द्विसदस्य प्रतिनिधीत्वाचा विचार करण्यात आलेला होता. परंतु दुसऱ्या परिसीमन आयोगामध्ये द्विसदस्याऐवजी एकप्रतिनिधी या तत्त्वांचा विचार करण्यात आला. त्यामुळे अगोदरच्या द्विप्रतिनिधी मतदारसंघ रद्द होऊन त्याऐवजी एकसदस्य मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली.

दुसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर महाराष्ट्रामध्ये ५८ ऐवजी ४५ इतकी मतदारसंघाची निर्मिती झाली. त्यामध्ये सर्वसाधारण वर्गासाठी ३९ जागा अनुसूचित जातीसाठी ०३ जागा व अनुसूचित जमातीसाठी ०३ जागा राखीव ठेवण्यात आल्या. या पुनर्रचनेत प्रतिनिधीत

संख्येइतकीच मतदाराची संख्या दिसून येते. कारण दोन प्रतिनिधी मतदारसंघ बरखास्त करण्यात आले. एकूणच या पुनर्रचनेचा विचार करता लोकसंख्या वाढल्यामुळे मतदारसंघामध्ये वाढ झाली.

१९६१ च्या जनगणनेनुसार लोकसभा मतदारसंघ वाढले. त्यामुळे लोकसभेची सदस्य संख्या ५२० इतकी झाली. त्यामध्ये ४०६ जागा खुल्या, ७७ जागा अनुसूचित जातीसाठी तर ३७ जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या.[२९]

### १.१५.३ तिसरा परिसीमन आयोग (१९७३)

१९७१ च्या जनगणनेनुसार विधानसभा व लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्याची संपूर्ण जबाबदारी तिसऱ्या परिसीमन आयोगावर होती. १९७० च्या दशकामध्ये भारतातील घटकराज्यांच्या रचनेत बऱ्यापैकी सुसूत्रता आलेली दिसते. कारण भारतामध्ये भाषावार प्रांतरचना निर्माण झालेली होती. पाश्चिमात्यांच्या प्रांतरचना निर्माण झालेली होती. पाश्चिमात्यांच्या ताब्यात असलेले भारतीय भूभाग भारतीय राज्यात सामील करण्यात आलेले होते. तसचे केंद्रशासित प्रदेशांची निश्चिती झाली होती. वरील सर्व बदलामुळे तिसऱ्या परिसीमन आयोगाला राज्यांनुसार लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना करणे बऱ्याच अंशी सोपे झाल्याचे दिसते.

**तिसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतरची लोकसभा मतदारसंघाची स्थिती[३०]**

| अ.क्र. | राज्य | जनरल | एस.सी. | एस.टी. | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | ३४ | ६ | २ | ४२ |
| २. | अरूणाचलप्रदेश | २ | – | – | २ |
| ३. | आसाम | ११ | १ | २ | १४ |
| ४. | बिहार | ४१ | ८ | ५ | ५४ |
| ५. | गोवा दमण दिव | २ | – | – | २ |
| ६. | गुजरात | २० | २ | ४ | २६ |
| ७. | हरियाणा | ८ | २ | – | १० |
| ८. | हि.प्रदेश | ३ | १ | – | ४ |
| ९. | जम्मू काश्मिर | ६ | – | – | ६ |
| १०. | कर्नाटक | २४ | ४ | – | २८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | केरळ | १८ | २ | – | २० |
| १२. | मध्यप्रदेश | २५ | ६ | ९ | ४० |
| १३. | महाराष्ट्र | ४१ | ३ | ४ | ४८ |
| १४. | मणिपूर | १ | – | १ | २ |
| १५. | मेघालय | २ | – | – | २ |
| १६. | मिझोराम | – | – | १ | १ |
| १७. | नागालँड | १ | – | – | १ |
| १८. | ओरिसा | १३ | ३ | ५ | २१ |
| १९. | पंजाब | १० | ३ | – | १३ |
| २०. | राजस्थान | १८ | ४ | ३ | २५ |
| २१. | सिक्किम | १ | – | १ | २ |
| २२. | तामिळनाडू | ३२ | ७ | – | ३९ |
| २३. | त्रिपूरा | १ | – | १ | २ |
| २४. | उत्तरप्रदेश | ६७ | १८ | – | ८५ |
| २५. | पश्चिम बंगाल | ३२ | ८ | २ | ४२ |
| | **केंद्रशासित प्रदेश** | | | | |
| १. | अंदमान निकोबार | १ | – | – | १ |
| २. | चंदिगड | १ | – | – | १ |
| ३. | दादरा व नगरहवेली | – | – | १ | १ |
| ४. | दिल्ली | ६ | १ | – | ७ |
| ५. | लक्षद्विप | – | – | १ | १ |
| ६. | पाँडिचरी | – | – | १ | १ |
| | एकूण | ४२२ | ७९ | ४१ | ५४२ |

तिसऱ्या परिसीमन आयोगाने १९७२ च्या परिसीमन आयोग कायद्यातील तरतूदींना अनुसरून कायद्याच्या मर्यादित चौकटीत परिसीमन आयोगाने लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना केलेली दिसते. दुसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेच्या तुलनेत तिसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेत लोकसभा मतदारसंघामध्ये २२ जागांची वाढ होऊन एकूण सदस्य संख्या ५४२ झालेली दिसते. ५४२ जागांपैकी ४२२ जागा

खुल्या गटासाठी तर ७९ जागा अनुसूचित जातीसाठी व ४१ जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या.

उत्तरप्रदेश ८५ जागा, बिहार ५४ जागा, तर महाराष्ट्रात ४८ जागा लोकसभा मतदारसंघाच्या आहेत. कारण या तीन राज्यांमध्ये लोकसंख्या जास्त आहे. या तीन राज्यांमध्ये लोकसभेचे १/३ पेक्षा जास्त मतदारसंघ दिसून येतात. पूर्वेडील काही राज्ये व केंद्रशासित प्रदेशामध्ये कमी लोकसभा मतदारसंघ दिसून येतात.

**लोकसभा व राज्याच्या विधानसभेमध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव मतदारसंघ–**

भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेत कलम ३३०(२व३) व कलम ३३२(४) नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी लोकसभा व घटकराज्यांच्या विधानसभांमध्ये राखीव जागा ठेवल्या जातील अशी तरतूद केली. भारतीय राज्यघटनेतील राखीव जागाबाबतच्या तरतूदींना अनुसरूनच प्रत्येक परिसीमन आयोगामार्फत लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना केलेली दिसून येते. १९५३, १९६३, १९७३ व २००२ च्या परिसीमन आयोगामार्फत झालेल्या मतदारसंघ पुनर्रचनेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते.[३१]

| अ.क्र. | पुनर्रचना वर्ष | अनुसूचित जातीचे मतदारसंघ | अनुसूचित जमातीचे मतदारसंघ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | १९५३ | ७६ | ३१ | १०७(४९०) |
| २. | १९६३ | ७७ | ३७ | ११४(५२०) |
| ३. | १९७३ | ७९ | ४१ | १२०(५४२) |
| ४. | २००२ | ८४ | ४७ | १३१(५४३) |

प्रत्येक मतदारसंघ पुनर्रचनेत सर्वसाधारण व राखीव जागांमध्ये त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. २००२ च्या मतदारसंघ पुनर्रचनेत लोकसभेसाठी ५४३ पैकी अनुसूचित जातीसाठी ८४ तर अनुसूचित जमातीसाठी ४७ मतदारसंघ राखीव होते. महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागापैकी अनुसूचित जातीसाठी २९ तर अनुसूचित जमातीसाठी २५ मतदारसंघ राखीव ठेवण्यात आले. भारतातील लोकसभेच्या एकूण ५४३ सदस्यापैकी १३१

जागा अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव तर ४१२ जागा खुला वर्गासाठी असलेल्या दिसून येतात.

### १.१५.४ चौथा परिसीमन आयोग :–

संसदेने २००१ मध्ये ८४ वी घटनादुरुस्ती करून व २००२ मध्ये कायदा करून चौथ्या परिसीमन आयोगाची स्थापना केली. १९७३ च्या परिसीमन कायद्यातील निकष व मार्गदर्शक तत्त्वामध्ये काही बदल करून २००२ चा परिसीमन कायदा संमत केला. चौथ्या परिसीमन आयोगाने एकूण ४८ लोकसभा मतदारसंघाच्या संख्येमध्ये बदल न करता अंतर्गत मतदारसंघामध्ये फेरफार केल्याचे दिसते.

महाराष्ट्र राज्यातील ४८ लोकसभेच्या व २८८ विधानसभेच्या जागांची पुनर्रचना करताना चौथ्या विधानसभेच्या जागांची पुनर्रचना करताना चौथ्या परिसीमन आयोगाचे सदस्य खालीलप्रमाणे होते.[३२]

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद | पक्ष |
|---|---|---|---|
| १. | न्या.कुलदिपसिंग | अध्यक्ष | |
| २. | एन.गोपालस्वामी | सचिव (केंद्रिय निवडणुक आयुक्त) | |
| ३. | नंदलाल | राज्य निवडणुक आयुक्त | |
| ४. | रामदास आठवले | लोकसभा सदस्य | रिपाई |
| ५. | श्रीनिवास पाटील | लोकसभा सदस्य | रा.काँग्रेस |
| ६. | बाळासो विखे पाटील | लोकसभा सदस्य | काँग्रेस |
| ७. | प्रकाश परांजपे | लोकसभा सदस्य | शिवसेना |
| ८. | महादेव शिवणकर | लोकसभा सदस्य | भाजप |
| ९. | दिलीप वळसे पाटील | विधानसभा सदस्य | राष्ट्रवादी काँग्रेस |
| १०. | भाऊसाहेब थोरात | विधानसभा सदस्य | काँग्रेस |
| ११. | सुभाष देसाई | विधानसभा सदस्य | काँग्रेस |
| १२. | गोपीनाथ मुंडे | विधानसभा सदस्य | भाजप |
| १३. | हर्षवर्धन देशमुख | विधानसभा सदस्य | जनसुराज्य |

२००१ च्या जनगणनेवर आधारित लोकसभा व विधानसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेची जबाबदार या आयोगाकडे होती. २००२ ते २००७ या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये परिसीमन

आयोगाने संपूर्ण देशभरात पुनर्रचनेचे कार्य पूर्ण केलेले दिसते. आयोगाने सादर केलेल्या अंतिम आराखड्यावर मार्च २००८ मध्ये संसदेत चर्चा करून शिक्कामोर्तब करण्यात आले. यानंतर राष्ट्रपतीची स्वाक्षरी होऊन आराखड्याला अंतिम मान्यता देण्यात आली.

**चौथ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतरची लोकसभा मतदारसंघाची स्थिती**[३३]

| अ.क्र. | राज्य | जनरल | एस.सी. | एस.टी. | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | ३२ | ०७ | ०३ | ४२ |
| २. | अरूणाचलप्रदेश | २ | – | – | २ |
| ३. | आसाम | ११ | १ | २ | १४ |
| ४. | बिहार | ३४ | ६ | – | ४० |
| ५. | छत्तीसगढ | ०६ | ०१ | ०४ | ११ |
| ६. | गोवा | ०२ | – | – | ०२ |
| ७. | गुजरात | २० | २ | ४ | २६ |
| ८. | हरियाणा | ८ | २ | – | १० |
| ९. | हिमाचलप्रदेश | ३ | १ | – | ४ |
| १०. | जम्मू काश्मिर | ६ | – | – | ६ |
| ११. | कर्नाटक | २१ | ५ | २ | २८ |
| १२. | केरळ | १८ | २ | – | २० |
| १३. | मध्यप्रदेश | १९ | ०४ | ०६ | २९ |
| १४. | महाराष्ट्र | ३९ | ०५ | ०४ | ४८ |
| १५. | मणिपूर | १ | – | १ | २ |
| १६. | मेघालय | – | – | ०२ | २ |
| १७. | मिझोराम | – | – | ०१ | ०१ |
| १८. | नागालँड | ०१ | – | – | ०१ |
| १९. | ओरिसा | १३ | ३ | ५ | २१ |
| २०. | पंजाब | ०९ | ०४ | – | १३ |
| २१. | राजस्थान | १८ | ४ | ३ | २५ |
| २२. | सिक्किम | ०१ | – | – | ०१ |
| २३. | तामिळनाडू | ३२ | ७ | – | ३९ |
| २४. | त्रिपूरा | १ | – | १ | २ |
| २५. | उत्तराखंड | ४ | १ | – | ५ |
| २६. | उत्तरप्रदेश | ६३ | १७ | – | ८० |
| २७. | पश्चिम बंगाल | ३२ | ८ | २ | ४२ |
| | **केंद्रशासित प्रदेश** | | | | |
| १. | अंदमान निकोबार | १ | – | – | १ |
| २. | चंदिगड | १ | – | – | १ |
| ३. | दादरा व | – | – | १ | १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | नगरहवेली | | | | |
| ४. | दिल्ली | ६ | १ | – | ७ |
| ५. | दमण व दिव | ०१ | – | ०१ | ०२ |
| ६. | लक्षद्विप | १ | – | – | १ |
| ७. | पाँडेचरी | १ | – | – | १ |
| ८. | एकूण | ४१२ | ८४ | ४७ | ५४३ |

चौथ्या परिसीमन आयोगाने केलेल्या ५४३ लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेमध्ये ४१२ लोकसभा मतदारसंघ सर्वसाधारण वर्गासाठी ८४ लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी व ४७ लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आले. चौथ्या परिसमिन आयोगाच्या पुनर्रचनेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या जागांमध्ये वाढ झालेली दिसून येते.

**चौथ्या परिसीमन आयोगाच्या पुनर्रचनेनंतरची महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघाची जिल्हानिहाय मतदारसंघ संख्या**[३४]

| अ.क्र. | जिल्हा | खुला | एस.सी. | एस.टी. | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | नंदूरबार | – | – | ०१ | ०१ |
| २. | धुळे | – | – | – | – |
| ३. | जळगांव | – | – | – | – |
| ४. | बुलढाणा | – | – | – | – |
| ५. | अकोला | – | – | – | – |
| ६. | वाशिम यवतमाळ | – | – | – | – |
| ७. | अमरावती | – | – | – | – |
| ८. | वर्धा | – | – | – | – |
| ९. | नागपूर | – | – | – | – |
| १०. | भंडारा गोंदिया | – | – | – | – |
| ११. | गडचिरोली | – | – | ०१ | ०१ |
| १२. | चंद्रपूर | ०१ | – | – | ०१ |
| १३. | नांदेड | ०१ | – | – | ०१ |
| १४. | हिंगोली | ०१ | – | – | ०१ |
| १५. | परभणी | ०१ | – | – | ०१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६. | जालना | ०१ | – | – | ०१ |
| १७. | औरंगाबाद | ०१ | – | – | ०१ |
| १८. | नाशिक | ०१ | – | ०१ | ०२ |
| १९. | ठाणे | ०३ | – | ०१ | ०४ |
| २०. | मुंबई उपनगर | ०४ | – | – | ०४ |
| २१. | मुंबई शहर | ०२ | – | – | ०२ |
| २२. | रायगड | ०१ | – | – | ०१ |
| २३. | पुणे | ०४ | – | – | ०४ |
| २४. | अ.नगर | ०१ | ०१ | – | ०२ |
| २५. | बीड | ०१ | – | – | ०१ |
| २६. | लातूर | – | ०१ | – | ०१ |
| २७. | उस्मानाबाद | ०१ | – | – | ०१ |
| २८. | सोलापूर | ०१ | ०१ | – | ०२ |
| २९. | सातारा | ०१ | – | – | ०१ |
| ३०. | सिंधुदुर्ग रत्नागिरी | ०१ | – | – | ०१ |
| ३१. | कोल्हापूर | ०२ | – | – | ०२ |
| ३२. | सांगली | ०१ | – | – | ०१ |
| | एकूण | ३९ | ०५ | ०४ | ४८ |

चौथ्या परिसीमन आयोगाने महाराष्ट्रातील लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना केली. त्यामध्ये ३९ जागा सर्वसाधारण गट, ५ जागा अनुसूचित जातीसाठी तर ४ जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या. तिसऱ्या परिसीमन आयोगातील पुनर्रचनेशी तुलना करता सर्वसाधारण गटामध्ये २ जागा कमी झाल्या व २ जागा अनुसूचित जातीसाठी वाढल्या तर अनुसूचित जमातीच्या जागामध्ये काहीही बदल झाला नाही.

**पुनर्रचनेनंतरचे अनुसूचित जातीसाठीचे महाराष्ट्रातील विभागनिहाय राखीव लोकसभा मतदारसंघ**[३५]

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारसंघ |
|---|---|---|---|---|
| १. | उत्तर महाराष्ट्र | – | – | – |
| २. | विदर्भ | अमरावती<br>नागपूर | अमरावती<br>रामटेक | ०१<br>०१ |
| ३. | मराठवाडा | लातूर | लातूर | ०१ |
| ४. | मुंबईसह कोकण | – | – | – |
| ५. | पश्चिम महाराष्ट्र | अहमदनगर<br>सोलापूर | शिर्डी<br>सोलापूर | ०१<br>०१ |

महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघापैकी ५ लोकसभा मतदारसंघापैकी ५ लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणाचे विश्लेषण करताना वरील प्रमुख पाच प्रादेशिक विभागामध्ये रचना केली जाते. उत्तर महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ नाही. विदर्भात अमरावती व रामटेक हे दोन लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. मराठवाड्यात लातूर हा एकमेव लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. मुंबईसह कोकणात अनुसूचित जातीसाठी राखीव लोकसभा मतदारसंघ नाही. तर पश्चिम महाराष्ट्रात शिर्डी व सोलापूर हे दोन लोकसभा मतदारसंघ राखीव आहेत.

**पुनर्रचनेनंतरचे अनुसूचित जातीसाठीचे महाराष्ट्रातील विभागनिहाय राखीव लोकसभा मतदारसंघ**[३६]

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारसंघ |
|---|---|---|---|---|
| १. | उत्तर महाराष्ट्र | नंदुरबार<br>नाशिक | नंदुरबार<br>दिंडोरी | ०१<br>०१ |
| २. | विदर्भ | गडचिरोली | गडचिरोली | ०१ |
| ३. | मराठवाडा | – | – | – |
| ४. | मुंबईसह कोकण | ठाणे | पालघर | ०१– |
| ५. | पश्चिम महाराष्ट्र | – | – | – |

(पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९ पृ.क्र. )

महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघापैकी ४ लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. अनुसूचित जमातीच्या चार राखीव मतदारसंघापैकी उत्तर महाराष्ट्रामध्ये नंदुरबार व दिंडोरी हे दोन लोकसभा मतदारसंघ आहेत. विदर्भात गडचिरोली हा लोकसभा मतदारसंघ राखीव आहे. मुंबईसह कोकण विभागात पालघर हा लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. तर मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या कमी प्रमाणात आहे. त्यामुळे तेथे अनुसूचित जमातीसाठी राखीव मतदारसंघ नाही.

## १.१६ मतदारसंघ पुनर्रचना अडथळे व परिणाम

### १.१६. १ मतदारसंघ पुनर्रचना पद्धती स्वीकारण्यात अडचण –

मतदारसंघ पुनर्रचना करण्यासाठी अनेक पद्धती आहेत. यापैकी साधारणतः कोटा व वेबस्टर या दोन पद्धतींनी भारतामध्ये पुनर्रचना केली जाते. तरीसुद्धा काही घटकराज्यांच्या मतदारसंघ पुनर्रचनेसाठी ही पद्धत समाधानकारकरित्या लागू पडत नाही. आजपर्यंत एकाही मतदारसंघ पुनर्रचना समितीने कोणत्या पद्धतीने पुनर्रचना केलेली आहे. याचे स्पष्टीकरण दिलेले नाही.[३७]

### १.१६.२ असंतुलित लोकसंख्येच्या प्रमाणावर आधारित मतदारसंघाची रचना –

वास्तविक पाहता लोकसंख्या वाढली की मतदारसंघाची संख्या वाढणे आवश्यक आहे. परंतु इ.स. २०२६ पर्यंत मतदारसंघाच्या संख्येत कोणताही बदल होणार नसल्यामुळे असंतुलित लोकसंख्येच्या प्रमाणात मतदारसंघाची रचना झालेली आहे. यामुळे मूळ मतदारसंघ रचनेच्या तत्त्वाला बाधा येत आहे. उदा.आऊटर दिल्लीचा लोकसभेचा प्रतिनिधी ३१ लाख लोकसंख्येचे प्रतिनिधीत्व करत आहे. तर महाराष्ट्रामधील ठाणे लोकसभा मतदारसंघ हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा लोकसभेचा मोठा मतदारसंघ आहे. यामध्ये २८ लाख लोकसंख्या आहे. तर केवळ ३७ हजार लोकसंख्या असणारा लक्षद्वीप हा छोटा लोकसभा मतदारसंघ आहे.

### १.१६.३ प्रादेशिक व भौगोलिक असमतोल–

काही मतदारसंघ क्षेत्रफळाच्यादृष्टिने फारच मोठे आहेत तर काही मतदारसंघ क्षेत्रफळाच्यादृष्टीने अतिशय छोटे आहेत. याचा परिणाम उमेदवाराच्या प्रचार यंत्रणा राबवताना

होतो. उदा. लडाख लोकसभा मतदारसंघाचे क्षेत्रफळ एक लाख चौऱ्याहत्तर हजार चौरस कि.मी.ची आहे तर महाराष्ट्रातील मुंबई दक्षिण मध्य हा मतदारसंघ अठरा चौ.कि.मी. चा आहे.

### १.१६.४ असंतुलित विकास–

लोकसंख्या व क्षेत्रफळ भिन्न असले तरी संबंधित मतदारसंघ प्रतिनिधीला मिळणारा निधी समान आहे. त्यामुळे जास्त लोकसंख्या व जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या मतदारसंघाचा विकास होऊ शकत नाही.

### १.१६.५ शहरी व ग्रामीण विभाजन –

मतदारसंघ पुनर्रचनेमुळे शहरी भागात प्रतिनिधीची संख्या वाढलेली आहे. तुलनेने ग्रामीण भागातील जनतेचे शहरात स्थलातंर झाल्यामुळे ग्रामीण मतदारसंघाची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे भविष्यातील राजकारण, शहरी नेतृत्त्वास पोषक ठरणारे आहे. उदा.महाराष्ट्र

**चौथ्या परिसीमन आयोगाने महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघाची जिल्हा व वर्गनिहाय मतदारसंघ संख्या**[३८]

| अ.क्र. | जिल्हा | खुला | एस.सी. | एस.टी. | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | नंदूरबार | – | – | ०४ | ०४ |
| २. | धुळे | ०३ | – | ०२ | ०५ |
| ३. | जळगांव | ०९ | ०१ | ०१ | ०१ |
| ४. | बुलढाणा | ०६ | ०१ | – | ०७ |
| ५. | अकोला | ०४ | ०१ | – | ०५ |
| ६. | वाशिम | ०२ | ०१ | – | ०३ |
| ७. | अमरावती | ०६ | ०१ | ०१ | ०८ |
| ८. | वर्धा | ०४ | – | – | ०४ |
| ९. | नागपूर | १० | ०२ | – | १२ |
| १०. | भंडारा | ०२ | ०१ | – | ०३ |
| ११. | गोंदिया | ०२ | ०१ | ०१ | ०४ |
| १२. | गडचिरोली | – | – | ०३ | ०३ |
| १३. | चंद्रपूर | ०५ | ०१ | – | ०६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४. | यवतमाळ | ०४ | ०१ | ०२ | ०७ |
| १५. | नांदेड | ०८ | ०१ | – | ०९ |
| १६. | हिंगोली | ०३ | – | – | ०३ |
| १७. | परभणी | ०४ | – | – | ०४ |
| १८. | जालना | ०४ | ०१ | – | ०५ |
| १९. | औरंगाबाद | ०८ | ०१ | – | ०९ |
| २०. | नाशिक | १० | ०१ | ०१ | १५ |
| २१. | ठाणे | १७ | ०१ | – | २४ |
| २२. | मुंबई उपनगर | २५ | ०१ | – | २६ |
| २३. | मुंबई शहर | ०९ | ०१ | – | १० |
| २४. | रायगड | ०७ | – | – | ०७ |
| २५. | पुणे | १९ | ०१ | – | २१ |
| २६. | अ.नगर | १० | ०१ | – | १२ |
| २७. | बीड | ०५ | ०१ | – | ०६ |
| २८. | लातूर | ०५ | ०१ | – | ०६ |
| २९. | उस्मानाबाद | ०३ | ०१ | – | ०४ |
| ३०. | सोलापूर | ०९ | ०१ | – | ११ |
| ३१. | सातारा | ०७ | ०१ | – | ०८ |
| ३२. | रत्नागिरी | ०५ | – | – | ०५ |
| ३३. | सिंधुदुर्ग | ०३ | – | – | ०३ |
| ३४. | कोल्हापूर | ०९ | ०१ | – | १० |
| ३५. | सांगली | ०७ | ०१ | – | ०८ |

(संदर्भ - www.eco.gov.in)

चौथ्या परिसीमन आयोगाच्या पुनर्रचनेनंतर महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या २८८ मतदारसंघापैकी २३४ मतदारसंघ सर्वसाधारण वर्गासाठी २९ मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी व २५ मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आले. तिसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेच्या तुलनेत चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेत सर्वसाधारण मतदारसंघ कमी होऊन राखीव

मतदारसंघ वाढलेले दिसतात. महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यापैकी २६ जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ आहेत तर १० जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव मतदारसंघ आहेत. ६ जिल्ह्यामध्ये राखीव मतदारसंघ नाहीत तर २ जिल्ह्यामध्ये सर्वसाधारण वर्गासाठी मतदारसंघ नाहीत. अनुसूचित जातीचे मतदारसंघ शहरी भागाऐवजी जास्त आहेत. (प्रकाश पवार २००८) अनुसूचित जातीच्या बाबतीत असे दिसून येते. की चळवळीचे केंद्र शहर व नेतृत्त्वाचे केंद्र ग्रामीण असे विसंगत चित्र दिसते.

चौथ्या परिसीमन आयोगानुसार महाराष्ट्रातील विभागनिहाय विधानसभा मतदारसंघ शहरी व ग्रामीण माहिती पुढीलप्रमाणे[३९]

| अ. क्र. | विभाग | ग्रामीण | ग्रामीण बहुल | शहरी | शहरी बहुल | निम शहरी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उ.महाराष्ट्र | ८(२८) | १७(४) | ६(२) | २(२) | २(–) | ३५(३६) |
| २. | विदर्भ | १४(४६) | २५(१०) | ९(७) | ९(७) | १३(–) | ६२(६२) |
| ३. | मराठवाडा | १५(३५) | २२(८) | ४८(२) | ४८(२) | २(–) | ४६(४६) |
| ४. | प.महाराष्ट्र | २३(५६) | २३(४) | २०(१३) | २०(१३) | ३(२) | ७०(७५) |
| ५. | मुंबईसह कोकण | ५(२६) | १३(–) | ५३(३९) | ५३(३९) | ३(–) | ७५(६५) |
| | एकूण | ६५(१९१) | १००(२६) | ९२(६३) | ९२(६३) | २३(२) | २८८(२८८) |

(संदर्भ – प्रकाश पवार, मतदारसंघ पुनर्रचना २००८ पान नं.३४)

(कंसातील आकडे तिसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेसंबंधी विधानसभा संघाची संख्या दर्शवितात)

पुनर्रचनेपूर्वी ग्रामीण राजकारणाचे शहरी हितसंबंधावर नियंत्रण होते. कारण शहरी मतदारसंघ कमी व ग्रामीण मतदारसंघ जास्त होते. परंतु चौथ्या मतदारसंघ १६५ आहेत जे की पूर्वी २१७ होते. म्हणजे ५२ मतदारसंघ कमी झाले तर शहरी मतदारसंघ १२३ आहेत जे की पूर्वी ७१ होते.

ग्रामीण हितसंबंधाची बाजू घेणारे राज्यात १६५ विधानसभा मतदारसंघ आहेत. म्हणजेच सध्या ग्रामीण व शहरी विधानसभा मतदारसंघात ४२ मतदारसंघाचाच फरक आहे. तिसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेवेळी हा फरक १४६ मतदारसंघाचा होता. म्हणजे मतदारसंघाच्या संख्याबळानुसार ग्रामीण व शहरी हितसंबंधावरील स्पर्धा जास्त तीव्र झाली आहे. शहरी

मतदारसंघ जरी ग्रामीण मतदारसंघापेक्षा संख्येने कमी असले तरी शहरी हितसंबंधाचा वरचष्मा स्पष्टपणे जाणवतो.

**चौथ्या परिसीमन आयोगानुसार महाराष्ट्रातील विभागनिहाय लोकसभा मतदारसंघाचे पृथःकरण**[४०]

| अ.क्र. | विभाग | सर्वसाधारण मतदारसंघ | अनुसूचित जातीचे मतदारसंघ | अनुसूचित जमातीचे मतदारसंघ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | उ.महाराष्ट्र | ०४(०४) | (–) | २(२) | ६(६) |
| २. | विदर्भ | ७(१०) | २(१) | १(–) | १०(११) |
| ३. | मराठवाडा | ७(६) | १(१) | –(–) | ८(८) |
| ४. | प.महाराष्ट्र | १०(११) | २(१) | –(–) | १२(१२) |
| ५. | मुंबईसह कोकण | ११(१०) | –(–) | १(१) | १२(११) |
| ०६ | एकूण | ३९(४२) | ५(३) | ४(३) | ४८(४२) |

(संदर्भ – प्रकाश पवार २००८ पान नं.३४)

(कंसातील आकडे तिसऱ्या परिसीमन आयोगातील मतदारसंघाची संख्या दर्शवितात)

**२००२ च्या परिसीमन आयोगानुसार महाराष्ट्रातील विभागनिहाय राखीव व विधानसभा मतदारसंघाचे पृथःकरण**[४१]

| अ.क्र. | विभाग | सर्वसाधारण मतदारसंघ | अनुसूचित जातीचे मतदारसंघ | अनुसूचित जमातीचे मतदारसंघ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | उ.महाराष्ट्र | २२(२४) | २(२) | ११(१०) | ३५(३६) |
| २. | विदर्भ | ४७(५७) | १०(३) | ७(६) | ६२(६६) |
| ३. | मराठवाडा | ४०(४१) | ६(५) | ०(–) | ४६(४६) |
| ४. | प.महाराष्ट्र | ६१(६७) | ८(७) | १(१) | ७०(७५) |
| ५. | मुंबईसह कोकण | ३४(३३) | २(१) | ०(–) | ३६(३४) |
| ६. | कोकण | ३२(२६) | १८(–) | ६(५) | ३९(३१) |
| | एकूण | २३४(२४८) | २९(१८) | २५(२२) | २८८(२८८) |

(संदर्भ – प्रकाश पवार २००८ पान नं.३४)

(कंसातील आकडे हे १९७२–२००४ पर्यतची संबंधित विधानसभा मतदारसंघाची संख्या दर्शवितात)

उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात पुनर्रचनेनंतर लोकसभा मतदारसंख्येत बदल झाला नाही. मात्र पुनर्रचनेनंतर विदर्भातील लोकसभेचा १ मतदारसंघ कमी झाला तर मुंबईसह कोकण विभागात एका मतदारसंघाची वाढ झाली. पुनर्रचनेनंतर मुंबईसह कोकण विभाग, पश्चिम महाराष्ट्राच्या लोकसभा मतदारसंघाच्या बरोबरीने झाला आहे.

प्रामुख्याने उ.महाराष्ट्र व विदर्भातील राखीव मतदारसंघाची पुनर्रचना झाल्याचे दिसून येते. उत्तर महाराष्ट्रातील ३५ पैकी १३ व विदर्भातील ६२ पैकी १७ मतदारसंघ राखीव झाले आहेत. विधानसभेचे १४ मतदारसंघ १९७८ च्या तुलनेत नव्याने राखीव झाले आहेत. या नवीन १४ राखीव जागांपैकी अनुसूचित जातीसाठी ११ मतदारसंघ राखीव झाले आहेत. नवबौद्ध समाजाचा २००२ च्या परिसीमन आयोगाने अनुसूचित जातीगटात समावेश केला आहे. महाराष्ट्रात २००१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या ९८,८१६५६(१०.२७ टक्के) आहे. तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८५,७७, २७६(८.७ टक्के) आहे. त्यामुळे अनुसूचित जाती व जमातींच्या या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार राज्याच्या एकूण २८८ विधानसभा मतदारसंघापैकी अनुसूचित जाती व जमातीसाठी अनुक्रमे २९ व २५ मतदारसंघ राखीव ठेवण्यात आले आहेत.

## १.१७ परिसीमन आयोग– भूमिका –बंधने –

### १.१७.१ सरासरी लोकसंख्येनुसार मतदारसंघाची पुनर्रचना –

दुसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेत भारतामध्ये लोकसभेचे ५२० मतदारसंघ होते. त्यापैकी ५०७ लोकसभा मतदारसंघ हे १५ मोठ्या राज्यामध्ये होते. तर राहिलेले (५२०–५०७) १३ लोकसभा मतदारसंघ हे लहान राज्ये व केंद्रशासित प्रदेशामध्ये होते. तिसऱ्या परिसीमन आयोगाने मतदारसंघाची पुनर्रचना करताना १९७१ च्या जनगणनेच्या एकूण लोकसंख्येत ५०७ ने विभागून जी संख्या येईल ती लोकसभा मतदारसंघाची सरासरी लोकसंख्या काढली होती. या सरासरी लोकसंख्येनुसार राज्या–राज्यामधील मतदारसंघाची पुनर्रचना केलेली दिसून येते. १५ मोठी राज्ये वगळता इतर केंद्रशासित प्रदेशामधील व लहान राज्यामधील लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचन करताना मतदारसंघानुसार सरासरी लोकसंख्येचा निकष शिथिल केलेला दिसून येतो. कारण मुळातच या राज्यामधील व

केंद्रशासित प्रदेशामधील लोकसंख्या फारच कमी होती. त्यामुळे सरासरी लोकसंख्येचा निकष लागू शकला नसता कारण राज्याच्या बाहेर मतदारसंघाचे अस्तित्त्व राहिले असते.[४२]

### १.१७.२ तिसऱ्या परिसीमन आयोगावर मर्यादा/बंधने–

तिसऱ्या परिसीमन आयोगावर परिसीमन कायदा १९७२ नुसार मतदारसंघ पुनर्रचनेबाबत काही मर्यादा घालण्यात आल्या होत्या. ६० लाख लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या राज्यांच्या लोकसभेत निश्चित असे प्रतिनिधीत्व देण्यात आले होते. त्यामध्ये जम्मू व काश्मीर, हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपूरा, मेघालय, नागालँड, सिक्कीम या राज्यामध्ये लोकसभा मतदारसंघाची संख्या निश्चित करण्यात आली होती. त्या लोकसभेच्या जागांमध्ये बदल करण्याचा अधिकार परिसीमन आयोगाला नव्हता. जम्मू व काश्मीर, हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय, नागालँड, सिक्कीम या राज्यामध्ये लोकसभेच्या १८ जागा वगळता ठरलेल्या राज्यांमधील ५२४ लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना तिसऱ्या परिसीमन आयोगाने केली. तसेच केंद्रशासित प्रदेशातील लोकसभा मतदारसंघामध्ये केवळ भौगोलिक पुनर्रचना करावयाची होती. कारण केंद्रशासित प्रदेश कायदा १९६३ नुसार केंद्र सरकारने वेळोवेळी बदल करून या केंद्रशासित प्रदेशामध्ये लोकसभेच्या जागा निश्चित केल्या होत्या. त्यामुळे मतदारसंघाच्या संख्येत बदल करण्याचा अधिकार तिसऱ्या परिसीमन आयोगाला नव्हता.

### १.१७.३ चौथ्या परिसीमन आयोगावरील बंधने –

लोकसभा व विधानसभा मतदारसंघाच्या संख्येत वाढ न करण्याचे बंधन चौथ्या परिसीमन आयोगावर होते. कलम ८२ व १७० मध्ये घटना दुरुस्ती लोकसभेची सदस्य संख्या व राजयच्या विधानसभेच्या सदस्यांची संख्या २०२६ पर्यत न बदलण्याचा निर्णय संसदेकडून घेण्यात आला. या सर्व घटनांमुळे मतदारसंघाच्या संख्येत वाढ करणयवर संसदेने नियंत्रण घातलेले आहे. तसेच १९७६ मध्ये केंद्रशासित प्रदेशामध्ये २० पेक्षा जास्त लोकसभा सदस्य आणू नयेत. असा निर्णय चौथ्या परिसीमन आयोगावर बंधनकारक करण्यात आला. एस.सी.व एस.टी.च्या २००१ च्या जनगणनेनुसार आधारित संख्येच्या प्रमाणात राखीव मतदारसंघात वाढ करण्यात यावी. परंतु लोकसभा व विधानसभा मतदारसंघाच्या संख्येत वाढ करू नये. असेही बंधन होते. त्यामुळे २००१ च्या जनगणनेनुसार राखीव जागामध्ये वाढ झाली. मात्र एकूण

सदस्य संख्येत वाढ होणार नाही याची दक्षता ७ टिसीमन आयोगाला घ्यावी लागली त्यामुळेच परिसीमन आयोगाने भारताच्य एकूण लोकसंख्येच्या सरासरीनुसार सर्व मतदारसंघात समान लोकसंख्या या तत्त्वानुसार मतदारसंघाची पुनर्रचना केलेली दिसत नाही. प्रत्येक घटक राज्याच्या लोकसंख्येनुसार सरासरी काढल्याने राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघामध्ये पुनर्रचना केलेली दिसते. याचा अर्थ भारताच्या एकूण लोकसंख्येच्या सरासरीनुसार मतदारसंघातील लोकसंख्या निर्धारीत करण्यात आली होती. हे तत्त्व पुनर्रचनेमध्ये डावलले गेले आहे.[४३]

## १.१८ अहवाल

### १.१८.१ परिसीमन आयोग अहवाल(१९५३)

२६ जानेवारी १९५० रोजी संविधानाचा अंमल सुरू झाला. प्रौढ मतदानावर आधारलेल्या लोकसभा व विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका १९५२च्या फेब्रुवारी मार्चमध्ये घेण्यात येण्यात असा सरकारचा प्रयत्न होता. रिप्रेझेंटेशन ऑफ दी पीपल्स ॲक्ट १९५१ संसदेने पास करून निवडणुका घेण्याबाबत आवश्यक त्या कायदेशीर तरतूदी केल्या. मतदारांच्या याद्या बनवण्याचे काम फार मोठे व वेळ घेणारे होते. १९५१च्या जनगणनेचे आकडे प्रसिद्ध होण्यास वेळ लागणार होता. म्हणून १९४१च्या जनगणनेचे आकडे, देशाची फाळणी, संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण त्यामुळे राज्यांच्या सीमांचे निर्धारण व महसूली यंत्रणेतील ताळे एकक निश्चित करणे या सगळयांचा परिणाम झालेले प्रमाण मानून मतदारसंघाचे परिसीमन करण्यात आले. त्या आधारे १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यावेळी राखीव जागा या अगदी स्वतंत्र न ठेवता सर्वसाधारण राखीव मिळून द्विसदस्यीय मतदार संघ बनवण्यात आले. मुंबई राज्यात एक त्रिसदस्य (सर्वसाधारण  अनु.जाती राखीव अनु.जमाती राखीव) असा मतदारसंघ विधानसभेचा बनवावा लागला तसा पश्चिम बंगाल मध्येही झाला.[४४]

१ मार्च १९५० पर्यंतच्या अंदाजित लोक संख्येच्या आधारावर मतदारसंघ पुनर्रचना करण्यात आली आहे.म्हणजेच १९४१ च्या जनगणनेवर आधारित मतदार संघातील मतदारांची संख्या नव्हती. लोकसभेच्या प्रत्येक मतदार संघात पाच लाख व जास्तीत जास्त साडेसात लाख लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी असे प्रमाण या पुनर्रचनेत करण्यात आले. तात्कालिन

घटकराज्यांची अ,ब,क अशी वर्गवारी करण्यात आली होती. तसेच एक प्रतिनिधी मतदारसंघ, दोन प्रतिनिधी मतदारसंघ व तीन प्रतिनिधी मतदारसंघ अशी विभागणी करण्यात आली.

प्रतिनिधीत्वानुसार मतदारसंघाचा विचर केल्यास एक प्रतिनिधी असलेले २३१ लोकसभा मतदारसंघ होते. तसेच ७० मतदारसंघ द्विप्रतिनिधी होते.ज्या मतदारसंघात दोन प्रतिनिधी आहेत. त्या मतदारसंघामध्ये एक खुल्या वर्गातून व दुसरा प्रतिनिधी अनुसूचित जातीकिंवा अनुसूचीत जमातीमधून निवडलेला दिसतो. पश्चिम बंगालमध्ये तीन प्रतिनिधी असलेला एकमेव मतदारसंघ होता. या तीन प्रतिनिधीमध्ये एक खुल्या गटातून, दुसरा अनुसूचित जाती गटातून व तिसरा अनुसूचित जमातीमधून निवडला जात होता.

१९५१–५२ च्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या होत्या. भारताच्या राष्ट्रपतींच्या आदेशानुसार निवडणुक आयोगाच्या मुख्य निवडणुक आयुक्तंच्या नियंत्रणाखाली मतदारसंघ पुनर्रचनेची प्रक्रिया पार पाडलेली दिसते. परंतु यामध्ये अनेक त्रुटी राहिल्या. या पुनर्रचनेमध्ये भौगोलिक रचना राजकीय प्रतिनिधीत्वाबाबत आक्षेप घेण्यात आले. राजकीय दृष्टिकोणातून सत्ताधारी पक्षांनी मतदारसंघाची आखणी केली असा आक्षेप निवडणुक आयोगाने घेतल्यामुळेच त्यातून परिसीमन आयोगाची निर्मिती झालेली दिसून येते.

संसदेने संमत झालेल्या कायद्याला अनुसरून १९५१ च्या जनगणनेवर आधारित लोकसभा व विधानसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी १९५३ मध्ये सवंत्र भारतातील पहिला परिसीमन आयोग नेमण्यात आला. या परिसीमन आयोगावर १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

या पहिल्या मतदारसंघ पुनर्रचना आयोगाने आधीच्या मतदारसंघ पुनर्रचना पद्धतीत काही महत्त्वपूर्ण बदल केले. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेला राज्यांचा गट अ,ब, क अशी वर्गवारी न करता केंद्रशासित व घटकराज्ये असे दोन गट तयार केले. या दोन गटामध्ये १३ घटकराज्ये व ४ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश केला. तसेच या परिसीमन आयोगाने अ, ब, क पैकी ब व क गटाचा विचार करून या परिसीमन आयोगाने एक प्रतिनिधी व दोन प्रतिनिधी मतदारसंघाची पुनर्रचना केली परंतु प.बंगाल राज्यामधील तीन प्रतिनिधी असलेला मतदारसंघ रद्द केला.

## पहिल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे घटक राज्यातील लोकसभा मतदारसंघ

## एक प्रतिनिधी मतदारसंघ व दोन प्रतिनिधी मतदारसंघ[४५]

| अ.क्र. | राज्य | मतदार संघ | जनरल | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती. | एकूण | जनरल | अनुसूचित जाती. | अनुसूचित जमाती | एकूण | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | ३५ | २७ | – | – | २७ | ८ | ६ | २ | १६ | ४३ |
| २. | आसाम | १० | ७ | – | १ | ८ | २ | १ | १ | ४ | १८ |
| ३. | बिहार | ४५ | ३३ | – | ४ | ३७ | ८ | ७ | १ | १६ | ५३ |
| ४. | बॉम्बे | ५८ | ४६ | – | ४ | ५० | ८ | ७ | १ | १६ | ६६ |
| ५. | केरळ | १६ | १४ | – | – | १४ | २ | २ | – | ४ | १८ |
| ६. | मध्यप्रदेश | २७ | १५ | – | ३ | १८ | ५ | ५ | ४ | १४ | ३२ |
| ७. | मद्रास | ३४ | २७ | – | – | २७ | ७ | ७ | | १४ | ४१ |
| ८. | म्हैसूर | २३ | २० | – | – | २० | ३ | ३ | | ०६ | २६ |
| ९. | ओरिसा | १४ | ०१ | – | – | १ | ५ | ५ | | | |
| १०. | पंजाब | १७ | १२ | – | – | १३ | | | | १० | २२ |
| ११. | राजस्थान | १८ | १३ | – | – | १३ | ४ | ३ | १ | ८ | २२ |
| १२. | उ.प्रदेश | ६८ | ५० | – | – | ५० | १८ | १८ | – | ३६ | ८६ |
| १३. | प.बंगाल | २८ | २० | – | – | २० | ८ | ६ | २ | १६ | ३६ |
| **केंद्रशासित प्रदेश** | | | | | | | | | | | |
| १. | दिल्ली | ०४ | ३ | – | – | ३ | १ | १ | | २ | ५ |
| २. | हि.प्रदेश | ०३ | २ | – | – | २ | १ | १ | | २ | ४ |
| ३. | मणिपूर | ०२ | २ | – | – | २ | – | – | | – | २ |
| ४. | त्रिपुरा | ०१ | १ | – | – | १ | १ | – | १ | १ | २ |
| | एकूण | ४०३ | २९८ | – | – | | ८७ | ७६ | १५ | १७७ | ४९० |

१९५२ च्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर लोकस्भेचे ४०३ मतदारसंघ तयार झाले तर या आयोगामार्फत एक प्रतिनिधीत्वाचे ३१३ व दोन प्रतिनिधीत्वाचे १७७ असे ४९० सदस्य त्यावेळच्या लोकसभेत होते परंतु मतदारसंघ ४०३ होते. एकूण ४९० सदस्यांपैकी ३८५

प्रतिनिधी खुल्या गटाचे तर अनुसूचित जातीसाठी ७६ व अनुसूचित जमातीसाठीचे ३० प्रतिनिधी होते.

### १.१८.२ परिसीमन आयोग अहवाल(१९६३)

दर १० वर्षांनी लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना करावी असा कायदा १९६२ ला करण्यात आला. १९६१ च्या जनगणनेवर आधारित १९६२ च्या परिसीमन आयोगाने मतदारसंघाची पुनर्रचना केलीक्त १९५३ मध्ये ज्या द्विप्रतिनिधीत्वाचा स्वीकार केलेला होता. ते रद्द करून १९६३ च्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार 'एक मतदारसंघ एक प्रतिनिधी' तत्त्वांचा स्वीकार करण्यात आला.[४६]

| अ.क्र. | राज्य | जनरल | अनुसूचित जाती. | अनुसूचित जमाती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | ३३ | ६ | २ | ४१ |
| २. | आसाम | ११ | १ | २ | १४ |
| ३. | बिहार | ४१ | ७ | ५ | ६५३ |
| ४. | गुजरात | १९ | २ | ३ | २४ |
| ५. | हरियाणा | ७ | २ | – | ९ |
| ६. | जम्मू काश्मिर | ६ | – | – | ६ |
| ७. | मध्यप्रदेश | २४ | ५ | ८ | ३७ |
| ८. | मद्रास | ३२ | ७ | – | ३९ |
| ९. | महाराष्ट्र | ३९ | ३ | ३ | ४५ |
| १०. | म्हैसूर | २३ | ४ | – | २७ |
| ११. | नागालँड | १ | – | – | १ |
| १२. | ओरिसा | १२ | ३ | ५ | २० |
| १३. | पंजाब | १० | ३ | – | १३ |
| १४. | राजस्थान | १६ | ४ | ३ | २३ |
| १५. | उत्तरप्रदेश | ६७ | १८ | – | ८५ |
| १६. | प.बंगाल | ३० | ८ | २ | ४० |
| १७. | केरळ | १७ | २ | – | १९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **केंद्रशासित प्रदेश** | | | | |
| १. | अंदमान व निकोबार | १ | – | – | ०१ |
| २. | चंदीगड | १ | – | – | १ |
| ३. | दादरा व नगरहवेली | – | – | १ | १ |
| ४. | दिल्ली | ६ | १ | – | ७ |
| ५. | गोवा दमण दीव | २ | – | – | २ |
| ६. | हिमाचल प्रदेश | ५ | १ | – | ६ |
| ७. | लक्षद्विप बेटे | – | – | १ | १ |
| ८. | मणिपूर | १ | – | १ | २ |
| ९. | पाँडिचरी | १ | – | – | १ |
| १०. | त्रिपुरा | १ | – | १ | २ |
| | एकूण | ४०६ | ७७ | ३७ | ५२० |

१९५१ ते १९६१ या दशकाच्या दरम्यान ६ नवीन केंद्रशासित प्रदेश व चार नवीन राज्य निर्माण झाली. मुंबई राज्यातून गुजरात व महाराष्ट्र या दोन स्वतंत्र राज्याची निर्मिती तसेच नागालँड व केरळ हरियाणा या राज्यांची निर्मिती झाली. केंद्रशासित प्रदेशामध्ये अंदमान व निकोबार, चंदिगड, दादरा आणि नगरहवेली, गोवा, दमण दिव, लक्षद्विप बेटे, पाँडिचरी या सहा प्रदेशांचा समावेश होतो. राज्यांची संख्या वाढण्याचे कारण म्हणजे राज्यांची भाषावर प्रांतरचना करण्यात आली होती. १९६१ च्या जनगणनेनुसार लोकसभा मतदारसंघ वाढले त्यामुळे लोकसभेच्या सदस्यसंख्या ५२० झाली. त्यामध्ये ४०६ जागा खुल्या, ७७ जागा अनुसूचित जाती व ३७ जागा अनुसूचीत जमातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या. या पुनर्रचनेमध्ये प्रतिनिधी संख्येइतकीच मतदारांची संख्या दिसते. कारण दोन प्रतिनिधी मतदारसंघ बरखास्त करण्यात आले.

**परिसीमन आयोग अहवाल (१९७३)**

तिसरा परिसीमान आयोग सर्व चारही आयोगामध्ये महत्त्वपूर्ण मानला जातो. कारण या आयोगामध्ये मतदारसंघाच्या पुनर्रचनेबाबत असणारे निकष व तत्त्वांचा समावेश तिसऱ्या परिसीमन आयोगामध्ये केलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे पहिल्या व दुसऱ्या परिसीमन आयोगाच्या तुलनेत तिसऱ्या परिसीमन आयोगात राखीव जागाबाबत कायद्यात अनेक महत्त्वपूर्ण

बदल केले आहेत. त्याचप्रमाणे आयोगावरील सहयोगी सदस्यांचा मुद्दा प्रशासकीय सीमांचा निकष, मतदारसंघानुसार लोकसंख्या निकष इ. निकष व तत्त्वांचा समावेश तिसरा परिसीमन आयोगात केलेला दिसतो.

**तिसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर लोकसभा मतदारसंघाची स्थिती**[४७]

| अ.क्र. | राज्य | जनरल | अनुसूचित जाती. | अनुसूचित जमाती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | ३४ | ६ | २ | ४२ |
| २. | अरुणाचलप्रदेश | २ | – | – | २ |
| ३. | आसाम | ११ | १ | २ | १४ |
| ४. | बिहार | ४१ | ८ | ५ | ५४ |
| ५. | गोवा दमण दिव | २ | – | – | २ |
| ६. | गुजरात | २० | २ | ४ | २६ |
| ७. | हरियाणा | ८ | २ | – | १० |
| ८. | हिमाचल प्रदेश | ३ | १ | – | ४ |
| ९. | जम्मू काश्मिर | ६ | – | – | ६ |
| १०. | कर्नाटक | २४ | ४ | – | २८ |
| ११. | केरळ | १८ | २ | – | २० |
| १२. | मध्यप्रदेश | २५ | ६ | ९ | ४० |
| १३. | महाराष्ट्र | ४१ | ३ | ४ | ४८ |
| १४. | मणिपूर | १ | – | १ | २ |
| १५. | मेघालय | २ | – | – | २ |
| १६. | मिझोराम | – | – | १ | १ |
| १७. | नागालँड | १ | – | – | १ |
| १८. | ओरिसा | १३ | ३ | ५ | २१ |
| १९. | पंजाब | १० | ३ | – | १३ |
| २०. | राजस्थान | १८ | ४ | ३ | २५ |
| २१. | सिक्किम | १ | – | १ | २ |
| २२. | तामिळनाडू | ३२ | ७ | – | ३९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३. | त्रिपूरा | १ | – | १ | २ |
| २४. | उत्तरप्रदेश | ६७ | १८ | – | ८५ |
| २५. | पश्चिम बंगाल | ३२ | ८ | २ | ४२ |
| | **केंद्रशासित प्रदेश** | | | | |
| १. | अंदमान निकोबार | १ | – | – | १ |
| २. | चंदिगड | १ | – | – | १ |
| ३. | दादरा व नगरहवेली | – | – | १ | १ |
| ४. | दिल्ली | ६ | १ | – | ७ |
| ५. | लक्षद्विप | – | – | १ | १ |
| ६. | पाँडिचरी | – | – | १ | १ |
| | एकूण | ४२२ | ७९ | ४१ | ५४२ |

भारतीय राज्यघटनेच्या कलम (१८१) कलमानुसार लोकसभेची सदस्य संख्या ५०० ठरविण्यात आली होती. तसेच २० सदस्य केंद्रशासित प्रदेशातून निवडण्याचीही तरतूद होती. ही संख्या १९६२ च्या १४ व्या घटनादुरुस्तीने ५२५ करण्यात आली होती.

भारतामध्ये १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुका या तिसऱ्या परिसीमन आयोगाच्या पुनर्रचनेनुसार पार पडल्या. दुसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेच्या तुलनेत तिसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेत लोकसभा मतदारसंघामध्ये २२ जागांची वाढ होऊन एकूण सदस्य संख्या ५४२ झालेली दिसते. ५४२ जागांपैकी ४२२ जागा खुल्या गटासाठी तर ७९ जागा अनुसूचित जातीसाठी व ४१ जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या.

### १.१८.३ चौथा परिसीमन आयोग अहवाल(२००२)

चौथा परिसीमन आयोगाने महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघाची व २८८ विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना केली. महाराष्ट्र राज्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी ४८ लोकसभा मतदारसंघ होते पुनर्रचनेनंतरही ४८ लोकसभा मतदारसंघच राहिले. मात्र राखीव जागांच्या संख्येत वाढ होऊन मतदारसंघ बदल झाले.

## महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ मतदारसंघाचे वर्गनिहाय विभाजन[४८]

| अ.क्र. | जिल्हा | जनरल | अनुसूचित जाती. | अनुसूचित जमाती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | – | – | ०१ | ०१ |
| २. | धुळे | ०३ | – | – | ०१ |
| ३. | जळगांव | ०९ | – | – | २ |
| ४. | बुलढाणा | ०६ | – | – | ०१ |
| ५. | अकोला | ०४ | – | – | ०१ |
| ६. | वाशिम यवतमाळ | ०२ | – | – | ०१ |
| ७. | अमरावती | ६ | ०१ | – | ०१ |
| ८. | वर्धा | ०४ | – | – | ०१ |
| ९. | नागपूर | १० | ०१ | – | ०२ |
| १०. | भंडारा गोंदिया | ०१ | – | – | ०१ |
| ११. | गडचिरोली | – | – | ०१ | ०१ |
| १२. | चंद्रपूर | ०१ | – | – | ०१ |
| १३. | नांदेड | ०१ | – | – | ०१ |
| १४. | हिंगोली | ०१ | – | – | ०१ |
| १५. | परभणी | ०१ | – | – | ०१ |
| १६. | जालना | ०१ | – | – | ०१ |
| १७. | औरंगाबाद | ०१ | – | – | ०१ |
| १८. | नाशिक | ०१ | – | ०१ | ०२ |
| १९. | ठाणे | ०३ | – | ०१ | ०४ |
| २०. | मुंबई उपनगर | ०४ | – | – | ०४ |
| २१. | मुंबई शहर | ०२ | – | – | ०२ |
| २२. | रायगड | ०१ | – | – | ०१ |
| २३. | पुणे | ०४ | – | – | ०४ |
| २४. | अ.नगर | ०१ | ०१ | – | ०२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५. | बीड | ०१ | – | – | ०१ |
| २६. | लातूर | – | ०१ | – | ०१ |
| २७. | उस्मानाबाद | ०१ | – | – | ०१ |
| २८. | सोलापूर | ०१ | ०१ | – | ०२ |
| २९. | सातारा | ०१ | – | – | ०१ |
| ३०. | सिंधुदुर्ग–रत्नागिरी | ०१ | – | – | ०१ |
| ३१. | कोल्हापूर | ०२ | – | – | ०२ |
| ३२. | सांगली | ०१ | – | – | ०१ |
| | एकूण | ३९ | ०५ | ०४ | ४८ |

(संदर्भ – परिसीमंन आयोग अहवाल– मतदारसंघ पुनर्रचना २००८)

**चौथ्या परिसीमन आयोगानुसार महाराष्ट्रातील विभागनिहाय लोकसभा मतदारसंघाचे पृथःकरण**[४९]

| **अ.क्र.** | **विभाग** | **सर्वसाधारण मतदारसंघ** | **अनुसूचित जातीचे मतदारसंघ** | **अनुसूचित जमातीचे मतदारसंघ** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १. | उ.महाराष्ट्र | ०४(०४) | (–) | २(२) | ६(६) |
| २. | विदर्भ | ७(१०) | २(१) | १(–) | १०(११) |
| ३. | मराठवाडा | ७(६) | १(१) | –(–) | ८(८) |
| ४. | प.महाराष्ट्र | १०(११) | २(१) | –(–) | १२(१२) |
| ५. | मुंबईसह कोकण | ११(१८) | –(–) | १(१) | १२(११) |
| | एकूण | ३९(४२) | ५(३) | ४(३) | ४८(४८) |

(संदर्भ– प्रकाश पवार, २००८पान नं.२३)

(कंसातील आकडे तिसऱ्या परिसीमन आयोगातील मतदारसंघाची संख्या दर्शवितात)

महाराष्ट्रातील ४८लोकसभा मतदारसंघापैकी तिसऱ्या परिसीमन आयोगाच्या पुनर्रचनेत सर्वसाधारण वर्गासाठी ४२ मतदारसंघ खुले होते. तर अनुसुचित जातीचे व अनुसुचित जमातीचे प्रत्येकी ३ मतदारसंघ होते. मात्र चौथ्या परिसीमन आयोगाच्या पुनर्रचनेत सर्वसाधारण वर्गासाठीचे ३९मतदारसंघ खुले झाले. तर अनुसुचित जातीचे व अनुसुचित जमातीचे अनुक्रमे ५

व ४ मतदारसंघ राखीव झाले. त्यामुळे सर्वसाधारण वर्गातील ३ लोकसभा मतदारसंघ कमी झाले तर अनुसुचित जातीचे २ व अनुसुचित जमातीचा एक मतदार संघ वाढला.

उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व प.महाराष्ट्रात पुनर्रचनेनंतर लोकसभा मतदारसंघ संख्येत बदल झाला नाही. मात्र मतदार संघातर्गत फार मोठे बदल झाले. पुनर्रचनेनंतर विदर्भातील लोकसभेचा १ मतदारसंघ कमी झाला. तर मुंबईसह कोकण विभागात एका मतदारसंघाची वाढ झाली. त्याचा परिणाम म्हणजे पुनर्रचनेनंतर महाराष्ट्रातील लोकसभेच्या मतदार संघाचा विचार करता मुंबईसह कोकण विभाग पुनर्रचनेनंतर पश्चिम महाराष्ट्राच्या लोकसभा मतदार संघाच्या बरोबरीने झाला आहे.

**चौथ्या परिसीमन आयोगाने महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघाची जिल्हा व वर्ग निहाय मतदारसंघ संख्या**[५०]

| अ.क्र. | जिल्हा | जनरल | अनुसूचित जाती. | अनुसूचित जमाती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | – | – | ०४ | ०४ |
| २. | धुळे | ०३ | – | ०२ | ०५ |
| ३. | जळगांव | ०९ | ०१ | –०१ | ११ |
| ४. | बुलढाणा | ०६ | ०१ | – | ०७ |
| ५. | अकोला | ०४ | ०१ | – | ०५ |
| ६. | वाशिम यवतमाळ | ०२ | ०१ | – | ०३ |
| ७. | अमरावती | ०६ | ०१ | ०१ | ०८ |
| ८. | वर्धा | ०४ | – | – | ०४ |
| ९. | नागपूर | १० | ०२ | – | १२ |
| १०. | भंडारा | ०२ | ०१ | – | ०३ |
| ११. | गोंदिया | ०२ | ०१ | ०१ | ०४ |
| १२. | गडचिरोली | – | – | ०३ | ०३ |
| १३. | चंद्रपूर | ५ | ०१ | – | ०६ |
| १४. | यवतमाळ | ४ | ०१ | ०२ | ०७ |
| १५. | नांदेड | ८ | ०१ | – | ०९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६. | हिंगोली | ३ | – | – | ०३ |
| १७. | परभणी | ४ | – | – | ०४ |
| १८. | जालना | ४ | ०१ | – | ०५ |
| १९. | औरंगाबाद | ८ | ०१ | – | ०९ |
| २०. | नाशिक | १० | ०१ | ०४ | १५ |
| २१. | ठाणे | १७ | ०१ | ०६ | २४ |
| २२. | मुंबई उपनगर | २५ | ०१ | – | २६ |
| २३. | मुंबई शहर | ९ | ०१ | – | १० |
| २४. | रायगड | ७ | – | – | ०७ |
| २५. | पुणे | १९ | २ | – | २१ |
| २६. | अ.नगर | १० | ०१ | ०१ | १२ |
| २७. | बीड | ५ | ०१ | – | ०६ |
| २८. | लातूर | ५ | ०१ | – | ०६ |
| २९. | उस्मानाबाद | ३ | ०१ | – | ०४ |
| ३०. | सोलापूर | ९ | ०२ | – | ११ |
| ३१. | सातारा | ७ | ०१ | – | ०८ |
| ३२. | रत्नागिरी | ५ | – | – | ०५ |
| ३३. | सिंधुदुर्ग | ३ | – | – | ०३ |
| ३४. | कोल्हापूर | ९ | ०१ | – | १० |
| ३५. | सांगली | ७ | ०१ | – | ०८ |
| | एकूण | २३४ | २९ | २५ | २८८ |

चौथ्या परिसीमन आयोगाच्या पुनर्रचनेनंतर महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या २८८ मतदारसंघापैकी २३४ मतदारसंघ सर्वसाधारण वर्गासाठी, २९ मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी व २५ मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आले. म्हणजेच तिसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेच्या तुलनेत १८ वरून १९ मतदारसंघ निर्माण झाले. त्यामुळे त्याचे ३ मतदारसंघ वाढले. तिसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेच्या तुलनेत चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेत सर्वसधारण

मतदारसंघ कमी होऊन राखीव मतदारसंघ वाढलेले आहेत. महाराष्ट्रातल्या ३५ जिल्ह्यापैकी २६ जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ वाढलेले आहेत. तर १० जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव मतदारसंघ आहेत. ६ जिल्ह्यामध्ये राखीव मतदारसंघ नाहीत तर २ जिल्ह्यामध्ये सर्वसाधारण वर्गासाठी मतदारसंघ नाहीत.

**महाराष्ट्रातील २००९ च्या लोकसभा निवडणुकीतील विभागनिहाय राजकीय पक्षांना मिळालेल्या जागा**[५१]

| अ. क्र. | राजकीय पक्ष | उ.महाराष्ट्र | विदर्भ | मराठवाडा | मुंबईसह कोकण | प.महाराष्ट्र | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | काँग्रेस | १ | ४ | २ | ८ | ३ | १८ |
| २. | रा.काँग्रेस | १ | १ | १ | २ | ३ | ८ |
| ३. | शिवसेना | – | ३ | ३ | १ | ४ | ११ |
| ४. | भाजपा | ४ | २ | २ | – | – | ८ |
| ५. | बहुजन वि आघाडी | – | – | – | १ | – | १ |
| ६. | स्वाभिमानी शे.पक्ष | – | – | – | – | १ | १ |
| ७. | अपक्ष | – | – | – | – | १ | १ |
| | एकूण | ६ | १० | ८ | १२ | १२ | ४८ |

(संदर्भ :– महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २००९)

महाराष्ट्रामध्ये २००९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये विभागनिहाय राजकीय पक्षांना मिळालेल्या जागेंचा विचार करता असे दिसून येते की, मुंबईसह कोकण व पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येकी १२ जागा मिळून समसमान राहिलेला आहे. मुंबईसह कोकणात जरी काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसने प्रभाव दाखवला असला तरी पश्चिम महराष्ट्रामध्ये शिवसेनेने काही अंशी प्रभाव दाखवून बरोबरी साधलेली आहे. त्या खालोखाल विदर्भ, मराठवाड्यात अनुक्रमे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस ५ व ३ तर शिवसेना भाजप अनुक्रमे ५ व ५ अशा जागा मिळालेल्या आहेत. तसेच उत्तर महाराष्ट्रात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी १ जागा मिळाली तर भाजपला ४ जागा मिळवून या विभागामध्ये आपली ताकद दाखवून दिली आहे.

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २००९ पक्षनिहाय मिळालेले मतदार एकूण उमेदवार व टक्केवारी**[५२]

| अ.क्र. | राजकीय पक्ष | मिळालेले मतदान | टक्केवारी | उमेदवार संख्या | विजयी उमेदवार | विजयी उमेदवार |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | काँग्रेस | ९५२१७०३ | २१.०१ | १७० | ८२ | ४८ |
| २. | रा.काँग्रेस | ७४२०२१२ | १६.३७ | ११३ | ६२ | ५५ |
| ३. | भाजपा | ६३५२२४६ | १४.०२ | ११९ | ४६ | ३९ |
| ४. | शिवसेना | ३६९०२९ | १६.२६ | १६० | ४४ | २८ |
| ५. | अपक्ष | ७०२३५८१ | १५.५ | १२० | २४ | १ |
| ६. | मनसे | २५८५४९८ | ५.७१ | १४३ | १३ | ९ |
| ७. | सपा | ३३७३७८ | ०.७४ | ३१ | ०४ | १३ |
| ८. | शेकाप | ५०३८९५ | १.११ | १७ | ४ | २४ |
| ९. | बी.व्ही.ए. | २०८३२१ | ०.४६ | ४ | २ | ५० |
| १०. | जसु | ५७५२२४ | १.२७ | ३७ | २ | ५ |
| ११. | लोस | ६०९२४ | ०.१३ | २ | १ | ५० |
| १२. | बसपा | १८७१२७ | ०.४१ | २६ | १ | ४ |
| १३. | माकप | २७००५२ | ०.६ | २० | १ | ५ |
| १४. | स्वाभिमानी शे.पक्ष | ३५२१०१ | ०.७८ | १४ | १ | ७ |
| १५. | बहुजन म.संघ | ३७६६४५ | ०.८३ | १०३ | १ | १ |
| १६. | इतर | २१७०६८३ | ४.७९ | ७८० | ० | ० |
| | एकूण | ४५३१४६१८ | १०० | ३५५९ | २८८ | – |

संदर्भ–(महाराष्ट्र विधानसभा निवडणुक अहवाल २००९)

२००९च्या विधानसभेतील प्रमुख राजकीय पक्षांना मिळालेल्या टक्केवारीचा विचार करता राष्ट्रवादी काँग्रेस ५५ टक्के काँग्रेस ४८ ट२के शिवसेना २८ टक्के, भाजपा ३९ टक्के व मनसे ९ टक्के मते मिळाली. एकूणच लढविलेल्या जागांचा विचार करता २००९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला इतर राजकीय पक्षाच्या तुलनेत मिळालेल्या मतांची टक्केवारी जास्त आहे.

पुनर्रचनेपूर्वी महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेस आघाडीचे सरकार सत्तेवर होते. पुनर्रचनेनंतरही मतदारसंघातंर्गत बदल होऊनही कॉंग्रेस आघाडीचे सरकार सत्तेवर आले.

## १.१९ स्वातंत्र्यपूर्व भारतातील परिसीमन आयोग :-

भारतामध्ये १९४७ पूर्वी मतदानाचा अधिकार सार्वत्रिक नव्हता. फार कमी लोकांना अधिकार होता. मतदानाचा अधिकार कोणाला असावा या बाबत ब्रिटिश सरकारने १९१८ साली निवडणुक हक्क समितीची नियुक्ती केली. निवडणुक हक्क समितीने संपत्तीच्या निकषावर मतदानाच्या अधिकाराची शिफारस केली. त्यामुळे फार कमी लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला. या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१) संपत्तीच्या निकषावर मतदानाचा अधिकार

२) महसुल विभागावर आधारित मतदारसंघ निर्माण करण्यात यावेत.

३) प्रांतातील जास्त लोकसंख्या असलेली शहरे व काही प्रांतातील कमी लोकसंख्या असलेली शहरे यांना एकत्र करून शहरी मतदारसंघ तयार करण्यात यावेत.

४)अल्पसंख्यांकांची संख्या जिथे कमी असेल त्याठिकाणी जिल्ह्यातील अल्पसंख्यांकाचे भाग एकत्र करून त्यांच्यासाठी मतदारसंघ तयार करण्यात यावेत. १९४७ पूर्वी दोनवेळा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली.[५३]

### १.१९.१ १९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टच्या तरतुदीनुसार मतदारसंघ पुनर्रचना—

सर्वप्रथम भारतामध्ये ब्रिटिश कालखंडामध्ये १९१९च्या कायदयानुसार मतदारसंघाची पुनर्रचना झालेली झालेली आहे. ब्रिटिश राजवटीत भारताचे अनेक विभाग होते. कमिशनरच्या अधिपत्याखाली जिल्ह्याचा समावेश होता. कौन्सिल ऑफ स्टेटचे पाच मतदारसंघ होते. एका मतदारसंघात पाच विभागाचा समावेश करण्यात आलेला होता. तर एक मतदारसंघ दोन विभागाचा मिळून तयार करण्यात आला होता. तसेच तीन मतदारसंघ प्रत्येकी चार विभाग एकत्र करून तयार करण्यात आले होते. या सर्वाचा एकत्रित परिणाम असा झाला की, मतदारसंघाचा भौगोलिक आकार मोठ्या प्रमाणात वाढला. मात्र त्या मतदारसंघातील मतदारांची संख्या फारच कमी होती. तसेच या मतदारसंघामध्ये ग्रामीण व शहरी असा फरक करण्यात आला नव्हता.

मतदानाचा अधिकार मर्यादित ठेवण्यात आलेला होता. १९२० मध्ये भारताच्या २४ कोटी लोकसंख्येपैकी फक्त १७३६४ लोकांनाच मताधिकार होता. १९१९ चा मतदारसंघ पुनर्रचनेत मतदारसंघाची दोन गटात विभागणी झाली होती. एक गट म्हणजे मुस्लिम मतदारसंघ व दुसरे म्हणजे बिगर मुस्लिम मतदारसंघ होय.

### १.१९.२ १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टमधील तरतूदीनुसार मतदारसंघ पुनर्रचना :–

१९३५ च्या कायद्यानुसार भारतामध्ये संघराज्य व्यवस्थेचा पाया घातला गेला. या कायद्यात प्रांतीय स्वायत्तता निवडणुकीचा समावेश, द्वितीय कायदेमंडळ निर्मिती १९३५ च्या कायद्याने परिसीमन समिती नियुक्ती करण्यात आली होती. या समितीने मतदारसंघाची पुनर्रचना करण्यासाठी विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित केली की जी १९४७ नंतर परिसीमन आयोगासाठी मार्गदर्शक ठरली. या समितीने एकापेक्षा अधिक प्रतिनिधी असलेले मतदारसंघ व अनुसूचीत जातीसाठी राखीव मतदारसंघाचाही विचार केला होता.

या पुनर्रचनेत प्रशासकीय युनिटनुसार मतदारसंघाची सीमा निश्चित केली होती. यामध्ये तहसील, ठाणे, जिल्हा किंवा विभाग या प्रशासकीय युनिटचा विचार करण्यात आला होता. लोकसंख्या भौगोलिक क्षेत्र, मतदारसंख्या व दळणवळणाच्या सुविधा या सर्व बाबीकडे समितीने लक्ष दिले होते. वरील बाबींचा पूर्ण अभ्यास २००२ च्या परिसीमन समितीने केला. १९३५ च्या परिसीमन समितीच्या बऱ्याच शिफारशीचा कमीअधिक प्रमाणात चौथ्या(२००२) परिसीमन आयोगाने स्वीकार केलेला आहे.

### १.१९.३ पहिला परिसीमन आयोग (१९५३)

संसदेमध्ये संमत झालेल्या कायद्याला अनुसरून १९५३ च्या जनगणनेनुसार आधारित लोकसभा व विधानसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी १९५३ मध्ये स्वतंत्र भारतातील पहिला परिसीमन आयोग नेमण्यात आला. स्वतंत्र भारतामध्ये आतापर्यत चार वेळा परिसीमन आयोगाची निर्मिती अनुक्रमे १९५३, १९६३, १९७३, २००२ मध्ये झाली.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या राज्यांचा गट अ, ब, क या वर्गवारी पहिल्या मतदारसंघ पुनर्रचना आयोगाने रद्द केला. केंद्रसरकार व घटकराज्ये अशा दोन गटात १३ घटकराज्य व चार केंद्रशासित प्रदेशांचा समावेश केला आहे. या आयोगाने १ प्रतिनिधी व २ प्रतिनिधी मतदारसंघाची पुनर्रचना केली.

पहिल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर दिल्ली घटकराज्यातील लोकसभा मतदारसंघाची विभागणी पाहिली असता असे दिसून येते की, बॉम्बे घटकराज्यांतर्गत ५८ मतदारसंघात १ प्रतिनिधि मतदारसंघात ४६ सर्वसाधारण गटासाठी तर ४ एस.टी. जागा राखून ठेवलेल्या आहेत. तसेच दोन प्रतिनिधी मतदारसंघात सर्वसाधारण ८ एससी साठी ७ व एसटीसाठी १ असा एकूण १६ जागांची विभागणी झालेली दिसून येते.

### १.१९.४ दुसरा परिसीमन आयोग(१९६३)

संविधान तरतूदीनुसार दर १० वर्षानी लोकसभा व विधानसभा पुनर्रचना करण्यात यावी. १९६२ च्या परिसीमनच्या आयोगाने १९६१ च्या जनगणनेवर आधारित मतदारसंघाची पुनर्रचना केली. दोन प्रतिनिधी मतदारसंघ बरखास्त करण्याचा कायदा करण्यात आला. १९६३ च्या पुनर्रचनेनुसार 'एक मतदारसंघ एक प्रतिनिधी' हे तत्त्व अमलात आले. त्यामुळे द्विप्रतिनिधी मतदारसंघाचे रूपांतर एक प्रतिनिधी मतदारसंघात झाले.

दुसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर लोकसभा व विधानसभा मतदारसंघ–

| **महाराष्ट्र लोकसभा व विधानसभा मतदारसंघ** | | | |
|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | **अनुसूचित जाती.** | **अनुसूचित जमाती** | **एकूण** |
| ३९ | ०३ | ०३ | ४५ |

१९६३ साली झालेल्या दुसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या १९६७ च्या सार्वत्रिक लोकसभा मतदारसंघ संख्येत बदल होऊन सातारा कराड बरोबर सांगली या नवीन मतदारसंघाची निर्मिती झाली. सातारा कराड व सांगली मधून INC ला प्रत्येकी एक जागा मिळाली. त्याचप्रमाणे १९६७ च्या चौथ्या लोकसभा निवडणुकीदरम्यान पुणे, बारामती या मतदारसंघाबरोबर खेड या नवीन मतदारसंघाची निर्मिती झाली.

### १.१९.५ तिसरा परिसीमन आयोग (१९७३)

मतदारसंघ पुनर्रचनेच्या दृष्टीने 'परिसीमन कायदा १९७२ महत्त्वपूर्ण मानला जातो. या कायद्यामध्ये मतदारसंघ पुनर्रचना निकष व तत्त्वांचा विचार करण्यात आला. तिसऱ्या परिसीमन कायद्यात अनेक महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले.

उदा. राखीव जागांची निश्चिती, आयोगावरील सहयोगी सदस्यांचा मुद्दा, प्रशासकीय सीमांचा निकष, मतदारसंघानुसार लोकसंख्येचा निकष इ.बाबीचा विचार केलेला दिसतो.

**तिसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर लोकसभा मतदारसंघातील स्थिती –**

| **महाराष्ट्र लोकसभा मतदारसंघ** | | | |
|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | **अनुसूचित जाती.** | **अनुसूचित जमाती** | **एकूण** |
| ४१ | ०३ | ०४ | ४८ |

तिसऱ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेमध्ये लोकसभेच्या २२ जागा वाढल्या. त्यामध्ये ६ जागा खुल्या गटासाठी तर १६ जागा अनुसूचित जाती–जमातीसाठी वाढलेल्या दिसतात.

## १.२० परिसीमन आयोगाची भूमिका –

### १.२०.१ असंतुलित लोकसंख्येच्या प्रमाणावर आधारित मतदारसंघाची रचना –

लोकसंख्या ही सतत वाढत असते. त्यामुळे वाढलेला लोकसंख्येनुसार मतदारसंघाची संख्या वाढणे अपेक्षित असते. संतुलित लोकसंख्येच्या प्रमाणात मतदारसंघाची रचना झालेली नाही. त्यामुळे मतदारसंघ रचनेच्या तत्त्वाला बाधा येत आहे. उदा. ३१ लाख लोकसंख्येचा आऊटर दिल्ली लोकसभा मतदारसंघ, २८ लाख लोकसंख्येचा ठाणे लोकसभा मतदारसंघ, केवळ ३७ हजार लोकसंख्येचा लक्षद्विप लोकसभा मतदारसंघ.[५४]

### १.२०.२ भौगोलिक व प्रादेशिक असमतोल–

काही मतदारसंघ क्षेत्रफळाच्यादृष्टीने मोठे आहेत. तर काही मतदारसंघ फारच लहान आहेत. त्यामुळे प्रतिनिधीला मतदारसंघात विकासकामे व प्रचार करताना अडचणी निर्माण होतात. उदा.लडाख लोकसभा मतदारसंघ १ लाख ७४ हजार चौ.कि.मी. आहे. दिल्लीतील चांदणी चौक लोकसभा मतदारसंघ १०चौ.कि.मी. आहे. मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघ १८ चौ.कि.मी.चा आहे. मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघ १३ चौ.कि.मी. आहे.

### १.२०.३ असंतुलित विकास –

मतदारसंघाची लोकसंख्या क्षेत्रफळ भिन्न आहे. मात्र सर्व मतदारसंघ प्रतिनिधीला मिळणारा निधी सारखा आहे. परिणामी जास्त लोकसंख्या असलेल्या व जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या मतदारसंघाचा विकास होणे अशक्य आहे.

### १.२०.४ शहरी मतदारसंघ व ग्रामीण मतदारसंघ विभाजन –

ग्रामीण भागातील लोकांचे शहरात स्थलांतर झाल्यामुळे शहरी मतदारसंघाची संख्या वाढली व ग्रामीण भागातील मतदारसंघाची संख्या कमी झाली. ग्रामीण नेतृत्त्व कमी व शहरी नेतृत्त्वात वाढ झाली. त्यामुळे शहरी मतदारसंघ व ग्रामीण मतदारसंघ असे विभाजन झाले.

लोकशाहीमध्ये निवडणुका मुदतीमध्ये होणे व प्रत्येक मतदाराला आपल्या प्रतिनिधीशी संपर्क साधणे शक्य होईल अशी मतदारसंघाची रचना आवश्यक असते. घटनाकारांनी भारतामध्ये प्रत्येक जनगणनेनंतर लोकसंख्या व सलग भूप्रदेश, या तत्त्वावर मतदारसंघाची रचना करण्यात यावी अशी तरतूद केलेली आहे. ९१ व्या घटनादुरुस्तीनुसार २०२६ पर्यत मतदारसंघाच्या संख्येत कोणताही बदल केला जाऊ नये अशी तरतूद केली आहे. यामुळे लोकसंख्या व प्रतिनिधी यांचे एकमेकाशी असलेले प्रमाण अतिशय व्यस्त झालेले आहे. त्यामुळे जास्त लोकसंख्या असणाऱ्या मतदारसंघाचा प्रतिनिधी त्या मतदारसंघातील लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही. यासाठी प्रतिनिधीची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे.

१९७१ च्या जनगणनेनुसार केलेली मतदारसंघाची संख्या व रचना बदलून ती २००१ च्या जनगणनेनुसार करणे आवश्यक आहे. केवळ मतदारसंघ पुनर्रचना करून चालणार नाही. तर मतदारसंघाच्या संख्येत वाढ करणे अतिशय आवश्यक आहे. लोकसभेने सदस्य संख्येवर २०२६ पर्यत घातलेले बंधन चुकीचे आहे. प्रतिनिधी व लोकसंख्या यांच्या व्यस्त प्रमाणामुळे प्रतिनिधीत्वाच्या तत्त्वाला बाधा येत आहे.

## समारोप–

मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची स्थापना लोकसभेमार्फत करण्यात येते. या समितीमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश या आयोगाचे अध्यक्ष असतात. केंद्रीय निवडणुक आयोगाचे मुख्यनिवडणुक आयुक्त आयोगाचे पद्‌सिद्ध सदस्य असतात. सहयोगी सदस्य म्हणून १०

सदस्य असून त्यापैकी संबंधित घटकराज्यांच्या लोकसभेचे ५ व विधानसभेचे ५ सदस्य असतात.

राज्यघटनेत मतदारसंघाची पुनर्रचना दर १० वर्षाच्या जनगणनेनुसार करावी अशी तरतुद आहे. १९७६ मध्ये २००१ पर्यंत व २००१ मध्ये २०२६ पर्यंत मतदार संघाच्या संख्येत कोणताही बदल केला जाणार नाही असा कायदा संसदेने केला आहे.

मतदारसंघ पुनर्रचना करण्याच्या अनेक पद्धती आहेत. त्यामध्ये जेफरसन, हॅमिल्टन, हिल आणि हंरिग्टन पद्धती, कोटा, वेबस्टर या पद्धतीचा समावेश होता. भारतामध्ये प्रामुख्याने कोटा व वेबस्टर या दोन पद्धती वापरल्या जातात.

भारतामध्ये केंद्रपातळी (लोकसभा) व राज्यपातळी (विधानसभा) पुनर्रचनेबाबत १९५३,१९६३ व २००२ असे चार अहवाल तयार करण्यात आले आहेत.

१९५३ च्या परिसीमन आयोगाच्या अहवालात राज्यांचा अ, ब, क अशी वर्गवारी न करता केंद्रशासित व घटकराज्ये असे दोन गट तयार केले. या परिसीमन आयोगाने फक्त एक प्रतिनिधी व द्विप्रतिनिधी मतदार संघाची पुनर्रचना केली आहे.

१९६३ च्या परिसीमन अहवालात दर १० वर्षांनी लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना करावी असा कायदा केला तसेच द्विप्रतिनिधीत्वाची पद्धत रद्द करून 'एक मतदार संघ एक प्रतिनिधी' तत्वांचा स्वीकार करण्यात आला. १९५१ ते १९६१ या दरम्यान हा नवीन केंद्रशासित प्रदेश व चार नवीन राज्य निर्मांण झाली. मुंबई राज्यातून गुजरात व महाराष्ट्र ही दोन स्वतंत्र राज्य निर्माण झाली.

१९७३ च्या परिसीमन आयोग अहवालामध्ये प्रशासकीय सीमांचा निकष मतदारसंघानुसार लोकसभा निकष इ. तत्वांचा समावेश आहे.

२००२ च्या परिसीमन अहवालात लोकसभेच्या मतदारसंघात बदल केले नाहीत परंतु विधानसभेच्या मतदारसंघात अंतर्गत बदल केले आहे. तसेच सर्वसाधारण मतदारसंघाची संख्या कमी होऊन राखीव मतदार संघाची संख्या वाढली आहे.

वरील परिसीमन आयोगांचा पुणे व सातारा जिल्ह्याच्या संदर्भात काही फेरबदल झालेले आहेत. पुणे जिल्ह्याच्या संदर्भात १९७३ च्या परिसीमन आयोगाचा विचार करता त्या नुसार पुणे जिल्ह्यात लोकसभा पातळीवर प्रशासकीय युनिटमर्यादा ओलाडल्याने मावळ लोकसभामध्ये

दिसून आले. तसेच विधान सभापातळीवर वडगांवशेरी मतदार संघात फेरबदल करताना मांजरी खुर्द हा असलग भाग त्यामध्ये घेतला आहे.

२००२ च्या परिसीमन अहवालानुसार पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये काही फेरबदल झाले आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये १८ ऐवजी २१ मतदारसंघ झाले त्यापैकी १९ सर्वसाधारण व २ राखीव झाले. पूर्वी एकच मतदारसंघ राखीव होता. शहरी मतदार संघाची संख्या वाढली आहे. लोकसभेचे ऐवजी २ ऐवजी ४ मतदारसंघ निर्माण झाले.

सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभेचा एक मतदार संघ कमी झाला तसेच विधान सभेचे २ मतदारसंघ कमी झाले त्याबरोबरच राखीव मतदारसंघामध्ये बदल झालेला आहे. पूर्वी माण हा राखीव होता पुनर्रचनेत फलटण हा राखीव झाला आहे.

अशाप्रकारची विशेष महत्त्व असलेल्या मतदारसंघ पुनर्रचनेचा समाजशास्त्रीय चौकटीत अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणून पुणे व सातारा जिल्हयात त्याचे झालेले परिणाम व वस्तुस्थिती प्रस्तुत अभ्यासातून विशद केली आहे.

## संदर्भ

१) भारताचे संविधान, भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २००६, पृ. १२३

२) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९, पृ.०७

३) Singh C.P. 'A century of constituency of De, P.No. 61

४) खुराणा पन्नालाल, 'मतदारसंघ परिसीमन प्रबोधन ज्योती जुलै २००८

५) १९३५ चा कायदा

६) डॉ.भोळे भा.ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर, २००३, पृ. ३७७

७) खुराणा पन्नालाल, 'मतदारसंघ परिसीमन प्रबोधन ज्योती जुलै २००८

८) 'भारताचे संविधान' भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २००६, पृ..२९

९) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९, पृ. १३

१०) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन पुणे, २००९, पृ.१७

११) कित्ता, पृ. २२०

१२) कित्ता, पृ. २२२

१३) कित्ता, पृ. २५९

१४) कित्ता, पृ. २६३

१५) कित्ता, पृ. २६२

१६) Shakdner S.L.Low & practice of Elections in India N.P.H.New Delhi P.No.67

१७) कित्ता, पृ. २८९

१८) डॉ. भोळे भा.ल. भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण पृ.३७७

१९) पन्नालाल खुराणा, मतदार संघ परिसीमन, प्रबोधन प्रकाश ज्योती जुलै २००८ पृ.१३

२०) उपरोक्त पृ.क्र.१३ व १४

२१) पाटील शिवाजी, मतदार संघ पुनर्रचना आयोगाच्या शिफारशी व राजकीय परिणाम पृ.५

२२) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९ पृ.२०

२३) बिराजदार प्रभाकर, पाटील शिवाजी मतदारसंघ पुनर्रचना आयोगाच्या शिफारशी व राजकीय परिणाम प्रबोधन प्रकाशन ज्योती जुलै २००८ पृ. २६

२४) Singh c.p. 'A century of constituency of Delinitation p.No.519

२५) कश्यप सुभाष, हमारा संविधान नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया २००७ पृ. ३१७

२६) देठे विजय, चौथ्या परिसीमन आयोगाच्या संदर्भात कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्याचे बदलते राजकारण, पीएच. डी.शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१२

२७) कित्ता

२८) www.eci.gov.in http://www.eci.gov.in, 22/02/2017

२९) www.eci.gov.in http://www.eci.gov.in, 23/02/2017

३०) www.eci.gov.in http://www.eci.gov.in, 27/02/2017

३१) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाश पुणे २००९

३२) www.eci.gov.in http://www.eci.gov.in, 25/03/2017

३३) परिसीमन आयोग अंतिम अहवाल २००८

३४)उपरोक्त, पृ. २२

३५) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९

३६) उपरोक्त पृ.क्र. ६८

३७) खुराणा पन्नालाल, 'मतदारसंघ परिसीमन प्रबोधन ज्योती जुलै २००८

३८) परिसीमन आयोग अहवाल २००८

३९) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९ पृ.३४

४०) कित्ता, पृ.३४

४१) कित्ता, पृ.३४

४२) डॉ. भोळे भा.ल. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर २००३ पृ.१९१

४३) देठे विजय, चौथ्या परिसीमन आयोगाच्या संदर्भात कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्याचे बदलते राजकारण, पीएच. डी.शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१२

४४) Shakdner S.L.Low & practice of Elections in India National Publishing House New Delhi 1952 P.No.67

४५) www.eci.gov.in http://www.eci.gov.in, 28/03/2017

४६) www.eci.gov.in http://www.eci.gov.in, 01/04/2017

४७) १९७६ परिसीमन आयोग अहवाल (इंटरनेटवरून)

४८) परिसीमन आयोग अंतिम अहवाल २००८

४९) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९, पृ. २३

५०) परिसीमन आयोग अंतिम अहवाल २००८

५१) महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २००९

५२) कित्ता, पृ. ७४

५३) बिराजदार प्रभाकर, पाटील शिवाजी मतदारसंघ पुनर्रचना आयोगाच्या शिफारशी व राजकीय परिणाम प्रबोधन प्रकाशन ज्योती जुलै २००८ पृ. २६

५४) कित्ता, पृ. १६५

# प्रकरण दुसरे

# संदर्भ साहित्याचा आढावा (Reviw of Literature)

## प्रस्तावना

मतदारसंघाची पुनर्रचना ही त्या मतदारसंघाची राजकीय फेरजुळणी असते. मतदारसंघ पुनर्रचनेचा अभ्यास करताना विविध पातळ्यांवर जी राजकीय प्रक्रिया घडत असते. ही राजकीय प्रक्रिया घडत असताना त्यातून होणाऱ्या राजकीय बदलांच्या संदर्भात ज्या समस्या निर्माण होतात. त्याबाबत पूर्ण माहिती मिळणे आवश्यक असते. संशोधन करीत असताना त्या संदर्भात झालेल्या लेखनाच्या माध्यमातून त्या विषयाचा गाभा लक्षात येण्यास मदत होते. त्या दृष्टिकोनातून संशोधनामध्ये संदर्भ साहित्य अत्यंत महत्त्वाची आहेत. म्हणून प्रस्तुत संशोधनाची मांडणी करण्यापूर्वी संबंधित विषयावर झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला आहे.

पुणे व सातारा जिल्हयाच्या संदर्भात मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या राजकारणाचा परामर्श घेत असताना त्या विषयाशी निगडीत विविध अभ्यास व पूर्व साहित्याचा आढावा घेणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर विविध विद्यापीठात झालेल्या अभ्यास विविध नियतकालिकात छापून आलेले लेख व तत्सम साहित्यांचा आढावा घेतला आहे.

## अ) संदर्भ साहित्य

**१. 'पवार प्रकाश' महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना (मतदारसंघाची पुनर्रचना) प्रतिमा प्रकाशन पुणे, २००९.**

प्रस्तुत संदर्भ ग्रंथातूल लेखकांनी मतदारसंघ पुनर्रचेनंतर महाराष्ट्रातील नव्या सत्ता समीकरणाचा उदय झाला व याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने पश्चिम विदर्भ, पूर्व विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र असा विभागवार मतदारसंघ पुनर्रचनेचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच या मतदारसंघाच्या पुनर्रचनेमुळे कोणत्या पक्षाचे वर्चस्व राहिले व कोणत्या जातीच्या उमेदवारास मतदारसंघामध्ये संधी मिळू शकते याचा अंदाज वर्तविला आहे.

महाराष्ट्राचे राजकारण १९९० नंतर बदलत गेले. एवढेच नव्हे तर राजकारणाची नव्याने फेरजुळवाजुळव राजकीय पक्षांना करावी लागली. १९९० नंतरचे राजकारण १९६० ते १९८० च्या दोन दशकांपेक्षा पूर्णपणे वेगवेगळे होते. त्यांची वैशिष्ट्येही वेगवेगळी आहेत. विभागनिहाय

पक्षांच्या पाठिंब्यात बदल विविध जातींचे चार किंवा पाच पक्षात विभाजन शहरी पक्षांची ग्रामीण भागात शिरकावाची मोहीम ग्रामीण पक्षांची शहरी भागात घोडदौड, ग्रामीण अर्थकारणावर शहरी राजकीय अर्थकारणाचे नियंत्रण स्थानिक शासन संस्थाच्या निवडणुकामधील सक्रीय सहभाग व राजकीय संघटनासाठीचा हेतूपूर्वक सहभाग या मुद्दयांच्या आधारे केलेली मांडणी राजेंद्र व्होरा व राजेंद्र व्होरा व सुहास पळशीकर(१९९६), सुहास पळशीकर व नितीन बिरमल(२००७ व २००८) सुहास पळशीकर व सुहास कुलकर्णी(२००७) सुहास पळशीकर व राजेश्वरी देशपांडे(२००३) यांनी केले असून या अभ्यासकांनी केलेला अभ्यास हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा दुसरा व नवा टप्पा आहे. या दोन टप्प्यातील अभ्यासांशी मतदारसंघ पुनर्रचना व महाराष्ट्राच्या राजकारणाची पुनर्रचना हा विषय संबंधित आहे.

**२. महाराष्ट्राचे राजकारण –राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ –सुहास पळशीकर, प्रकाश पवार प्रतिमा प्रकाशन पुणे**

प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये नव्वदीच्या दशकापर्यंत स्थानिक राजकारणाचा अभ्यास महाराष्ट्राच्या राजकारणाच्या अभ्यासात दुर्लक्षित राहिला होता. २००१–२००२ च्या स्थानिक शासन निवडणुकांचा पळशीकर यांनी घेतलेला आढावा ही त्रुटी भरून काढण्याचा एक प्रयत्न होता.

वास्तविक पाहता चव्हाण प्रणित राजकारणाचे प्रारूप आणि त्यातून साकारलेले महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्व यांच्या आकलनासाठी राज्य विभाग-जिल्हा या तीन पातळ्यांवरील राजकीय आधारांची बांधणी तपासणे अत्यंत उपयुक्त ठरू शकते. स्थानिक पातळीवर उभा राहणारा पाठिंबा व त्यातून आकाराला येणाऱ्या संधी यांच्यामुळेच जिल्हा व प्रादेशिक पातळीवरील नेतृत्त्वाची साखळी तयार होऊ शकली. नव्वदीच्या दशकातही साखळी विस्कळीत होऊ लागली तरीही स्थानिक पातळीवरील राजकारणाचे महत्त्व आजही कमी झाले नाही. महाराष्ट्रात काँग्रेसची पीछेहाट झाली तरी ती काही केवळ राष्ट्रीय पातळीवरच्या ऱ्हासामुळे झालेली नाही. जिल्हा पातळीवर आणि विभागीय पातळविर काँग्रेसच्या राजकीय ताकदीची जी शक्तिस्थाने होती त्यांच्या मध्ये आलेल्या विस्कळीतपणातून महाराष्ट्राच्या राजकीय स्थित्यंतराला दिशा मिळाली या संदर्भ साहित्यातून स्थानिक पातळीवरील राजकारणाचे महत्त्व

**३. पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास 'महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष' समकालीन प्रकाशन, २०११**

प्रस्तुत ग्रंथात एकपक्षीय वर्चस्वाकडून महाराष्ट्राच्या पक्षीय राजकारणाचा प्रवास बहुपक्षीय द्विध्रुवीत्वाकडे कसा झाला. याचे विश्लेषण प्रस्तुत ग्रंथात केलेले आहे. तसेच महाराष्ट्रातील आतापर्यंच्या राजकीय पक्षांच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला असून सद्यःस्थितीत तिसरी आघाडी व बहुजनवाद या चौकटीत राष्ट्रीय राजकारण कसे बसते. याची माहिती या ग्रंथात दिलेली आहे.

२००४ व २००९ सालच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांतील यशातून महाराष्ट्रातील काँग्रेसने एका अर्थाने राष्ट्रीय पातळीवरील काँग्रेस पक्षाच्या राजकारणाच्या उल्लेख गिरवलेला दिसतो. नव्वदीच्या दशकांत विशेषतः भाजप प्रणित सरकार सत्तेवर आल्यानंतर काँग्रेस पक्ष संपला अशी हाकाटी पिटली जात असतानाच, काँग्रेस पक्षाने निरनिराळ्या राज्यांत व राष्ट्रीय राजकारणातही पुन्हा एकदा जम बसविला. महाराष्ट्रातील एका अर्थाने हेच घडले. परंतु राष्ट्रीय काँग्रेसप्रमाणेच महाराष्ट्रातल्या काँग्रेस ही गेल्या दोन दशकांतील स्वरूप संपूर्ण बदलले दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणातील एकमेंव वर्चस्वशाली पक्ष म्हणून न वावरता या काळात काँग्रेसला आपले अस्तित्व कसेबसे टिकवून ठेवणे भाग पडले आहे. राष्ट्रीय राजकारणाचा विचार करता काँग्रेसच्या ऱ्हासानंतर अनेक राज्यामध्ये पर्यायी राजकीय शक्ती उभ्या राहिल्या व त्यांनी काँग्रेसला निवडणुकीच्या राजकारणातून जवळपास हद्दपार केले. महाराष्ट्रात मात्र असे घडले नाही. काँग्रेस अपयशी ठरून देखील तिला पर्याय देणारा कोणताही एक समर्थ पक्ष राज्याच्या राजकारणात उभा राहू शकला नाही. किंबहुना भाजपशिवसेना युतीचे एकत्रित प्रयत्नदेखील या बाबतीत तोकडे पडलेले दिसतात. या परिस्थितीत काँग्रेस पक्षाचा निवडणुकीच्या राजकारणातील मध्यवर्ती सहभाग अबाधित राहिला.

वरील लेखकांच्या अभ्यासावरून महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचा निवडणुकीतील चढउतार पाहत असताना काँग्रेस पक्षाचे अस्तित्व कायम राहिलेले आहे. याचा आढावा या निर्मित्ताने घेता आला.

४. जाधव तुकाराम, 'महाराष्ट्र वार्षिकी २०१०'द युनिक ॲकॅडमी, पुणे.

प्रस्तुत अंकात घोटाळे विवेक यांचा महाराष्ट्रातील लोकसभा, विधानसभा निवडणुका याविषयी विश्लेषण त्यांच्या लेखात केलेले आहे. तसेच शिरापूरकर महेश यांचा मतदारसंघ पुनर्रचनेचा उत्तरार्ध या लेखात २००४ व २००९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर मतदारसंघ पुनर्रचनेच्या परिणामाचे तसेच मतदारसंघाचे बदलते स्वरूप याबाबतचे विश्लेषण या लेखात केलेले आहे.

**मतदार संघपुनर्रचनेचे परिणाम–**

विधानसभेच्या २००४ ते २००९ या दोन वर्षाच्या निवडणुक निकालांची विभागीय तुलना केली असता मतदारांच्या पुनर्रचनेमुळे पक्षीय लढतीवर कसा परिणाम झाला आहे. याची कल्पना येऊ शकते.

**अ) मतदारसंघाचे बदले स्वरूपशहरी–(ग्रामीण)**

विधनासभेच्या २००४ ते २००९ या दोन निवडणुक निकालांची तुलना केली असता शहरी मतदारसंघ वाढल्याचे दिसते. २००४ च्या निवडणुकीच्या वेळी (जुन्या रचनेनुसार) शहरी मतदार संघापेक्षा ग्रामीण मतदारसंघाची संख्या ४२ ने अधिक होती. पुनर्रचनेमुळे मुंबई व कोकण या दोन विभागातील काही जिल्हयांमध्ये मतदारसंघाची वाढ झाली. त्यातही मुंबई व ठाणे जिल्ह्यातील मतदारसंघ वाढ महत्त्वाची आहे. परंतु मुंबई उपनगरांमधील सर्वच वाढीव व पुणेजिल्ह्यातील काही मतदारसंघाचा अपवाद वगळता ठाणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद या जिल्ह्यातील वाढीव मतदासंघ पूर्णपणे शहरी स्वरूपाचे नाहीत हे स्पष्ट होते.

शहरी मतदारसंघावर कोणत्या एका पक्षाचे वर्चस्व दिसून आले नाही. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर शहरी मतदारसंघाची संख्या ७१ वरून वाढून १२४ झाली. त्यापैकी काँग्रेस व राष्ट्रवादीने ५० जागा तर शिवसेनाभाजप युतीने ४२ जागा जिंकल्या कोणाही एका राजकीय पक्षाला पूर्णपणे शहरी भागत वर्चस्व मिळवता आले नाही. तरी सेनाभाजप युतीच्या शहारी जागा कमी होऊन काँग्रेसच्या शहरी जागा वाढलेल्या दिसून येतात.

**ब) मतदार संघ राखीव होणे–**

पुनर्रचनेमुळे नव्याने काही मतदार संघ अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव झाले. त्यामुळे काँग्रेसचे (श्रीरामपूर) राजेंद्र दर्डा (औरंगाबाद पश्चिम) सुरेश दंगळ (वाशिम,

अमरिथभाई पटेल (शिरपूर) हा राष्ट्रवादीचे –रामराजे निंबाळकर (फलटण) राजन पाटील (मोहळ), विजयसिंह मोहिते पाटील (माळाशिरूर) इ. नेत्यांनी आपला पारंपरिक मतदार संघ सोडावा लागला.

**क) निवडणुक स्पर्धेतून बाहेर–**

इच्छुक उमेदवारांचे संख्याधिक्य प्रस्थापित नेतृत्वाला पर्यायी नेतृत्व देणे, मित्र पक्षाला जागा जाणे किंवा मतदारसंघ रद्द होणे. उदा. शिवसेनेचे दत्ताजी नलावडे, युदूफ अब्राहमी, दपानदे गायकवाड, गजानन किर्तीकर, राष्ट्रवादीचे शशिकांत शिंदे, कमल ढोले, पाटील, सुधाकरपंत परिचारक इ.

त्याचबरोबर पक्षांतर करून विजय मिळविलेल्या उमेदवारांची यादी यामध्ये देण्यात आली असून मतदार संघ पुनर्रचनमुळे काही जुन्या प्रतिनिधींना पराभव स्वीकारावा लागलेला आहे.

**५. डॉ.पवार प्रकाश, ‘काँग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.**

या पुस्तकात ‘काँग्रेस पुढील आव्हाने आणि भाजपचा उदय’ हा ग्रंथ नव्वदीच्या नंतरच्या राजकारणासंदर्भातील आहे. या ग्रंथाची मध्यवर्ती संकल्पना ‘निवडणुक अभ्यास’ ही आहे. निवडणुकीच्या अभ्यासात जात,जात संघटना आरक्षणाचे राजकीयीकरण, शहरी ग्रामीण घटक आणि निवडणुका यांच्या सहसंबंधाचा सूक्ष्म अभ्यास केला आहे. तसेच यामध्ये राजकीय प्रक्रिया अर्थ, निवडणुक अभ्यास, जात आणि राजकीय अर्थकारण यांच्या संदर्भात विश्लेषण केले आहे. भारतीय राजकीय प्रक्रिया ही गतिशील होत आहे असे दिसून आले पक्ष, नेतृत्व, जात, धर्म, शहर–ग्रामीण, सामाजिक न्याय, आरक्षण हे घटक राजकीय प्रक्रिया घडवितात. राजकीय प्रक्रिया सामाजिक वास्तवातून आकार घेत.त्यामुळे भारतीय समाज वास्तवामध्ये भारतीय राजकारण खोलवर गुंतलेले आहे. समाज वास्तवामध्येच वाद–विवाद–संवाद समझोते, सत्तासंघर्ष, सत्ता स्पर्धा, सत्तावाटप यांच्या विचारांची आदान–प्रदान होते. राजकीय प्रक्रिया गतीशील करण्यासाठी वंचितांच्या भागीदारीचा दावा करण्यासाठी महिलांच्या भागीदारीचा दावा करण्यासाठी सर ते शेवटी समाज वास्तवाच्या चौकटीतमध्ये समझोते घडत गेले आहेत. असे या अभ्यासात दिसते.

**६. डॉ.पवार प्रकाश, 'भारतीय राजकारण आणि नेतृत्त्वातील वाटचाल (राजकीय धुरीणत्व वर्चस्व) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.**

या पुस्तकात नेतृत्त्वाचा अर्थ, राजकीय धुरीणत्व आणि वर्चस्वाची प्रारूपे, प्रादेशिक नेतृत्त्व आणि प्रतिनिधित्व इ. घटकांचा अभ्यास या पुस्तकांमध्ये करण्यात आलेला आहे.

व्यक्तिगत नेतृत्व, विशिष्ट गटलक्षी नेतृत्त्व, बहुसंख्याकाचे नेतृत्त्व आणिं सामुहिक सत्संकल्प किंवा सकलजनवादी नेतृत्त्व अशा चार गटांमध्ये इथे नेतृत्त्व संकल्पनेचे वर्गीकरण केले आहे. 'भारतातल्या नेतृत्वाचा विकास राजकीय वंचितेपासून राजकीय भागीदारीपर्यंत झालेला दिसतो. राजकीय नेतृत्व वंचितता, प्रतिनिधित्व, धुरीणत्व, वर्चस्व अशा सैद्धातिक चौकटीमध्ये विकसित होत असते. विकासाच्या प्रक्रियेतल्या या लक्षवेधक संकल्पना हाच या पुस्तकाचा मध्यवर्ती आशय आहे. त्यामुळे या पुस्तकात भारतीय नेतृत्वाचा अर्थ विविध कंगोऱ्यासह चित्तवेधक स्वरूपात मांडलेला आहे. वास्तविक नेतृत्वाची संपूर्ण संकल्पना सध्या केवळ विभूतीपूजा किंवा 'तुच्छतादर्शक विशेषणे' अशा दोन मनोरंजक चौकटीमध्ये बंदिस्त झाली आहे.

काँग्रेसच्या नेतृत्वात धुरीणत्व आणि वर्चस्व उदारमतवादाच्या अंगाने येते. काँग्रेसला समांतर हिंदुत्ववादी पक्षांचे नेतृत्व आदर्शवाद ते समरसता अशा चौकटीत विकसित होत असतानाच उच्चवर्गीय स्वरूप धारण करते तर या नेतृत्वामध्ये प्रतिनिधित्व प्राप्त होत नाही. म्हणून ज्योती बसू, माणिक सरकार आणि आम आदमी असे नेतृत्वाचे नवे धुमारे दिसतात.

**७. डॉ.पळशीकर सुहास, राजकारणाचा ताळेबंद (भारतीय लोकशाहीची वाटचाल) साधना प्रकाशन पुणे**

भारतीय राज्यघटना, संघराज्याचे बदलते स्वरूप, भाजपचा उदय व विस्तार, पक्षीय राजकारण, काँगेस वर्चस्वाचे राजकारण इ.घटकांची माहिती सविस्तरपणे या पुस्तकात दिलेली आहे. भारताची राज्यघटना तयार झाली तेव्हा इतर अनेक बाबी प्रमाणे या मुद्यावरही सुवर्णमध्य साधण्याची भूमिका घेतली गेली. भारताची राज्यघटना ही उदारमतवादी परंपरेतून उभी राहिलेली आहे. त्यामुळे सामान्य कायदा आणि घटनात्मक कायदा यातील फरक गृहीत धरून घटनात्मक कायदा श्रेष्ठ मानला गेला आहे. पण त्याचबरोबर या घटनात्मक कायद्यातही दुरूस्त्या कराव्या लागतील हे गृहित धरून घटनात्मक कायदा श्रेष्ठ मानला गेला आहे. पण

त्याचबरोबर या घटनात्मक कायद्यातही दुरूस्त्या कराव्या लागतील हे गृहीत धरून घटना ही अपरिवर्तनीय संहिता नसेल अशी व्यवस्था केली गेली. म्हणजेच राज्यघटना श्रेष्ठ आणि पवित्र आहे.

**८. डॉ.पळशीकर सुहास 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, सुगावा प्रकाशन पुणे**

या पुस्तकात भारतीय राजकरणासंदर्भ, मराठा वर्चस्व, दलित राजकारण, इतर मागास जतींचे राजकारण इ.घटकाांचा तपशीलवारपणे माहिती या पुस्तकामध्ये दिलेली आहे. महाराष्ट्र राज्य जरी १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले असले तरी येथील राजकारण आणि जातिसमाज यांच्या परस्परसंबंधाची पायाभरणी त्यापूर्वीच झाली आहे. ब्रिटीश राजवटीच्या काळात ब्राम्हण व तत्सम उच्च जाती आपले सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्व टिकविण्याचे प्रयत्न करीत असतानाच मुख्यतः मराठा कुणबी समाजात विसाव्या शतकाच्या आरंभी राजकीय सत्तेबद्दल जागरूकता निर्माण झाली वसाहती अंतर्गत जे अधिकार ब्रिटिश सरकार देऊ करीत होते. त्यातील अधिक–अधिक वाटा मिळविण्याचे केले त्यातूनच महाराष्ट्रात जातीच्या राजकरात्याने आकार घेतला.

**९. भारतीय संविधान शासन व राजकारण 'डॉ.प.ल.जोशी. विद्या प्रकाशन नागपूर –**

प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये भारतीय राजकारण, प्रादेशिक पक्ष, प्रादेशिक पक्षांचे महत्त्व, निर्वाचन आयोग, निवडणुका, काही महत्त्वाच्या निवडणुका इ.घटकांची माहिती या संदर्भ ग्रंथात देण्यात आलेली आहे.

प्रत्येक राज्यात काही संसदीय व काही विधानसभा निर्वाचन क्षेत्रे तयार करण्यात येत असतात. लोकप्रतिनिधीत्वाचे प्रमाण सर्वत्र सारखे राखण्यात यावे या करिता घटनेत अशी तरतूद आहे की 'प्रत्येक मतदार संघातून निवडावयाचे सदस्य व त्यातील लोकसंख्सा यांचे प्रमाण राज्यात सर्वत्र सारखे राखण्यात यावे तसेच प्रत्येक राज्यातील संसदीय मतदार संघ आणि त्यातील लोकसंख्या यांचे प्रमाण शक्यतो सारखे राबविण्यात यावे. याकरिता पूर्वी प्रत्येक शिरगणती नंतर मतदार संघाची पुर्नरचना करण्यास एक मतदार संघ निर्वाचित आयोग(Deliration commission). परंतु १९७६च्या ४२व्या घटनादुरुस्ती द्वारे मतदारसंघ २०००पर्यंत गोठविण्यात आले त्यानंतर २००२ साली पुन्हा कायदा करून ते २०२६ पर्यंत बदलणार नाहीत अशी तरतूद केली आहे. वरील संदर्भ साहित्याच्या माध्यमातून संशोधनामध्ये

बदलत्या कायद्यांचा अभ्यास या निमित्ताने करण्यात आला. गेल्या सुमारे पाच दशकात (१९५६–२००८) महराष्ट्राची जी राजकीय वाटचाल झाली. त्यामध्ये प्रत्येक विभागाची काही वैशिष्टये अधिकाअधिक ठळक होत गेली. उदाहरणार्थ. मुंबईचे राजकारण हे एकीकडे प्रबळ भांडवली हितसंबंधाच्या विळख्यात राहिले. दुसरीकडे निवडणूकीच्या राजकारणावर तिथल्या समाजाच्या भाषिक  घडणीच्या प्रभाव फार मोठा राहिला. १९६५ ते १९७५ च्या दशकात दाक्षिणात्य विरोधी तर १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून  उत्तर भारतीयाविरोधी भूमिकेतून मराठी समुहांचे राजकारण मुंबईत घडत राहिले. मुंबईच्या सावलीमुळे कोकणचे वेगळेपण झाकोळले गेले आणि मुंबई–कोकणाची एक वेगळीच राजकीय घडी तयार झाली. कोकणातील शिवसेनाचा विस्तार हा या मुंबई केंद्रित राजकारणातून झाला.

**१०. राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर 'भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार' डायमंड पब्लिकेशन पुणे २०१०.**

प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये भारीताय राजकारणाचे आकलन, भाजेचा उदय व क्राँग्रेसचा पाडाव, निवडणुकांमधील वाढती अनिश्चितता आणि पदस्थित विरोधाची भावना इ. घटकांची माहिती या प्रकरणात घेण्यात आलेली आहे.

**लोकसभा मतदार संघाच्या पातळीवरील पदस्थित विरोध (१९९१–९९) –**

गेल्या दशकातील चार लोकसभा निवडणुका पाहिल्या असता राजकीय पक्षाच्या बाजूने किंवा विरोधात लाट असणारा  असा कोणताही मोठा राष्ट्रीय स्वरूपाचा मुद्दा पुढे आलेला नाही. असे असले तरी  राजकीय पक्षांनी गेल्या दशकांमध्ये अनेक फायदे त्तोटे मिळवले आहेत. काँग्रेस पक्ष दुसऱ्या स्थानावर आला असून जागांच्या निकषावर भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. गेल्या तीन लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या मतांची टक्केवारी कमी झालेली आहे. १९९१ मध्ये २४४, १९९६ मध्ये १४४, १९९८ मध्ये १४१, १९९९ मध्ये ११२ जागा काँग्रेस पक्षाला मिळालेल्या दिसतात. १९९९ मध्ये पक्षाने १९९८ च्या निवडणुकांपेक्षा २४ जागा कमीही लढविल्या तरीही ही वाढ दिसते.

वरील माहिती वरून दशकांतील मुख्य राजकीय पक्षांच्या निवडणुकीतील कामगिरीचा आढावा अभ्यास यानिमित्ताने करता आला.

**११. संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा उपयोग यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकामध्ये ग्रंथालय तालिका, संदर्भ ग्रंथ, प्रकार, शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्रकोश, वार्षिक निर्देशिका, सांख्यिकीसाधने, स्थलवर्णन कोश, ग्रंथसूची, संदर्भ साहित्यातून माहितीचे संकलन इ.घटकांची तपशिलवारपणे माहिती देण्यात आलेली आहे.

ज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रात, संशोधन करीत असताना तुम्हाला विविध प्रकारच्या माहितीची आवश्यकता भासते. अशी माहिती तुम्हाला विविध ठिकाणांहून मिळवावी लागते. अशी माहिती दोन प्रकारचा असतात.एक क्षेत्रीय स्त्रोत तर दुसरा लिखित स्त्रोत. क्षेत्रीय स्त्रोतामध्ये समाजात घडणाऱ्या घटना तसेच बदलांचे अद्ययावत ज्ञान असणाऱ्या व्यक्ती येतात तर लिखित स्त्रोत हे प्रकाशित किंवा अप्रकाशित (हस्तलिखित) स्वरूपात उपलब्ध असणारी माहितीची साधने असतात. प्राथमिक स्त्रोतात जगात पहिल्यांदाच निर्माण झालेली नवी आणि तााजी माहिती मिळते उदाहरणार्थ नियतकालिके, प्रबंध, अहवाल, शासकीय प्रकाशने, ग्रंथ इत्यादी तर दुय्यम स्त्रोत हे प्राथमिक स्त्रोतापासून तयार केले जातात व त्यांच्यातून दुय्यम प्रकारची माहिती मिळते. उदाहरणार्थ ज्ञानकोश, ग्रंथसूची, सारसंग्रह, चरित्रकोश, वार्षिके, निर्देश इ. मात्र दुय्यम स्त्रोतांमध्ये प्राथमिक माहितीपर्यंत कसे पोहोचायचे याचे मार्गदर्शन केलेले असते. माहितीच्या या दोन प्रमुख स्त्रोतांपैकी संशोधनासाठी लिखित स्त्रोतांवरच तुम्हाला मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागते म्हणून माहितीच्या या लिखित स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी तुम्हाला ग्रंथालयकडे वळणे अपरिहार्य ठरते. कारण लिखित साहित्य हे ग्रंथालयात उपलब्ध असते.

**१२. डॉ. जगदाळे आत्माराम 'राजकीय विचारवेध' अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकांमध्ये पंचायतराज व्यवस्थेतील महिलांचा सहभाग, भारतीय लोकशाहीतील निवडणुक व्यवस्था व निवडणुक सुधारणा या घटकांबाबत तपशीलवार माहिती दिलेली आहे. सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा अधिकार केवळ वंश, संपत्ती, धर्म इ. प्रकारचा भेदभाव न करता ज्यावेळी समतेच्या आधारावर दिला जातो. त्यास प्रौढ मताधिकार असे म्हणतात. १९६५ च्या कायदयाने सुद्धा मर्यादित नागरिकांना हा अधिकार प्राप्त झाला होता. परंतु हा अधिकार संपत्ती, शिक्षण याद्वारे संकुचित होता. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीतील जनतेच्या

सार्वभौमत्वाची कल्पना विकसित झाली त्याचबरोबर समता या मूल्यालाही महत्त्व प्राप्त झाले.. त्यातूनच सर्व भेद विसरून प्रत्येक नागरिकास एकमत असाचे असा विचार पुढे आला. भारतीय संविधानानुसार प्रौढ मताधिकार १८ वर्षावरील सर्व नागरिकांना दिला गेला इंग्लंड, अमेरिका व बहुसंख्य लोकशाही राज्यात सार्वत्रिक प्रौढ मतदानांचा अधिकार दिला गेला.

## ब) गतसंशोधन आढावा

**१३. देठे विजय, पीएच.डी.प्रबंध विषय, 'चौथ्या परिसिमन आयोगाच्या संदर्भात कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील बदलते राजकारण (अप्रकाशित शोधप्रबंध) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये संशोधकाने सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी, परिसीमन आयोग, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्याचे बदलते राजकारणाचे विश्लेषण या प्रबंधात करण्यात आलेले आहे.

राजकीय प्रक्रिया घडत असताना उत्तरोत्तर सातत्याने तिच्यामध्ये बदल घडत असतात. ही प्रक्रिया ज्या भौगोलिक क्षेत्रात घडत असते. त्या भौगोलिक क्षेत्रातील राजकीय, सामाजिक व आर्थिक जडणघडण त्याला कारणीभूत असते. समाजातील जातीय बदल व आर्थिक बदल खऱ्या अर्थाने राजकारणाला दिशा देत असतात. प्रत्येक मतदारसंघात जात व आर्थिक बदल निवडणुकीच्या माध्यमातून प्रकट होत असतात. त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. तसेच परिसीमन आयोगामुळे मतदारसंघात फार मोठया प्रमाणात बदल होतात.त्याचा परिणाम सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रावर होतो.

प्रस्तुत शोधनिबंधाची एकून सात प्रकरणामध्ये विभागणी केली असून प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

१) मतदारसंघ परिसीमन आयोग व मतदारसंघ परिसीमन यांच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२) मतदारसंघ परिसीमनामुळे सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्याच्या बदललेल्या लोकसभा व विधानसभा मतदारसंघांचा अभ्यास करणे.

३) मतदारसंघ परिसीमनामुळे सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील बदलत्या राजकारणाचा अभ्यास करणे.

**१४. गोळवे सोपान पंढरीनाथ, पीएचडी प्रबंध २०१६ पुणे जिल्हयातील राजकीय प्रक्रियेचा अभ्यास १९९० ते २०१०पुणे विद्यापीठ**

या प्रबंधात पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक, सामाजिक ऐतिहासिक माहिती तसेच निवडणुका, पक्षीय राजकारण तसेच पुणे जिह्यातील ग्रामीण राजकारण (जि.प.) अभ्यास या प्रबंधात केलेला आहे.

**१५. वाबळे दत्तात्रय चंद्रकांत, पीएच.डी. प्रबंध २००२ स्थानिक स्वराज्य संस्थातील महिलांचे राजकीय योगदान पुणे जिल्हा परिषदेत महिलांचे सामाजिक व राजकीय सहभाग पुणे विद्यापीठ**

या प्रबंधात पुणे जिल्ह्यातील पंचायत राज्यपद्धती मध्ये महिलांचा राजकीय सहभाग, महिला सदस्यांच्या कार्याचा आढावा या प्रबंधात घेण्यात आलेला आहे.

**१६. चव्हाण वैशाली चंद्रकांत पीएचडी प्रबंध २००७ पश्चिम महाराष्ट्रातील महानगर पालिकेचे राजकारण (१९९२ ते २००३)**

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये महाराष्ट्रातील शहरी राजकीय प्रक्रिया, पुणे, पिंपरी चिंचवड, अहमदनगर, सोलापूर, सांगली मिरज कुपवाड व कोल्हापूर महानगर पालिकेच्या राजकारणांचा अभ्यास यामध्ये केलेला आहे.

**१७. करीम नबी मुल्ला पीएचडी प्रबंध २०१४ शि.वि.कोल्हापूर औंध संस्थानातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक सुधारणांचा तुलनात्मक अभ्यास.**

या प्रबंधामध्ये औंध संस्थानची ऐतहासिक भौगोलिक रचना, औंध संस्थानमधील सामाजिक, आर्थिक सुधारणा, तसेच औंध संस्थानातील सत्तेचे विकेंद्रीकरण याबाबत माहिती प्रबंधात दिलेली आहे.

**१८. चव्हाण मनिषा पीएचडी प्रबंध २०१६ शि.वि.कोल्हापूर 'सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकांचा अभ्यास ( १९६२ ते २००९ )**

या प्रबंधामध्ये सातारा जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगालिक पार्श्वभूमी तसेच सातारा जिल्हयामध्ये १९६२पासून आतापर्यंत आतापर्यंत (२००९) पर्यंत झालेल्या लोकसभा निवडणुकीचा अभ्यास करून लोकसभा पातळीवर विविध राजकीय पक्षांच्या प्रभावांची मांडणी या प्रकरणात करण्यात आलेला आहे.

**१९. मराठे संदिप, 'एम.फील. प्रबंध(२००५) पुणे विद्यापीठ, 'ठाणे जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचना'**

या प्रबंधात ठाणे जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक राजकीय पार्श्वभूमीची मांडणी या प्रकरणात केली आहे. ठाणे जिल्ह्यात झालेल्या सामाजिक व राजकीय बद्दलांचे माहिती या प्रबंधामध्ये देण्यात आलेली आहे.

**२०. चव्हाण अरुण 'कोल्हापूर जिल्ह्याचा १९६० नंतरच्या राजकारणाचा अभ्यास' (अप्रकाशित पी.एच.डी. शोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ.कोल्हापूर एप्रिल, २००७**

उपरोक्त शोध प्रबंधामध्ये संशोधकाने १९६० पासून २००४ पर्यंतची कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकीय पार्श्वभूमीचे विश्लेषण केले आहे यामध्ये कृषी औद्योगिक समाज, काँग्रेसचे विघटन व काँग्रेसचे राजकारण, काँग्रेसचा प्रभाव असताना काँग्रेसमध्ये गटबाजी वाढत गेली. त्यामुळेच १९९५ नंतर शिवसेना भाजपच्या राजकारणाला सुरुवात झाली यांचा आढावा घेतला आहे तसेच १९६२ ते२००४ मधील कोल्हापूर जिल्ह्यातून लोकसभा व विधानसभा निवडणुकीमधील विविध पक्षाच्या निवडून आलेल्या उमेदवारांची सविस्तर यादी प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये दिली आहे.

समजून घेण्यास मदत झाली. स्थानिक पातळीच्या राजकारभाराचा आढावा घेता आला.

**२१. पळशीकर सुहास, बिरमल नितिन 'महाराष्ट्राचे राजकारण (राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ २००९) प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९.**

उपरोक्त संदर्भ ग्रंथातील लेखकांनी राजाकारणाचा अभ्यास करण्यासाठी स्थानिक राजकीय प्रक्रियेचे संदर्भ सांगितलेले आहेत. स्थानिक राजकारणात मराठा या जातीचे वर्चस्व असून त्यावरील मर्यादाचे स्पष्टीकरण या ग्रंथात केलेले आहे. तसेच १९९९ नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघर्ष त्याचबरोबर महाराष्ट्राच्या राजकारणाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**२२. पवार प्रकाश, स्थानिक शासनसंस्था निवडणुका २००७ व महाराष्ट्राचे नवे राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७.**

प्रस्तुत ग्रंथामध्ये लेखकाने चौथ्या परिसीमन आयोगानुसार विविध राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामीण) व स्थानिक स्वराज्य संस्था (शहरी) निवडणुकामध्ये

मतदारसंघाची पुनर्रचना स्पष्ट केली असून त्यानुसार कशा पद्धतीने राजकीय समीकरणे मांडावीत याचे विश्लेषण या ग्रंथामध्ये केलेले आहे.

**२३. Singh C.P., A Century of constituency Delimination in India Political Geography 2000.**

उपरोक्त संदर्भ ग्रंथामध्ये लेखकाने स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील परिसीमन आयोगाच्या संदर्भात लेखन केलेले असून त्यामध्ये पूर्वीच्या आयोगाच्या शिफारशीचे विश्लेषण केलेले आहे.

**२४. Out Parliament an Introduction to the Parliament of Indian National Book Trust India 2008.**

उपरोक्त संदर्भ ग्रंथामध्ये लेखकाने १९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट व १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टमधील तरतूदीनुसार मतदारसंघ पुनर्रचनेचे विश्लेषण प्रस्तुत ग्रंथामध्ये करण्यात आलेले आहे.

**२५. रविकिरण साने, निलिमा साने 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण' डायमंड प्रकाशन प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००९.**

प्रस्तुत संदर्भ ग्रंथात महाराष्ट्राच्या राजकारणाचा वेध, निवडणुकीचे विश्लेषण, महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम करणाऱ्या राष्ट्रीय घडामोडी, बदलते अर्थकारण, विविध जनआंदोलनातून उभे राहिलेले कळीचे प्रश्न इत्यादीचा वेध या ग्रंथात घेण्यात आलेला आहे.

**२६. भोळे भास्कर लक्ष्मण 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, आवृत्ती जून – २००३.**

प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये राज्याच्या राज्यव्यवस्थेचे स्वरूप, राज्यांच्या राजकारणातील बदलते प्रवाहांचे विश्लेषण केलेले आहे. तसेच १९७७ नंतर प्रादेशिक पक्षांचे वाढते महत्त्व आणि राज्यांचे राजकारण या संदर्भात चर्चा केली आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील पंचायत राजव्यवस्थेचा आढावा घेण्याबरोबरच १९५२ ते १९८० पर्यतच्या लोकसभेच्या निवडणुकींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**२७. य.दि.फडके 'लोकसभा निवडणुका १९५२ ते १९९९ अक्षर प्रकाशन**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकांमध्ये १९५२ पासून ते १९९९ पर्यंत लोकसभेच्या निवडणुकांच्या आढाव्यात निवडणुकांच्या राजकीय इतिहास या पुस्तकामध्ये स्पष्ट करण्यात आला असून १९५२ ते १९९९ या कालावधीत झालेल्या निवडणुकीत प्रमुख राजकीय पक्षांचा चढ–उतारांचा प्रवास यामध्ये सविस्तरपणे स्पष्ट करण्यात आलेला आहे.

**२८. प्रा.बिराजदार/घोडके 'भारतातील स्थानिक स्वशासन संस्था अंथुल पब्लिकेशनस**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकांमध्ये भारतीय स्थानिक शासनसंस्था, लोकशाही विकेंद्रिकरण महाराष्ट्रातील शहरी शासन संस्था, महाराष्ट्रातील स्थानिक शासन व्यवस्थेतील निवडणुक प्रक्रिया आणि नेतृत्त्व याबाबत सविस्तर माहती दिलेली आहे.

**२९. योगेंद्र ठाकूर 'निवडणुक जिंकण्यासाठी तंत्र आणि मंत्र 'आमोद प्रकाशन, मुंबई**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकांमध्ये निवडणुक आणि जातीय समीकरणे, महाराष्ट्रातील राखीव मतदार संघावर एक नजर, २००९ ची लोकसभा आणि विधान सभा निवडणुक निकाल आणि ४८ लोकसभा मतदारसंघाची सद्यस्थिती, मतदार संघपुनर्रचना२००९, महाराष्ट्रातील २००९ च्या लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघातील विभागावर पक्षीय बलाबल इ. घटकांच्या संदर्भात सविस्तर माहिती दिलेली आहे.

**३०. डॉ.खांदवे एकनाथ 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण'–**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकात 'संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती महाराष्ट्राचे शासन, राजकीय पक्ष, निवडणुका यामध्ये लोकसभेच्या १९७७, १९८९ व १९९८ निवडणुकांचे महत्त्व तसेच विधानसभेच्या १९७८, १९९५ व १९९९ च्या निवडणुकांचे महत्त्व तसेच स्थानिक स्वराज्यांच्या १९९२, २००१–०२ व २००६–०७ निवडणुकांचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे.

**३१. पवार प्रकाश 'भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल राजकीय धुरीणत्व व वर्चस्व डायमंड पब्लिकेशन, पुणे**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकांत नेतृत्त्वाचा अर्थ आणि संकल्पना, राजकीय नेतृत्त्व संकल्पनेतील पेचप्रसंग आणि राजकीय व्यवहार, राजकीय धुरीणत्व व वर्चस्वाची निवडक प्रारूपे, प्रादेशिक नेतृत्त्व आणि प्रतिनिधित्व इ. घटकांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**३२. डॉ.भोळे भास्कर लक्ष्मण 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पिंपळापुर ॲण्ड पब्लिकेशन नागपुर**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकांमध्ये राज्यांच्या राजकारणातील बदलते प्रवाह, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, निर्वाचित आयोग व निवडणुक सुधारणा, पक्ष पद्धती व राजकीय पक्ष इ. घटकांच्या संदर्भात सविस्तर माहिती दिलेली आहे.

**३३. डॉ.मंजिरी कारेकर, डॉ.सुवर्णा बेनके 'भारताचे शासन आणि राजकारण'**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकात पक्ष पद्धतीचे स्वरूप, पक्ष पद्धतीच्या बदलत्या संरचना, भारतातील प्रमुख प्रादेशिक पक्ष, निवडणुक आयोग, रचना इ.घटकांची पक्षीय नुसार पणे माहिती या संदर्भ पुस्तकात देण्यात आलेली आहे.

**३४. डॉ.शाम शिरसाठ, प्रा. भगवानसिंग बैनाडे 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था 'विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकात पंचायतराज व्यवस्थेमध्ये जिल्हा परिणाम, पंचायत समितीची माहिती दिलेली आहे तसेच स्थानिक स्वशासनातील नेतृत्व-त्यामध्ये अनुसूचित जातीजमाती व इतर मागस प्रवर्गाचे राजकीय नेतृत्त्वाचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

35. **S.R. Maheshwari, local Government in India 'Lakshmi Narain Agarwal Educational publishers Agra -3 -1**

S.R.Maheshwari's Local Government in India depiets the concepts of zilla parishad panchyat samiti, Local self Govt. arban Govt. history of Locaol Government in India.

36. **Alok prasad' Dynamics of Indian Democracy mohit publications, New Delhi' 2**

Alok Prasad's 'Dynamks of Indian Democracy explores the ancient Indian Democracy changing the Boundries of Indian Democracy the Institutional Framework of Delication in India, Reforming the Delication process, conclusions.

**37. IQBAL NARAIN 'state politics in India Meenakshi prakashan -3**

Inbal Narain 'state politics in India elaborates the Maharashtra politics of unkage elites, Govt & politics since 1961 General Election 1967, Maharashtra politics from 1967 to the congress split, the congress splits after the pattern of congress Dominance 1957 to 1972.

**38. Jayant Lele 'Yashvantarao Chavan Reflects on Indian society & politics edited by prakash pawar, Dimond publications. -4**

In the book 'Yashvantarao Chavan Reflects on Indian society & politics Jayant Lele explains the concepts of Maharashtra, society & politics India, society & politics this book by Jayant Lele is edited by prakash pawar.

**39. Ramesh Kumar's congress & congression in Indian politics Deep & Deep publications Delhi -5**

Ramesh Kumar's congress & congression in Indian politics gives detail note on the evalution of political parties in India, congress & Loksabba Elections, Indian National congress Nature & character.

**४०. पोतदार दत्तात्रय, एम.फिल. प्रबंध विषय, जिल्हा नेतृत्वाच्या संकल्पनेचा पुणे जिल्हयाच्या संदर्भात अभ्यास (१९६० ते २००५) (अप्रकाशित लघुशोध निबंध) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, (२००८)**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधकाने पुणे जिल्हयाच्या संदर्भात सन १९६० ते २००५ या कालावधीतील नेतृत्त्वाचा अभ्यास करून बदलत्या नेतृत्त्वाचा आढावा या शोधनिबंधात घेतलेला आहे

**४१. सिरसीकर व.मं., 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण' (इ.स.१९६० ते २०००) कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे– ३०**

या संदर्भ पुस्तकात महाराष्ट्राच्या राजकारणाचे स्वरूप स्पष्ट केले असून त्यामध्ये राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवरचे राजकारणाचा समावेश आहे. त्याबरोबरच राजकीय आयोजन, राजकीय संस्था, राजकीय व्यक्ती व राजकीय सहभाग याबाबतचे सविस्तर विश्लेषण पुस्तकात केले आहे.

**४२. डॉ.ना.रा.खेकाळे 'राजकीय नेतृत्व(Political leadership), श्री. मंगेश प्रकाशन नागपूर**

या संदर्भ पुस्तकात नेतृत्वाची संकल्पना, नेतृत्वाची प्रक्रिया, नेतृत्वाचे महत्त्व इ.घटकांचा सविस्तरपणे माहिती दिलेली आहे.

भौगोलिक क्षेत्राची देखील नेतृत्वाला सीमा नसते. सामान्यता पुढाऱ्यांच्या कार्यक्षेत्रावर त्याच्या नेतृत्वाची सीमा बदलत जाते. अभ्यासाच्या सोयीसाठी, राष्ट्रीय नेतृत्व, प्रादेशिक नेतृत्व, स्थानिक नेतृत्व असे म्हणू शकतो एन.टीरामाराव, जयललिता, ज्योती बसू हे प्रादेशिक पुढारी असले तरी आपल्या प्रदेशात त्यांचा अधिक प्रभाव असल्यामुळे त्याना वेळप्रसंगी राष्ट्रीय महत्त्वाची भूमिका प्राप्त होते. तसेच राष्ट्रीय कार्यक्षेत्र लाभलेल्या पुढाऱ्यांना आपल्या विशिष्ट प्रदेशातील महत्त्व टिकवून ठेवावे लागते जसे यशवंतराव चव्हाण हयांचा महाराष्ट्रामध्ये जोपर्यंत प्रभाव होता. तोपर्यंत त्यांना राष्ट्रीय पुढारी म्हणून मान्यता होती. महाराष्ट्रात वसंतदादा पाटील तथा शंकरराव चव्हाणांच्या रूपाने त्यांना शह मिळाल्यानंतर त्यांचे नेतृत्व नाममात्र राहिले.

**४३. महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थित्यंतरे (२०१४ ते २०१७) डॉ. विनोद कों. गायकवाड , अथर्व पब्लिकेशन जळगाव**

या पुस्तकात महाराष्ट्रातील राजकारण, तडजोडी व पर्याय, भाजपा–शिवसेना सत्तासंघर्षाचे पडसाद, सत्तासंघर्षात राष्ट्रवादी कॉंग्रेसची भूमिका आणि परिणाम २०१७ च्या महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणूकांचे बदलते स्वरूप इ.घटकांची सविस्तर माहिती पुस्तकांट दिलेली आहे.

सन २०१४ ते २०१७ या दरम्यान झालेल्या महाराष्ट्रातील निवडणूका आघाडी व युती न होता स्वबळावर पार पाडल्या. दोन्ही कॉंग्रेमधील मैत्रीपूर्ण सत्ताकारण पण स्पर्धात्मक आणि दोन दशकाहून अधिक काळ असलेली शिवसेना भाजप युती २०१४ च्या विधानसभेच्या जागा वाटपावरून तुटली ती स्थानिक निवडणूकीपर्यंत मात्र विधानसभा आणि बहुसंख्य महानगरपालिका व जिल्हा परिषदा निवडणूकांमध्ये आलेल्या त्रिशंकू निकालामुळे बहुमताकरिता पुन्हा तडजोडीने वेग घेतला.

**४४. महाराष्ट्राचे राजकारण नफा वळणावर(युनिक ॲकडमी) (विधानसभा निवडणूक २०१४, सामाजिक, आर्थिक व राजकीय अन्वयार्थ) तुकाराम जाधव, अभय कांता, विवेक घोटाळे, विजय कुंजीर, महेश शिरापूरकर**

या पुस्तकात जिल्हानिहाय विधानसभा मतदारसंघ निहाय विश्लेषन या पुस्तकात केलेले आहे. तसेच मराठा राजकारणाचा लोप, ओबीसी राजकारण, शहरी वर्चस्वाचे राजकारण इ. घटकांचा समावेश यात केलेला आहे.

**४५. फडके य.दि.(१९१९) लोकसभा निवडणूका १९५२ ते १९९९) अक्षर प्रकाशन, मुंबई**

या पुस्तकात लेखकाने १९५२ पासून ते १९९९ पर्यतंच्या लोकसभा निवडणूकांचा अभ्यास करून विविध राजकीय पक्षांना मिळालेल्या जागांमधील बदल तसेच राजकीय पक्षांचे वर्चस्व इ. घटकांबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे.

**४६. डॉ.पवार प्रकाश, राजकीय अर्थकारण(महाराष्ट्रातील निवडणूकीय राजकारणातील मैलांचा दगड) डायमंड पब्लिकेशन पुणे**

या पुस्तकात राजकीय अर्थकारण, ग्रामीण राजकारण, शहरी राजकारण यांची माहिती सविस्तरपणे या पुस्तकात दिलेली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हा परिषद राजकारण (१९२२ ते २००७) या विषयाच्या संशोधनासाठी पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली व कोल्हापूर या सहा जिल्हा परिषद सदस्यांचा अभ्यास केला आहे. आजपर्यत जिल्हा परिषद राजकारणातील स्थानिक राजकीय आयोजन हे सहकार, जमीन मालकी प्रभावशाली जात. या घटकांतून अभिजन म्हणून स्थानिक राजकारणात आले होते.

**४७. य.दि.फडके 'लोकसभा निवडणुका १९५२ ते १९९९ अक्षर प्रकाशन**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकांमध्ये १९५२ पासून ते १९९९ पर्यंत लोकसभेच्या निवडणुकांच्या आढाव्यात निवडणुकांच्या राजकीय इतिहास या पुस्तकामध्ये स्पष्ट करण्यात आला असून १९५२ ते १९९९ या कालावधीत झालेल्या निवडणूकीत प्रमुख राजकीय पक्षांचा चढ–उतारांचा प्रवास यामध्ये सविस्तरपणे स्पष्ट करण्यात आलेला.

**४८. प्रा.बिराजदार / घोडके 'भारतातील स्थानिक स्वशासन संस्था अंथुल पब्लिकेशनस**

प्रस्तुत संदर्भ पुस्तकांमध्ये भारतीय स्थानिक शासनसंस्था, लोकशाही विकेंद्रिकरण महाराष्ट्रातील शहरी शासन संस्था, महाराष्ट्रातील स्थानिक शासन व्यवस्थेतील निवडणूक प्रक्रिया आणि नेतृत्व याबाबत सविस्तर माहती दिलेली आहे.

## समारोप

प्रस्तुत संशोधन समस्येशी संबंधित असणाऱ्या संदर्भ साहित्याची माहिती व गतसंशोधनाचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. संशोधनाशी संबधित असलेल्या संकल्पना संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यामुळे स्पष्ट करता येतो. पाठीमागील झालेल्या संशोधनाची उद्दिष्टे कोणती होती. त्यातून कोणते निष्कर्ष निघाले आहेत. याबाबतचा आढावा घेतल्यामुळे प्रस्तुत संशोधनातील वेगळेपण सिद्ध करता आला आहे.

वरील विविध अभ्यास व संदर्भ साहित्यातून असे आढळते की, मतदारसंघ पुनर्रचना ही देशाची राज्याचे राजकारण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. मतदारसंघ पुनर्रचना ही दर दहा वर्षानी होत असते. त्यावेळी मतदारसंघात विविध बदल होत असतात. त्याचा तेथील सामान्य जीवनावर व राजकारणावर परिणाम होत असतो. ही बाब स्पष्ट होते. तथापि माझा अभ्यास वरील सर्व अभ्यासापेक्षा वेगळा आहे

## संदर्भ–


१. 'पवार प्रकाश' महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना (मतदारसंघाची पुनर्रचना) प्रतिमा प्रकाशन पुणे, २००९.

२. महाराष्ट्राचे राजकारण –राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ –सुहास पळशीकर, प्रकाश पवार प्रतिमा प्रकाशन पुणे

३. पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास 'महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष' समकालीन प्रकाशन, २०११

४. जाधव तुकाराम, 'महाराष्ट्र वार्षिकी २०१०'द युनिक अॅकॅडमी, पुणे.

५. डॉ.पवार प्रकाश, 'काँग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

६. डॉ.पवार प्रकाश, 'भारतीय राजकारण आणि नेतृत्त्वातील वाटचाल (राजकीय धुरीणत्व वर्चस्व) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

७. डॉ.पळशीकर सुहास, राजकारणाचा ताळेबंद (भारतीय लोकशाहीची वाटचाल) साधना प्रकाशन पुणे

८. डॉ.पळशीकर सुहास 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, सुगावा प्रकाशन पुणे

९. भारतीय संविधान शासन व राजकारण 'डॉ.प.ल.जोशी. विद्या प्रकाशन नागपूर –

१०. राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर 'भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार' डायमंड पब्लिकेशन पुणे २०१०.

११. संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा उपयोग यशवंतराव चव्हाण महाराष्ट. मुक्त विद्यापीठ, नाशिक.

१२. डॉ. जगदाळे आत्माराम 'राजकीय विचारवेध' अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर

१३. देठे विजय, पीएच.डी.प्रबंध विषय, 'चौथ्या परिसिमन आयोगाच्या संदर्भात कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील बदलते राजकारण (अप्रकाशित शोधप्रबंध) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१४. गोळवे सोपान पंढरीनाथ, पीएचडी प्रबंध २०१६ पुणे जिल्हयातील राजकीय प्रक्रियेचा अभ्यास १९९० ते २०१०पुणे विद्यापीठ

१५. वाबळे दत्तात्रय चंद्रकांत, पीएच.डी. प्रबंध २००२ स्थानिक स्वराज्य संस्थातील महिलांचे राजकीय योगदान पुणे जिल्हा परिषदेत महिलांचे सामाजिक व राजकीय सहभाग पुणे विद्यापीठ

१६. चव्हाण वैशाली चंद्रकांत पीएचडी प्रबंध २००७ पश्चिम महाराष्ट्रातील महानगर पालिकेचे राजकारण (१९९२ ते २००३)

१७. करीम नबी  मुल्ला पीएचडी प्रबंध २०१४ शि.वि.कोल्हापूर औंध संस्थानातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक सुधारणांचा तुलनात्मक अभ्यास.

१८. चव्हाण मनिषा पीएचडी प्रबंध २०१६ शि.वि.कोल्हापूर 'सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकांचा अभ्यास ( १९६२ ते २००९ )

१९. मराठे संदिप, 'एम.फील. प्रबंध(२००५) पुणे विद्यापीठ, 'ठाणे जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचना'

२०. चव्हाण अरुण 'कोल्हापूर जिल्ह्याचा १९६० नंतरच्या राजकारणाचा अभ्यास' (अप्रकाशित पी.एच.डी. शोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर एप्रिल, २००७

२१. पळशीकर सुहास, बिरमल नितिन 'महाराष्ट्राचे राजकारण (राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ २००९) प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९.

२२. पवार प्रकाश, स्थानिक शासनसंस्था निवडणुका २००७ व महाराष्ट्राचे नवे राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७.

२३. Singh C.P., A Century of constituency Delimination in India Political Geography 2000.

२४. Out Parliament an Introduction to the Parliament of Indian National Book Trust India 2008.

२५. रविकिरण साने, निलिमा साने 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण' डायमंड प्रकाशन प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००९.

२६. भोळे भास्कर लक्ष्मण 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, आवृत्ती जून – २००३.

२७. य.दि.फडके 'लोकसभा निवडणुका १९५२ ते १९९९ अक्षर प्रकाशन

२८. प्रा.बिराजदार/घोडके 'भारतातील स्थानिक स्वशासन संस्था अंथुल पब्लिकेशनस

२९. योगेंद्र ठाकूर 'निवडणुक जिंकण्यासाठी तंत्र आणि मंत्र 'आमोद प्रकाशन, मुंबई

३०. डॉ.खांदवे एकनाथ 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण'–

३१. पवार प्रकाश 'भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल राजकीय धुरीणत्व व वर्चस्व डायमंड पब्लिकेशन, पुणे

३२. डॉ.भोळे भास्कर लक्ष्मण 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पिंपळापुर ॲण्ड पब्लिकेशन नागपुर

३३. डॉ.मंजिरी कारेकर, डॉ.सुवर्णा बेनके 'भारताचे शासन आणि राजकारण'

३४. डॉ.शाम शिरसाठ, प्रा. भगवानसिंग बैनाडे 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था 'विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद

35. S.R. Maheshwari, local Government in India 'Lakshmi Narain Agarwal Educational publishers Agra -3 -1

36. Alok prasad' Dynamics of Indian Democracy mohit publications, New Delhi' 2

37. IQBAL NARAIN 'state politics in India Meenakshi prakashan -3

38. Jayant Lele 'Yashvantarao Chavan Reflects on Indian society & politics edited by prakash pawar, Dimond publications. -4

39. Ramesh Kumar's congress & congression in Indian politics Deep & Deep publications Delhi -5

४०. पोतदार दत्तात्रय, एम.फिल. प्रबंध विषय, जिल्हा नेतृत्वाच्या संकल्पनेचा पुणे जिल्हयाच्या संदर्भात अभ्यास (१९६० ते २००५) (अप्रकाशित लघुशोध निबंध) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, (२००८)

४१. सिरसीकर व.मं., 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण' (इ.स.१९६० ते २०००) कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे– ३०

४२. डॉ.ना.रा.खेकाळे 'राजकीय नेतृत्व(Political leadership), श्री. मंगेश प्रकाशन नागपूर

४३. महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थित्यंतरे (२०१४ ते २०१७) डॉ. विनोद कों. गायकवाड , अथर्व पब्लिकेशन जळगाव

४४. महाराष्ट्राचे राजकारण नफा वळणावर(युनिक ॲकडमी) (विधानसभा निवडणूक २०१४, सामाजिक, आर्थिक व राजकीय अन्वयार्थ) तुकाराम जाधव, अभय कांता, विवेक घोटाळे, विजय कुंजीर, महेश शिरापूरकर

४६. डॉ.पवार प्रकाश, राजकीय अर्थकारण(महाराष्ट्रातील निवडणूकीय राजकारणातील मैलांचा दगड) डायमंड पब्लिकेशन पुणे

४७. य.दि.फडके ‘लोकसभा निवडणुका १९५२ ते १९९९ अक्षर प्रकाशन

४८. प्रा.बिराजदार/घोडके ‘भारतातील स्थानिक स्वशासन संस्था अंथुल पब्लिकेशनस

# प्रकरण तिसरे
# संशोधन कार्यपद्धती

## ३.१ प्रस्तावना –

भारतीय राज्यघटनेने अठरा वर्ष पूर्ण झालेल्या स्त्री–पुरुषांना मतदानाचा अधिकार दिलेला आहे. परंतु मतदानाचा अधिकार प्रभावीपणे वापर केला तर लोकशाही यशस्वी होईल. यासाठी केंद्रपातळीवर लोकसभा व राज्यपातळीवर विधानसभा ही संसदेची प्रतिनिधी गृहे असून या सभागृहामध्ये मतदारांनी आपले प्रतिनिधी निवडून द्यावयाचे असतात.

मतदार संघ पुनर्रचना ही सर्व जिल्ह्यासाठी महत्त्वाची व आवश्यक बाब आहे. प्रत्येक जिल्ह्यानुसार झालेले सामाजिक व राजकीय बदलांचा आढावा प्रस्तुत संशोधनात घेण्यात ओला असून सत्ता व अधिकारापासून वंचित असणाऱ्या काही जिल्ह्यांचा या पुनर्रचनेमुळे फायदा होणार आहे. त्यादृष्टीने मतदारसंघ पुनर्रचना ही महत्त्वाची आहे.

मतदार संघ पुनर्रचनेच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये होणाऱ्या बदलांचा अभ्यास करीत असताना मतदार संघ पुनर्रचनेच्या कार्यपद्धतीमध्ये काही दोष आहेत की नाहीत याचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविण्यात आले आहेत. तसेच त्याबाबत काही शिफारशी केलेल्या आहेत. संशोधनातून होणाऱ्या निष्पत्तीतून मतदार संघ पुनर्रचनेनंतर जिल्हापातळीवर होणाऱ्या राजकीय बदलांची माहीती मिळण्यास यामुळे मदत होते.

## ३.२ विषयाची निवड आणि महत्व –

प्रस्तुत विषय संशोधनासाठी विषय निवडण्यामागील कारणे अशी आहेत.

१) मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मतदारसंघामध्ये जी काही सामाजिक, राजकीय, आर्थिक समीकरणे बदलली आहेत. या बदललेल्या समीकरणांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

२) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे राजकारणांचे स्वरुप बदलणार आहे. या बदललेल्या राजकारणांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

३) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे भौगोलिक असलगता निर्माण झाली या प्रश्नांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

४) मतदारसंघ पुनर्रचनेनंतर त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर काय परिणाम झाला याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

५) मतदारसंघ पुनर्रचनेचा राजकीय पक्षांवर काय परिणाम झाला याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## ३.३ संशोधनाची मर्यादा –

मतदारसंघ पुनर्रचना सर्व भारतभर झालेली आहे. परंतु सर्व देशाचा अभ्यास करणे शक्य नाही. त्यामुळे अभ्यासाची क्षेत्रमर्यादा व कालमर्यादा ही निश्चित केलेली आहे.

शोध प्रबंधामध्ये अभ्यासाची व्याप्ती निश्चित करीत असताना ती केवळ पुणे व सातारा जिल्ह्यापुरती मर्यादित ठेवलेली आहे. कारण संपूर्ण घेणे असे अशक्य आहे. यामध्ये पुणे व सातारा जिल्ह्याचा मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्य राजकीय बदलांचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे.

**१. संशोधन प्रश्न आणि समस्या सूत्रण–**

१. ज्या पद्धतीने नवीन मतदारसंघ निर्माण झाले परंतु त्या मतदार संघातील असणारे प्रश्न नेतृत्वातील वाढ, नेतृत्वातील होणारा बदल यातून नवीन नेतृत्व यासंदर्भातील समस्या निर्माण होत असतात.

२. मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी पूर्वीचा पारंपारिक असणारा पक्ष म्हणजे काँग्रेस हा एकमेंव होता. इतर पक्षांना काँग्रेसच्या राजवटीमध्ये महत्व नव्हते काँग्रेस हा एकमेंव प्रभावशाली पक्ष होता. परंतु पुनर्रनेनंतर मात्र काँग्रेस पक्षांचे असणारे महत्व कमी झाले व इतर पक्षांचे महत्व वाढले या संदर्भात सत्तातर नेमके कोणत्या कारणाने होते किंवा इतर पक्षांना महत्व का प्राप्त झाले हा ही एक महत्वाचा प्रश्न आहे. त्यानुसार इतर पक्षाचे महत्व वाढल्याने एकूण महाराष्ट्र व भारताच्या राजकारणात त्याचा परिणाम म्हणून त्याचे महत्व वाढलेले दिसून येते.

३. राखीव मतदारसंघ करीत असताना पुन्हा तोच मतदारसंघ कसा राखीव होतो. हा ही एक प्रश्न आहे.

४. जात नेतृत्व व प्रादेशिकता या चौकटीतच आतापर्यंत मतदारसंघ पुनर्रचनेचा अभ्यास झालेला आहे. मात्र पुनर्रचनेनंतर स्थानिक व शहरी भागाच्या परिस्थितीचा अभ्यास तुलनात्मक व एकत्रित असा होत नाही.

५. जनतेला बदल हा हवा असतो तो बदल नवीन मतदारसंघ पुनर्रचनेच्या माध्यमातून नेतृत्व बदलातून होत असतो.

**समस्येची जाणीव आणि निवड–**

आपल्या कार्यक्षेत्रात आपल्याला अनेकविध समस्या जाणवता किंवा ज्या कार्यक्षेत्रात आपण काम करतो तिथली परिस्थिती कशी आहे हे अभ्यासकाची आपल्याला गरज वाटते. सर्वच समस्या संशोधनयोग्य असतात. असे नाही संशोधन योग्य समस्या कोणत्या याचा विचार करण्यापूर्वी काही समस्यांची जाणीव संशोधकाला होणे गरजेचे आहे. कारण अशी जाणीव झाली तरच ती समस्या आपली आहे, असे संशोधकाला वाटेल आणि बोलणाऱ्या, जाणवणाऱ्या समस्येवर होणारे संशोधन हे अधिक चांगले होते कारण त्याबद्दल संशोधकाच्या मनात आपले पणाची भावना निर्माण होते.

आपण ज्या क्षेत्रात काम करतो तिथले आपले अनुभव, तिथे राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, त्या क्षेत्रावर आधारित विविध पुस्तके, संशोधने, त्या क्षेत्रातील सहकाऱ्यांशी केलेली चर्चा या सर्वांतून आपल्याला जाणवणाऱ्या समस्येविषयी आधिक चिंतन होत जाते आणि समस्येचा नेमके रूप देण्यास ते उपयुक्त ठरते.

**प्रस्तुत संशोधनाची समस्या –**

मतदारसंघाच्या पुनर्रचनेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या सत्ता समीकरणाचा उदय झालेला दिसून येतो. मतदारसंघ पुनर्रचना ही अघोषित राजकीय सत्तेचे केंद्रिकरण काही जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहिलेले असून काही जिल्हे सत्ता व अधिकारापासून वंचित राहिलेले आहे. मतदारसंघ पुनर्रचनेमुळे मतदारसंघातील बदलाबरोबर राजकारणातही बदल झालेला दिसून येतो. सत्ता व अधिकार न मिळाल्यामुळे राजकीय असंतोष, वाढती लोकसंख्या, वाढते नागरीकरण इ. कारणामुळे मतदार संघाचे स्वरुप बदलले आहे. त्यामुळे या बदललेल्या मतदारसंघाचा राजकीय अभ्यास पुणे व सातारा य दोन जिल्ह्याच्या पातळीवर तुलनात्मक दृष्टिकोनातून करणे गरजेचे आहे.

## ३.४ संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे–

### प्रस्तावना –

मतदारसंघ पुनर्रचना ही भारतासाठी आवश्यक बाब असून दुर्लक्षित जिल्ह्यासाठी त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय निवारणासाठी कायद्यानुसार सर्वांना योग्य तो न्याय देण्यासाठी

मतदारसंघ पुनर्रचना महत्त्वाची आहे. परंतु राजकारणी सत्ताधारी लोक याचा स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्या पद्धतीने मतदारसंघ रचना करावयाचे ठरवितात त्याला आळा घालण्यासाठी व या सर्व व्यवस्थेचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

## प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे–

१) परिसीमन आयोगाचा मतदारसंघ रचनेबाबतच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

२) पुणे व सातारा जिल्ह्यातील मतदार संघाच्या पुनर्रचनेच्या झालेल्या राजकीय व सामाजिक बदलांचा अभ्यास करणे.

३) मतदारसंघ परिसीमन आयोगामुळे पुणे व सातारा जिल्ह्याच्या स्थानिक पातळीवरील बदललेल्या राजकारणांचा अभ्यास करणे.

४) मतदारसंघ परिसीमन आयोगामुळे पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये भौगोलिक असलगता निर्माण झाली त्याचा अभ्यास करणे.

५) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे पुणे व सातारा जिल्ह्याच्या तुलनात्मक राजकीय अभ्यास करणे.

## ३.५ संशोधनाची गृहितके –

### गृहितकृत्ये– (Hypothesis )

सामाजिक संशोधनामध्ये सामाजिक घटनाचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन केले जाते. म्हणून कोणत्याही सामाजिक घटनेचे अध्ययन करताना, शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असते. संशोधनाच्या समस्येचे निर्धारण केल्यानंतर त्या समस्येच्या संदर्भात काही अनुमान किंवा संभाव्य उत्तरे काढली जातात. संशोधन समस्येबाबत प्राथमिक स्वरूपाचे काही ज्ञान व अनुभव संशोधन कर्त्याला असते त्या ज्ञान व अनुभवाच्या आधारावर संशोधन समस्येच्या विविध पैलूंच्या संबंधात एक सामान्य अनुमान काढले जाते याचाच अर्थ संशोधन समस्येच्या संदर्भात काही संभाव्य उत्तरे किंवा अनुमान विधानाच्या स्वरूपात मांडले जाते या संभाव्य उत्तरे व अनुमानामुळे संशोधन कार्य आपले लक्ष काही निश्चित व आवश्यक तथ्यावरच केंद्रीत करतो. त्यामुळे संशोधनाला एक निश्चित दिशा प्राप्त होते. या संभाव्य उत्तरे किंवा अनुमानाला गृहितकृत्ये किंवा उपकल्पना असे म्हणतात.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितके निर्धारित केली आहेत.

## प्रस्तुत संशोधनाची गृहितके

१) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे पुणे व सातारा जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेमुळे सत्ता स्पर्धा आधिक तीव्र होऊन लोकसभा व विधानसभा मतदार संघाची समीकरणे बदलणार आहेत.

२) पुणे व सातारा जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रभाव लोकसभा व विधानसभेपुरता मर्यादित न राहता स्थानिक शासनाच्या राजकारणात बदल होऊन नवीन नेतृत्त्वास चालना मिळाली.

३) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे पुणे व सातारा जिल्ह्यातील लोकसभा, विधानसभा व स्थानिक शासनाच्या राजकारणात राजकीय व सामाजिक बदल होत आहे.

४) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे पुणे व सातारा जिल्ह्याच्या लोकसभेच्या निवडणुकीबरोबरच विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राखीव जागामधून नवीन नेतृत्त्व उदयास येत आहे.

५) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे पुणे जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण हितसंबंध जोडणारे नेतृत्त्व निर्माण होत आहे.

६) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे लोकसभा व विधानसभा पातळीवरील राजकारणात ग्रामीण भागातील मतदार संघाच्य संख्येच्या तुलनेत शहरी भागातील मतदारसंघ संख्या जास्त असल्याने शहरी भागाच्या मतदार संघाचे वर्चस्व निर्माण होत आहे.

## ३.६ संशोधनाचे क्षेत्र

### पुणे

पुणे जिल्ह्यामध्ये अनेक गावे, वस्त्या आणि शहरे असा भाग मिळून तालुका तयार होतो अनेक तालुके मिळून जिल्हा तयार होत असतो. पुणे जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिमेला असून एकूण ५ जिल्ह्यांचा सीमा या जिल्ह्याचा लगत आहेत एकूण १३ तालुक्यांचा मिळून पुणे जिल्हा तयार झाला आहे.

### सातारा

पुणे जिल्हा व सातारा जिल्हा हया जिल्ह्याची अध्ययन क्षेत्र म्हणून निवड केली आहे. पुणे जिलहयामध्ये एकूण चार पुणे, बारामती, शिरूर व मावळ असे लोकसभा मतदारसंघ असून विधानसभा मतदारसंघ २१ इतके आहेत.

पुणे जिल्ह्याबरोबरच सातारा हया जिल्ह्याची अध्ययन क्षेत्र म्हणून निवड केली असून सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा हा एक मतदारसंघ असून विधानसभेचे एकूण ८ मतदारसंघ आहेत.

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा मतदारसंघानुसार विधानसभेचे मतदारसंघ असे आहेत.

१) पुणे– वडगाव शेरी, शिवाजीनगर(कोथरूड) पर्वती, पुणे केन्टोन्मेंट व कसबा

२) मावळ– पनवेल, कर्जत व अरण मावळ, चिंचवड, पिंपरी

३) बारामती– दौंड, इंदापूर, बारामती, पुरंधर, भोर, खडकवासला

४) शिरूर– जुन्नर, आंबेगाव, खेड, आळंदी, शिरूर व हडपसर

सातारा जिल्ह्यामध्ये सातारा लोकसभा मतदारसंघ असून त्यामध्ये वाई, कोरेगाव, कराड उत्तर व कराड दक्षिण, पाटण व सातारा असे एकूण सहा मतदारसंघ असून वाई, खंडाळा, महाबळेश्वर, या तालुक्याचा समावेश होतो. कोरेगाव विधानसभेत– कोरेगाव, खटाव व सातारा कराड उत्तरमध्ये खटाव, कोरेगाव, सातारा व कराड अशी चार तालुके कराड दक्षिणमध्ये कराड तालुक्याचा समावेश होतो. पाटणमध्ये पाटण तालुका व कराड तालुक्यातील सुपने महसूल मंडळ, सातारा जावळी तालुकाखेरीज सातारा तालुक्यातील वर्ये, सातारा, दहिवडी, परळी, अंबवडे व शेंद्रे महसूल मंडळांचा समावेश होतो.

## ३.७.(ब) संशोधन पद्धती

### विश्लेषणात्मक संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनाचा विषय पश्चिम महाराष्ट्रातील मतदार संघ पुनर्रचनेनंतरचे विशेष संदर्भ पुणे व सातारा ( २००२ चा परिसीमन आयोग ) असा असून या संशोधन विषयासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

मतदार संघपुनर्रचनेचा अभ्यास करीत असताना पुणे व सातारा जिल्ह्यातील लोकसभा, विधानसभा व स्थानिक पातळीवरील मतदार संघाच्या संकलित केलेल्या आकडेवारी व माहितीच्या आधारे प्रस्तुत संशोधनाविषयाचे विश्लेषण केलेले आहे. या विश्लेषाणाच्या माध्यामतून संशोधन विषयाचे निष्कर्षा पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला आहे.

### माहितीचे विश्लेषण

प्रस्तुत संशोधनात विविध साधनांतून मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण हे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. माहितीचे विश्लेषण करणे म्हणजे प्रक्रिया केलेल्या माहितीतून मूळ अर्थ

शोधून काढणे व त्याची खात्री करणे होय. माहितीचे विश्लेषण करून गुंतागुंतीच्या स्वरूपातील घटना साध्या व सरळ स्वरूपात मांडल्या जातात. माहितीतील साम्य, फरक, वेगळेपणा व संशोधनातील नवीन प्रवाह लक्षात घेऊन संशोधकास माहितीचे विश्लेषण करताना लवचिकता ठेवावी लागते. माहितीच्या विश्लेषणातील तंतोतंतपणा आणि वस्तुनिष्ठता संशोधकामध्ये असलेल्या कौशल्यावरच अवलंबून असते. संशोधन विषयाची पार्श्वभूमी, संशोधनातील विविध टप्पे आणि संशोधनासाठी माहिती गोळा करण्याची पद्धती यातूनच संशोधकाकडे कौशल्य येऊ शकते. विश्लेषणासाठी दर्जेदार पद्धतीचा वापर करून संशोधनाला दर्जा प्राप्त करून देता येतो.

**सारांश**

माहितीवरील प्रक्रियेनंतर माहितीचे संपादन, क्रमावारिता, वर्गीकरण व तक्त्याच्या रूपातील मांडणीनंतर पुढच्या टप्पा म्हणजे विश्लेषण व त्यानंतर स्पष्टीकरण, माहिती विश्लेषण म्हणजे तक्त्याच्या स्वरूपातील माहिती मुळापासून अर्थ शोधण्यासाठी अभ्यास करणे होय.

प्रत्यक्षात विश्लेषणाची सुरुवात माहिती जमा करण्यापासून होते. विश्लेषणाचे नियोजन स्वतः संशोधकालाच करावे लागते. माहितीच्या विश्लेषणात संशोधन विषयातील प्रश्नांची उत्तरे मिळतात. या उत्तरांच्या आणि माहितीच्या स्पष्टीकरणातून संशोधनातून हाती आलेल्या निष्कर्षांना अन्वायार्थ प्राप्त होतो.

**प्राथमिक साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाचे राजपत्र, परिसीमन आयोगाचे अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयातील माहिती व निवडणुक कार्यालयातील माहिती व निवडणुक कार्यालयवरील माहिती या प्राथमिक साधनांद्वारे अभ्यास केला आहे. पुणे जिल्ह्यातील २ लोकसभा प्रतिनिधी व १२ विधानसभा प्रतिनिधी आणि सातारा जिल्ह्यातील एक लोकसभा प्रतिनिधी व ५ विधानसभा प्रतिनिधींच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या तसेच दोन्ही जिल्ह्यातील जिल्हापरिषद व पंचायत समिती सदस्यांपैकी ५ टक्के सदस्यांची लॉटरी पद्धतीने निवड केली व या सर्वांचा मुलाखती घेऊन प्राथमिक माहिती संकलित केली आहे.

**प्रस्तुत संशोधनाच्या माहितीसंकलन साधने**

**१) प्राथमिक स्त्रोत–**

कोणत्याही संशोधन प्रक्रियेत प्राथमिक माहितीच्या स्त्रोताला विशेष महत्त्व असते. प्राथमिक माहितीही मूळ माहिती असून ती सत्य व वस्तुस्थितीवर आधारित असते. यामध्ये

प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षणे, प्रत्यक्ष दस्तऐवज आणि हस्तलिखीतांचा समावेश होतो. प्रस्तुत अभ्यासासाठी निरीक्षण अर्थपूर्ण माहिती मिळविण्यासाठी पुढील प्रकरणे प्राथमिक स्त्रोत वापरले आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी परिसीमन आयोगाचे अहवाल, महाराष्ट्र शासनाचे राजपत्र, जिल्हाधिकारी कार्यालयातील माहिती, महाराष्ट्र शासनाचे परिपत्रके, प्रत्यक्ष भेटी, अवलोकन इत्यादी प्राथमिक साधनांचा वापर करणार आहे.

**२) दुय्यम स्त्रोत–**

सामाजिक शास्त्रातील संशोधनात दुय्यम माहितीच्या स्त्रोताला विशेष महत्त्व असते. दुय्यम माहितीच्या आधारे सत्यापर्यंत जाता येते. प्रस्तुत अभ्यासासाठी खालील दुय्यम स्त्रोताच्या साह्याने माहितीचे संकलन केले आहे.

तसेच नियतकालिके, साप्ताहिके, विविध लेखकांचे प्रकाशित ग्रंथ, वृत्तपत्रीय लेख, शोधनिबंध, संशोधन अहवाल, स्मरणिका, संशोधन प्रबंध, शासकीय आकडेवारी, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

१) विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ व माहिती पुस्तके

२) M.Phil., पीएच.डी. प्रकाशित व अप्रकाशित प्रबंध

३) शासनाने प्रकाशित केलेली विषयाशी संबंधित आकडेवारी

४) भारतीय संविधान प्रत

१) जिल्हा कार्यालयातील अहवाल

२) महाराष्ट्र व पुणे जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक पाहणी.

३) वर्तमानपत्रे

४) मासिके

**अप्रकाशित प्रलेखे**

१) शासकीय रेकॉर्ड

२) संशोधन अहवाल

## ३.९ प्रकरण योजना

**प्रकरण पहिले –संशोधनाची ओळख– Introduction**

**अ) संशोधन विषयाची प्रस्तावना–**

मतदार संघ पुनर्रचना अर्थ, मतदार पुनर्रचना आयोगाची रचना भारतीय संविधानातील तरतूदी, मतदार संघ पुनर्रचनेची मार्गदर्शक तत्त्वे, मतदारसंघ पुनर्रचनेनंतर महाराष्ट्राचे राजकारण, मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे व सातारा विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे बदलते स्वरूप

**ब) परिसीमन अयोगाची ओळख–**

यामध्ये भारतीय परिसीमन आयोग, उदय व विकास, रचना, पहिला, दुसरा, तिसरा व चौथा परिसीमन आयोग १९५३,१९६३,१९७३ व २००२ चा अहवाल आयोगावरील बंधने व मतदार संघाबद्दल भूमिका इ. घटकांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आलेला आहे.

**प्रकरण दुसरे– संदर्भ साहित्यांचा आढावा**

या प्रकरणामध्ये संबंधित साहित्याचा आढावा, गत संशोधनाचा आढावा यामध्ये घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण तिसरे – संशोधनाची कार्यपद्धती**

यामध्ये प्रस्तावना, संशोधन समस्या, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे, संशोधन अभ्यासाची गृहितके, संशोधनाची पद्धत, तथ्य संकलनाची साधने, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा विषयाची निवड, प्रकरणाची योजना इ. घटक घेण्यात आलेले आहेत.

**प्रकरण चौथे–तथ्य विश्लेषण आणि अर्थ निर्वचन**

पुणे व सातारा जिल्ह्याचे पुनर्रचनेनंतर राजकीय व समाजिक बदल यामध्ये अ) पुणे व सातारा जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक अ)पुणे व राजकीय माहिती ब) पुनर्रचनेनंतर पुणे व सातारा ब) सातारा जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक बदल क) पुणे व सातारा जिल्ह्यातील पुनर्रचनेनंतरचा तुलनात्मक राजकीय अभ्यास या प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण पाचवे – सारांश / निष्कर्ष**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाचा सारांश, गृहितकांची पडताळणी व शिफारशी, या घटकांची मांडणी केली आहे.

## संदर्भ

१) डॉ.आगलावे प्रदिप(२००९), संशोधनाची तंत्रे आणि मंत्रे

२) नाडगोंडे गुरूनाथ(१९९८), सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३) डॉ.मायी सुनील, सामाजिक संशोधन पद्धती, डायमंड प्रकाशन, पुणे

४) डॉ.प.श्री.पांढरीपांडे, राजकीय व सामाजिक संशोधन पद्धतीची मुलतत्त्वे, श्री.मंगेश प्रकाशन, पुणे.

# प्रकरण चौथे
# तथ्य विश्लेषण आणि अर्थ निर्वचन

या प्रकरणाचे तीन विभागामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. अ) पुणे व सातारा जिल्ह्याची भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय पार्श्वभूमी ब) पुणे व सातारा जिल्ह्याची पुनर्रचनेनंतरचे राजकीय व सामाजिक बदल क) पुणे व सातारा जिल्ह्याचा पुनर्रचनेनंतर तुलनात्मक राजकीय अभ्यास अशी केलेली आहे.

## ४.१ पुणे व सातारा जिल्ह्याची भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय पार्श्वभूमी

### ४.१.१ प्रास्ताविक –

'पुणे जिल्हा' असे नाव पुणे शहराच्या नावावरून दिले आहे. राष्ट्रकूट राजांच्या ताम्रपटावरील कोरेगाव लेखामध्ये या शहराचा उल्लेख 'पुनकवाडी' 'पुनकविषय' असा आढळतो. मोगल राजवटीत या गावाला 'कसबे पुणे' असा उल्लेख सापडतो. मराठा राजवटीचे केंद्र पेशव्यांची राजधानी म्हणून पुणे या शहरास राजकीय व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. या शहरास राजकीय व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. पुणे हे महत्त्वाचे शैक्षणिक, औद्योगिक सांस्कृतिक व व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जात आहे.[१]

सह्याद्री पर्वतामुळे सातारा जिल्ह्यास वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालेले आहे. सातारा जिल्ह्यास प्रागैतिहासिक काळापासून राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यास महाराष्ट्राच्या इतिहासात गौरवशाली स्थान प्राप्त झाले आहे. दुर्गमता हे सातारा जिल्ह्याचे भौगोलिक वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्यामुळे येथे शिवाजी राजांनी स्वराज्याची स्थापना केली. आपले स्वातंत्र्य दीर्घकाळ टिकविण्याचा प्रयत्न या जिल्ह्यात झाला. सातारा जिल्ह्याला या वैभवशाली ऐतिहासिक परंपरेचा सार्थ अभिमान आहे. सातारा जिल्ह्यात घडलेल्या राजकीय परिवर्तनाचे दूरगामी परिणाम समाज जीवनावर झाले.[२]

### ४.१.२ पुणे जिल्हा –

**भौगोलिक स्थान व प्राकृतिक रचना**

महाराष्ट्रातील एक प्रगत जिल्हा म्हणून पुणे जिल्ह्याची ओळख आहे. पश्चिम महाराष्ट्रातील या जिल्ह्याला इतिहास आहे. पुणे जिल्ह्यामध्ये शहर, हवेली, पुरंदर, इंदापूर,

बारामती, दौंड, भोर, वेल्हे, खेड, शिरूर, जुन्नर, आंबेगांव, मावळ व मुळशी असे एकूण १४ तालुके आहेत.[३]

## भौगोलिक स्थान


पश्चिम महाराष्ट्रातील शेती व साखर उद्योगांच्या दृष्टीने पुणे जिल्हा हा वैशिष्ट्यपूर्ण आहे. पुणे जिल्हा ७५.२० व ७५.१० पूर्व रेखांश या भौगोलिक पट्ट्यामध्ये वसला आहे. पुणे जिल्ह्याच्या उत्तर व पूर्व बाजूस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेला सातारा व पश्चिमेस रायगड जिल्हा आहे. पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५६४२ चौ.कि.मी. असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५टक्के आहे. पुणे जिल्ह्यात जमीन उंच सखल असल्याने घाटमाथा, मावळ व पठार असे जिल्ह्याचे तीन विभाग पडतात.

## प्राकृतिक रचना

पुणे जिल्ह्याचे पठार सपाट नाही. सह्याद्रीच्या पर्वतरांगा उत्तरेकडून दक्षिणेकडे पसरलेल्या आहेत. पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागात सहयाद्री पर्वताच्या रांगा पसरलेल्या आहेत. या भागात अनेक उंच शिखरे आहेत. हा डोंगराळ भाग सुमारे ५ ते १० कि.मी. रुंदीचा असून त्यास घाटमाथा' असे म्हणतात.[४]

जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भाग सपाटी प्रदेशाचा आहे. सह्याद्रीच्या पूर्वभागात असलेल्या ३० ते ४० कि.मी. रुंदीच्या पट्ट्यास 'मावळ' म्हणून ओळखले जाते. सहयाद्रीचा पूर्व भाग डोंगराळ व टेकडयांचा आहे. या प्रदेशात नद्यांची खोरी आहेत. पश्चिमेकडील डोंगराळ भाग या भागाला लागून असलेला पूर्वेकडील टेकड्यांचा उंच सखल प्रदेश आहे.

## पुणे जिल्ह्याचा प्राकृतिक रचना दर्शविणारा नकाशा



## जमीन, हवामान आणि पर्जन्यमान


पुणे जिल्ह्यात तांबडी, तपकीरी व काळी जमीन आढळते. पश्चिमेकडून पूर्वेकडे गेले असता मृदेची सुपीकता वाढलेली आढळून येते. जुन्नर, आंबेगाव, खेड व पुरंदर या भागातील डोंगराळ प्रदेशात तांबडी मृदा आढळते तर खेड, हवेली, शिरूर व दौंड व पुरंदर या तालुक्यांच्या काही भागात तपकीरी मृदा आढळते. इंदापूर व बारामती तालुक्यात काळी कसदार मृदा आढळते.

## पुणे जिल्ह्यातील धारणा क्षेत्र(विश्लेषण)

पुणे जिल्ह्यातील ४.९८ लाख जमीनधरकांपैकी ३.१८ लाख जमीनधारक अल्पभूधरक आहेत. त्यांचे जमिनीचे क्षेत्र २ हेक्टर पेक्षा कमी आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना जमिनीत सुधारणा करता येत नाही तसेच ज्या शेतकऱ्यांकडे २ हेक्टरपेक्षा जास्त जमीन आहे. अशा १.८ लाख जमीनधारकांना शेती उत्पादनात वाढ करता आली. ४ हेक्टर पेक्षा जास्त जमीन असणाऱ्यांचे प्रमाण फक्त १४ टक्के आहे.[५]

महाराष्ट्र राज्याच्या पश्चिमेला असणाऱ्या समुद्राचा हवामानावर परिणाम होतो. तशाच प्रकारे तो पुणे जिल्ह्याच्या हवामानावर परिणाम करतो. कोकण किनारपट्टीला समांतर उत्तर दक्षिण या  पर्वत रांगेने नैऋत्य मोसमी वारे अडविल्यामुळे जिल्ह्याला जास्त पाऊस मिळतो.

पुणे जिल्ह्यातील पावसाचे प्रमाण विषम स्वरूपाचे आहे. पश्चिम घाटाच्या भागात वार्षिक सरासरी पावसाचे प्रमाण ४०० से.मी.पेक्षा जास्त आहे. तर पश्चिम घाटाच्या शेजारी असलेल्या मावळ भागात पावसाचे प्रमाण २०० से.मी. ते ४०० से.मी. आहे. विशेषतः भोर, मावळ, वेल्हा, मुळशी, खेड, आंबेगाव व जुन्नर या तालुक्यात १११७ मि.मि.पाऊस पडतो तर पूर्वेकडील तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी म्हणजेच ६०० ते ७०० मि.मि.एवढे आढळून येते.




पुणे जिल्ह्यातील भूमी उपयोजन नकाशा

**पर्जन्यमान तालुकानिहाय(मि.मि.)**[६]

| अ.नं. | तालुका | १९९१ | २००२ |
|---|---|---|---|
| १. | जुन्नर | ८५७.८० | ६४५.६ |
| २. | आंबेगाव | ७९९.४० | ४९५.६ |
| ३. | शिरूर | ४१८.९० | ५७७.०० |
| ४. | खेड | ७५१.४० | ५३९.२ |
| ५. | मुळशी(पौड) | १,९४६.०० | १०७२.०० |
| ६. | मावळ | -- | १०५५.०० |
| ७. | पुणे शहर | १०४२.८० | ८१६.२ |
| ८. | पुरंदर(सासवड) | १,०४४.०० | २७६.०० |
| ९. | वेल्हे | २,४३७.०० | १२७३.०० |
| १० | भोर | १३५२.०० | ८४०.०० |
| ११. | बारामती | ४१२.६० | २३७.५ |
| १२. | इंदापूर | ४०३.५० | ३४९.५ |
| १३. | दौंड | ५६६.१० | २६०.५ |

**(पुणे जिल्हा आ.व सा. पाहणी अहवाल २००२-०३)**

**शेती, पिके व जलसिंचन व्यवस्था -**

शेती हा महत्त्वाचा व्यवसाय पुणे जिल्ह्यात केला जातो. काम करणाऱ्या लोकसंख्यपैकी ५१.१७ टक्के लोक शेती हा व्यवसाय करतात. पुणे जिल्ह्यामध्ये ४.९८ लाख जमीनधारक आहेत. त्यामध्ये २ हेक्टर पेक्षा कमी धारणाक्षेत्र असलेले ६४ टक्के सीमांत व लहान शेतकरी आहेत.


पुणे जिल्ह्यात प्रामुख्याने बाजरी, तांदूळ, गहू, हरभरा, ज्वारी, कांदा टोमॅटो, द्राक्षे, संत्री, मोसंबी ही पिके घेतली जातात. खरीप ज्वारीच्या दृष्टीने भोर, खेड, हवेली, इंदापूर महत्त्वाचे आहेत तर इंदापूर, दौंड, शिरूर, बारामती व पुरंदर हे रब्बी ज्वारीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. तांदळाच्या पिकासाठी शिरूर, जुन्नर, खेड व वेल्हे तालुके प्रसिद्ध आहेत. टोमॅटो उत्पादनासाठी आंबेगाव, बटाता उत्पादनासाठी आंबेगाव, जुन्नर, द्राक्षे उत्पादनासाठी बारामती

व हवेली तर संत्री मोसंबी दौंड व शिरूर तर अंजीर व सिताफळासाठी पुरंदर तालुका प्रसिद्ध आहे.[७]

भीमा नदी ही पुणे जिल्ह्यातीला प्रमुख नदी आहे. ती पुणे जिल्ह्यातच आंबेगाव तालुक्यात सहा पर्वतरांगामध्ये 'भीमाशंकर' येथून उगम पावते. जिल्ह्यातील तिचा प्रवास आंबेगाव, खेड, शिरूर या तालुक्यातून व दौंड व इंदापूर या तालुक्याच्या सीमावर्ती भागातून होतो. इंद्रायणी, घोड, मुळा, मुठा व नीरा या भीमेच्या जिल्ह्यातील प्रमुख उपनद्या आहेत.

वेळवंडी या नीरेच्या उपनदीवर भाटघर येथे धरण बांधण्यात आले आहे. खडकवासला प्रकल्पातंर्गत पुण्याजवळ तीन धरणे बांधण्यात आली आहेत. अंबी या मुठेच्या उपनदीवर वरसगांव येथे दुसरे धरण आहे. अंबी, मोशी व मुठा या नद्यांवर खडकवासला येथे तिसरे धरण बांधण्यात आले आहे.

वरील प्रकल्पाशिवाय खेड तालुक्यातील चासकमान, प्रकल्प, जुन्नर तालुक्यात पुष्पवरी प्रकल्प, पुरंदर तालुक्यात नाझरे प्रकल्प हे मध्यम प्रकल्प आहेत. धरणांचा जिल्हा म्हणून पुणे जिल्ह्याला ओळखले जाते. याचे कारण म्हणजे पुणे जिल्ह्यामध्ये पश्चिम भागात सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा विखुरलेल्या आहेत. या परिसरामध्ये प्रचंड पाऊस पडतो. पर्वरतरांगाच्या तीव्र उतारामुळे नद्यांचा उगम पश्चिम भागात दिसतो. त्यामुळे पावसाचे पाणी साठविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सिंचन प्रकल्प उभारण्यात आले आहेत.[८]




पर्जन्य व तापमान वितरण नकाशा (पुणे जिल्हा)

**क्षेत्रफळ व लोकसंख्या –**

पुणे जिल्ह्याचा विस्तार १७° ५४′ उ. ते १९° २४ उ. आणि ७३° १९′ पू. ते ७५° १०′ पू. या दरम्यान आहे. पुणे जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १५,६४३ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या शेकडा ५ टक्के आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टिने पुणे जिल्ह्यामध्ये शिरूर तालुका सर्वात मोठा आहे तर पुणे शहर सर्वात लहान आहे.[९]

**क्षेत्रफळ–**

**तालुका निहाय क्षेत्रफळ**[१०]

| अ.नं. | तालुका | क्षेत्रफळ हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जुन्नर | १,३८,४७२ | ९ |
| २. | आंबेगाव | १,०४,२७५ | ७ |
| ३. | शिरूर | १,५५,७२७ | २० |
| ४. | खेड | १,३७, ३५४ | ९ |
| ५. | मावळ | १,१३,१३५ | ७ |
| ६. | मुळशी | १,०३,९३१ | ७ |
| ७. | हवेली | १,३३,६२७ | ९ |
| ८. | पुणे शहर | ११,९९० | १ |
| ९. | दौंड | १,२८,९८६ | ८ |
| १० | पुरंदर | १,१०,३५३ | ७ |
| ११. | वेल्हे | ४९,९५५ | ३ |
| १२. | भोर | ८९,२३४ | ६ |
| १३. | बारामती | १,३८२४८ | ९ |
| १४. | इंदापूर | १,४६,७९१ | ९ |
|  | एकूण | १५,६२,०५८ | १०० |

सन २०११ च्या जनगणनेच्या प्राथमिक आकडेवारीनुसार पुणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ९४.२७ लाख आहे. यामध्ये ४९.३६ लाख पुरुष व ४४.९१ लाख स्त्रिया आहेत.


जिल्ह्याची लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटर मागे ६०३ माणसे एवढी आहे. जिल्ह्यात ८७ टक्के लोक साक्षर आहेत.

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्या ४२ टक्के आहे तर नागरी भागातील लोकसंख्या ५८ टक्के आहे.

### २) पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या प्रमाण (२०११ नुसार)[११]

**तक्ता**


| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| **नागरी** | ११.०८ | १३.१६ | १३.०४ | १२.८८ | १४.१७ | १८.९८ |
| **ग्रामीण** | ८८.९२ | ८६.८४ | ८६.९६ | ८७.१२ | ८५.८३ | ८१.०२ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, पुणे जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण १९६१ साली ११.०८ इतके होते. ते २०११ साली १८०९८ इतके वाढलेले दिसून येते. तसेच पुणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण १९६१ साली ८८.९२ इतके होते. ते २०११ मध्ये कमी होवून ८१.०२ इतके झाले.

**साक्षरतेचे प्रमाण**[१२]

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| **पुरु ष** | ४७.४१ | ५२.३८ | ६१.३९ | ८६.६१ | ८८.२० | ९२.०९ |
| **स्त्रिया** | २१.१६ | २४.७७ | ३५.६७ | ५३.६५ | ६८.३८ | ७६.२९ |
| **एकूण** | ३३.९८ | ३८.३२ | ४७.१५ | ६६.६७ | ७८.२२ | ८४.२० |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, पुणे जिल्ह्यातील पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ४४.४१ इतके होते ते २०११ मध्ये वाढून ९२.०९ इतके झाले. १९६१ मध्ये स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण २१.१६ इतकेच होते. २०११ मध्ये हे प्रमाण वाढून स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ७६.२९ इतके झाले.

**पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्या विभाग(लोकसंख्या हजारात)**[१३]

| अ.नं. | तालुका | १९९१ | २००२ |
|---|---|---|---|
| १. | जुन्नर | ३०३ | ३७० |
| २. | आंबेगाव | १८६ | २०० |
| ३. | शिरूर | २४७ | ३११ |
| ४. | खेड | २८३ | ३५७ |
| ५. | मुळशी | १२३ | १२७ |
| ६. | मावळ | २४२ | ३०५ |
| ७. | पुणे शहर | १,७३५ | २,६९७ |
| ८. | दौंड | २६३ | ३४१ |
| ९. | पुरंदर | १९२ | २२० |
| १० | वेल्हे | ५३ | ५५ |
| ११. | भोर | १५४ | १७१ |
| १२. | बारामती | ३१० | ३७३ |
| १३. | इंदापूर | २८७ | ३४९ |
| १४. | हवेली | १,१४४ | १,३४७ |

**(जनगणना अहवाल सन २००२-०३)**

पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्येची आकडेवारी पाहिली असता असे दिसून येते की, ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात लोकसंख्येचे प्रमाण वाढलेले दिसून येते. १९९१ ते २००२ पर्यतचा कालखंड पाहिला असतात पुणे जिल्ह्यात पुणे शहर, हवेली, जुन्नर, बारामती खेड असा शहरी भागात १९९१ मध्ये लोकसंख्येचे प्रमाण १७३५, ११४४, ३०३, ३१०, २८३ असे प्रमाण होते ते २००२ मध्ये २६९७, १३४७, ३७०, ३७३, ३५७ असे वाढलेले दिसून येते. इतर ग्रामीण भागातील तालुक्यांची लोकसंख्येची आकडेवारी कमी राहिलेली दिसून येते.

**ऐतिहासिक महत्त्व –**

पुण्याचे प्राचीन कालखंड दाखविणारा लिखित पुरावा राजा कृष्णदेवराव यांच्या दानपत्रात पुण्याला पुण्यविषयी (इ.स.७५८) असा उल्लेख आढळून येतो. नंतर पुनक विषय(इ.स.७६८) नंतर पुनकविषय (इ.स.९९३) नंतर पुनवडी तसेच कसबे पुणे तर अलीकडे पुणे शहर असे नांव प्राप्त होत आले.[१४]

पुणे मागील २०० ते २५० वर्षापासून बदलत आले आहे. महाराष्ट्रात मुंबईनंतर पुण्याचा सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक क्षेत्रातील विकासात दुसरा क्रमांक लागतो. मराठा राजवटीचे केंद्र पेशव्यांची राजधानी म्हणून पुणे शहरास राजकीय व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

चालुक्य, आंध्र, राष्ट्रकूट आणि यादवकालीन साम्राज्यात पुण्यास व्यापार आणि वाणिज्यामुळे अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. मध्ययुगीन काळातील बहामनी, निजामशाही, आदिलशाही या इस्लामी राजवटीमध्ये व मराठा, ब्रिटिश राजवटीमध्ये पुण्याला जेवढे महत्त्व होते तेवढे स्वातंत्र्यानंतरही टिकून आहे. पुण्याच्या इतिहासामध्ये पेशवाईला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

हिंदवी स्वराज्य हे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रथम विचार शिवरायांच्या मनात याच भूमीत आला. मराठा राजवटीत पुणे हे एक महत्त्वाचे राजकीय केंद्र होते. शिवराय व पुणे हे अतूट नाते आहे. नंतरच्याकाळात बाजीराव पेशव्यांनी आपली राजधानी वसविली परंतु त्यांना राजवट जास्त काळ टिकविता आली नाही. इ.स.१८१८ मध्ये मराठेशाही संपुष्टात येऊन पुण्याच्या शनिवार वाड्यावरील 'भगव्या' झेंड्याची जागा ब्रिटनच्या 'युनियन जॅक' ने घेतली. पुणे ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, महात्मा फुले, गोपाळ

गणेश आगरकर, गोपाळ हरी देशमुख, लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, महर्षी धोंडो केशव कर्वे, चाफेकर बंधू, पंडीता रमाबाई इत्यादी राष्ट्रपुरुष क्रांतीकारकांची पुणे हीच कर्मभूमी होती. या राष्ट्रभक्तीच्या अथक प्रयत्नांनंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर पुण्याच्या शनिवारवाड्यावरील 'युनियन जॅक काढून तेथे अत्यंत शोभनीय असा 'तिरंगा ध्वज' फडकविण्यात आला.[१५]

**सहकारी चळवळ –**

सहकारी पतसंस्था सहकारी चळवळीचा गाभा आहे. गाव हे सहकारी चळवळीचे मुख्य कार्यक्षेत्र होय. गावागावातून ही चळवळ वाढून सहकार क्षेत्राचा जिल्ह्यात विकास झाला. १९३९ साली पुणे जिल्ह्यात १९२ अशा संस्था होत्या. याचाच अर्थ या काळातही लोकांना सहकाराचे महत्त्व कळलेले होते. पुणे जिल्हा हा प्रगत विचारांचा जिल्हा आहे. त्यामुळे सहकार चळवळीने या जिल्ह्यात मूळ धरले. सहकारी साखर कारखाने, दूध संस्था, बँका व विविध सहकारी संस्था यांचे जाळे फार मोठ्या प्रमाणात पुणे जिल्ह्यात आहे. जिल्ह्यामध्ये सहकाराच्या माध्यमातून निर्माण झालेल्या पतसंस्था, बँकाच्या माध्यमातून कर्जपुरवठा होऊन खाजगी सावकारीचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला आहे. सहकाराच्या माध्यमातून अनेक लोकांना रोजगार उपलब्ध होऊन जिल्ह्यातील अर्थकारणात बदल होण्यास सुरुवात झालेली आहे.[१६]

**उदयोगधंदे**


औद्योगिक पुणे हा प्रगत जिल्हा आहे. खडकी या ठिकाणी दारूगोळा कारखाना आहे तर चिंचवड येथे ट्रक, रिक्षा, स्कूटर, मोटार सायकलचे कारखाने आहेत. पुणे जिल्ह्यात औषधे रबरी व प्लास्टीकच्या वस्तू, साबण, बिस्किटे, लाकडी खेळणी यांची निर्मिती केली जाते.

पुणे जिल्ह्यात पिंपरी चिंचवड, भोसरी, गुलटेकडी, पर्वती, हडपसर, बारामती, भोर, शिक्रापूर, रांजणगाव (ता.शिरूर ) या ठिकाणी वसाहती व औद्यौगिक केंद्रे प्रस्थापित झाली आहे. रेल्को, फिलिप्स, बजाज, किर्लोस्कर, सेन्चुरी ऐका, गरवारे नायलॉन, क्रॉप्टन ग्रीव्हज या सारख्या कंपन्या तसेच वैकुंठगाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था ही सहकारी क्षेत्रातील प्रगत संशोधन संस्था पुणे येथे आहे. उद्योगसमुहांचे अनेक आधुनिक उदयोग या औद्योगिक पट्टयात एकवटलेले आहेत. पिंपरी येथे हिंदुस्थान ॲन्टीबायोन्टिक्सचा कारखाना आहे. खडकी व देहूरोड येथे केंद्र सरकारचा दारूगोळा कारखाना आहे.[१७]

**दळणवळण**

वाहतूक हा मानवाचा तृतीय श्रेणीतील महत्त्वाचा व्यवसाय आहे. कोणत्याही देशाचा , राज्याचा, जिल्ह्याचा तसेच शहराचा आर्थिक विकास वाहतूक साधने व सोयी–सुविधावर असतो. २०११ च्या आकडेवारीनुसार पुणे जिल्ह्यामध्ये– १) द्रुतगती (एक्सप्रेस) मार्ग, २) राष्ट्रीय महामार्ग, ३) राज्य महामार्ग व ४) गाव रस्ते अस्तित्त्वात आहेत.

पुणे जिल्ह्यामधून पुणे–मुंबई हा द्रुतगती मार्ग, पुणे नाशिक, पुणे सोलापूर, पुणे मुंबई, पुणे बंगलोर हे चार राष्ट्रीय महामार्ग गेलेले आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये असणाऱ्या लोहमार्ग, राष्ट्रीय मार्गामुळे प्रवासी व मालवाहतूक मोठया प्रमाणावर होते. मुंबई–पुणे–बंगळूर–चेन्नई हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार जिल्ह्यातून जातो. पुणे–सोलापूर–हैद्राबाद विजयवाडा हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक नऊही पुणे जिल्ह्यामधून जातो. मुंबई–पुणे–कोल्हापूर हा लोहमार्ग जिल्ह्यातून गेला आहे. पुणे–मिरज हा पुणे जिल्ह्यामधून जाणारा आणखी एक लोहमार्ग आहे. पुण्याजवळ लोहगाव येथे विमानतळ आहे.[१८]



**दळणवळण व वाहतूक**[१९]

| अ.नं. | बाह्य तपशील | १९९२–९३ | १९९८–९९ | २००५–०६ | २००८–०९ |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रमुख जिल्हा मार्ग (कि.मी.) | २५५२ | ४२०३ | २६६५ | २९४८ |
| २. | इतर जिल्हा मार्ग | २१५१ | ८२० | ४२७० | २९४८ |
| ३. | ग्रामीण रस्ते (कि.मी.) | ४५५४ | ३८ | ९४४५ | १३९४९ |
| | एकूण | ९२३७ | ५०६१ | १६३८० | १९८४५ |

पुणे जिल्ह्यातील दळणवळण व वाहतूकीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, प्रमुख जिल्हा मार्ग १९९२–९३ साली २५५२ कि.मी.चा होता. तो २००८–०९ मये २९४८ कि.मी.इतका वाढलेला आहे. ग्रामीण रस्त्यांची सुधारणा विकास पाहता असे दिसून येते की, १९९२–९३ मध्ये हे ग्रामीण रस्ते ४५५४ कि.मी. होते ते २००८–०९ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन ते १३९४९ कि.मी.चे ग्रामीण रस्त्यांची निर्मिती झालेली आहे.

**शैक्षणिक वाटचाल –**

व्यक्तीच्या जीवनामध्ये शिक्षण हा घटक महत्त्वाचा आहे. शिक्षण हे परिवर्तनाचे व प्रबोधनाचे साधन आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यत अनेक सोयी पुणे जिल्ह्यामध्ये उपलब्ध आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्यामध्ये ४४४० प्राथमिक शाळा, १०१९ माध्यमिक शाळा व ४० उच्च शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. जिल्ह्यात एकूण २२ औद्योगकि प्रशिक्षण संस्था आहेत. औंध प्रशिक्षण संस्था सर्वात मोठी असून मुलींच्या शिक्षणासाठी एकमेव संस्था आहे.

पुणे जिल्ह्यामधील पुणे विद्यापीठ, भारती विद्यापीठ, सिम्बॉयसीस, सिंहगड इन्स्टिटयुट इत्यादी संस्थामधून कला, वाणिज्य, शास्त्र, वैद्यकीय, अभियांत्रिकी व संगणक शाखेत केवळ याच राज्यातील नव्हे तर देशातील तसेच परदेसातील विद्यार्थीही शिक्षण घेत आहेत. याशिवाय महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, NDA, लष्करी संस्था, सी डॅक,

आयुका भाततीय शिक्षण संस्था, प्रकाशन व साहित्य संस्था, भांडारकर संस्था, बालभारती गोखले अर्थशास्त्र इत्यादी संस्थाही पुणे शहरात संशोधनाचे व विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

पुणे जिल्ह्यामध्ये २०११–१२ यावर्षी ६५२७ प्राथमिक, १८७८ माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्था होत्या. त्या संस्थामध्य अनुक्रमे ९.७२ लाख ११.६६ लाख विद्यार्थी पटावर होते. तर सन २०११–१२ मध्ये ८१ कनिष्ठ महाविद्यालयीन संस्था होत्या. त्या संस्थामध्ये १.२९ लाख विद्यार्थी पटावर होते. जिल्ह्यात एकूण २२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. ओंध प्रशिक्षण संस्था सर्वात मोठी असून मुलींच्या शिक्षणासाठी एकमेव संस्था आहे.[२०]

पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठ, भारती विद्यापीठ, सिम्बॉयसीस संस्था, सिंहगड इन्स्टिटयुट इत्यादी संस्थामधून कला, वाणिज्य, शास्त्र, वैद्यकीय, आभियांत्रिकी व संगणक शाखेत केवळ याच राज्यातील नव्हे तर देशातील तसेच परदेशातील विद्यार्थीही शिक्षण घेत आहेत. याशिवाय महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, छऊअ लष्करी संस्था, सी–डॅक, आयुका, भारतीय शिक्षण संस्था, प्रकाशन व साहित्य संस्था, भांडारकर संस्था, बालभारती, गोखले अर्थशास्त्र इत्यादी संस्था ही पुणे शहरात संशोधनाचे व विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

**शैक्षणिक विकासाची महाराष्ट्राशी तुलना** [२१]

| अ. नं. | शिक्षण स्तर | शाळा संस्था | | पुणे जिल्हा प्रमाण(टक्केवारीत) | विद्यार्थी संख्या | | पुणे जिल्हा प्रमाण(टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुणे | महाराष्ट्र | | पुणे | महाराष्ट्र | |
| १. | प्राथमिक | ४,३२० | ६८,३८४ | ६.३१ | ७,७७,९९२ | ११,७३८ | ६.६२ |
| २. | माध्यमिक | ८४६ | १५,४९७ | ५.४५ | ३,७४,३१५ | ८,०८२ | ४.६३ |
| ३. | कनिष्ठ महाविद्यालये | २५३ | ३,८१६ | ६.६२ | ३,७०,९८३ | १,५५४ | २३.८७ |

**(आधार : पुणे जिल्हा सामा.व आर्थिक पाहणी समालोचन –२००२–०३)**

**प्रशासकीय विभाग –**

पुणे जिल्ह्यामध्ये १४ तहसिल असून ते पुढीलप्रमाणे आहेत. – जुन्नर, आंबेगाव, शिरूर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, पुणे शहर, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती व इंदापूर इत्यादी.

**प्रशासकीय संरचना –**

चौथ्या मतदारसंघ पुनर्रचना आयोगानुसार पुणे जिल्ह्यात लोकसभेचे मावळ, पुणे, बारामती व शिरूर असे चार मतदारसंघ आहेत. चिंचवड, पिंपरी, भोसरी, वडगाव, शेरी, खडकवासला, हडपसर, जुन्नर, आंबेगाव, दौंड, बारामती, पुरंदर, मावळ, शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, पुणे कन्टोन्मेंट, कसबा

असे एकूण २१ विधानसभा मतदारसंघ आहेत. तसेच पुणे जिल्ह्यामधील राजकीय संरचना पुढीलप्रमाणे आहे.[२२]

| अ.क्र. | राजकीय संरचना | संख्या |
|---|---|---|
| १. | लोकसभा मतदारसंघ संख्या | ०४ |
| २. | विधानसभा मतदारसंघ संख्या | २१ |
| ३. | जिल्हापरिषद मतदारसंघ संख्या | २५ |
| ४. | पंचायत समिती मतदारसंघ संख्या | १३ |
| ५. | महानगरपालिकेची संख्या | ०२ |
| ६. | ग्रामपंचायतीची संख्या | १४०७ |
| ७. | गावांची संख्या | १८६६ |
| ८. | तालुक्यांची संख्या | १४ |
| ९. | प्राथमिक जि.प.शाळा | ६५२७ |
| १०. | सहकारी साखर कारखाने | ११ |
| ११. | नगरपालिका | ११ |
| १२. | कटकमंडळे | ०३ |

**१) प्रशासकीय संरचना –**

१) तालुके – १४

२) शहरे – २५

३) एकूण गावे – १८६६

४) महानगरपालिका – ०२

५) नगरपरिषदा – ११

६) कटकमंडळे – ०३

७) पंचायत समित्या – १३

८) ग्रामपंचायती – १४०७

९) जिल्हा परिषदा – २५

१०) प्राथमिक शाळा – ६५२७

११) माध्यमिक शाळा – १५००

१२) उच्च शिक्षण संस्था – ८१

१३) प्राथमिक आरोग्य केंद्रे– १२२

१४) साखर कारखाने – १७

१५) साक्षरतेचे प्रमाण – ८७.०९

**पर्यटन व धार्मिक स्थळे –**

पुणे जिल्ह्यामध्ये पर्यटकांना आकर्षित करणारी अनेक ठिकाणे आहेत. धार्मिकदृष्ट्या महत्त्व असलेले अष्टविनायकांपैकी मोरगाव, रांजणगाव, थेऊर, ओझर, लेण्याद्री येथील पाच गणपती, जेजुरीचा खंडोबा, ज्ञानेश्वरांची आळंदी तसेच देहू क्षेत्र चिंचवडचे मोरया गोसावी समाधी स्थळ, बारा ज्योतिर्लिंगापैकी श्रीक्षेत्र भिमाशंकर, नारायणपूर, सोमयाचे करंजे व नव्याने पुरंदर तालुक्यात उभारण्यात आलेले केतकावळे येथील बालाजी मंदिर हे याच जिल्ह्यात आहे.

तर पुणे शहरातील कसबा गणपती, सारसबाग गणपती, दगडूशेठ गणपती, मंडई गणपती, जंगली महाराज मंदिर, चतुश्रृंगीचे देवीचे मंदिर, चांदणी चौकातील वेदभवन, पर्वती टेकडी व मंदिर पाताळेश्वर गुंफा, विश्रामबागवाडा, शनिवारवाडा, लालमहाल, केसरीवाडा, आगाखान राजवाडा, कस्तुरबा गांधी स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वस्तुसंग्रहालय, महात्मा

फुले वस्तुसंग्रहालय आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय, राजा केळकर संग्रहालय इत्यादी स्थळांना राज्यातून, परराज्यातून तसेच परदेशातून आलेले अनेक पर्यटक भेटी देतात.[२३]

**राजकीय आढावा (स्वातंत्र्यपूर्व)**

दुसरा बाजीराव पेशवा हा अधिकारांने जरी मराठ्यांच्या राज्याच्या मुख्य कार्यकारी असला तरी पेशव्यांचे राज्यावरचे नियंत्रण संपुष्टात आल्यात जमा होते. मराठ्यांची सत्ता केंद्र पुण्यावरुन आता इंदूर व ग्वाल्हेर येथे गेले. महादजी शिंदे निधनानंतर मराठ्यांच्या एकीतील कच्चे दुवे बाहेर पडले. पेशवे व शिंदेना होळकरांनी पुण्याचा ताबा घेतल्यानंतर बाजीरावाने पळून इंग्रजाकडे आश्रय घेतला. बाजीरावच्या या देशघातकी निर्णयाने मराठे संस्थानिकात संतापाची लाट उसळली व ब्रिटिशांविरुद्ध युद्ध पुकारले. अशाप्रकारे बाजीराव, इंग्रज सरकार व ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध शिंदे व इतर काही मराठा संस्थानिक असे दुसरे इंग्रज मराठा युद्ध झाले. मराठ्यांचे नेतृत्व शिंद्याकडे होते तर इंग्रजांचे नेतृत्त्व आर्थर वेलस्ली व जनरल लेक यांनी केले[२४].

खडकीची लढाई ही तिसऱ्या इंग्रज–मराठा युद्धातंर्गत मराठा साम्राज्याचे पंतप्रधान दुसरे बाजीराव पेशवे आणि ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी यांच्या सैन्यामध्ये नोव्हेंबर ५ इ.स.१८१७ रोजी पुण्याजवळील खडकी येथे झाली होती. तिसरे इंग्रज–मराठा युद्ध हे इ.स.१८१७–१८ मध्ये मराठे व इंग्रजात झालेले तिसरे व निर्णायक युद्ध होते. या युद्धात इंग्रजांनी मराठा साम्राज्याचा पराभव केला व जवळपास संपूर्ण भारतावर नियंत्रण मिळवले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा विचार करता पुण्याचे स्थान व भूमिका महत्त्वाची होती. न्यायमूर्ती रानडेपासून ते एस.एम.जोशीपर्यत तसेच लोकमान्य टिळकांपासून ते सेनापती बापट यांचेपर्यत असंख्य स्वातंत्र्य सेनानीचे कार्य उल्लेखनीय आहे. लोकमान्य टिळक यांच्या काळात पुणे हे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचे अतिशय महत्त्वाचे केंद्र बनले होते.

क्रांतिकारी चळवळीच्या मार्गातील आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके व हुतात्मा राजगुरू यांचे स्मरण हा प्रत्येक भारतीयांचा अभिमानाचा विषय आहे. त्यांनी पुणे जिल्हा परिसरात क्रांतिकारकांची संघटना बांधण्याचा प्रयत्न केला. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव या त्रिकुटातील राजगुरू हे जिल्ह्यातील खेड या गावचे होते. हुतात्मा बाबू गेनू यांचे मूळ जन्मगांवही याच जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ हे होय. स्वातंत्र्य पूर्वकाळापासूनच्या

राजकीय व सामाजिक चळवळी व अनेक प्रकारच्या संस्थांची पुण्यात झालेली स्थापना यामुळे पुण्यात १९ व्या शतकात पुण्याने अनेक दिग्गजांना घडवले. तसेच असंख्य मान्यवरांनी पुण्याच्या लौकिकात भर घातली.[२५]

राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या सर्व महत्त्वाच्या आंदोलनात पुण्यातील थोर समाजवादी नेते एस.एम.जोशी यांचा सक्रिय सहभाग होता. संयुक्त महाराष्ट्र तसेच आणीबाणी विरोध या आंदोलनातही त्यांनी पुण्याचे नेतृत्व केले.

**मतदारसंघ विभागणी –**

सन १९५१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत Bombay अंतर्गत पुणे जिल्ह्यात – १)Poona central २)Poona south असे दोन लोकसभा मतदारसंघ होते.

सन १९५७ च्या निवडणुकीत Bombay अंतर्गत Poona व Baramati अशा स्वतंत्र दोन लोकसभा मतदारसंघाची निर्मिती झाली. तसेच अशीच विभागणी १९६२ च्या लोकसभा निवडणुकीत कायम राहिली. परंतु १९६७ च्या लोकसभा निवडणुकीतील कायम राहिली. परंतु १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत Poona, Baramati बरोबरच खेड या नव्या लोकसभा मतदारसंघाची भर पडली. १९६७ ते २००४ पर्यत खेड, पुणे, बारामती असे पुणे जिल्ह्यातील मतदारसंघ कायम राहिले. परंतु मतदारसंघ पुनर्रचनेनंतर यामध्ये बदल होऊन खेड, पुणे, बारामती बरोबरच शिरूर असे एकूण चार लोकसभा मतदारसंघ तयार झाले.[२६]

**राजकीय आढावा(स्वातंत्र्योत्तर)**

**अ) लोकसभा निवडणुक**

पुणे जिल्ह्याच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये बॉम्बे राज्यातंर्गत पुना सेन्ट्रल लोकसभा मतदारसंगातून INC ला एक तर पुना South मधून INC ला १ जागा मिळाली.

१९५३ मध्ये झालेल्या पहिल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदारसंघामध्ये बदल झाला. बॉम्बे राज्यातंर्गत Poona Central ऐवजी झेपर या नावाने नवीन मतदारसंघ निर्माण झाला. तसेच Poona South हा मतदारसंघ रद्द होऊन त्याऐवजी बारामती हा नवीन लोकसभा मतदारसंघ निर्माण करण्यात आला. पुणे लोकसभा मतदारसंघातून PSP पक्षाला १ जागा मिळाली तर बारामती लोकसभा मतदारसंघातून INC ला एक जागा मिळाली.

सन १९६३ मध्ये झालेल्या दुसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या सन १९६७ च्या चौथ्या लोकसभा निवडणुकी दरम्यान पुणे, बारामती या मतदारसंघाबरोबरच खेड या नवीन एका मतदारसंघांची निर्मिती करण्यात आली. खेड बारामती मतदारसंघातून INC ला एक–एक जागा मिळाली तर पुना लोकसभा मतदारसंघातून समाजवादी पक्षाला एक जागा मिळाली.

सन १९७१ मध्ये झालेल्या पाचव्या लोकसभा निवडणुकीमध्ये लोकसभा मतदारसंघाची संख्या तेवढीच राहिली आणि या तिन्ही (खेड, बारामी व पुणे) या लोकसभा मतदारसंघातून तिन्ही जागा INC ला मिळाल्या.

सन १९७३ साली झालेल्या तिसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर सन १९७७ मध्ये झालेल्या सहाव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या दरम्यानच्या काळात मतदारसंघ संख्येत कोणताही बदल करण्यात आला नाही. सन १९७७ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये खेड लोकसभेची १ जागा INC ला मिळाली तर बारामती लोकसभेची जागा BLD पक्षास मिळाली.

सन १९८० साली झालेल्या सातव्या लोकसभेच्या निवडणुकीत मतदारसंघाची संख्या वाढविण्यात आली नाही. खेड लोकसभा मतदारसंघातून INC ला १ जागा मिळाली तर पुणे व बारामती लोकसभा मतदारसंघातून INC(I) यांना प्रत्येकी एक जागा मिळाली. तर बारामती लोकसभेतून ICS या पक्षाला १ जागा मिळाली.

सन १९८९ साली  झालेल्या नवव्या लोकसभा निवडणुकीमध्ये पुणे व बारामती लोकसभा मतदारसंघातून INC ला एक जागा मिळाली. तर खेड मधून गऊ या पक्षास १ जागा मिळाली. सन १९९१ साली झालेल्या दहाव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीमध्ये प्रथमच इगझ ला एक जागा मिळाली.[२७]

सन १९९६ साली झालेल्या अकराव्या लोकसभा निवडणुकीमधे खेड, पुणे व बारामती या तिन्ही मतदारसंघातून INC ला प्रत्येकी १ जागा मिळाली. पुणे जिल्ह्यावर काँग्रेसचेच वर्चस्व राहिले. सन १९९८ साली झालेल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीमध्येसुद्धा सन १९९६ च्या निवडणुकीच्या निकालाची पुनरावृत्ती झाली. खेड, पुणे व बारामती या तिन्ही जागा INC लाच मिळाल्या.

सन १९९८ साली शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केल्यानंतर झालेल्या सन १९९९ च्या पुणे जिल्ह्याच्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीमध्ये खेड व बारामती

मतदारसंघातून प्रत्येकी १ जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाली तर पुणेमधून भाजपला १ जागा मिळाली.

२००२ साली झालेल्या चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेच्या संदर्भात कायदा करण्यात आला. परंतु त्याची अंमलबजावणीपर्यंत मतदारसंघ संख्या तीच राहिली. २००४ साली सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीमध्ये तीन पक्षास तीन जागा मिळाल्या. त्यामध्ये खेडची जागा शिवसेनेस बारामती छ्उझ ला  मिळाली. तर पुणेची जागा INC ला मिळाली.

चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मतदारसंघ बदलाच्या पार्श्वभूमीवर २००९ च्या लोकसभा मतदारसंघ संख्येत बदल झालेला दिसून येतो. पूर्वीच्या खेड, पुणे, बारामती ऐवजी मावळ, पुणे बारामती व शिरूर अशा एकूण चार लोकसभा मतदारसंघाची निर्मिती झाल्यानंतर २००९ च्या निवडणुकीमध्ये मावळमधून प्रथमच शिवसेनेला २ जागा मिळाल्या. पुणे मतदारसंघातून INC ला १ जागा तर बारामती लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसला एक जागा मिळाली.

**ब) विधानसभा निवडणुक –**

सन १९६० साली महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर झालेल्या १९६२ च्या पहिल्या सार्वत्रिक विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पुणे जिल्ह्यातून एकूण १६ जागा पैकी १४ जागा सर्वसाधारण गटास मिळाल्या तर २ जागा अनुसूचित जातीस (SC) मिळाल्या.

सन १९६३ मध्ये झालेल्या दुसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर १९६७ साली झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये पुणे जिल्ह्याच्या मतदारसंघ संख्येत बदल झाला नाही. परंतु अनुसूचित जातीच्या मतदारसंघाची संख्या १ ने कमी होऊन राहिलेली जागा बोपोडी पेठेला मिळाली. तसेच राहिलेल्या १५ जागा सर्वसाधारण गटास मिळाल्या. सन १९७२ च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदार संख्येत बदल होऊन १६ मतदारसंघाऐवजी १७ मतदारसंघ झाले. या १७ जागापैकी १६ जागा सर्वसाधारण गटास मिळाल्या तर SC ची एक जागा भवानी पेठेस मिळाली.[२८]

सन १९७३ मध्ये झालेल्या तिसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर १९७८ साली झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पुणे जिल्ह्याच्या विधानसभा मतदारसंघ संख्येत व अनुसूचित जातीच्या मतदारसंघात बदल करण्यात आला. त्यानुसार पुणे जिल्हा विधानसभेच्या

१८ जागांपैकी १७ जागा सर्वसाधारण गटास मिळाल्या तर SC ची जागा नवीन पर्वतीस मिळाली.

१९८५ मध्ये झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्येसुद्धा पुण जिल्ह्याच्या १८ मतदारसंघाच्या जागांपैकी १७ जागा सर्वसाधारण गटास मिळाला तर SC (अनुसूचित जाती) ची १ जागा पर्वतीस मिळाली.

१९९० ते २००४ पर्यत झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पुणे जिल्ह्याच्या मतदार संख्येत कोणताही बदल न होता १८ जागांपैकी १७ जागा सर्वसाधारण गटास मिळाल्या तर १ जागा अनुसूचित जातीची (SC)पर्वतीस मिळाली. २००२ साली झालेल्या चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मात्र मतदारसंघ संख्येत बदल झाले. या २१ जागांपैकी २० जागा या सर्वसाधारण गटास मिळाला तर SC तर १ जागा पर्वतीस मिळाली.

**निवडणुकीतील पक्षांची कामगिरी(मते/टक्के)**[२९]

| अ. न. | राजकीय पक्ष | १९६२ | १९६७ | १९७२ | १९७८ | १९८० | १९८५ | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | काँग्रेस | ५३.९७ | ५१.८१ | ५५.८० | ५.५३ | ३७.१५ | ४३.४७ | ४९.५१ | ४१.५१ | २२.५४ | १०.९ |
| २. | राष्ट्रवादी | – | – | – | ३९.५९ | ३७.०४ | २३.४४ | – | – | ३६.२८ | ३०.९४ |
| ३. | भाजप | – | – | – | – | ८.८६ | ९.७८ | ९.०६ | १०.४९ | १०.५८ | ९.३ |
| ४. | शिवसेना | – | – | – | ०.३१ | – | – | १२.६३ | १७.९४ | १८.२७ | २५.२ |
| ५. | शे.का.प. | ५.०४ | ६.४८ | १.७० | ०.६१ | ०.१२ | – | – | – | – | – |
| ६. | सी.पी.एम. | १.४२ | – | ०.०३ | ०.०७ | – | – | – | – | ०.२२ | – |
| ७. | आर.पी.आय. | – | २.८३ | २.३६ | ०.२३ | ०.०९ | ०.०६ | – | ०.१९ | –१.३८ | – |
| ८. | इतर | २७.९५ | ३४.१२ | २६.८४ | ३९.५७ | १२.६३ | १३.७ | २.९२ | २.३१ | ८.५२ | २३.६६ |
| ९. | अपक्ष | ११.६२ | ५.१६ | १३.२४ | १४.०९ | ४.११ | ९.५९ | १३.१४ | १८.५३ | १.९५ | – |
| १०. | जनता दल | – | – | – | – | – | – | १२.९० | ७.४३ | ०.२६ | – |
| ११ | ब.स.प. | – | – | – | – | – | – | ०.०७ | १.६० | | – |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद सर्वात जास्त आहे. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाची राजकीय ताकद शिवसेनेची आहे.

## ४.१.३ सातारा जिल्हा ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय पार्श्वभूमी :–

### भौगोलिक स्थान व प्राकृतिक रचना

सातारा जिल्ह्याचे सातारा, महाबळेश्वर, पाटण, फलटण हे चार उपविभाग असून त्यात सातारा, कोरेगांव, जावळी, वाई, महाबळेश्वर, पाटण, कराड, फलटण, खटाव, माण, खंडाळा असे ११ तालुके आहेत.

### भौगोलिक स्थान

सातारा जिल्हा महाराष्ट्राच्या दक्षिण भागात मध्यभागी आहे. भौगोलिकदृष्टया त्याचा विस्तार दक्षिण पठाराच्या पश्चिम सीमावर्ती भागात $१७^{\circ}$ ५० ते $१८^{\circ}$ ११ उत्तर अक्षांश आणि $७३.३३^{\circ}$ ते $७४^{\circ}$.५४ पूर्व रेखांश आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस पुणे जिल्हा, पूर्वेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेस आणि आग्नेयेस सांगली जिल्हा व पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा आहे. फक्त वायव्येस २४ कि.मी. अंतरापर्यंत रायगड जिल्ह्याची सिमा या जिल्ह्यास स्पर्श करून जाते.[३०]

### प्राकृतिक रचना

सातारा जिल्हा हा सहयाद्रीच्या उंच पर्वत रांगा, शिखरे आणि उंच पठारांनी वेढलेला आहे. या पर्वत रांगांची उंची समुद्र सपाटीपासून सुमारे ४५०० फूट आहे. सातारा जिल्हा भीमा आणि कृष्णा नदीच्या खोऱ्यामध्ये वसलेला आहे. हा जिल्हा विविध प्रकारच्या भूभागांनी बनलेला आहे.

### जमीन, हवामान आणि पर्जन्यमान

सातारा जिल्ह्यामध्ये मध्यमकाळी जमीन, हलकी मुरमाड जमीन लॅटेराईट तांबडी माती अशी तीन प्रकारची जमीन आढळते. मध्यम काळी जमीन कोरेगांव वडूजचा पश्चिम भाग, खंडाळा व फलटण तालुक्याच्या उत्तर भागात आढळते. तर हलकी जमीन कृष्णा खोऱ्याच्या पूर्वेकडील भाग, कोरेगांव तालुक्यातील डोंगरा लगतची जमीन या भागात आढळते. तसेच लॅटेराईट जमीन महाबळेश्वरच्या डोंगरावरील कोयना नदीच्या सुरुवातीच्या खोऱ्यात आढळते.

सातारा जिल्ह्याचे हवामान चार ऋतूत विभागलेले आहे. उन्हाळ्यामध्ये पश्चिम विभागातील हवामान थंड आणि आल्हाददायक असते. परंतु पावसाळ्यात येथे थंडी असते. वाई तालुक्याच्या सपाटीवर मात्र वर्षभर समशीतोष्ण हवामान असते. पश्चिम व मध्यभागापेक्षा जिल्ह्याच्या पूर्वभागातील हवामान अधिक उष्ण आहे. [३१]

विशिष्ट भौगोलिक परिस्थितीनुसार जिल्ह्यातील पर्जन्यमानात खूपच तफावत आहे. पूर्व भागातील माण या दुष्काळी तालुक्यातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान ४४३ मि.मि. इतके कमी आहे तर महाबळेश्वर या पश्चिम भागातील उंचीवरील ठिकाणी २२२३मि.मि. इतके जास्त आहे. जिल्ह्यातील पश्चिम भागात सह्याद्री पर्वत श्रेणीमध्ये पावसाचे प्रमाण जास्त असून अगदी पश्चिम भागातील टोकास ते ५००० मि.मि. जास्त आहे. जिल्ह्याच्या मध्य व दक्षिण भागात पावसाचे प्रमाण यापेक्षा खूपच कमी असून १२०० ते २०० मि.मि. असते. पूर्व भागात व उत्तरेकडे पावसाचे प्रमाण कमी असून ते सर्वसाधारणपणे ६०० मि.मि. पेक्षा कमी असते.

**सातारा जिल्हा– सरासरी वार्षिक पर्जन्यमान आणि तापमान**[32]

| अ.नं | तहसिल | सरासरी वार्षिक पर्जन्यमान (मि.मी) | सरासरी वार्षिक तापमान अंश सेल्सियस | |
|---|---|---|---|---|
| १ | महाबळेश्वर | ६१२६.४ | ३७.५ | १२.७ |
| २ | जावळी | १७१२.२ | ३४.७ | १३.९ |
| ३ | वाई | ७३४.६ | ३५.४ | १४.१ |
| ४ | पाटण | १८८२.५ | ३५.१ | १४.० |
| ५ | सातारा | ५०३.८ | ३६.२ | १५.३ |
| ६ | खंडाळा | ५१२.२ | ३६.५ | १५.४ |
| ७ | खटाव | ४९६.२ | ३७.२ | १४.९ |
| ८ | माण | ५५७.१ | ३६.९ | १४.८ |
| ९ | फलटण | ७१४.७ | ३५.५ | १५.१ |
| १० | कोरेगाव | ७१३.१ | ३३.५ | १६.३ |
| ११ | कराड | १३७१.३ | ३५.२५ | १४.६० |

साताऱ्यामध्ये २५०० मीमी ते ६००० मिमी. पाऊस पडतो. पाऊस जास्त पर्जन्यमान क्षेत्रात येतो. पश्चिमेकडून पूर्वेकडे पडत जाणाऱ्या पावसाचे प्रमाण कमी होत जाते. मध्यभागातील सातारा, कराड, कोरेगाव या भागामध्ये १००० ते २५०० मि.मी.पर्यत पर्जन्यमान होते. पूर्वेकडील फलटण, खंडाळा माण आणि खटाव तसेच कोरेगावच्या पूर्वेकडील काही भागात ५०० ते १००० मिमी. एवढा पाऊस पडतो. त्यामुळे तो कमी पर्जन्यमान क्षेत्रात येतो. पूर्वेकडील काही प्रदेश दुष्काळसदृश्य आहे. बहुतेक पूर्वेकडील माण, खटाव आणि फलटण तालुक्यात पर्जन्य ५०० मिमी.पेक्षा कमी आहे. या भागात पिकाच्या पाण्याची कमतरता भासते.[33]

**शेती, पिके व जलसिंचन व्यवस्था**

कृषीगणना २०००–०१ प्रमाणे जिल्ह्यात ७.८० लाख वहित खातेदार असून त्यांचे एकूण क्षेत्र ७.७५ लाख हेक्टर इतके होते. सातारा जिल्ह्यामध्ये सर्व प्रकारच्या खातेदारांनी धारण केलेले सरासरी क्षेत्र फक्त ०.९९ हे. एवढे कमी असून ते राज्याच्या १.६६ हे. पेक्षा ४० टक्क्यांनी कमी आहे. एकूण खातेदारांपैकी २१ टक्के खोतदार पूर्ण ओलिताखालील ६९ टक्के पूर्ण जिरायत तर १० टक्के खातेदार अंशतः ओलिताखालील जमीन धारण करीत होते.

सातारा जिल्ह्यामध्ये दोन हंगामामध्ये पिके घेतली जातात. खरीप हंगामाध्ये ज्वारी, भात, नाचणी, वरी व भुईमूग इ.पिके घेतली जातात. तर रब्बी हंगामात गहू, हरभरा, कापूस, नीळ, तंबाखू, भुईमूग अशा नगदी पिकांचे उत्पादन घेतले जाते. भाताचे पीक जिल्ह्याच्या पाटण, वाई, महाबळेश्वर, कराड व सातारा या तालुक्याच्या पश्चिम भागात घेतले जाते. ज्वारी व बाजरीचे पिक माण, खटाव, फलटण व कोरेगांव तालुक्यात तर तरीचे उत्पादन खटाव, माण व कराड तालुक्यात घेतले जाते.

सातारा जिल्ह्यात नद्यांवर धरणे अथवा बंधारे बांधून अनेक ठिकाणी जलाशये निर्माण केली आहेत. कोयना नदीवर हेळवाक येथे शिवसागर हे मोठे जलाशय निर्माण केले आहे. सन २०१०–११ या वर्षाअखेरीस विहिरीखेरीज एकूण १८२९ लघुपाटबंधाऱ्याच्या कामाचा शेतीस लाभ झालेला आहे. त्यामध्ये लहान बंधारे, तलाव, पाझर तलाव व उपसा जलसिंचन योजनांचा अंतर्भाव आहे. वीर, कण्हेर व धोम पूर्ण झालेले व सिंचनाचा लाभ चालू असलेले जिल्ह्यातील ७ मोठे जलसिंचन प्रकल्प आहेत.

**जमिनीचा वापर –**

सातारा जिल्ह्यामध्ये जमिनीची प्रतवारी वेगवेगळी आहे. गाळांच्या गाडीप्रमाणे जमिनीचा पोत विविध प्रकारचा आहे. ज्या ठिकाणी गाळांची थरांची जाडी कमी आहे. त्याठिकाणी नापीक जमीन दिसून येते. तर जास्त गाळांची थरांची जाडी असेल त्याठिकाणी जमीन मध्यम व अंत्यत सुपीक आढळते पश्चिम भागातील तालुक्यातील जमीन लाल असून लॅटराईट प्रकारच्या पाषाणापासून बनलेला आहे. [३४]

**भूमियोजना :–**

**भूमियोजना तक्ता [३५]–**

| अ.नं. | शेतजमिन प्रकार | प्रमाण हेक्टरमध्ये |
|---|---|---|
| १. | शेतीस उपलब्ध नसलेली जमीन<br>बिगर शेती वापराखालील जमीन<br>पडीक आणि लागवड नसलेले क्षेत्र | <br>२८ हजार हेक्टर<br>९३ हजार हेक्टर |
| २. | पडीक जमीनी व्यतिरिक्त लागवड न केलेली जमीन<br>कायम गुरे चरण व इतर<br>झाडा झुडपाखालील क्षेत्र | <br><br>७४ हजार हेक्टर<br>०६ हजर हेक्टर |
| ३. | पडीत जमीन<br>चालू पड<br>इतर पड<br>दुसोरा क्षेत्र<br>एकूण पिकाखालील क्षेत्र | <br>४६ हजार हेक्टर<br>५१ हजार हेक्टर<br>१ लाख ६५ हजार<br>७ लाख ४६ हजार |
| ४. | ओलिताखालील क्षेत्र<br>निव्वळ ओलित क्षेत्र<br>एकूण ओलित क्षेत्र | <br>१ लाख ७६ हजार<br>२ लाख २६ हजार |
| ५. | महत्त्वाच्या पिकाखालील ओलित क्षेत्र | १ लाख ३५ हजार |

**(सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल २००१)**

महसूल खात्याच्या गावपत्रकानुसार सातारा जिल्ह्याचे एकूण क्षेत्र १०.५८ लक्ष हेक्टर आहे. सन २०००–२००१ मध्ये त्यापैकी १३.० तक्के क्षेत्र जंगलाखाली, २.६८ टक्के क्षेत्र बिगर शेतीसाठी ८.७९ टक्के क्षेत्र लागवडीलायक पण पडीक आहे. ६.५२ टक्के क्षेत्र इतर पडजमिनीचे आहे.

**पिके :–**

सातारा जिल्हा कृषिप्रधान असून खरीप व रब्बी या दोन्ही हंगामातील पिके जिल्ह्यात घेतली जातात. ऊस हे जिल्ह्यातील महत्त्वाचे नगदी पीक आहे. ज्वारीचे पीक दोन्ही हंगामात घेतले जाते.

## सातारा जिल्हा पिकाखालील क्षेत्र तक्ता [३६]:–

| अ.नं. | पीक | क्षेत्र (टक्के) |
|---|---|---|
| १. | ज्वारी | २९ |
| २. | बाजरी | १३ |
| ३. | भात | ७ |
| ४. | गहू | ५ |
| ५. | ऊस | ६ |
| ६. | गळीत पीक | १३ |
| ७. | कडधान्ये | १० |

**(सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल २००३)**

सातारा जिल्ह्यामध्ये सन २००२–०३ मध्ये प्रामुख्याने पीकाखालील एकूण क्षेत्रापैकी ५७ टक्के तृणधान्याखाली होते. त्यापैकी ज्वारी पीकाखालील २९ टक्के, बाजरी पीकाखाली १३ टक्के, भात पीकाखालील ७ टक्के, गहू पिकाखालील ५ टक्के तर ऊस या नगदी पिकाखालील ६ टक्के क्षेत्र होते. गळीताच्या पीकाखाली १३ टक्के क्षेत्र असून त्यापैकी ९ व २ टक्के क्षेत्र सोयाबीन या पीकाखाली होते. कडधान्याच्या पीकाखाली १० टक्के क्षेत्र असून त्यापैकी ३ टक्के क्षेत्र हरभरा या पिकाखाली होते.

## ८) तालुक्यानुसार क्षेत्रफळ (सातारा)[३७]

| अ.नं. | तालुका | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १. | महाबळेश्वर | ३५३.१७ |
| २. | वाई | ७११.३६ |
| ३. | खंडाळा | ५२१.१० |
| ४. | फलटण | १,२३५ |
| ५. | माण | १,४५४.९४ |
| ६. | खटाव | १,४५२.०३ |
| ७. | कोरेगाव | ९१४.५३ |
| ८. | सातारा | ९०७.२६ |
| ९. | जावळी | ५०९.२५ |
| १०. | पाटण | १,४७८.२९ |

**(सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल २०११)**

सातारा जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १०,४८० चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या ३.४० टक्के आहे. आकारमानाच्यादृष्टीने राज्यातील एकूण ३५ जिल्ह्यामध्ये या जिल्ह्याचा १२ वा क्रमांक लागतो.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३०.०४ लाख असून जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३०.०४ लाख असून २००१ च्या तुलनेत ६.९४ टक्क्यांनी लोकसंख्येत वाढ झालेली आहे. जिल्ह्यात स्त्री–पुरुष प्रमाण ९८६ असून ० ते ६ वयोगटातील हेच प्रमाण ८८१ इतके कमी आहे. २००१ ते २०११ या दशकामध्ये सातारा जिल्ह्यात स्त्री–पुरुष प्रमाणात १ टक्क्यांनी घट झालेली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील पुरुष साक्षरतेचे प्रमाण ९२.०९ टक्के आहे तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ७६.२९ टक्के इतके आहे. एकूण लोकसंख्येचे साक्षरतेचे प्रमाण ८४.२० टक्के आहे.

## सातारा जिल्हा– वसाहतीचे वितरण[३८]–(२००१)

| अ.नं. | तहसिल | क्षेत्र चौ.कि.मी | गांवाची संख्या | ग्रामीण वसाहत | शहरी वसाहत |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाबळेश्वर | २२३.०१ | ५५ | ५५ | १ |
| २ | जावळी | ८६४.५३ | २०७ | २११ | ० |
| ३ | वाई | ६१९.१० | ११३ | १२० | १ |
| ४ | पाटण | १३२०.९२ | २६९ | ३४२ | १ |
| ५ | सातारा | ८७६.२४ | २०० | २०८ | १ |
| ६ | खंडाळा | ५२३.७२ | ६५ | ६५ | ० |
| ७ | खटाव | ११२९.६६ | १३२ | १३६ | ० |
| ८ | माण | १४४९.११ | ९८ | १०४ | ० |
| ९ | फलटण | ११९९.४३ | १२० | १२२ | १ |
| १० | कोरेगाव | ९२१.८० | ११० | १३९ | १ |
| ११ | कराड | ९६९.२० | १७८ | २१९ | १ |
| | एकूण | १०४८०.०० | १५४७ | १७२१ | ७ |

(Source : Review of dist statistical Abstract of Satara 2001)

एखाद्या भागातील लोकसंख्येचे विश्लेषण करणे गरजेचे असते. प्राकृतिक रचना आणि शेतीचा तेथील भूभागावर परिणाम होत असतो. या भूभागामध्ये व सेटलमेन्ट आहेत. कराड, वाई, फलटन, हे प्रमुख बाजारकेंद्रे आहेत. तर सातारा हे मुख्य औद्योगिक केंद्र आहे. महाबळेश्वर हे आरोग्य पर्यटन केंद्र आहे. कोरेगाव व पाटण हे प्रमुख केंद्रे आहेत.

२००१ च्या लोकसंख्येनुसार या प्रदेशामध्ये १७२१ ग्रामीण Settlement आहेत. वरील तक्ता नं. हा तालुक्यानुसार ग्रामीण आणि शहरी Settlement चे विभाजन करतो. यामध्ये जावळी, खटाव व माण तालुक्यांच्या प्रशासकीय केंद्र म्हणून समावेश होतो. पूर्वेकडील भागामध्ये लहान ग्रामीण Settlement दिसून येतात. पण कृष्णा आणि निरेच्या खोऱ्यात ग्रामीण Settlement मोठ्या प्रमाणात आहेत तसेच काही प्रमाणात पश्चिमेकडील डोंगररांगामध्ये लहान ग्रामीण Settlement दिसून येतात. पश्चिमेकडील भागात Settlement चा एक विशिष्ट Pattern दिसून येतात. ज्याची लोकसंख्या १०,००० पेक्षा जास्त आहे अशी खेडी.

**लोकसंख्या :–**

२००१ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २८.०९ लाख आहे. त्यापैकी १४.०८ लाख पुरुष तर १४.०१ लाख इतक्या स्त्रिया आहेत.

**२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येची तालुकावार टक्केवारी** [३९]

| अ.नं. | तालुका | टक्के | अ.नं. | तालुका | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| १. | सातारा | १६०९ | ७. | खटाव | ९.२९ |
| २. | वाई | ६.०४ | ८. | कराड | १९.३५ |
| ३. | खंडाळा | ४.०६ | ९. | पाटण | १०.६१ |
| ४. | कोरेगाव | ९.०१ | १०. | जावळी | ४.४४ |
| ५. | फलटण | ११.१६ | ११. | महाबळेश्वर | १.९४ |
| ६. | माण | ७.११ | | | |

(Source : Review of dist statistical Abstract of Satara 2001)

सन २०११ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्ह्यामध्ये स्त्री व पुरुष प्रमाण ९८८ इतके असून ० ते ६ वयोगटातील हेच प्रमाण ८९५ इतके कमी आहे. २००१ च्या जनगणनेमध्ये हेच प्रमाण अनुक्रमे ९९५ व ८७८ इतके होते. २००१ ते २०११ या दहा वर्षाच्या कालावधीत सातारा जिल्ह्यामध्ये स्त्री–पुरुष प्रमाणात ०.७० टक्क्यांनी घट तर ० ते ६ वयोगटातील १.९४ टक्यांनी वाढ झालेली आहे.

२०११ च्या जनगणेनुसार सातारा जिल्ह्यामध्ये पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८९.४२ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ७६.३१ टक्के इतके आहे. एकूण लोकसंख्येचे साक्षरतेचे प्रमाण ८२.८७ टक्के आहे.

**दळणवळण/वाहतूक**

**सातारा जिल्हा रस्त्यांचे प्रकार व लांबी**

| अ.न | रस्त्यांचे प्रकार | रस्त्यांची लांबी | सरासरी घनता चौ.कि.मी |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय महामार्ग | १३१.०० | ०१.२५ |
| २ | राज्यमहामार्ग | ९९६.६७ | ०९.५० |
| ३ | जिल्ह्यातील मुख्य रस्ते | २२४९.९८ | २१.४४ |
| ४ | इतर जिल्ह्यातील रस्ते | १८३८.०३ | १७.५२ |
| ५ | गाव रस्ते | ४६८३.१८ | ४४.६४ |
| ६ | इतर रस्ते | ५५२.२८ | ५.२६ |
|  | जिल्हा एकूण | १०४५१.१४ | ९९.६१ |

(Source : Eeoromir Review of dist statistical Abstract of satara 2007-08)

शासन योजनेनुसार ५०० लोकसंख्या असलेले खेडे हे रस्त्याने जोडलेले असावे. त्यानुसार साताऱ्यातील जवळपास सर्व खेडी रस्त्याला जोडलेली आहेत.

वरील तक्त्यावरून बरेच रस्ते हे राष्ट्रीय महामार्ग राज्यमहामार्ग आणि जिल्ह्यातील मुख्य रस्ते खेड्यातील रस्ते याविषयी आहेत. सातारा जिल्ह्यातून पुणे, बंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग जातो. त्याची लांबी १२४ किमी. आहे. त्याच्याच बरोबर महाबळेश्वर–पंढरपूर–पुणे–महाबळेश्वर–महाड–सातारा–महाबळेश्वर–महाड फलटण–मिरज आणि विजापूर चिपळूण हे राज्यमार्ग या भागातून जातात. त्याची लांबी ९९६ किमी आहे. या भागातील सर्व तालुके आणि महत्त्वाची ठिकाणेही जिल्ह्याशी जोडलेले आहेत. त्याची लांबी १२४ कि.मी.आहे. या रेल्वे मार्गावर उत्तरेकडून पश्चिमेकडे अनुक्रमे लोणंद, वाठार, सातारा, कोरेगाव, रहिमतपूर, मसूर, कराड ही महत्त्वाची रेल्वेस्टेशने आहेत.

**हवामान –**

नोव्हेंबरच्या मध्ये ते फेब्रुवारीच्या अखेरपर्यंत हिवाळा असून हवा खूप थंड असते. मात्र फेब्रुवारीच्या सुरुवातीपासून मार्च अखेरपर्यंत थंडीची तीव्रता हळूहळू कमी होत जाते. मार्चपासून जूनच्या मध्यापर्यंत उन्हाळा असतो. सर्वसाधारणपणे हवामान अतिथंड व अतिउष्ण आंत्यतिक टोकाचे असून हवामानात अचानक बदल होत नाही.

**ऐतिहासिक महत्त्व :–**

सातारा या शब्दाचे अनेक अर्थ व उत्पत्ती सांगण्यात येतात. सातदरा वरून सातारा महादरा ते सातारा 'सप्ततारा' पासून सातारा अजिंक्यताऱ्यावरील सप्तऋषीच्या देवालयावरून सातारा ही विशेषतः व्यक्त करणारी म्हणून 'सात' म्हणजे विपूल या अर्थाच्या शब्दावरून 'सातारा' या संकल्पनेची उत्पत्ती सांगितली जाते.

'सातारा' या संज्ञेचे अनेक अर्थ सांगण्यात येतात. सातदरा, महादरा, सप्ततारा या शब्दापासून सातारा शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. 'अजिंक्यतारा' या किल्ल्यावरील सप्तऋषीच्या मंदिरावरून या किल्ल्या जवळील प्रदेशास सातारा हे नाव पडले.[४१]

हिंदवी स्वराज्याचा सुवर्णक्षण पाहणाऱ्या आणि आधुनिक काळापर्यंत सलग असा इतिहास लाभलेला आहे.

प्रागैतिहासिक कालखंडात सातारा जिल्ह्यातील आसगांव, पाचवड, मर्ढे, माहुली, लिंब आणि सोनगांव या ठिकाणी अश्मयुगीन हत्यारे उपलब्ध झाली आहेत. मध्याश्मयुग काळात मानवाचे अस्तित्व उंब्रज, कराड, काशीळ, कोपर्डे, चिंचनेर, टेंभू, तारगांव, धामनेर, माहुली, लिंब, वेणेगाव, इ.ठिकाणी आढळले. त्याचप्रमाणे नवाश्मयुग बदामीचे चालुक्याची सत्ता, मानपूरचे राष्ट्रकूटाची राज्य, वाकाटकचे, कलचूटी, शिलाहार घराणे व यादव घराण्याचे महत्त्व सातारा जिल्ह्यास पाहायला मिळते.

मध्ययुगीन कालखंडात किल्ला हे संरक्षणाचे प्रभावी माध्यम ठरल्याने किल्ल्याचे महत्त्व वाढले. छ.शिवाजी महाराजांनी बांधलेला प्रतापगडचा किल्ला याचे उत्तम उदाहरण होय. सातारा जिल्ह्यात लहान–मोठे असे ३४ किल्ले आहेत. साताऱ्याचा अजिंक्यतारा हा अभेद्य पुरातन किल्ला असून आदिलशाही व शिवशाहीमध्ये त्याचा तुरुंग म्हणून वापर केल्याचे दिसून येते.

याच कालखंडात काही मुस्लीम राजवटी येऊन गेल्या. त्यामध्ये बहामनीची राजवट, महमद बहमनी, अहमदशहावली पहिला तसेच आदिलशाहीची राजवट या जिल्ह्याने पाहिलेल्या असून साताराच्या वाटचालीच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास विजापूरच्या आदिलशाहीमध्ये साताऱ्याचे महत्त्व वाढले आहे. नंतरच्या मराठा राजवटीमध्ये सातारा परिसर राजकीय घडामोडीचे महत्त्वाचे केंद्र बनला.[४२]

**प्रशासकीय विभाग**

जमिनीचा उंच सखलपणा लक्षात घेता पश्चिमेकडील प्रदेश डोंगराळ असून यामध्ये महाबळेश्वर, जावळी, पाटण व सातारा या तालुक्यांचा निम्मा भाग तर मधला कृष्णा काठचा प्रदेश खोलगट असून त्यामध्ये वाई, सातारा तालुक्यातील पूर्वेकडील प्रदेश माळवताचा असून त्यामध्ये खटाव, माण व फलटणाच काही भाग व खंडाळा हे तालुके येतात. याप्रमाणे जिल्ह्यातील तीन स्वाभाविक विभाग आहेत.

सन १८४८–४९ मध्ये सातारा जिल्हा अस्तित्त्वात आला. त्यावेळी जिल्ह्यास प्रांत असे संबोधण्यात येत होते. हा प्रांत विजापूर, जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तारगाव, वाळवा आणि वाई अशा ११ उपविभागामध्ये विभागला होता.

सध्या सातारा जिल्ह्याचे सातारा, वाई, कराड व फलटण असे ४ महसूल विभाग असून सातारा विभागामध्ये सातारा, कोरेगाव व जावली, कराड, पाटण, वाई विभागात महाबळेश्वर, वाई, खंडाळा आणि फलटण विभागामध्ये फलटण, माण, खटाव तालुक्यांचा समावेश आहे.[४३]

**सहकार चळवळ :–**

सातारा जिल्ह्यामध्ये १९०७ मध्ये पहिली कृषी पतसंस्था बोधे (ता.माण) येथे स्थापन झाली. त्यानंतर शेतकऱ्यांच्या मूलभूत आर्थिक गरजा भागविण्यासाठी जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात कृषी पतसंस्था स्थापन झाल्या. तसेच १९६१ मध्ये वाई तालुका को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची स्थापना करण्यात आली. संस्थानातील प्रजेच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी मालोजीराजे नाईक निबांळकर यांनी १९२६ मध्ये फलटणला लक्ष्मी सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली. १९४९ मध्ये साताऱ्याला मध्यवर्ती वित्त संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारी नॉर्थ सातारा सेंट्रल–काँ–ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना झाली. या सहकारी संस्था शेतकऱ्यांनाच पतपुरवठा करीत असल्याने जिल्ह्यातील वेगवेगळ्या घटकांतून पतसंस्था निर्माण झाल्या.[४४]

**उद्योगधंदे :–**

करा‍ड, सातारा व वाई येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहती आहेत. शिरवळ येथील शिर्केपेपर मिल, कराड येथील किर्लोस्कर ब्रदर्सचा हेमोटेक सिल्द कॉम्प्रेसर हैड्रोलिक प्रॉडक्ट कारखाना, जरंडेश्वर येथील भारत फोर्ज इत्यादी मोठे व मध्यम स्वरूपाचे २७ कारखाने आहेत.

उद्योगक्षेत्रास जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या पोषक वातावरणामुळे गेल्या काही वर्षामध्ये मोठया प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक होऊ लागली आहे. खंडाळा व फलटण तालुक्यामध्ये प्रत्येकी एक प्रमाणे दोन विशेष आर्थिक क्षेत्र (ङ्ग्न) स्थापन करण्यात आले आहेत.

याशिवाय जिल्ह्यामध्ये तेल गाळणे, गूळ तयार करणे, हातमागावर कापड विणणे इ.छोटे उद्योग चालतात. खटाव, माण व फलटण तालुक्यात लोकरीच्या घोंगड्या विणण्याचा उद्योग चालतो. महाबळेश्वर तालुक्यात मध उद्योग व दोरखंड तयार करण्याचा उद्योग इ.सारखे लघुउद्योगसुद्धा मोठ्या प्रमाणावर आहेत.

कराड, सातारा, वाई येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहती आहेत. कराड, सातारा तालुक्यामध्ये सहकारी तत्त्वावर औद्योगिक वसाहती कार्यरत असून आजारी कराड, खटाव फलटण याठिकाणी प्रत्येकी एका सहकारी तत्त्वावरील औद्योगिक वसाहतीचे काम सुरू आहे.[४५]

**दळणवळण :–**

कोल्हापूर मुंबई हा दक्षिण मध्य रेल्वेचा १२४.८४ कि.मी.लांबीचा ब्रॉडगेज एकेरी रेल्वेमार्ग जिल्ह्यातून जातो. त्या मार्गावर सातारा व कराड ही दोन महत्त्वाची स्थानिक आहेत. सर्व रेल्वेमार्ग पूर्व व मध्यभागातून जात असल्याने पश्चिमेकडे पाटण, जावळी, महाबळेश्वर व वाई तालुक्यांचा स्पर्श होत नाही. राष्ट्रीय महामार्ग क्र.४ शिरवळ, खंडाळा, पाचवड, सातारा, उंब्रज या ठिकाणावरून जातो. याशिवाय सातारा–पंढरपूर–पुणे–महाबळेश्वर महाड, कराड, चिपळूण इ.अंतर्गत राज्यमार्ग आहेत.

**शैक्षणिक वाटचाल :–**

स्वातंत्र्यपूर्व काळात साताऱ्यातील शिक्षणप्रेमी समाजसुधारकांनी साताऱ्यातील शैक्षणिक चळवळीला खरे स्वरूप दिले आहे. त्यामध्ये महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, विठ्ठल

रामजी शिंदे, नारायण हरि आपटे, विष्णूशास्त्री पंडित, रामशास्त्री प्रभुणे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या थोर शिक्षण प्रसारकांचा समावेश करावा लागेल.

पाचगणी येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळा, वासोटा पर्यटन स्थळाने पुरविलेले गिर्यारोहन शिक्षण, कास पठाराने उपलब्ध केलेले पर्यावरण शिक्षण, वाई येथील मराठी विश्वकोशाच्या माध्यमातून उपलब्ध केलेले भाषेचे शिक्षण फलटणमधील डॉ.आनंद कर्वे यांनी उपलब्ध केलेले 'ग्रामीण उद्योजकता' विकास केंद्रातील शिक्षण ही शैक्षणिक केंद्रे आपल्याला सातारा जिल्ह्यातील शिक्षणाची चाहूल देतात.[४६]

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी शिक्षणास दिलेले उत्तेजन व महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, बापूजी सांळुखे इ. समाजसुधारकांनी केलेल्या शिक्षणप्रसाराच्या कार्यामुळे जिल्ह्यास उत्तम शैक्षणिक परंपरा लाभलेली आहे.

सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षाअखेर जिल्ह्यात एकूण २८६९ प्राथमिक शाळा, ६५८ माध्यमिक शाळा, १३५ उच्च माध्यमिक शाळा व ३८ महाविद्यालये शेती सातारा जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेचे २००१ च्या जनगणनेनुसार १ लाख लोकसंख्येमागे असणार प्रमाण अनुक्रमे १०८ व २३ शाळा असे आहे.

**पर्यटन व धार्मिक स्थळे :-**

सातारा जिल्हा मुख्यालय १७$^{\circ}$४० उ.७३$^{\circ}$५० (पू.न.पा.१८५३) शहर सहयाद्री पर्वताच्या पूर्वउताराकडील डोंगराळ भागात वसले आहे. दीर्घकाळ छत्रपतींचे वास्तव्य असण्याचे भाग्य लाभलेली स्वराज्याची सातारा ही राजधानी अजिंक्यतारा गडाच्या पायथ्याशी आहे. अंजिक्यतारा गडाला पूर्वापार इतिहास असून तो साताऱ्याचा किल्ला या नावानेच ओळखला जातो. शिलाहार सम्राट भोज (दुसरा) याने इ.स.११९० च्या सुमारासच हा किल्ला बांधला असा उल्लेख आढळतो[४७].

सातारा जिल्ह्यात भवानी चित्रसंग्रहालय हे बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी सन १९३२ मध्ये स्थापन केले असून त्यांनी देशी व परदेशी कलाकृतीत रंगचित्रे, पाश्चात्य रंगचित्रे हा निर्दयी या अमूल्य व दुर्मिळ कलाकृती प्रदर्शित केलेल्या आहेत.

सातारा शहरात लगत किल्लाच्या पूर्वेकडील डोंगरावर चारभिंती असून राजघराण्यातील स्त्रिया  दसऱ्याची मिरवणूक येथे बसून पाहत असत. १९५७ मध्ये या ठिकाणी स्मारकस्तंभ उभारण्यात आला आहे.

शिवाजी महाराजांनी भोरप्या  डोंगरावर प्रतापगड हा किल्ला बांधला असून तो सातारा व रायगड जिल्ह्याच्या सरहद्दीवर आहे. या किल्ल्यावर चिलखत योजना पाहावयास मिळते. महाबळेश्वर हे सह्याद्रीच्या एका शृंगावरील थंड हवेचे निसर्गरम्य गिरिस्थान पोलादपूर–महाबळेश्वर वाई –पुणे व महाबळेश्वर मध्ये पर्यटकांची आवडती अशी अनेक सौंदर्यस्थळे व पॉईंट आहेत. या परिसरात प्रतापगड, मकरंदगड, कमळगड, पांडवगड व पाचगणी ही प्रसिद्ध पर्यटन स्थळे आहेत.[४८]

पर्यटन स्थळाबरोबरच सातारा जिल्ह्यांमध्ये काही धार्मिक स्थळे प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये औंध येथील यमाई देवीचे मंदिर आणि ८००० वस्तूंचे व चित्रांचे संग्रहालय या ठिकाणी पर्यटकांना आकर्षित करते. वाई हे शहर साताऱ्याच्या वायव्येस व पुण्याच्या दक्षिणेस कृष्णाकाठी वसलेले हे ऐतिहासिक शहर दक्षिणकाशी नावाने तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. वाई शहरातील गणपती घाटावरील महागणपती मंदिर पर्यटकांचे खास आकर्षण आहे. मूर्तीच्या भव्यतेमुळे ते ढोल्या गणपती नावानेही परिचित आहे.

**राजकीय आढावा (स्वातंत्र्यपूर्व )**

१८५७मधील सातारा राजद्रोहाच्या कटाचे मुख्य सुत्रधार रंगो बापूजी गुप्ते होते. मनुष्यबळ संघटित करण्यासाठी वाठार, येनवडे, देऊर, वर्धनगड, वारूगड, आर्वी, कळंबी, कराड, अरळे, अर्जुनगड, येकमुल्ली, जकातवाडी,फलटण व सातारा येथे भूमिगत केंद्रे स्थापन केली. रंगोजीच्या सहकाऱ्यांमध्ये साताऱ्याचे तात्या फडणीस, कराडचे दौलत पवार, रंगोजीचे महाडचे मेहुणे केशव निळकंठ, अण्णामामा चित्रे, आपले सुपुत्र सीताराम गुप्ते, भोरमधील शेटे बंधू साताऱ्याचे २२ व्या पलटणीतील दफेदार गणेश सखाराम कारखानीस, जकातवाडीचे हरी राघोजी देवरूख, साताऱ्याचे बाळाजी शिंपी इत्यादींचा समावेश होता. ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध लढण्याचा आणि सातारा जिल्हा मुख्यालय जिंकून सरकारी खजाना लुटण्याचा या सर्वांचा कट होता. रंगो बापूजींच्या १८५७ मधील उपक्रमाला साताऱ्याच्या राजघराण्यांचा वित्तीय पाठिंबा होता.[४९]

भारतीय स्वातंत्र्यलढयाचे सुवर्णमय रक्तपान याच भूमीत लिहिले गेले. १९०० शतकामध्ये प्रांतिक परिषद सातारला भरली होती. राष्ट्रीय नेत्यांच्या विचारांचा पाठपुरावा करणाऱ्या भाऊसोा सोमण, नरूभाऊ लिमये, कृष्णराव जगदाळे, शेखकाका, शंकरराव साठे इत्यादी शूरवीरांनी स्वतःला स्वातंत्र्य संग्रामात झोकून दिले. १९३० च्या सविनय कायदेभंगात व १९४२ च्या चलेजाव चळवळीत साताऱ्यातील असंख्य समर्पनशील शूरवीरांनी भाग घेतला. क्रांतिसिंह नाना पाटिल, जी.डी.लाड, इ. स्वातंत्र्यवीरांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार हे पत्रीसरकार म्हणून जगभर प्रसिद्ध झाले. प्रतिसरकार हे साताऱ्याचा शिखरबिंदू होता.

महाराष्ट्रातील भूमिगत आंदोलनाचे सर्वात दैदीप्यमान शिखर म्हणजे साताऱ्याचे प्रतिसरकार होय. सातारा–सांगली भागातील निर्भय जनतेमुळेच ही संघटना दीर्घकाळ कार्यरत राहिली. ग्रामीण भागातील स्वातंत्र्य सैनिकांच्या संघटना कुशलतेने व वीर वृत्तीमुळे प्रतीसरकार निर्माण झाले आणि दीर्घकाळ कार्यरत राहीले. ब्रिटिश सरकार जवळ प्रचंड पोलिस व सेना असताना देखील प्रतिसरकारने गनिमी काव्याने लढून पोलादी सरकारी यंत्रणा खिळखिळी केली. त्यामुळे प्रतिसरकारची कामगिरी खचितच कौतुकास्पद मानावी लागते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतामध्ये सामील होताना औंध संस्थान जरी लहान संस्थान असले तरी ऐतिहासिक काळात या संस्थानाच्या परिसीमा खूप लांबवर पसरलेल्या होत्या. मराठ्यांचे राज्य नष्ट करण्याकरता औरंगजेब सर्व सामर्थ्यानिशी जेव्हा दक्षिणेत आला तेव्हा मराठ्यांची अस्मिता जपण्याची कामगिरी एकजुटीने करणाऱ्या मराठा मुत्सद्दी सरदारांमध्ये औंधचे परशुराम त्रिबंक प्रतिनिधी हे एक होते. या संस्थानाच्या मूळच्या प्रादेशिक व्याप्तीत सध्याचा सातारा व सांगली जिल्ह्यातील काही भाग होता. तसेच प्रतिनिधी संस्थानाची राजधानी काही काळ कराड येथेही होती. ब्रिटिशांनी आपली सत्ता स्थापित केल्यानंतर कराडचा समावेश ब्रिटिश मुलखात करण्यात आला. त्या संस्थानाची राजधानी औंध येथे हलवावी लागली होती.[५०]

प्रजेला अधिकार देण्यात उत्सुक असलेले बाळासाहेब पंत प्रतिनिधी सारखे संस्थानिक त्या काळात निदान महाराष्ट्रात तरी नव्हते. म्हणून औंध सारख्या छोट्या संस्थानाच्या मोठ्या मनाच्या राजाने अवलंबलेल्या प्रगतीशील धोरणाचे इतर संस्थानिकांनीही अनुकरण करावे असे महात्मा गांधीनी आवाहन केले होते.

फलटण संस्थान हे दक्षिण महाराष्ट्रातील सर्वात जुने व ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे होते. तोराव्या शतकातील महानुभव वाङ्‌मयात याचा फलेठाण असा उल्लेख आहे. तर काही वाङ्‌मयात फलपतन असा उल्लेख आढळतो. माण, खटाव व फलटण या भागांवर वाकाटकांची अधिसत्ता होती.[५१]

फलटण संस्थानाच्या अधिपतीने २२ एप्रिल १८२० रोजी ईस्ट इंडिया कंपनीशी एक करार करून फलटणचे संस्थान कायम ठेवले. या संस्थानाच्या कारभारातील एक उल्लेखनीय घटना म्हणजे तेथील राजांनी संस्थानात ७ सप्टेंबर १९२९ रोजी कार्यकारी मंडळ व कायदे मंडळाची स्थापना केली. कायदे मंडळातील काही सदस्य लोकनियुक्त होते. १९३१ मध्ये कायदे मंडळाची पुनर्घटना करण्यात आली. त्यात लोकनियुक्त सभासदांचे शेकडा प्रमाण ४५ होते.

**मतदारसंघ विभागणी**

पहिल्या सार्वत्रिक १९५१ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये Bombay लोकसभा क्षेत्रातंर्गत १) North Satara २) Kolhapur cum Satara ३) Kolhapur cum Satara ४) South Satara अशा प्रकारची सातारा जिल्ह्याची मतदारसंघाची विभागणी केली गेली होती.

१९५७ च्या दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत Bombay अंतर्गत कराड व सातारा अशा दोन मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली. तसेच १९६२ च्या निवडणुकीत अशाच प्रकारची मतदारसंघाची विभागणी होती. परंतु १९६७ च्या निवडणुकीत सांगली या नवीन मतदारसंघाची भर पडली.

**भारतातील राज्यांची विभागणी व पुनर्रचना**

तत्कालिन राष्ट्रपतीने निवडणुक आयोगामार्फत गठीत करण्यात आलेल्या समितीकडे मतदारसंघ पुनर्रचनची जबाबदारी सोपविली. १ मार्च १९५० पर्यंतच्या अंदाजित लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघ पुनर्रचना करण्यात आली आहे. म्हणजेच १९४१ च्या जनगणनेवर आधारित मतदारसंघातील मतदारांची संख्या नव्हती. लोकसभेच्या प्रत्येक मतदारसंघात पाच लाख व जास्तीत जास्त साडेसात लाख लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी असे प्रमाण या पुनर्रचनेत करण्यात आले. तत्कालिन घटकराज्यांची अ,ब,क अशी वर्गवारी करण्यात आली

होती. या घटकराज्यांमध्ये एक प्रतिनिधी मतदारसंघ, दोन प्रतिनिधी मतदारसंघ व तीन प्रतिनिधी मतदारसंघाची विभागणी करण्यात आली होती.

भारतामध्ये वेगवेगळ्या आकडेवारीनुसार १९५१–५२ च्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या होत्या. भारताच्या राष्ट्रपतींच्या आदेशानुसार निवडणुक आयोगाच्या मुख्य निवडणुक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली मतदारसंघ पुनर्रचनेची प्रक्रिया पार पडलेली दिसते. परंतु मतदारसंघ पुनर्रचनेची प्रक्रिया समाधानकारकपणे झाली नाही. या पुनर्रचनेमध्ये भौगोलिक रचनेत तसेच सामाजिक गटांनी जाणीवपूर्वक डावलल्याचा आरोप करण्यात आला. मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यावर मतदारसंघ निर्माण करण्याचे काम दिले. परंतु प्रत्यक्षात हा अधिकार सत्ताधारी पक्षालाच मिळाला. सत्ताधारी पक्षाने त्यांच्या सोयीनुसार मतदारसंघाची आखणी केली गेली. संसदीय सल्लागार समितीने केवळ राजकीय दृष्टिकोनातून मतदारसंघ निर्माण केले. निवडणुक आयोगाने याला आक्षेप घेतला. त्यातूनच परिसीमन आयोगाचा जन्म झाला.[५२]

**पहिला परिसीमन आयोग (१९५३)**

१९५१ च्या जनगणनेवर आधारित मतदारसंघाची पुनर्रचना करण्याचे कार्य परिसीमन आयोगाला पार पाडावयाचे होते. निवडणुक आयोगाच्या शिफारशीवरून केंद्र सरकारकडे कायदा करून स्वतंत्र भारतातील पहिला परिसीमन आयोग १९५३ साली नियुक्त केला. या परिसीमन आयोगावर १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. हा आयोग त्रिस्तरीय होता.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या राज्यांचा गट अ,ब,क पहिल्या मतदारसंघ पुनर्रचना आयोगाने रद्द केल्या. केंद्रशासित व घटकराज्ये असे दोन गट तयार केले. या दोन गटांमध्ये १३ घटकराज्ये व ८ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश केला तसेच या परिसीमन आयोगाने एक प्रतिनिधी, दोन प्रतिनिधी मतदारसंघ पुनर्रचना केली. परंतु प.बंगाला हा तीन प्रतिनिधी मतदारसंघ रद्द केला.

**दुसरा परिसीमन आयोग(१९६३)**

संविधानानुसार दर दहा वर्षांनी लोकसंख्या जनगणनेनुसार मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात यावी. १९६२ च्या आयोगाने १९६१ च्या जनगणनेवर पुनर्रचना करण्यात आली. आयोग नियुक्त करण्यापूर्वी १९६१ मध्ये दोन प्रतिनिधी मतदारसंघ बरखास्त करण्याचा कायदा

संसदेमध्ये संमत करण्यात आला १९६३ च्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार एक मतदारसंघ एक प्रतिनिधी हे तत्त्व अंमलात आले.

## तिसरा परिसीमन आयोग (१९७३)[५३]

मतदारसंघ पुनर्रचनच्या दृष्टीने १९७३ चा आयोग महत्त्वपूर्ण मानला जातो. यात मतदारसंघ पुनर्रचनेसंबंधी निकष व मार्गदर्शक तत्त्वांचा कायद्यांचा सखोल विचार करण्यत आला. राखीव जागाबद्दल कायद्यात अनेक बदल करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे–

१) मतदारसंघाची निश्चिती करताना भौगोलिक एकसंघपणा, प्राकृतिक रचना, सध्याच्या सीमा, प्रशासकीय युनिट, जनतेची सोय व दळणवळणाची साधने याला प्राधान्य द्यावे.

२) विधानसभा मतदारसंघ संपूर्णतः एकाच लोकसभा मतदारसंघात अनुसूचित जातीची संख्या जास्त ते मतदारसंघ राखीव करावेत. ते मतदारसंघ राज्यभर विखरलेले असावेत.

४) ज्या मतदारसंघात अनुसूचित जमातीची संख्या जास्त आहे ते मतदारसंघ राखीव करावेत.

## १९७६ ची ४२ वी घटनादुरूस्ती :–

आणीबाणीच्या काळात ४२ वी घटनादुरूस्ती करण्यात आली. या दुरूस्तीने दर १० वर्षानी आयोग नेमण्याची प्रक्रिया खंडित करण्यात आली. या घटना दुरूस्तीनुसार कलम ८२ व कलम १७० मध्ये बदल करण्यात आले. २००१ पर्यत लोकसभा व विधानसभा मतदारसंघ १९७३ च्या मतदारसंघ पुनर्रचनेप्रमाणे राहतील. या दुरूस्तीने १९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना झाली नाही. १९७१ ते २००१ या ३० वर्षाच्या कालखंडात मतदारसंघ पुनर्रचनेची एक वेळच प्रकिया करण्यात आली.

## चौथा परिसीमन आयोग (२००२)

संसदेने २००१ मध्ये ८४ वी घटनादुरूस्ती करून २००२ मध्ये चौथ्या परिसीमन आयोगाची स्थापना केली. १९७३ च्या परिसीमन कायद्यातील निकष व मार्गदर्शक तत्त्वांत बदल करण्यात आले. भारतीय राज्यघटनेच्या कलम ८२ नुसार आयोगाची रचना पुढीलप्रमाणे–

१) सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश (हे पदसिद्ध अध्यक्ष)

२) केंद्रिय निवडणुक आयोगाचे मुख्य निवडणुक आयुक्त(पद्सिद्ध सदस्य)

३) सर्व घटकराज्यांच्या निवडणुक आयोगाचे आयुक्त(पदसिद्ध सदस्य)

४) सहयोगी सदस्य १० असतील.

५) घटक राज्यांच्या लोकसभेचे + ५ घटकराज्यांच्या विधानसभेचे सदस्य असतात.[५४]

**राजकीय आढावा (स्वातंत्र्योत्तर) लोकसभा :–**

सातारा जिल्ह्याच्या पहिल्या सार्वत्रिक १९५१ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये बॉम्बे राज्याच्या लोकसभा मतदारसंघाच्या उत्तर सातारा लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसला एक एक तर कोल्हापूर Cumsatara लोकसभा मतदारसंघातून अपक्षला एक जागा मिळाली.

१९५३ साली झालेला पहिल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारसंघामध्ये बदल झाला. बॉम्बे राज्यातंर्गत कराड व सातारा अशा नवीन नावाने मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली. कराड लोकसभा मतदारसंघातून PWP ( Peasant And workers party) ला एक जागा मिळाली तर सातारा लोकसभा मतदारसंघातून भारतीय कम्युनिस्ट ला एक जागा मिळाली.

१९६३ साली झालेल्या दुसऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या १९६७ च्या सार्वत्रिक लोकसभा मतदारसंघ संख्येत बदल होऊन सातारा, कराडबरोबर सांगली या नवीन मतदारसंघाची निर्मिती झाली. साताऱ्यातून काँग्रेसला १ जागा कराडमधून INC ला एक तर सांगलीमधून काँग्रेसला एक जागा मिळाली. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सातारा हा एकच मतदारसंघ राहून कराड व सांगली हे दोन मतदारसंघ रद्द झाले व सातारा लोकसभा मतदारसंघातून १९७१ ते १९९१ पर्यत काँग्रेसलाच एक जागा मिळाली.

१९९६ च्या सातारा लोकसभेच्या निवडणुकीमध्ये पक्षबदल होऊन सातारा लोकसभेची जागा प्रथमच शिवसेनेस मिळाली. १९९८ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सातारा लोकसभेची जागा पुन्हा INC ला मिळाली. १९९८ साली शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यानंतर सातारा लोकसभेची पहिली जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाली. २००४ साली झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सातारा लोकसभेची जागा पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच गेली.

**विधानसभा**

१९६० साली महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर झालेल्या १९६२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून ते २००४ पर्यंतच्या सार्वत्रिक विधानसभेच्या निवडणुकीपर्यत सातारा

जिल्ह्याच्या विधानसभा मतदारसंघातून १० पैकी ९ जागा या सर्वसाधारण गटास मिळाल्या तर SC ची एक जागा २००४ पर्यत माणला मिळाली आहे.

परंतु २००२ साली झालेल्या चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मतदारसंघ संख्येत बदल झालेप. पूर्वीच्या सातारा जिल्ह्याच्या १० मतदारसंघाऐवजी जावळी व खटाव हे दोन मतदारसंघ कमी होऊन एकूण मतदारसंघाची संख्या ८ करण्यात आली. २००९ मध्ये झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ८ जागापैकी  सर्वसाधारण गटास ७ जागा मिळाल्या तर SC ची एक जागा फलटण या राखीव मतदारसंघास मिळाली.

**सातारा जिल्हा विधानसभा निवडणुकीतील पक्षांची कामगिरी(मते/टक्के)[५५]**

| अ. न. | राजकीय पक्ष | १९६२ | १९६७ | १९७२ | १९७८ | १९८० | १९८५ | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | काँग्रेस | ७०.६१ | ६८.२० | ६६.६४ | ७.९१ | ३८.७३ | ४५.९९ | ४७.३७ | ४५.५३ | २६.२५ | ७.८ |
| २. | राष्ट्रवादी | – | – | – | ४२.६८ | ५२.०९ | ३८.४१ | – | – | ४६.२९ | ४६.३२ |
| ३. | भाजप | – | – | – | – | २.०६ | ०.९३ | २.९० | १.१३ | ९.३२ | १०.९ |
| ४. | शिवसेना | – | – | – | – | – | – | ९.९५ | ८.६९ | १६.१२ | १५.४ |
| ५. | सी.पी.एम. | ३.४५ | ३.८८ | २.७८ | ०.७० | – | – | ०.२२ | ०.३८ | ०.११ | – |
| ६. | शे.का.प. | १०.३४ | १०.०२ | २.८२ | ८.४४ | १.८१ | – | ०.८१ | – | ०.३४ | – |
| ७. | जनता दल | – | – | – | – | – | – | १०.१४ | ०.१५ | ०.०३ | – |
| ८. | आर.पी.आय. | – | ३.०७ | १.०६ | – | ०.११ | ०.४० | – | ०.०३ | – | – |
| ९. | इतर | ७.०३ | ४.४९ | ८.४१ | २८.०५ | ०.२८ | – | ०.९२ | – | ०.२३ | १९.५८ |
| १०. | अपक्ष | ८.५३ | १०.३४ | १८.२९ | १२.२२ | ४.९२ | १४.२७ | २७.६९ | ४४.०९ | १.३१ | – |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सातारा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची राजकीय ताकद सर्वात जास्त आहे.

## समारोप–

पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५६४२ चौ.किलोमीटर असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५ % आहे. जिल्ह्याच्या उंच सखलपणामुळे घाटमाथा, मावळ व पठार असे तीन स्वाभाविक विभाग असून जुन्नर, आंबेगांव, मावळ, मुळशी वेल्हे व भोर हे तालुके घाटमाथ्यावर असून उर्वरित ८ तालुके व मावळचा काही भाग हा पठारी भागात आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ९४.२७ लाख असून जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ३९ % लोकसंख्या ग्रामीण भागात तर ६१ % लोकसंख्या नागरी भागात आहे.

पुणे जिल्ह्याची मतदारसंघाची रचना करीत असताना भौगोलिक रचनेचा परिणाम मतदारसंघनिर्मितीवर झालेला आहे. त्यामुळे सपाटी भागावर मतदारसंघाची निर्मिती जास्त आहे तर पठारी भागामध्ये मतदारसंघ निर्मितीवर मर्यादा पडलेल्या आहेत.

सातारा जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०४८० चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या ३.४० % आहे. जमिनीचा उंच सखलपणा लक्षात घेता पश्चिमेकडील प्रदेश डोंगराळ असून यामध्ये महाबळेश्वर, जावळी, पाटण व सातारा तालुक्याचा निम्मा भाग तर मधला कृष्णा काठचा प्रदेश खोलगट असून त्यामध्ये वाई, सातारा तालुक्यातील उर्वरित भाग, कोरेगांव व कराड हे तालुके येतात. पूर्वेकडील प्रदेश माळरानाचा असून त्यामध्ये खटाव, माण व फलटण काही भाग व खंडाळा तालुके येतात.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३०.०४ लाख असून २००१ च्या तुलनेत ६.९४ टक्यांनी लोकसंख्येत वाढ झालेली आहे.

सातारा जिल्ह्याची मतदारसंघाची निर्मिती करीत असताना डोंगराळ भागाचा मतदारसंघानिर्मितीवर मर्यादा पडलेल्या आहेत. त्यामुळे पुणे जिल्ह्याच्या तुलनेत मतदारसंघाची संख्या कमी प्रमाणात राहिलेली आहे.

पुणे हा पुरातन व ऐतिहासिक वारसा असणारा जिल्हा आहे. या शहराला छत्रपती शिवाजी महाराजापासून मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. पेशवाई ब्रिटिशांच्या काळात नावाजलेले होते. पूर्वीच्या काळी या शहराला कसबे पुणे, पुनवडी या नावाने ओळखले जात होते.

वारसा–१७व्या शतकापर्यंत हे शहर निजामशाही, आदिलशाही, मुघल अशा राजवटीच्या अंमलाखाली होते. सतराव्या शतकात शहाजीराजे भोसले यांना निजामशहाने पुण्याची जहागिरी दिली. या जहागिरीमध्ये शहाजीच्या पत्नी जिजाबाई वास्तव्यास असताना १६३० मध्ये शिवनेरी किल्ल्यावर शिवजीराजे भोसले यांचा जन्म झाला शिवाजीनी पुणे इलुखान मराठ्यांचे स्वराज्य स्थापन केले. पेशवेकाळात १७४९ साली सातारा ही छत्रपतीची गादी तर पुणे मराठा साम्राज्याची प्रशासकीय राजधानी बनली.

सात दारावरून सातारा महादरा ते सातारा 'सप्ततारा' पासून सातारा अजिंक्यताऱ्यावरील सप्तऋषीच्या देवालयावरून सातारा ही विशेषत : व्यक्ती करणारी म्हणून

'सात' म्हणजे विपूल या अर्थाच्या शब्दांवरून 'सातारा' या संकल्पनेची उत्पती सांगितली जाते.

वारसा– मराठ्यांच्या इतिहासाशी साताऱ्याचे नाते अतूट आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात छत्रपती राजारामाने आपली गादी येथे स्थापन केली. छत्रपती शाहू महाराज मोगलाच्या कैदेतून सुटल्या नंतर झालेल्या यादवीत शाहूचा पक्ष वरचढ ठरला व सातारची गादी शाहू महाराजांच्या ताब्यात आली. १७०८ मध्ये येथे शाहुचा राज्यभिषेक संपन्न झाला. तेव्हापासून छत्रपतींची थोरली गादी येथे प्रस्थापित झाली.

सन १८४८–४९ मध्ये सातारा जिल्हा अस्तित्वात आला. त्यावेळी जिल्ह्यातस प्रांत संबोधले जायचे. हा प्रांत विजापूर, जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगांव, पंढरपूर, सातारा, तारगांव, वाळवा आणि वाई अशा ११ उपविभागामध्ये विभागला होता. प्रशासकीय सोयोसाठी १८६२ मध्ये पुन्हा जिल्ह्याची पुनर्रचना करून ११ उपविभाग व १२ महिलांऐवजी १४३५ विभाग व दोन लहान विभाग बनविण्यात आले. नवीन रचनेनुसार विजापूर, जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगांव, पंढरपूर, सातारा, तारगांव, वाळवा वाई माळाशेरस, माण व पाटण हे उपविभाग तर वाईमध्ये खंडाळा व वाळवामध्ये शिराळा हे दोन महाल होते. १९४९ नंतर नवीन प्रस्थापित झालेल्या जिल्ह्याची तीन प्रांतामध्ये विभागणी केली त्यात नऊ तालुके व दोन महालांचा समावेश होता. सातारा, कोरेगांव व महाबळेश्वर हे तीन प्रांत असून साताऱ्यामध्ये सातारा, जावळी, कराड व पाटण तालुके कोरेगांव प्रांतात खटाव, माण, फलटण व खंडाळा तालुके आणि महाबळेश्वरमध्ये वाई व महाबळेश्वर तालुके मोडत होते.

स्वांतत्र्यपूर्व काळातील परिसीमन आयोगाचा आढावा घेताना १९१९ च्या ॲक्टनुसार मतदारसंघपुनर्रचना झालेली होती. कॉन्सिल ऑफ स्टेटचे ५ मतदारसंघ होते. एका विभागात ५ मतदारसंघाचा समावेश करण्यात आला. एक मतदारसंघ दोन विभागाचा मिळून बनविण्यात आला. यामुळे मतदारसंघाचा आकार वाढला मात्र मतदार संख्या कमी राहिली. १९३५ च्या कायद्यानुसार प्रांतीय स्वायत्तता निवडणुकांचा समावेश करण्यात आला. या पुनर्रचनेमध्ये लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्र यावर भर दिला त्याच शिफारशी २००२ च्या परिसीमन आयोगाने स्वीकारल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात परिसीमन आयोगाचा आढावा घेत असताना आतापर्यंत म्हणजे १९५३, १९६३, १९७३ व २००२ असे चार परिसीमन आयोग स्थापन झाले असून त्याबाबत आढावा परिसीमन आयोगाची रचना अहवाल व त्याबाबतची भूमिका या प्रकरणामध्ये घेणार आहोत.

## ४.२ मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे पुणे जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक बदल

**प्रस्तावना**

केंद्र,राज्य व जिल्हा पातळीवर राजकारण घडत असते. भारतात या पातळ्यांवरील राजकारणात शिरकाव करण्यासाठी मतदारसंघ हे प्रमुख साधन आहे. त्यामुळे मतदारसंघ रचनेला महत्त्व आहे. पुनर्रचना आयोगाने भारतातील व घटक राज्यातील विधानसभा व लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना केली. त्यानुसार महाराष्ट्रातील ४८ लोकसभा व २८८ विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना झाली. लोकसभा व विधानसभा सदस्य संख्येमध्ये कोणताही बदल केला नाही. मात्र मतदारसंघातर्गत फारच बदल झाले मतदारसंघाची पुनर्रचना म्हणजे केवळ भौगोलिक व प्रशासकीय सीमा रेखाची पुनर्रचना नव्हे. मतदारसंघाची पुनर्रचना म्हणजे राज्य, जिल्हा मतदारसंघातील आर्थिक व सामाजिक संबधाची फेरजुळणी झाली. लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा वाढत्या परिणामी खुल्या जागा कमी झाल्या. त्यामुळे महाराष्ट्रातील विभाग, जिल्हा व विधानसभा मतदारसंघातील बदलत्या राजकारणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.[५६]


**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे पुणे जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघ[५७]–**

| अ.क्र. | लोकसभा मतदारसंघ | लोकसभा मतदारसंघातील समाविष्ट विधानसभा मतदारसंघ |
|---|---|---|
| १. | पुणे | वडगाव शेरी, शिवाजी नगर, कोथरूड, पर्वती, पुणे कॅन्टोमेंट व कसबा |
| २. | मावळ | पनवेल, कर्जत व उरण, मावळ, चिंचवड, पिंपरी |
| ३. | बारामती | दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर, खडकवासला |
| ४. | शिरूर | जुन्नर, आंबेगाव, खेड, आळंदी, शिरूर व हडपसर |

## पुणे लोकसभा मतदारसंघ

### १९५२ ते २००४ पर्यंतचा पुणे लोकसभा मतदारसंघ दृष्टिक्षेप[५८]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १. | नारायण गोरे | १९५७ | प्रजा समाजवादी पक्ष | १४३८०२ |
| २. | शंकरराव मोरे | १९६२ | काँग्रेस | ११५४०२ |
| ३. | एस.एम.जोशी | १९६७ | संयुक्त समाजवादी पक्ष | १५०६९६ |
| ४. | मोहन धारिया | १९७१ | काँग्रेस | २०८१५० |
| ५. | मोहन धारिया | १९७७ | भारतीय लोकदल | २०९९२२ |
| ६. | विठ्ठल गाडगीळ | १९८० | काँग्रेस | २१५१६१ |
| ७. | विठ्ठल गाडगीळ | १९८४ | काँग्रेस | ३११२३८ |
| ८. | विठ्ठल गाडगीळ | १९८९ | काँग्रेस | २९६०५१ |
| ९. | अण्णा जोशी | १९९१ | भारतीय जनता पक्ष | २५०२७२ |
| १० | सुरेश कलमाडी | १९९६ | काँग्रेस | ३९०७७८ |
| ११ | विठ्ठल तुपे | १९९८ | काँग्रेस | ४३४९१५ |
| १२ | प्रदीप रावत | १९९९ | भारतीय जनता पक्ष | ३०४९५५ |
| १३ | सुरेश कलमाडी | २००४ | काँग्रेस | ३७३७७४ |




मागील तक्त्यावरून असे स्पष्ट दिसून येते की, १९९१ व १९९९ च्या विधानसभेच्या निवडणुकीचा अपवाद सोडला तर १९५७ ते २००४ पर्यत काँग्रेस पक्षाचे नियंत्रण या विधानसभेवर होते. १९९९ मध्ये पक्ष बदल होऊन या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये भाजप विजयी झाले. या निवडणुकीमध्ये या मतदारसंघातील भाजपचे उमेदवार प्रदीप रावत यांना ३०४,९५५ मते पडून ते विजयी झाले. या मतदारसंघावर असणारा काँग्रेसचा प्रभाव कमी झालेला दिसून येतो. परंतु २००४ च्या निवडणुकीत काँग्रेसला विजय संपादन करता आला व भाजपला या ठिकाणी जागा राखता आली नाही. या निवडणुकीत काँग्रेसचे सुरेश कलमाडी हे ३७३७७४ मते पडून विजयी झाले.

## पुणे लोकसभा मतदारसंघाची मतदारसंघ पुनर्रचना –

नवीन पुणे लोकसभा मतदारसंघात वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, पुणे कन्टोन्मेट आणि कसबा पेठ या सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. या लोकसभा मतदारसंघात जुन्या पुणे लोकसभा मतदारसंघातील पुणे कॅन्टोन्मेंटमधील हडपसर व मुंढवा हा भाग कमी झाला. या मतदारसंघात सामील केला. हवेली तालुक्यातील कळस महसूल मंडल या मतदारसंघात आहे. पुणे हा पूर्व पुणे शहरी मतदारसंघ आहे.[५९]

## २००९ च्या पुणे लोकसभा निवडणुकीमधील राजकीय प्रभुत्व

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|
| १. | सुरेश कलमाडी | काँग्रेस | २,७९९७३ |
| २. | अनिल शिरोळे | भारतीय जनता पक्ष | २,५४,२७२ |
| ३. | रणजित शिरोळे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ७५९३० |
| ४. | डी.एस.कुलकर्णी | बहुजन समाजवादी पार्टी | ६२९८१ |




वरील तक्त्यावरून असे स्पष्ट दिसून येते की, २००९ च्या पुणे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण ४ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. यामध्ये खरी लढत काँग्रेस व भाजप यांच्यात दिसून आली. काँग्रेसचे सुरेश कलमाडी यांना २,७९,९०३ मते पडली तर भाजपचे अनिल शिरोळे यांना २,५४,२७२ मते पडली. सुरेश कलमाडी २५००० मतांनी निवडून आले.

**पुणे लोकसभा मतदारसंघातील विधान सभानिहाय उमेदवाराला मिळालेले मतदान**

**पुणे लोकसभा २००९ (विधानसभा निहाय मतदान)**[६०]

| अ. न. | उमेदवाराचे नाव | पक्ष | शिवाजी नगर | वडगाव शेरी | कसबा पेठ | कोथरूड | पर्वती | पुणे कॅन्टोन्मेंट | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सोमनाथ काळू पवार | अपक्ष | ९९ | १३३ | १२१ | १३२ | ९२ | ८२ | ६५९ |
| २. | ॲड.सुहास नरहर गोडसे | अपक्ष | ६७ | ८१ | ८७ | ९४ | ७४ | ७३ | ४७६ |
| ३. | सरदेसाई किशोरकुमार रघुनाथ | अपक्ष | ७८ | १०९ | ९५ | १२८ | १२२ | ५५ | ५८७ |
| ४. | श्रीकांत मधुसुदन जगताप | अपक्ष | ५१ | ५१ | ४२ | ४४ | ५० | ५१ | २८९ |
| ५. | शेख अल्ताफ करीम | अपक्ष | ८५ | १०४ | ९१ | ९४ | ११० | १११ | ५९५ |
| ६. | शिंदे राजेंद्र बाबूराव | अपक्ष | १०९ | १५४ | १५३ | १४० | १४१ | १०४ | ८०१ |
| ७. | विक्रम नरेंद्र बोके | अपक्ष | ४१९ | ३४२ | २६९ | ४६१ | ३९२ | २०९ | २१७२ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | राजेंद्र भगत अलीस जितूभाई | अपक्ष | १३० | १९६ | १३३ | १५३ | १५४ | १२४ | ८९० |
| ९. | भागवत रघुनाथ कांबळे | अपक्ष | ९६ | १४४ | ७६ | ९६ | १३९ | ७७ | ६२८ |
| १०. | भारत मनोहर गवळी | अपक्ष | ७६ | ११३ | ६१ | ८४ | ११३ | ७१ | ५१८ |
| ११. | बालू अलीस अनील शिरोळे | भारतीय जनता पक्ष | १७० | ३६२ | ४१८ | ४८३ | ४०२ | २२३ | २०५८ |
| १२. | बगाडे सचिन मारूती | अपक्ष | १२६ | १३० | १०८ | १०८ | २३९ | ९२ | ८०३ |
| १३. | दत्तात्रय गणेश तलगेरी | अपक्ष | ११२ | १२८ | १०७ | ११६ | १२९ | १०३ | ६९५ |
| १४. | तांबोळी शब्बीर सज्जनभाई | अपक्ष | ७४ | १०९ | १०३ | ७३ | १०३ | ९९ | ५६१ |
| १५. | नारायण शंकर वामघिरे | अपक्ष | १६७ | १९७ | १७५ | २२७ | २०३ | १६१ | ११३० |
| १६. | चौरे विलास चिंतामण | भारतीय जनता पक्ष | १०८ | १४४ | १०८ | ९६ | १३४ | १०३ | ६९३ |
| १७. | चौधरी सुनिल गुलाबराव | बहुजन समाजवादी पार्टी | ६५ | १०९ | ११० | ७७ | १२२ | ८६ | ५६९ |
| १८. | पी.के.चव्हाण | अपक्ष | ७४ | १०५ | ७३ | ८० | ७७ | ९४ | ५०३ |
| १९. | खान निसार ताजअहमद | अपक्ष | १२० | १७० | १५२ | १०१ | १६० | १२६ | ८२९ |
| २०. | खान आम्रोल्ला मोहमद | अपक्ष | ३४२ | ३६७ | ८३१ | १४५ | ४१२ | ९९१ | ३०८८ |
| २१. | कुलकर्णी कौस्तुभ शशिकांत | अपक्ष | २५५ | ३८४ | ३७४ | ३६२ | ३७१ | २६७ | २०१३ |
| २२ | काम्तम ईश्वर संभाव्य | अपक्ष | ३९० | ४६१ | २९१ | ४०७ | ३८१ | २९४ | २२२४ |
| २३ | अशोक गणपत पालखेअलीस सुतार | अपक्ष | १२४ | १३७ | १०० | १२६ | ११० | १११ | ७०८ |
| २४ | अडागळे भाऊसाहेब रामचंद्र | अपक्ष | १०२ | १५४ | ७८ | १०० | ११७ | ९४ | ६४५ |
| २५ | अजय वसंत पैठणकर | अपक्ष | ८४ | ७४ | १४८ | ९२ | ७४ | ६२ | ५३४ |
| २६ | संघर्ष अरूण आपटे | प्रबुध्द रिपब्लिकन पक्ष | १९८ | २५७ | २२८ | १९८ | ३१९ | २१७ | १४१७ |
| २७ | सविता हजारे | पीवायपीआ य | १४५ | १२० | १११ | १४९ | १३६ | ८६ | ७४७ |
| २८ | शिरोळे रणजित श्रीकांत | महाराष्ट्र नवनिर्माण | १२२४८ | १०५५१ | १५२०५ | १८५१५ | १३४ | ५९२४ | ७१८८ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सेना | | | | | ४४ | | ७ |
| २९ | विनोद आनंद सिंह | पीएसएस | १५० | १३२ | १०८ | १७८ | १२८ | १०६ | ८०२ |
| ३०. | विक्रमादित्य ओमप्रकाश श्रिमान | राष्ट्रीय समाजवादी पार्टी | ७५ | ६६ | ५२ | ७८ | १२६ | ५४ | ४५१ |
| ३१ | भागबान जावेद कासिम | आययूएम एल | ८१ | ९४ | १२८ | ६७ | १०७ | १२९ | ६०६ |
| ३२ | गुलाब तात्या वाघमोडे | भारिप बहुजन पक्ष | २९२ | ३९९ | २५८ | १२१ | ५६७ | ७१६ | २३५३ |
| ३३ | अरुण भाटीया | पीपल्स गार्डियन पार्टी | ५०५४ | ४२८४ | ४०६२ | ७१३४ | ४१९६ | ५५९९ | ३०३२९ |
| ३४ | डी.एस.कुलकर्णी | बहुजन समाजवादी पार्टी | १२०७४ | १४३०४ | ६९१९ | ७०२७ | १०२४४ | १२३९५ | ६२९६३ |
| ३५ | कलमाडी सुरेश | कॉंग्रेस | ४४३३४ | ५४९४० | ४८०९५ | ३५४०४ | ४४४५३ | ५२६७१ | २७२८८७ |
| ३६ | अनिल शिरोळे | भारतीय जनता पक्ष | ३३११४ | ३३३५९ | ५६५९३ | ५६४९१ | ४९००६ | २५५८७ | २५४१५० |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्व उमेदवारांचा तपशील दिलेला आहे. या निवडणुकीमध्ये कॉंग्रेसचे सुरेश कलमाडी यांना शिवाजीनगरमधून ४४३३४, वडगाव शेरीतून ५४९४०, कसबा पेठेतून ४८०९५ मते, कोथरूडमधून ३५४०४ मते, पर्वतीमधून ४४४५३ मते तर पुणे कॅन्टोन्मेंटमधून ५२६७१ अशी एकूण २७९,८८७ मते मिळाली. BJP चे उमेदवार अनिल शिरोळे यांना शिवाजीनगरमधून ३३११४, वडगाव शेरीतून ३३३५९, कसबा पेठेतून ५६५९३ मते, कोथरूडमधून ५६४९१ मते, पर्वतीमधून ४९००६ मते तर पुणे कॅन्टोन्मेंटमधून २५५८७ अशी एकूण २५४,१५० मते मिळाली. बीएसपीचे उमेदवार डी.एस.कुलकर्णी यांना शिवाजीनगरमधून १२०७४, वडगाव शेरीतून १४३०४, कसबा पेठेतून ६९१९ मते, कोथरूडमधून ७०२७ मते, पर्वतीमधून १०२४४ मते तर पुणे कॅन्टोन्मेंटमधून १२३९५अशी एकूण ६२९६३ मते मिळाली. या निवडणुकीत कॉंग्रेसचे उमेदवार सुरेश कलमाडी यांना वडगाव शेतीतन पहिल्या क्रमांकाची मते मिळाली. तर

पुणे कॅन्टोन्मेटमधून दुसऱ्या क्रमांकाची मते  मिळाली. तसेच तिसऱ्या क्रमांकाची मते कसबा पेठेतून मिळाली. बीजेपीचे उमेदवार अनिल शिरोळे यांना कसबा पेठ व कोथरूडमधून प्रथम क्रमांकाची व दुसऱ्या क्रमांकाची मते पर्वतीमधून मिळाली. तर तिसऱ्या क्रमांकाची मते शिवाजीनगर व वडगाव शेरीमधून मिळाली. या दोन्हीच्या तुलनेत डी.एस.कुलकर्णी यांची मतांची संख्या कमी राहिलेली आहे. या निवडणुकीत प्रथम क्रमांकावर सुरेश कलमाडी, दुसऱ्या क्रमांकावर अनिल शिरोळे तर तिसऱ्या क्रमांकावर डी.एस.कुलकर्णी राहिलेले आहेत. इतर अपक्ष उमेदवारांना अत्यल्प मते मिळाली.

नवीन पुणे लोकसभा मतदारसंघात वडवाव शेरी, शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, पुणे कॅन्टोन्मेंट आणि कसबापेठ या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. पुणे महापालिकेच्या सीमा रेषेवरील भाग शिरूर व बारामती मतदारसंघात गेला. केवळ वडगावशेरी येथील सीमा रेषेवरील भाग पुणे लोकसभा मतदारसंघामध्ये आल्याने काँग्रेस व भाजप पक्षाला त्याचा फायदा होईल असे दिसते. कारण या सीमारेषेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद आहे. पुणे महापालिकेच्या सीबीडी भागात काँग्रेस व भाजपमध्ये स्पर्धा राहील असा मतदारसंघ तयार झाला आहे.[६१]

**मतदारसंघाची राजकीय सद्यस्थिती –**

पुणे लोकसभा मतदारसंघ १९७७ आणि १९९१ तसेच १९९९ तसेच १९९९चा अपवाद वगळता काँग्रेसने या मतदारसंघावर पकड कायम ठेवलेली आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातर्गत येणाऱ्या सहा विधानसभा मतदारसंघापैकी काँग्रेसकडे दोन भाजपकडे दोन तर राष्ट्रवादी व शिवसेनेकडे प्रत्येकी एक विधानसभा मतदारसंघ आहे. राजकीय दृष्ट्या काँग्रेस राष्ट्रवादीच्या तुलनेत भाजपसेना आघाडीचे मताधिक्य समान आहे.[६२]

**मावळ लोकसभा मतदारसंघ**

**२००९ च्या मावळ लोकसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व**[६३]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | गजानन बाबर | शिवसेना | ३६४८५७ | ५०.८४ |
| २. | आझम पानसरे | रा.काँग्रेस | २८४२३८ | ३९.६१ |
| ३. | उमाकांत मिश्रा | बहुजन समाजवादी पार्टी | २०४५५ | २.८५ |
| ४. | मारूती भापकर | अपक्ष | ८७६० | १.२२ |
| ५. | यशवंत नारायण देसाई | अपक्ष | ८२६० | १,१५ |
| ६. | हरिभाऊ दादाजी शिंदे | अपक्ष | ५५७२ | ०.७८ |
| ७. | शकील राजाबाई शेख | अपक्ष | ५५३३ | ०.७७ |
| ८. | BRO मनुल दिसोझा | अपक्ष | ३४७३ | ०.४८ |
| ९ | भिमराज निवृत्ती ढोले | अपक्ष | २३५६ | ०.३३ |
| १० | आयु. दिपाली निवृत्ती जाधव | अपक्ष | २२८८ | ०.३२ |
| ११ | महिंद्र प्रभाकर तिवारी | अपक्ष | २११७ | ०.३० |
| १२ | तुकाराम वामन बनसोडे | अपक्ष | १८२८ | ०.२५ |
| १३ | प्रदीप पांडुरंग कोपारकर | राष्ट्रीय समाज पक्ष | १५६३ | ०.२२ |
| १४ | गोपाळ यशवंत तंतरपाळे | अपक्ष | १५१५ | ०.२१ |
| १५ | शिवशंकर दत्तात्रय शिंदे | आयसीएम | १४११ | ०.२० |
| १६ | प्रमोद महादेव गोरे | अपक्ष | १२६२ | ०.१८ |
| १७ | जगन्नाथ पांडुरंग खर्गे | अपक्ष | ११४६ | ०.१६ |
| १८ | ईश्वर दत्तात्रय जाधव | अपक्ष | ९८२ | ०.१४ |
|  | Margin of victory |  | ८०,६१९ | ११.२३ |
|  |  |  | ७१७६१६ | ४४.७१ |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट दिसून येते की, २००९ च्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण १८ उमेदवार निवडणुक रिंगणात होते. त्यापैकी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस  पक्ष यांच्यामध्ये खरी लढत होती. शिवसेनेचे गजानन बाबर या मतदारसंघातून विजयी झाले. इतर अपक्ष पक्षांना अत्यल्प मते मिळाली.

**मावळ लोकसभा २००९ (विधानसभा निहाय मतदान)**[६४]

| अ. न. | उमेदवाराचे नाव | पक्ष | पनवेल १८८ | कर्जत १८९ | उरण १९० | मावळ २०४ | चिंचवड २०५ | पिंपरी २०६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हरिभाऊ दादाजी शिंदे | अपक्ष | ८५७ | ११७८ | १२०८ | १२१३ | ५४० | ५७५ | ५५७१ |
| २. | शकील राजाभाई शेख | अपक्ष | ८७० | १२४४ | ११२९ | १२१७ | ४७६ | ५९७ | ५५३३ |
| ३. | यशवंत नारायण देसाई | अपक्ष | १३०९ | २३१० | २०६१ | १४५९ | ४७९ | ६४१ | ८२५९ |
| ४. | ब्रो.मॅन्युअल डिसोझा | अपक्ष | ५३७ | ९०५ | ७९१ | ६६४ | २५४ | ३२२ | ३४७३ |
| ५. | महेंद्र प्रभाकर तिवारी | अपक्ष | ३५३ | ५५६ | ५०१ | ३५० | १६४ | १९२ | २११६ |
| ६. | भापकर मारूती साहेबराव | अपक्ष | ४५५ | ४३१ | ८७९ | १२६९ | १७४९ | ३९५२ | ८७३३ |
| ७. | ॲड.प्रमोद महादेव गोरे | अपक्ष | १८८ | २२० | २६४ | २१३ | १८८ | १८९ | १२६२ |
| ८. | तानतारपले गोपाल यशवंत | अपक्ष | २१४ | २५२ | २४७ | ३३६ | ३२२ | १४४ | १५१५ |
| ९. | ॲड.तुकाराम वामनराव बनसोडे | अपक्ष | २५९ | ४८६ | २८५ | ३९१ | २०६ | २०० | १८२७ |
| १०. | ढोले भिमराज निवृत्ती | अपक्ष | ४३४ | ५०० | ४८२ | ५६३ | १८३ | १९४ | २३५६ |
| ११. | जगन्नाथ पांडुरंग खारगे | अपक्ष | २२९ | २०१ | २५२ | २३१ | ११९ | ११३ | ११४५ |
| १२. | इश्वर दत्तात्रय जाधव | अपक्ष | १५६ | ३०४ | १६५ | १५९ | ८८ | ११० | ९८२ |
| १३. | ॲड.शिवशंकर दत्तात्रय शिंदे | केम | २७७ | २२२ | २६२ | २६९ | १९७ | १८२ | १४०९ |
| १४. | प्रदिप पांडुरंग कोचरकर | राष्ट्रीय समाज पक्ष | ३५४ | ३७९ | २८६ | २११ | १९२ | १४० | १५६२ |
| १५. | आयु.दिपालीनिवृत्ती चव्हाण | अपक्ष | ४७८ | ३५० | ३६२ | ३५६ | ३७५ | ३६२ | २२८३ |
| १६. | मिश्रा उमाकांत रामेश्वर | बहुजन समाजवादी पार्टी बाबासाहेब | १९७९ | ३५२६ | १९२६ | ३५५१ | ४४१९ | ५०३३ | २०४३४ |
| १७. | बाबर गजानन धर्मेश | शिवसेना | ५ए+४ | ५ए+४ | ७ए+४ | ७ए+४ | ६ए+४ | ६ए+४ | ३६४८५५ |
| १८. | पानसरे आजम फकिरभाई | रा.काँ. | ४ए+४ | ४ए+४ | ५ए+४ | ६ए+४ | ४ए+४ | ५ए+४ | २८४२३८ |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्व उमेदवारांचा तपशील दिलेला आहे. या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे उमेदवार गजानन बाबर यांना मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आझम पानसरे यांना २८४२३८ मते मिळाली तर

बीएसपीबीचे उमेदवार उमाकांत मिश्रा यांना पनवेलमधून १९७९ मते कर्जतमधून ३५२६, उरणमधून १९२६, मावळमधून ३५५१, चिंचवडमधून ४४१९ मते तर पिंपरीमधून ५०३३ मते अशी एकूण २०४३४ मते मिळाली. या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे गजानन बाबर यांना उरण व मावळमधून पहिल्या पसंतीचे मते मिळाली. तसेच पिंपरी व चिंचवडमधून दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर पनवेल व कर्जतमधून तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार यांना मावळमधून पहिल्या पसंतीची मते मिळाली. उरणमधून दुसऱ्या क्रमांकाच्या पसंतीची मते मिळाली तर पनवेल, कर्जत व चिंचवडमधून तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. बीएसपीबीचे उमेदवार यांना या दोन्ही उमेदवारांपेक्षा कमी परंतु इतर अपक्षांपेक्षा जादा मते मिळाली. या निवडणुकीमध्ये एकूण मतांचा विचार करता शिवसेनेचे गजानन बाबर प्रथम क्रमांकावर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार आझम पानसरे दुसऱ्या क्रमांकावर तर बीएसपीबी चे उमेदवार उमाकांत मिश्रा तिसऱ्या क्रमांकावर राहिलेले दिसून येते. इतर अपक्ष उमेदवारांना अत्यल्प मते मिळाली.

मावळ लोकसभा मतदारसंघात पनवेल, कर्जत व उरण हे विधानसभा मतदारसंघ रायगड जिल्ह्यातील व मावळ, चिंचवड व पिंपरी हे तीन विधानसभा मतदारसंघ पुणे जिल्ह्यातील आहेत. यामुळे या मतदारसंघात शेकाप व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात स्पर्धा राहील. या लोकसभा मतदारसंघात जुन्या बारामती खेड व रायगड लोकसभा मतदारसंघाचा राजकीय इतिहास आहे. बारामती व खेडपेक्षा रायगडचा इतिहास राजकिय दृष्ट्या जास्त महत्त्वाचा आहे.[६५]

ठाणे व रायगड या दोन जिल्ह्यातील काही भाग पुणे जिल्ह्यातील मावळ लोकसभा मतदारसंघाला जोडल्याने तळकोकणाचे राजकीय महत्त्व कमी झाले. रायगड जिल्ह्यात लोकसभेचे दोन मतदारसंघ असते तर शेतकरी कामगार पक्षाचे महत्त्व वाढण्याची शक्यता होती. परंतु हा भाग पुणे जिल्ह्यातील मतदारसंघाला जोडला गेल्यामुळे रायगड जिल्ह्यातील शेकापच्या राजकारणास खीळ बसणार आहे.

पनुर्रचनेनंतर नव्याने भाग समाविष्ट झालेल्या या नव्या मावळ लोकसभा मतदारसंघात पुणे, रायगड या जिल्ह्यातील तालुक्याचा समावेश असल्याने संमिश्र राजकीय पक्षांचा प्रभाव आहे. यामध्ये शिवसेना, शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस यांचा समावेश आहे. आगरी समाजावर शिवसेनेचा प्रभाव असल्याने येथे सेनेचे वर्चस्व असून त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघापैकी राष्ट्रवादीकडे दोन तर कॉँग्रेस, शेकाप, भाजप, अपक्षाकडे प्रत्येकी एक मतदारसंघ आहे.[६६]

### बारामती लोकसभा मतदारसंघ

### १९६२ ते २००४ पर्यतच्या बारामती लोकसभा मतदारसंघ दृष्टिक्षेप[६७]

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १. | गुलाब केशव वेदे | १९६२ | कॉँग्रेस | १०६२४४ |
| २. | टी.एस.जाधव | १९६७ | कॉँग्रेस | १६६३९२ |
| ३. | रघुनाथ केशव खाडिलकर | १९७१ | कॉँग्रेस | १८५६३७ |
| ४. | संभाजीराव काकडे | १९७७ | भारतीय लोकदल | २०३१४८ |
| ५. | शंकरराव पाटील | १९८० | कॉँग्रेस | २०९३०० |
| ६. | शरद पवार | १९८४ | कॉँग्रेस | ३६१६१८ |
| ७. | अजित पवार | १९९१ | कॉँग्रेस | ४३७२९३ |
| ८. | शरद पवार | १९९६ | कॉँग्रेस | ४२७५८९ |
| ९. | शरद पवार | १९९८ | कॉँग्रेस | ५२९०५९ |
| १०. | शरद पवार | १९९९ | रा.कॉँग्रेस | ५१०९२८ |
| ११. | शरद पवार | २००४ | रा.कॉँग्रेस | ६३४५५५ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९७७ च्या निवडणुकीची अपवाद सोडला तर १९६२ ते १९९८ पर्यत या मतदारसंघावर कॉँग्रेस पक्षाचे नियंत्रण राहिलेले होते. १९९८ साली शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्यानंतर १९९९ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे उमेदवार शरद पवार १, ४५, ३१३ मतांनी विजयी झाले. आणि आतापर्यत कॉँग्रेसच्या तिकिटावर जिंकणारा उमेदवार मात्र यावेळी स्वतंत्र स्थापन झालेल्या पक्षाच्या चिन्हावर निवडून येऊन पक्ष बदल झालेला दिसून येतो.


### बारामती लोकसभा मतदारसंघाची मतदारसंघ पुनर्रचना

बारामती लोकसभा मतदारसंघात दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर आणि खडकवासला या विधानसभा मतदारसंघांचा समावेश केला आहे. या मतदारसंघात प्रमुख चार बदल झाले. १) हवेली व शिरूर हे दोन विधानसभा मतदारसंघ या मतदारसंघातून वगळले. २) पिंपरी चिंचवड महापालिका बारामती लोकसभा मतदारसंघात होती हा भाग मतदारसंघातून वगळला गेला. ३) ग्रामीण भाग या मतदारसंघात संख्येने जास्त आला आहे. ४) बारामती

लोकसभा मतदारसंघात (मतदारसंघ पुनर्रचनेनंतर) मुळशी वेल्हे व भोर हे तीन तालुके नव्याने सामील झाले आहेत.[६८]

**२००९ च्या बारामती लोकसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[६९]**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | सुप्रिया सुळे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४८७८२७ | ५६.४५ |
| २. | कांता नलवडे | भारतीय जनता पक्ष | १५०९१६ | ३०.५७ |
| ३. | विवेक कुदळे पाटील | बहुजन समाजवादी पार्टी | २९८६४ | ४.०७ |
| ४. | संपत एकाळे | राष्ट्रीय समाजवादी पार्टी | १४९१२ | २.०३ |




वरील तक्त्यावरून असे स्पष्ट दिसते की, २००९ च्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण ४ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप यांच्यात खरी लढत होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे सुप्रिया सुळे यांना ४,८७,८२७ मते पडली. तर भाजपच्या कांता नलवडे यांना १,५०,०९६ मते पडली. सुप्रिया सुळे ह्या २,३०,००० मतांनी विजयी झाल्या.

## बारामती लोकसभा मतदारसंघातील विधान सभानिहाय उमेदवाराला मिळालेले मतदान :-

### बारामती लोकसभा २००९ (विधानसभा निहाय मतदान)[७०]

| अ. न. | उमेदवाराचे नाव | पक्ष | दौंड १९९ | इंदापूर २०० | बारामती २०१ | पुरंदर २०२ | भोर २०३ | खडकवासला २०११ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संगिता श्रीराम भूमकर | अपक्ष | ५५७ | ९०२ | ११८० | ६७६ | ९६९ | ५०४ | ४७८८ |
| २. | सुरेश बाबूराव वीर | अपक्ष | ९९० | १३६४ | १८०५ | ९१५ | १९४४ | ५८१ | ७५९९ |
| ३. | शिवाजी जयसिंग कोकरे | अपक्ष | ४८२ | ५६५ | ७४३ | ५०० | ९४९ | २४५ | ३४८४ |
| ४. | योगेश सोनबा रणधीर | अपक्ष | ४११ | ४४६ | ६७२ | ३९० | १३०७ | ९५३ | ४१७९ |
| ५. | मृदालिनी जयराज काकडे | अपक्ष | ६९३ | ५५० | १६११ | ६३२ | १०१० | ४२३ | ४९१९ |
| ६. | भिमा आण्णा कडले | अपक्ष | २६९ | ३८९ | ४३७ | २१७ | ४७५ | १८२ | १९६९ |
| ७. | दिपक शंकर भापकर | अपक्ष | ८२६ | ९०१ | ११८९ | ९४० | १२४७ | १८९८ | ७००१ |
| ८. | तानतारपळे गोपाल यशवंतराव | अपक्ष | ३७६ | ६९४ | ५७७ | ३३९ | ८३३ | २३८ | ३०५७ |
| ९. | ताफ्या अलीनारायण शंकर | अपक्ष | १९९ | २६४ | ४८२ | ४१७ | ७१३ | ४१२ | २४८७ |
| १०. | घोरपडे सविता अशोक | अपक्ष | १८६ | २२० | ३२२ | १६९ | २५६ | १६८ | १३२१ |
| ११. | संपत मारूती ठक्कर | राष्ट्रीय समाजवादी पार्टी | १८०१ | ४५०२ | ७२९३ | ५७८ | ५०२ | २२६ | १४९०२ |
| १२. | सचिन विठ्ठल अहिरे | प्रबुध्द रिपब्लिकन पक्ष | २८९ | ३४० | ४२६ | २७७ | ४११ | २१५ | १९५८ |
| १३. | शेलार संगिता पांडुरंग | केएसएम | ३९६ | ३१५ | ५३९ | ३१४ | ६७५ | ४२४ | २६६३ |
| १४. | मायावती अमर चित्रे | भारतीय अल्पसंख्यांक सुरक्षा महासंघ | ६९५ | ८०१ | ११९६ | ५९० | १२५७ | ४६२ | ५००१ |
| १५. | सुप्रिया सुळे | रा.काँग्रेस | ६१२४६ | ८०६५१ | १ए+ ५ | ६४३१२ | ९६७३७ | ६२७९८ | ३६५७४४ |
| १६. | कांता जयसिंग नलवडे | भारतीय जनता पक्ष | २५६४५ | १४११५ | १५६६६ | ३७३५३ | २५३५६ | ३२५६० | १५०६९५ |
| १७. | कुदळेपाटील विवेक अनंत | बहुजन समाजवादी पार्टी बाबासाहेब | ५००२ | ८९८६ | ६१२६ | ३००९ | ३२२१ | ३४८८ | २९८४२ |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्व उमेदवारांचा तपशील दिलेला आहे. या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना दौंडमधून ६१२४६, इंदापूरमधून ८०६५१, बारामतीमधून ३६५७४४ , पुरंदरमधून ६४३१२, भोरमधून ९६७३७ तर खडकवासला ६२७९८ मते अशी एकूण मते मिळाली. BJP चे उमेदवार कांता नलवडे यांना दौंडमधून २५६४५, इंदापूरमधून १४११५, बारामतीमधून १५६६६, पुरंदरमधून ३७३५३, भोरमधून २५३५६ तर खडकवासला ३२५६० मते अशी एकूण १५०६९५ मते मिळाली. बीएसपीबीचे उमेदवार विवेक कुदळेपाटील यांना दौंडमधून ५००२, इंदापूरमधून ८९८६, बारामतीमधून ६१२६, पुरंदरमधून ३००९, भोरमधून ३२२१ तर खडकवासला ३४८८ मते अशी एकूण २९८४२ मते मिळाली. या निवडणुकीमध्ये रा.काँ.पक्षाच्या सुप्रिया सुळे यांना बारामतीतून पहिल्या पसंतीची मते मिळाली. भोरमधून दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. तर पुरंदर, खडकवासला व दौंडमधून अनुक्रमे तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकाची मते मिळाली. भाजपच्या कांता नलावडे यांना पहिल्या पसंतीची मते पुरंदरमधून मिळाली. खडकवासला, दौंड व भोरमधून अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या क्रमंकाची मते मिळाली. बीएसपीबीचे उमेदवार कुदळे विवेक यांना या दोन्ही उमेदवारांपेक्षा कमी मते मिळाली. या निवडणुकीत मतांचा विचार करता राष्ट्रवादी काँ.पक्षाच्या उमेदवार या पहिल्या क्रमांकावर, भाजपच्या कांता नलावडे दुसऱ्या क्रमांकावर व विवेक कुदळे पाटील तिसऱ्या क्रमांकावर राहिलेले आहेत. इतर अपक्ष उमेदवारांना अत्यल्प मते मिळाली.

पनुर्रचनेनंतर बारामती लोकसंख्या मतदारसंघात दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर आणि खडकवासला या विधानसभा मतदारसंघाचा समावेश केला आहे. ग्रामीण भाग या मतदारसंघात संख्येने जास्त आला आहे. नव्या मतदारसंघ पुर्नरचनेत भोर विधानसभा मतदारसंघातील मुळशी, वेल्हे, भोर हे तीन तालुके नव्याने बारामती लोकसभा मतदारसंघात सामील झाले आहेत त्यामुळे आदिवासी समाज या मतदारसंघात आला.

नव्या बारामती लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नियंत्रण असले तरी काही आव्हाने त्यांच्यापुढे आहेत ते म्हणजे इंदापूर व भोर तालुक्यावर काँग्रेसपक्षाचे नियंत्रण आहे. पुरंदर तालुक्यात राष्ट्रवादी, जनता दल व काँग्रेस अशा तीन गटात राजकीय ताकद विभागली

आहे. बारामती व दौंड तालुक्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नियंत्रण आहे मुळशी येथे शिवसेनेचा प्रभाव आहे. अर्थात या लोकसभा मतदारसंघात एकपक्षीय राजकीय प्रभाव दिसत नाही.[७१]

बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये पनुर्रचनेनंतर पुणे शहरालगतचा भाग समाविष्ट झाल्यामुळे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या मताधिक्यात फरक पडला असून या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव आहे. या मतदारसंघातर्गत येणाऱ्या सहा विधान सभा मतदारसंघापैकी काँग्रेसकडे दोन तर भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना व अपक्षाकडे प्रत्येकी एक मतदारसंघ आहे.[७२]

**शिरूर लोकसभा मतदारसंघ**

**शिरूर लोकसभा मतदारसंघांची मतदारसंघ पुनर्रचना –**

शिरूर लोकसभा मतदारसंघात जुन्नर, आंबेगाव, खेड–आळंदी, शिरूर, भोसरी व हडपसर या मतदारसंघात चार बदल झाले.

१) हा लोकसभा मतदारसंघ नव्याने तयार झाला आहे. परंतु जुन्या खेड लोकसभा मतदारसंघातील जवळजवळ ५० टक्के भाग एकत्र आला आहे. जुन्नर, आंबेगाव व खेड आळंदी हे तीन विधानसभा मतदारसंघ जुन्या खेड लोकसभा मतदारसंघातील आहेत.


२) भोसरी व शिरूर हा भाग जून्या बारामती लोकसभा मतदारसंघातील होता.

३) हडपसर हा भाग पुणे लोकसभा मतदारसंघात यापूर्वी होता.

४) जुन्नर व आंबेगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांच्यात स्पर्धा आहे.[७३]

**२००९ च्या शिरूर लोकसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व [७४]**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | शिवाजी आढळराव पाटील | शिवसेना | ४,८२,५६३ | ५७.५४ |
| २. | विकास विठोबा लांडे | रा.काँग्रेस | ३,०३,९५२ | ३६.२४ |
| ३. | यशवंत झगडे | बहुजन समाजवादी पार्टी | १७,४३९ | २.०८ |
| ४. | विलास महाजनी लांडे | अपक्ष | १४,१९६ | १.६९ |
| ५. | राम वर्मा डांबले | अपक्ष | ४,५४१ | ०.५४ |
| ६. | पल्लवी मोहन हर्णे | प्रभुदेवा रिपब्लिक पार्टी | ४,३३० | ०.५२ |
| ७. | श्रीपती ज्ञानोबा शेलार | रिपब्लिक प्रेसिडिअम पार्टी ऑफ इंडिया | ३,८९४ | ०.४६ |
| ८. | काळुराम रघुनाथ तापकीर | अपक्ष | २,९७८ | ०.३६ |
| ९ | चांगदेव नामदेव कारंडे | अपक्ष | २,२८७ | ०.२७ |
| १० | सुरेश मुलचंद कांकिरिया (मायर) | राष्ट्रीय समाज पक्ष | १,५३१ | ०.१८ |
| ११ | कोडिंबा गिमाजी अभंग | अपक्ष | २११७ | ०.३० |




वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण ११ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी खरी लढत शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच झाली. शिवसेनेचे उमेदवार शिवाजी आढळराव पाटील यांना ४८२५६३ मते मिळाली तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार विलास विठोबा लांडे यांना ३०३९५२ इतकी मते मिळाली. शिवसेनेचे शिवाजी आढळराव पाटील या मतदारसंघातून विजयी झाले. इतर अपक्ष उमेदवारांना अत्यल्प मते मिळाली.

**शिरूर लोकसभा मतदारसंघातील विधान सभानिहाय उमेदवाराला मिळालेले मतदान :–**

**शिरूर लोकसभा २००९ (विधानसभानिहाय मतदान)**[७५]

| अ. न. | उमेदवाराचे नाव | पक्ष | जुन्नर १९५ | आंबेगाव १९६ | खेड आळंदी १९७ | शिरूर १९८ | भोसरी २०७ | हडपसर १२०१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लांडे विलास म्हातबा | अपक्ष | ३३८६ | ३२०२ | २८५४ | २३७३ | ११७५ | १२०१ | १४१९१ |
| २. | राम धर्मा दांबले | अपक्ष | ९९७ | १०३५ | ९८२ | ७१० | ३५० | ४६७ | ४५४१ |
| ३. | काळुराम रघुनाथ तापकीर | अपक्ष | ७१२ | ६९७ | ५०६ | ४५९ | २३२ | ३७१ | २९७७ |
| ४. | कारंडे चांगदेव नामदेव | अपक्ष | ५२५ | ४६३ | ३२५ | ३६२ | २२१ | ३३१ | २२२७ |
| ५. | अभंग कोडिंबा भिमाजी | अपक्ष | २४२ | १९२ | १५१ | १७२ | १०५ | २१५ | १०७७ |
| ६. | सुरेश मूलचंद कांकरिया | राष्ट्रीयसमाज पक्ष | ३२५ | २३० | २०१ | २४६ | २०९ | ३२० | १५३१ |
| ७. | शेलार ज्ञानोबा श्रीपती | भारतीय रिपब्लिकन पक्ष | ७४२ | ८९३ | ६३१ | ९६७ | २५३ | ४०७ | ३८९३ |
| ८. | पल्लवी मोहन हरीष | प्रभुदेवा पब्लिक पार्टी | ७०६ | ८१६ | ६५४ | ७२६ | ४३९ | ९८९ | ४३३० |
| ९. | विलास विठोबा लांडे | रा.काँ. | २५६९२ | ५४६९१ | ४०४९७ | ५७५८८ | ४५३६८ | ५२६०६ | ३०२१३४ |
| १०. | झगडे यशवंत सिताराम | बहुजन समाजवादी पार्टी बाबासाहेब | १७७२ | १६९६ | १८२३ | २९९५ | ४५३७ | ४६०७ | १७४३० |
| ११. | आढळराव शिवाजी दत्तात्रय | शिवसेना | ८५४२३ | ९१३५८ | ९७३०८ | ७८३११ | ७२९०२ | ५६४१४ | ४८१७१६ |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्व उमेदवारांचा तपशील दिलेला आहे. या निवडणुकीमध्ये RSP उमेदवाराला जुन्नरमध्ये ३२५, आंबेगावमध्ये २३०, खेड आळंदीमध्ये २०१, शिरूरमध्ये २४६, भोसरीमध्ये २०९, तर हडपसरमध्ये ३२० अशी एकूण १५३१ मते मिळाली. परंतु एकूण मतांचा विचार करता त्यांना मते कमी पडली. त्यामुळे त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. याच निवडणुकीमध्ये प्रभूदेव पब्लिक पार्टीचे उमेदवार पल्लवी मोहन हरीष यांना जुन्नरमध्ये ७०६, आंबेगावमध्ये ८१६, खेड आळंदीमध्ये ६५४, शिरूरमध्ये ७२६, भोसरीमध्ये ४३९, तर हडपसरमध्ये ९८९ अशी एकूण ४३३० मते मिळाली असली तरी अपेक्षित मते न मिलल्याने अनामत रक्कम जप्त झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार विलस लांडे यांना जुन्नरमध्ये ५२६९२, आंबेगावमध्ये ५४६९१, खेड आळंदीमध्ये ४०४९७, शिरूरमध्ये ५७५८८, भोसरीमध्ये ४५३६८, तर हडपसरमध्ये ५२६०६ अशी एकूण ३०३४४२ मते मिळाली. शिवसेनेचे उमेदवार आढळराव शिवाजी यांना जुन्नरमध्ये ८५४२३, आंबेगावमध्ये ९१३५८, खेड आळंदीमध्ये ९७३०८, शिरूरमध्ये ७८३११, भोसरीमध्ये ७२९०२, तर हडपसरमध्ये ५६४१४ अशी एकूण ४८१७१६ मते मिळाली. तोच बीएसपीबी चे उमेदवार यांना जुन्नरमध्ये १७७२, आंबेगावमध्ये १६९६, खेड आळंदीमध्ये १८२३, शिरूरमध्ये २९९५, भोसरीमध्ये ४५३७, तर हडपसरमध्ये ४६०७ अशी एकूण १७४३० मते मिळाली.

या निवडणुकीत शिवसेनेचे आढळराव शिवाजी यांना खेड–आळंदीमधून पहिल्या पसंतीची मते मिळाली तर आंबेगाव व जुन्नरमधून दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विलास लांडे यांना शिरूरमधून पहिल्या पसंतीची मते मिळाली. तर आंबेगाव व जुन्नरमधून दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. बीएसपीबीचे उमेदवार सिताराम झगडे यांना या दोन उमेदवारांच्यापेक्षा कमी मते मिळाली व इतर अपक्ष उमेदवारांना अत्यल्प मते मिळाली.

शिरूर लोकसभा मतदारसंघात जुन्नर, आंबेगाव, खेड, आळंदी, शिरूर, भोसरी व हडपसर या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश केला आहे. हा लोकसभा मतदारसंघ नव्याने केला असला तरी यातील ५० टक्के भाग जुन्या खेड मतदारसंघातील आहे. शिरूर येथे पक्षांपेक्षा मराठा व धनगर या दोन जातीय पंत राजकीय स्पर्धा दिसते. असेच चित्र हडपसर येथे

मराठा व माळी यांच्यात पाहायला मिळते. थोडक्यात माळी, धनगर व मराठा या दोन जातीगटांमध्ये या मतदारसंघात राजकीय स्पर्धा लोकसभा पातळीवर राहील आहे.

शिरूर या लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थात काँग्रेस राष्ट्रवादीचे वर्चस्व असले तरी लोकसभा मतदारसंघात शिवसेनेने आपला प्रभाव निर्माण केला आहे. पुनर्रचनेनंतर नव्याने समाविष्ट असलेल्या भागातून निर्माण झालेल्या या मतदारसंघावर शिवसेनेने आपली पकड ठेवली आहे. या मतदारसंघातर्गत येणाऱ्या सहा विधानसभा मतदारसंघापैकी फक्त एकच शिवसेनेकडे मतदारसंघ असून राष्ट्रवादीकडे चार विधानसभा मतदारसंघ आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या तुलनेने भाजप सत्तेकडे स्थानिक सत्ता नसताना देखील लोकसभा निवडणुकीत मताधिक्य टिकवून ठेवले आहे.

**२००२ परिसीमन आयोगापूर्वी व पुनर्रचनेनंतरची पुणे जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघाबाबतची अनुमाने**

१) मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती व खेड असे तीन लोकसभा मतदारसंघ होते. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, शिरूर व मावळ असे चार लोकसभा मतदारसंघ करण्यात आला.

२) पुनर्रचनेपूर्वी अशोक मोहोळ यांचा मुळशी हा बालेकिल्ला खेड लोकसभा मतदारसंघात मोडत असल्याने या मतदारसंघातून तेच निवडून यायचे. परंतु पुनर्रचनेनंतर मुळशी विभाग हा बारामती लोकसभा मतदारसंघाशी जोडला अशोक मोहोळ यांचे राजकीय भवितव्य राहिलेले दिसून येते.

३) मावळ, शिरूर व बारामती या तिन्ही मतदारसंघात निम्माभाग शहरी आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील हितसंबंध जोडून घेणारे नेतृत्व या मतदारसंघात उभे राहण्याची शक्यता आहे.

४) मतदारसंघपुनर्रचनेपूर्वी मावळ हा मतदारसंघ पुणे जिल्ह्यातील आहे. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मावळ हा नवीन लोकसभा मतदारसंघ निर्माण झाल्यामुळे या मतदारसंघात जुन्या रायगड लोकसभा मतदारसंघातून पनवेल, कर्जत व उरण हे तीन विधान सभामतदारसंघ कमी होऊन ते मावळ लोकसभा मतदारसंघाला जोडले गेले. त्याचप्रमाणे जुन्या बारामती लोकसभा मतदारसंघातून चिंचवड व पिंपरी हे दोन मतदारसंघ मावळला जोडले गेल्याने एकूणच निम्मा मतदारसंघ पुणे जिल्ह्यातील तर निम्मा मतदार संघ

कोकणातील असा मावळ लोकसभा मतदारसंघ निर्माण झाला आहे. कोकणातील भाग पुणे जिल्ह्यात आल्यामुळे तळ कोकणाचे महत्त्व कमी झाले त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील शेकापची ताकद कमी झालेली आहे.

मावळ हा लोकसभा मतदारसंघ राजकीय, ऐतिहासिक व भौगोलिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण आहे. कधी काळी पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा प्रभाव होता. पुनर्रचनेनंतर मात्र या मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलली. २००९ च्या निवडणुकीमध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे गजानन बाबर विजयी झाले. या मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला धोबीपछाड व्हावे लागले आहे. एकूणच या मतदारसंघावर २००९ व २०१४ च्या निवडणुकीत शिवसेनेने आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे.

नव्याने निर्माण झालेल्या या मावळ लोकसभा मतदारसंघातील समस्यांचा विचार करता या मतदारसंघातील समस्यांचा विचार करता या मतदारसंघाचा अपेक्षित विकास होऊ शकला नाही या मतदारसंघामध्ये कोकणवासियांच्या समस्या वेगळ्या तर शहरी भागातील पिंपरी चिंचवडच्या समस्या वेगळ्या आहेत.

पिंपरीमधील लोकांना मुंबईला जाण्यासाठी लोणावळा रेल्वेच्या अतिरिक्त फेऱ्या सुरू केल्या नाहीत. तसेच रस्ता, वीज प्रश्न सोडविता आले नाहीत तर कोकणवासियांच्या असणाऱ्या समस्या, आदिवासी भागाच्या समस्या सोडविल्या गेल्या नाहीत.

५) पुनर्रचनेनंतर नव्याने तयार झालेल्या शिरूर लोकसभा मतदारसंघात जुन्या खेड लोकसभा मतदारसंघातील निम्मा भाग जुन्नर, आंबेगाव व खेड आळदी यामध्ये येतात तर भोसरी व शिरूर हा भाग जुन्या बारामती मतदारसंघातील तर हडपसर हा भाग जुन्या पुणे लोकसभा मतदारसंघातील आहे.

हा मतदारसंघ कॉंग्रेसचा बालेकिल्ला समजला जात होता. १९८९ चा अपवाद वगळता १९७७ पासून १९९९ पर्यत कॉंग्रेसचे वर्चस्व या मतदारसंघावर होते. अण्णासाहेब मगर, प्रा.रामकृष्ण मोरे, विकास नवले, निवृत्ती शेरकर, अशोक मोहोळ १९८९ साली जनता दलाचे किसनराव बाणखेले यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले होते. परंतु २००४ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केलेले आढळराव शिवाजी यांनी या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अशोक मोहोळ यांचा पराभव करून शिवसेनेचे वर्चस्व या मतदारसंघावर प्रस्थापित केले. तसेच पुनर्रचनेनंतर निम्मा

लोकसभा मतदारसंघ बाहेरचा असतानासुद्धा शिवाजी आढळराव यांनी २००९ च्या निवडणूकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस उमेदवार विलास लांडेयांचा पराभव केला.

एकेकाळी कॉंग्रेस–राष्ट्रवादीचा प्रभाव असणारा हा मतदारसंघ पुनर्रचनेनंतर सुद्धा शिवसेनेने या ठिकाणी आपला प्रभाव निर्माण केलेला दिसून येतो.

नव्याने निर्माण झालेल्या शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये विकास होऊ शकला नाही. या मतदारसंघातील बऱ्याच समस्या सुटू शकल्याा नाहीत. या मतदारसंघामध्ये वाहतूक कोंडीचा प्रश्न नेहमी भेडसावत आहे. पाणी टंचाई प्रश्न, स्वंयरोजगाराची वाणवा या मतदारसंघामध्ये आहे. प्रस्तावित चाकण विमानताळाबाबत प्रयत्न केले नाहीत. दुर्गम भागामध्ये सोयी–सुविधांच्या उणिवा आहेत. मोठे मोठे प्रकल्प या मतदारसंघात आणणे गरजेचे आहे.

६) पश्चिम महाराष्ट्रात लोकसभेच्या १२ मतदारसंघापैकी १० मतदारसंघ सर्वसाधारण वर्गासाठी व २ लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. पुनर्रचनेपूर्वी १ मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव होता तर ११ लोकसभा मतदारसंघ सर्व साधारण वर्गासाठी होते.

पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभेच्या ४ जागा असून या चारही जागा सर्वसाधारण वर्गासाठी खुल्या आहेत.

७) मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये दौंड, बारामती, खडकवासला, पुरंधर, पिंपरी–चिंचवड, हवेली व शिरूर यांचा समावेश होता. परंतु पुनर्रचनेनंतर या मतदारसंघामध्ये पिंपरी–चिंचवड शिरूर व हवेली हा शहरी भाग वगळण्यात आला व या मतदारसंघात भोर, वेल्हे, मुळशी हे या मतदारसंघात आल्यामुळे या मतदारसंघात ग्रामीण भाग जास्त आल्याने शहरी भागाचे निमंत्रण कमी झाले आहे.

नवीन बारामती लोकसभा मतदारसंघावर जरी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे वर्चस्व असले तरी सुद्धा त्यांना प्रामुख्याने पुरंधर, भोर व इंदापूर या तालुक्यांचे आव्हाने आहेत. कारण भोर व इंदापूर या तालुक्यात कॉंग्रेसचे नियंत्रण आहेत तर पुरंधरमध्ये कॉंग्रेस जनता दल, शिवसेना अशी राजकीय ताकद विभागलेली आहे.


लोकसभेच्या निवडणुकीच्यावेळी या तालुक्यातील कॉंग्रेस नेत्यांनी रा.कॉ.ला मदत करायची व विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी हे मतदासंघ कॉंग्रेससाठी सोडायचे अशी भूमिका राष्ट्रवादी कॉंग्रेसची राहिलेली आहे.

८) पुनर्रचनेपूर्वी पुणे लोकसभा मतदारसंघावर कॉग्रेसचे वर्चस्व होते. २००४ च्या निवडणुकीमध्ये सुरेश कलमाडी यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले होते. तर २००९ च्या निवडणुकीसुद्धा कॉग्रेसचे सुरेश कलमाडी विजयी झाले होते. मुंढवा हा भाग वगळण्यात आला व पुणे कॅन्टोन्नेट व वडगांवशेरी हा भाग नव्याने समावेश केल्याने सीमारेषेवरील हडपसरमधील काही भाग व मुंढवा ही वगळल्याने राष्ट्रवादी कॉग्रेसच पक्षाची ताकद कमी झाली. १९९८ मध्ये हडपसरचे विठ्ठल तुपे यांनी लोकसभेची निवडणुक राष्ट्रवादी पक्षाच्या तिकिटावर जिंकली होती.

**१)जुन्नर विधानसभा मतदारसंघ**

**१९६२ ते २००४ पर्यंतचा जुन्नर विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप**[७६]

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | विठ्ठलराव आवटे | १९६२ | प्रजा समाजवादी पक्ष | १७८२६ |
| २ | डी.आर.काकडे | १९६७ | काँग्रेस | १८४८६ |
| ३ | श्रीकृष्ण रणजित तांबे | १९७२ | काँग्रेस | २५५४२ |
| ४ | कृष्णराव मुंढे | १९७८ | काँग्रेस | २९०१७ |
| ५ | दिलीप ढमढेरे | १९८० | काँग्रेस | २८४८४ |
| ६ | वल्लभ भेनके | १९८५ | इंडियन काँग्रेस (सोशालिस्ट) | ४१८४० |
| ७ | वल्लभ भेनके | १९९० | काँग्रेस | ३७९५३ |
| ८ | बाळासो दांगट | १९९५ | शिवसेना | ५९५५२ |
| ९ | बाळासो दांगट | १९९९ | शिवसेना | ५२२२८४ |
| १० | वल्लभ भेनके | २००४ | रा.काँग्रेस | ७३८५५ |



वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६२ च्या विधानसभेच्या निवडणुकीत PSP पक्ष व १९८५ च्या निवडणुकीत .पक्षाचा अपवाद वगळला तर १९६७ ते १९९० पर्यंत काँग्रेस पक्षाचे नियंत्रण या मतदारसंघावर राहिलेल होते. १९९५ च्या विधान सभेच्या निवडणुकीमध्ये मात्र हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाकडून शिवसेनेकडे गेलेला दिसून येतो. या निवडणुकीमध्येशिवसेनेचे बाळासो दांगट ५९५५२ मतांनी निवडून आले.१९९९ च्या निवडणुकीमध्ये सुद्धा या पक्षाची व उमेदवाराची विजयाची पुनरावृत्ती झालेली दिसून येते. मात्र २००४ च्या निवडणुकीमध्ये पुन्हा हा मतदारसंघ शिवसेनेकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे गलेला होता. यानिवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वल्लभ बेनके हे ७३८५५ मतांनी निवडून आले होते.

जुन्नर विधानसभा मतदारसंघामध्ये मराठा जातीचा उमेदवार सातत्याने निवडून आलेला आहे.


**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा जुन्नर विधान सभा मतदारसंघ (१९५)**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर जुन्नर विधान सभा मतदारसंघात केवळ जुन्नर तालुक्यातील लोकसंख्येचा समावेश झाला. या मतदारसंघात नारायणगाव महसूल विभागाचा नव्याने समावेश केला. हा एकमेव बदल आहे. जुन्नर हा ग्रामीण विधानसभा मतदारसंघ आहे.

जुन्नर विधानसभा मतदारसंघातून मराठा जातीचाउमेदवार सातत्याने निवडून आलेला आहे. येथे केवळ १९७८ च्या निवडणुकीचा अपवाद होता. जुन्नर विधानसभा मतदारसंघा काँग्रेसकडून शिवसेनेकडे सरकला. (१९९५ व १९९९) शिवसेनेकडून हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे सरकला होता.(२००४)[७७]

**२००९ च्या जुन्नर विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[७८]–**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | आशा दत्तात्रय बुचके | शिवसेना | ७२९०२ | ४४.५८ |
| २ | वल्लभ दत्तात्रय बेनके | रा.काँग्रेस | ७९,३६० | ४८.५३ |
| ३ | सुनिल रघुनाथ भोसले | बहुजन समाजवादी पार्टी बाबासाहेब | १,२१४ | ०.७४ |
| ४ | ॲड.कृष्णा दशरथ लांडे | मनसे | ४,७४१ | २.९० |
| ५ | पोपट सखाराम राक्षे | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | १,४१३ | ०.८६ |
| ६ | सुखदेव गणपत खरात | अपक्ष | ४९४ | ०.३० |
| ७ | वसंत सावळरेल चिलीप | अपक्ष | १,३२४ | ०.८१ |
| ८ | शंकर तुकाराम शिंदे | अपक्ष | २,०८८ | १.२८ |




२००९ च्या जुन्नर विधानसभा निवडणुकीमध्ये आठ उमेदवार उभे होते. त्यापैकी तीन उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी लढत ही शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये झालेली दिसून येते. कारण मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार निवडून गेलेला होता. या निवडणुकीत आशा बुचके (शिवसेना) यांना ९२९०२ मते मिळाली. बेनके हे ७ हजार मतांनी निवडून आले.

**२००९ च्या जुन्नर विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी –**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | झालेले मतदान | | |
|---|---|---|---|---|
| जुन्नर विधानसभा | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| | २५८०९२ | ८७२७५ | ७५६५६ | ६३.१२ |

२००९ च्या जुन्नर विधानसभा मतदारसंघामध्ये २५८०९२ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १६२९३१ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८७२७५ व ७५६५६ स्त्री मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी जुन्नर विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या (२००४) २०७३२९ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १०४१५७ तर स्त्रीमतदारांची संख्या १०३१७२ इतकी होती. पुनर्रचनेनंतर (२००९) जुन्नर विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या २५८०९२ इतकी होती. त्यापैकी १३१९६१ पुरुष मतदार १२६१३१ तर स्त्री मतदार इतके होते.


जुन्नर हा ग्रामीण विधानसभा मतदारसंघ आहे. १९७८ चा अपवाद वगळता या मतदारसंघातून मराठा जातीचे उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत. १९९५ व १९९९ ला हा मतदारसंघ शिवसेनेकडे सरकला. २००४ च्या निवडणुकीत तो राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे सरकला. दळणवळणाच्या सुविधामुळे मुंबई व ठाणे या शहरांशी संबंध आल्याने राजकीय घडामोडींचा जुन्नरच्या राजकारणावर परिणाम झालेला दिसून येतो.[७९]

पुनरर्चनेनंतर या मतदारसंघामध्ये फारसा बदल झाला नाही. तरीसुद्धा या मतदारसंघातून शिवसेनेने २००९ च्या निवडणुक़ीत आशा बुचके यांना उमेदवारी दिली होती. राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून वल्लभ बेनके हे उभे राहिले होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिवसेना यांच्या अटीतटीच्या लढतीत ७००० एवढ्या कमी मताधिक्याने वल्लभ बेनके विजयी झाले.

**२)आंबेगाव विधानसभा मतदारसंघ (१९६)**

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | अण्णासाहेब आवटे | १९६२ | कॉँग्रेस | २२१११ |
| २ | डी.जी.वळसे | १९६७ | कॉँग्रेस | २५५५३ |
| ३ | कृष्णराव भेनके | १९७२ | अपक्ष | ३८९०८ |
| ४ | काळे बी.डी | १९७८ | कॉँग्रेस | २४५४२ |
| ५ | कृष्णराव भेनके | १९८० | जनता पार्टी | २१०५६ |
| ६ | कृष्णराव भेनके | १९८५ | जनता पार्टी | ३५२९७ |
| ७ | दिलीप वळसे पाटील | १९९० | कॉँग्रेस | ३०३५४ |
| ८ | दिलीप वळसे पाटील | १९९५ | कॉँग्रेस | ५७०१४ |
| ९ | दिलीप वळसे पाटील | १९९९ | रा.कॉँग्रेस | ५००५२ |
| १० | दिलीप वळसे पाटील | २००४ | रा.कॉँग्रेस | ८१८३० |

**१९६२ ते २००४ पर्यंतचा आंबेगाव विधान सभा मतदारसंघाचा दृष्टीक्षेप–**[८०]



वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९८० व १९८५ च्या निवडणुकीत पक्षाचा अपवाद सोडला तर १९६२ नंतर १९९५ पर्यंत या आंबेगाव मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. परंतु १९९८ साली शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केल्यानंतर १९९९ च्या निवडणुकीत या मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार दिलीप वळसे पाटील हे ५००५२ मतांनी विजयी झाले व २००४ च्या निवडणुकीत पक्ष व उमेदवाराची पुनरावृत्ती होऊन दिलीप वळसे पाटील हे ८१८३० मतांनी निवडून आले.

या मतदारसंघामध्ये मराठा जातीचे उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा आंबेगाव विधानसभा मतदारसंघ (१९६)**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर आंबेगाव विधानसभा मतदारसंघात आंबेगाव तालुक्याखेरीज शिरूर तालुक्यातील पाबळ, ढाकळी, हाजी व शिरूर या महसूल मंडळाचा समावेश केला गेला. या विधानसभा मतदारसंघात दोन बदल झाले.

१) जुन्नर तालुक्यातील नारायणगाव महसूल विभाग वगळला.


२) शिरूर तालुक्यातीलतीन महसूल मंडळे नव्याने सामील केली. हा मतदारसंघ ग्रामीण आहे.

आंबेगाव विधानसभा मतदारसंघातून मराठा जातीचे उमेदवार सातत्याने निवडून आले. हा मतदारसंघ काँग्रेसकडून जनता दलाकडे (१९८०, १९८५), जनता दलाकडून काँग्रेसकडे (१९९० व १९९५ ) व काँग्रेसकडून राष्ट्रवादी काँग्रेसकडे (१९९९ व २००४) सरकला होता.[८१]

**२००९ च्या आंबेगाव विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–[८२]**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | कल्पना शिवाजी आढळराव | शिवसेना | ६२,५०२ | ३६.४१ |
| २ | आनंद गुणाजी सोनवणे | बहुजन समाजवादी पार्टी | १,४३९ | ०.८४ |
| ३ | दिलीप दत्तात्रय वळसे पाटील | रा.काँग्रेस | ९९,८५१ | ५८.१७ |
| ४ | परमेश्वर महादू चौधरी | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | १,४०० | ०.८२ |
| ५ | दिरंगे संदिप दशरथ | मनसे | १,२३३ | ०.७२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | तात्यासो बापुसो लोखंडे | अपक्ष | ३६४ | ०.२१ |
| ७ | भास्कर नामदेवराव घोलप | अपक्ष | १,०७९ | ०.६३ |
| ८ | झाफर अब्बास महम्मद अली सय्यद | अपक्ष | ३९० | ०.२३ |
| ९ | सुरेश जयराम भोर | अपक्ष | ८३६ | ०.४९ |
| १० | सुरेश लक्ष्मण भोर | अपक्ष | ६४९ | ०.३८ |
| ११ | सुहास चंद्रकांत सहाणे | अपक्ष | १,९०६ | ०.११ |




२००९ च्या निवडणुकीमध्ये एकूण अकरा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. यापैकी पाच उमेदवार अपक्ष होते. या निवडणुकीमध्ये खरी लढत शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये पाहावयास मिळाली. कारण २००४ च्या निवडणुका हा मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे होता. परंतु या निवडणुकीत देखील राष्ट्रवादी कॉंग्रेसने आपली जागा कायम राखली. या ठिकाणी शिवसेनेच्या कल्पना शिवाजी आढळराव यांना ६२५०२ मते पडली तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे दिलीप वळसे पाटील यांना ९१,८५१ मते पडली. दिलीप वळसे पाटील हे ३७००० मतांनी निवडून आले.

**२००९ च्या आंबेगाव विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी –**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| आंबेगाव विधानसभा मतदारसंघ | २४९२१८ | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| | | ९१६१६ | ७९४४२ | ६८.६३ |

२००९ च्या आंबेगाव विधानसभा मतदारसंघामध्ये २४९२१८ मतदार आहेत.त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १७१०५८ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ९१६११६ व ७९४४२ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.


मतदारसंघपुनर्रचनेपूर्वी आंबेगाव विधान सभा मतदारसंघाची मतदारांची संख्या ही १७६५५८९ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ८५७२२३ व स्त्री मतदार ८४८६६ इतके होते. पुनरर्चनेनंतर या विधानसभा मतदारांची संख्या १७१०५८ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ९१६१६ व स्त्री मतदार ७९४४२ इतके होते.

मतदारसंघपुनर्रचनेनंतर आंबेगाव विधानसभा मतदारसंघामध्ये मुळशी तालुक्याचा काही भाग येत असल्याने आंबेगाव तालुक्याचे राजकारण करणाऱ्या नेतृत्वाला शिरूरचा सुद्धा विचार करावा लागला. त्याप्रमाणे २००४ च्या (पुनर्रचनेपूर्वी) निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दिलीप वळसेपाटील व शिवसेनेचे अविनाश रहाणे यांच्यात लढत झाली व या निवडणुकीतमध्ये दिलीप वळसेपाटील विजयी झाले. मात्र पुनर्रचनेनंतर–२००९ च्या निवडणुकीत या मतदारसंघातून शिवसेनेकडून शिवाजी आठळराव पाटील यांची पत्नी कल्पना आठळराव पाटील यांना उभे करण्यात आले. शिरूरचा भाग या मतदारसंघात येत असल्यामुळे व शिरूरमध्ये भाजपाचा प्रभाव असल्याने या मतदारसंघातून निवडणुक लढविली परंतु याच मतदारसंघातून मागील निवडणुकीत निवडून गेलेल्या दिलीप वळसे पाटील यांना पुनर्रचनेचा थोडा परिणाम यामध्ये जाणवला मताधिक्य कमी झाले तरी ते या ठिकाणी पुन्हा निवडून आले.

### ३) खेड आळंदी विधानसभा मतदारसंघ [८३]

### १९६२ ते २००४ पर्यंतचा खेड आळंदी विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप–

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एम.साळीकर | १९६७ | काँग्रेस | ३०४८६ |
| २ | साहेबराव पाटील | १९७२ | काँग्रेस | ३८७४ |
| ३ | राम जनार्दन कांडगे | १९७८ | काँग्रेस | २३६४६ |
| ४ | राम जनार्दन कांडगे | १९८० | काँग्रेस | १८९६४ |
| ५ | नारायण पवार | १९८५ | आयसीएस | ४८७५८ |
| ६ | नारायण पवार | १९९० | काँग्रेस | ५१०७२ |
| ७ | नारायण पवार | १९९५ | काँग्रेस | ६०४३६ |
| ८ | नारायण पवार | १९९९ | रा.काँग्रेस | ४७९२५ |
| ९ | दिलीप मोहिते | २००४ | रा.काँग्रेस | ७६७६९ |





### मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा खेड–आळंदी विधानसभा मतदारसंघ (१९७)

मतदारसंघपुनर्रचनेनंतर खेड तालुक्याचा खेड आळंदी विधानसभा मतदारसंघात समावेश केला आहे. या मतदारसंघात फेरबदल झाला नाही. आळंदी चाकण व राजगुरूनगर नगरपालिका (खेड) हा भाग शहरी आहे. परंतु मतदारसंघात ग्रामीण २,८६,३३३ लोकसंख्येचे (८३.४) वर्चस्व आहे. त्यामुळे या मतदारसंघाचे स्वरूप ग्रामीण आहे.

खेड–आळंदी विधानसभा मतदारसंघातून माळी (१९७८ व १९८० ) व मराठा (१९९५ ते २००४) समाजांचे उमेदवार निवडून आले होते. काँग्रेस पक्षाचे मतदारसंघावर नियंत्रण होते. हा मतदारसंघ काँग्रेसकडून राष्ट्रवादी काँग्रेसकडे सरकला.(१९९९,२००४)

**२००९ च्या खेड आळंदी विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | अशोक श्रीपती खांडेगरड | शिवसेना | ४३,९३४ | २६.२१ |
| २ | दिलीप दत्तात्रय मोहिते | रा. काँग्रेस | ६४,७२६ | ३८.६१ |
| ३ | मनोहर पोपट भालेराव | बहुजन समाजवादी पार्टी | १,७३४ | १.०३ |
| ४ | स्वाती भालचंद्र निळेगावकर | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | १,५३८ | ०.९२ |
| ५ | राजेश वसंतराव गावळेकर | अपक्ष | १५,१७० | ९.०५ |
| ६ | रामदास नामदेव ठाकूर | अपक्ष | ४०,५२८ | २४.१८ |




या निवडणुकीत एकूण सहा उमेदवार उभे होते. त्यापैकी २ उमेदवार अपक्ष होते. या अपक्षापैकी एक व शिवसेना व रा. काँग्रेस पक्ष या तिघांत खरी लढत झाली. या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार अशोक श्रीपती खांडेगरड यांना ४३,९३४ मते पडली. राष्ट्रवादीकाँग्रेस पक्षाचे दिलीप दत्तात्रय मोहिते यांना ६४७२६ मते पडली तर या दोन्ही पक्षाच्या मतांची विभागणी करणारे अपक्ष उमेदवार रामदास नामदेव ठाकूर यांना ४०,५२८ मते पडली याचा तोटा शिवसेनला झाला. तसेच याचा फायदा रा. काँग्रेस पक्षाला होऊन त्या ठिकाणी रा. काँग्रेस पक्षाचे उमेदवार हे २१,२०० मतांनी विजयी झाले.

**२००९ च्या खेड–आळंदी विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| खेड–आळंदी | २५९७५१ | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| | | ९२२९५५ | ७४०९६ | ६४.३१ |

२००९ च्या खेड– आळंदी विधानसभा मतदारसंघामध्ये २५९७५१ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १६७०५१ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ९२२९५५ व ७४०९६ स्त्री मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.


मतदारसंघपुनर्रचनेपूर्वी खेड आळंदी मतदारसंघाची एकूण मतदार संख्या २००४ साली २३२६८१ इतकी होती त्यापैकी पुरुष मतदार ११५७२८ व स्त्री मतदार ११२९५३ इतके होते. पुनर्रचनेनंतर खेड हा भाग आळंदीला जोडल्याने यामध्ये चाकण व राजगुरूनगर समावेश केलेला आहे. त्यामुळे या मतदारसंघाची २००९ ची मतदार संख्या ही वाढलेली आहे. यामध्ये या मतदारसंघाची एकूण संख्या २५२२५२ इतकी आहे. त्यापैकी १३१४५५ पुरुष मतदार व स्त्रीमतदार १२०७९७ इतके आहे.

पुनर्रचनेपूर्वी २००४ च्या विधान सभेच्या निवडणुकीच्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दिलीप दत्तात्र्य मोहिते व अपक्ष उमेदवार नारायण बाबुराव पवार यांच्यात लढत झाली. परंतु यामध्ये दिलीप मोहिते विजयी झाले. १९७८ ते १९९५ पर्यत या मतदारसंघावर कॉंग्रेसचे वर्चस्व होते. परंतु नंतर हा मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे वळाला या मतदारसंघात प्रामुख्याने मराठा व माळी अशी मताची विभागणी झाली. पुनर्रचनेनंतर २००९ च्या निवडणुकीत शिवसेनेकडून अशोक खंडेगल यांना या मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली परंतु फारसा प्रभाव पडला नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दिलीप मोहिते पुन्हा या मतदारसंघातून निवडून आले.

### ४) शिरूर विधानसभा मतदारसंघ

### १९६२ ते २००४ पर्यंतचा शिरूर विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप–[८४]

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | रावसाहेब पवार | १९६२ | काँग्रेस | १२३९५ |
| २ | एस . डी.मोरे | १९६७ | राष्ट्रीय समाजवादी पक्ष | १६८१४ |
| ३ | पोपटराव कोकरे | १९७२ | काँग्रेस | २१९२४ |
| ४ | भाबुराव दौंडकर | १९७८ | जनता पार्टी | ३२७२७ |
| ५ | सुर्यकांत पलांडे | १९८० | काँग्रेस.. | ३८६४८ |
| ६ | बापूसाहेब थिटे | १९८५ | इंडियन काँग्रेस(सोशालिस्ट) | ३६९९४ |
| ७ | बापूसाहेब थिटे | १९९० | काँग्रेस | ३६४९९ |
| ८ | पोपट गावडे | १९९९ | रा .काँग्रेस | ४१९१७ |
| ९ | बाबुराव पाचर्णे | २००४ | रा .काँग्रेस | ७०६०१ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६७,१९७८ व १९८५ च्या निवडणुकीचा अपवाद सोडला तर १९६२ ते १९९० पर्यंत या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचेच नियंत्रण होते. १९९९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नियंत्रण या मतदारसंघावर राहिलेले आहे. १९९९ च्या निवडणुकीत पक्ष व उमेदवाराची पुनरावृत्ती होऊन दिलीप वळसे पाटील हे ८१८३० मतांनी निवडून आले.

या मतदारसंघामध्ये मराठा जातीचे उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पोपट गावडे यांना ४१९५७ मते मिळून विजयी झाले. २००४ च्या निवडणुकीत

याच पक्षाचे उमेदवार बाबुराव पाचर्णे यांना ७०६०१ मते मिळून ते विजयी झाले. या मतदारसंघात मराठा व धनगर (१९९५ १९९९) अशा दोन समाजाचे उमेदवार निवडून आले होते. या मतदारसंघात मराठा व धनगर अशा दोन समाजातच राजकीय स्पर्धा राहिली होती.[८५]

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा शिरूर विधान सभा मतदारसंघ (१९५)**

मतदारसंघपुनर्रचनेनंतर शिरूर विधान सभा मतदारसंघात केवळ शिरूर व हवेली तालुक्यातील गावांचा समावेश केला आहे.शिरूर तालुक्यातील न्हावरे, वडगांव, तळेगाव ढमढेरे, शिरूर व करगावणे या राजस्व मंडळाचा समावेश केला आहे. तर हवेली तालुक्यातील वाघोली व उरळी कांचन या दोन राजस्व मंडलांचा समावेश केला आहे. या मतदारसंघात मुख्य तीन बदल झाले.

१) पाबळ टाकळी हाजी, शिरूर ही तीन म्हसूल मंडले नव्या मतदारसंघातून वगळली.

२) हवेली तालुक्यातील वाघोली आणि उरळी कांचन ही नवीन महसूल मंडले सामील झाली.


३) हा मतदारसंघ निम शहरी स्वरूपाचा तयार झाला आहे.

या मतदारसंघात मराठा व धनगर (१९९५–१९९९)अशा दोन समाजाचे उमेदवार निवडून आले होते. हा मतदारसंघ जनता पक्षाकडून काँग्रेसकडे (१९९९) व राष्ट्रवादी काँग्रेसकडून भाजपकडे (२००४) सरकला होता. या मतदारसंघात मराठा व धनगर अशा दोन समाजात राजकीय स्पर्धा राहिली होती.

**२००९ च्या शिरूर विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–[८६]**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | मुरलीधर विठ्ठल अवचट | बहुजन समाजवादी पार्टी | १७३९ | ०.९५ |
| २ | अशोक रावसाहेब पवार | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५३९३६ | २९.४३ |
| ३ | मंगलदास विठ्ठल बांदल | भारतीय जनता पक्ष | ३७९९६ | २०.७३ |
| ४ | विकास सदाशिव लवांडे | समाजवादी पक्ष | २४८६ | १.३६ |
| ५ | प्रो.के.डी.कांचन | अपक्ष | १३६४५ | ७.४५ |
| ६ | निवृत्त गणपत गवारी | अपक्ष | २०५२१ | ११.२० |
| ७ | धनंजय नानासो चौधरी | अपक्ष | ५६२ | ०.३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | सुमिता संपतराव दौंडकर | अपक्ष | ७५० | ०.४१ |
| ९ | बाबुराव संपतराव पाचुर्णे | अपक्ष | ४६३६९ | २५.३० |
| १० | रामकृष्ण रखमाजी बीडगर | अपक्ष | ७४८ | ०.४१ |
| ११ | माणिक संभाजी मुंडगे | अपक्ष | ६७७ | ०.३७ |
| १२ | लक्ष्मण बापूराव येळे | अपक्ष | २५२७ | १.३८ |
| १३ | शरद कृष्णानंद गार्डे | अपक्ष | १३१४ | ०.७२ |




२००९ च्या निवडणुकीमध्ये एकूण १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. त्यापैकी ९ उमेदवार अपक्ष होते. या निवडणुकीमध्ये खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसचे तिकीट न मिळालेले अपक्ष उमेदवार बाबुराव पाचुर्णे यांच्यात होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे अशोक पवार यांना ५३,९३६ मते मिळाली. भाजपच उमेदवार मंगलदास विठ्ठल बांदल यांना ३७,९९६ इतकी मते मिळाली तर अपक्ष उमेदवार बाबुराव पाचुर्णे यांना ४६,३६९ मते मिळाली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार अशोक रावसाहेब पवार हे १६०० मतांनी निवडून आले. या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपली जागा कायम राखली. २००९ च्या शिरूर विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | झालेले मतदान | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| शिरूर | २८५१२९ | १००९८१ | ८१५५४ | ६४.०१ |

२००९ च्या शिरूर विधानसभा मतदारसंघामध्ये २८५१२९ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १८२५३५ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष १००९८१ व ८१५५४ स्त्री मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.


मतदारसंघपुनर्रचनेपूर्वी शिरूर विधान सभा मतदारसंघाची (२००४) मतदार संख्या एकूण २०९४८० इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १०७५६६ व स्त्रीमतदार १०१९१४ इतकी होती. पुनर्रचनेनंतर शिरूर विधानसभा मतदारसंघात हवेली तालुक्यात काही भागांचा समावेश केल्याने या मतदारसंघाची मतदारसंख्या केल्याने या मतदारसंघाची मतदारसंख्या वाढलेली आहे. त्यानुसार या मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या २७३९९१ इतकी आहे. त्यापैकी पुरुष मतदार १४३६७० व स्त्रीमतदार १३०५२१ इतकी आहे.

शिरूर हा मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी (२००४)च्या निवडणुकीमध्ये भाजपकडे होता. या निवडून आले होते. २००९ च्या निवडणुकीमध्ये भाजपकडे होता. या निवडणुकीमध्ये बाबुराव पाचर्णे निवडूण आले होते.२००९ च्या निवडणुकीत मात्र भाजपला आपली जागा राखता आली नाही. या निवडणुकीमध्ये भाजपाचे मंगलदास विठ्ठल बौदल हे उभे होते तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अशोक रावसाहेब पवार यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अशोक पवार हे विजयी झाले व पुन्हा शिरूर मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेसने कब्जा मिळविला.

### ५) दौंड विधानसभा मतदारसंघ (१९९)

१९६२ ते २००४ पर्यंतचा दौंड विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप[८७]

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | राजाराम ताकवणे | १९७८ | जनता पार्टी | २६९४० |
| २ | कृष्णराव अडागळे | १९८० | कॉंग्रेस | २९९४४ |
| ३ | उषादेवी जगदाळे | १९८५ | इंडियन कॉंग्रेस(सोशालिस्ट) | ३३४०८ |
| ४ | सुभाष कुल | १९९० | अपक्ष | ५९९८२ |
| ५ | सुभाष कुल | १९९५ | कॉंग्रेस | १२१९१४ |
| ६ | सुभाष कुल | १९९९ | रा.कॉंग्रेस | ८२६ |
| ७ | रंजना कुल | २००४ | रा.कॉंग्रेस | १०२२६४ |
| ८ | रमेश थोरात | २००९ | अपक्ष | ८५७६४ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९७८,१९८५ व १९९० च्या निवडणुकीचा अपवाद सोडला तर (१९८०–१९९५) ला काँग्रेस पक्षाचे नियंत्रण या मतदारसंघावर होते. १९९९ च्या व २००४ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले होते. १९९९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सुभाष कुल हे ८२६५५ मते पडून विजयी झाले तर २००४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रंजना कुल यांना १०२२६४ मते पडून विजयी झाले होते.

या मतदारसंघात मराठा जाती गटातील उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे मतदारसंघावर नियंत्रण दिसते. परंतु काँग्रेस व राष्ट्रवादी खेरीज ही राजकीय ताकद दिसते.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा दौंड विधान सभा मतदारसंघ –**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर दौंड विधानसभा मतदारसंघात केवळ दौंड तालुक्यातील लोकसंख्येचा समावेश केला आहे. याविधानसभा मतदारसंघात प्रमुख दोन बदल झाले.–


१) सुपा हे बारामती तालुक्यातील महसूल मंडल नव्या विधानसभा मतदारसंघातून वगळले गेले.

२) दौंड विधानसभा मतदारसंघावरील बारामती तालुक्याचे नियंत्रण कमी झाले. या मतदारसंघाचे स्वरूप ग्रामीण आहे.

या मतदारसंघात मराठा जाती गटातील उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत (११९७८ ते २००४) या विधानसभा मतदारसंघात जनता पक्ष (१९७८) काँग्रेस (१९८०, १९८५, व १९९५) अपक्ष (१९९०) व राष्ट्रवादी (१९९९ व २००४) यांचे उमेदवार निवडून आले होते.[८८]

**२००९ च्या दौंड विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–[८९]**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | अजित गुलाब ठोकळे | बहुजन समाज पार्टी | १६०० | ०.९१ |
| २ | वासुदेव शंकर काळे | भारतीय जनता पक्ष | ७०६३ | ४.०२ |
| ३ | ॲड.राहुल सुभाष कुल | रा.काँग्रेस | ६८३२२ | ३८.८४ |
| ४ | भानुदास सुरेष शिंदे | स्वाभिमानी पक्ष | २३९२ | ३.६ |
| ५ | प्रल्हाद दगडू महाडीक | अपक्ष | ७४० | ०.४३ |
| ६ | बाळासो तात्याबा म्हस्के | अपक्ष | ३९९ | ०.२३ |
| ७ | देवाई भिका भोसले | अपक्ष | १४५२ | ०.८३ |
| ८ | मंगल दत्ता वाघ | अपक्ष | ५५५३ | ३.१६ |
| ९ | रमेशराव किसन थोरात | अपक्ष | ८५७६४ | ४८.७५ |
| १० | संजय अंबादास कांबळे | अपक्ष | २६२० | १.४९ |




२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघामध्ये एकूण दहा उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. यापैकी सहा उमेदवार हे पक्ष व अपक्ष उमेदवार यांच्यात खरी लढत झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार ॲड. राहुल सुभाष कुल यांना ६९,३२२ मते पडली तर अपक्ष उमेदवार रमेश किसन थोरात यांना ८५,७६४ मते पडली व थोरात हे १७००० मतांनी निवडून आले.

**२००९ च्या दौंड विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| दौंड विधानसभा | २५४४७१ | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| | | ९३५५४ | ८१३९३ | ६८.७४ |

२००९ च्या दौंड विधानसभा मतदारसंघामध्ये २५४४७१ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १७४९४७ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ९३५५४ व स्त्री ८१३९३ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ रचनेपूर्वी दौंड विधानसभा मतदारसंघाची लोकसंख्या २७३७९९ इतकी होती. त्यावेळी पुरुष मतदार १४१६५२ व स्त्री मतदार १३२१४७ इतके होते.


मतदार संघ पुनर्रचनेनंतर या मतदारसंघाची लोकसंख्या २४२२९९ इतकी होती त्यापैकी पुरुष मतदारांची संख्या १२५४०० व स्त्री मतदारांची लोकसंख्या ही ११६८९९ इतकी होती.

१९७८ ते २००४ या कालावधीत मराठा जातीगटातील उमेदवार सातत्याने निवडून येत आहेत. २००४ च्य निवडणूकीमध्ये राष्ट्रवादी कॉग्रेसच्या रंजना सुगाण कुल व रा. कॉग्रेसचे बंडखोर अपक्ष उमेदवार रमेश थोरात यांनी ही निवडणुक लढवली या निवडणुकीमध्ये रजंना कुल या विजयी झाल्या. मात्र पुनर्रचनेनंतरच्या २००९ च्या निवडणुकीत रमेश किसन थोरात हे पुन्हा निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिले त्यांच्याविरोधात रंजना कुल यांचा मुलगा राहुल कुल उभे राहिले परंतु रमेश थोरात हे निवडणुकीत विजयी झाले त्यांनी मागील निवडणुकीच्या पराभवाचा वचपा काढला.

## ६) इंदापूर विधानसभा मतदारसंघ

### १९६२ ते २००४ पर्यंतचा इंदापूर विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप–[१०]

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | एस.बी.पाटील | १९६२ | काँग्रेस | १८६७६ |
| २ | एस.बी.पाटील | १९६७ | काँग्रेस | ३२४२० |
| ३ | शंकरराव बी.पाटील | १९७२ | काँग्रेस | ४२२९४ |
| ४ | शंकरराव बी.पाटील | १९७८ | काँग्रेस | ४०३३२ |
| ५ | राजेंद्र घोलप | १९८० | काँग्रेस(आय) | ४१६१९ |
| ६ | गणपत सिताराम पाटील | १९८५ | काँग्रेस | ४११ |
| ७ | गणपत सिताराम पाटील | १९९० | काँग्रेस | ६२६३८ |
| ८ | हर्षवर्धन पाटील | १९९५ | काँग्रेस | ५९१२५ |
| ९ | हर्षवर्धन पाटील | १९९९ | काँग्रेस | ६४८४० |
| १० | हर्षवर्धन पाटील | २००४ | काँग्रेस | ९४४०९ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६२ ते २००४ पर्यंतच्या विधानसभेच्या निवडणुकीत या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचेच नियंत्रण होते. या विधानसभा मतदारसंघात मराठा (१९७८, १९८०, १९९५, १९९९,२००४) व धनगर (१९८५ व १९९०) अशा दोन जातीगटातील उमेदवार निवडून आले होते. मराठा व धनगर अशा दोन जातीगटातील राजकीय स्पर्धा या मतदारसंघाच्या राजकारणाला दिशा देते. सन २००४ नंतर काँग्रेस -मराठा व राष्ट्रवादी काँग्रेस -धनगर असे विभाजन झाल्याचे दिसते.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा इंदापूर विधान सभा मतदारसंघ –**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर विधानसभा मतदारसंघात केवळ इंदापूर तालुक्याचा समावेश विधान सभा मतदारसंघात केला आहे. या विधानसभा मतदारसंघात बदल झाल नाही.

या मतदारसंघात काँग्रेस व राष्ट्रवादी अशी स्पर्धा आहे.विधानसभा मतदारसंघात मराठा (१९७८, १९८०, १९९५, १९९९,२००४) व धनगर (१९८५ व १९९०) अशा दोन जाती गटातील उमेदवार निवडून आले होते. या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. (१९७८ ते १९९०) काँग्रेसकडून तो अपक्षाकडे सरकला. २००४ नंतर काँग्रेस मराठा व राष्ट्रवादी, काँग्रेस -धनगर असे विभाजन झाल्याचे दिसते.

**२००९ च्या इंदापूर विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व**[११]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | हर्षवर्धन शहाजी पाटील | काँग्रेस | ९२,७२९ | ४८.६३ |
| २ | भीमराव माणिकराव भोसले | शिवसेना | ४१०६ | २.१५ |
| ३ | शाकील मकबूल सय्यद | बहुजन समाजवादी पार्टी | १७४२ | ०.९ |
| ४ | वसंत गणपत मोरे | समाजवादी पार्टी | २५३ | ०.१३ |
| ५ | भिमराव अण्णा कादळे | अपक्ष | २५५ | ०.१३ |
| ६ | विकास भिमराव गायकवाड | अपक्ष | ३९२ | ०.२१ |
| ७ | गिरिष मदन पाटील | अपक्ष | ४०० | ०.२१ |
| ८ | भाऊराव राजाराम झेंडे | अपक्ष | ९३९ | ०.४९ |
| ९ | दत्तात्रय विठोबा भरणे | अपक्ष | ८४७६९ | ४४.४५ |
| १० | सुधीर पोळ | अपक्ष | ७१५ | ०.३७ |
| ११ | शरद उत्तम भोसले | अपक्ष | ३०१ | ०.१६ |
| १२ | मच्छिंद्र गणपत मदने | अपक्ष | ४५२ | ०.२४ |
| १३ | महादेव भगवान लोखंडे | अपक्ष | ९९८ | ०.५२ |
| १४ | शिवाजीराव वामन मखरे | अपक्ष | २६३४ | १.३८ |

२००९ च्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघामध्ये एकूण १४ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. यापैकी दहा उमेदवार हे अपक्ष होते. परंतु खरी लढत काँग्रेस व अपक्ष उमेदवार यांच्यात झाली. काँग्रेसचे हर्षवर्धन शहाजी पाटील यांना ९२,७२९ मते पडली तर अपक्ष उमेदवार असलेले दत्तात्रय विठोबा भरळे यांना ८४,७६९ मते पडली. काँग्रेसचे हर्षवर्धन पाटील हे भरणे यांचेपेक्षा ८००० मते जास्त पडून ते निवडून आले. आणि १९६२ पासूनच्या काँग्रेसचा असणारा बालेकिल्ला त्यांनी कायम राखला.

**२००९ च्या इंदापूर विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| इंदापूर विधानसभा | २४८९२९ | ८७८४८ | १०१९३८ | ७६.२४ |

२००९ च्या इंदापूर विधानसभा मतदारसंघामध्ये २४८९२९ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १८९७८६ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८७८४८ व स्त्री १०१९३८ मतदारांनी मतदान केले.

मतदारसंघपुनर्रचनेपूर्वी इंदापूर विधान सभा मतदारसंघाची (२००४) मतदार संख्या एकूण २२८४७३ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ११८०८६ इतके तर स्त्री मतदार ११०३८७ इतके होते. पुनर्रचनेनंतर इंदापूर विधानसभा मतदारसंघामध्ये कोणताही बदल केलेला नाही. त्यामुळे मतदारसंख्येत फारसा फरक पडला नाही. पुनर्रचनेनंतर या मतदारसंघाची एकूण मतदार संख्या २४१०८२ इतकी होती त्यापैकी पुरुष मतदारसंख्या १२५२६५ तर स्त्री मतदारसंख्या ११५८१७ इतके होते. एकूण मतदानाचे प्रमाण ७९.१% इतके होते.

या विधानसभा मतदारसंघात १९७८ , १९८०, १९९५, १९९९ व २००४ या काळात मराठा जातीचे तर १९८५ व १९९० या काळात धनगर जातीचे उमेदवार निवडून आले होते. सन २००४ नंतर कॉग्रेस मराठा व राष्ट्रवादी कॉगेस धनगर असे विभाजन झाल्याचे दिसते.


२००४ च्या निवडणुकीमध्ये कॉग्रेसचे हर्षवर्धन पाटील तर भाजपाचे प्रदीप गाटरकर यांच्या लढत झाली. अपेक्षेप्रमाणे या निवडणुकीत हर्षवर्धन पाटील हे विजयी झाले. २००९ च्या

पुनर्रचनेनंतरच्या निवडणुकीत मात्र हर्षवर्धन पाटील यांना शह देण्यासाठी अपक्ष उमेदवार म्हणून दत्तात्रय विठोबा भरणे यांना उमेदवारी देण्यात आली या दोन उमेदवारांची अटीतटीची लढत पाहायला मिळाली हर्षवर्धन पाटील यांना ९२७२९ तर दत्तात्रय  विठोबा भरणे यांना ८४७६९ मते मिळाली. हर्षवर्धन पाटील हे विजयी झाले. एकूणच पुनर्रचनेचा या मतदारसंघावर फारसा फरक पडला नाही.

### ७) बारामती विधानसभा मतदारसंघ (२०१)[१२]

१९६२ ते २००४ पर्यंतचा बारामती विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | मालतीबाई शिरोळे | १९६२ | काँग्रेस | १४७५१ |
| २ | शरद गोविंद पवार | १९६७ | काँग्रेस | ३४१६० |
| ३ | शरद गोविंद पवार | १९७२ | काँग्रेस | ४९८७५ |
| ४ | शरद गोविंद पवार | १९७८ | काँग्रेस | ४९६८५ |
| ५ | शरद गोविंद पवार | १९८० | काँग्रेस | ५४९१९ |
| ६ | शरद गोविंद पवार | १९८५ | इंडियन काँग्रेस(सोशालिस्ट) | ५३५४५ |
| ७ | अजित पवार | १९९० | काँग्रेस | ९६०३२ |
| ८ | शरद गोविंद पवार | १९९० | काँग्रेस | १०२०६६ |
| ९ | अजित पवार | १९९५ | काँग्रेस | ९१४९३ |
| १० | अजित पवार | १९९९ | रा .काँग्रेस | ८६५०७ |
| ११ | अजित पवार | २००४ | रा .काँग्रेस | ९६३०२ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६२ ते १९९५ पर्यंतच्या विधान सभेच्या निवडणुकीत या मतदारसंघावर कॉंग्रेस पक्षाचेच नियंत्रण होते.१९९५ नंतर हा या मतदारसंघ ११९९ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे गेला. १९७६ पासून २००४ पर्यंतच्या निवडणुकीत (१९६७, ७२, ७८, ८०, ८५ ,१९९०) शरद पवार व (१९९०, १९९५, १९९९,२००४) अजित पवार यांचेकडे हा मतदारसंघ राहिलेला दिसतो. या मतदारसंघामध्ये मराठा व धनगर अशी राजकीय स्पर्धा आहे.


**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा बारामती विधानसभा मतदारसंघ –**

बारामती विधानसभा मतदारसंघात केवळ बारामती तालुक्यातील लोकसंख्या समील केली आहे. या मतदारसंघात सुद्धा महसूल मंडलाचा समावेश केला आहे. हा एकमेव बदल या विधानसभा मतदारसंघात झाला आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघातून शरद पवार व अजित पवार सातत्याने निवडून आले. कॉंग्रेस (१९७८, १९८०, १९८५, १९९०, व १९९५) व राष्ट्रवादी कॉंग्रेस (१९९९ व २००४) पक्षाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडून आले. याविधानसभा मतदारसंघात मराठा व धनगर अशा दोन जाती गटांमध्ये राजकीय स्पर्धा आहे.

**२००९ च्या बारामती विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–[९३]**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | अजित अनंतराव पवार | रा . काँग्रेस | १,२८,५४४ | ६८.२६ |
| २ | काळूराम व्ही.चौधरी | बहुजन समाजवादी पार्टी | ६०३७ | ३.२१ |
| ३ | ॲड.दत्तात्रय राजेंद्र काळे | शिवसेना | १९,६२७ | १०.४२ |
| ४ | दशरथ नाना राऊत | राष्ट्रीय समाजवादी पार्टी | ६,०४२ | ३.२१ |
| ५ | शिवाजी जयसिंग कोकरे | अपक्ष | १,०६६ | ०.५७ |
| ६ | विठ्ठल ज्ञानदेव जरड | अपक्ष | १,२६२ | ०६७ |
| ७ | रंजनकुमार शंकर मावटे | अपक्ष | २५,७४७ | १३.६७ |




२००९ च्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघामध्ये एकूण ७ उमेदवार उभे होते. यापैकी तीन उमेदवार अपक्ष होते. शिवसेना व अपक्ष हे दोन पक्षाचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसपुढे जास्त प्रभाव दाखवू शकले नाहीत. त्यामुळे ही निवडणुक एकतर्फी झालेली दिसून येते. २००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत बारामती विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार अजित पवार यांना १,२८,५४४ मते पडली. शिवसेनेचे उमेदवार ॲड. दत्तात्रय राजेंद्र काळे यांना १९,६२७ मते मिळाली. तर एक अपक्ष उमेदवार रंजन तावरे यांना २५,७४७ मते पडली. या निवडणुकीत अजित पवार एक लाख मतांनी निवडून आले.

२००९ च्या बारामती विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | झालेले मतदान | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रीया | एकूण टक्के |
| बारामती विधानसभा | २९०५२८ | १०२३६८ | ८५३६६ | ६४.६१ |

२००९ च्या बारामती विधानसभा मतदारसंघामध्ये २९०५२८ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १८७७३४ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष १०२३६८ व स्त्री ८५३६६ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी बारामती विधानसभा मतदारसंघाची (२००४) मतदारसंख्या एकूण २०९३२० इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १०६९६९ तर स्त्री मतदार १०२३५१ इतकी होती. मतदार पुनर्रचनेनंतर बारामती विधानसभा मतदारसंघाची (२००९) मतदारसंख्या एकूण २७७३१५ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १४२२७७ तर स्त्री मतदार १३५०३८ इतके होती.[९४]

या मतदारसंघाचे स्वरूप ग्रामीण आहे. तर मतदारसंघातून शरद पवार व अजित पवार सातत्याने निवडून आले. १९७८ ते १९९५ पर्यत व १९९९ व २००४ राष्ट्रवादी कॉगेसचे उमेदवार या मतदारसंघातून निवडून आले.


या मतदारसंघात मराठा व धनगर अशा दोन जातीगटांमध्ये राजकीय स्पर्धा दिसते. धनगर समाज २००४ पर्यत भाजपकडे सरकला होता. परंतु २००४ नंतर पुन्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे सरकला आहे.

पुनर्रचनेनंतर या मतदारसंघामध्ये फारसा राजकीय बदल झाला नाही. २००९ च्या निवडणुकीमध्ये अजित पवार ६८.२६% मते मिळवून निवडून आले.[९५]

## ८) भोर विधानसभा मतदारसंघ –

१९६२ ते २००४ पर्यंतचा बारामती विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप[९६]

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एम.भेलके | १९६२ | काँग्रेस | २३५४३ |
| २ | एस.एम.भेलके | १९६७ | काँग्रेस | २४८८८ |
| ३ | अनंतराव थोपटे | १९७२ | अपक्ष | २७४०१ |
| ४ | संपतराव गेधे | १९७८ | अपक्ष | २७२२५ |
| ५ | अनंतराव थोपटे | १९८० | काँग्रेस (आय) | ५३८५१ |
| ६ | अनंतराव थोपटे | १९८५ | काँग्रेस | ५१६५३ |
| ७ | अनंतराव थोपटे | १९९० | काँग्रेस | ५१६५३ |
| ८ | अनंतराव थोपटे | १९९५ | काँग्रेस | ५७०५५ |
| ९ | कााशिनाथ खुटवड | १९९९ | रा.काँग्रेस | ५००६३ |
| १० | अनंतराव थोपटे | २००४ | रा.काँग्रेस | ६१५३६ |




वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की १९६२ ते १९९५ पर्यंत याविधानसभा मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचेच नियंत्रण होते. हा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जातो. परंतु १९९८ साली शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केल्यानंतर १९९९ च्या पासून निवडणुकीत या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काशिनाथ खुरवड

यांना ५००६३ मते पडून ते विजयी झाले. त्यामुळे आत्तापार्यंत काँग्रेसकडे असलेला मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे गेला.परंतु २००४ च्या निवडणुकीमध्ये दोन्ही पक्षांनी आघाडी केल्याने काँग्रेस पक्षाला हा मतदारसंघ सोडला त्यामुळे या ठिकाणी काँग्रेस पक्षाचे उमेदवार अनंतराव थोपटे यांना या निवडणुकीत ६१५३६ मते पडली. व ते विजयी झाले.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा भोर विधानसभा मतदारसंघ (२०३)**

भोर विधानसभा मतदारसंघात भोर , वेल्हे व मुळशी या तीन तालुक्यांचा समावेश केला आहे. या शिवाय पुणे पालिकेतील १२,१८२ लोकसंख्या या मतदारसंघात सामील केली आहे.या मतदारसंघात चार प्रमुख बदल झाले.

१) खेड शिवपूर मंडल वगळण्यात आले.

२) मुळशी तालुक्याचा नव्याने समावेश करण्यात आला.

३) पुणे मनपातील शहरी भागाचा नव्याने समावेश करण्यात आला.

४) भोर व मुळशी तालुक्यांची लोकसंख्या जवळजवळ समान आहे.

नव्याने तयार झालेला भोर विधानसभा मतदारसंघातील जुन्या भोर व मुळशी विधानसभा मतदारसंघातून सातत्याने मराठा जातीगटातील उमेदवार निवडून आले.(१९७८ ते २००४) मुळशी व भोर विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसचे नियंत्रण होते. (१९७८ ते १९९५) काँग्रेसकडून हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे सरकला (१९९९), राष्ट्रवादी काँग्रेसकडून मुळशी मतदारसंघ शिवसेनेकडे सरकला होता, तर काँग्रेसला भोर राष्ट्रवादी काँग्रेसने आघाडीत सोडला होता. अर्थातच नव्या भोर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस खेरीज शिवसेना व राष्ट्रवादीकाँग्रेसची राजकीय ताकद आहे.

**२००९ च्या भोर विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | सतिश निवृत्ती गायकवाड | बहुजन समाजवादी पार्टी | १४७२ | ०.७८ |
| २ | शरद बाजीराव ढमाले | शिवसेना | ४०४६१ | २१.३२ |
| ३ | संग्राम अनंतराव थोपटे | काँग्रेस | ५९०४१ | ३१.१२ |
| ४ | श्रीकांत रघु कदम | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | ४६११ | २.४३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | रवींद्र बबन गरूडकर | मनसे | १४९७० | ७.८९ |
| ६ | मोरेश्वर बबनराव धारे | अपक्ष | १३०९ | ०.६९ |
| ७ | रेवनाथ कृष्णा दारवाडकर | अपक्ष | २०८९९ | ११.०१ |
| ८ | मानसिंग खंडेराव धुमाळ | अपक्ष | २६६७६ | १४.०६ |
| ९ | सुधाकर भिकोबा पडळघारे | अपक्ष | ८१० | ०.४३ |
| १० | रणजित अप्पासो पाटील | अपक्ष | ७६६ | ०.४० |
| ११ | बाळासाहेब विलास चांदेरे | अपक्ष | १४६९४ | ७.७५ |
| १२ | विक्रम विलास भोसले | अपक्ष | १२६२ | ०.६७ |
| १३ | संतोष महादेव लोकावळे | अपक्ष | २७७१ | १.४६ |

२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण १३ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. यापैकी आठ उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी चुरस काँग्रेस व शिवसेना यांच्यात दिसून आली. काँग्रेस पक्षाचे उमेदवार संग्राम अनंतराव थापटे यांना ५९,०४१ मते पडली , तर शिवसेनेचे उमेदवार शरद रणपिसे यांना ४०,४६१ मते पडली. तसेच अपक्ष उमेदवार रेवनाथ कृष्णा दारवाडकर यांना २०,८९९ मते तर दुसरे अपक्ष उमेदवार मानसिंग खंडेराव धुमाळ यांना २६,६७६ मते पडली. अशी अपक्षामध्ये मतांची विभागणी होऊनसुद्धा काँग्रेसचे संग्राम अनंतराव थापटे हे १९००० मतांनी निवडून आले व आपला काँग्रेसचा बालेकिल्ला परत मिळवला.

**२००९ च्या भोर विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | झालेले मतदान | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| भोर विधानसभा | २८४३८४ | १०३५७० | ८५५६६ | ६६.५० |

२००९ च्या भोर विधानसभा मतदारसंघामध्ये २८४३८४ मतदार आहेत.त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये २८४३८४ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष १०३५७० व स्त्री ८५५६६ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघपुनर्रचनेनंतर नव्याने तयार झालेल्या भोर, वेल्हर व मुळशी या तालुक्यातील एकूण मतदारांची संख्या ही २७९६७४ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १४५१९२ व स्त्री मतदार १३४४८२ इतके होते.

नव्याने तयार झालेल्या भोर विधानसभा मतदारसंघातील जुन्या मुळशी व भोर विधानसभा मतदरसंघातून सातत्याने मराठा जातीगटातील उमेदवार निवडून आले. (१९७८–२००४) १९७८ ते १९९५ या कालखंडात मुळशी व भोर विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसचे नियंत्रण होते. १९९१ मध्ये हा मतदारसंघ काँग्रेसकडून राष्ट्रवादी काँग्रेसकडे सरकला परंतु २००४च्या निवडणुकीत अनंतराव थोपटे काँग्रेस व शिव सेनेचे मानसिंग धुमाळ यांच्या लढत होऊन काँग्रेसचे अनंतराव थोपटे या ठिकाणी निवडून आले.

पुनर्रचनेनंतर २००९ च्या भोर विधान सभा निवडणुकी मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी आघाडी करून जागावाटपाचे धोरणाप्रमाणे भोरची जागा राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेसला सोडली. त्यामुळे या निवडणुकीमध्ये काँग्रेसचे उमेदवार अनंतराव थोपटे यांचे चिरंजीव संग्राम थोपटे व शिवसेनेचे उमेदवार शरद ढमाले यांच्यात लढत झाली यामध्ये संग्राम थोपटे विजयी झाले; तरीसुद्धा या मतदारसंघामध्ये काँग्रेस खेरीज शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसची राजकीय ताकद आहे.

### ९) १९६२ ते २००४ पर्यंतचा पुरंदर विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप[१७]

| वर्ष | विजेता | पक्ष | मते | प्रतिस्पर्धी | पक्ष | मते |
|---|---|---|---|---|---|---|
| १९६२ | ज्ञानेश्वर रघुनाथ खैरे | काँग्रेस | ७८९० | विठ्ठल देशमुख | अपक्ष | ८३६१ |
| १९६७ | ज्ञानेश्वर रघुनाथ खैरे | काँग्रेस | २६८४१ | व्ही.एस.देशमुख | Sanghata Socialist party | १७८०५ |
| १९७२ | ज्योत्याजीराव जाधवराव | Samyucta Socialist party Socialist | २९५८६ | ज्ञानेश्वर रघुनाथ खैरे | INC | २१३६७ |
| १९७८ | दादा जाधवराव | जनता पार्टी | ३५०५३ | उरसळ शंकरराव दशरथराव | काँग्रेस | ३२२६७ |
| १९८० | कुंजीर संभाजी रामचंद्र | काँग्रेस (यु) | २३९०१ | दादा जाधवराव | JNPUP | २३१७५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९८५ | दादा जाधवराव | जनता पार्टी | ४६७१२ | सस्ते हरिश्चंद्र सोपानराव | काँग्रेस | २७९१६ |
| १९९० | दादा जाधवराव | जनता दल | ५६४२१ | कोलते विजय विनायक | काँग्रेस | ५२६२१ |
| १९९५ | दादा जाधवराव | जनता दल | ९०३२१ | चंदुकाका जगताप | काँग्रेस | ४६९३५ |
| १९९९ | दादा जाधवराव | जनता दल(एस) | ४४२५० | चंदुकाका जगताप | काँग्रेस | २८३३९ |
| २००४ | अशोक कोंड्बिा टेकवडे | राष्ट्रवादी काँग्रेस | ६३०११ | दादा जाधवराव | जनता दल(एस) | ४९५५१ |

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा पुरंदर विधानसभा मतदारसंघ –**

पुरंदर विधानसभा मतदारसंघात पुरंदर तालुक्याखेरीज हवेली तालुक्यातील पिसोळी, उंड्री, आंबेगाव बुद्रुक या गावांचा समावेश केला आहे. या विधानसभा मतदारसंघात दोन बदल झाले.


१) हवेली तालुक्यातील उरळी कांचन महसूल मंडल या मतदारसंघातून वगळण्यात आले.

२) पुणे महानगरपालिकेमधील शहरी भाग या मतदारसंघात नव्याने समाविष्ट केला.

या विधानसभा मतदारसंघात सातत्याने मराठा जातीगटातील उमेदवार निवडून आले. या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचा (२००४) अपवाद वगळता सातत्याने जनता दलाचे उमेदवार निवडून आले होते.

**२००९ च्या पुरंदर विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–**

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** | **पक्ष** | **मते** | **टक्के** |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमंत रूद्राप्पा गायकवाड | बहुजन समाजवादी पार्टी | १,४२७ | ०.८१ |
| २ | दिगंबर गणपत दुर्गाडे | काँग्रेस | ४४,५२९ | २५.१६ |
| ३ | विजय सोपान शिवतारे | शिवसेना | ६७,९९८ | ३८.४३ |
| ४ | कृष्णा हरिभाऊ लोहकरे | मनसे | ११,१८० | ६.३२ |
| ५ | दादा जाधव | अपक्ष | १,९५४ | १.० |
| ६ | विजय ज्ञानेबा हरपळे | अपक्ष | १,५६४ | ०.८८ |
| ७ | दादा जाधवराव | जनता दल | १४,०५० | ७.९४ |
| ८ | सुरेश दादाभाऊ वीर | अपक्ष | ७४२ | ०.४२ |
| ९ | संजय चंदुकाका जगताप | अपक्ष | ३३,५१३ | १८.९४ |




२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण ९ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. यापैकी चार उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी चुरस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिवसेना वकाँग्रेसचे असणारे अपक्ष उमेदवार यांच्यात दिसून आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार दिगंबर दुर्गाडे यांना ४४,५२९ मते मिळाली. शिवसेनेचे उमेदवार विजय शिवतारे यांना ६७,९९८ तर अपक्ष उमेदवार संजय चंदुकाका जगताप यांना ३३५१३ मते मिळाली. या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार विजय शिवतारे २३००० मतांनी विजयी झाले. या मतादेर संघावर शिवसेनेने प्रथमच विजय मिळविला. आतापर्यंत जनता दलाचे वर्चस्व या मतदारसंघावर होते.

२००९ च्या पुरंदर विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | झालेले मतदान | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| पुरंदर विधानसभा | २६९५०९ | ९६२२७ | ८००५३१ | ६५.४० |

२००९ च्या पुरंदर विधानसभा मतदारसंघामध्ये २६९५०९ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १७६२८० मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ९६२२७ व स्त्री ८००५३१ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी विधान सभा मतदारसंघाची मतदारसंख्या एकूण २३२२०० इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १२०४९४ इतके तर स्त्री मतदार १११७०६ इतके होते. पुनरर्चनेनंतर पुरंदर विधानसभा मतदारसंघाची मतदारसंख्या एकूण २५०९०८ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १३१२४७ तर स्त्री मतदार प्रमाण ११९६६१ इतके होते.


या मतदारसंघाला पुणे महापालिकेतील शहरी भाग (हवेली तालुक्यातील भाग) नव्याने सामील केला या मतदारसंघाचे स्वरूप त्यामुळे शहरी झाले आहे. या विधानसभा मतदारसंघामध्ये सातत्याने मराठा जातीगटातील उमेदवार निवडून आले आहेत. या मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचा (२००४) चा अपवाद वगळला सातत्याने जनतादलाचे उमेदवार दादा जाधवराव निवडून येत होते.

पुनर्रचनेनंतर मात्र पुरंदर विधानसभा मतदारसंघामध्ये इतर पक्षांनीसुद्धा आपली ताकद आजमावली आणि २००९ च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे शिवतारे यांना उमेदवारी दिली तर राष्ट्रवादीकडून दिजवार दुगडि हे रिंगणात उतरले तसेच अपक्ष म्हणून चंदुकाका जगताप यांचे चिंरजीव उभे राहिले या तिघांमध्ये तिरंगी लढत चुरशीची झाली. आतापर्यंत या मतदारसंघामध्ये शिवसेनेला शिरकाव करता आला नव्हता परंतु या निवडणुकीत शिवसेनेने या मतदारसंघातून शिवाजी शिवतारे मतदार यांच्या रूपाने जागा मिळाली. आणि जनतादल, राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेस यांच्याबरोबरीने शिवसेनेनेसुद्धा या ठिकाणी ताकद दाखवून दिली.

### १०) मावळ विधानसभा मतदारसंघ –

### १९६२ ते २००४ पर्यंतचा मावळ विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप[९८]

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | नामदेव मोहोळ | १९६२ | कॉंग्रेस | २६२४७ |
| २ | आर.एस.सातकर | १९६७ | कॉंग्रेस | १९५२५ |
| ३ | कृष्णराव शेगडे | १९७२ | भारतीय जन संघ | २७७३० |
| ४ | कृष्णराव शेगडे | १९७८ | कॉंग्रेस | ३८५१४ |
| ५ | बी.एस. गाडे पाटील | १९८० | कॉंग्रेस | २३०३२ |
| ६ | मदनलाल बाफना | १९८५ | कॉंग्रेस | ३७०२८ |
| ७ | मदनलाल बाफना | १९९० | कॉंग्रेस | ४५४०९ |
| ८ | रूपलेखा ढोरे | १९९५ | भारतीय जनता पक्ष | ७१४५२ |
| ९ | दिगंबर बाळोबा बेगडे | १९९९ | भारतीय जनता पक्ष | ४६९७० |
| १० | दिगंबर बाळोबा बेगडे | २००४ | भारतीय जनता पक्ष | ४९६१२ |




वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की १९६२ ते १९९५ पर्यंत या विधानसभा मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचेच नियंत्रण होते.१९६२ ते १९९० पर्यंतच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. १९९५ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाकडून भारतीय जनता पक्षाकडे गेला. या निवडणुकीत भाजपच्या रूपलेखा ढोरे यांना ७१४५२ मते पडून त्या विजयी झाल्या. पुढील १९९९ व २००४ च्या निवडणुकीमध्येसुद्धा भाजपकडे हा मतदारसंघ राहिला. या दोन्ही निवडणुकीत भाजपचे दिगंबर बेगडे हे निवडून आले.

या मतदारसंघात मराठा व मारवाडी अशा दोन जाती गटात राजकीय स्पर्धा असलेली दिसून येते. (१९९५, १९९९, व २००४) या मतदारसंघात मराठा नेते दोन्ही काँग्रेसवर असंतोष व्यक्त करतात.

### मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा मावळ विधानसभा मतदारसंघ (२०४)[९९]

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मावळ विधानसभा मतदारसंघात मावळ तालुक्याखेरीज हवेली तालुक्यातील चिंचवडगाव महसूल मंडळ व देहू रोड कंटोनमेंटचा समावेश केला आहे. या मतदारसंघत दोन बदल झाले.


१) चिंचवड महसूल मंडळ व देहू सज्ञा यांचा या मतदारसंघात नव्याने समावेश केला गेला.

२) हा मतदारसंघ निमशहरी स्वरूपाचा तयार झाला आहे.

या मतदारसंघात मारवाडी (१९८९, व ९९९०) व मराठा (१९७८, १९८०, १९९५,९९ व २००४) असे दोन जातीगटातील उमेदवार निवडून आले होते. या मतदारसंघावर काँग्रेसचे नियंत्रण होते. (१९७८ व १९८०, १९८५ व १९९०). काँग्रेस अंतर्गत मराठा व अमराठा अशी राजकीय स्पर्धा होती. या स्पर्धेत काँग्रेसने अमराठी उमेदवारांच्या पाठीशी ताकद उभी केली. त्यामुळे मराठा नेते कॉंग्रेसकडून भाजपकडे सरकले. (१९९५.९९९, व २००४)

**२००९ च्या मावळ विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–**[१००]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | काळोखे ज्ञानोबा किसन | बहुजन समाजवादी पार्टी | २५५९ | १.३९ |
| २ | बापू बजरंग बेगडे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ६८,८४० | ३७.५० |
| ३ | संजय विश्वनाथ बेगडे | भारतीय जनता पक्ष | ८३,१५८ | ४५.३० |
| ४ | णवनाथ कुंडलिक गरडे | भारिप बहुजन महासंघ | १,३५६ | ०.७४ |
| ५ | रमेश रामचंद्र साळवे | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | १५१६० | ८.२६ |
| ६ | राजू नामदेव पिंगण | मनसे | ८४७२ | ४.६२ |
| ७ | उमाकांत रामेश्वर मिश्रा | अपक्ष | ७५८ | ०.४१ |
| ८ | गेनू बाबूराव कडू | अपक्ष | १,१७१ | ०.६४ |
| ९ | प्रकाश दादा जैन | अपक्ष | २,१०० | १.१४ |



२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ९ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी ३ उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेसपक्ष व भाजप यांच्यामध्ये झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे बापू जयवंत बेगडे यांना ६८, ८४० मते मिळाली. तर भाजपचे संजय विश्वनाथ बेगडे यांना ८३,१५८ मते पडली व भाजपचे बेगडे हे १५०० मतांनी निवडून आले. व भाजपची या मतदारसंघावरील पकड कायम राहिली.

२००९ च्या मावळ विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | झालेले मतदान | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| मावळ विधानसभा | २८०७४८ | १००१२९ | ८३१८१ | ६५.२९ |

२००९ च्या मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये २८०७४८ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १८३३१० मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष १००१२९ व स्त्री ८३१८१ मतदारांनी मतदान केले.पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी मावळ विधानसभा मतदारसंघाची मतदारसंख्या (२००४) एकूण २२१२९३ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ११४७६८ व स्त्री मतदार १०६५२५ इतके होते. पुनर्रचनेनंतर मावळ तालुक्याबरोबरच चिंचवड गांव व देहुरोड कॅन्टोन्मेट्चा समावेश केल्याने या मतदारसंघाची मतदारसंख्या वाढलेली आहे. या मतदारसंघाची (२००९) एकूण मतदार संख्या २६७३६१ इतकी होती त्यापैकी पुरुष मतदार १३८९५७ होती व स्त्री मतदार १२८४०४ इतके होते.

या मतदारसंघावर १९९७ ते १९९० पर्यत कॉग्रेसचे नियंत्रण राहिलेले आहे. परंतु १९९५ पासून आज हा मतदारसंघ कॉग्रेसकडून भाजपाकडे सरकलेला दिसून येतो. २००४ च्या निवडणूकीमध्ये भाजपाचे दिगंबर बेगडे व राष्ट्रवादीचे उमेदवार मदन बाघला यांचाच अटीतटीची लढत झाली परंतु भाजपाचे बेगडे या ठिकाणी विजयी झाले.


पुनर्रचनेनंतर चिंचवडगांव व देहुरोडचा समावेश होऊन सुद्धा बेगडे बंधुमध्ये लढत झाली. यामध्ये भाजपाचे संजय बेगडे व राष्ट्रवादीचे बापू बेगडे यांच्यात अटीतटीची लढत झाली. परंतु संजय बेगडे हे या ठिकाणी विजयी झाले.

एकूण या मतदारसंघावर मराठा नेते दोन्ही कॉंग्रेसवर असंतोष व्यक्त करतात.

**११) चिंचवड विधानसभा मतदारसंघ – (२०५)**

२००९ च्या चिंचवड विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–[१०१]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते |
|---|---|---|---|
| १ | श्रीरंग चंदू बारणे | शिवसेना | ७२,१६६ |
| २ | भाऊसाहेब सोपान भोईटे | कॉंग्रेस | २४,६८४ |
| ३ | विजय निवृत्ती वाघमारे | बहुजन समाजवादी पार्टी | २,७१४ |
| ४ | नंदिनी बाळासो गायकवाड | भारिप बहुजन महासंघ | ३७१ |
| ५ | शामल आर.बी. | समाजवादी पक्ष | ८२७ |
| ६ | रेखा संजय शिंदे | अपक्ष | १७६ |
| ७ | इमाम बशीर शेख | अपक्ष | १९५ |
| ८ | केंदले रामदास कैलास | अपक्ष | ४१८ |
| ९ | लक्ष्मण पांडुरंग जगताप | अपक्ष | ७८,७४१ |
| १० | दशरथ विठोबा ढोरे | अपक्ष | ४३७ |
| ११ | विलास एकनाथ नांदगुडे | अपक्ष | १५,५६१ |
| १२ | प्रदीप जाधव | अपक्ष | ३३४ |
| १३ | प्रमोद तुकाराम केसरकर | अपक्ष | ३७५ |
| १४ | डॉ.सुरेश भेरी | अपक्ष | ९२९ |



२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये चिंचवड विधानसभा मतदारसंघात एकूण १४ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी नऊ उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी लढत शिवसेना व राष्ट्रवादीतून बाहेर पडलेले अपक्ष उमेदवार यांच्यामधे दिसून आली. शिवसेनेचे श्रीरंग चंदू बारणे यांना ७२,१६६ मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार लक्ष्मण पांडुरंग जगताप यांना ७८,७४१ मते पडली. लक्ष्मण पांडुरंग जगताप हे ६००० मतांनी निवडून आले.

२००९ च्या चिंचवड विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| चिंचवड विधानसभा | ३९१८५७ | १०९४६० | ८८०२१ | ५०.३९ |

२००९ च्या चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये ३९१८५७ मतदार आहेत.त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १९७४८१ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष १०९४६० व स्त्री ८८०२१ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर चिंचवड विधानसभा मतदारसंघाची (२००९)ची मतदारसंख्या एकूण ३४३८३४ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १८६७२२ तर स्त्री मतदार १५७११२ इतके होते.

चिंचवड विधान सभामतदारसंघ जुन्या हवेली व मुळशी विधान सभा मतदारसंघातील भाग जोडून तयार करण्यात आलेला आहे. हा मतदारसंघ जवळजवळ ९०% शहरी आहे. हा मतदारसंघ मध्यमवर्गीय कामगारांचे प्राबल्य असणारा आहे.

### १२) पिंपरी विधानसभा मतदारसंघ जा. २०६


### मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा पिंपरी विधानसभा मतदारसंघ – पिंपरी (२०६)

हा मतदारसंघ हवेली मतदारसंघाचे विभाजन होऊन तयार झाला आहे. या मतदारसंघाची प्रमुख पाच वैशिष्ट्ये आहेत. एक –सुशिक्षित लोकवस्तीचा भाग या मतदारसंघात आहे. उदा. पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक, गंगानगर, आकुर्डी, निगडी, चिंचवड स्टेशन, एल्प्रो कंपनी, सुदर्शनगर, पिंपरी गाव, जिजामाता हॉस्पिटल, वैष्णदेवी मंदिर, मोरवाडी, एम. आय. डी. सी. संघवी केशरी कॉलेज, एच. डी. एफ. सी. कॉलनी, संत तुकारामनगर, वाय.सी.एम. हॉस्पिटल, सी. आय. आर. टी., कासारवाडी व कासारवाडी स्टेशन इ. दोन –या मतदारसंघात

झोपडपट्टीतील भाग महत्त्वाचा आहे. उदा. तुळजाई वस्ती, खंडोबा माळ, मोहनगर, भाटनगर, आनंदनगर, सिद्धानर्थनगर इ. तीन –बोपखेल हा ग्रामीण भाग या मतदारसंघात आहे. चार – दापोडीची संमिश्र लोकवस्ती या मतदारसंघात आहे. सी.एम.ई.हा मिलिटरीचा परिसर नव्या मतदारसंघात समाविष्ट केला आहे.[१०२]

**२००९ च्या पिंपरी विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | अण्णा बनसोडे | रा .कॉंग्रेस | ६१०६१ | ४१.६९ |
| २ | अमर शंकर साबळे | भारतीय जनता पक्ष | ५१,५३४ | ३५.१९ |
| ३ | राजेंद्र कुंडलिक गायकवाड | बहुजन समाजवादी पार्टी | ४,०८८ | २.७९ |
| ४ | मानव श्रीपती कांबळे | जनता दल | ८,२४७ | ५.६३ |
| ५ | देवेंद्र सहदेव तायडे | भारिप बहुजन महासंघ | ८०३ | ०.५५ |
| ६ | वनिता संदीप शेलार | प्रबुध्द रिपब्लिकन पक्ष | ४४० | ०.३० |
| ७ | चंद्रकांत लक्ष्मण सोनकांबळे | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | ११,१४६ | ७.६१ |
| ८ | के. के. कांबळे | अपक्ष | ४३६ | ०.३० |
| ९ | बी. के. कांबळे | अपक्ष | ४९२ | ०.३४ |
| १० | विश्वास भगवान गजरमल | अपक्ष | ९९९ | ०.६८ |
| ११ | ताराबाई भागवान गायकवाड | अपक्ष | ३९० | ०.२७ |
| १२ | भाबासो श्रीपती गायकवाड | अपक्ष | ३५५ | ०.२४ |
| १३ | राजू सुदाम भालेराव | अपक्ष | ५८३ | ०.४० |
| १४ | श्याम अभिमन्यू घोडके | अपक्ष | ६९६ | ०.४८ |
| १५ | श्यामल मचिंद्र सोनवणे | अपक्ष | ६०६ | ०.४१ |
| १६ | संजय नारायण जगताप | अपक्ष | १,१५५ | ०.७९ |
| १७ | हर्षवर्धन मधुकर मेश्राम | अपक्ष | ३,४३० | २.३४ |



२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पिंपरी विधानसभा मतदारसंघात एकूण १७ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी १० उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी चुरस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भाजप यांच्यामध्ये झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अण्णा बनसोडे यांना ६१,०६१ मते पडली तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे अमर शंकर साबळे यांना ५१,५३४ मते पडली व अण्णा बनसोडे १०,००० मतांनी विजयी झाले.

**२००९ च्या पिंपरी विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी–**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| पिंपरी विधानसभा | ३४४४८५ | ८२९२६ | ६३३९३ | ४२.४७ |

२००९ च्या पिंपरी विधानसभा मतदारसंघामध्ये ३४४४८५ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १४६३१९ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८२९२६ व स्त्री ६३३९३ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघपुनर्रचनेनंतर पिंपरी विधानसभा मतदारसंघाची (२००९) एकूण मतदार संख्या ३१२६४६ इतकी होती. त्यापैकी पुरुषमतदार १६६७८८ तर स्त्री मतदार १४५८५८ इतके होते.

पिंपरी हा मतदारसंघ हवेली मतदारसंघाचे विभाजन होऊन तयार झालेला आहे.

**१३) भोसरी विधानसभा मतदारसंघ (- २०७)**

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा भोसरी विधानसभा मतदारसंघ**


**भोसरी (-२०७)**

निगडी गाव या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ३६ वॉर्डाचा समावेश भोसरी विधानसभा मतदारसंघात केलेला आहे. भोसरी मतदारसंघात जुन्या हवेली मतदारसंघातील बहुतांश भाग एकत्रित आलेला आहे. या मतदारसंघाची चार वैशिष्ट्ये आहेत. एक –भोसरी. विधानसभा मतदारसंघात झोपडपट्टीचा भाग महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे. उदा. अंजठानगर झोपडपट्टी, ओटा स्कीम. दोन –या विधानसभा मतदारसंघात उच्चभ्रूत, सुशिक्षित भाग एकत्र आला आहे. अजमेरा कॉलनी, निगडी, प्राधिकरण, यमुनानगर इ. तीन भागातील चऱ्होली

बुद्रुक, वडमुखवादी, चोविसावाडी, डुडुळगाव, मोशी, चिखली, तळवडे यांचा या मतदारसंघात समावेश होता.[१०३]

**२००९ च्या भोसरी विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–[१०४]**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | सुलभा रामभाऊ उबाळे | शिवसेना | ४९,२०० | २९.६९ |
| २ | मंगलताई अशोक कदम | रा.कॉंग्रेस | २६,७९८ | १६.१७ |
| ३ | अब्दुलसईद तालुकदार शेख | बहुजन समाजवादी पार्टी | ५,१३१ | ३.१० |
| ४ | शुकुमार वासुदेव दामले | भारतीय रिपब्लिकन पक्ष | १,२५५ | ०.७६ |
| ५ | काळुराम रघुनाथ तापकीर | हिंदुस्थान जनता पार्टी | १४५ | ०.०९ |
| ६ | आशा अंकुश लांडगे | अपक्ष | ३३६ | ०.२० |
| ७ | अब्बाअलीस दत्तात्रय गायकवाड | अपक्ष | ६,६४१ | ४.०१ |
| ८ | एस.टी.कांबळे | अपक्ष | २०० | ०.१२ |
| ९ | दत्तात्रय लक्ष्मण गायकवाड | अपक्ष | २१६ | ०.१३ |
| १० | ..देवसेन अलीस रॉबर्ट | अपक्ष | २६८ | ०.१६ |
| ११ | बाबासाहेब महादेव पाटील | अपक्ष | २,२५४ | १.३६ |
| १२ | राजाराम राऊत | अपक्ष | ४०६ | ०.२५ |
| १३ | वसंतराव लोंढे | अपक्ष | १९,०६८ | ११.५१ |
| १४ | विकास महादू दरावडे | अपक्ष | ५६८ | ०.३४ |
| १५ | विलास विठोबा लांडे | अपक्ष | ५०,४७२ | ३०.४६ |
| १६ | संतोषभाऊ काळुराम लांडगे | अपक्ष | २,७५५ | १.६६ |




२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये भोसरी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण १६ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी ११ उमेदवार अपक्ष

होते. परंतु खरी चुरस शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये दिसून आली. शिवसेनेच्या उमेदवार सुलभा रामभाऊ उभाळे यांना ४९,०००मते पडली. तर राष्ट्रवादीच्या उमेदवार मंगलताई अशोक कदम यांना २६,७९८ मते पडली. सुलभा उभाळे या २३००० मतांनी निवडून आल्या.

**२००९ च्या भोसरी विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| भोसरी विधानसभा | ३४४०९३ | ९५५६१ | ६९९८४ | ४८.०९ |

२००९ च्या भोसरी विधानसभा मतदारसंघामध्ये ३४४०९३ मतदार आहेत.त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १६५४८५ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ९५५६१ व स्त्री ६९९८४ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर भोसरी विधानसभा मतदारसंघाची (२००९) ची एकूण मतदार संख्या ३०४४०५ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १७०२७० इतकी तर स्त्री मतदार १३४१३५ इतके होते.


भोसरी मतदारसंघामध्ये जुन्या हवेली मतदारसंघातील बहुतांश भाग एकत्रित झालेला आहे. या मतदारसंघामध्ये मराठा व माळी या दोन जातीच्या नात्यागोत्याची वीण या मतदारसंघात दिसते. या मतदारसंघामध्ये बराचसा भाग झोपडपट्टीचा आहे.

**१४) वडगांवशेरी विधानसभा मतदारसंघ –**

**२००९ च्या वडगावशेरी विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–[१०५]**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | हुलगेश मरिअप्पा यलवादी | बहुजन समाजवादी पार्टी | १३,१४० | ७.८५ |
| २ | बापूसाहेब तुकाराम पठारे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | ७२,०३४ | ४३.०१ |
| ३ | अजय जयवंत भोसले | शिवसेना | ३८,९१८ | २३.२४ |
| ४ | राजेंद्र शंकर इंदल | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | २८,९१८ | १७.०६ |
| ५ | शकील इब्राहीम सय्यद | प्रबुध्ध रिपब्लिकन पक्ष | ४१४ | ०.२५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | अफसार इब्राहीम सय्यद | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | ११,३८१ | ६.८० |
| ७ | ॲटनी फ्रान्सीस भोसले | अपक्ष | ५२४ | ०.३ |
| ८ | इस्माईल बाबुलाल शेख | अपक्ष | ४२८ | ०.२६ |
| ९ | नानाभाऊ शंकर लंके | अपक्ष | १९७ | ०.१२ |
| १० | रमेश मनोहर पांढरे | अपक्ष | ३६१ | ०.२२ |
| ११ | राजेंद्र भगत | अपक्ष | ४९७ | ०.३६ |
| १२ | विजयराज येलाजी वडमारे | अपक्ष | ३९३ | ०.२३ |
| १३ | श्याम रामदास चंदनशिवे | अपक्ष | ६१७ | ०.३७ |
| १४ | राजेंद्र भगत | अपक्ष | २६२ | ०.२० |
| १५ | शशिकांत भिकाजी ओव्हळ | अपक्ष | ४३१ | ०.३३ |
| १६ | हनुमंत गोरोबा पांडगळे | अपक्ष | ४७३ | ०.३७ |




२००९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये शिवाजीनगर विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण १६ उमेदवार रिंगणात उभे होते. त्यापैकी ८ उमेदवार हे अपक्ष होते; परंतु खरी लढत काँग्रेस पक्ष , भाजप व मनसे यांच्यात झाली. काँग्रेसचे उमेदवार विनायक निम्हण यांना ५०,९१८ मते मिळाली. भाजपचे उमेदवार विकास मतकरी यांना ३०,३८८ मते पडली

तर मनसेचे रणजित श्रीकांत शिरोळे यांना २६,१४३ मते पडली. निम्हण हे २०,००० मताांनी निवडून आले.

२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये वडगांवशेरी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघात एकूण १३ उमेदवार रिंगणात उभे होते. त्यापैकी ६ उमेदवार हे अपक्ष होते; परंतु खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजप व मनसे यांच्यात झाली. राष्ट्रवादीचे उमेदवार बापूसाहेब तुकाराम पठारे यांना ७२,०३४ मते पडली. तर मनसेचे उमेदवार राजेंद्र शंकर इंदल यांना २८,९१८ मते पडली. राष्ट्रवादीचे उमेदवार बापूसाहेब तुकाराम पठारे हे ३४००० मतांनी निवडून आले.

**२००९ च्या वडगांवशेरी विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण टक्के |
| वडगांवशेरी विधानसभा | ३६५९६१ | ९२२६८ | ७५०९९ | ४५.७३ |

२००९ च्या वडगांव शेरी विधानसभा मतदारसंघामध्ये ३६५९६१ मतदार आहेत.त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १६७३६७ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ९२२६८ व स्त्री ७५०९९ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.


मतदारसंघपुनर्रचनेनंतर वडगांवशेरी विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदार संख्या ३३४८३३ इतकी होती. त्यावेळी पुरुष मतदार १७६८६८ इतके होते. तर स्त्री मतदार १५८६०५ इतके होते.

वडगांवशेरी विधानसभा मतदारसंघाची जुन्या बोपोडी भवानी पेठ व हवेली मतदारसंघातील भाग जोडून निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच या मतदारसंघामध्ये मांजरी खुर्दचा समावेश केल्यामुळे मतदारसंघाची भौगोलिक सलग रचना दिसत नाही.[१०६]

### १५) शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ –

१९६२ ते २००४ पर्यंतचा शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप[१०७]

| अ.क्र. | प्रतिनिधींची नावे | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १ | सदाशिव बर्वे | १९६२ | काँग्रेस | ३०३०६ |
| २ | बी.डी.किल्लेदार | १९६७ | वंचित कामगार पक्ष | २३५०९ |
| ३ | रविंद्र मोरे | १९७२ | काँग्रेस | ३४४६२ |
| ४ | शांती नाईक | १९७८ | जनता पार्टी | ४८६९६ |
| ५ | अण्णा जोशी | १९८० | भारतीय जनता पक्ष | २६२७३ |
| ६ | अण्णा जोशी | १९८५ | भारतीय जनता पक्ष | ४८६९६ |
| ७ | शशिकांत सुतार | १९९० | शिवसेना | ७७२९७ |
| ८ | शशिकांत सुतार | १९९५ | शिवसेना | १०२४०९ |
| ९ | विनायक निम्हण | १९९९ | शिवसेना | ६७९७९ |
| १० | विनायक निम्हण | २००४ | शिवसेना | ११४७१३ |




वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, १९६२ ते १९७२ पर्यंतच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. त्यानंतर मात्र शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघावर १९८० ते १९८५ या काळात भाजपचे व १९९० ते २००४ या

काळात शिवसेना या पक्षाचे नियंत्रण होते. भाजपकडून ब्राह्मण व शिवसेनेकडून मराठा समाजाचे उमेदवार या मतदार संघाकडून निवडून आले होते. १९९० व १९९५ च्या निवडणुकीत शिवसेनेच उमेदवार शशिकांत सुतार हे दोनवेळा या मतदारसंघातून निवडून आले. तर १९९९ व २००४ च्या निवडणुकीत याच पक्षाचे उमेदवार विनायक निम्हाण हे निवडून आले.


**शिवाजीनगर (-२०९)**

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ**

एक –जुन्या शिवाजीनगर मतदारसंघातील कोथरूडचा भाग वगळण्यात आला आहे. दोन –बोपोडी विधानसभा मतदारसंघातील भाग या मतदारसंघात नव्याने जोडला आहे. तीन –पेठांमधील भाग कमी करण्यात आला. तर चार –जुन्या शिवाजीनगरचा अर्धा भाग व बोपोडी विधानसभा मतदासंघातील अर्धा भाग असा हा मतदारसंघ तयार झाला आहे. त्यामुळे या मतदारसंघातील टक्क्यांपर्यत पुनर्रचना झाली. पाच या मतदारसंघात उच्च मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय व झोपडीपट्टीवासीय एकत्रित झाले आहेत.

**२००९ च्या शिवाजीनगर विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–**[१०८]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते |
|---|---|---|---|
| १ | संतोष रमेश चव्हाण | बहुजन समाजवादी पार्टी | १,६३८ |
| २ | विनायक महादेव निम्हण | कॉंग्रेस | ५०,९१८ |
| ३ | प्रा.विकास मतकरी | भारतीय जनता पक्ष | ३०३८८ |
| ४ | गौतम विनायक भोसले | भारतीय अल्पसंख्यांक सुरक्षा महासंघ | २७९ |
| ५ | राणजित श्रीकांत शितोळे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | २६,१४३ |
| ६ | परशुराम बाळकृष्ण वडेकर | भारतीय रिपब्लिकन पक्ष | १५,९२० |
| ७ | सचिन विठ्ठल अहिरे | प्रबुध्द रिपब्लिकन पक्ष | १५२ |
| ८ | सुरेश बाबुराव ससाणे | आखिल भारतीय सेना | १५७ |
| ९ | संजय किसन भिंगारे | भारिप बहुजन महासंघ | ६०१ |
| १० | किशोर पुंडलिक शिंदे | अपक्ष | १,२०७ |
| ११ | सुभाष गोपाळ बोधे | अपक्ष | ११९ |
| १२ | कुसाळकर मनोहर बजरंग | अपक्ष | २३९ |
| १३ | मंगलाताई पवार | अपक्ष | ३७१ |
| १४ | राजेश सुभाष कांबळे | अपक्ष | २३१ |




**२००९ च्या शिवाजीनगर विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण टक्के |
| शिवाजीनगर विधानसभा | ३०२२५१ | ७०२४२ | ५९२०५ | ४२.८२ |

२००९ च्या शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघामध्ये ३०२२५१ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १२९४४७ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ७०२४२ व स्त्री ५९२०५ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

पुनर्रचनेपूर्वी शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाची मतदारसंख्या (२००४) ८१३५५८ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ४२१३३ व स्त्री मतदार ३९२२५ इतके होते. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाला बोपोडी विधानसभेचा निम्मा भाग जोडल्याने या मतदारसंघाची मतदारसंख्या वाढलेली आहे. या मतदारसंघाची मतदारसंख्या एकूण ३०२२५१ होती. त्यापैकी पुरुष मतदार १५५७३२ व स्त्री मतदार १४६५१९ इतके होते.

१९८० ते २००४ पर्यत या शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघावर भाजप, शिवसेना पक्षाचे नियंत्रण होते. भाजपकडून ब्राह्मण व शिवसेनाकडून मराठा समाजाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडून आले होते.


पुनर्रचनेनंतर मात्र या विधान सभा मतदारसंघाचे चित्र बदलले २००९ च्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेसने विनायक निम्हण यांना उमेदवारी दिली होती. तर भाजपकडून विकास

मतकरी यांना तिकीट दिले गेले या दोघांच्या लढतीमध्ये कॉंग्रेसचे विनायक निम्हण हे निवडून आले आणि भाजपाची विजयी परंपरा या निवडणुकीने खंडित केली.

### १६)कोथरूड विधानसभा मतदारसंघ –

२००९ च्या कोथरूड विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व–[१०९]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | अण्णा जोशी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | १९,०९५ | १२.३४ |
| २ | चंद्रकांत बलभिम मोकाटे | शिवसेना | ५२०५५ | ३३.६५ |
| ३ | राजू सिताराम शंके | बहुजन समाजवादी पार्टी | १,५१८ | ०.९८ |
| ४ | किशोर नाना शिंदे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४४,८४३ | २८.९९ |
| ५ | पल्लवी मनोहर हर्षे | प्रबुध्द रिपब्लिकन पक्ष | ४१० | ०.२७ |
| ६ | विजय रमेश बोडेकर | राष्ट्रीय समाजवादी पक्ष | ४५३ | ०.२९ |
| ७ | हिमानी सावरकर | आखिल भारत हिंदू महासभा | ६८४ | ०.४४ |
| ८ | अभंगराव हेमंत भागवत | अपक्ष | १८२ | ०.१२ |
| ९ | उज्वल केसरकर | अपक्ष | १०,००० | ६.४६ |
| १० | जयवंत हेमंत दहीभाते | अपक्ष | ७०५ | ०.४६ |
| ११ | दिपक मानकर | अपक्ष | २२,८५३ | १४.७७ |
| १२ | बालदे दिपक बबन | अपक्ष | २३९ | ०.१५ |
| १३ | मनोहर चंद्रभान बोरकर | अपक्ष | १९८ | ०.१३ |
| १४ | डॉ.यशराज हिरामन पारखी | अपक्ष | ७९४ | ०.५१ |
| १५ | सुनिल गुलाबराव चौधरी | अपक्ष | ६७२ | ०.४३ |



२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कोथरूड विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण १५ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी ८ उमेदवार अपक्ष होते . परंतु खरी चुरस शिवसेना व मनसे या दोन पक्षामध्ये झाली. शिवसेनेचे उमेदवार चंद्रकांत बलभिम मोकाटे यांना ५२०५५ मते पडली तर मनसेचे उमेदवार किशोर नाना शिंदे यांना ४४,८४३ इतकी मते पडली. शिवसेनेचे चंद्रकांत मोकाटे हे ८००० मतांनी विजयी झाले.

२००९ च्या कोथरूड विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदारांची संख्या | मतदान केलेले | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण टक्के |
| कोथरूड विधानसभा | ३३३६९३ | ८४२९२ | ७०२५० | ४६.२८ |

२००९ च्या कोथरूड विधानसभा मतदारसंघामध्ये ३३३६९३ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १५४५४२ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८४२९२ व स्त्री ७०२५० मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पिंपरी विधानसभा मतदारसंघाची (२००९) एकूण मतदारसंख्या ३३३६९३ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १७३६०३ इतके आहे. तर स्त्री मतदारसंख्या १६००९० इतके आहे.

नवीन कोथरूड मतदारसंघ शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचे विभाजन करून तयार झालेला आहे. त्यामुळे या मतदारसंघाला शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचा राजकीय इतिहास दिसतो.

पुनर्रचनेनंतर झालेल्या कोथरूड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे चंद्रकांत मोकाटे, मनसेचे उमेदवार किशोरनाना शिंदे तर अपक्ष म्हणून दिपक मानकर यांच्यामध्ये अटीतटीची लढत झाली. या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे चंद्रकांत मोकाटे हे विजयी झाले. मोकाटे यांना ८२०५५ मते, किशोर शिंदे यांना २८,०९ तर दिपक मानकर यांना २२,८५३ इतकी मते मिळाली.

## १७)खडकवासला  विधानसभा मतदारसंघ –


### खडकवासला -(२११)

### मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा खडकवासला विधानसभा मतदारसंघ

खडकवासला हा विधानसभा मतदारसंघ नव्याने तयार करण्यात आला आहे. जुन्या मुळशी व पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील भाग या मतदारसंघाला जोडला आहे. या मतदारसंघाची तीन वैशिष्ये दिसतात. एक, या मतदारसंघाता शहरी भाग आला आहे. कोथरूडमधील भुसारी कॉलनी, बावधन खुर्द, वारजे माळवाडी, शिवणे, उत्तमनगर, कोंढवे – धावडे, कोपरे, उत्तमनगर, सिंहगड रस्त्यावरील हिंगणे आनंदनगर, माणिकबाग, वडगाव खुर्द, धायरी, धनकवडी, कात्रज उद्यान, नऱ्हे आंबेगाव हा शहरी भाग या मतदारसंघात समाविष्ट केला आहे. दोन –या विधानसभा मतदरसंघातील शहरी भागांखेरीज ग्रामीण भागाचा समावेश करण्यात आला आहे. कात्रज घाटापलीकडील शिवापूर, आर्वी, कोंढणपूर, रामनगर, खेड, गौडदरा, गोगलवाडी, कल्याण, राहटवडे, मोगरवाडी, खामगाव, वरदाडे, भालखेड, सोनापूर, सिंहगड किल्ल व परिसरातील वाडयांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय खडकवासला धरण परिसरातील नांदेड, खडकवासल, डोणजे, गोऱ्हे बुद्रुक, खानापूर, कुडजे, आगळंबे, मांडवी, सांगरूण, बहुली, जांभळी व आंबी यांचा समावेश या मतदारसंघात केला आहे.[११०]

### २००९ च्या खडकवासला विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व(-२११)[१११]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते |
|---|---|---|---|
| १ | मुरलीधर किसन मोहोळ | भारतीय जनता पक्ष | २९,१७१ |
| २ | विकास पंढरीनाथ दांगट | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ५६,४८८ |
| ३ | बाबाजी सिताराम शेलार | बहुजन समाजवादी पार्टी | १३७८ |
| ४ | रमेश हिरामण वांजळे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ७९००६ |
| ५ | सिद्धू हनुमंता कांबळे | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | १७२८ |
| ६ | डॉ.स्मिता सोमनाथ पोळ | भारिप बहुजन महासंघ | ५७१ |
| ७ | दिलीप सुदाम कोळेकर | अपक्ष | २२७ |
| ८ | बाळासाहेब कोंडीबा घोगरे | अपक्ष | ६९६ |
| ९ | योगेश सोनबा रणधीर | अपक्ष | ७०० |
| १० | शोमनाथ शंकर लांडगे | अपक्ष | ४३९२ |
| ११ | डॉ.साधना पंडीत पोळ | अपक्ष | ४९३ |
| १२ | ॲड.सुभाष नरहर गोडसे | अपक्ष | ९९० |




२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये खडकवासला विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण १२ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी ६ उमेदवार अपक्ष होते . परंतु खरी चुरस राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व मनसे यांच्यामध्ये दिसून आली. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार विकास पंढरीनाथ दांगट यांना ५६,४८८ मते पडली. तर मनसेचे उमेदवार रमेश हिरामण वांजळे हे २३००० मतांनी निवडून आले.

**२००९ च्या खडकवासला विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानांची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नांव | एकूण मतदारांची संख्या | झालेले मतदान | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण टक्के |
| खडकवासला विधानसभा | ३५६१४८ | ९७४७० | ७८०४४ | ४९.२८ |

२००९ च्या खडकवासला विधानसभा मतदारसंघामध्ये ३५६११४८ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १७५५१४ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ९७४७० व स्त्री ७८०४४ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे. मतदारसंघ पुर्नरचनेनंतर (२००९) खडकवासला विधानसभा मतदारसंघाची मतदारसंख्या एकूण ३५६१४८ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १८८०५१ तर स्त्री मतदार १६८०९७ इतके होते.


नव्याने निर्माण करण्यात आलेल्या या मतदारसंघामध्ये जुन्या मुळशी व पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील भाग या मतदारसंघाला जोडला आहे. या मतदारसंघामध्ये शहरी भागाबरोबर ग्रामीण भाग जोडल्याने हा मतदारसंघ निमशहरी निमग्रामीण स्वरूपाचा आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या २००९ च्या पहिल्या निवडणुकीत या मतदारसंघामध्ये मनसेचे रमेश वांगळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विकास दांगट तर भाजपाचे मुरलीधर मोहोळ यांच्यामध्ये तिरंगी लढत झाली. या तिरंगी लढतीमध्ये मनसेचे रमेश वांगळे यांनी विजय संपादन केला. त्यामुळे या मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा असणारा प्रभाव यामुळे कमी झाला.

### १८) पर्वती विधानसभा मतदारसंघ

**१९७८ ते २००४ पर्यंतच्या पर्वती लोकसभा मतदारसंघ दृष्टिक्षेप**[११२]

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १. | सुभाष सर्वोगोड | १९७८ | कॉंग्रेस | ३९५०४ |
| २. | वसंत चव्हाण | १९८० | कॉंग्रेस (आय) | ३६२३३ |
| ३. | शरद रणपिसे | १९८५ | कॉंग्रेस | ४२८३६ |
| ४. | शरद रणपिसे | १९९० | कॉंग्रेस | ६६८६५ |
| ५. | दिलिप कांबळे | १९९५ | भारतीय जनता पक्ष | ८२७९२ |
| ६. | विश्वास गांगुर्डे | १९९९ | भारतीय जनता पक्ष | ६६६४६ |
| ७. | रमेश बागवे | २००४ | कॉंग्रेस | ९६८५३ |



वरील तक्त्यावरून असे स्पष्ट दिसून येते की, १९७८ मध्ये पहिल्या पर्वती विधानसभेच्या निवडणुकीत जनतादलाकडे हा मतदारसंघ गेला. १९८० ते १९९० या काळातील विधानसभेच्या निवडणुकीत या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. १९९५ ते १९९९ या विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडे असलेला मतदारसंघ भाजपकडे गेला. १९९५ मध्ये भाजपचे दिलीप कांबळे हे ८२७९२ मते पडून विजयी झाले तर १९९९ च्या निवडणुकीत पुन्हा हा मतदारसंघ भाजपकडून काँग्रेसकडे गेला. २००४ च्या निवडणुकीत काँग्रेसचे रमेश बागवे हे ९६८५३ मते पडून विजयी झाले.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी (२००४) पर्वती विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदार संख्या १७९०७७ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ९७०५१ इतके होते तर स्त्री मतदार ८१९८० इतके होतो. पुनर्रचनेनंतर २००९ या मतदारसंघाची एकूण मतदार संख्या ३४०३४३ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १७७६०२ इतके होते तर स्त्री मतदार १६२७४१ इतके होते.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा पर्वती विधानसभा मतदारसंघ**


**पर्वती -(२११)**

हिंगणे खुर्द कोंढवा आणि जयदेवनगर ते बिबवेवाडी आणि मतदारसंघाची पुनर्रचना झाली. जुन्या मतदारसंघाच्या तुलनेत तीन बदल किंवा तीन नवीन समीकरणे घडली. एक – जुन्या पर्वती मतदारसंघाचा मोठा भाग कसबा, पुणे कॅन्टोन्मेंट व खडकवासला विधानसभा मतदारसंघाला जोडला गेला. त्यामुळे नव्या पर्वती मतदारसंघाच्या आकार पूर्वीपेक्षा तुलनेने कमी झाला. दोन –लक्ष्मीनगर, जनता वसाहत, पर्वती दर्शन येथील झोपडपट्टीवासीयांचा या मतदारसंघावर प्रभाव राहील. तीन बिबवेवाडी गावठाण, लुल्लनगर, मार्केट यार्ड, आदिनाथ सोसायटी, मुकुंदनगर या भागतून उच्चभ्रू लोकवस्ती आहे.

**२००९ च्या पर्वती विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व** [११३]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | किरणताई मोघे | मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी | ३२१६ | २.०८ |
| २. | विजय भास्कर जाधव | बहुजन समाजवादी पार्टी | १९९१ | १.२९ |
| ३. | सचिन श्याम तावरे | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ४६७४३ | ३०.२२ |
| ४. | माधुरी सतीश मिसाळ | भारतीय जनता पक्ष | ६४९५९ | ४२.०० |
| ५. | ॲड.किरण एकनाथ कदम | भारिप बहुजन महासंघ | २१४४ | १.३९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | कृष्णा मधुकर गायकवाड | एएनपी | ७७७ | ०.५० |
| ७. | शिवाजी भिवा गदारे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | २९६८९ | १९.१९ |
| ८. | अक्रम इस्लमा खान | अपक्ष | ५९० | ०.३८ |
| ९. | अशोक प्रभुराव बहुनवाड | अपक्ष | १२५ | ०.०८ |
| १०. | ॲड.श्रीधर लिंबाजी कसेबकर | अपक्ष | १५५ | ०.१० |
| ११. | नितीन सर दौंड | अपक्ष | ३२३ | ०.२१ |
| १२ | श्रीमंत जगन्नाथ देवकुळे | अपक्ष | २०८ | ०.१३ |
| १३ | प्रमोद प्रभाकर भटकरे | अपक्ष | २८६ | ०.१८ |
| १४ | भागवत रघुनाथ कांबळे | अपक्ष | ११४० | ०.७४ |
| १५ | सुरेखा शाम भोसले | अपक्ष | २०५ | ०.१३ |
| १६ | माला प्रभाकर कांबळे | अपक्ष | ४५० | ०.२९ |
| १७ | मारूती गंगाराम भालेराव | अपक्ष | ४९८ | ०.३२ |
| १८ | राजुभाई परदेशी | अपक्ष | १८३ | ०.१२ |
| १९ | राम तुकाराम वाघमारे | अपक्ष | ३२७ | ०.२१ |
| २० | शशिकांत चंद्रकांत हनवळे | अपक्ष | ४२५ | ०.२७ |
| २१ | गणेश दादू शेंडगे | अपक्ष | २४५ | ०.१६ |
| | एकूण | | १५४,६७९ | |



२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पर्वती विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण २१ उमेदवार रिंगणात उभे होते. त्यापैकी १४ उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी लढत राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष, भाजप व मनसे यांच्यामध्ये  होती. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे उमेदवार सचिन श्याम तावरे यांना ४६७४३ मते पडली. भाजपच्या उमदेवार माधुरी सतीश मिसाळ यांना ६४,९५९ मते पडली. तर मनसेचे उमेदवार शिवाजी भिवा गदारे यांना २७,६८९ मते पडली. भाजपच्या माधुरी पिसाळ या १८००० मतांनी विजयी झाल्या.

**२००९ च्या पर्वती विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | |
| पर्वती विधानसभा | ३४०३४३ | ८४३८३ | ७०२७७ | १५४६६० | ४५.४४ |

२००९ च्या पर्वती विधानसभा मतदारसंघामध्ये ३४०३४३ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १५४६६० मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८४३८३ व स्त्री ७०२७७ मतदारांनी मतदान केले. पुरुष मतदारांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

## १९) हडपसर –(२१३)


### मतरदारसंघ पुनर्रचनेनंतरचा हडपसर विधानसभा मतदारसंघ

### हडपसर विधानसभा मतदारसंघ

जुन्या पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाची फोड करण्यातून हडपसर या विधानसभा मतदारसंघाची निर्मिती झाली. कात्रज व मांजरी बुद्रुक अशी या मतदारसंघाची रचना आहे. संपूर्ण उपनगरी भागांचा समावेश झालेला हा विधानसभा मतदारसंघ आहे. या मतदारसंघाची चार वैशिष्ष्ये दिसतात. एक –कात्रजमधील मध्यमवर्गीय वस्ती या मतदारसंघात आहे. दोन –कोंढवा –मुंढवा भागातील लोकवस्ती संमिश्र स्वरूपाची आहे. तीन –रामटेकडी व वैदूवाडीतील झोपडपट्टीचा भाग या मतदारसंघात आहे. चार मगरपटट्टा भागात उच्चभू व आयटीमुळे स्थायिक झालेला परराज्यांतील मोठा वर्ग या मतदारसंघात आहे. हा मतदारसंघ पुणे शहराच्या सीमारेषेवरील व उपनगरी प्रकारचा आहे.[११४]

## २००९ च्या हडपसर विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[११५]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | महादेव रामचंद्र बाबर | शिवसेना | ६५५१७ | ३९.७४ |
| २. | विक्रम शिवाजी मगर | बहुजन समाजवादी पार्टी | २२५५ | १.३७ |
| ३. | चंद्रकांत विठ्ठलराव शिवरकर | काँग्रेस | ५५२०८ | ३३.४९ |
| ४. | मोहमद अलीखान अमानुला | भारिप बहुजन महासंघ | ९०८ | ०.५६ |
| ५. | ज्योतीराव अंकुश वाघमारे | प्रबुध्द रिपब्लिकन पक्ष | २१२ | ०.१३ |
| ६. | वसंत विठूजी भोळे | लोकजन शक्ती पार्टी | १३३२ | ०.८१ |
| ७. | वसंत कृष्णा मोरे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ३३०९२ | २०.०७ |
| ८. | विठ्ठल लक्ष्मण सातव | जनता दल (एस) | १२५३ | ०.७६ |
| ९. | अल्ताफ करीम शेख | भारतीय अल्पसंख्यांक सुरक्षा महासंघ | २०१ | ०.१२ |
| १०. | सलीम इक्बाल तांबोळी | ऑल इंडिया युनायटेड डेमॉक्रेसी पार्टी | ३१० | ०.१९ |
| ११. | उत्तमचंद वालचंद अग्रवाल | अपक्ष | १६९ | ०.१० |
| १२. | किशोर दाजिबा शहाणे | अपक्ष | ३९३ | ०.२४ |
| १३. | गणेश दिपक थार्मिक | अपक्ष | १७७ | ०.११ |
| १४. | बाबुलाल प्रभाकर नाबियार | अपक्ष | ३१३ | ०.१९ |
| १५. | राजू बबनराव मोरे | अपक्ष | ३२३ | ०.२० |
| १६. | सखाराम किसन पळसे | अपक्ष | ९९६ | ०.६० |
| १७. | सुनिल बाळकृष्ण गायकवाड | अपक्ष | १०३७ | ०.६३ |
| १८. | सुनंदा शारीराज मानवी | अपक्ष | २१४ | ०.१३ |
| १९. | बाळासो निवृत्ती हरपळे | अपक्ष | ९५१ | ०.५८ |




२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये हडपसर विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण १९उमेदवार रिंगणात उभे होते. त्यापैकी ९ उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी चुरस शिवसेना

काँग्रेस पक्ष व मनसे यांच्यामध्ये झाली. शिवसेनेचे उमेदवार महादेव चंद्रकांत बाबर यांना ६५,५१७ मते पडली. काँग्रेसचे चंद्रकांत विठ्ठलराव शिवरकर यांना ५५२०८ मते पडली तर मनसेचे उमेदवार वसंत कृष्णा मोरे यांना ३३०९२ मते मिळाली. यामध्ये महादेव चंद्रकांत बाबर हे १०,००० मतांनी निवडून आले.

**२००९ च्या हडपसर विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | |
| हडपसर विधानसभा | ३६३००७ | ९२९७० | ७१८३३ | १६४८०३ | ४५.३९ |

२००९ च्या हडपसर विधानसभा मतदारसंघामध्ये ३६३००७ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १६४८०३ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ९२९७० व स्त्री ७१८३३ मतदारांनी मतदान केले. पुरुष मतदारांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.


मतदारसंघ पुनर्रचनेनंतर हडपसर विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदार संख्या ३११५७७ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १६५६०९ इतके होते तर स्त्री मतदार १४५९८८ इतके होते.

जुन्या पुणे कॅन्टोन्मेट विधानसभा मतदारसंघाची फोड करून या मतदारसंघाची निर्मिती झाली.

## २०) पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ

**१९६२ ते २००४ पर्यतच्या पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ दृष्टिक्षेप**[११६]

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मते |
|---|---|---|---|---|
| १. | के.टी.गिरमे | १९६२ | काँग्रेस | १७५२९ |
| २. | के.टी.गिरमे | १९६७ | काँग्रेस | १४९२४ |
| ३. | शिवाजीराव ढेरे | १९७२ | काँग्रेस | ३०६६१ |
| ४. | विठ्ठल तुपे | १९७८ | जनता पार्टी | ३४७३७ |
| ५. | विठ्ठल तुपे | १९८० | जनता पार्टी | ३७८६० |
| ६. | विठ्ठल तुपे | १९८५ | जनता पार्टी | ४४९७७ |
| ७. | बाळासो शिवरकर | १९९० | काँग्रेस | ७१७८९ |
| ८. | सूर्यकांत लोणकर | १९९५ | शिवसेना | ७८००० |
| ९. | बाळासो शिवरकर | १९९९ | काँग्रेस | ५९७५५ |
| १०. | बाळासो शिवरकर | २००४ | काँग्रेस | १०१८०२ |




## पुणे कॅन्टोन्मेट विधानसभा

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा पुणे कॅन्टोन्मेट विधानसभा मतदारसंघ–**

१) बहू भाषिक व दाटीवाटीची वस्ती असलेल्या पुणे लष्कर छावणीचा संपूर्ण समावेश या मतदारसंघात केला आहे.

२) जुन्या कॅन्टोन्मेट विधानसभा मतदारसंघातील हडपसर भाग वगळण्यात आला आहे.


३) या विधानसभा मतदारसंघाला पर्वती व भवानी पेठ मतदारसंघाचा भाग जोडला आहे.

४) कोरेगांव पार्क,क विकासनगर, कवडेवाडी, उदयबाग वानवडी गांव, महादजी शिंदे छत्री हा उच्चभ्रू वस्तीचा भाग जोडण्यात आला आहे.[११७]

**२००९ च्या पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व** [११८]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | ओव्हाळ कैलास बबन | बहुजन समाजवादी पार्टी | ३७४९ | ३.२८ |
| २. | रमेश आनंदराव बागवे | काँग्रेस | ६५६३८ | ५७.३८ |
| ३. | सदानंद कृष्णा शेट्टी | शिवसेना | २८३१३ | २४.७९ |
| ४. | रोहिदास गजानन गायकवाड | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | ५०९३ | ४.४५ |
| ५. | दिपाली निवृत्ती चव्हाण | प्रबुध्द रिपब्लिकन पक्ष | २४४ | ०.२१ |
| ६. | बापूसाहेब सदाशिव भोसले | भारतीय रिपब्लिकन पक्ष (बाबासाहेब) | १९३८ | १.६९ |
| ७. | मिलिंद दत्ता अहिरे | भारिप बहुजन महासंघ | ८६१ | ०.७५ |
| ८. | अरुण नारायण भालेराव | जनता दल (एस) | १८६ | ०.१६ |
| ९. | कादर फरिद पटेल | भारतीय अल्पसंख्यांक सुरक्षा महासंघ | ३६४ | ०.३२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | केदल मदन लोटे | ऑल इंडिया युनायटेड डेमॉक्रेसी पार्टी | १०० | ०.०९ |
| ११. | गोरख नारायण घोडके | अपक्ष | १०५ | ०.०९ |
| १२. | शशिकांत सर्जेराव घोडे | अपक्ष | १७३ | ०.१५ |
| १३. | झाफर इकर्शिद चौधरी | अपक्ष | ३१२ | ०.२७ |
| १४. | नितिन रोकडे | अपक्ष | ३३८ | ०.३० |
| १५. | प्रशांत प्रभाकर म्हस्के | अपक्ष | २१२ | ०.१९ |
| १६. | लक्ष्मण बबन जावळे | अपक्ष | ९५३ | ०.८३ |
| १७. | विवेक बनसोडे | अपक्ष | ४९५० | ४.३३ |
| १८. | गणेश दादू शेंडगे | अपक्ष | ४०७ | ०.३६ |
| १९. | सुरेश तुकाराम रणदिवे | अपक्ष | २०५ | ०.१८ |
| २०. | संदिप प्रकाश कांबळे | अपक्ष | २४५ | ०.२१ |




२००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पुणे कन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण २० उमेदवार रिंगणात उभे होते. त्यापैकी १३ उमेदवार अपक्ष होते. परंतु खरी लढत कॉंग्रेस पक्ष व शिवसेना यांच्यामध्ये झाली. कॉंग्रेसचे उमेदवार रमेश बागवे यांना ६५,६३८ मते पडली. तर शिवसेनेचे उमेदवार सदानंद कृष्णा शेट्टी यांना २८३१३ मते मिळाली. यामध्ये रमेश बागवे हे ३७,००० मतांनी निवडून आले.

**२००९ च्या पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पु. | स्त्री | एकूण | |
| पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा | ३१८३४६ | ६४०९७ | ५०२४४ | ११४३४१ | ३५.९१ |

२००९ च्या पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघामध्ये ३१८३४६ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये ११४३४१ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ६४०९७ व स्त्री ५०२४४ मतदारांनी मतदान केले. पुरुष मतदारांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी (२००४) मध्ये कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या ४२५२६७ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार २२६५६८ इतके तर स्त्री मतदार १९८२९९ इतके होते.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर (२००९) पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या ३१८३४६ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १६४७४२ इतके होते. तर स्त्री मतदार १५३६०४ इतके होते.

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघामध्ये जुन्या कॅन्टोन्मेंट विधानसभा विधानसभा मतदारसंघातील हडपसर भाग वगळला आहे. या मतदारसंघाला भवानी पेठ व पर्वती मतदारसंघाचा भाग जोडलेला आहे. या मतदारसंघामध्ये प्रामुख्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस (कमल ढोलेपाटील) कॉंग्रेसचे (बाळासो शिवरकर) व मनसेचे दीपक पायगुडे यांच्यात राजकीय स्पर्धा पाहायला मिळते.

२००४ च्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेसचे बाळासो शिवरकर हे या मतदारसंघातून उभे राहिले होते. तर त्यांच्या विरोधात शिवसेनेच्या लिलावाती विठ्ठल तुपे त्यांना उमेदवारी देण्यात आली. यामध्ये कॉंग्रेसचे बाळासाहेब शिवरकर विजयी झाले.

पुनर्रचनेनंतर २००९च्या निवडणुकीत या मतदारसंघामध्ये पर्वतीचा समावेश झाल्याने या निवडणुकीत रमेश बागवे हे निवडूक रिंगणात उभे राहिले त्यांच्या विरोधात शिवसेनेचे सदानंद शेट्टी यांना उमेदवारी देण्यात आली. या लढतीमध्ये रमेश बागवे हे विजयी झाले.

## २१) कसबा पेठ विधानसभा मतदारसंघ


### मतरदारसंघ पुनर्रचनेनंतरचा कसबा पेठ विधानसभा मतदारसंघ

कसबा विधानसभा मतदारसंघात कसबा गणपती, गावकोस मारूती , विश्रामबाग वाडा, म. फुले मंडई, भरतनाट्य मंदिर, केसरी वाडा, एस.पी.कॉलेज, राजा केळकर संग्रहालय, सिटीपोस्ट, डॉ.कोरवीण दवाखाना, शिवाजी मराठा,सोन्या मारूती, गुरूद्वारा, जैनमंदिर, समता भूमी व बुरूड पूल या भागाचा समावेश केला आहे.

या मतदारसंघाची सीमारेषा सारस बाग, संत तुकडोजी महाराज चौक, खडकमाळ आळी रस्ता, पंचहौद मिशन, म.गांधी विद्यालय, घोरपडे पेठ एकबोटे कॉलनी, रिंबार मार्केट

### २००९ च्या कसबा पेठ विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[११९]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्ष | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | गिरीश बापट | भारतीय जनता पक्ष | ५४९८२ | ३५.३४ |
| २. | सतीश बबन मोहोळ | बहुजन समाजवादी पार्टी | १३९६ | ०.९० |
| ३. | रोहिरा दीपक टिळक | काँग्रेस | ४६७२८ | ३०.०३ |
| ४. | अनिस अहमद | समाजवादी पार्टी | १११० | ०.७१ |
| ५. | रविंद्र हेमराज दंगेकर | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४६८२० | ३०.०९ |
| ६. | मिलिंद रमाकांत एकबोटे | आखिल भारत हिंदू महासभा | १०२७ | ०.६६ |
| ७. | वैशाली विठ्ठल अहिरे | प्रबुध्द रिपब्लिकन पक्ष | १४४ | ०.०९ |
| ८. | अजय वसंत पलढणकर | अपक्ष | १५५ | ०.१० |
| ९. | अब्दुल गणी खान | अपक्ष | १०६ | ०.०७ |
| १०. | अशोक गणपत पालखे | अपक्ष | ८१ | ०.०५ |
| ११. | आयेशबी नौशाद सय्यद | अपक्ष | ९९ | ०.०६ |
| १२. | नारायण शहाजीराव चव्हाण | अपक्ष | १८८ | ०.१२ |
| १३. | नाना क्षीरसागर | अपक्ष | १३० | ०.०८ |
| १४. | महेश सकट | अपक्ष | १४४ | ०.०९ |
| १५. | युनिस अब्दुल करीम शेख | अपक्ष | १४० | ०.०९ |
| १६. | बबन बन्सी रावडे | अपक्ष | ६४८ | ०.४२ |
| १७. | विनय तुकाराम लोंढे | अपक्ष | ४५९ | ०.३० |
| १८. | परमेश्वर बबनराव व्हनकलाव | अपक्ष | २०६ | ०.१३ |
| १९. | अब्दुल रेहमान शेख | अपक्ष | ३४८ | ०.२२ |
| २०. | मुनाफ युसूफ शेख | अपक्ष | ६७६ | ०.४३ |




**२००९ च्या कसबा पेठ विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पु. | स्त्री | एकूण | |
| कसबा पेठ विधानसभा | ३१७०९३ | ८५००१ | ७०४९६ | १५५४९७ | ४९.०३ |

२००९ च्या कसबा पेठ विधानसभा मतदारसंघामध्ये ३१७०९३ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १५५४९७ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८५००१ व स्त्री ७०४९६ मतदारांनी मतदान केले. पुरुष मतदारांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदार संख्या (२००४) १२४७१२ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ६२२६६ तर स्त्री मतदार ६२४४६ इतके होते. पुनर्रचनेनंतर कसबापेठ या विधानसभा मतदारसंघात शिवाजीनगर मतदारसंघाच्या पेठांचा यात आल्याने मतदारसंख्या वाढलेली आहे. त्यानुसार या मतदारसंघाची मतदारसंख्या एकूण ३००४९९ इतकी आहे. त्यापैकी पुरुष मतदार १५११७७ व स्त्री मतदार १४९३२२ इतकी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी (२००४) च्या निवडनूकीत भाजपाचे गिरीश बापट व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आण्णा थोरात यांचात लढत झाली. यामध्ये भाजपाचे गिरीश बापट विजयी झाले. यापूर्वीच्या निवडणुकीमध्ये सुद्धा गिरीश बापट यांनी विजय संपादन करून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेले आहे.

पुनर्रचनेनंतर मात्र कसबा पेठ या मतदारसंघामध्ये निवडणुकीमध्ये चुरस दिसून आली. या मतदारसंघात मनसेचे रवींद्र दिगरकर यांना उमेदवारी दिली तर कॉंग्रेसने रोहित टिळक यांना या मतदारसंघाचे तिकीट दिले. त्यामुळे भाजपाचे गिरीश बापट व यांच्यात तिरंगी लढत चुरशीची झाली. तरीसुद्धा गिरीश बापट हे थोडया फरकाने विजयी झाले. त्यांचे मताधिक्य या निवडणुकीमध्ये घटले.

## २००२ च्या परिसीमन आयोगापूर्वी व पुनर्रचनेनंतरची पुणे जिल्हयातील विधानसभा मतदारसंघाबाबतची अनुमाने

१) जुन्नर विधानसभा मतदारसंघ हा जुन्नर तालुक्यात पुरता मर्यादीत राहिलेला आहे यामध्ये फक्त नारायणगाव महणुक मंडळाचा समावेश केलेला आहे. हा मतदारसंघ ग्रामीण असून या मतदारसंघातील ग्रामीण असून या मतदारसंघातील अनु जातीची संख्या १५% तर अनु.जमातीचे संख्या ४% असूनसुद्धा या मतदारसंघावर मराठा जातीच्या उमेदवाराचे वर्चस्व राहिलेले आहे. या मतदारसंघाचे नेतृत्व मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी रा. कॉंग्रेसचे वल्लभ बेनके यांनी केले पुनर्रचनेपूर्वी पुन्हा १९९९ नंतर शिवसेनेने या मतदारसंघामध्ये २००९ च्या निवडणुकीत महिला उमेदवाराला तिकिट दिले या ही निवडणुक रा. कॉंग्रेस व शिवसेना यांच्यात अटीतटीची झाली यामधून वल्लभ बेनके पुन्हा विजयी झाले.

२) पुनर्रचनेपूर्वी आंबेगाव विधानसभा मतदारसंघामध्ये नारायणगांव या महपूक मंडळाचा समावेश होता. या मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा प्रभाव/नियंत्रण आहे. दिलीप वळसे पाटील या मतदारसंघाचे नेतृत्व करत आहे. पुनर्रचनेनंतरच्या २००९ च्या निवडणुकीत जुन्नर विधानसभेप्रमाणेच शिवसेनेने आंबेगाव विधान सभेच्या २००९ च्या निवडणुकीत महिला उमेदवाराला तिकीट दिले. परंतु २००९ च्या निवडणुकीत दिलीप वळसे पाटील विजयी झाले. हा मतदारसंघ ग्रामीण आहे. या मतदारसंघामध्ये सातत्याने मराठा उमेदवार निवडून आले आहेत. या मतदारसंघामध्ये शिरूर चा भाग येत असल्याने तसेच शिरूरमधून तर भाजपचे नियंत्रण असल्याने शिरूर मधून कल्पना आढळराव यांना उमेदवारी दिलेली होती. परंतु रा.कॉ. बालेकिल्ला फोडण्यात शिवसेना अयशस्वी ठरली. आंबेगांचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला पुनर्रचनेनंतर शिरूर भागाचा पाठिंबा नेहमीच मिळवावा लागणार आहे तरच राजकीय भविष्य निश्चित होणार आहे.

३) खेड तालुक्याचा खेड आळंदी मतदारसंघात समावेश केला आहे. खेड आळंदी मतदारसंघात १६ % लोक संख्या शहरी आहे तर ८४% लोकसंख्या ग्रामीण आहे.

त्यामुळे हा मतदारसंघ ग्रामीण अहो या मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नियंत्रण आहे. २००४ पर्यंत व २००९ ला मराठा व माळी समाजाचे उमेदवार या मतदारसंघात निवडून आले आहेत.

४) पुनर्रचनेनंतर शिरूर विधान सभा मतदारसंघामध्ये शिरूर व हवेली तालुक्यातील गावांचा समावेश आहे. हा मतदारसंघ नीमशहरी स्वरूपाचा आहे. पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघावर रा.कॉंग्रेसचे नियंत्रण होते पुनर्रचनेनंतर सुद्धा या मतदारसंघावर रा.कॉंग्रेसचे नियंत्रण राहून २००९ च्या निवडणुकीत अशोक रावसो पवार हा पक्षाचा नवीन नेतृत्व या मतदारसंघाला मिळाले. या मतदारसंघात प्रामुख्याने मराठा व धनगर अशा दोन समाजामध्ये राजकीय स्पर्धा राहिलेली आहे. (नवीन नेतृत्व)

५) दौंड विधानसभा मतदारसंघात केवळ दौड तालुक्यातील लोकसंख्येचा समावेश आहे.

१) बारामती तालुक्यातील सुपा महसूल मंडळ या मतदारसंघातून कमी झाल्यामुळे या मतदारसंघावर बारामती नियंत्रण कमी झाले आहे.

२) या मतदारसंघावर रा. कॉंग्रेसचे नियंत्रण आहे. परंतु २००९ च्या निवडणुकीमध्ये या पक्षात बंडखोरी झाली. या पक्षाचे उमेदवार रमेश थोरात अपक्ष म्हणून निवडणुक लढवून विजयी झाले.

३) या मतदारसंघामध्ये मराठा जातीचे उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत.

६) पुनर्रचनेपूर्वी इंदापूर मतदारसंघ तालुक्यापुरता मर्यादित होता. पुनर्रचनेनंतरसुद्धा तो तालुक्यातपुरताच मर्यादित आहे. या मतदारसंघावर कॉंग्रेसचे नियंत्रण आहे. या तालुक्यातचे नेते हर्षवर्धन पाटील या तालुक्याचे नेतृत्व १९९५ पासून करीत आहे. पुनर्रचननेनंतर सुद्धा या मतदारसंघात बदल झाला नाही हा शहरी मतदारसंघ आहे. या मतदारसंघातून मराठा व धनगर अशी राजकीय स्पर्धा सुरू आहे.

७) पुनर्रचनेपूर्वी बारामती लोकसभ मतदारसंघात केवळ बारामती तालुक्यापुरता मर्यादित होता परंतु पुर्नचनेनंतर यामध्ये सुपा महसूल मंडळाचा समावेश केला आहे. हा मतदारसंघ शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण जास्त आहे. या मतदारसंघावर रा.कॉ.नियंत्रण राहिलेले आहे.

या मतदारसंघामध्ये मराठा व धनगर अशी राजकीय स्पर्धा दिसते. या मतदारसंघाचे नेतृत्व सध्या अजित पवार करीत आहे. एकूणच पुनर्रचनेचा या मतदारसंघावर परिणाम झालेला नाही.

८) नवीन भोर विधानसभा मतदारसंघामध्ये मुळशी तालुक्याचा समावेश केलेला आहे. हा मतदारसंघ ग्रामीण आहे भोर व मुळशी तालुक्याची लोकसंख्या सारखी असल्यामुळे या मतदारसंघामध्ये नेतृत्वाबाबत चढाओढ होऊ शकते. १९९९ पासून कॉंग्रेस–रा.कॉंग्रेसची आघाडी असल्यने ही जागा रा. कॉंग्रेसचने कॉंग्रेसला सोडलेली होती. या मतदारसंघातून सातत्याने मराठा समाजाचे उमेदवार निवडून येत आहेत.

या मतदारसंघात कॉंग्रेसखेरीज शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेसची ताकद आहे. या मतदारसंघाचे नेतृत्व पुनर्रचनेनंतर अनंतराव थोपटे यांचे पुत्र सग्राम थोपटे करीत आहे. या मतदारसंघावर कॉंग्रेसचा प्रभाव कायम राहिलेला आहे.

९) पुरंधर विधानसभा मतदारसंघात पुरंधर तालुक्याखेरीज हवेली तालुक्यातील विसोळी, उंडी, आंबेगाव बुद्रुक या गावांचा समावेश आहे.

पुणे महापालिकेतील शहरीभाग या मतदारसंघास नव्याने सामील केल्यामुळे या मतदारसंघातील सत्तासमीकरणे बदलेली दिसून येतात.

या मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचा पुनर्रचनेपूर्वी (२००४) चा अपवाद वगळता या मतदारसंघावरतून जनता दलाचे आमदार दादा जाधवराव निवडून यायचे परंतु पुनर्रचनेनंतर या मतदारसंघामध्ये शिवसेनेने शिरकाव केला . २००९ च्या निवडणुकीमध्ये या भागातील नेते विजय शिवतारे या निवडणुकीत शिवसेनेच्या तिकिटावर निवडून आले. या मतदारसंघामध्ये कॉंगेसचे संजय जगताप, जनता दलाचे दादा जाधवराव व शिवसेनेचे उमेदवार विजय शिवतारे यांच्यात तिरंगी लढत झाली परंतु या अटीतटीच्या लढतीत पुनर्रचनेनंतरच्या जोडलेल्या हवेली तालुक्यातील निर्णायक मते विजय शिवतारे यांना विजयी करण्यास साह्यभूत ठरली विजय शिवतारे यांच्या रूपाने नवीन नेतृत्व या मतदारसंघाला मिळाले.

१०) १)पुनर्रचनेनंतच्या मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये चिंचवड गांव व देदुसडे कॅन्टान्मेटचा समावेश करण्यात आला आहे.

२) हा मतदारसंघ निमशहरी स्वरूपाचा आहे.

३ ) त्यामुळे या मतदारसंघात शहरी व ग्रामीण अशी स्पर्धा राहिल.

४) १९९९ पासून या मतदारसंघावर भाजपाचे वर्चस्व आहे.

५) २००९ च्या निवडणुकीत पुनर्रचनेनंतर या मतदारसंघात संजय बेगडे यांच्या रूपाने नवीन नेतृत्व उदयास आले.

६) या मतदारसंघात कॉंग्रेसने १९९० पर्यंत अमराठी ताकद उभी केलेली होती. त्यामुळे

७) पुनर्रचनेपूर्वी मराठा नेते कॉंग्रेसकडून भाजपाकडे सरकलेले दिसून येते.

११) १) पुनर्रचनेनंतरच्या नवीन चिंचवड विधानसभ मतदारसंघ जुन्ना हवेली व मुळशी विधान सभा मतदारसंघातील जाग सोडून तयार झाला आहे.

२) हा मतदारसंघ ९० % शहरी आहे.

३) पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नियंत्रण होते.

४) पुनर्रननेनंतर २००९ च्या निवडणुकीत या मतदारसंघात शिवसेनेने शिराकाव केला आहे.

५) राष्ट्रवादी पक्षाचे बंडखोर अपक्ष उमेदवार लक्ष्मण पांडुरंग जगताप व शिवसेनेचे श्रीरंग बाटणे यांच्यात अटीतटीची लढत घेऊन यामध्ये लक्ष्मण जगताप विजयी झाले.

१२) पुणे जिल्ह्यातील एकूण पुनर्रचनेनंतरच्या २१ विधानसभा मतदारसंघापैकी पिंपरी हा एक अनुसूचित जाती राखीव मतदारसंघ आहे तर दुसरा पुणे कॅन्टोन्मेट मतदारसंघ आहे. पिंपरी या मतदारसंघात एकूण लोकसंख्येपैकी १३ % लोकसंख्या अनुसूचित जातीची आहे.

नव्याने निर्माण झालेल्या या पिंपरी अनुसूचित जातीच्या राखीव मतदारसंघामध्ये रा.कॉ.चे अण्णा बनसाडै तर भाजपाचे अमर साबळे यांच्या लढत झाली यामध्ये अण्णा बनसाडै विजयी झाले . एकूणच कॉंग्रेसचा प्रभाव राहिलेला आहे.

१३) पुनर्रचनेनंतरच्या नवीन मतदारसंघापैकी एक भोसरी मतदारसंघ ओळखला जातो. या मतदारसंघात हवेली तालुक्यातील बहुतांश भागामध्ये आलेला आहे.

२) या मतदारसंघामध्ये मराठा व माळी यांच्यात राजकीय स्पर्धा दिसते.

३) पुनर्रचनेनंतरच्या या मतदारसंघामध्ये शिवसेनेकडून महिला उमेदवार सुलभा उबाळे यांना तिकीट देण्यात आले तर राष्ट्रवादीचे बंडखोर उमेदवार विलास लांडे यांनी निवडणुक लढविली होती. तर रा.कॉंग्रेसनेसुद्धा शिवसेनेच्या महिला उमेदवारा विरोधात महिला उमेदवार म्हणून चिंचवड महापालिकेत सदस्य म्हणून राहिलेल्या मंगला कदम यांना उमेदवारी दिली होती. या तिरंगी लढती अपक्ष उमेदवार विकास लांडे यांना स्थानिक प्रतिनिधी म्हणून मतदारांनी पसंती दिली.

१४)नव्याने निर्माण करण्यात आलेल्या वडगांवशेरी विधानसभा मतदारसंघात–जुना बोपोडी, भवानीपेठ व हवेली मतदारसंघातील भाग जोडून नव्या मतदारसंघाची निर्मिती केली.

त्यातच मांजरी खुर्दचा समावेश या मतदारसंघात केल्यामुळे–मतदारसंघातील भौगोलिक रचना सलग दिसत नाही.

नव्याने निर्माण करण्यात आलेल्या या मतदारसंघामध्ये पुनर्रचनेपूर्वी रा.कॉंग्रेसचे वर्चस्व होते तर पुनर्रचनेनंतर रा.कॉंग्रेसचे उमेदवार बापूसाहेब पठारे २००९ च्या निवडणुकीत विजयी झाले.

१५) १) शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेनंतर जुना शिवाजीनगरचा अर्ध विभाग व बोपोडीचा अर्धा भाग मिळून तयार झालेला आहे.

२) यामुळे या मतदारसंघात शहरी व उपनगरी असे दोन प्रकार दिसून येतात.

३) या मतदारसंघामध्ये पुनर्रचनेपूर्वी २००४ पर्यंत शिवसेनेचे या मतदारसंघावर वर्चस्व होते.

४) पुनर्रचनेनंतर शिवसेनेचे उमेदवार विनायक निम्हण यांनी २००४ नंतर कॉगेसमध्ये प्रवेश केला व २००९ च्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाकडून निवडणुक लढविली यामध्ये विनायक निम्हण यामध्ये विजयी झाले.

५) पुनर्रचनेनंतर कॉंग्रेसपक्षाने या मतदारसंघावर कब्जा केला व आतापर्यंत शिवसेनेचे असणारे या मतदारसंघावरील वर्चस्व सपुष्टांत आणले.

६) या पातळीवर पक्षबदल झालेला आहे.

१६) कोथरूड विधानसभा शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचे विभाजन करत तयार करण्यात आला आहे. या मतदारसंघामध्ये पुनर्रचनेनंतर शिवसेनेचे चंद्रकांत मोकाटे तर मनसेचे किशोर शिंदे यांच्या लढत झाली शिवसेनेचे चंद्रकांत मोकाटे या मतदारसंघात विजयी झाले. शिवाजी नगर भागात शिवसेनेचे वर्चस्व आहे. त्यामुळे कोथरूड विधानसभा मतदारसंघावर सुद्धा त्याचा परिणाम झालेला दिसून येतो.

१७) नव्याने निर्माण करण्यात आलेल्या खडकवासला जुन्या मुळशी व पुणे कॅन्टोन्मेट विधानसभा मतदारसंघातील भाग या मतदारसंगाला जोडलेला आहे. हा मतदारसंघ निमशहरी व निमग्रामीण स्वरूपाचा आहे. या मतदारसंघामध्ये ग्रामीण भागातील ३७ गावांचा समावेश यामध्ये करण्यात आलेला आहे.

या मतदारसंघावर पुनर्रचननेपूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेसचा प्रभाव होता. परंतु पुनर्रचनेनंतर या मतदारसंघत मनसेने शिरकाव केलेला आहे. मनसेचे उमेदवार रमेश वांगळे व राष्ट्रवादीचे विकास दांगट यांच्यात लढत होऊन मनसेचे रमेश वांजळे हे विजयी

झाले व पुनर्रचनेनंतर या मतदारसंघात आतापर्यंत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे वर्चस्व संपुष्टात येऊन या मतदारसंघात मनसे हा मतदारसंघ आपल्या तााब्यात घेतला व त्याबरोबरच या नवीन मतदारसंघाला नवीन नेतृत्व रमेश वांजळे यांच्या रूपाने मिळाले.

१८) जुना पर्वती मतदारसंघातील मोठा भाग कसबा पेठ, पुणे कॅन्टोन्मेट व खडकवासला विधानसभा मतदारसंघाला जोडला गेल्याने मतदारसंघाचा आकार कमी झालेला आहे. पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघावर कॉंग्रेसचे नियंत्रण होते. परंतु पुनर्रचनेनंतर या मतदारसंघामध्ये पक्षबदल झालेला दिसून येतो. या मतदारसंघामध्ये २००९ साली निवडणुकीत भाजपाकडून प्रथमच महिला उमेदवार म्हणून माधुरी सतिश मिसाळ यांना उमेदवारी देण्यात आली यांच्या विरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सचिन तावरे यांनी निवडणुक लढविली या निवडणुकीत भाजपाच्या माधुरी सतिश मिसाळ विजयी झाले व या मतदारसंघाला पुनर्रचनेनंतर प्रथमच महिला उमेदवार विजयी झाले आहेत.

१९) नवीन हडपसर मतदारसंघाची निर्मिती जुन्या पुणे विधानसभा मतदारसंघाची फोड करून झालेली आहे.

पूनर्रचनेपूर्वी हा मतदारसंघ जुना कॅन्टोन्मेट मतदारसंघात होता. पुनर्रचपूर्वी या मतदारसंघावर कॉंग्रेसपक्षाचे वर्चस्व होते. या मतदारसंघाचे २००४ पर्यंत बाळासाहेब शिवरकर (कॉंग्रेस) नेतृत्व करीत होते. पुनर्रनेनंतर कॉंग्रेसपक्षाचा प्रभाव या मतदारसंघावर राहिला नाही. पुनर्रचनेनंतर या मतदारसंघास शिवसेनेने शिरकाव केला. २००९ च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे गजानन बाबर व कॉंग्रेसचे चंद्रकात शिवरकर यांच्यात लढत झाली. यामध्ये शिवसेनेचे गजानन बाबर विजयी झाले व पुनर्रचनेनंतर नवीन नेतृत्व गजानन बाबर यांच्यारूपाने या मतदारसंघाला मिळाले. त्या बरोबरच आतापर्यंतची कॉंग्रेसचे या मतदारसंघाावर असणारे वर्चस्व संपृष्टात येऊन या मतदारसंघात पक्ष बदल झाला.

२०) जुन्या कॅन्टोन्मेट मतदारसंघातील हडसरच्या भाग या मतदारसंघातून वगळण्यात आला. पर्वती व भवानी पेठेचा भाग या मतदारसंघाला जोडण्यात आला. मतदारसंघ रचनेपूर्वी हा मतदारसंघाचे नेतृत्व JNP चे विठ्ठल तुपे व कॉंग्रेसचे बाळासाहेब शिवरकर यांनी अनुक्रमे १९७८, ८०, ८५ व १९९९ व २००४ ला केले.

पुनर्रचनेनंतर हा या मतदारसंघातील भागातील रमशे बागवे हे २००९ च्या निवडणुकीत या मतदारसंघातून उभे राहिले व कॉंग्रेसकडून ते विजयी झाले. पर्वतीचा

बरचा मोठा भाग या मतदारसंघात टाकल्याने त्याचा फायदा कॉंग्रेसचे रमेश बागवे यांना झाला व पुनर्रचनेनंतर या मतदारसंघामध्ये बाहेरील मतदारसंघातून येऊन या मतदारसंघावर वर्चस्व प्रस्थापित केले व स्थानिक प्रतिनिधीना पराभूत व्हावे लागले.

२१) नवीन कसबा पेठ मतदारसंघामध्ये शिवाजीनगर मतदारसंघातील पेठांचा भाग या मतदारसंघात आलेला आहे.

पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघाचे भाजपाचे गिरीश बापट यांनी नेतृत्व केलेले आहे. पुनर्रचनेनंतर भाग या मतदारसंघामध्ये मनसेकडून रवींद्र दगेकर यांना उमेदवारी देण्यात आली तर कॉंग्रेसकडून रोहित टिळक यांना उमेदवारी देण्यात आली. अशा या तिरंगी अटीतटीच्या लढतीत भाजपाचे गिरीश बापट थोड्या फरकाने विजयी झाले एकूणच या मतदारसंघातील लढत ही रंगतदार झाली.

पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाची संख्या १८ इतकी होती. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यातील एक विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्या तीन लाख ४४ हजार राहील. या सुत्रामुळे विधानसभेच्या १८ मतदारसंघाऐवजी विधान सभेचे २१ मतदारसंघ तयार झाले. या तीन मतदारसंघाची वाढ हवेली तालुक्यात झाली.

तदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यातील चिंचवड पिंपरी, भोसरी, वडगांवशेरी, खडकवासला व हडपसर हे विधान सभेचे सहा मतदारसंघ नव्याने उदयास आले आहेत. हे सहाही मतदारसंघ शहरी स्वरूपाचे आहेत. जुने तीन (मुळशी, हवेली व भवनीपेठ) हे मतदारसंघ रद्द झाले.

पुनर्रचनेपूर्वी

पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यातील विधानसभेच्या २१ जागापैकी १९ जागा सर्वसाधारण वर्गासाठी व २ जागा अनुसूचित जातीसाठी (पिंपरी व कॅन्टोन्मेट) राखीव आहेत.

## मतदारसंघ पुनर्रचनेनंतर जिल्हा परिषद पातळीवर झालेले राजकीय व सामाजिक बदल

### पुणे जिल्हा परिषद राखीव जागा पुणे अहवाल १९९४ ते २००३[१२०]

| अ.नं. | जिल्हा परिषद | १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | एकूण जागा | राखीव जागांचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जनरल | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | बीसीसी | |
| | | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | हवेली | ५९६३८६ | ६३४०५ | १०२११ | ३० | १८ | ६ | ३ | १ | १ | ० | ८ | ३ |
| २ | खेड | २७३२५५ | १०३८१ | ३४३६२ | १४ | ७ | ३ | १ | ० | २ | १ | ४ | १ |
| ३ | आबेगांव | १८६८८०९ | ६४५३ | ३९०६६ | १० | ५ | १ | ० | ० | २ | १ | ३ | १ |
| ४ | जुन्नर | २८१५३५ | ९७३२ | ५६८१० | १४ | ७ | ३ | ० | ० | ३ | १ | ४ | १ |
| ५ | शिरूर | २२०९९५ | १५२१९ | ४७८१ | १२ | ८ | ३ | १ | ० | ० | ० | ३ | १ |
| ६ | दौंड | २३०६४१ | ३११२२ | ३८५३ | १२ | ७ | २ | २ | १ | ० | ० | ३ | १ |
| ७ | इदापुर | २७५७३९ | ४२४२३ | ३०२६ | १४ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| ८ | बारामती | २६५९२७ | ३५०४० | १८३२ | १४ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| ९ | पुरंदर | १६५४९८ | १०२६८ | ३९२९ | ८ | ६ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| १० | भौर | १३९८३८ | ७७७० | २९३६ | ६ | ४ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ११ | वेल्होर | ५३९६८ | ३५८० | १४४० | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० |
| १२ | मुळशी | १२३३२६ | ८९५५ | ४९५९ | ६ | ४ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| १३ | मावळ | १६३३८३ | ८३९९ | १५१८८ | ८ | ५ | २ | ० | ० | १ | ० | २ | १ |
| | **एकूण** | २९७८३०० | २५२७४७ | १८२३९३ | १५० | ८८ | ३१ | ११ | ४ | ९ | ३ | ४२ | १४ |

१९९७ ते १९९८ या कालावधीत जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा आढावा घेत असताना त्या जिल्ह्याची लोकसंख्या एकूण जागा व राखीव जागांचा आढावा घेण्यात आला. पुणे जिल्ह्याची या कालावधीत १९९१ च्या जनगणनेनुसार २९७८३०० इतकी लोकसंख्या होती. त्यापैकी २५२७४७ इतकी लोकसंख्या अनुसूचित जातीची होती तर BCC अनुसूचित जमातीचे प्रमाण १८२३९३ इतके होते. पुणे जिल्हा परिषदेच्या एकूण ७५ जागापैकी ४४ जागा सर्वसाधारण गटासाठी राखीव होत्या. त्यापैकी १४ जा महिलांसाठी राखीव होत्या. अनुसूचित जातीच्या एकूण ६ जागापैकी २ जागा अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव होत्या. अनुसूचित जमातीच्या एकूण ५ जागांपैकी २ जागा महिलांना राखीव होत्या. तर BCC च्या

एकूण २० जागांपैकी ७ जागा महिलांसाठी राखीव होत्या. या निवडणुकीत १९५०४८३ मतदारांपैकी ९९५७६७ पुरुष मतदार होते. तर ९५४७१६ स्त्री मतदार होते. या निवडणुकीत एकूण ६९.२३ इतके मतदान झाले.

## मतदारसंघ पुनर्रचनेनंतर जिल्हा परिषद पातळीवर झालेले राजकीय व सामाजिक बदल

### पुणे जिल्हा परिषद

**राखीव जागा जिल्हा परिषद पुणे अहवाल २००४ ते २००९**[१२१]

| जिल्हा | २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | एकूण जागा | महिलासांठी जागा | राखीव जागांचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | | | जनरल | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | बीसीसी | |
| | | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| पुणे | ३३०८९७८ | २७१८५० | २०९६७३ | ७५ | २५ | ३९ | १२ | ९ | ३ | ७ | ३ | २० | ७ |

२००४ ते २००९ या कालावधीत जिल्हा परिषद पुणे निवडणुकीचा आढावा घेत असताना २००१ च्या जनगणेनुसार पुणे जिल्ह्याची लोकसंख्या ३३०८९७८ इतकी होती. त्यापैकी २७१७५० इतके प्रमाण अनुसूचित जातीचे होते तर २०९६७३ इतके प्रमाण अनुसूचित जमातीचे होते. पुणे जिल्हा परिषदेच्या एकूण ७५ जागांपैकी २५ जागा महिलांसाठी राखीव होत्या. त्यापैकी सर्वसाधारण महिलांसाठी ३९ पैकी १२ जागा राखीव होत्या. अनुसूचित जातीच्या महिलांसाठी ९ जागांपैकी ३ जागा राखीव होत्या. अनुसूचित जमातीच्या एकूण ७ जागांपैकी ३ जागा महिलांसाठी राखीव होत्या तर BCC च्या एकूण २० जागांपैकी ७ जागा महिलांसाठी राखीव होत्या.

## राखीव जागा जिल्हा परिषद पुणे अहवाल २००४ ते २००९[१२२]

| जिल्हा | २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | एकूण जागा | महिलांसाठी जागा | राखीव जागांचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | | | सर्वसाधारण | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | BCC | |
| | | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| पुणे | ३२९०२८० | २६८९१४ | २०९०९२ | ७५ | ३८ | ४४ | २२ | ६ | ३ | ५ | ३ | २० | १० |

२००९ ते २०१३ या कालावधीत जिल्हा परिषद पुणे निवडणुकीचा आढावा घेत असताना २००१ च्या जनगणेनुसार पुणे जिल्ह्याची लोकसंख्या ३२९०२८० इतकी होती. त्यापैकी २६८९१४ इतके प्रमाण अनुसूचित जातीचे होते तर २०९०९२ इतके प्रमाण अनुसूचित जमातीचे होते. पुणे जिल्हा परिषदेच्या एकूण ७५ जागांपैकी ३८ जागा महिलांसाठी राखीव होत्या. त्यापैकी सर्वसाधारण वर्गासाठी (महिला) २२ जागा होत्या. अनुसूचित जातीच्या महिलांसाठी ६ जागांपैकी ३ जागा राखीव होत्या. अनुसूचित जमातीच्या एकूण ५ जागांपैकी ३ जागा महिलांसाठी राखीव होत्या तर BCC च्या एकूण १० जागा महिलांसाठी राखीव होत्या.

### जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पक्षनिहाय मिळालेल्या जागा
### जानेवारी २००४ ते जानेवारी २००९[१२३]

| जिल्हा परिषद | एकूण विभाग | SEATS WON BY DEFERENT POLITICAL PARTIES | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | भाजप | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(मार्क्सवादी) | शिवसेना | जनता दल (एस) | SWP | BRP | RPI | PWP | आघाडी | इतर | अपक्ष |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| पुणे | ७५ | १० | ४८ | २ | --- | -- | ६ | २ | -- | -- | -- | -- | -- | १ | ६ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००४ ते २००९ या कालावधीत झालेल्या पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत ७५ जागांपैकी ४८ जागा राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकून प्रथम क्रमांकावर राहिला. तर काँग्रेसला १० जागा, BCC ला २ जागा शिवसेनेला ६ जागा JD(S)

ला २ जागा, इतर १ जागा तर अपक्षाला ६ जागा मिळाल्या. या निवडणुकीत राष्ट्रीय काँग्रेसला एकहाती सत्ता मिळाली.

**जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पक्षनिहाय मिळालेल्या जागा**

जानेवारी २००९ ते जानेवारी २०१३[१२४]

| जिल्हा | एकूण मते | पक्षनिहाय मिळालेल्या जागा | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भाजप | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | राष्ट्रवादी काँग्रेस | काँग्रेस | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) | बहुजन समाज वादी पार्टी | शिवसेना | मनसे | Parties Regd. Sec. | अपक्ष | A/F | नोटो |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| पुणे | १६४५३९४ | ६२१४३ | ० | ७६८७२९ | २३०५८६ | ० | ८९४३ | २५१९१४ | ५९०७८ | १४३५८७ | ११४४४१४ | ० | ० |
| | | ३.७८ | ०.०० | ४६.७२ | १४.३८ | ०.०० | ०.५४ | १५.३१ | ३.५९ | ८.७३ | ६.९५ | ०.०० | ०.०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ ते २०१३ या कालावधीत झालेल्या पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये विविध राजकीय पक्षांना पडलेल्या मतांचा विचार करता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जास्त मतदान झालेले दिसून येते. पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये एकूण १६४५३९४ मतदारांपैकी  ७६८७७२९ इतके मतदान राष्ट्रवादी काँग्रेसला झालेले आहे. त्याची टक्केवारी ४६.७२ इतकी आहे. त्याच्या खालोखाल काँग्रेसला २३६५८६ इतकी मते पडली त्यचे प्रमाण १४.३८ इतके राहिले तर इतर पक्षांचे त्यांच्या तुलनेत कमी प्रमाण राहिलेले दिसून येते. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव जास्त राहिलेला दिसून येतो.

**पुणे जिल्हा परिषद**

राज्यातील जिल्हा परिषद राजकारणातील स्थानिक राजकीय अभिजन हे सहकार जमिन मालकी प्रभावशाली जात या घटकातून अभिजन म्हणून स्थाानिक राजकारणात ाले होत. अशा राजकीय अभिजनाकडे जिल्हा परिषद राजकारणाची सत्ता एकवटलेली होती.

**पुर्नरचनेपूर्वी (२००७) :**

पुर्नरचनेपूर्वी पुणे जिल्हा परिषदेच्या २००७ च्या निवडणुकीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की या निवडणुकीमध्ये एकूण मतदारांची संख्या २२०७६१५ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ११३५३७८ तर स्त्री मतदार १०७२२३७ इतके होते.

जिल्हा परिषदेच्या एकूण ७५ जागापैकी सर्वसाधारण गटांसाठी ४४ जागा अनुसूचित जातीसाठी ६ जागा अनुसूचित जमातीसाठी ५ जागा तर बीसीसी साठी २० जागा राखीव ठेवण्यात आल्या.

पुणे जिल्हा परिषदेच्या २००७ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये पक्षनिहाय आढावा घेतला असता असे दिसून येते की, जिल्हा परिषदेच्या ७५ जागांपैकी ४८ जागा राष्ट्रवादी काँग्रेसने मिळवून जिल्हा परिषदेवर वर्चस्व प्रस्थापित केले होते. इतर पक्षामध्ये काँग्रेसला १० जागा तर भाजपला २ जागा व शिवसेनेला ६ जागा, जनता दल २, इतर व अपक्ष ६ जागा मिळाल्या होत्या. एकूणच या जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाच जास्त प्रभाव राहिलेला दिसून येतो.

**पुनर्रचनेनंतर (२०१२)**

पुणे जिल्हा परिषदेच्या २०१२ च्या निवडणुकीचा आढावा घेतला असता या निवडणुकीमध्ये एकूण मतदारांची संख्या ५०८३५९४ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदारांची संख्या २६६३३०६ होती. तर स्त्री मतदारांची सख्या २४२०२८८ इतकी होती. ४४ जागा सर्वसाधारण वर्गासाठी ६ जागा अनुसूचित जातीसाठी ५ जागा अनुसूचित जमातीसाठी तर २० जागा बीसीसी साठी राखून ठेवण्यात आल्या होत्या. एकूणच कोणत्याही वर्गाच्या जागेच्या संख्येत बदल झाला नाही.

पुनर्रचेनेनंतर पुणे जिल्हा परिषदेच्या २०१२ ला झालेल्या निवडणुकीमध्ये पक्षनिहाय जागांचा आढावा घेतला असता मागील निवडणुकीच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागा कमी

झाल्या असूम या निवडणुकीत त्यांना ४२ जागा मिळाल्या. काँग्रेसच्या जगेत फक्त एक जागेने फरका झालेला आहे. या निवडणुकीत शिवसेनेने मागील निवडणुकीच्या तुलनेत दुप्पट जागा म्हणजेच १२ जागा मिळविल्या. तर मनसे १ जागा धर्मनिरपेक्ष ५ जागा तर अपक्षाला १ जागा मिळाली. एकूण या निवडणूकीत स्थानिक पातळीवरील राजकारणात शिवसेनेने आपला प्रभाव निर्माण करण्यास सुरूवात केलेली दिसून येते. ही बाब राष्ट्रवादी काँग्रेस दुर्लक्षून चालणार नाही.

## २००२ च्या परिसीमन आयोगापूर्वी व पुनर्रचनेनंतरची पुणे जिल्यातील जिल्हा परिषद मतदारसंघाबाबतची अनुमाने

१) पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्हा परिषदेच्या एकूण ७५ जागापैकी सर्वसाधारण वर्गासाठी ४४ जाग अनुसूचित जातीसाठी ६ जागा, अनुसूचित जमातीसाठी ५ जागा तर बीसीसीसाठी ४० जागा राखीव होत्या.

पुनर्रचनेनंतर सुद्धा म्हणजे जिल्हा परिषदेच्या २०१२ च्या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या जागा ७५ राहिल्या त्यापैकी सर्वसाधारण वर्गासाठी ४४ जागा अनुसूचित जातीसाठी ६ जागा, अनुसूचित जमातीसाठी ५ जागा तर बीसीसीसाठी २० जागा राखीव होत्या. एकूणच पुनर्रचनेनंतर ही कोणत्याही वर्गाच्या जागेत बदल झाला नाही

२) पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला दिसून येतो. जिल्हा परिषदेच्या एकूण ७५ जागापैकी ४८ जागा राष्ट्रवादी कॉगेसला मिळालेल्या आहेत तर कॉग्रेसच १०, भाजप २, शिवसेना ६, जनतादल २, इतर व अपक्ष ६ जागा मिळाल्या होत्या.

पुनर्रचनेनंतर २०१२ साली झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत राष्ट्रवादी पक्षाच्या जागा कमी झाल्या . ४२ जागा राष्ट्रवादी कॉग्रेसला मिळाल्या, कॉग्रेसला ११, शिवसेनेच्या मागील निवडणुकीपेक्षा दुप्पट म्हणजे १२ जागा मिळवल्या. तर मनसे १, धर्मनिरपेक्ष ५, तर अपक्षाला १ जागा मिळाली. निवडणूकीपेक्षा दुप्पट म्हणजे १२ जागा मिळवल्या. तर मनसे १, धर्मनिरपेक्ष ५, तर अपक्षाला १ जागा मिळाली.

एकूणच या निवडणुकीत स्थानिक पातळीवरील राजकरणात शिवसेनेने आपल्या प्रभाव वरील राजकारणात शिवसेनेने आपल्या प्रभाव निर्माण करण्यास सुरूवात केलेली दिसून येते.

## मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पंचायत समिती पातळीवर झालेले राजकीय व सामाजिक बदल

## पंचायत समिती राखीव जागा पुणे अहवाल १९९४ ते २००३[१२५]

| अ.नं. | पंचायत समिती | १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | एकूण जागा | राखीव जागांचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सर्वसाधारण | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | BCC | |
| | | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | हवेली | ५९६३८६ | ६३४०५ | १०२११ | ३० | १८ | ६ | ३ | १ | १ | ० | ८ | ३ |
| २ | खेड | २७३२५५ | १०३८१ | ३४३६२ | १४ | ७ | ३ | १ | ० | २ | १ | ४ | १ |
| ३ | आंबेगांव | १८६८८०९ | ६४५३ | ३९०६६ | १० | ५ | १ | ० | ० | २ | १ | ३ | १ |
| ४ | जुन्नर | २८२५३५ | ९७३२ | ५६८१० | १४ | ७ | ३ | ० | ० | ३ | ० | ४ | १ |
| ५ | शिरूर | २२०९९५ | १५२१९ | ४७८१ | १२ | ८ | ३ | १ | ० | ० | ० | ३ | १ |
| ६ | दौंड | २३०६४१ | ३११२२ | ३८५३ | १२ | ७ | २ | २ | १ | ० | ० | ३ | १ |
| ७ | इंदापूर | २७५७३९ | ४२४२३ | ३०२६ | १४ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| ८ | बारामती | २६५९२७ | ३५०४० | १८३२ | १४ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| ९ | पुरंदर | १६५४९८ | १०२६८ | ३९२९ | ८ | ६ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| १० | भोर | १३९८३८ | ७७७० | २९३६ | ६ | ४ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ११ | वेल्होर | ५३९६८ | ३५८० | १४४० | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० |
| १२ | मुळशी | १२३३२६ | ८९५५ | ४९५९ | ६ | ४ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| १३ | मावळ | १६३३८३ | ८३९९ | १५१८८ | ८ | ५ | २ | ० | ० | १ | ० | २ | १ |
| | **एकूण** | २९७८३०० | २५२७४७ | १८२३९३ | १५० | ८८ | ३१ | ११ | ४ | ९ | ३ | ४२ | १४ |

पुणे जिल्ह्यातील १३ पंचायत समित्यांची एकूण लोकसंख्या २९७८३०० इतकी आहे. यापैकी २५२७४७ इतके लोकसंख्येचे प्रमाण अनु.जातीचे आहे. तर अनु.जमातीचे प्रमाण १८२३९३ इतके आहे. पंचायत समित्यांच्या एकूण १५० जागांपैकी ३१ जागा सर्वसाधारण महिलांसाठी राखीव आहेत. अनु.जातीच्या ११ जागापैकी ४ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनु.जमातीच्या ९ जागापैकी महिलांसाठी ३ जागा राखीव आहेत. तर महिलासाठी १४ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

### पंचायत समिती -राखीव जागा पुणे - अहवाल २००४ ते २००९[१२६]

| अ.नं. | जिल्हा | पंचायत समिती | एकूण जागा | एकूण महिला | राखीव जागांचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सर्वसाधारण | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | BCC | |
| | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | पुणे | जुन्नर | १६ | ६ | ८ | ४ | १ | ० | ३ | १ | ४ | १ |
| २ | पुणे | आंबेगांव | १० | ४ | ५ | २ | ० | ० | २ | १ | ३ | १ |
| ३ | पुणे | शिरूर | १२ | ४ | ८ | २ | १ | १ | ० | ० | ३ | १ |
| ४ | पुणे | खेड | १४ | ५ | ७ | ३ | १ | ० | २ | ० | ४ | १ |
| ५ | पुणे | मावळ | १० | ४ | ६ | ३ | ० | ० | १ | ० | ३ | १ |
| ६ | पुणे | मुळशी | ६ | २ | ३ | ० | १ | १ | ० | ० | २ | १ |
| ७ | पुणे | हवेली | २० | ७ | १३ | ४ | २ | १ | ० | ० | ५ | २ |
| ८ | पुणे | दौंड | १४ | ५ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| ९ | पुणे | पुरंदर | ८ | ३ | ६ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| १० | पुणे | वेल्होर | ४ | २ | ३ | २ | ० | ० | ० | ० | १ | ० |
| ११ | पुणे | भोर | ८ | ३ | ६ | २ | ० | ० | ० | | २ | १ |
| १२ | पुणे | बारामती | १४ | ५ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| १३ | पुणे | इंदापूर | १४ | ५ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| | | **एकूण** | १५० | ५५ | ८९ | ३३ | १२ | ६ | ८ | ३ | ४१ | १३ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००४ ते २००९ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा आढावा घेत असताना पुणे जिल्ह्यातील एकूण १३ पंचायत समित्यांच्या एकूण १३ पंचायत समित्यांच्या एकूण १५० जागांपैकी ५५ जागा महिलासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सर्वसाधारण वर्गासाठी ८९ जागांपैकी ३३ जागा महिलासाठी राखीव ठेवल्या आहेत. अनुसूचित जातींच्या १२ जागांपैकी ६ जागा या अनूसूचित जातींच्या महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. अनूसूचित जमातीच्या ८ जागांपैकी ३ जागा महिलांसाठी राखीव आहेत तर BCC च्याएकूण ४१ जागांपैकी १३ जागा या महिलासाठी राखीव ठेवल्या आहेत.

## पंचायत समिती -राखीव जागा पुणे अहवाल २००९ ते २०१३[१२७]

| अ.नं. | जिल्हा | पंचायत समिती | एकूण जागा | एकूण | राखीव जागांचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सर्वसाधारण | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | BCC | |
| | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | पुणे | जुन्नर | १६ | ८ | ८ | ३ | १ | १ | ३ | २ | ४ | २ |
| २ | पुणे | आंबेगांव | १० | ५ | ५ | २ | ० | ० | २ | १ | ३ | २ |
| ३ | पुणे | शिरूर | १२ | ६ | ८ | ४ | १ | ० | ० | ० | ३ | २ |
| ४ | पुणे | खेड | १४ | ७ | ७ | ३ | १ | १ | २ | १ | ४ | २ |
| ५ | पुणे | मावळ | १० | ५ | ६ | २ | ० | ० | १ | १ | ३ | २ |
| ६ | पुणे | मुळशी | ६ | ३ | ४ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ७ | पुणे | हवेली | २० | १० | १३ | ६ | २ | १ | ० | ० | ५ | ३ |
| ८ | पुणे | दौंड | १४ | ७ | ८ | ४ | २ | १ | ० | ० | ४ | २ |
| ९ | पुणे | पुरंदर | ८ | ४ | ६ | ३ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| १० | पुणे | वेल्होर | ४ | २ | ३ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ११ | पुणे | भोर | ८ | ४ | ६ | ३ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| १२ | पुणे | बारामती | १४ | ७ | ८ | ४ | २ | १ | ० | ० | ४ | २ |
| १३ | पुणे | इंदापूर | १४ | ७ | ८ | ४ | २ | १ | ० | ० | ४ | २ |
| | | **एकूण** | १५० | ७५ | ९० | ४१ | ११ | ६ | ८ | ५ | ४१ | २३ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ ते २०१३ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा आढावा घेत असताना पुणे जिल्हातील एकूण १३ पंचायत समित्यांच्या एकूण १३ पंचायत समित्यांच्या एकूण १५० जागांपैकी ७५ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सर्वसाधारण वर्गासाठी ९० जागांपैकी ४१ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. अनुसूचित जातींच्या ११ जागांपैकी ६ जागा या अनुसूचित जातींच्या महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. अनुसूचित जमातीच्या ८ जागांपैकी ५ जागा महिलासाठी राखीव आहेत तर एकूण ४१ जागांपैकी २३ जागा या महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत.

## पंचायत समिती पक्षनिहाय निकाल पुणे अहवाल १९९४ ते २००३[१२८]

| अ. न. | पंचायत समिती | प्रत्यक्ष मतदान | पक्षनिहाय मिळालेल्या मतांची टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | काँग्रेस | राष्ट्रवादी | भारतीय जनता पक्ष | शिवसेना | O/A/F | अपक्ष |
| **१** | **२** | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | हवेली | १२३०५० | २७.३८ | ३६०.९२ | ०.८१ | २६.८६ | ०.२५ | ७.७७ |
| २ | खेड | ११७८६४ | ४२.८७ | ३८.२४ | ३.३५ | ७.९७ | .०० | ७.५७ |
| ३ | आंबेगांव | ८०५६४ | १२.११ | ४४.६७ | ०.८४ | ४१.७१ | ०.०० | ०.६७ |
| ४ | जुन्नर | १२६४९८ | १२.७४ | ४१.१३ | ०.०३ | ४२.७७ | ०.०० | ३.३२ |
| ५ | शिरूर | १०४६२३ | २६.७४ | ३९.६७ | १४.६७ | ०.०० | १.७२ | १७.४६ |
| ६ | दौंड | ९७८९७ | १४.०७ | ५२.७१ | १९.८५ | २.०७ | ०.०० | ११.२९ |
| ७ | इंदापूर | १२८४५१ | ०.०० | ४१.९४ | ८.०२ | ०.३३ | ४८.८६ | ०.८४ |
| ८ | बारामती | १२४०७९ | | ५५.८४ | ०.०० | ०.०० | ४०.३२ | ३.८४ |
| ९ | पुरंदर | ७४६३९ | ३१०२१ | २३.०५ | १.०२ | १.३७ | ४२.६३ | ०.७१ |
| १० | भौर | ६७०९६ | ४६.४९ | ४५.२९ | ०.७५ | ४.२९ | ०.०० | ३.१९ |
| ११ | वेल्होर | २३६५४ | ३७.६६ | २०.९९ | ४.१० | १५.८५ | ०.०० | २१.४० |
| १२ | मुळशी | ४४५९० | १४.९१ | ३१.२८ | ०.५१ | ३१.०९ | ०.०० | २२.२१ |
| १३ | मावळ | ६६९३२ | २०.३२ | १९.४३ | ३५.३१ | ५.३१ | ०.०० | १९.६३ |
| | एकूण | ११७९९४१ | १९.९३ | ४०.२० | ६.५१ | १३.३६ | १२.४३ | ७.५६ |

१९९४ ते २००३ या कालावधीत झालेल्या पुणे जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुक निकालांचा पक्षनिहाय आढावा घेतला असता असे दिसून येते की, पुणे जिल्ह्यातील १३ पंचायत समित्यामध्ये एकूण ११७९९४१ मतदानापैकी ४०.२० टक्के मतदान राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाले. तर काँग्रेसला १९.९३ तक्के मते मिळाली. इतर पक्षांना मात्र या पंचायत समित्यांच्या निवडणुकीत जास्त प्रभाव दाखविता आला नाही.

## पंचायत समिती -पक्षनिहाय निकाल पुणे अहवाल २००४ ते २००९[१२९]

| अ.न | पंचायत समिती | प्रत्यक्ष मतदान | पक्षनिहाय मिळालेली मते व मतांची टक्केवारी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | बहुजन समाजवादी पक्ष | भाजप | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | शिवसेना | जनता दल (एस) | इतर | अपक्ष |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | जुन्नर | १४२७८२ | | | ३९१६९ | ६१५५४ | ३५९६६ | | | ६०९३ |
| | | | | | २७.४ | ४३.१ | २५.२ | | | ४.३ |
| २ | आंबेगांव | १००२८९ | १७७ | ६७८ | ५७७२ | ४६८२० | ४४४६४ | | | २३७८ |
| | | | ०.२ | ०.७ | ५.८ | ४६.७ | ४४.३ | | | २.४ |
| ३ | शिरूर | १२८४८९ | | ३४३९० | ७४८७ | ६१७८१ | ५१९८ | ९७७ | | १८५६ |
| | | | | २६.८ | ५.८ | ४८.१ | ४.० | ०.८ | | १४.५ |
| ४ | खेड | १४३१०८ | | | ५६५९२ | ५५०४२ | २२०४७ | | | ९४२७ |
| | | | | | ३९.५ | ३८.५ | १५.४ | | | ६.६ |
| ५ | मावळ | ८८५७३ | | २९०३५ | ८९७२ | ३१३९२ | ९९०८ | | | ९२६६ |
| | | | | ३२.८ | १०.१ | ३५.४ | ११.२ | | | १०.५ |
| ६ | मुळशी | ५८३६६ | | १८५६ | ११४९६ | २१०९० | ९७३१ | | | ४१९३ |
| | | | | ३.२ | १९.७ | ३६.१ | ३३.८ | | | ७.२ |
| ७ | हवेली | १६८५४३ | ४३२ | ६३९४ | ३०१७० | ६१६४० | ३३८३१ | | | ३६०७६ |
| | | | ०.३ | ३.८ | १७.९ | ३६.६ | २०.१ | | | २१.४ |
| ८ | दौंड | १३४९३४ | ३६४ | १००३३ | ५९००७ | ५८८८८ | १२७४ | | २१६२ | ३२०६ |
| | | | ०.३ | ७.४ | ४३.७ | ४३.६ | ०.९ | | १.६ | २.४ |
| ९ | पुरंदर | ८१५९७ | | | २९०८२ | १७९६७ | ३७२३ | २२३५२ | | ८४७३ |
| | | | | | ३५.६ | २२.०० | ४.६ | २७०४ | | १०.४ |
| १० | वेल्हा | २९५०२ | | | १०२८८ | ११७७३ | २५६२ | | | ४८७९ |
| | | | | | ३४.९ | ३९.९ | ८.७ | | | १६.५ |
| ११ | भोर | ८१०३२ | | २.३७ | ३००६० | ३५३७९ | २४४४ | | | १२९१२ |
| | | | | ०.३ | ३७.१ | ४३.७ | ३.० | | | १५.९ |
| १२ | इंदापूर | १३७७८४ | | | १५.७२ | ९२२०२ | ७४५० | | | २३०६० |
| | | | | | १०.९ | ६६.९ | ५०४ | | | १६.७ |
| १३ | बारामती | १५०५२७ | १९३५ | ४०८ | ८०३७७ | ७२४८० | २०७१ | | | २२५६ |
| | | | १.२ | ०.३ | ५०.४ | ४५.४ | १.३ | | | १.४ |
| | एकूण | १४५४५२६ | २९०८ | ८३०३१ | ३८३५४४ | ६२८००८ | १९.६६९ | २३३२९ | २१६२ | १४०८७५ |
| | | | ०.२ | ५.७ | २६.४ | ४३.२ | १३.१ | १.६ | ०.१ | ९.७ |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, १९९८ ते २००४ या कालावधीत झालेल्या पुणे जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुक निकालाचा पक्षनिहाय आढावा घेतला असता असे

दिसते की, पुणे जिल्ह्यातील १३ पंचायत समित्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला एकूण मतदानाच्या ४३.२ टक्के मते मिळवून प्रथम क्रमांकावर आला. तर काँग्रेस २६.४ टक्के मते मिळवून दुसऱ्या स्थानावर राहिला. इतर पक्षांना मात्र पंचायत समितीत जास्त प्रभाव दाखविता आला नाही.

**पंचायत समिती -पक्षनिहाय निकाल पुणे अहवाल २००९ ते २०१३**[१३०]

| अ. नं. | जिल्हा | पंचायत समिती | एकूण महिला | पक्षनिहाय मते व मतांची टक्केवारी | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भाजप | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | राष्ट्रवादी काँग्रेस | काँग्रेस | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) | बहुजन समाजवादी पार्टी | शिवसेना | मनसे | Parties Regd. With sec (Recogd. Stae Party For State Other Than Mah.) | Parties Regd. With Sec. | अपक्ष | A/F | अपक्ष |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १ | पुणे | आंबेगांव | १०५७९५ | ४७८० | ० | ६०४९३ | १४४४ | ० | ० | ४०४५० | ६९० | ० | ९७६ | १२६४ | ० | ० |
| | | | % | ०.४५ | ०.०० | ५७.१८ | १.३६ | ०.०० | ०.०० | ३८.२३ | ०.६५ | ०.०० | ०.९२ | १.१९ | ०.०० | ० |
| २ | | बारामती | १६३६३९ | ० | ० | ९६३०४ | ० | ० | ७.१४ | ० | ० | ० | ४९६७७ | १६९४४ | ० | ० |
| | | | % | ०.०० | ०.०० | ५८.८५ | ०.०० | ०.०० | ०.४४ | ०.०० | ०.११३४०० | ०.०० | ३०.३६ | १०.३५ | ०.०० | ० |
| ३ | | भोर | ८७८९७ | ० | ० | ३८१८१ | ३६५९० | ० | ० | ८४३९ | १.२९ | ० | २८४ | ३२६९ | ० | ० |
| | | | % | ०.०० | ०.०० | ४३.४४ | ४१.६३ | ०.०० | ०.०० | ९.६० | ८७४२ | ०.०० | ०.३२ | ३.७२ | ०.०० | ० |
| ४ | | दौंड | १४७९१३ | ३८२४ | ० | ६२१२० | ५६० | ० | २४७९ | ७४८ | ५.९१ | ९३ | ६५२३१ | ४११६ | ० | ० |
| | | | % | २०५९ | ०.०० | ४२.०० | ०.३८ | ०.०० | १.६८ | ०.५१ | १४८०२ | ०.०६ | ४४.१० | २.७८ | ०.०० | ० |
| ५ | | हवेली | २१३३११ | २१५७ | ० | ८६०१६ | २७३९८ | ० | ४३८ | ५२७९४ | ६.९४ | ० | १५३ | २९५३५ | ० | ० |
| | | | % | १.०२ | ०.०० | ४०.३२ | १२.८४ | ०.०० | ०.२१ | २४.७१ | ३५७०.२१ | ०.०० | ०.०७ | १३.८५ | ०.०० | ० |
| ६ | | इंदापूर | १७२८२३ | २११२ | ० | ७७७५१ | ८३४६९ | ० | २४०८ | २३९३ | ४६०७ | ० | २०२९ | २३.४ | ० | ० |
| | | | % | १०२२ | ०.०० | ४४.९९ | ४८.३० | ०.०० | १.३९ | १.३८ | २.९९ | ०.०० | १.१७ | १.३३ | ०.०० | ० |
| ७ | | जुन्नर | १५४२३८ | ० | ० | ७०५२२ | १००७२ | ० | ३३९ | ६७५६३ | २३४९ | ० | ० | ११३५ | ० | ० |
| | | | % | ०.०० | ०.०० | ४५.७२ | ६.५३ | ०.०० | ०.२२ | ४३.८० | १.५६ | ०.०० | ०.०० | ०.७४ | ०.०० | ० |
| ८ | | खेड | १५०६०७ | ६१८० | ० | ६५१११४ | २६४७८ | ० | ० | २४९८४ | १५८७ | ६६ | २२२७ | २३२०९ | ० | ० |
| | | | % | ४.१० | ०.०० | ४३.२३ | १७.५८ | ०.०० | ०.०० | १६५९ | १.५१ | ०.०४ | १.४८ | १५.४१ | ०.०० | ० |
| ९ | | मावळ | १०५२४६ | ४१३७२ | ० | ३१४१६ | ६३५७ | ० | २१६ | १०८०७ | ० | ० | ० | १३४९१ | ० | ० |
| | | | % | ३९.३१ | ०.०० | २९.८५ | ६.०४ | ०.०० | ०.२१ | १०.२७ | ०.०० | ०.०० | ०.०० | १२.८२ | ०.०० | ० |
| १० | | मुळशी | ६९४९५ | ० | ० | २५७५१ | १३८२८ | ० | ० | १८५८० | ६८०७ | ० | ० | ४५२९ | ० | ० |
| | | | % | ०.०० | ०.०० | ३७.०५ | १९.९० | ०.०० | ०.०० | २६.७४ | ९.७९ | ०.०० | ०.०० | ६.५२ | ०.०० | ० |
| ११ | | पुरंदर | १०२४६६ | ० | ० | २७६०५ | २७१०१ | ० | ० | २०४३४ | २१८७५ | ३७१७ | ० | १७३४ | ० | ० |
| | | | % | ०.०० | ०.०० | २६.९४ | २६.४५ | ०.०० | ०.०० | १९.९४ | २१.३५ | ३.६३ | ०.०० | १.६९ | ०.०० | ० |
| १२ | | शिरूर | १४५९५१ | १६०३५ | ० | ६९३५२ | ३९२० | ० | ११७५ | ९३२६ | ० | ० | ३७३४१ | ८६२२ | ० | ० |
| | | | % | १०९९ | ०.०० | ४७.६४ | २.६९ | ०.०० | ०.८१ | ६.३९ | ०.०० | ०.०० | २५.५८ | ५.९१ | ०.०० | ० |
| १३ | | वेल्हा | ३११५७ | ० | ० | १०३१५ | १२.२१ | ० | ० | १२८२ | ७५३९ | ० | ० | ० | ० | ० |
| | | | % | ०.०० | ०.०० | ३३.११ | ३८.५८ | ०.०० | ०.०० | ४.११ | २४.२० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ० |
| | | एकुण | १६५०५३८ | ७२१७६ | ० | ७२११२० | २४९२३८ | ० | ७७६९ | २५७८०० | ७०४८९ | ३८७६ | १५७९१८ | ११०१५२ | ० | ० |
| | | | % | ४.३७ | ०.०० | ४३.६९ | १५.१० | ०.०० | ०.४७ | १५.६२ | ४.२७ | ०.२३ | ९.५७ | ६.६७ | ०.०० | ० |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, २००९ ते २०1३ या कालावधीत झालेल्या पुणे जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणूकीच पक्षनिहाय आढावा घेतला असता असे दिसून आले की, पुणे जिल्ह्यातील १३ पंचायत समित्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचेच वर्चस्व राहिलेले आहे. या पंचायत समित्यांच्या निवडणुकीत एकूण १६५०५३८ मतादानांपैकी ७२११२० इतकी मते राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाली. म्हणजेच ४३.६९ मते मिळवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रथम क्रमांकावर राहिला १५.६४ मते मिळवून सेना दुसऱ्या क्रमांकावर राहिली तर तिसऱ्या क्रमांकावर काँगेस पक्ष राहिला. त्यांना या निवडणुकीत १५.१० इतकी मते मिळाली.

**पंचायत समिती (पुणे जिल्हा) पुनर्रचनेपूर्वी (२००७)**

पुणे जिल्ह्यातील पंचायत समितींच्या २००७ मध्ये झालेल्या निवडणुकीचा आढावा घेतला असता जिल्ह्यातील एकूण १४ पंचायत समितींच्या एकूण १५० जागांपैकी सर्वसाधारण वर्गासाठी ८९ जागा अनुसूचित जाती साठी १२ जागा अनुसूचित जमातीसाठी ८ जागा तर बीसीसीसाठी ४१ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या होत्या.

पुणे जिल्ह्यातील १४ पंचायत समितींच्या २००७ मध्ये झालेल्या निवडणुकीचा पक्षनिहाय जागांचा आढावा घेतला असता. एकूण १५० जागांपैकी राष्टवादी काँग्रेस पक्षाने ८९ जागा जिंकून पुणे जिल्हा पंचायत समित्यांवर वर्चस्व प्रस्थापित केलेले दिसून येते. काँग्रेसला २६ जागा, भाजपला ९ शिवसेनेला १४ जागा जनता दल ४ जागा इतर १ व अपक्षाला ४ जागा मिळाल्या होत्या. एकूणच जिल्हा परिषदेप्रमाणेच पंचायत समित्यावर सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपला झेंडा फडकविलेला दिसून येतो.

**पुनर्रचनेनंतर**

पुणे जिल्ह्यातील १४ पंचायत समित्यांच्या २०१२ मध्ये झालेल्या निवडणुकीचा आढावा घेतला असता जिल्ह्यातील एकुण १४ पंचायत समित्यांच्या एकूण १५० जागांचा आढावा घेतला असता काही वर्गांच्या जागेमध्ये थोडाफार बदल झालेला आहे. एकूण १५० जागांपैकी सर्वसाधारण वर्गासाठी ९० जागा, अनुसूचित जातीसाठी ११ जागा, अनुसूचित जमातीसाठी ८ जागा तर बीसीसीसाठी ४१ जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या.

पुणे जिल्ह्यातील १४ पंचायत समित्यांच्या २०१२ मध्ये झालेल्या निवडणुकींचा पक्षनिहाय जागांचा आढावा घेतला असता. एकूण १५० जागापैकी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या १४

जागा कमी झाल्या तर काँग्रेसच्या ३ जागा कमी झालेल्या आहेत. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने एकूण १५० जागांपैकी ७५ जागा जिंकल्या. काँग्रेसने २३ जागा भाजपने ९ जागा शिवसेना १९ जागा मनसे ४ जागा धर्मनिरपेक्ष पक्ष १३ जागा तर अपक्षला ७ जागा मिळाल्या एकूण सर्व जागांचा विचार करता राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस यांनी आघाडी करून पंचायत समित्यांवर वर्चस्व मिळविलेले दिसून येते.

## २००२ च्या परिसीमन आयोगापूर्वी व पुनर्रचनेनंतरची पुणे जिल्यातील पंचायत समिती मतदारसंघाबाबतची अनुमाने

पुनर्रचनेपूर्वी पुणे जिह्यातील एकूण १३ पंचायत समित्यातील एकूण १५० जागापैकी ५५ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. सर्वसाधारण वर्गासाठी ८९ जागापैकी ३३ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. अनुसूचित जातीच्या १२ जागापैकी ६ जागा या अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव ठेवल्याा आहेत. अनुसूचित जमातीच्या ८ जागांपैकी ३ जागा महिलांसाठी राखीव आहेत. एकूण ४१ जागापैकी १३ जागा या महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत.

पुर्नरचनेनंतर १५० जागापैकी सर्वसाधारण वर्गासाठी ९० जागा, अनुसुचित जातीसाठी ११ जागा अनुसूचित जमातीसाठी ८ जागा तर बीसीसीसाठी ४१ जागा राखीव ठेवण्यात आल्या.

पुर्नरचनेनंतर जि.प.झालेल्या २०१२ च्या निवडणुकीमध्ये १५०, जागांपैकी ७५ जागा रा.कॉग्रेसने जिंकल्या, कॉग्रेसने २३ जागा, भाजप ९ जागा, शिवसेना १९, मनसे ४ जागा, धर्मनिरपेक्ष पक्ष १३ जागा तर अपक्षाला ७ जागा मिळाल्या एकूण–सर्व जागांचा विचार करता राष्ट्रवादी कॉग्रेस कॉग्रेस यांनी आघाडी करून पंचायत समित्यांवर वर्चस्व मिळविलेले दिसून येते.

**समारोप–**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक बदलांचा अभ्यास लोकसभा, विधानसभा, जिल्हापरिषद व पंचायत समिती पातळीवर केलेला असून पुणे जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी व पुनर्रचनेनंतर काही बदल झालेले आहेत. त्याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभेचे पुणे, बारामती व खेड असे तीन मतदारसंघ होते. तिन्ही मतदारसंघ सर्वसाधारण मतदारसंघ होते. या लोक सभा मतदार संघावर काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव होता. पुर्नरचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभेचे चार लोकसभा मतदारसंघ झाले. खेड लोकसभा मतदारसंघ होऊन शिरूर व मावळ हे दोन मतदारसंघ नव्याने निर्माण झाले. लोकसभेचे चारही मतदारसंघ सर्वसाधारण आहेत. या मतदारसंघावर पुनर्रचनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव कमी झाला असून शिवसेना ही दुसऱ्या क्रमांकाची ताकद उभी राहिलेली आहे.

पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्यामध्ये विधान सभेचे १८ मतदारसंघ होते. त्यापैकी १७ मतदारसंघ सर्वसाधारण होते तर १ मतदारसंघ राखीव होता. या मतदारसंघावर रा.काँग्रेसचे नियंत्रण राहिले असून त्या तुलनेत इतर पक्षाची ताकद कमी राहिलेली असून पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये विधानसभेचे १८ ऐवजी २१ विधानसभा मतदारसंघ झाले. त्यापैकी १९ मतदारसंघ सर्वसाधारण तर २ मतदारसंघ (पिंपरी व कॅन्टोन्मेट) राखीव झाले आहेत. या पुनर्रचनेत पर्वती ऐवजी पुणे कॅन्टोन्मेट हा मतदारसंघ राखीव झाला तर पिंपरी नवीन हा राखीव मतदारसंघ वाढला. पुनर्रचनेत शहरी विधानसभा मतदारसंघामध्ये वाढ झालेली आहे. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यातील विधान सभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव कमी होऊन शिवसेना, भाजप, मनसे, या पक्षांचा प्रभाव काही प्रमाणात राहिलेला आहे.

एकंदरीत लोकसभा व विधान सभापातळीवर पुणे जिल्ह्याच्या संदर्भात झालेल्या राजकीय व सामाजिक बदलांचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. त्याच पद्धतीने सातारा जिल्ह्यातील पुनर्रचनेनंतरचे राजकीय व सामाजिक बदलांचा अभ्यास पुढील प्रकरणामध्ये करणार आहोत.

## ४.३ मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे सातारा जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक बदल

**प्रस्तावना –**

राजकीय प्रक्रिया घडत असताना सातत्याने त्यामध्ये बदल घडून येत असतात. त्याला भौगोलिक क्षेत्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक जडणघडण त्याला कारणीभूत असतात. मतदारसंघ पुनर्रचना घडल्यामुळे विविध पातळीवरील राजकारण बदलून नवीन सत्ता समीकरणे आकाराला येत असतात. त्याचा परिणाम राजकीय, सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रावर होतो. म्हणून मतदारसंघ पुनर्रचनेनंतरची फेरजुळणी समजून घेने गरजेचे असते. (प्रकाश पवार) प्रस्तुत प्रकरणात मतदारसंघ पुनर्रचनेनंतर ज्या लोकसभा, विधानसभा तसेच जिल्हापरिषद व पंचायत समित्यांच्या ज्या निवडणुका झाल्या त्याच्या संदर्भात सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर काही परिणाम/बदल झालेला आहे. त्याला अभ्यास करणार आहोत.[१३१]

चौथ्या परिसीमन आयोगाच्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर सातारा जिल्ह्यामध्ये एक लोकसभा मतदारसंघ व आठ विधानसभा मतदारसंघ निर्माण झाले की जे मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये सातारा व कराड असे दोन लोकसभा मतदारसंघ व १० विधानसभा मतदारसंघ होते. मतदारसंघ पुनर्रचनेमुळे या जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील समाविष्ट मतदारसंघ व भाग पुढीलप्रमाणे–

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे सातारा जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघ –**


लोकसभा मतदारसंघ (सातारा ८४५)– लोकसभा मतदारसंघातील समाविष्ट विधानसभा मतदारसंघ वाई, कोरेगाव व कराड उत्तर, कराड दक्षिण, पाटण व सातारा

**सातारा लोकसभा मतदारसंघ–**

१९५२ ला कोल्हापूर व सातारा मिळून एकच लोकसभा मतदारसंघ होता व या मतदारसंघातून १९५२ ते १९५७ अशा दोन निवडणुकामध्ये एकाच मतदारसंघातून दोन प्रतिनिधी निवडून यायचे. एक प्रतिनिधी सर्वसाधारण गटातून निवडून जायचा. १९६२ पासून ही दोन प्रतिनिधींची निवड प्रक्रिया बंद होवून एक प्रतिनिधी पद्धत सुरू झाली.

**सातारा जिल्ह्यातील १९५२ ते २००४ पर्यंतचे निवडून आलेले प्रतिनिधी पुढीलप्रमाणे[१३२]–**

| वर्ष | प्रतिनिधीचे नाव | राजकीय पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १९५१ | गणेश अष्टेकर | काँग्रेस | १३१९ |
| १९५७ | नाना पाटील | भारतीय कम्युनिस्ट पार्टी | १,४५,१९४ |
| १९६२ | किसन वीर | काँग्रेस | १,६५,८७९ |
| १९६७ | यशवंतराव चव्हाण | काँग्रेस | ४०,७,८४५ |
| १९७१ | यशवंतराव चव्हाण | काँग्रेस | २,४६,१८० |
| १९७७ | यशवंतराव चव्हाण | काँग्रेस | २,६०,५६२ |
| १९८० | यशवंतराव चव्हाण | काँग्रेस | २,२३,२१३ |
| १९८४ | प्रतापराव भोसले | काँग्रेस | २,७०,११० |
| १९८९ | प्रतापराव भोसले | काँग्रेस | ३,६९,४६७ |
| १९९१ | प्रतापराव भोसले | काँग्रेस | २,६१,१२९ |
| १९९६ | हिंदुराव निंबाळकर | शिवसेना | १,९०,५२६ |
| १९९८ | अभयसिंह भोसले | काँग्रेस | ३,८९,२३८ |
| १९९९ | लक्ष्मण पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | ३,१३,३२५ |
| २००४ | लक्ष्मण पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | २,८१,५७७ |



वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९५७ च्या निवडणुकीतील भारतीय कम्युनिष्ट पक्षाचा अपवाद सोडला तर १९५१ ते १९९१ पर्यत काँग्रेस पक्षाचे वर्चस्व दिसून येते. मात्र १९९९ साली काँग्रेसमधून बाहेर पडून शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. १९९९ व २००४ या दोन्ही लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व या मतदारसंघात दिसून येते.

**सातारा लोकसभा मतदारसंघाची मतदारसंघ पुनर्रचना –**


मतदारसंघ रचनेपूर्वी सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये वाई, कोरेगाव, कराड उत्तर, कराड दक्षिण, पाटण, सातारा, खटाव व जावळी असे दहा विधानसभा मतदारसंघ होते. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर विधानसभेचे आठ मतदारसंघ तयार झाले. खटाव व जावळी हे जुने दोन मतदारसंघ रद्द झाले. त्यामुळे सातारा जिल्ह्यात हा एक लोकसभा मतदारसंघ बसून दोन (माण व फलटण) हे मतदारसंघ शिल्लक राहिले. त्यांचा समावेश सोलापूर जिल्ह्यातील माढा लोकसभा मतदारसंघात केला. त्यामुळे कराड लोकसभा मतदारसंघ रद्द केला.[१३३]

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचे सातारा जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघ –**

| अ.क्र. | विधानसभा मतदारसंघ | समाविष्ट भाग |
|---|---|---|
| १. | वाई – (३५६) | वाई, खंडाळा व महाबळेश्वर तालुक्यांचा समावेश |
| २. | कोरेगाव – (२५७) | खटाव, कोरेगाव व सातारा अशा तीन तालुक्यांचा समावेश |
| ३. | कराड उत्तर | खटाव, कोरेगाव, सातारा व कराड अशा चार तालुक्यांचा समावेश |
| ४. | कराड दक्षिण | कराड तालुक्याचा समावेश (जुना कराड उत्तर मतदारसंघ) |
| ५. | पाटण | पाटण तालुका व कराड तालुक्यातील सुपने महसूल मंडळ |
| ६. | सातारा | जावळी तालुका खेरीज सातारा तालुक्यातील वर्ये सातारा, दहिवडी, परळी, अंबवडे व शेंद्रे या महसूल मंडळाचा समावेश |

**सातारा लोकसभा २००९ (विधानसभा निहाय मतदान)**[१३४]

| अ. न. | उमेदवाराचे नाव | पक्ष | वाई २५६ | कोरेगाव २५७ | कराड द.२५९ | कराड उ.२६० | पाटण २६१ | सातारा २६२ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अलंकृत अभिजीत बिचुकले | अपक्ष | ५२१०० | १७५४ | २०८५ | १८७० | २७३२ | २११३ | २०५४१ |
| २ | भाऊसाहेब गजानन वाघ | राष्ट्रीय समाजवादी पक्ष | २३७४ | १७७१ | १६४६ | १४८७ | २०७० | १८७० | ९३४८ |
| ३ | उदयनराजे प्रतापसिंह भोसले | रा.कॉं. | ७६४४३ | ९४७५२ | ९६०७० | ७०३२४ | ७४४९४ | १२०२५१ | ४१२०८३ |
| ४ | पुरु षोत्तम बाजीराव जाधव | शिवसेना | ६२८९३ | २८२९७ | ३२५८५ | ४३४१० | ३९३२८ | २८४२८ | २०६५१३ |
| ५ | चव्हाण प्रशांत वसंत | बहुजन समाजवादी पार्टी | ४०१५ | ३१९० | ४६५८ | ५२३९ | ४५८३ | ४५८३ | २१६८५ |




उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्व उमेदवारांचा तपशील दिलेला आहे. या निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवाराला वाईमधून २१००

मते, कोरेगावमधून १७५४, कराड दक्षिणमधून २०८५, कराड उत्तरमधून १८७०, पाटणमधून २७३२ व सातारामधून २११३ अशी एकूण २०५४१ मते मिळाली. RSPS चे उमेदवार भाऊसाहेब गजानन वाघ यांना वाईमधून २३७४ मते, कोरेगावमधून १७७१, कराड दक्षिणमधून १६४६, कराड उत्तरमधून १४८७, पाटणमधून २०७० व सातारामधून १८७० अशी एकूण ९३४८ मते मिळाली. परंतु अपेक्षित मते न पडल्याने अनामत रक्कम जप्त झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उदयनराजे भोसले यांना वाईमधून ७६४४३ मते, कोरेगावमधून ९४७५२, कराड दक्षिणमधून ९६०७०, कराड उत्तरमधून ७०३२४, पाटणमधून ७४४९४ व सातारामधून १२०२५१ अशी एकूण ४१२०८३ मते मिळाली. शिवसेनेचे उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांना वाईमधून ६२८९३ मते, कोरेगावमधून २८२९७, कराड दक्षिणमधून ३२५८५, कराड उत्तरमधून ४३४१०, पाटणमधून ३९३२८ व सातारामधून २८४२८ अशी एकूण २०६५१३ मते मिळाली. तर BSP चे उमेदवार प्रशांत वसंत चव्हाण यांना वाईमधून ४०१५ मते, कोरेगावमधून ३१९०, कराड दक्षिणमधून ४६५८, कराड उत्तरमधून ५२३९, पाटणमधून ४५८३ व सातारामधून ३४२१ अशी एकूण २१६८५ मते मिळाली. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उदयनराजे भोसले यांना सातारा विधानसभा मतदारसंघातून पहिला पसंतीची मते मिळाली तर कराड दक्षिण व कोरेगांवमधून दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या पसंतीची मते मिळाली. शिवसेनेचे उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांना वाईमधून पहिल्या पसंतीची मते मिळाली तर कराड उत्तर व कराड दक्षिणमधून दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकांची पसंतीची मते मिळाली. BSPB चे उमेदवार प्रशांत वसंत चव्हाण यांना पहिल्या पसंतीची मते कराड उत्तर दुसऱ्या पसंतीची कराड दक्षिण व तिसऱ्या क्रमांकाची मते पाटणमधून मिळाली. एकूणच या निवडणुकीमध्ये उदयनराजे भोसले हे पहिल्या क्रमांकावर राहिले म्हणून दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे पुरुषोत्तम जाधव व प्रशांत चव्हाण राहिलेले आहेत.

## २००२ च्या परिसीमन आयोगापूर्वी व पुनर्रचनेनंतरची सातारा जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघाबाबतची अनुमाने

१) सातारा जिल्ह्यातील दक्षिण कराड या विधान सभेचे १९६२ व ६७ प्रतिनिधित्व केलेले कराडचे नेते यशवंतराव चव्हाण यांचे सातारा जिल्ह्यावर वर्चस्व होते. सातारा जिल्ह्यावर १९९६ पर्यंत काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. राज्याची सर्व सूत्रे सातारा जिल्ह्यातून हालवली

जायची परंतु १९९६ च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे हिंदुराव निबांळकर यांनी या मतदारसंघातून विजय मिळवून दाखविला. १९९९ मध्ये शरद पवार यांनी रा. काँग्रेसची स्थापना केल्यापासून या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिलेले आहे.

२) मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी कराड व सातारा एकत्र होता तरी देखील या मतदारसंघावर सातारा जिल्ह्याचा प्रभाव राहिलेला होता.

३) पुनर्रचनेनंतर कराड लोकसभा मतदारसंघ रद्द होऊन सातारा जिल्ह्यामध्ये सातारा हा एकमेव लोकसभा मतदारसंघ शिल्लक राहिला आहे. पनर्रचनेनंतर झालेल्या २००९ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार उदयनराजे भोसले हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. कराड, पाटण वासियांना दुसरा पर्याय उपलब्ध राहिला नाही.

पुनर्ररचनेनंतर मात्र कराड, पाटण भागातील विकासावर परिणाम झालेला दिसतो. या भागातील असणाऱ्या समस्यांचे गाऱ्हाणे त्यांच्या पर्यत पोहचू शकत नाही. कारण कराडच्या लोकसभा मतदारसंघ रद्द केल्यानंतर एकाच खासदाराकडून नुसत्या अपेक्षा व्यक्त करण्यापलिकडे काही करता येत नाही या भागातील लोकांच्या समस्या सुटू शकल्या नाहीत. कराड लोकसभा रद्द झाल्यापासून उदयनराजे भोसले सातारा जिल्ह्याचे खासदार आहेत परंतु अजूनपर्यंत ते कराडकडे फिरकले नाहीत. कराडचा मतदार त्यांच्यावर नाराज आहे. या मतदारसंघातील कराड तालुक्यातील ज्या समस्या आहेत त्यामध्ये शेतकऱ्यांच्या ऊसाचा FRP चा प्रश्न, रस्त्यांचा प्रश्न उद्योगधंदे निर्माण करयाबाबत प्रयत्न केले नाहीत २००९ च्या निवडणुकीमध्ये वीज व पाण्याच्या प्रश्नाबाबत आवाज उठविला परंतु १० वर्षानंतरसुद्धा प्रश्न कायम आहे. पर्यटना साठी प्रयत्न केले नाहीत. कराड-चिपळूण रेल्वे मार्ग अपूर्ण आहे. कराडा विमानतळ विस्तारीकरणाचे काम रखडलेले आहे. पाटण भागातील नागरिकांच्याही समस्या सुटू शकल्या नाहीत. कोयना भूकंपग्रस्तांच्या समस्या प्रकल्प ग्रस्तांच्या समस्या ५० वर्षानंतरही सुटू शकल्या नाहीत.

४) सातारा जिल्ह्यात लोकसभेचा एकमेव मतदारसंघ असून तो सर्वसाधारण वर्गासाठी आहे.

५) सातारा जिल्हा पूर्वी पासून काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. १९९९ पासून तो राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार लक्ष्मण पाटील हे पुनर्ररचने पूर्वी २००४ च्या निवडणुकीत निवडून आले तर २००९ च्या निवडणुकीमध्ये स्थानिक आघाडीमधील दोन्ही उदयनराजे व


शिवेंद्रराजेच्या मनो मिलनामुळे या निवडणुकीत (लोकसभेच्या) उदयनराजे प्रचंड मताधिक्याने निवडून आले.

६) सातारा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात २००९च्या निवडणुकमिध्ये उमेदवारीच्या अडचणीमुळे मोठया प्रमाणात बंडखोरी होऊनसुद्धा भाजप–शिवसेनेला या जिल्ह्यात आपला प्रभाव दाखविता आला नाही.

**१) वाई विधानसभा मतदारसंघ**

**१९६२ ते २००४ पर्यतचा वाई विधानसभा मतदारसंघाचा दृष्टिक्षेप[१३५]–**

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १. | दादासाो जगताप | १९६२ | काँग्रेस | ९१३१९ |
| २. | भोसले प्रताप | १९६७ | काँग्रेस | १,४५,१९४ |
| ३. | भोसले प्रताप | १९७२ | काँग्रेस | १,६५,८७९ |
| ४. | भोसले प्रताप | १९७८ | काँग्रेस | ४०,७,८४५ |
| ५. | भोसले प्रताप | १९८० | काँग्रेस(यू) | २,४६,१८० |
| ६. | पिसाळ मदन | १९८५ | काँग्रेस | २,६०,५६२ |
| ७. | पिसाळ मदन | १९९० | काँग्रेस | २,२३,२१३ |
| ८. | पिसाळ मदन | १९९५ | अपक्ष | २,७०,११० |
| ९. | पिसाळ मदन | १९९९ | राष्ट्रवादी काँग्रेस | ३,६९,४६७ |
| १०. | मदन भोसले | २००४ | अपक्ष | २,६१,१२९ |



वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६२ ते १९९० पर्यंतच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले होते. या मतदारसंघामध्ये १९८० च्या निवडणुकीचा अपवाद वगळता मराठा समाजाच्या उमेदवाराचे  वर्चस्व राहिलेले होते. १९९५ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये हा मतदारसंघ कॉंग्रेस पक्षाकडून अपक्षाकडे केला गेला. या निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवार मदत पिसाळ हे ५१७६१ मतांनी निवडून आले होते. १९९९ च्या निवडणुकीमध्ये मदन पिसाळ हे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तिकीटावर निवडणुक लढवून ४३१८१ मतांनी निवडून आले. त्यानंतर पुन्हा २००४ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये अपक्षाकडे हा विधानसभेच्या मतदारसंघ गेला. या निवडणुकीत अपक्ष उमेदवार मदन भोसले हे ६८८६० मतांनी निवडून आले. राष्ट्रवादी पक्षाकडून अपक्षाकडे हा मतदारसंघ सरकण्याचे मुख्य कारण म्हणजे मराठा समाजातंर्गत राजकीय स्पर्धा येथे होती.


**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा वाई विधानसभा मतदारसंघ –**

वाई विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी वाई तालुका व खंडाळा तालुक्यातील केवळ खंडाळा महसूल मंडळाच्या समावेश होता. परंतु मतदारसंघ पुनर्रचनेनंतर वाई मतदारसंघात जवळपास ५० टक्के बदल झाला आहे. वाई, खंडाळा तालुका व महाबळेश्वर तालुक्यांचा समावेश असलेला नवीन मतदारसंघ तयार झालेला आहे.

वाई विधानसभा मतदारसंघातून १९८० चा अपवाद वगळता मराठा समाजाचे उमेदवार निवडून आले. वाई विधानसभा मतदारसंघावर कॉंग्रेस पक्षाचे नियंत्रण होते.(१९७९ ते १९९०) कॉंग्रेस पक्षाकडून अपक्ष(१९९५), अपक्षाकडून राष्ट्रवादीकडे (१९९९), राष्ट्रवादीकडून अपक्षाकडे (२००४) हा मतदारसंघ सरकला.[१३६]

२००९ च्या वाई विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[१३७] –

| अ.क्र. | राजकीय पक्ष | उमेदवाराचे नाव | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | बहुजन समाजवादी पार्टी | जगताप दिलीप श्रीरंग | ९६२ | ०.४८ |
| २. | शिवसेना | जाधव पुरुषोत्तम बाजीराव | ३५,४५२ | १७.८५ |
| ३. | काँग्रेस | भोसले मदन प्रतापराव | ५९,०६२ | २९.७३ |
| ४. | भारतीय रिपब्लिकन पक्ष (आठवले) | अशोक वामनराव गायकवाड | ८,०२५ | ४.०४ |
| ५. | स्वतंत्र भारत पक्ष | कदम संजय कृष्णराव | ४२७ | ०.२१ |
| ६. | मनसे | खरात राजू भगवान | २,५६५ | ९.२९ |
| ७. | अपक्ष | नितिन लक्ष्मण भरगुडे पाटील | ८,७१६ | ४.३९ |
| ८. | अपक्ष | मकरंद लक्ष्मण जाधव पाटील | ८०,८८७ | ४०.७२ |
| ९. | अपक्ष | शिवाजी खाशाबा मोटे | १,०२४ | ०.५२ |
| १०. | अपक्ष | साबळे सुधा संपत | १,५३४ | ०.७७ |




२००९ च्या वाई विधानसभा निवडणुकीमध्ये एकूण दहा उमेदवार निवडणुक रिंगणात होते. त्यापैकी ४ उमेदवार अपक्ष होते. २००४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवार मदन भोसले हे ६८,१६० मतांनी निवडून आले होते. २००९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये

दहा उमेदवार असले तरी खरी लढत शिवसेनेचे पुरुषोत्तम जाधव काँग्रेसचे भोसले मदन व अपक्ष उमेदवार मकरंद लक्ष्मण जाधव पाटील यांच्यात झाली. काँग्रेसच्या उमेवार मदन भोसले यांना ५९,०६२, पुरुषोत्तम जाधव यांना ३५,४५२ मते तर अपक्ष उमेदवार मकरंद पाटील यांना ८०,८८७ मते मिळून मकरंद पाटील निवडून आले.

**२००९ च्या वाई विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | | | झालेले मतदान | | | टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु. | स्त्री | एकूण | पु. | स्त्री | एकूण | पु. | स्त्री | एकूण |
| वाई विधानसभा | | | २८१५०१ | १०१९८७ | ९५९२३ | १९८६५४ | | | ७०.५७ |

२००९ च्या वाई विधानसभा मतदारसंघामध्ये २८१५.१ मतदार आहेत. त्यापैकी झालेल्या निवडणुकीमध्ये १९८६५४ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष १०१९८७ व ९५९२३ स्त्री मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत स्त्री मतदारांचे प्रमाण कमी आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या (२००४) वाई विधानसभा मतदारसंघाची मतदार संख्या १६९६१४ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ८३५१० तर स्त्री मतदारांची संख्या ८६१०४ इतकी होती. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर (२००९) वाई विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या ३७४००५ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १३७२१७ तर स्त्री मतदार १३७८८ इतके होते.


वाई विधानसभा मतदारसंघामध्ये वाई, खंडाळा व महाबळेश्वर या तीन तालुक्यांचा समावेश केल्यामुळे राजकीय स्पर्धा राहिली तरी सुद्धा या मतदार संघामध्ये वाई तालुका वरचढ दिसून येतो. २००४ च्या निवडणूकीमध्ये मदन भोसले अपक्ष तर मकरंद पाटील (राष्ट्रवादी कॉग्रेसचे) यांच्यात लढत होऊन मदन भोसले विजयी झाले.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर २००९ च्या निवडणुकीत मदन भोसले यांना कॉग्रेसकडून उमेदवारी दिली तर मकरंद जाधव यांनी अपक्ष म्हणून निवडणुक लढविली. या निवडणुकीमध्ये पुन्हा मदन भोसले यांनी बाजी मारली.

**कोरेगाव विधानसभा मतदारसंघ(२५७)**

**१९६२ ते २००४ पर्यंतचा कोरेगाव विधानसभा मतदारसंघ दृष्टिक्षेप[१३८] –**

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १. | तुषार पवार | १९६२ | काँग्रेस | २०६०९ |
| २. | ए.एन.फाळके | १९६७ | काँग्रेस | ३७५४७ |
| ३. | दत्ताजीराव बर्गे | १९७२ | अपक्ष | ३९२२५ |
| ४. | शंकरराव जगताप | १९७८ | काँग्रेस | ३०७६५ |
| ५. | शंकरराव जगताप | १९८० | काँग्रेस(यू) | ३४८२९ |
| ६. | शंकरराव जगताप | १९८५ | काँग्रेस | ४८०४९ |
| ७. | शंकरराव जगताप | १९९० | काँग्रेस | ५६२४७ |
| ८. | शंकरराव जगताप | १९९५ | काँग्रेस | ५९७९३ |
| ९. | डॉ.शालिनीताई पाटील | १९९९ | राष्ट्रवादी काँग्रेस | ६१६९२ |
| १०. | डॉ.शालिनीताई पाटील | २००४ | राष्ट्रवादी काँग्रेस | ६१३२६ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, या विधानसभेच्या मतदारसंघावर १९७२ ते १९९५ या कालावधीत काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. याच दरम्यान या मतदारसंघातून इतर मागासवर्गीय जातीगटातील उमेदवार सातत्याने निवडून आले. परंतु १९९९ व २००४ च्या विधानसभेच्या निवडणुकामध्ये हा विधानसभेचा मतदारसंघ काँग्रेस पक्षाकडून राष्ट्रवादी पक्षाकडे गेला. त्याचबरोबर इतर मागासवर्गीयाऐवजी मराठा समाजाचे नेतृत्व पुढे आलेले दिसून येते. या दोन्ही निवडणुकामध्ये डॉ.शालिनीताई पाटील ह्या मराठा समाजाच्या उमेदवार निवडून आल्या


होत्या.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा कोरेगाव विधानसभा मतदारसंघ–**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर कोरेगाव विधानसभा मतदारसंघात खटाव, कोरेगाव व सातारा अशा तीन तालुक्यांचा समावेश केला आहे. पुनर्रचनेपूर्वी हा मतदारसंघ कोरेगाव तालुक्यापुरता मर्यादित होता. पनर्रचनेनंतर खताव तालुक्यातील पुसेगाव व खटाव, कोरेगाव तालुक्यातील सातारारोड, किन्हई, कुमठे व कोरेगाव आणि सातारा तालुक्यातील वडूज, खेड, व तासगाव या महसूल मंडळाचा कोरेगाव विधानसभा मतदारसंघात समावेश केला गेला.

**२००९ च्या कोरेगाव विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[१३९] –**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | उमेदवाराचे नाव | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | शशिकांत जयवंत शिंदे | ८०,३७३ | ४९.६५ |
| २. | अपक्ष | डॉ.शालिनीताई वसंत पाटील | ४८,६२० | ३०.०३ |
| ३. | शिवसेना | संतोष लक्ष्मण जाधव | १६,६२१ | १०.२७ |
| ४. | अपक्ष | यशवंतराव भोसले | १०,७०१ | ६.६१ |
| ५. | बहुजन समाजवादी पार्टी | महिंद्रा भिवा मोरे | १,५१४ | ०.९४ |
| ६. | अपक्ष | सुरेश भाऊराव वीर | १,२१५ | ०.७५ |
| ७. | अपक्ष | रमेश पांडुरंग बर्गे | १,१९३ | ०.७४ |
| ८. | राष्ट्रवादी सेना | सदाशिव साहेबराव बागल | ४९५ | ०.३१ |
| ९. | अपक्ष | दत्ताजीराव निवृत्ती बर्गे | ४७१ | ०.२९ |
| १०. | अपक्ष | अलंकृत अभिजीत आवाडे (बिचुकले) | ३७० | ०.२३ |
| ११. | अपक्ष | रमेश दगडू माने | ३१३ | ०.१९ |
| | एकूण | | ३१,७५३ | ६२.०४ |




२००९ च्या कोरेगाव विधानसभा निवडणुकीमधे एकूण अकरा उमेदवार निवडणुक रिंगणात होते. त्यापैकी ७ उमेदवार हे अपक्ष होते. २००४ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या डॉ.शालिनीताई पाटील या ६१३२६ मतांनी निवडून आल्या होत्या. परंतु मतदारसंघ पुनर्रचनेमुळे जावळी हा मतदारसंघ वगळल्याने जावळीचे राष्ट्रवादीचे नेते मा.शशिकांत शिंदे यांनी नवीन कोरेगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणुक लढविली. त्यामुळे पक्षाने तिकिट न दिल्यामुळे डॉ.शालिनीताई पाटील यांनी अपक्ष म्हणून निवडणुक लढविली. २००९ च्या निवडणुकीत उमेदवार जरी अकरा असले तरी खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शशिकांत शिंदे व अपक्ष डॉ.शालिनीताई पाटील यांच्यातच झाली. शशिकांत शिंदे यांना ८०,३७३ मते मिळाली तर डॉ.शालिनीताई पाटील यांना ४८६२० मते मिळाली. शशिकांत शिंदे हे ३२००० मतांनी विजयी झाले.

**२००९ च्या कोरेगाव विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पु. | स्त्री | एकूण | |
| कोरेगाव (२५७) | २५७४५८ | ८३७४१ | ७७६५५ | १६१८८६ | ६२.८८ |

२००९ च्या कोरेगाव विधानसभा मतदारसंघामध्ये २५७४५८ मतदार होते. त्यापैकी १६१८८६ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८३७४१ व ७७६५५ स्त्री मतदार होते. या निवडणुकीमध्ये पुरुषांच्या तुलनेने स्त्री मतदारांची संख्या कमी होती.

मतदारसंघपुनर्रचनेपूर्वी (२००४) कोरेगांव विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदार संख्या १७८४१५ इतकी होती. त्यापैकी पुरुषमतदार ८८६३१ तर स्त्री मतदार ८९७६४ इतके होते. मतदारसंघपुनर्रचनेनंतर कोरेगांव विधानसभा मतदारसंघात खटाव, कोरेगाव व सातारा तालुक्यांतील गावांचा समावेश केल्याने मतदारसंख्या वाढलेली दिसून येते. त्यानुसार या मतदारसंघाची एकूण मतदार संख्या २५४७८० इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १२८४३४ इतके तर स्त्री मतदार १२६३४६ इतके होते.

नवा मतदारसंघ तीन तालुक्यांशी संबंधित असल्याने कोरेगांवचे या मतदारसंघावर नियंत्रण राहणार नाही. १९७८ ते १९९५ पर्यंत या मतदारसंघामध्ये मागासवर्गीय जातीगटाचे उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत. १९९९ ते २००४ या कालावधीत कॉग्रेसकडून राष्ट्रवादीकडे हा मतदारसंघ सरकला अर्थातच डॉ.शालिनीताई पाटील यांच्या रूपाने मराठासमाजाचे नेतृत्व पुढे आले होते.


मतदारसंघ पुनर्रचनेनंतर या मतदारसंघात वेगळे चित्र दिसून आले. जावळीचा समावेश सातारा विधानसभा मतदारसंघात केल्यामुळे जावळीचे राष्ट्रवादी कॉग्रेस नेते शशिकांत शिंदे यांनी कोरेगांवमधून निवडणुक लढविली त्यांच्याविरोधात शालिनी पाटील उभ्या होत्या या २००९ च्या निवडणुक शशिकांत शिंदे यांनी ही निवडणुक जिकूंन या मतदारसंघात आपला पाय रोवला.

**कराड उत्तर विधानसभा मतदारसंघ–**

**१९६२ ते २००४ पर्यंतचा कराड उत्तर विधानसभा मतदारसंघांचा दृष्टिक्षेप**[१४०]

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १. | व्ही.जे.मोहिते | १९६२ | काँग्रेस | ३३३९० |
| २. | व्ही.जे.मोहिते | १९६७ | काँग्रेस | ४०६३३ |
| ३. | यशवंत मोहिते | १९७२ | काँग्रेस | ३४३९७ |
| ४. | यशवंत मोहिते | १९७८ | काँग्रेस | ४८८८५ |
| ५. | विलास पाटील | १९८० | काँग्रेस | ४३३३८ |
| ६. | विलास पाटील | १९८५ | काँग्रेस | ५४१५९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | विलास पाटील | १९९० | काँग्रेस | ६४१०० |
| ८. | विलास पाटील | १९९५ | काँग्रेस | ६९३८६ |
| ९. | विलास पाटील | १९९९ | काँग्रेस | ६२७९५ |
| १०. | विलास पाटील | २००४ | काँग्रेस | १०८३६७ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६२ ते २००४ पर्यतच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाचेच वर्चस्व राहिलेले दिसून येते. १९६२ ते १९६७ या दोन निवडणुकीमध्ये व्ही.जे.मोहिते हे निवडून आलेले आहेत. त्यानंतर नेतृत्व बदल होऊन १९७२ व १९७८ च्या निवडणुकीत व्ही.जे.मोहिते पराभूत होऊन त्याऐवजी यशवंत मोहिते हे काँग्रेस पक्षाच्याच तिकिटांवर निवडून आले. १९८० ते २००४ पर्यंतच्या कराड उत्तर विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पुन्हा नेतृत्व बल होऊन या कालखंडात विलासकाका पाटील उंडाळकर यांचे वर्चस्व कायम राहिलेले दिसून येते.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा कराड उत्तर विधानसभा मतदारसंघ–**


मतदारसंघ रचनेपूर्वी हा मतदारसंघ जुन्या कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा भाग होय. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात खटाव–कोरेगाव, सातारा व कराड अशा चार तालुक्यांचा समावेश केला गेला. खटाव तालुक्यातील पुसेसावळी, कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर व वाठार किरोली, सातारा तालुक्यातील अपशिंगे  व नागठाणे आणि

कराड तालुक्यातील इंदोली, मसूर, उंब्रज व कोपवडे हवेली या महसूल मंडळाचा समावेश या मतदारसंघात केलेला आहे.[१४१]

या मतदारसंघातून मराठा जातीचे उमेदवार निवडून आले होते.(१९७८ ते २००४) या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण सातत्याने राहिले होते(१९७८ ते २००४)

**२००९ च्या कराड उत्तर विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व [१४२]–**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | उमेदवाराचे नाव | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | बीएसपी | थोरावडे आनंदा रमेश | १,७७५ | १.०६ |
| २. | बीजेपी | भारत बाबूराव पाटील | ९,७८४ | ५.८३ |
| ३. | काँग्रेस | विलासकाका पाटील | ८२,८५७ | ४९.३५ |
| ४. | एसबीपी | मोहिते राजेंद्र प्रतापराव | १,९५० | १.४६ |
| ५. | अपक्ष | अशोक अण्णा भोसले | ५३२ | ०.३२ |
| ६. | अपक्ष | थोरात पाटील सूर्यकांत रामचंद्र | ६७१ | ०.४४ |
| ७. | अपक्ष | पाटील विलास गोविंद | ६७,९४४ | ४०.४७ |
| ८. | अपक्ष | राजेंद्र शिवाजी पवार | १,१४३ | ०.६८ |
| ९. | अपक्ष | शब्बीर इसाक मुजावर | १,२३६ | ०.७४ |



**२००९ च्या कराड उत्तर विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पु. | स्त्री | एकूण | |
| कराड उत्तर | २५२९९७ | ८९१३३ | ८८५८२ | १७७९६२ | ७०.३४ |


२००९ च्या कराड उत्तर विधानसभा मतदारसंघामध्ये २५२९९७ मतदार होते. त्यापैकी १७७९६२ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८९१३३ व ८८५८२ स्त्री मतदार होते. या निवडणुकीमध्ये एकूण मतदारांपैकी स्त्री मतदारांपेक्षा पुरुष मतदारांचे प्रमाण जास्त होते.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी (२००४)कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाच एकूण मतदार संख्या इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार तर स्त्री मतदारांची इतके होते. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर (२००९) या मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या २४३८३९ इतकी होती. त्यापैकी पुरुषमतदार १२५८२९ तर स्त्री मतदार ११८०१० इतके होते.

**कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघ –**

**१९६२ ते २००४ पर्यंतचा कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघांचा दृष्टिक्षेप**[१४३]

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण | १९६२ | काँग्रेस | ३३३९० |
| २. | यशवंतराव चव्हाण | १९६७ | काँग्रेस | ४०६३३ |
| ३. | बाबूराव कोतवाल | १९७२ | काँग्रेस | ३४३९७ |
| ४. | केशवराव पवार | १९७८ | वंचित कामगार पक्ष | ४८८८५ |
| ५. | दादासो पाटील | १९८० | काँग्रेस(यू) | ४३३३८ |
| ६. | श्याम अष्टेकर | १९८५ | इंडियन काँग्रेस (सोशालिस्ट) | ५४१५९ |
| ७. | श्याम अष्टेकर | १९९० | काँग्रेस | ६४१०० |
| ८. | पी.डी.पाटील | १९९५ | अपक्ष | ६९३८६ |
| ९. | बाळासो पाटील | १९९९ | रा.काँग्रेस | ६२७९५ |
| १०. | बाळासो पाटील | २००४ | रा.काँग्रेस | १०८३६७ |





वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६२ ते २००४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाचेच वर्चस्व राहिलेले दिसून येते. त्यानंतर १९७८ च्या निवडणुकीमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार केशवराव पवार निवडून आले. परंतु पुढच्या १९८० च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाकडे गेला. त्याचबरोबर १९८० व १९८५ च्या निवडणुकीमध्ये मराठा व ब्राह्मण समाजाचे उमेदवार निवडून आले. १९९० च्या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाकडे असलेला हा मतदारसंघ १९९५ मध्ये अपक्षाकडे जाऊन पी.डी.पाटील अपक्ष म्हणून निवडून आले. अपक्षाकडून हा विधानसभेचा मतदारसंघ १९९९ व २००४ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे गेला या मतदारसंघातून दोन्ही निवडणुकीमध्ये बाळासो पाटील निवडून आले होते.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघ–**

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी हा मतदारसंघ म्हणजे जुना कराड उत्तर मतदारसंघ होय. पुनर्रचनेनंतर कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात कराड तालुक्याचा समावेश केला आहे. कराड तालुक्यातील कोळे, कराड, उंडाळे, काले, शेणोली या पाच महसूल मंडलांचा समावेश केला आहे. पाटण तालुक्यातील ढेबेवाडी महसूल मंडल नवीन पुनर्रचनेत वगळण्यात आले. या मतदारसंघाचे स्वरूप निमशहरी व निमग्रामीण स्वरूपाचे झालेले आहे. या मतदारसंघातून मराठा व ब्राह्मण (१९८५ व १९९०) या दोन समाजाचे उमेदवार निवडून आले होते. हा मतदारसंघ शेतकरी कामगार पक्षाकडून काँग्रेसकडे (१९८० ते १९९०), काँग्रेसकडून अपक्षाकडे (१९९५) व अपक्षाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे (१९९०, २००४) सरकत होता.

## २००९ च्या कराड दक्षिण विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[१४४] –

| अ.क्र. | राजकीय पक्ष | उमेदवाराचे नाव | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय काँग्रेस | अतुल सुरेश भोसले | ६०,५७१ | ३४.०४ |
| २. | बहुजन समाजवादी पार्टी | विलास बाबू पवार | १,३६२ | ५.६७ |
| ३. | शिवसेना | माने वासुदेव हणमंत | १०,०८२ | ५.६७ |
| ४. | मनसे | अशोक गणपत चव्हाण | १,१७३ | ०.६६ |
| ५. | अपक्ष | अतुल भगवान देशकर | ६४४ | ०.३६ |
| ६. | अपक्ष | बाळासो पांडुरंग पाटील | १,१७३ | १.०६ |
| ७. | अपक्ष | शामराव आबा पाटील | ५८८ | ०.३३ |
| ८. | अपक्ष | शामराव बाळासो पाटील | १०१,६५८ | ५७.१२ |




## २००९ च्या कराड दक्षिण विधानसभा निवडणूकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | |
| कराड दक्षिण(२६०) | २५११९४ | ८७२६० | ८०१६८ | १६७८९२ | ६६.६३ |

२००९ च्या कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघामध्ये २५१९९४ मतदार होते. त्यापैकी १६७८९२ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८७२६० व ८०१६८ स्त्री मतदार होते. या निवडणुकीमध्ये एकूण मतदारांपैकी स्त्री मतदारांपेक्षा पुरुष मतदारांचे प्रमाण जास्त होते.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी (२००४)कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे एकूण मतदार संख्या २६३५२८ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १०८८४० तर स्त्री मतदारांची १०४६८८ इतके होते. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर (२००९) या मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या २५५१७९ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार १२८६११ तर स्त्री मतदार १२६५६८ इतके होते.

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघामध्ये कराड नगरपालिकेचा समावेश केला आहे. या मतदारसंघाचे स्वरूप निमशहरी व निमग्रामीण असे आहे. कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघ म्हणजे जुना कराड मतदारसंघ आहे.

२००४ च्या निवडणुकीमध्ये मतदारसंघामध्ये राष्ट्रवादीकडून बाळासो पाटील व अपक्ष म्हणून अजय जाधव यांच्यात लढत झाली होती. त्यामध्ये बाळासो पाटील विजयी झाले होते.


मतदारसंघपुनर्रचनेनंतर (२००९) च्या निवडणुकीतमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून अतुल भोसले यांना तिकिट दिले तर NCP चे बंडखोर अपक्ष उमेदवार बाळासो पाटील हे विरोधात उभे राहिले होते बाळासो पाटील हे या लढतीमध्ये विजयी झाले.

**पाटण विधानसभा मतदारसंघ –**

**१९६२ ते २००४ पर्यंतचा पाटण विधानसभा मतदारसंघांचा दृष्टिक्षेप [१४५]–**

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १. | डी.एस.देसाई | १९६२ | कॉंग्रेस | ४२९५५ |
| २. | डी.एस.देसाई | १९६७ | कॉंग्रेस | ४३५५२ |
| ३. | दौलतराव देसाई | १९७२ | कॉंग्रेस | ६९८५७ |
| ४. | दौलतराव देसाई | १९७८ | जनता पार्टी | ५४३१२ |
| ५. | दौलतराव देसाई | १९८० | कॉंग्रेस(आय) | ४०४८३ |
| ६. | विक्रम पाटणकर | १९८५ | इंडियन कॉंग्रेस | ४८८८३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | (सोशालिस्ट) | |
| ७. | विक्रम पाटणकर | १९९० | रा.कॉंग्रेस | ६२६०७ |
| ८. | विक्रम पाटणकर | १९९५ | कॉंग्रेस | ५९३९९ |
| ९. | विक्रम पाटणकर | १९९९ | रा.कॉंग्रेस | ५३३३६ |
| १० | शंभुराज देसाई | २००४ | शिवसेना | ७२२१४ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६२ ते १९७२ या कालावधीत कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले दिसून येते. त्यानंतर १९७८ च्या निवडणुकीमध्ये हा मतदारसंघ जनता पक्षाकडे गेला. या १९८० ते १९९५ या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेसचे विक्रमसिंह पाटणकर निवडून आले होते. १९९८ साली राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना झाल्यावर १९९९च्या विधानसभेच्या निवडणुकीत विक्रमसिंह पाटणकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तिकटावर निवडणुक लढवून या निवडणुकीत विजय मिळविला. त्यानंतर २००४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत नेतृत्व बदल होऊन या निवडणुकीत मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून शिवसेनेकडे गेला. या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे उमेदवार शंभुराज देसाई हे ७२२१४ मतांनी निवडून आले.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा पाटण विधानसभा मतदारसंघ**


मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी हा मतदारसंघ केवळ पाटण तालुक्यापुरता मर्यादित होता. परंतु मतदारसंघ पुनर्रचनेनंतर नवा हा मतदारसंघ पाटण व कराड अशा दोन तालुक्यांशी संबंधित

तयार झाला. पाटण तालुक्यातील ढेबेवाडी महसूल मंडल व कराड तालुक्यातील सुपने महसूल मंडळाचा समावेश नवीन पुनर्रचनेत करण्यात आला.

या मतदारसंघातून मराठा समाजाचे उमेदवार सातत्याने निवडून आले होते. (१९५७ ते २००४) जनता पक्षाकडून काँग्रेसकडे (१९८० ते १९९५) काँग्रेसकडून राष्ट्रवादी काँग्रेसकडे (१९९९) व राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिवसेनेकडे (२००४) हा मतदारसंघ सरकला होता.[१४६]

**२००९ च्या पाटण विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[१४७] –**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | उमेदवाराचे नाव | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | शिवसेना | देसाई शंभुराज शिवाजी | ८७,३३७ | ४७.८३ |
| २. | राष्ट्रीय काँग्रेस | पाटणकर विक्रमसिंह राजसिंह | ८७,९१७ | ४८.१५ |
| ३. | बहुजन समाजवादी पार्टी | मगरे निवृत्ती सिताराम | १,४९९ | ०.८२ |
| ४. | मनसे | पाटील अविनाश तुकाराम | २,०६१ | १.२३ |
| ५. | अपक्ष | शिंदे राजेंद्र धोर्डिबा | ४३६ | ०.२४ |
| ६. | अपक्ष | कांबळे सर्जेराव शंकर | १,३४० | ०.७३ |
| ७. | अपक्ष | डॉ.माने संदिप राजाराम | २,०१० | १.१० |
| | | एकूण | १,८२,६०० | |



वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ च्या पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण सात उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. त्यापैकी चार राजकीय पक्षाचे व ३ उमेदवार अपक्ष होते. पाटण विधानसभा मतदारसंघ सुरुवातीपासून कॉंग्रेसचा बालेकिल्ला समजला जातो. परंतु १९९८ साली राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना झाल्यानंतर तेथील पक्ष बदलून ती जागा १९९९ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे गेली. २००४ च्या निवडणुकीमध्ये ती जागा शिवसेनेकडे जाऊन शिवसेनेचे शंभुराज देसाई हे ७२२१४ मतांनी विजयी झाले आणि विक्रमसिंह पाटणकरांना पराभव स्वीकारावा लागला २००९ च्या निवडणुकीत सुद्धा ७ उमेदवार असताना खरी चुरस विक्रमसिंह पाटणकर व शंभुराज देसाई यांच्यात पाहावयास मिळाली. शिवसेनेचे शंभुराज देसाई यांना ८७,३३७ मते तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे विक्रमसिंह पाटणकर यांना ८७,९१७ इतकी मते मिळाली. यामध्ये पाटणकरांनी ५८० मतांनी निसटता विजय मिळविला.

**२००९ च्या पाटण विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पु. | स्त्री | एकूण | |
| पाटण(२६१) | २४६९३२ | ८८६९८ | ९२३७८ | १८२६०० | ७३.९९ |

२००९ च्या पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये २४६९३२ मतदार होते. त्यापैकी १८२६०० मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८८,६९८ व ९२,३७८ स्त्री मतदार होते. या निवडणुकीमध्ये एकूण मतदारांपैकी पुरुष मतदारांपेक्षा स्त्री मतदारांचे प्रमाण जास्त होते.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी (२००४)पाटण विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदार संख्या १७५११४ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ८४७०८ तर स्त्रीमतदार ९०४०६ इतके होते. मतदारसंघपुनर्रचनेनंतर पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये कराड तालुक्यातील काही गावांचा समावेश केल्याने या मतदारसंघाची मतदारसंख्या वाढलेली दिसून येते. त्यानुसार या मतदारसंघाची एकूण मतदार संख्या २४११४७ इतकी होती. त्यापैकी पुरुषमतदार १२०१२ इतके तर स्त्रीमतदार १२१०२१ इतके होते.


या मतदारसंघातून सातत्याने मराठा समाजाचे उमेदवार निवडून आले आहेत. १९८० ते १९८० ते १९९५ या काळात हा मतदारसंघ कॉंग्रेसकडे होता. या काळात हा मतदारसंघ

कॉग्रेसकडे होता. १९९९मध्ये राष्ट्रवादी कॉग्रेसकडे गेला व राष्ट्रवादी कॉग्रेसकडून २००४मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे शंभुराज देसाई व राष्ट्रवादी कॉग्रेस विक्रम सिंहपाटणकर यांच्यात अटीतटीची लढत झाली या लढतीत शिवसेनेचे शंभुराज देसाई विजयी झाले.

पुनर्रचनेनंतर झालेल्या २००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पुन्हा पारंपारिक प्रतिस्पर्ध्यामध्ये अटीतटीची लढत झाली. या लढतीमध्ये राष्ट्रवादी कॉग्रेसचे उमेदवार विक्रम सिंहपाटणकर यांना अवघ्या काही मतांनी निसटता विजय मिळवता आला.

**१९६२ ते २००४ पर्यंतचा सातारा विधानसभा मतदारसंघांचा दृष्टिक्षेप**[१४८]

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नाव | वर्ष | राजकीय पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १. | डी.एस.जगताप | १९६२ | कॉंग्रेस | ३५३९० |
| २. | डी.एस.जगताप | १९६७ | कॉंग्रेस | ३३९८४ |
| ३. | धोंडिराम जगताप | १९७२ | कॉंग्रेस | ४१३०७ |
| ४. | अभयसिंह भोसले | १९७८ | जनता पार्टी | ३७५४९ |
| ५. | अभयसिंह भोसले | १९८० | कॉंग्रेस(यू) | ३८०४८ |
| ६. | अभयसिंह भोसले | १९८५ | कॉंग्रेस | ६०६७७ |
| ७. | अभयसिंह भोसले | १९९० | कॉंग्रेस | ७४९३६ |
| ८. | अभयसिंह भोसले | १९९५ | कॉंग्रेस | ८३०५३ |
| ९. | अभयसिंह भोसले | १९९९ | रा.कॉंग्रेस | ५४९८० |
| १०. | शिवेंद्रराजे भोसले | २००४ | रा.कॉंग्रेस | ८२२३८ |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६२ ते १९७२ या तीन विधानसभांच्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाचे नियंत्रण राहिलेले होते. १९७८ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये हा मतदारसंघ जनता पक्षाकडे गेला. या निवडणुकीत जनता पक्षाचे अभयसिंह भोसले ३७५४९

मतांनी निवडून आले होते. या १९८० ते १९९५ या कालावधीत पुन्हा काँग्रेस पक्षाकडे मतदारसंघ गेला या कालावधीत अभयसिंह भोसले काँग्रेस पक्षाकडून निवडून आले होते.

**मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा सातारा विधानसभा मतदारसंघ –**


मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी हा मतदारसंघ सातारा तालुक्यापुरता मर्यादित होता. परंतु मतदारसंघ पुनर्रचनेनंतर जवळी तालुक्याखेरीज सातारा तालुक्यातील वर्ये, सातारा, दहीवडी, परळी, अंबर्डे व शेंद्रे या महसूल मंडलाचा समावेश केला आहे. त्यामुळे हा मतदार निमशहरी व निमग्रामीण स्वरूपाचा बनला आहे.

सातारा व जावळी या दोन्ही विधानसभा मतदारसंघातून सातत्याने मराठा समाजाचे उमेदवार सातत्याने निवडून आले होते. जावळीवर (१९७८ ते १९९०) या कालावधीत काँग्रेसचे नियंत्रण होते. काँग्रेसकडून शिवसेनेकडे (१९९५) व शिवसेनेकडून राष्ट्रवादी काँग्रेसकडे (१९९९ ते २००४) हा मतदारसंघ सरकला होता.[१४९]

सातारा विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसकडून हा मतदार राष्ट्रवादीकडे गेला. (१९९५, २००४) या मतदारसंघात मराठा जातीअंतर्गत राजकीय स्पर्धा आहे.

**२००९ च्या सातारा विधानसभा निवडणुकीतील राजकीय प्रभुत्व[१५०] –**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | उमेदवाराचे नाव | मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | रा.कॉ.पक्ष | शिवेंद्र अभयसिंह भोसले | १,२७,१४३ | ७७.७१ |
| २. | भा.ज.प. | नरेंद्र मोहन पाटील | २१,३६५ | १३.०६ |
| ३. | स्वाभिमानी पक्ष | वर्षा लक्ष्मण देशपांडे | ७,३४९ | ४.४९ |
| ४. | बहुजन समाजवादी पार्टी | प्रशांत वसंत चव्हाण | २,१४७ | १.३१ |
| ५. | अपक्ष | किशोर हनुमंत धुमाळ | १,८७३ | १.१४ |
| ६. | लोकजन शक्ती पार्टी | प्रदीप गणपत शिवदास | १,५८५ | ०.९७ |
| ७. | अपक्ष | संजय पोपटराव जाधव | १,२५२ | ०.७७ |
| | अपक्ष | अलांकृत अभिजित आवटे(बिचुकले) | ८९१ | ०.५५ |
| | | एकूण | १,०५७७८ | ६४.६५ |




२००९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये या सातारा विधानसा मतदारसंघामध्ये एकूण आठ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे होते. २००४ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच उमदेवार निवडून गेला होता. परंतु २००९ च्या निवडणुकीमध्ये भा.ज.प.चे नरेंद्र पाटील यांनी काही अंशी आव्हान उभे केले होते. परंतु मतदारसंघ पुनर्रचनेमुळे फारसा न पडता एकतर्फी विजय राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवेंद्रराजे भोसले यांनी संपादन केला. २००९ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शिवेंद्रराजे भोसले यांना १,२७,१४३ मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे नरेंद्र पाटील यांना केवळ २१,३६५ मते मिळाली.

**२००९ च्या सातारा विधानसभा निवडणुकीतील एकूण मतदार व झालेल्या मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघाचे नाव | एकूण मतदार | झालेले मतदान | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | |
| सातारा(२६२) | २९०१२४ | ८१४१० | ८१८६८ | १६३६०५ | ५६.३९ |

२००९ च्या सातारा विधानसभा मतदारसंघामध्ये २९०१२४ मतदार होते. त्यापैकी १६३६०५ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी पुरुष ८१४१० व ८१८६८ स्त्री मतदार होते. या निवडणुकीमध्ये १६३६०५ (५६.३९) मतदारांनी मतदान केले.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी (२००४) सातारा विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या २२२७०३ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ११०५१२ इतके तर स्त्री मतदार ११२१९१ इतके होते.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर (२००९) सातारा विधानसभा मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या २९०९९३ इतकी होती. त्यापैकी पुरुषमतदार १८८०५१ इतके होते तर स्त्रीमतदार १६८०९७ इतके होते.

सातारा विधानसभा मतदारसंघात जावळी तालुक्यात समावेश केलेला आहे. हा मतदारसंघ निमशहरी निमग्रामीण स्वरूपाचा तयार झाला आहे. यामतदारसंघाशी संबंधित संघातून सातत्याने मराठा समाजाचे उमेदवार निवडून आले आहेत. या मतदारसंघात मराठाअंतर्गत राजकीय स्पर्धा आहे.

२००४ च्या विधानसभा मतदारसंघामध्ये शिवेंद्रराजे भोसले (राष्ट्रवादी कॉंग्रेस) उदयनराजे भोसले (BJP) यांच्यात अटीतटीची लढत झाली. या अटीतटीच्या लढतीमध्ये शिवेंद्रराजे भोसले विजयी झाले.

मतदारपुनर्रचनेनंतर (२००९) या निवडणुकीच्या वेळी दोन्ही राज्यांचे मनोमिलन झाले स्थानिक पातळीवर निवडणुकीत सुद्धा मनोमिलन झाले. त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला त्यांना राष्ट्रवादीकडून खासदारकीसाठी तिकीट मिळाले. त्यामुळे शिवेंद्रराजे भोसले यांचा सातारा विधानसभेचा मार्गमोकळा झाला. त्यांच्या विरोधात (BJP) चे नरेद्र पाटील उभे होते. यामध्ये शिवेंद्रराजे भोसले विजयी झाले.

## २००२ च्या परिसीमन आयोगापूर्वी व पुनर्रचनेनंतरची सातारा जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाबाबतची अनुमाने

१) पुनर्ररचनेपूर्वी जुन्या वाई मतदारसंघामध्ये वाई तालुक्याखेरिज खंडाळा तालुका महसूल मंडळाचा समावेश होता. परंतु पुनर्ररचनेनंतरच्या वाई विधान सभा मतदारसंघामध्ये पूर्ण खंडाळा तालुका व महाबळेश्वरचा समावेश या मतदारसंघात केलेला आहे.

हा मतदारसंघ ग्रामीण स्वरूपाचा आहे. मतदारसंघ पुनर्ररचनेपूर्वी या मतदारसंघावर अपक्षाचा प्रभाव होता.अपक्ष म्हणून मदन भोसले यांनी या मतदारसंघाचे प्रथमच शिवसेनेने शिरकाव केलेला आहे. या मतदारसंघात शिवसेनेचे पुरुषोत्तम जाधव राष्ट्रवादीचे बंडखोर (अपक्ष) उमेदवार मकरंद पाटील व राष्ट्रवादीचे दुसरे बंडखोर उमेदवर नितीन बरगुडे पाटील यांच्यात तिरंगी लढत झाली. पुवर्रचित या मतदारसंघात वाई तालुक्याचे जास्त प्राबल्य राहिलेले दिसून येते त्यामुळे वाईचे अपक्ष उमेदवार मकरंद पाटील या मतदारसंघातून विजयी झाले.

एकूण तीन तालुक्यांचा विचार करता वाईचा नवीन समाविष्ट खंडाळा व महाबळेश्वर या तालुक्यापेक्षा जास्त प्रभाव राहिलेला दिसून येतो.

हा मतदारसंघ राष्ट्रवादीकडून अपक्षाकडे जाण्याचे मुख्य कारण म्हणजे मराठा समाजा अंतर्गत राजकीय स्पर्धा येथे होती.

२) पुनर्रचनेनंतर सातारा जिल्ह्यामध्ये खटाव व जावळी हे दोन मतदारसंघ रद्द झाले त्यामुळे जावळी जावळीचे नेते शशिकांत शिंदे यांना कोरेगांव मतदारसंघाचा आधार घ्यावा लागला. सातारा जिल्ह्यामधील कोरेगांव विधानसभा मतदारसंघात काँग्रेस व राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. शंकरराव जगताप व शालिनीताई पाटील यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले परंतु पुनर्रचनेनंतर या मतदारसंघामध्ये जवळपास ७५ % बदल झाला व या मतदारसंघामध्ये खटाव व सातारा यांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे पुनर्रचनेत रद्द झालेल्या जावळीचे प्रतिनिधी शशिकांत शिंदे यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून कोरेगांव विधानसभा मतदारसंघात तिकीट मिळाले व त्याच वेळी शालिनीताई पाटलांना ही निवडणुक अपक्ष म्हणून लढवावी लागली. या २००९ च्या नवीन मतदारसंघातून शशिकांत शिंदे विजयी झाले व कोरेगांव मतदारसंघाला एक नवीन नेतृत्व या पुनर्रचनेच्या माध्यमातून मिळाले.

३) पाटण विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी फक्त पाटण तालुक्यापुरता मर्यादित होता. परंतु पुनर्रचनेनंतर पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये पाटण तालुक्यातील ढेबेवाडी महसूल व कराडमधील सुपने महसूल मंडळाचा समावेश केला आहे. अशा प्रकारचा बदल भौगोलिक दृष्टया संयुक्तिक नाही. कारण ढेबेवाडी व सुपने येथील नागरिक फक्त काही कचेरीच्या कामानिमित्त पाटणशी संपर्क राहिलेला आहे. इतर वेळी नेहमी त्यांचा कराडशी संपर्क राहिलेला आहे. पर्यायाने या मतदारसंघतील होणाऱ्या विधान सभेच्या निवडणुकीतील मतदानाचा यामुळे फरक परिणाम झालेला दिसून येतो.

४) कराड उत्तर विधानसभा मतदारसंघ म्हणजे जुन्या कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा हा भाग होय. या मतदारसंघात खटाव, कोरेगांव, सातारा व कराड अशा चार तालुक्याच्या समावेश केला आहे.

पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघावर कॉग्रेस पक्षाचे नियंत्रण होते पुनर्रचनेनंतर या मतदारसंघात चार तालुक्यांचा समावेश केल्याने राजकीय समीकरणे बदलतील अशी अपेक्षा होती परंतु विलास पाटील यांच्या रूपाने कॉग्रेस्थ या मतदारसंघावर पुनर्रचनेनंतरसुद्धा पकड

कायम ठेवली आहे. या मतदारसंघात सातत्याने मराठा समाजाचे उमेदवार निवडून आले आहेत. पृथ्वीराज चव्हाण

५) कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघामध्ये कराड तालुक्याचा समावेश केलेला आहे. या मतदारसंघात ढेबेवाडी महसूल मंडळाचा समावेश होता. पुनर्रचनेनंतर तो वगळून पाटण विधानसभा मतदारसंघात त्याचा समावेश केलेला आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नियंत्रण होते. या मतदारसंघाचे नेतृत्व रा. कॉंग्रेसचे बाळासो पाटील यांनी केले आहे.

पुनर्रचनेनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अतुल भोसले यांना राष्ट्र.कॉंग्रेसकडून तिकिट दिले होते तर रा. कॉ.बंडखोर (अपक्ष) उमेदवार बाळासो पाटील यांनी निवडणुक लढविली या निवडणुकीत बाळासो पाटील विजयी झाले. हा मतदारसंघ निमशहरी व निमग्रामीण स्वरूपाचा आहे.

शहरी लोकसंख्या ६०,१०३ आहे तर ग्रामीण लोकसंख्या, २,४१,६६० असली तरी शहरी लोकसंख्या प्रभावी ठरणारी आहे.

६) सातारा विधान सभेत जावळी तालुक्यातबरोबर सातारा तालुक्यातील काही भागचा समावेश या मतदारसंघात करण्यात आलेला आहे. हा मतदारसंघ निमशहरी व निमग्रामीण असा तयार झाला आहे.

पुनर्रचनेपूर्वी सातारा विधानसभेवर कॉंग्रेसचे नियंत्रण राहिलेले आहे. १९७८ ते १९९९ पर्यंत अभयसिंहराजे भोसले नेतृत्व केले. १९९९ रोजी शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना केल्यापासून या मतदारसंघावर रा. कॉंग्रेसचा प्रभाव राहिलेला दिसून येतो. २००४ च्या निवडणुकीत अभयसिंहराजे भोसले यांचे चिरजीव शिवेंद्रराजे भोसले निवडून आले तर पुनर्रचनेनंतरच्या निवडणुकीतसुद्धा शिवेंद्र राजे भोसले विजयी झाले यांचे मुख्य कारण म्हजणे स्थानिक राजकारणात जिल्हापरिषद, नगरपरिषद निवडणुकीत ज्या दोन्ही राजांच्या (शिवेंद्र, उदयनराजे) ज्या दोन आघाडया होत्या त्यांचे मनोमीलन झाल्यामुळे त्याचा फायदा विधानसभा व लोकसभेला झालेला दिसून येतो.

या मतदारसंघात मराठा जाती अंतर्गत राजकीय स्पर्धा आहे.

७) मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये विधानसभेचे एकूण १० मतदारसंघ होते. परंतु मतदारसंघ पुनर्रचनेनंतर विधानसभेचे आठ मतदारसंघ तयार झाले. खटाव व जावळी हे

जुने मतदारसंघ रद्द झाले तर फलटण व माण दोन विधानसभा मतदारसंघ माढा लोकसभा मतदारसंघामध्ये गेला आहे.

८) सातारा जिल्ह्यामध्ये केवळ १४.१७ % शहरी लोकसंख्या आहे. त्यामुळे जवळपास सर्व मतदारसंघ ग्रामीण स्वरूपाचे आहेत.

९) सातारा जिल्ह्यामध्ये शहरीकरण झाले नसल्यामुळे विधान सभा मतदारसंघाची संख्या घटली आहे.

१०) पुनर्रचनेनंतर सातारा जिल्ह्यातील विधानसभेच्या ८ जागांपैकी कॉंग्रेसला फक्त १ जागा मिळाली. राष्ट्रवादी कॉंग्रेसला अपेक्षेप्रमाणे ४ जागा मिळाल्या तर माण, वाई व कराड उत्तरमधून राष्ट्रवादीचे बंडखोर उमेदवार निवडून आले.

## मतदारसंघ पुनर्रचेनेनंतर जिल्हापरिषद पातळीवर झालेले राजकीय व सामाजिक बदल

### जिल्हा परिषद राखीव जागा सातारा अहवाल (१९९४ ते २००३)[१५१]

| जिल्हा परिषद | १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | एकूण विभाग | राखीव जागाचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अनुसूचित जाती | एसटी | | जनरल | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | बीसीसी | |
| | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| सातारा | २१७६ १५४ | २१२८९१ | १६४३८ | १३२ | ८४ | ३१ | १२ | ३ | ० | ० | ३६ | ११ |

१९९४ ते २००३ या कालावधीत झालेल्या सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांचा आढावा घेत असताना सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांची एकूण लोकसंख्या २१७६१५ इतकी आहे. त्यापैकी २१२८९१ इतकी लोकसंख्या अनुसूचित जातीची आहे तर अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे प्रमाण १८२३९३ इतके आहे. पंचायत समित्यांच्या एकूण १३२ जागांपैकी सर्वसाधारण वर्गासाठी ८४ जागा राखीव असून त्यापैकी ३ जागा महिलांसाठी राखीव

आहेत. अनुसूचित जातीच्या १२ जागापैकी ३ जागा महिलांसाठी राखीव आहेत. तर BCC च्या ३६ जागांपैकी ११ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत.

## जिल्हा परिषद राखीव जागा सातारा अहवाल (२००४ ते २००९)[१५२]

| जिल्हा | २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | एकूण विभाग | महिला जागा | राखीव जागाचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | | | जनरल | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | बीसीसी | |
| | | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| सातारा | २४६२२४९ | २०६९१३ | १९५६६ | ६७ | ३४ | ४२ | २२ | ६ | ३ | १ | ० | १८ | ०९ |

सन २००१ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्ह्याची लोकसंख्या २४९९८०४ इतकी होती. त्यापैकी २११४६४ इतके प्रमाण एससीचे होते. तर १८८३० इतके प्रमाण एसटीचे होते. सातारा जिल्हा परिषदेच्या एकूण ६७ जागापैकी २३ जागा महिलासाठी राखीव होत्या. त्यापैकी सर्वसाधारण वर्गासाठी १४ जागा, एससी साठी २ जागा, एसटी साठी १ जागा तर बीसीसीसाठी ६ जागा राखीव होत्या.

## जिल्हा परिषद राखीव जागा सातारा अहवाल (२००९ ते २०१३)[१५३]

| जिल्हा | २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | एकूण विभाग | महिला जागा | राखीव जागाचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | | | जनरल | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | बीसीसी | |
| | | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| सातारा | २४९९८०४ | २११४६४ | १९८३० | ६७ | २३ | ४२ | १४ | ६ | २ | १ | १ | १८ | ६ |

सन २००१ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्ह्याची लोकसंख्या २४६२२४९ इतकी होती. त्यापैकी २०६९१३ इतके प्रमाण एससीचे होते. तर १९५६६ इतके प्रमाण एसटीचे होते.

सातारा जिल्हा परिषदेच्या एकूण ६७ जागापैकी ३४ जागा महिलासाठी राखीव होत्या. त्यापैकी सर्वसाधारण वर्गासाठी २२ जागा, एससी साठी ३ जागा, एसटी साठी ० जागा तर बीसीसीसाठी ९ जागा राखीव होत्या.

### सातारा जिल्हा परिषद पक्षनिहाय मतदान टक्केवारी (२००२ ते २००३)[१५४]

| जिल्हा परिषद | एकूण विभाग | प्रत्यक्ष मतदान | पक्षनिहाय मिळालेली मतदान टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कॉंग्रेस | राष्ट्रवादी कॉंग्रेस | भाजपा | शिवसेना | O/A/F | अपक्ष |
| **१** | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| सातारा | ६७ | ६३१६२८ | ३२.८४ | ४३.७० | ०.३४ | ४.८२ | १३.९१ | ४.३८ |

२००२ते २००३ या कालावधीत झालेल्या सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकात पक्षनिहाय जागांचा आढावा घेतला असता असे दिसून आले की, एकूण निवडणुकीत ६७ जागांसाठी ६३१६२८ मतदान झाले. त्यापैकी राष्ट्रवादी कॉंग्रेसला ४३.७०, कॉंग्रेस ३२.८४, बीजेपी ०.३४, शिवसेना ४.८२, आघाडी १३.९तर अपक्षांना ४.३८ मतदान झाले. एकूण सर्व पक्षांच्या मतांच्या टक्केवारीचा आढावा घेतला असता राष्ट्रवादी कॉंग्रेस हा पक्ष प्रथम क्रमांकावर राहिला. तर कॉंग्रेस पक्ष दुसऱ्या स्थानावर राहिला.

### जिल्हा परिषद पक्षनिहाय मतदान टक्केवारी (२००४ ते २००९)[१५५]

| जिल्हा परिषद | एकूण जागा | पक्षनिहाय मिळालेली मतदान टक्केवारी | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कॉंग्रेस | राष्ट्रवादी कॉंग्रेस | भाजपा | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्सवादी | शिवसेना | जनता दल | SWP | RPI | BRP | PWP | O/F/A | इतर | अपक्ष |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| सातारा | ६७ | २७ | ३६ | – | – | – | | – | – | – | – | – | ४ | १ | ६ |

२००४ ते २००९ या कालावधीत झालेल्या सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकात पक्षनिहाय जागांचा आढावा घेतला असता असे दिसून आले की एकूण निवडणुकीत ६७ जागांपैकी ३६ जागा राष्ट्रवादी कॉंग्रेसला, ४ जागा आघाडीला मिळाल्या. या निवडणुकीत ३६ जागा मिळवून राष्ट्रवादी कॉंग्रेस हा पक्ष प्रथम क्रमांकावर राहिला. तर २७ जागा मिळवून कॉंग्रेस पक्ष दुसऱ्या

स्थानावर राहिला.

## जिल्हा परिषद पक्षनिहाय मतदान टक्केवारी (२००९ ते २०१३)[१५६]

| जिल्हा | एकूण मते | पक्षनिहाय मिळालेली मतदान टक्केवारी | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भाजप | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | राष्ट्रवादी काँग्रेस | काँग्रेस | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्सवादी | बहुजन समाजवादी पक्ष | शिवसेना | मनसे | Parties Regd. Sec. | अपक्ष | A/F | नोटा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| सातारा | १२८०११० | ४७५९ | ० | ५६२०३२ | ४६८१३५ | ० | १२३५ | २८३६८ | ६२५१ | ६९९९९ | १३८५१४ | ० | ० |
| | % | ०.३७ | ०.०० | ४३.९० | ३६.५७ | ०.०० | ०.१० | २०२२ | ०.४९ | ५.४७ | १०.८२ | ०.०० | ०.०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सन २००९ ते २०१३ या कालावधीत झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकामध्ये विविध राजकीय पक्षांना पडलेल्या मतांचा विचार करता सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये एकूण १२८०११० मतदानांपैकी राष्ट्रीय काँग्रेसचे ५६२०३२ इतके झाले. त्याचे प्रमाण ४३.९० इतके होते. त्याच्या खालोखाल काँग्रेसला ४,६८१३५ इतकी मते मिळाली. त्याचे प्रमाण ३६.५७ इतके होते. या पक्षाच्या तुलनेत इतर पक्षांचे मतांचे प्रमाण अत्यल्प होते.

### पुर्नरचनेपूर्वी (२००७) –

पुर्नरचनेपूर्वी सातारा जिल्हा परिषदेच्या २००७ च्या निवडणुकीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की या निवडणुकीमध्ये एकूण मतदारांची संख्या १७३९५५५ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदार ८६२३८८ तर स्त्री मतदार ८७७१६७ इतके होते.

जिल्हा परिषदेच्या एकूण ६७ जागापैकी सर्वसाधारण गटांसाठी ४२ जागा अनुसूचित जातीसाठी ६ जागा अनुसूचित जमातीसाठी १ जागा तर बीसीसी साठी १८ जागा राखीव ठेवण्यात आल्या.

सातारा जिल्हा परिषदेच्या २००७ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये पक्षनिहाय आढावा घेतला असता असे दिसून येते की, जिल्हा परिषदेच्या ६७ जागांपैकी ३६ जागा राष्ट्रवादी काँग्रेसने मिळवून जिल्हा परिषदेवर वर्चस्व प्रस्थापित केले होते. इतर पक्षामध्ये काँग्रेसला २७ जागा तर आघाडीला ४ जागा मिळाल्या होत्या.

**पुनर्रचनेनंतर (२०१२)–**

सातारा जिल्हा परिषदेच्या २०१२ च्या निवडणुकीचा आढावा घेतला असता या निवडणुकीमध्ये एकूण मतदारांची संख्या १९२३३७९ इतकी होती. त्यापैकी पुरुष मतदारांची संख्या ९७६८३३ होती. तर स्त्री मतदारांची सख्या ९४५५४६ इतकी होती.

पुनर्रचेनेनंतर सातारा जिल्हा परिषदेच्या २०१२ ला झालेल्या निवडणुकीमध्ये पक्षनिहाय जागांचा आढावा घेतला असता २००७ च्या निवडणुकीच्या तुलनेत काही पक्षांच्या जागेच्या संख्येत कमी जास्त बदल झालेला दिसून येतो. मागील निवडणुकीच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ३ जागा जास्त म्हणजे ३९ जागा मिळाल्या. तर काँग्रेसला ६ जागा कमी म्हणजेच २१ जागा मिळाल्या. तर भाजपला या निवडणुकीत खातेही उघडता आले नाही. धर्मनिरपेक्ष पक्ष ४ जागा अपक्ष १३ जागा तर आघाडीला एकही जागा मिळविता आली नाही. एकूणच सर्व जागांचा विचार करता पुनर्रचनेनंतरसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेसची जिल्हा परिषदेवरील सत्ता कायम राहिलेली दिसून येते.

## २००२ च्या परिसीमन आयोगापूर्वी व पुनर्रचनेनंतरची सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद पातळीवर मतदारसंघाबाबतची अनुमाने

१) पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्हा परिषदेच्या एकूण ६७ जागापैकी सर्वसाधारण गटासाठी ४२ जागा, अनुसूचित जातीसाठी ६ जागा, अनुसूचित जमातीसाठी १ जागा तर बीसीसीसाठी १८ जागा राखीव ठेवण्यात आल्या.

२) पुनर्रचनेपूर्वी २००७ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये जिल्हा परिषदेच्या ६७ जागापैकी ३६ जागा राष्ट्रवादी कॉग्रेसने मिळवून जिल्हा परिषदेवर वर्चस्व प्रस्थापित केले होते. इतर पक्षामध्ये कॉग्रेसला २७ जागावर आघाडीला ४ जागा मिळाल्या होत्या.

पुनर्रचनेनंतरच्या २०१२च्या जिल्हापरिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी कॉग्रेसपक्षाला गेल्यावेळेपेक्षा ३ जागा जास्त मिळाल्या म्हणजेच ३९ जागा मिळाल्या तर ६ जागा कॉग्रेसला कमी मिळाल्या म्हणजेच २१ जागा मिळाल्या भाजपाला या निवडणुकीमध्ये खाते ही उघडता

आले नाही , धर्मनिरपेक्ष पक्ष ४ जागा , अपक्ष १३ तर आघाडीला एकही जागा मिळवता आली नाही.

पुनर्रचनेनंतर सुद्धा राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता कायम राहिलेली दिसून येते.

## मतदारसंघ पुनर्रचेनेनंतर पंचायत समितीवर झालेले राजकीय व सामाजिक बदल

## पंचायत समिती राखीव जागा सातारा अहवाल (१९९४ ते २००३)[१५७]

| अ. न | पंचायत समिती | २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | | | एकूण विभाग | राखीव जागाचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जनरल | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | बीबीसी | |
| | | | | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | सातारा | | | | | | | | | | | | |
| १ | सातारा | २७३३८६ | २३७६३ | १९७४ | १६ | ११ | ४ | १ | ० | ० | ० | ४ | १ |
| २ | कोरेगाव | २१२४१९ | २९८८० | १६३९ | १४ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| ३ | जावळी | ११७९८८ | ३९९२ | १६६५ | ८ | ६ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ४ | वाई | १४१२४३ | ८२८२ | २५३० | ८ | ६ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ५ | खंडाळा | १००६२४ | ८८५७ | १००२ | ६ | ३ | १ | १ | ० | ० | ० | २ | १ |
| ६ | महाबळेश्वर | २३३५४ | २०६१ | १६८९ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० |
| ७ | फलटण | २२९०८४ | २९८८० | १६३९ | १४ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| ८ | खटाव | २३४१८२ | २१६५० | ९२३ | १४ | ९ | ४ | १ | ० | ० | ० | ४ | १ |
| ९ | माण | १६६४५६ | २०९६६ | २९९ | १० | ६ | २ | १ | ० | ० | ० | ३ | १ |
| १० | कराड | ४०३१३६ | ४५५७२ | १६८२ | २४ | १५ | ५ | ३ | १ | ० | ० | ६ | २ |
| ११ | पाटण | २७४२८४ | १७९८८ | १३९६ | १६ | ११ | ४ | १ | ० | ० | ० | ४ | १ |
| | एकूण | २१७६१५४ | २१२८९१ | १६४३८ | १३२ | ८४ | ३१ | १२ | ३ | ० | ० | ३६ | ११ |

सातारा जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांची एकूण लोकसंख्या २१७६१५४ इतकी आहे. त्यापैकी २१२८९१ इतकी लोकसंख्या अनु.जातीची आहे तर अनु.जातीचे प्रमाण १६४३८ इतके पंचायत समित्याच्या एकूण १३२ जागापैकी ३१ जागा सर्वसाधारण महिला राकीव अनु.जाती महिलांना ३ जागा तर बीबीसीच्या महिलांना ११ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

# पंचायत समिती  राखीव जागा सातारा अहवाल (२००४ ते २००९)[१५८]

| अ. न | जिल्हा | पंचायत समिती | एकूण जागा | एकूण महिला | राखीव जागाचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जनरल | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | बीबीसी | |
| | | | | | एकूण | | महिला एकूण महिला | | एकूण महिला | | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | सातारा | खंडाळा | ६ | २ | ४ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| २ | सातारा | फलटण | १४ | ५ | ८ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १ |
| ३ | सातारा | माण | १० | ४ | ६ | ३ | १ | ० | ० | ० | ३ | १ |
| ४ | सातारा | खटाव | १४ | ५ | ९ | ४ | १ | ० | ० | ० | ४ | १ |
| ५ | सातारा | कोरे गाव | १२ | ४ | ८ | २ | १ | १ | ० | ० | ३ | १ |
| ६ | सातारा | वाई | ८ | ३ | ६ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ७ | सातारा | महाबळेश्वर | ४ | २ | ३ | २ | ० | ० | ० | ० | १ | ० |
| ८ | सातारा | जावळी | ६ | २ | ४ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ९ | सातारा | सातारा | १८ | ६ | ११ | ३ | २ | १ | ० | ० | ५ | २ |
| १० | सातारा | पाटण | १६ | ६ | ११ | ५ | १ | ० | ० | ० | ४ | १ |
| ११ | सातारा | कराड | २६ | ९ | १६ | ६ | ३ | १ | ० | ० | ७ | २ |
| | | एकूण | १३४ | ४८ | ८८ | ३२ | ११ | ४ | ० | ० | ३७ | १२ |

वरील तक्त्यावरून  असे दिसून येते की, २००४ ते २००९ या कालावधीत सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा आढावा घेत असताना या निवडणुकीत काही जागा प्रत्येक पंचायत समित्यात राखून ठेवलेल्या आहेत. सर्व समित्यांच्या राखीव जागांचा आढावा घेतला असता सातारा जिल्ह्यातील एकूण १३४ जागांपैकी ४८ जागा महिलांसाठी राखीव आहेत. सर्वसाधारण वर्गासाठी ८६ जागांपैकी ३२ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातीच्या ११ जागांपैकी ४ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. तर BCC च्या ३७ जागांपैकी १२ जागा महिलांसाठी राखीव ठेवलेल्या आहेत.

## पंचायत समिती राखीव जागा सातारा अहवाल (२००९ ते २०१३)[१५९]

| अ. न. | जिल्हा | पंचायत समिती | एकूण जागा | एकूण महिला | राखीव जागाचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जनरल | | | | जनरल | | बीबीसी | |
| | | | | | एकूण | | महिला एकूण महिला | | एकूण महिला | | एकूण | महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | सातारा | जावळी | ६ | ३ | ४ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| २ | सातारा | कराड | २४ | १२ | १६ | ८ | २ | १ | ० | ० | ६ | ३ |
| ३ | सातारा | खंडाळा | ६ | ३ | ४ | २ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ४ | सातारा | खटाव | १४ | ७ | ९ | ४ | १ | १ | ० | ० | ४ | २ |
| ५ | सातारा | कोरेगाव | १४ | ७ | ९ | ५ | १ | ० | ० | ० | ४ | २ |
| ६ | सातारा | महाबळेश्वर | ४ | २ | ३ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ७ | सातारा | माण | १० | ५ | ६ | २ | १ | १ | ० | ० | ३ | २ |
| ८ | सातारा | फलटण | १४ | ७ | ८ | ४ | २ | १ | ० | ० | ४ | २ |
| ९ | सातारा | पाटण | १६ | ८ | ११ | ५ | १ | १ | ० | ० | ४ | २ |
| १० | सातारा | सातारा | १८ | ९ | ११ | ५ | २ | १ | ० | ० | ५ | ३ |
| ११ | सातारा | वाई | ८ | ४ | ६ | ३ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| | | एकूण | १३४ | ६७ | ८७ | ४१ | १० | ६ | ० | ० | ३७ | २० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ ते २०१३ या कालावधीत सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या राखीव जागांचा आढावा घेतला असता सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या एकूण १३४ जागांपैकी ६७ जागा महिलांसाठी राखीव होत्या. अनुसूचित जातीच्या १० जागांपैकी ६ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. तर BCC च्या ३७ जागांपैकी २० जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या.

## पंचायत समिती पक्षनिहाय  मिळालेली मतदान टक्केवारी (१९९४ ते २००३)[१६०]

| अ. न. | पंचायत समिती | प्रत्यक्ष मतदान | पंचायत समिती पक्षनिहाय  मिळलेली मतदान टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | भाजप | शिवसेना | O□A□F | अपक्ष |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सातारा | १०५२४६९ | ३४.५८ | ३८.७७ | ०.२८ | ५.४४ | १६.५० | ४.४२ |

१९९४ ते २००३ या कालावधीत सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकींचा पक्षनिहाय आढावा  घेतला  असता  असे दिसून येते की, सातारा जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे.  या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या  निवडणुकीत एकूण १०५२४६९ मतदानापैकी ३८.७७ मते राष्ट्रवादी काँग्रेसला मिळून  प्रथम क्रमांकावर राहिला. ३४.५८ मते मिळवून काँग्रेस पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तर स्थानिक आघाडीला १६.५० मते मिळवून तिसऱ्या क्रमांकावर राहिला

## पंचायत समिती पक्षनिहाय  मिळालेली मतदान टक्केवारी (२००४ ते २००९)[१६१]

| पंचायत समिती | प्रत्यक्ष मतदान | पंचायत समिती पक्षनिहाय  मिळलेली मतदान टक्केवारी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बहुजन समाजवादी पार्टी | भाजप | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | शिवसेना | मनसे | खटाव माण पाटण विकास | इतर | अपक्ष |
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | | |
| सातारा | ११६२४८४ | ०.१ | ०.२ | ३६.७ | ४५.६ | २.० | ०.५ | ११.१ | ०.८ | २.९ |

२००४ ते २००९ या कालावधीत झालेल्या सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकींचा पक्ष निहाय आढावा घेतला असता सातारा जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे. या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकीत एकूण ११६२४८४ मतदानांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसला ४५.६ मते मिळून प्रथम क्रमांकावर राहिला. काँग्रेसला ३६.७ मते मिळवून दुसऱ्या क्रमांकावर राहिला तर खटाव, माण व पाटण विकास आघाडीला ११.१ मते मिळवून तिसऱ्या क्रमांकावर राहिली.

## पंचायत समिती राखीव जागा सातारा अहवाल (२००९ ते २०१३)[१६२]

| जिल्हा | पंचायत समिती | एकूण महिला | पंचायत समिती पक्षनिहाय मिळलेली मतदान टक्केवारी | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भाजप | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | राष्ट्रवादी कॉंग्रेस | कॉंग्रेस | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्सवादी | बहुजन समाजवादी पाटी | शिवसेना | मनसे | Parties Regd. With Sec (Recogd State Party For State Other Than Mah.) | Parties Regd. With Sec. | अपक्ष | A□F | नोटा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | १० | ११ | य१२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| सातारा | एकूण | १२७२६६९ | १३२४ | ० | ५४८६८१ | ४५०८०२ | ० | ९२५ | ४५८५९ | १०६०६ | ० | ६८२९६ | १४५१७६ | ० | ० |
| | | % | ०.१० | ०.०० | ४३.११ | ३५.४२ | ०.०० | ०.०७ | ३.६० | ०.८३ | ०.०० | ५.३७ | ११.४९ | ०.०० | ० |

२००९ ते २०१३ या कालावधीत झालेल्या सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकींचा पक्षनिहाय आढावा घेतला असता सातारा जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यावर राष्ट्रवादी कॉंगेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे. या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकीत एकूण १२७२६६९ मतदानांपैकी ५४८६८१ मते राष्ट्रवादी कॉंग्रेसला मिळाली. म्हणजेच ४३.११ मते मिळून राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रथम क्रमांकावर राहिला परंतु इतर पक्षांना या निवडणुकीत अत्यल्प मतदान मिळाले.

**पंचायत समिती (सातारा जिल्हा) पुनर्रचनेपूर्वी (२००७) –**

सातारा जिल्ह्यातील पंचायत समितींच्या २००७ मध्ये झालेल्या निवडणुकीचा आढावा घेतला असता जिल्ह्यातील एकूण ११ पंचायत समितींच्या एकूण १३४ जागांपैकी सर्वसाधारण वर्गासाठी ८८ जागा अनुसूचित जाती साठी ११ जागा तर बीसीसीसाठी ३७ जागा तर अनुसूचित जमातीसाठी एकही जागा राखीव नव्हती.

सातारा जिल्ह्यातील ११ पंचायत समितींच्या २००७ मध्ये झालेल्या निवडणुकीचा पक्षनिहाय जागांचा आढावा घेतला असता. एकूण १३४ जागांपैकी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने ७४

जाग जिंकून सातारा जिल्हा पंचायत समित्यांवर वर्चस्व प्रस्थापित केलेले दिसून येते. काँग्रेसला ४७ जागा तर अपक्षाला ४ जागा मिळाल्या होत्या.

**पुनर्रचनेनंतर (२०१२)–**

सातारा जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांच्या २०१२ मध्ये झालेल्या निवडणुकीचा आढावा घेतला असता जिल्ह्यातील एकूण ११ पंचायत समित्यांच्या एकूण १३४ जागांचा आढावा घेतला असता सर्वसाधारण वर्ग व अनुसूचित जातीच्या संख्येत १ जागेने फरक पडला. एकूण १३४ जागांपैकी सर्वसाधारण वर्गासाठी ८७ जागा  अनुसूचित जातीसाठी १० जागा तर बीसीसीसाठी ३७ जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या. अनुसूचित जमातीला २००७ च्या निवडणुकीप्रमाणे या निवडणुकीतसुद्धा राखीव जागा ठेवण्यात आली नाही.

सातारा जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांच्या २०१२ मध्ये झालेल्या निवडणुकींचा पक्षनिहाय जागांचा आढावा घेतला असता. राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागा ७ ने वाढल्या. म्हणजेच ८१ जागा मिळाल्या. तर काँग्रेसच्या मागील निवडणुकीच्या तुलनेत ८ जागा यावेळी कमी झाल्या. म्हाणजेच ३९ जागा काँग्रेसला मिंळाल्या. शिवसनेने या निवडणुकीत १ जागा मिळवून खाते उघडले आहे. धर्मनिरपेक्ष ७ जागा अपक्ष ६ जागा तर आघाडील एकही जागा मिळविता आली नााही. एकंदरीत पुनर्रचनेनंतरसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जिल्हा परिषदेप्रमाणेच सातारा जिल्हा पंचायत समित्यावर आपले वर्चस्व कायम राखलेले दिसून येते.

**२००२ च्या परिसीमन आयोगापूर्वी व पुनर्रचनेनंतरची सातारा जिल्ह्यातील पंचायत समिती मतदारसंघाबाबतची अनुमाने**

१) पुनर्ररचनेपूर्वी २००७ च्या सातारा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी १३२ जागां पैकी ३१ जागा सर्वसाधारण महिला राखीव, अनु–जाती महिलांना ३ जागा तर अनु जमातीच्या महिलांना ११ जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या.

पुनर्ररचनेनंतर पंचायत समित्यांच्या १३४ जागांपैकी ६७ जागा महिलांसाठी राखीव होत्या. अनुसूचित जातीच्या १० जांगापैकी ६ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या तर बी.सी.सीच्या ३७ जागांपैकी २० जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या.

२) पुनर्रचनेपूर्वी झालेल्या २००७ च्या पंचायत समितीच्या १३४ जागांसाठी झालेल्या निवडणुकीमध्ये ७४ जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जिंकल्या तर काँग्रेसला ४७ जागा तर अपक्षाला ४ जागा मिळाल्या होत्या.

पुनर्रचनेनंतर झालेल्या २०१२ च्या पंचायत समितीच्या १३४ जागांसाठी झालेल्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ८१ जागा मिळाल्या तर काँग्रेसला ३९ जागा, शिवसेनेला १, धर्मनिरपेक्ष पक्ष ७जागा, अपक्षाला ६ जागा तर आघाडीला एकही जागा मिळवता आली नाही.

एकंदरीत पुनर्रचने नंतरसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जिल्हा परिषदेप्रमाणेच सातारा जिल्हा पंचायत समित्यांवर आपले वर्चस्व कायम राखलेले दिसून येते.

**समारोप–**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर सातारा जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक बदलांचा अभ्यास लोकसभा, विधानसभा, जिल्हापरिषद व पंचायत समिती पातळीवर केलेला असून सातारा जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी व पुनर्रचनेनंतर काही बदल झालेले आहेत. त्याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये लोक सभेचे सातारा व कराड असे दोन मतदारसंघ होते दोन्ही मतदारसंघ सर्वसाधारण होते. या दोन्ही लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव होता. पुनर्रचनेनंतर सातारा जिल्ह्यामध्ये सातारा हा एकच लोकसभा मतदारसंघ राहून कराड हा मतदारसंघ रद्द झाला. पुनर्रचनेनंतर सुद्धा सातारा लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव राहिलेला आहे.

पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये विधान सभेचे १० मतदारसंघ होते. या १० पैकी एक मतदारसंघ (माण) राखीव होता तर ९ मतदारसंघ सर्वसाधारण होते. या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव राहिलेला आहे. पुनर्रचनेनंतर सातारा जिल्ह्यात विधानसभेचे ८ मतदारसंघ राहिले त्यापैकी १ मतदारसंघ (फलटण) राखीव झाला. यापूर्वी माण हा राखीव होता तो सर्वसाधारण झाला. पुनर्रचनेनंतर जावळी व खटाव हे मतदारसंघ रद्द झाले. पुनर्रचनेनंतर सुद्धा विधानसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचाच प्रभाव राहिलेला आहे.

एकदंरीत पुणे व सातारा जिल्ह्यातील पुनर्रचनेनंतरच्या राजकीय व सामाजिक बदलांचा अभ्यास लोकसभा व विधानसभा पातळीवर केल्यानंतर पुणे व सातारा जिल्ह्याचा तुलनात्मक राजकीय अभ्यास पुढील प्रकरणात करीत असताना त्यामध्ये १) राजकीय पक्षाचा प्रभाव २) राजकीय नेतृत्व ३) राजकारणातील फेरबदल ४) सरकारमधील भूमिका ५) शहरी व ग्रामीण

राजकारणाची तुलना ६) राजकीय सहभागाची तुलना ७) मतदारसंघाची तुलना या मुद्द्यांचा आधार त्यामध्ये घेतला जाणार आहे.

## ४.४ पुणे व सातारा जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतरचा तुलनात्मक राजकीय अभ्यास

### प्रस्तावना

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर राष्ट्रीय, राज्य पातळीवर, जिल्हा व तालुका पातळीवर काही सामाजिक व राजकीय बदल होत असतात. हे बदल बदलत्या राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतात. मतदारसंघाची पुनर्रचना म्हणजे राज्य, जिल्हा व मतदारसंघातील आर्थिक व सामाजिक संबंधाची फेर जुळणी आहे. राज्यातील, जिल्ह्यातील व मतदारसंघातील मतदारसंख्या राजकीय वर्तनाची फेरजुळणी झाली आहे. प्रत्येक विभाग व जिल्हा विधानसभा मतदारसंघातील बदलत्या राजकारणाचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून पुणे व सातारा जिल्ह्याचा पुनर्रचनेनंतर तुलनात्मक राजकीय अभ्यासातून लोकसभा, विधानसभा पातळीवर झालेल्या राजकीय व सामाजिक बदलांबरोबरच बदलत्या राजकारणाचा तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर राजकीय पक्षाचा प्रभाव, राजकीय नेतृत्व, शहरी व ग्रामीण राजकारणाची तुलना, राखीव मतदारसंघाची तुलना, सरकारमधील भूमिका राजकीय सहभाग , मतदारसंघाची तुलना, राजकारणातील फेरबदल इ. घटकांचा ऊहापोह करणे आवश्यक आहे.[१६३]

## अ) पुणे

### १) राजकीय पक्षाचा प्रभाव–

पुणे जिल्हा हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला समजला जातो. पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यामध्ये खेड बारामती व पुणे असे लोकसभेचे तीन मतदारसंघ होते. या तीन मतदारसंघापैकी खेड व बारामती या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला आहे तर पुणे लोकसभा मतदारसंघावर काँग्रेसचा प्रभाव राहिलेला आहे.

**२००४ सालचा पुनर्रचनेपूर्वीचा राजकीय पक्षनिहाय तक्ता क्र.१[१६४]**

| अ.नं. | मतदारसंघ | विजेता | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | पुणे | सुरेश कलमाडी | काँग्रेस |
| २ | खेड | अशोक मोहोळ | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ३ | बारामती | शरद पवार | राष्ट्रवादी काँग्रेस |

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात खेड मतदारसंघ रद्द झाला. पुणे जिल्ह्यात शिरूर व मावळ हे नवीन लोकसभा मतदारसंघ निर्माण झाल्याने एकूण मतदारसंघ चार झाले. पुनर्रचनेनंतर मात्र नवीन मतदारसंघामध्ये पक्ष बदल झालेला दिसून येतो. एकूण चार लोकसभा मतदारसंघापैकी पुणे व बारामती या ठिकाणी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव कायम राहिलेला आहे परंतु नव्याने निर्माण झालेल्या मावळ व शिरूर लोकसभा मतदारसंघावर शिवसेनेने प्रभाव निर्माण केलेला आहे.

**२००९ सालचा पुनर्रचनेनंतरचा राजकीय पक्षनिहाय तक्ता क्र.२**[१६५]

| अ.नं. | मतदारसंघ | विजेता | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | पुणे | सुरेश कलमाडी | काँग्रेस |
| २ | बारामती | सुप्रिया सुळे | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ३ | मावळ | गजानन बाबर | शिवसेना |
| ४ | शिरूर | शिवाजीराव आढळराव पाटील | शिवसेना |

पुर्नरचनेपूर्वी विधानसभा पातळीवर पुणे जिल्ह्यात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव राहिलेला आहे एकूण विधानसभेच्या १८ जागांपैकी काँग्रेस ४ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस ०८ भाजपा ०४ तर शिवसेनेला ०२ जागा मिळाली.

**२००४ सालचा पुनर्रचनेपूर्वीचा राजकीय पक्षनिहाय क्र.३**[१६६]

| अ.नं. | मतदारसंघ | विजेता | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | जुन्नर | वल्लभ बेनके | राष्ट्रवादी काँग्रेस |
| २ | आंबेगाव | दिलीप वळसे पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ३ | खेड आळंदी | दिलीप मोहिते | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ४ | मावळ | दिगंबर बाळासो बेगडे | भाजप |
| ५ | मुळशी | शरद ढमाले | शिवसेना |
| ६ | हवेली | विलास लांडे | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ७ | बोपोडी | चंद्रकांत छाजेड | काँग्रेस |
| ८ | शिवाजीनगर | निम्हण विनायक | शिवसेना |
| ९ | राखीव पर्वती (SC) | रमेश बागवे | काँग्रेस |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | कसबा पेठ | गिरिश बापट | भाजप |
| ११ | भवानी पेठ | कमल उल्हास ढोले पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस |
| १२ | पुणे कन्टोनेंट | बाळासाो शिवरकर | काँग्रेस |
| १३ | शिरूर | बाबुराव पाचर्णे | भाजप |
| १४ | इंदापूर | हर्षवर्धन पाटील | अपक्ष |
| १५ | बारामती | अजित पवार | राष्ट्रवादी काँग्रेस |
| १६ | पुरंदर | अजित टेकवडे | राष्ट्रवादी काँग्रेस |
| १७ | भोर | अनंतराव थोपटे | काँग्रेस |
| १८ | दौंड | रंजना कुल | राष्ट्रवादी काँग्रेस |

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात विधान सभा मतदारसंघाची संख्या १८ ऐवजी २१ इतकी झाली. पुणे जिल्हा हा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. परंतु २००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस राष्ट्रवादी पक्षाला ११ जागा मिळाल्या. काँग्रेस –४, राष्ट्रवादी काँग्रेस – ०७, भाजप ०३ शिवसेना ०३, मनसेला ०१ तर अपक्षाला ०३ जागा मिळाल्या. या जिल्ह्यात काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेसने प्रथम क्रमांकावर कामगिरी केली असली तरी भाजप व शिवसेनेने पुणे जिल्ह्यात शिरकाव केला आहे हे दुर्लक्षून चालणार नाही. कारण पूर्वी कधीही भाजप–सेनेला येथे यश मिळाले नव्हते.

**२००९ सालचा पुनर्रचनेनंतरचा राजकीय पक्षनिहाय तक्ता क्र.४**[१६७]

| अ.नं. | मतदारसंघ | विजेता | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | जुन्नर | वल्लभ बेनके | राष्ट्रवादी काँग्रेस |
| २ | आंबेगाव | दिलीप वळसे पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ३ | खडे आळंदी | दिलीप मोहिते | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ४ | शिरूर | अशोक पवार | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ५ | दौड | रमेश थोरात | राष्ट्रवादी बंडखोर |
| ६ | इंदापूर | हर्षवर्धन पाटील | काँग्रेस |
| ७ | बारामती | अजित पवार | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ८ | पुरंधर | विजय शिवतारे | शिवसेना |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | भोर | संग्राम थोपटे | काँग्रेस |
| १० | मावळ | बाळा भेगडे | भाजप |
| ११ | चिंचवड | लक्ष्मण जगताप | राष्ट्रवादी बंडखोर |
| १२ | पिंपरी (SC) | अण्णा बनसोडे | राष्ट्रवादी |
| १३ | भोसरी | विलास लांडे | राष्ट्रवादी बंडखोर |
| १४ | वडगांव शेटी | बापू पठारे | राष्ट्रवादी |
| १५ | शिवाजीनगर | विनायक निम्हण | काँग्रेस |
| १६ | कोथरूड | चंद्रकांत मोकाटे | शिवसेना |
| १७ | खडकवासला | रमेश वांजळे | मनसे |
| १८ | पर्वती | माधुरी मिसाळ | भाजप |
| १९ | हडपसर | महादेव बाबर | शिवसेना |
| २० | पुणे कॅन्टीन्मेट (SC) | रमेश बागवे | काँग्रेस |
| २१ | कसबा पेठ | गिरीश बापट | भाजप |

**२) राजकीय नेतृत्व ( लोकसभा पातळी)**

पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्याच्या राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व विचार करता पुणे जिल्ह्यातून मोहन धरिमा, विठ्ठल गाडगीळ, सुरेश कलमाडी यासाख्या नेत्यांचे नेतृत्व या जिल्ह्याला लाभलेले आहे. हे सर्व नेते काँग्रेस पक्षाकडून नेतृत्व केलेली आहेत. २००४ च्या निवडणुकीमध्ये सुरेश कलमाडी यांनी विजय संपादन करून पुणे लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले होते. बारामती लोकसभा मतदारसंघातून २००४ पर्यंत सातत्याने शरद पवार यांनी नेतृत्व केले आहे. तर खेड लोकसभा मतदारसंघातून अशोक मोहोळ यांनी २००४ पर्यंत नेतृत्व केले आहे.

मतदारसंघपुर्नरचनेनंतर मात्र लोकसभा मतदारसंघातील बदल व वाढ यामुळे काही मतदारसंघामध्ये नेतृत्व बदल झालेला आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे सुरेश कलमाडी यांचे नेतृत्व पुनर्रचनेनंतर सुद्धा कायम राहिलेले. परंतु बारामती लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस नेते शरद पवार यांची कन्या सुप्रिया सुळे या महिला नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या आहेत. हा बदल या मतदारसंघात जाणवतो.

मावळ लोकसभा मतदारसंघ नव्याने तयार झाल्याने यामध्ये निम्मा मतदारसंघ पुणे जिल्ह्यातील व निम्मा मतदारसंघ कोकणातील आहे. या मतदारसंघावर शहरीभागाचे नेतृत्व

पाहायला मिळते. शहरीभागातून (मावळ, पिंपरी, चिंचवड) शिवसेनेचे गजानन बाबर यांचे नवीन नेतृत्व या मतदारसंघाला मिळाले. तर शिरूर लोकसभा मतदारसंघ नव्याने तयार झाला असून यामध्ये खेड लोकसभा मतदारसंघाचा समावेश होतो. या मतदारसंघात शिवसेनेचे शिवाजीराव आढळराव पाटील यांचे नेतृत्व या मतदारसंघाला लाभले.

**विधानसभा पातळी–**

पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये पूर्वीच्या १८ विधानसभा मतदारसंघाऐवजी २१ विधानसभा मतदारसंघ झाले. त्यातील काही मतदारसंघ रद्द झाले तर काही मतदारसंघामध्ये काही बदल झाले तर काही मतदारसंघ नव्याने तयार झाले. त्यामुळे राजकीय नेतृत्व सुद्धा बदलले आहे. पुनर्रचनेपूर्वी मुळशी मतदारसंघाचे शिवसेनेचे शरद ढमाले यांनी नेतृत्व केले होते. परंतु पुनर्रचनेत हा मतदारसंघ रद्द होऊन तो भोर विधानसभेला जोडला गेल्याने ढमाले यांना पुनर्रचनेचा फटका बसला व त्यांना भोर विधानसभा मतदारसंघातून उभे रहावे लागले. पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे अनंतराव थोपटे यांचे चिरंजीव संग्राम थोपटे हे तरूण नेतृत्व (काँगेसपक्ष) पुढे आले आहे. या मतदारसंघाला काँग्रेसपक्षाची परंपरा लाभलेली आहे.

पुनर्रचनेपूर्वी हवेली मतदारसंघाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसचे विलास लांडे करीता होते. परंतु पुनर्रचनेनंतर हवेली या मतदारसंघाचा बराचसा भाग भोसरी (नवीन) विधानसभा मतदारसंघात गेल्याने या मतदारसंघातून विलास लांडे यांनी राष्ट्रवादीचे बंडखोर उमेदवार म्हणून या मतदारसंघातून विजय मिळविला. हवेलीचा भाग या मतदारसंघाला जोडल्याने त्याचा त्यांना फायदा झाला. बोपोडी, भवानी पेठ हे मतदारसंघ या पुनर्रचनेत रद्द झाल्यामुळे त्याचा फटका काँग्रेसचे चंद्रकांत छाजेड व कमल उल्हास ढोले पाटील यांना बसला त्यामुळे त्यांना निवडणुक स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. पुनर्रचनेपूर्वी पर्वती हा मतदारसंघ राखीव होता. या मतदारसंघाचे नेतृत्व रमेश बागवे हे करीत होते. परंतु पुनर्रचनेत हा मतदारसंघ पुणे कॅन्टोन्मेट जोडला गेला तसेच हा मतदारसंघ राखीव झाल्यामुळे बागवे यांना फायदा होऊन या राखीव जागेतून नवीन नेतृत्व पुढे आले. परंतु या अगोदर पुणे कॅन्टोन्नेट मतदारसंघाचे नेतृत्व पुढे आले. परंतु या अगोदर पुणे कॅन्टोन्मेट मतदारसंघाचे नेतृत्व करणारे बाळासाहेब शिवरकर यांना मतदारसंघ राखीव झाल्यामुळे बाहेर पडावे लागले.

### ३) राजकारणातील फेरबदल –

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्याच्या राजकारणामध्ये काही फेरबदल झालेले आहेत. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, मावळ व शिरूर असे चार मतदार लोकसभा मतदारसंघ निर्माण झाले. परंतु पूर्वीचा खेड लोकसभा मतदारसंघ रद्द झाल्यामुळे या मतदारसंघातून निवडून येणारे राष्ट्रवादीचे आमदार अशोक मोहोळ यांचे राजकीय भवितव्य अंधातरी झाले आहे. तर खेडचा ५० % भाग शिरूर लोकसभा मतदारसंघाला जोडला आहे.

नव्याने निर्माण झालेल्या मावळ लोकसभा मतदारसंघ निम्मा भाग कोकणातील रायगड लोकसभा मतदारसंघातील निम्मा भाग (पनवेल, कर्जंत व उरण ) व निम्मा भाग पुणे जिल्ह्यातील (मावळ, पिंपरी व चिंचवड) असल्याने या मतदारसंघावर शहरी भागाचे वर्चस्व पाहायला मिळते. या मतदारसंघाचा निम्मा भाग रायगड लोकसभा मतदारसंघातील आहेत. त्यामुळे तेथील शेतकरी कामगार पक्षाचे महत्त्व कमी झाले आहे तसेच राजकीय समीकरण सुद्धा बदलली आहेत.

पुनर्रचनेनंतर नव्याने निर्माण झालेल्या शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये खेडचा निम्मा भाग या मतदारसंघाला जोडला गेल्यामुळे खेडच्या जुन्या नेतृत्वाचा अस्त (अशोक मोहोळ) यांच्यारूपाने घेऊन त्याऐवजी या मतदारसंघात शिवसनेचे शिवाजीराव आढळराव पाटील हे नवीन नेतृत्व या मतदारसंघातून उदयाला आले.

पुनर्रचनेनंतर विधानसभा पातळीवर सुद्धा पुणे जिल्हामध्ये राजकारणात फेरबदल झालेले दिसून येतो. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात मध्ये २१ विधानसभा मतदारसंघ निर्माण झाले. त्यामध्ये पूर्वीचे काही मतदारसंघ नव्याने निर्माण झाले.तर काही मतदारसंघामध्ये बदल करण्यात आला. चिंचवड, पिंपरी, भोसरी, वडगांवशेरी, खडकवासला व हडपसर हे विधानसभेचे सहा मतदारसंघ नव्याने निर्माण झाले तर मुळशी, हवेली व भवानी पेठ हे मतदारसंघ रद्द झाले.

पुनर्रचनेपूर्वी पर्वती विधानसभा मतदारसंघ राखीव होता या मतदारसंघातून रमेश बागवे हे निवडून यायचे परंतु पुनर्रचनेत पर्वती ऐवजी पुणे कॅन्टोन्मेट हा मतदारसंघ राखीव ठेवल्याने तसेच पर्वतीचा काही भाग पुणे कॅन्टोन्मेटला जोडला गेल्याने रमेश बागवे यांना या राखीव जागेतून निवडणुक जिंकली.

पूर्वीचा पुणे कॅन्टोन्मेंट हा मतदारसंघ खुल्या प्रवर्गासाठी होता. त्यावेळी या मतदारसंघाचे नेतृत्व बाळासाहेब शिवरकर करीत होते परंतु हा मतदारसंघ राखीव झाल्यामुळे

शिवरकर यांना नव्याने निर्माण झालेल्या हडपसर विधानसभा मतदारसंघातून उभे राहावे लागले. २००९ च्या निवडणुकीत या ठिकाणी शिवसेनेचे महादेव बाबर यांनी विजय संपादन करून काँग्रेस राष्ट्रवादीची परंपरा मोडीत काढली.

पुरंधर विधानसभा मतदारसंघामध्ये पुनर्रचनेनंतर पुणे महापालिकेतील शहरी भाग- हवेली तालुक्यातील पिसोळी, उंड्री, आंबेगांव बुद्रुक या गावांचा समावेश केल्यामुळे मतदारसंघाचे स्वरूप ग्रामीण असले तरी शहरी भागाची भूमिका यामध्ये महत्त्वाची राहिलेली आहे. पुनर्रचनेपूर्वी या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे दादा जाधवराव यांना मात्र या पुनर्रचनेचा फटका बसलेला आहे. कारण शिवसेनेचे निवडून आलेले उमेदवार विजय शिवतारे यांना निर्णायक मताधिक्य या मतदारसंघात नव्याने मिळालेले आहे. त्यामुळे या मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलली आहेत.

**४) सरकारमधील भूमिका / योगदान-**

पुणे जिल्ह्यातील विकासाच्या दृष्टिकोनातून पूणे लोकसभा मतदारसंघासाठी या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे सुरेश कलमाडी यांनी पुण्यामध्ये कॉमन वेल्थ गेम या आंतरराष्ट्रीय स्पर्धा भरविण्याचे काम केलेले आहे. पुण्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्यासाठी सुरेश कलमाडी यांनी पुणे फेस्टिवल सुरू केले.

बारामती लोकसभा मतदारसंघासाठी खा. सुप्रिया सुळे यांनी विविध विकासपयोगी कामे केलेली आहेत. विशेषता महिलांच्या विकासासाठी विविध उपक्रम त्यांनी राबविलेले आहेत. अलिकडच्या ट्रिपल तलाकाच्या संदर्भात समर्थन करणारी भूमिका मांडण्याचे काम सुप्रिया सुळे यांनी केलेले आहे.

शिरूर मतदारसंघासाठी शिवाजीराव आढळराव पाटील यांनी विविध विकासकामे मार्गी लावली आहेत. विशेषतः शिरूर भागातील शेतकऱ्यांची आवडती बैलगाडया शर्यती भरविण्याच्या संदर्भात पाठपुरावा केलेला आहे.

**५) शहरी व ग्रामीण राजकारणाची तुलना-**

पुणे जिल्ह्यामध्ये एकूण लोकसभेचे चार मतदारसंघ असून पुणे हा मतदारसंघ शहरी आहे. तर बारामती, मावळ व शिरूर हे मतदारसंघ निमशहरी आहेत.

लोकसभा पातळीवर शहरी व ग्रामीण राजकारणाची तुलना करता बारामती लोकसभा मतदारसंघाला भोर, वेल्हा, मुळशी हा ग्रामीण भाग जोडलेला आहे. परंतु बारामती हेच या मतदारसंघाचे राजकारणाचे केंद्र बनले आहे. या मतदारसंघातून शहरी व ग्रामीण हितसंबंध

जोडून घेणारे नवीन महिला नेतृत्व म्हणून राष्ट्रवादी काँगेसच्या सुप्रिया सुळे यांच्या रूपाने पुढे आलेले आहे. यातून शहरी भागाचे ग्रामीण भागावरील वर्चस्व राहिलेले आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघाला सुद्धा कोकणातील ग्रामीण भाग–पनवेल, उरण, कर्जत, हा भाग जोडलेला आहे. परंतु पुणे जिल्हातील मावळ पिंपरी, चिंचवड या शहरी भागातील मतदारसंघातूनच सर्व मतदारसंघाची सूत्रे हलवली जातात. पर्यायाने शहरीभागाचे ग्रामीण भागावर वर्चस्व या माध्यमातून राहिलेले आहे. शहरी व ग्रामीण हितसंबंध जोडून घेणारे नेतृत्व म्हणून शिवसेनेचे गजानन बाबर यांचे नवीन नेतृत्व या मतदारसंघातून उदयाला आले.

पुणे जिल्ह्यातील विधानसभा पातळीवर १० शहरी मतदारसंघ, निमशहरी, ०४ तर ग्रामीण–०७ मतदारसंघ आहेत.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर चिंचवड, पिंपरी, भोसरी, वडगांव शेरी, खडकवासला, हडपसर असे सहा नवीन शहरी मतदारसंघाचा समावेश केला असून १ ग्रामीण मतदारसंघ (मुळशी) व २ शहरी मतदारसंघ (बोपोडी व हवेली) हे मतदारसंघ रद्द करण्यात आले आहेत.

पुणे जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतर विधानसभा मतदारसंघातील झालेले बदल व काही मतदारसंघ कमी होणे किंवा काही मतदारसंघ नव्याने निर्माण होणे. या कारणामुळे पुणे शहरी व ग्रामीण मतदारसंघाची तुलना करता शहरीभागामुळे एकूण ११ विधानसभा मतदारसंघ आहेत. तर ग्रामीण भागामध्ये १० विधानसभा मतदारसंघ आहेत.

**६) राजकीय सहभागाची तुलना–**

२००४**सालचा पुनर्रचनेपूर्वीची लोकसभा पातळीवरील मतदार संख्या**[१६८]

| अ.क्र. | मतदारसंघ | मतदान टक्केवारी | एकूण मतदार संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे | ३२.११ | ७६९०१८ |
| २ | खेड | ३०.७० | ७३२०६५ |
| ३ | बारामती | ३७.३० | ८९३३१ |

**२००९ सालचा पुनर्रचनेनंतरचा राजकीय प्रक्षनिहाय**[१६९]

| अ.क्र. | मतदारसंघ | मतदान टक्केवारी | एकूण मतदार संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे | २७.३३ | ८,६२,५३९ |
| २ | मावळ | २२.७५ | ७,१६,५५९ |
| ३ | शिरूर | २६.५९ | ८,३८,७२८ |
| ४ | बारामती | २३.२६ | ७,३२,५६८ |

## १) पुणे लोकसभा–२००९

| अ.क्र. | मतदारसंघ | मतदान टक्केवारी | एकूण मतदार संख्या |
|---|---|---|---|
| १ | वडगांव शेरी | १४.२५ | १२२९६४ |
| २ | शिवाजी नगर | १२.९१ | १११३१८१ |
| ३ | कोथरूड | १५.०० | १२९३८१ |
| ४ | पर्वती | १४.७४ | १२७१४७ |
| ५ | पुणे कॅन्टोन्मेंट | १२.४५ | १०७४२७ |
| ६ | कसबा पेठ | १५.७७ | १३६०६३ |

## २) बारामती लोकसभा

| अ.क्र. | मतदारसंघ | मतदान टक्केवारी | एकूण मतदार संख्या |
|---|---|---|---|
| १ | दौंड | १३.६५ | १०००६३ |
| २ | इंदापूर | १५.८३ | ११६००५ |
| ३ | बारामती | २२.०० | १६१२३३ |
| ४ | पुरंधर | १५.८७ | ११६२८ |
| ५ | भोर | १८.८१ | १३७८६२ |
| ६ | खडकवासला | १४.४३ | १०५७७७ |

## ३) शिरूर लोकसभा

| अ.क्र. | मतदारसंघ | मतदान टक्केवारी | एकूण मतदार संख्या |
|---|---|---|---|
| १ | जुन्नर | १७.५८ | १४७५२२ |
| २ | आंबेगांव | १८.५१ | १५५२७३ |
| ३ | खेडआळदी | १७.३९ | १४५९३२ |
| ४ | शिरूर | १७.२७ | १४४९०१ |
| ५ | भोसरी | १५.०० | १२५७९१ |
| ६ | हडपसर | १४.०१ | ११७९२८ |

## ४) मावळ लोकसभा

| अ.क्र. | मतदारसंघ | मतदान टक्केवारी | एकूण मतदार संख्या |
|---|---|---|---|
| १ | पनवेल | १४.६६ | १०५०५८ |
| २ | कर्जत | १४.९५ | १०७१९१ |
| ३ | उरण | १७.१५ | १२२९५७ |
| ४ | मावळ | १९.५३ | १३९९६८ |
| ५ | चिंचवड | १६.५५ | ११८६४६ |
| ६ | पिंपरी | १७.१२ | १२२७३४ |

## विधानसभा पातळी २००४ व २००९[१७०]

| अ.क्र. | मतदारसंघ | | एकूण मतदार संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | २००४ | | २००९ |
| १. | जुन्नर | ५.७७ | १४७७७२ | ४.७८ | १६२९३१ |
| २. | आंबेगाव | ४.९९ | १२७८४६ | ५.०२ | १७१०५८ |
| ३. | खेडआळदी | ५.७१ | १४६२२४ | ४.९० | १६७०५ |
| ४. | मावळ | ५.७४ | १४७१०५ | ५.३८ | १८३३१० |
| ५. | मुळशी | ८.०२ | २०५३६६ | | कमी |
| ६. | हवेली | १२.३६ | ३१६३५५ | | कमी |
| ७. | बोपोडी | ४.०८ | १०४५३० | | कमी |
| ८. | शिवाजीनगर | ५.०५ | १२९४४७ | ५.८२ | १९८११८ |
| ९. | पर्वती(३८) | ६.९९ | १७९०७७ | ४.४५ | १५४६६० |
| १०. | कसबा पेठ | २.६९ | ६८९९८ | ४.५६ | १५५४९७ |
| ११. | भवानीपेठ | ३.५० | ८९५८५ | | कमी |
| १२. | पुणे कॅन्टोन्मेट | ७.०२ | १७९७१८ | ३.३५ | ११४३४१ |
| १३. | शिरूर | ५.६२ | १४३८९७ | ५.३६ | १८२५३५ |
| १४. | इंदापूर | ६.६५ | १७०२१२ | ५.५७ | १८९७८६ |
| १५. | बारामती | ५.४५ | १३९५५५ | ५.५१ | १८७७३४ |
| १६. | पुरंदर | ५.९३ | १५१८८८ | ५.१७ | १७६२८० |
| १७. | भोर | ४.३६ | १११६०७ | ५.५५ | १८९१३६ |
| १८. | कोथरूड | ५.३६ | १३७२५९ | ४.५४ | १५४५४२ |

| अ.नं. | नवीन मतदारसंघ (२००९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | चिंचवड | | – | | १९७४८१ |
| २. | पिंपरी | | | | १४६३१९ |
| ३. | भोसरी | | | | १४५४२५ |
| ४. | वडगाव शेरी | | | | १६७३६७ |
| ५. | खडकवासला | | | | १७५५१४ |
| ६. | हडपसर | | – | | १६४८०३ |
| | | | २,५५,८५८२ | | ३,४०,३८४८ |

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळीवर मतदारांचा राजकीय सहभागाचा आढावा घेत असताना पुणे लोकसभा मतदारसंघातून ७६९०१८ इतक्या मतदारांचा राजकीय सहभाग होता. खेड लोकसभा मतदारसंघातून ७३७०६५ इतक्या मतदारांचा राजकीय सहभाग होता. तर बारामती लोकसभा मतदारसंघातून एकूण ८९३३३१ मतदारांचा राजकीय सहभाग होता.

पुनर्रचनेनंतर मतदारसंघामध्ये काही बदल झाले काही नवीन निर्माण झाले. त्यामध्ये बारामती, पुणे, मावळ व शिरूर असे मतदारसंघ निर्माण झाले. बारामती लोकसभा मतदारसंघातून विधानसभा मतदारसंघातून विधानसभानिहाय मतदारांचा राजकीय सहभाग पाहत असताना दौंड–१०००६३, इंदापूर–११६००५, बारामती–१६१२३३, पुरंधर–१११६२८, भोर–१३७८३२, खडकवासला–१०५७७७ ह्या आकडेवारीवरून राजकीय सहभागाचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

शिरूर लोकसभा मतदारसंघातून–विधानसभा निहाय मतदाराचा राजकीय सहभाग–जुन्नर–१४५९३२, शिरूर–१४४९०९, भोसरी–१८५७९१, हडपसर–११७९२८ असा आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघातून विधान सभानिहाय मतदारांचा राजकीय सहभाग पनवेल–१०५०५८, कर्जत–१०७१९१, उरण–१२२९५८, मावळ–१३९९६८, चिंचवड–११८६४६, पिंपरी–१२२७३४ असा आहे.

## ७) मतदारसंघाची तुलना–

### अ) भौगोलिक तुलना–

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभेचे पुनर्रचनेपूर्वी ३ मतदारसंघ होते. त्यापैकी एक मतदारसंघ (खेड) रद्द होऊन दोन नवीन (मावळ व शिरूर) मतदारसंघ निर्माण झाले. मावळ लोकसभा मतदारसंघाची लोकसंख्या पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय युनिट ओलाडल्यांचे दिसून येते. कारण मावळ लोकसभा मतदारसंघ निम्मा पुणे जिल्ह्यातील आहे. तर निम्मा कोकणातील आहे.




पुणे जिल्हा नकाशा[१७१]

विधानसभा पातळीवर विधानसभा मतदारसंघाची नव्याने निर्मिती करताना तसेच शहरी भागास ग्रामीण भाग जोडत असताना त्यामध्ये भौगोलिक सलगतेचा विचार नव्याने तयार

झालेला वडगांव शेरी विधानसभा मतदारसंघाच्या बाबत केलेले दिसत नाही. कारण या मतदारसंघात शहरी व ग्रामीण यांचे मिश्रण करीत असताना मांजरी खुर्दचा समावेश या मतदारसंघात केल्यामुळे मतदारसंघाची भौगोलिक रचना सलग दिसत नाही.

**ब) राखीव मतदारसंघाची तुलना–**

पुनर्रचनेपूर्वी पर्वती मतदारसंघ राखीव होता परंतु पुनर्रचनेनंतर हा मतदारसंघ खुला झाला त्याऐवजी पुणे जिल्ह्यामध्ये विधानसभेचे पुणे कॅन्टोन्मेट व पिंपरी हे दोन मतदारसंघ झाले.

पुनर्रचनेनंतर नव्याने निर्माण झालेल्या पुणेकॅन्टोन्मेट (राखीव मतदारसंघातून) कॉंग्रेसचे रमेश बागवे हे निवडून आले यापूर्वी ते पूर्वीच्या राखीव पर्वती मतदारसंघातून निवडून यायचे पर्वतीचा निम्माभाग पुणेकॅन्टोन्मेट मतदारसंघाला जोडलेला आहे. तसेच पिंपरी हा मतदारसंघ करण्यात आला असून राष्ट्रवादीचे अण्णा बनसोडे यांच्यारूपाने या मतदारसंघात नवीन नेतृत्व या मतदारसंघाला मिळाले तर पिंपरीचे अमर साबळे (भाजप) यांना मात्र नवीन मतदारसंघात पराभव पत्करावा लागला.

## ब. सातारा

**१) राजकीय पक्षाचा प्रभाव–**

सातारा जिल्ह्यामध्ये मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी लोकसभेचे सातारा व कराड असे दोन मतदारसंघ होते. सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये १९९६ च्या निवडणुकीचा अपवाद वगळता या मतदारसंघावर १९५१ ते १९९२ पर्यंत कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला आहे. तर कराड लोकसभा मतदारसंघामध्ये १९५७–६२ ही निवडणुक डी.आर.चव्हाण यांनी शेकापकडून लढवून ती जिंकली हा एकमेव पक्षाचा अपवाद वगळता कराड लोकसभा मतदारसंघावर १९६७ ते १९९८ पर्यंत कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला आहे.

**सातारा जिल्ह्यातील १९५२ ते २००४ पर्यंतचे निवडून आलेले पक्षानिहाय प्रतिनिधी[१७२]–**

| वर्ष | प्रतिनिधी | राजकीय पक्ष |
|---|---|---|
| १९५१ | गणेश पाटील | कॉंग्रेस |
| १९५७ | नाना पाटील | भारतीय कम्युनिस्ट पार्टी |
| १९६२ | किसन वीर | कॉंग्रेस |
| १९६७ | यशवंतराव चव्हाण | कॉंग्रेस |

| | | |
|---|---|---|
| १९७१ | यशवंतराव चव्हाण | काँग्रेस |
| १९७७ | यशवंतराव चव्हाण | काँग्रेस |
| १९८० | यशवंतराव चव्हाण | काँग्रेस |
| १९८४ | प्रतापराव भोसले | काँग्रेस |
| १९८९ | प्रतापराव भोसले | काँग्रेस |
| १९९१ | प्रतापराव भोसले | काँग्रेस |
| १९९६ | हिंदुराव निंबाळकर | शिवसेना |
| १९९८ | अभयसिंह भोसले | काँग्रेस |
| १९९९ | लक्ष्मण पाटील | राष्ट्रवादी |
| २००४ | लक्ष्मण पाटील | राष्ट्रवादी |

**कराड लोकसभा मतदारसंघातून १९६२ ते २००४ पर्यंतचे निवडून आलेले पक्षनिहाय प्रतिनिधी[१७३]–**

| कालावधी | खासदाराचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| १९५२–५७ | – | – |
| १९५७–६२ | डी.आर.चव्हाण | शेकाप |
| १९६२–६७ | डी.आर.चव्हाण | काँग्रेस |
| १९६७–७१ | डी.आर.चव्हाण | काँग्रेस |
| १९७१–७७ | डी.आर.चव्हाण | काँग्रेस |
| | प्रेमलाबाई चव्हाण | |
| १९७७–८० | प्रेमलाबाई चव्हाण | काँग्रेस |
| १९८०–८४ | यशवंतराव मोहिते | काँग्रेस (आय) |
| १९८४–८९ | प्रेमलाबाई चव्हाण | काँग्रेस (आय) |
| १९८९–९१ | प्रेमलाबाई चव्हाण | काँग्रेस (आय) |
| १९९१–९६ | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस |
| १९९६–९८ | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस |
| १९९८–९९ | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस |

| | | |
|---|---|---|
| १९९९-२००४ | श्रीनिवास पाटील | रा.काँग्रेस |
| २००४-२००९ | श्रीनिवास पाटील | रा.काँग्रेस |

### पुनर्रचनेनंतर-२००९

सातारा जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघामध्ये पूर्वी जे कराड व सातारा दोन मतदारसंघ होते. त्यापैकी पुनर्रचनेत कराड लोकसभा रद्द झाला व सातारा जिल्ह्यात फक्त एकच मतदारसंघ राहिला असून या मतदारसंघावर पुनर्रचनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला आहे. (२००९)

### सातारा लोकसभा २००९[१७४]

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | पक्ष | मते |
|---|---|---|---|
| १ | अलंकृत अभिजित बिचुकले | अपक्ष | २०५४१ |
| २ | भाऊसाहेब गजानन वाघ | राष्ट्रीय समाजवादी पक्ष | ९३४८ |
| ३ | उदयनराजे प्रतापसिंह भोसले | रा.काँगेस | ४१२०८३ |
| ४ | पुरुषोतम बाजीराव जाधव | शिवसेना | २०६५१३ |
| ५ | प्रशांत वसंत जाधव | बहुजन समाजवादी पार्टी | २१६८५ |

### २) राजकीय नेतृत्व-

सातारा जिल्ह्याच्या राजकारणामध्ये राष्ट्रीय स्तरावर मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचे लक्ष्मणराव पाटील यांनी जिल्ह्याचे नेतृत्व केले होते परंतु दुसऱ्या बाजूला सातारा जिल्ह्याच्या राजकारणामध्ये नेतृत्वासाठी उदयनराजे व अभयसिंह राजे यांच्यातील राजकीय संघर्ष २००६ पर्यंत कायम राहिलेला होता, परंतु अभयसिंह राजे भोसले यांच्या निधनानंतर २००६ च्या पालिका निवडणुकीच्या निमित्त्याने रयत विकास आघाडी (उदयनराजे) व सातारा विकास आघाडी शिवेंदराजे यांच्यात मनोमीलन झाले व राजकीय संघर्ष संपला पुनर्रचनेनंतर उदयनराजे भोसले यांचेकडे लोकसभेचे नेतृत्व आले तर शिवेंद्रराजे यांचेकडे वडीलांच्या निधनाने तसेच दोन्ही राजांचे मनोमीलन झाल्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व तालुक्यातील ग्रामपंचायतीवर राजघराण्याचेच वर्चस्व राहिले. त्यामुळे

पुनर्रचनेनंतर लोकसभा पातळीवर साताऱ्यातून पूर्वीच्या नेतृत्वात बदल होऊन उदयनराजे भोसले यांच्या रूपाने नवीन शहरी नेतृत्व या मतदारसंघाला मिळाले.

सातारा जिल्ह्यातील विधानसभा पातळीवर पुर्नचनेपूर्वी १० मतदारसंघ होते पुनर्रचनेनंतर फक्त ८ विधान सभा मतदारसंघ राहिले खटाव व जावळी हे दोन मतदारसंघ रद्द झाल्यामुळे जावळीचे आमदार शशिकांत शिंदे व खटावचे दिलीप येळगांवकर यांना दुसऱ्या मतदारसंघाचा शोध घ्यावा लागला. तसेच ८ मतदारसंघापैकी २ मतदारसंघ (माण व फलटण) हे माढा लोकसभा मतदारसंघाला जोडल्यामुळे पूर्वीचा राखीव माण व आताचा राखीव फलटण मतदारसंघ यामुळे तेथील नेत्यांना या पुनर्रचनेचा फटका बसलेला आहे.

**३. राजकारणातील फेरबदल –**

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये सातारा व कराड असे दोन लोकसभा मतदारसंघ होते परंतु पुनर्रचनेनंतर कराड हा लोकसभा रद्द होऊन सातारा जिल्हा एकमेव लोकसभा मतदारसंघ राहिला आहे. त्यामुळे येथुन पुढे सातारा व कराड असे नवीन समीकरण पुढे आले आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळीवरील नेतृत्व हे ज्येष्ठ व्यक्तींकडे राहिलेले होते. स्थानिक पातळी ते राष्ट्रीय पातळीवरील निर्णय सातारा जिल्ह्याच्या बाबतीत जिल्ह्याचे नेतृत्व घेत होती .पुनर्रचनेनंतर मात्र नेतृत्वात बदल झाल्यामुळे जुन्या नेतृत्वास मानणारा एक गट व नव्या नेतृत्वास मानणारा असा दुसरा गट निर्माण झालेला दिसून येतो. पुनर्रचने पूर्वी कराड लोकसभचे नेतृत्व खा. श्रीनिवास पाटील करीत होते परंतु पुर्नरचनेत हा मतदारसंघ रद्द झाल्यामुळे रा.काँ. पक्षाला श्रीनिवास पाटील यांचे राजकीय पुनर्वसन करावे लागले.

पुनर्रचनेनंतर विधानसभा पातळीवर काही बदल सातारा जिल्ह्याच्या मतदारसंघामध्ये झालेले असल्यामुळे जिल्ह्याच्या राजकारणामध्येही बदल झालेला आहे. पुनर्रचनेपूर्वी जावळी या मतादारसंघातून शशिकांत शिदे हे निवडून यायचे परंतु पुनर्रचनेत जावळी हा मतदारसंघ रद्द होऊन जावळीचा भाग साताऱ्याला जोडण्यात आला त्यामुळे शशिकांत शिंदे यांनी कोरेगाव विधानसभेतून निवडणुक लढविली व तेथून विजय संपादन केला. कोरेगांव मतदारसंघाचे नेतृत्व करणारे डॉ. शालिनीताई पाटील यांना ही निवडणुक अपक्ष म्हणून लढवावी लागली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बळावर शशिकांत शिंदे यांनी ही निवडणुक जिंकली.

**४. सरकारमधील भूमिका / योगदान –**

सातारा जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिने या जिल्ह्यातील नेतृत्वाने काही प्रमाणात प्रयत्न केलेले आहेत. मूलभूत सुविधांवर भर देण्याचे काम केलेले आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या सहा पदरी कामाला गती देणे बाबत प्रयत्न केला आहे. २००९ च्या निवडणुकीत वीज व पाण्याच्या संदर्भात आवाज उठविण्याचे काम उदयनराजे भोसले यांनी केले तसेच भूमाता दिंडीमध्ये सहभागी होण्याचे काम केले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात ठाम भूमिका मांडण्याचे काम केलेले आहे तसेच मराठा मोर्चा आंदोलनात सहभागी होण्याचे काम केलेले आहे. साताऱ्यातील नागरिकांना पाण्याचा पुरेसा पुरवठा होण्यासाठी कास तलावाची उंची वाढविण्यासाठी मंजुरी घेण्याचे काम उदयनराजे भोसले यांच्या प्रयत्नाने झालेले आहे.

**५. शहरी व ग्रामीण राजकारणाची तुलना –**

सातारा जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण राजकारणाची तुलना करताना पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये सातारा व कराड असे दोन मतदारसंघ होते. परंतु पुनर्रचनेत कराड लोकसभा मतदारसंघ रद्द झाला व सातारा एकमेव लोकसभा मतदारसंघ राहिला.

सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये वाई, कोरेगांव, कराड उत्तर, कराड दक्षिण, पाटण व सातारा हे सर्व विधानासभा मतदारसंघ ग्रामीण स्वरूपाचे आहे. सातारा जिल्ह्यामध्ये शहरीकरण झाले नाही त्यामुळे लोकसभा पातळीवर सातारा हा एकमेव मतदारसंघ असल्याने राष्ट्रीय पातळीवरील  राजकारण हे सातारा शहरातून चाललेले दिसते रद्द झालेल्या कराड लोकसभेचा भाग सातारा लोकसभेत बदलत असताना जुना नवा असा बदल करून कराडमधील भाग यामध्ये समाविष्ट केला आहे.

विधानसभा पातळीवर वाई, पाटण हे ग्रामीण स्वरूपाचे मतदारसंघ आहेत तर कोरेगांव कराड उत्तर, कराड दक्षिण व सातारा हे मतदारसंघ निमशहरी व निमग्रामीण स्वरूपाचे आहेत.

पुनर्रचनेत वाई मतदारसंघामध्ये खंडाळा, महाबळेश्वर या तालुक्यांचा समावेश केलेला आहे. तिन्ही तालुके ग्रामीण स्वरूपाचे आहेत. खंडाळा व महाबेश्वर हा भाग या मतदारसंघामध्ये नवीन असल्याने तसेच वाईची लोकसंख्या या दोन तालुक्यांपेक्षा जास्त असल्याने वाई तालुक्यांचा प्रभाव या मतदारसंघावर दिसतो. तसेच येथील हे मकरंद पाटील (रा.कॉं.अपक्ष) हे नवीन नेतृत्व या मतदारसंघात नवीन उदयाला आले आहे. पाटण मतदारसंघातून पुनर्रचनेपूर्वी शिवसेनेचे शंभुराज देसाई हे २००४ च्या निवडणुकीत विजयी झाले.२००९ मध्ये  पुनर्रचनेनंतर विक्रमसिंह पाटणकर अवघ्या काही मतांनी निसटता विजय त्यांना मिळवता आला. कोरेगांव

विधानसभा मतदारसंघामध्ये ग्रामीण भागातील (जावळी) नेतृत्व स्थलांतरीत झाले आहे. कराड उत्तर मतदारसंघावर शहरी नेतृत्व म्हणून विलासकाका उंडाळकर (काँग्रेस) यांचा प्रयत्न राहिलेला आहे तर नवीन कराड दक्षिण मतदारसंघातून शामराव बाळासो पाटील हे शहरी नेतृत्व करीत आहे. तर सातारा विधानसभा मतदारसंघातून शिवेंद्रसिंहराजे भोसले हे शहरी नेतृत्व पुढे आलेले आहे. एकूणच सातारा जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघामध्ये शहरी राजकारणाचे ग्रामीण भागावर वर्चस्व राहिलेले आहे.

### ६. राजकीय सहभागाची तुलना

**२००४ (लोकसभा पातळी)**

| अ.क्र | मतदारसंघ | एकूण मतदारसंघ |
|---|---|---|
| १ | सातारा | ६,७५०१२ |
| २ | कराड | ७,१४५२३ |

**२००९ (लोकसभा पातळी)**

| अ.क्र | मतदारसंघ | एकूण मतदारसंख्या |
|---|---|---|
| १ | सातारा | ८,१६ ६४५ |

**विधानसभा पातळी**[१७५]

| अ.नं. | मतदार संघ | एकूण मतदार संख्या २००४ | मतदान टक्केवारी | एकूण मतदार संख्या २००९ | मतदान टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | वाई | १२७९३३ | ८.५६ | १९८६५४ | १८.८६ |
| २. | कोरेगांव | ११९५७२ | ८.०० | १६१८८६ | १५.३७ |
| ३. | कराड दक्षिण | १२८९८१ | ८.६३ | १६७८९२ | १५.९५ |
| ४. | पाटण | १४१९४० | ९.५० | १८२६०० | १७.३४ |
| ५. | सातारा | १५६३३२ | १०.४६ | १६३६०५ | १५.५४ |
| ६. | कराड उत्तर | १४९५३५ | १०.०० | १७७९६२ | १६.९० |
| ७. | फलटण | १३४५६५ | ९.०० | माढा लोकसभा | |
| ८. | माण (SC) | १४३७६६ | ९.६२ | | |
| ९. | खटाव | १३७२९८ | ९.१९ | कमी रद्द | |
| १० | जावळी | १४९३९२ | ९.९९ | कमी रद्द | |
| | | १४९३९८० | | १०५२५९९ | |

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळीवर मतदारांचा राजकीय सहभागाचा आढावा घेत असताना सातारा लोकसभा मतदारसंघातून ६,७५,०१२ इतक्या मतदारांचा राजकीय सहभाग होता. तर कराड लोकसभा मतदारसंघातून ७,१४,५२३ इतक्या मतदारांचा राजकीय सहभाग होता.

पुनर्रचनेनंतर कराड हा मतदारसंघ रद्द झाला. त्यामुळे सातारा हया एकमेव लोकसभा मतदारसंघातून ८,१६,६४५ मतदारांनी राजकीय सहभाग घेतला होता.

विधानसभा पातळीवर सातारा जिल्ह्यातील मतदारांचा राजकीय सहभागाचा आढावा घेत असताना पुनर्रचोपूर्वी त्या मतदारसंघात असलेला मतदारांचा राजकीय सहभाग पुनर्रचनेनंतरच्या निवडणुकीमध्ये वाढलेला दिसून येतो. खालील दिलेल्या मतदारसंघातून पूर्वीची कंसातील व पुनर्रचनेनंतरची मतदारंची आकडेवारी दिलेली आहे.

१) वाई –१९८६५४ (१२७९३३)

२) कोरेगाव –१६१८८६(११९५७२)

३) कराड दक्षिण –१६७८९२ (१२८९८१)

४) पाटण –१८२६०० (१४१९४०)

५) सातारा –१६३६०५ (१५६१३२)

६) कराड उत्तर –१७७९६२ (१४९५३५)

वरील दिलेल्या आकडेवारीवरून पुनर्रचनेनंतर सातारा जिल्हा विधानसभा मतदारसंघामध्ये मतदारांचा राजकीय सहभागाच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

**८) मतदारसंघाची तुलना –**

**अ) भौगोलिक तुलना –**

**भौगोलिक रचना –**

जमिनीचा उंच सखलपणा लक्षात घेता पश्चिमेकडील प्रदेश डोंगराळ असून यामध्ये महाबळेश्वर, जावळी, पाटण व सातारा तालुक्याचा निम्मा भाग तर मधला कृष्णाकाठचा प्रदेश खोलगट असून त्यामध्ये वाई, सातारा तालुक्यातील उर्वरित भाग, कोरेगाव, कराड हे तालुके येतात. पूर्वेकडील प्रदेश माळरानाचा असून त्यामध्ये खटाव माण व फलटणचा काही भाग व खंडाळा तालुके येतात.




सातारा जिल्हा नकाशा[१७६]

सातारा जिल्ह्याची भौगोलिक रचना विचारात घेऊन मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली असून सातारा जिल्ह्यातील बहुतांशी भाग ग्रामीण स्वरूपाचा आहे. त्यामुळे सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये वाई, पाटण हे मतदारसंघ ग्रामीण स्वरूपाचे आहेत. तर कराड दक्षिण, कराड उत्तर, कोरेगाव व सातारा हे मतदारसंघ निमशहरी स्वरूपाचे आहेत.

**ब) राखीव मतदारसंघाची तुलना –**

पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा मतदारसंघ (सातारा व कराड) हे सर्वसाधारण गटांसाठी होते. पुनर्रचनेत सातारा एकमेव मतदारसंघ राहिला असून तो सर्वसाधारण गटासाठी कायम राहिलेला आहे. विधानसभा पातळीवर सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी १० मतदारसंघ होते. त्यापैकी माण हा मतदारसंघ राखीव होता.तर इतर ९ मतदारसंघापैकी ८ मतदारसंघ राहिले. त्यापैकी ६ मतदारसंघ सातारा लोकसभेमध्ये समाविष्ट केले तर दोनपैकी फलटण व माण यापैकी फलटण हा पुनर्रचनेत राखीव झाला असून त्यांचा व माणचा समावेश माढा लोकसभा मतदारसंघामध्ये करण्यात आलेला आहे. तर जावळी व खटाव हे मतदारसंघ रद्द करण्यात आले आहेत.


## पुणे व सातारा जिल्ह्यासंदर्भातील तुलना –

### राजकीय पक्षाचा प्रभाव

### १) पुणे

**पक्षीय बलाबल**

| राजकीय पक्ष | पुनर्रचनेपूर्वी (२००४) | | पुनर्रचनेनंतर(२००९) | |
|---|---|---|---|---|
| | विधानसभा | लोकसभा | विधानसभा | लोकसभा |
| काँग्रेस | ०५ | ०१ | ०४ | ०१ |
| रा.काँग्रेस | ०७ | ०२ | ०७ | ०१ |
| भाजप | ०४ | – | ०३ | – |
| सेना | ०२ | – | ०३ | ०२ |
| मनसे | – | – | ०१ | – |
| अपक्ष | | – | ०३ | – |
| एकूण जागा | १८ | ०३ | २१ | ०४ |





वरील आलेखावरून असे दिसून येते की, मतदारसंघ पुनर्रचने पूर्वी पूणे जिल्ह्यात लोकसभा पातळीवर काँग्रेस ०१, राष्ट्रवादी ०२ असा तर पुनर्रचनेनंतर काँग्रेस -०१, राष्ट्रवादी

०१ व शिवसेना ०२ अशा जागेच्या विभागणी वरून पुनर्ररचनेपूर्वी काँग्रेस व राष्ट्रवादी  काँग्रेसचा आलेख चढता दिसून येतो परंतु पुनर्ररचनेनंतर मात्र आलेख उतरता राहिलेला आहे.

## २) सातारा

**पक्षीय बलाबल**

| राजकीय पक्ष | पुनर्रचनेपूर्वी (२००४) | | पुनर्रचनेनंतर(२००९) | |
|---|---|---|---|---|
| | विधानसभा | लोकसभा | विधानसभा | लोकसभा |
| काँग्रेस | ०१ | – | ०२ | – |
| रा.काँग्रेस | ०६ | ०२ | ०६ | ०१ |
| भाजप | ०१ | – | – | – |
| सेना | ०१ | – | – | – |
| मनसे | | – | – | – |
| अपक्ष | ०१ | – | – | – |
| एकूण जागा | १० | ०२ | ०८ | ०१ |




वरील आलेखावरून असे दिसून येते की, मतदारसंघ पुनर्ररचनेपूर्वी सातारा जिल्ह्यात लोकसभा पातळीवर रा.काँग्रेस ०२ जागा मिळवल्या असून विधानसभा पातळीवर रा.काँग्रेस ०६, भाजप ०१, शिवसेना ०१, काँग्रेस ०१, अपक्ष ०१ अशा जागा असून दोन्ही पातळीवर रा.काँग्रेस प्रभावाचा आलेख चढता राहिला असून पुनर्ररचनेनंतर लोकसभा पातळी ०१ जागा तर विधानसभा पातळी रा.काँग्रेस ०६ तर काँग्रेस ०२ जागा तर विधान सभापातळीवर रा.काँग्रेस ०६ तर काँग्रेस०२ जागा मिळवल्या असून पुनर्रचनेनंतर सुद्धा चढता आलेख कायम

राहिलेला आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये राजकीय पक्षाचा प्रभावाचा आढावा घेताना पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला होता. पुर्नरचने नंतर (२००९ मध्ये रा.काँग्रेस पक्षाचा प्रभाव कमी झाला असून पुणे जिल्ह्यामध्ये शिवसेनेचा सुद्धा समप्रमाणात प्रभाव राहिलेला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये राजकीय पक्षाचा आढावा घेताना पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये कराड व सातारा असे लोकसभेचे दोन मतदारसंघ होते. या दोन्ही मतदारसंघावर पुनर्रचनेपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला होता पुनर्रचनेनंतर २००९ मध्ये कराड मतदारसंघ रद्द झाल्यामुळे सातारा लोकसभा मतदारसंघावर पुनर्रचनेनंतर सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी काँगेस–राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला होता. परंतु पुनर्रचनेनंतर २००९ मध्ये विधानसभा पातळीवर काँग्रेस–राष्ट्रवादी पक्षाचा प्रभाव कमी झालेला दिसतो जिल्ह्यामध्ये भाजप, शिवसेना, मनसे या पक्षानीही प्रभाव निर्माण सुरूवात केली आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचा प्रभाव राहिलेला होता. पुनर्रचनेनंतरसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव कायम राहिलेला आहे.

दोन्ही जिल्ह्यांची राजकीय पक्षाच्या प्रभावाबाबत तुलना केली असता पुणे जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँगेस पक्षाचा प्रभाव लोकसभा व विधानसभा पातळीवर पुनर्रचनेनंतर कमी झालेला आहे तर सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा व विधानसभा पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचा प्रभाव कायम राहिलेला आहे.

एकंदरीत शहरी मतदारसंघामध्ये रा.काँ.पक्षाचा प्रभाव कमी झाला आहे. परंतु सातारा जिल्ह्यात ग्रामीण मतदारसंघात प्रभाव कायम राहिलेला आहे तर भाजप शिवसेना ग्रामीण मतदारसंघामध्ये प्रभाव कमी असून शहरी मतदारसंघावर त्यांचा प्रभाव वाढलेला दिसून येतो.


महाराष्ट्रात दोन मुख्य आघाडयामध्ये तीव्र राजकीय स्पर्धा आहे. (काँग्रेस राष्ट्रवादी व शिवसेना भाजप) अशा टप्यांवर मतदारसंघात झालेले २५% बदल राजकारणातील सत्ता समीकरणात बदल करू शकतात. मतदारसंघात ५०% बदल झाला तर त्या मतदारसंघाचे जुने राजकाण जमा होऊन नवीन नेतृत्व पुढे येते.

मतदारसंघ पुनर्रचनेमुळे जुनी व्युहरचना, राजकीय पक्षांच्या आघाड्या, नेत्यांमध्ये संबंध, राजकीय पक्षांच्या सामाजिक पाठिब्यांमधील स्पर्धा,आर्थिक साधन सामग्रीवरील नियंत्रण पूर्णपणे बदलेले आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवरील राजकीय स्पर्धा पुनर्रचनेनंतर विशेषता राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेस व शिवसेना व भाजप याच्यांमध्ये दिसून येते. पुणे जिल्ह्यात शहरी भागामध्ये राजकीय पक्षांमध्ये पुनर्रचनेनंतर राजकीय स्पर्धा दिसून येते. पुणे जिल्ह्यात लोकसभा व विधानसभा पातळीवर शहरी भागामध्ये काँग्रेस, भाजप व शिवसेना यांच्यात राजकीय स्पर्धा दिसून येते. लोकसभा पातळीवर पुणे, बारामती, शिरूर व मावळ यापैकी पुणे लोकसभा मतदारसंघामध्ये शहरी भागांचा जास्त समावेशामुळे तेथे काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे. बारामतीमधून रा.काँ.पक्ष प्रभाव कायम राहिलेला आहे. परंतु मावळ व शिरूर मतदारसंघामध्ये विधान सभापातळीवरून लोकसभा पातळी गाठण्याची राजकीय स्पर्धा यशस्वी ठरलेली असून शिरूर व मावळ लोकसभेवर शिवसेनेचे वर्चस्व राहिलेले आहे. त्यामुळे शहरी भागात लोकसभा व विधानसभेची स्पर्धा तीव्र होऊन राजकीय समीकरणे बदलेली आहेत.

### २) राजकीय नेतृत्व

| नेतृत्वाचा स्तर | पुनर्रचनेपूर्वी (२००४) | |
|---|---|---|
| | पुणे | सातारा |
| तालुका | ८५ | ३१ |
| जिल्हा | २२ | १९ |
| राज्य | ०८ | ०६ |
| राष्ट्रीय | ०२ | ०१ |



वरील आलेखावरून असे दिसून येते की पुणे जिल्ह्यामध्ये नेतृत्वाचा स्तर तालुका ८५, जिल्हा स्तर–२२ राज्य स्तर–०८, राष्ट्रीय स्तर ०२, असा राहिला असून तालुका स्तरावरील आलेख चढता राहिलेला असून राष्ट्रीय स्तरावरील आलेख उतरता राहिलेला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये नेतृत्वाचा स्तर तालुका पातळी–३१ जिल्हापातळी १९, राज्य पातळी– ०६, तर राष्ट्रीय पातळी ०१ असा असून तालुका पातळीवर नेतृत्वाचा स्तर आलेखामध्ये उंचावला असून राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाचा स्तर खाली राहिला आहे.

पुणे व सातारा जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वाच्या संदर्भात तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर नेतृत्वाचा तुलनात्मक आढावा घेत असताना पुणे जिल्ह्यामध्ये तालुका पातळीवर नेतृत्व करणाऱ्यांची संख्या ८५ इतकी आहे. जिल्हा स्तरावर ती ३६ इतकी आहे तर राज्यस्तरावर ०८ इतकी आहे तसेच राष्ट्रीय स्तरावर ती संख्या फक्त ०२ इतकी आहे. एकूण राजकीय नेतृत्व तालुका पातळीवर फार जास्त प्रमाणात निर्माण झाले.

सातारा जिल्ह्यामध्ये तालुका पातळीवर नेतृत्व करणाऱ्याची संख्या ३१ इतकी आहे. जिल्हा पातळीवर नेतृत्व करणाऱ्याची संख्या १९ इतकी आहे. राज्यस्तरावरील नेतृत्वाची संख्या ०६ इतकी आहे तर राष्ट्रीय स्तरावर नेतृत्वाची संख्या फक्त ०१ इतकी राहिलेली आहे.

एकंदरीत पुणे व सातारा जिल्ह्याच्या राजकीय नेतृत्वाचा तुलनात्मक आढावा घेत असताना दोन्ही जिल्ह्यामध्ये तालुका पातळीवर नेतृत्व निर्माण झाले असले तरी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व पोहचवू शकले नाहीत अगदी नगण्य प्रमाणात या दोन्ही जिल्ह्यांना राज्य व राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व मिळालेले आहे.

राज्य पातळीवर नेतृत्वामध्ये–पुणे जिल्ह्यामध्ये सुप्रिया सुळे, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, अनंतराव थोपटे, विजय शिवतारे गिरीश बापट, हषवर्धन पाटील या नेत्याचा समावेश होतो तर राष्ट्रीय पातळीवर शरद पवार यांचा समावेश होता. राष्ट्रीय पातळीवर शरद पवार यांनी कृषिमंत्री, सरंक्षणमंत्री  अशी महत्त्वाची खाती सांभाळलेली आहेत.


सातारा जिल्ह्यामध्ये राज्यपातळीवरील नेतृत्वामध्ये पृथ्वीराज चव्हाण, रामराजे निंबाळकर, डॉ.शालिनीताई पाटील, विक्रमसिंह पाटणकर, विलास काका उंडाळकर, प्रतापराव भोसले या नेत्यांचा समावेश होतो.

राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वात यशवंतराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण  यांचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण यांनी राज्य पातळीवर मुख्यमंत्री म्हणून नेतृत्व केलेले आहे. त्याचबरोबरच राष्ट्रीय पातळीवर संरक्षण मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर राजकीय नेतृत्वाचा पुणे व सातारा जिल्ह्याच्या संदर्भात अभ्यास करताना लोकसभा व विधानसभा पातळीवर निर्माण झालेले आहे. जिल्ह्यातील विविध कार्याचे राजकारचे संघटन शहरी पातळीवर एकाच पद्धतीने होत नाही. एकाच मतदारसंघात विविध पद्धतीने संघटन केले जाते. जिल्हा हे राजकारणाचे केंद्र आहे. जिल्ह्यातील नेत्यांचा मतदारसंघावर प्रभाव होता परंतु तो जिल्ह्याचा प्रभाव कमी झालेला आहे. त्यामूळे या नेत्यांना दुसऱ्या पक्षाचा आधार घेऊन जिल्हा नेतृत्व घडविण्याचे नव्याने प्रयत्न झाले आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये अजित पवार यांना काँग्रेस पक्षाशी आघाडी करून नेतृत्व घडवावे लागले. सातारा जिल्ह्यामध्ये जिल्हा पातळीवरील नेतृत्व पक्षापेक्षा लोकमतावर आधारलेले हे नेतत्त्व म्हणावे लागेल कारण पुनर्ररचनेनंतर लोकसभा व विधानसभा पातळीवर पक्षापेक्षा व्यक्ती श्रेष्ठ असे चित्र सातारा जिल्ह्यामध्ये पहायला मिळते. लोकांच्या पाठिंब्यावरील हे नेतृत्व म्हणजे उदयनराजे भोसले यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव जनमतावर पडलेला दिसतो.

### ३) ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना

| संस्था | पुनर्रचनेपूर्वी (२००४) | | पुनर्रचनेनंतर(२००९) | | |
|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी | निमशहरी |
| सातारा | ०५ | ०५ | ०२ | ०४ | – |
| पुणे | १० | ०८ | ०७ | १० | ०४ |




वरील आलेखावरून असे दिसून येते की पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यामध्ये शहरी मतदारसंघाचे प्रमाण हे ग्रामीण मतदारासंघापेक्षा कमी राहिले तर पुनर्रचनेनंतर ग्रामीण

मतदारसंघाच्या संख्येच्या आलेख खाली आला असून शहरी मतदारसंघाचा आलेख उंचावला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी ग्रामीण मतदारसंघाचे प्रमाण हे शहरी मतदारसंघापेक्षा कमी राहिले तर पुनर्रचनेनंतर ग्रामीण मतदारसंघाचा संख्येचा आलेख खाली आला असून शहरी मतदारसंघाचा संख्येचा आलेख उंचावला आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना करता पुणे जिल्ह्यात ग्रामीण मतदारसंघाची संख्या १० होती तर शहरी मतदारसंघाची संख्या ८ इतकी होती.

पुनर्रचनेनंतर ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना करता पुणे जिल्ह्यात ग्रामीण मतदारसंघाची ७ इतकी झाली असून शहरी –१० तर निमशहरी –०४ असे प्रमाण राहिले आहे.

एकंदरीत पुणे जिल्ह्यामध्ये ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना करता पुनर्रचनेनंतर ग्रामीण मतदारसंघाची संख्या कमी होऊन शहरी मतदारसंघाची संख्या वाढलेली आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना करता सातारा जिल्ह्यात ग्रामीण मतदारसंघाची संख्या ०५ होती तर शहरी मतदारसंघाची संख्या सुद्धा ०५ होती.

पुनर्रचनेनंतर ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना करता सातारा जिल्ह्यात ग्रामीण मतदारसंघाची संख्या २ राहिली तर शहरी मतदारसंघाची संख्या ०४ इतकी झालेली आहे.

एकंदरीत सातारा व पुणे जिल्ह्यामध्ये ग्रामीण मतदारसंघाची संख्या कमी होऊन शहरी मतदारसंघाची संख्या वाढलेली दिसून येते.

लोकसंख्या, झोपडपट्टी, स्थलांतर, शहरी अर्थकारण व शहरी स्थानिक शासनसंस्था हे पाच घटक शहरी मातादार संघाचे मुख्य आधार आहे. १९५१, १९६१ व १९७१ ला जनगणना अहवालानुसार मतदारसंघाची पुनर्ररचना केल्यामुळे १९६० ते १९८० या दरम्यान राज्यात शहरी मतदारसंघ ग्रामीण मतदारसंघापेक्षा संख्येने कमी होती.

वरील आधारामध्ये पुणे शहराचा समावेश होतो त्यातुलनेने सातारा जिल्ह्यामध्ये लोकसंख्या हा घटक सोडल्यास इतर घटकांचा परिणाम फारसा जाणवत नाही. सातारा जिल्ह्यामध्ये वाढणारी लोकसंख्येचे प्रमाण ९.३३ आहे तर पुणे जिल्ह्याचे प्रमाण ३३.४३ इतकी

आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्याच्या तुलनेने सातारा जिल्ह्यामध्ये शहरी व ग्रामीण मतदारसंघ कमी राहिलेले आहेत तरी सुद्धा दोन्ही जिल्ह्यामध्ये शहरी मतदारसंघाचे प्रमाण हे ग्रामीण मतदार संघापेक्षा जास्त राहिले आहे.

**४) राखीव मतदारसंघाची तुलना(विधानसभा)**

| | **पुनर्रचनेपूर्वी (२००४)** | | **पुनर्रचनेनंतर (२००९)** | |
|---|---|---|---|---|
| | **ग्रामीण** | **शहरी** | **ग्रामीण** | **शहरी** |
| सातारा | ०१ | – | – | ०१ |
| पुणे | – | ०१ | – | ०२ |

पुणे जिल्ह्यामध्ये विधानसभापातळीवर राखीव मतदारसंघाची तुलना करीत असताना पुनर्रचनेपूर्वी  पुणे जिल्ह्यामध्ये शहरी भागामध्ये (पर्वती) या विधानसभा मतदारसंघासाठी जागा राखीव होती पुनर्रचनेनंतरसुद्धा शहरी भागामध्येच राखीव मतदारसंघाची संख्या एक ऐवजी दोन इतकी झाली पुणे कॅन्टोन्मेट व पिंपरी हे दोन्ही मतदारसंघ पुणे शहरातील आहेत.

सातारा जिल्ह्यामध्ये विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी राखीव मतदारसंघाची तुलना करता ग्रामीण भागामध्ये (माण) या मतदारसंघात राखीव जागा होती. पुनर्रचनेनंतर हा राखीव मतदारसंघ फलटण या निमशहरी मतदारसंघात गेला.

एकंदरीत पुणे व सातारा जिल्ह्यातील राखीव मतदारसंघाची तुलना करता पुणे जिल्ह्यात विधानसभा पातळी व शहरी भागामध्येच नवीन राखीव मतदारसंघ निर्माण झालेले आहेत तर सातारा जिल्ह्यामध्ये मात्र ग्रामीण भागातून शहरी भागामध्ये या मतदारसंघाचे रूपांतर झालेले आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये राखीव मतदारसंघाचा विधानसभा पातळीवर आढावा घेत असताना पुनर्रचने पूर्वी पर्वती हा एकमेव राखीव मतदारसंघ होता परंतु पुनर्ररचने नंतर राखीव जागांची संख्या वाढली याचे प्रमू कारण म्हणजे नवबौद्ध समाजाच्या २००२ च्या परिसीमन आयोगाने अनुसूचित जाती गटामध्ये समावेश केला आहे पूर्वी नवबौद्ध समाजाचा समावेश केला गेला नव्हता त्यामुळे  पुणे कॅन्टोन्मेंट व पिंपरी हे दोन मतदारसंघ राखीव झाले.

सातारा जिल्ह्यामध्ये पूर्वीचा माण हा विधानसभा मतदारसंघ राखीव होता पुनर्ररचनेनंतर फलटण हा मतदारसंघ राखीव झाला. पुणे जिल्ह्याच्या तुलनेने सातारा जल्ह्यातील अनुसूचित जातीची संख्या त्यामानाने कमी असल्याने मतदारसंघ संख्येत वाढ झाली नाही परंतु पुणे

जिल्ह्यात ती जास्त असल्याने तेथे एक एवजी दोन मतदारसंघ राखीव झाले त्यामुळे शहरी भागामध्ये राखीव जागांमधून नवीन नेतृत्वाचे प्रमाण जास्त राहिले तर सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातून नेतृत्वाचे प्रमाण कमी राहिलेले आहे.

**५) राजकीय सहभाग**

| | **पुणे** | | **सातारा** | |
|---|---|---|---|---|
| | **पुनर्रचनेपूर्वी (२००४)** | **पुनर्रचनेनंतर (२००९)** | **पुनर्रचनेपूर्वी (२००४)** | **पुनर्रचनेनंतर (२००९)** |
| लोकसभा | ६५% | ७५% | ६०% | ६५% |
| विधानसभा | ७५% | ८८% | ६८% | ७७% |

पुणे व सातारा जिल्ह्यातील राजकीय सहभागाचा तुलनात्मक आढावा घेत असताना पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर ६५% राजकीय सहभाग होता तर पुनर्रचनेनंतर ७५ % राजकीय सहभाग आहे. तसेच विधान सभापातळीवर पुनर्रचनेपूर्वी राजकीय सहभाग ७५% होता. पुनर्रचनेनंतर विधानसभापातळीवर ८८ % राजकीय सहभाग वाढला आहे.

एकंदरीत पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा व विधानसभापातळीवर पुनर्रचनेनंतर १०% व १५% राजकीय सहभाग वाढला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभापातळीवर ६० % राजकीय सहभाग होता तर पुनर्रचनेनंतर ६५% राजकीय सहभाव वाढला आहे. विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी ६८% राजकीय सहभाग होता पुनर्रचनेनंतर ७७% राजकीय सहभाग वाढला आहे.

## समारोप

पुनर्रनेनंतर पुणे व सातारा जिल्ह्याचा तुलनात्मक राजकीय अभ्यास करताना राजकीय पक्षाचा प्रभाव पुणे जिल्ह्यात रा.काँग्रेस व भाजप शिवसेनेचा तर सातारा जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव राहिलेला आहे. पुणे सातारा जिल्ह्यामध्ये काही महत्त्वपूर्ण लोकसभा व विधानसभा पातळीवर राजकीय व सामाजिक बदल झालेले असून त्याचा पुणे व सातारा जिल्ह्याच्या बदलत्या राजकारणांवर परिणाम झाला असून त्याबाबतची नवीन सत्ता समीकरणे निर्माण झालेली आहेत. त्याचबरोबर शहरी मतदारसंघाची झालेली वाढ व ग्रामीण मतदारसंघाची कमी झालेली संख्या शहरी व ग्रामीण राजकारणात महत्त्वपूर्ण ठरली आहेत. तसेच शहरी

भागामध्ये राखीव मतदारसंघाची वाढ झाली असून त्यामानाने सातारा जिल्ह्यात संघाची वाढ झालेली नाही. त्याचबरोबर पुनर्रचनेनंतर पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा व विधानसभा पातळीवर राजकीय सहभाग वाढलेला आहे. या प्रकरणातील राजकीय सहभाग वाढलेला आहे. या प्रकरणातील तुलनात्मक–राजकीय पक्षाचा प्रभाव, राजकीय नेतृत्व, मतदारसंघाची रचना, राजकारणातील फेरबदल, राजकीय सहभाग, शहरी व ग्रामीण मतदारसंघ या घटकांच्या आधारे पुढील प्रकरणात निष्कर्ष काढले जाणार आहेत.

## संदर्भ


१) पवार विकास, १९९२ ते २००२ या शतकातील पुणे जिल्ह्यातील बँक सेवाचे विस्ताराचे चिकित्सक मूल्यमापन, पीएच.डी.शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, पृ. १५७

२) तांबे प्रिया लक्ष्मण, पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास, पीएच.डी.शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, ९ मे २०१५, पृ. ३२

३) सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल पुणे जिल्हा, २०१२, पृ. ४२

४) कित्ता, पृ.४३

५) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल, २०१२, पृ. ४५

६) पवार विकास १९९२ ते २००२ या शतकातील पुणे जिल्ह्यातील बँक सेवाचे विस्ताराचे चिकित्सक मूल्यमापन टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, पृ. १६३

७) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.५८

८) कित्ता, पृ. ५९

९) पवार विकास १९९२ ते २००२ या शतकातील पुणे जिल्ह्यातील बँक सेवाचे विस्ताराचे चिकित्सक मूल्यमापन टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, पृ.१५८

१०) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००६–०७, पृ. ४९

११) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.५२

१२) कित्ता, पृ. ५३

१३) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल २०१२, पृ. ५७

१४) डोंगरे महादेव, पुणे जिल्ह्यातील कातकरी समाजाचा समस्या शोधनिबंध (पी.एच डी) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, पृ. १८९

१५) सलाम सातारा, मासिक, पृ.१७

१६) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.९

१७) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल, २०१२, पृ. ८

१८) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.९

१९) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००९–१०, पृ.१२

२०) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.१२–२

२१) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००२–०३, पृ.१२–३

२२) कित्ता, पृ.१२–४

२३) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल, २०१२, पृ. ९८

२४) पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, २००७, पृ.१०५

२५) पुणे जिल्हा गॅझेटियर, पृ. १०२

२६) www.eci.in, 24/04/2017

२७) www.eci.in, 25/05/2017

२८) www.eci.in, 28/05/2017

२९) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९ पृ.२१९

३०) तांबे प्रिया लक्ष्मण, पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास, पीएच.डी.शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, ९ मे, २०१५, पृ.३४

३१) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.११

३२) सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल २००७–०८, पृ.१७

३३) टिळेकर शरद, A Geographyical Analysis of Sheduled cast in Satara Distrit, 30 Aug. 2011., P. 41

३४) सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.७

३५) कित्ता, पृ.७

३६) सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.८

३७) कित्ता, पृ.८

३८) Review of District Satara & Abstract of Satara- 2001

३९) सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल, २०१२, पृ.७

४०) टिळेकर शरद, A Geographyical Analysis of Sheduled cast in Satara Distrit, 30 Aug. 2011., P. 52

४१) सातारा जिल्हा गॅझेटियर, २०१३

४२) सातारा जिल्हा गॅझेटियर, २०१३

४३) खोत एम.आर.‘कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील डोंगरी भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्था पी.एचडी अप्रकाशित शोधप्रंबध, शिवाजी विद्यापीठ ऑक्टो. २०१५, पृ.१४९

४४) सातारा जिल्हा गॅझेटियर, २०१३

४५) कित्ता, पृ.१५०

४६) सलाम सातारा मासिक, पृ.२२

४७) सोवनी अविनाश ‘स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान पूर्वा प्रकाशन पुणे एप्रिल, पृ.३७

४८) सातारा जिल्हा गॅझेटियर, २०१३

४९) कित्ता,  पृ.३५८३६०

५०) कित्ता, पृ.३६२

५१) कित्ता, पृ.३६४

५२) Sing C.P., A Century of constituency a delimitation, P. 5

५३) परिसिमन आयोग अहवाल, १९७३

५४) खुराणा पन्नालाल, मतदारसंघ परिसिमन, प्रवोधनज्योती, जुलै, २००८, पृ.२८

५५) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९, पृ.२६१

५६) देठे विजय (२०१२) पीएचडी प्रबंध, चौथ्या परिसीमन आयोगाच्या संदर्भात कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्याचे बदलते राजकारण पृ.क्र.६७

५७) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९, पृ.क्र. ८९

५८) ceo.maharashtra.gov.in, 15/6/2017

५९) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९, पृ.२२३

६०) ceo.maharashtra.gov.in, 25/06/2017

६१) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९, पृ.२२४

६२) भुजबळ चंद्रकांत महाराष्ट्रातील राजकारण लोकप्रतिनिधी निवडणूक मार्गदशक पॉलिटिक्स रिसर्च अॅनालिसेस ब्युरो (प्राब), पृ.८३

६३) CEO Maharashtra, gov.in , 01/07/2017

६४) Election commission of India, 15/07/2017

६५) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२२०

६६) भुजबळ चंद्रकांत महाराष्ट्रातील राजकारण लोकप्रतिनिधी निवडणूक मार्गदशक पॉलिटिक्स रिसर्च अॅनालिसेस ब्युरो (प्राब), पृ.९६

६७) CEO Maharashtra, gov.in, 9/8/2017

६८) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.क्र.२२७

६९) ceo.maharashtra, gov.in, 14/08/2017

७०) ceo.maharashtra.gov.in, 18/08/2017

७१) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९, पृ.२२७

७२) भुजबळ चंद्रकांत महाराष्ट्रातील राजकारण लोकप्रतिनिधी निवडणूक मार्गदशक पॉलिटिक्स रिसर्च अॅनालिसेस ब्युरो (प्राब.), पृ.८५

७३) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन पुणे २००९ पृ.२३१

७४) election Commission of India, 27/8/2017

७५) election Commission of India, 28/08/2017

७६) election Commission of India, 9/9/2017

७७) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२२७

७८) election Commission of India, 8/10/2017

७९) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२३२

८०) election Commission of India, 12/10/2017

८१) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.क्र.२३२

८२) ceo.maharashtra, gov.in , 15/10/2017

८३) ceo.maharashtra, gov.in, 17/10/2017

८४) ceo.maharashtra, gov.in,6/11/2017

८५) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२३३

८६) ceo.maharashtra, gov.in, 8/11/2017

८७) ceo.maharashtra, gov.in, 12/11/2017

८८) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२३३

८९) ceo.maharashtra, gov.in, 13/01/2018

९०) ceo.maharashtra, gov.in, 13/01/2018

९१) ceo.maharashtra, gov.in, 15/02/2018

९२) ceo.maharashtra, gov.in, 19/02/2018

९३) ceo.maharashtra, gov.in, 22/02/2018

९४) ceo.maharashtra, gov.in, 27/02/2018

९५) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२३३

९६) ceo.maharashtra, gov.in, 05/03/2018

९७) ceo.maharashtra, gov.in,07/03/2018

९८) ceo.maharashtra, gov.in, 09/03/2018

९९) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२३३

१००) ceo.maharashtra, gov.in, 12/03/2018

१०१) ceo.maharashtra, gov.in, 19/03/2018

१०२) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२२३

१०३) कित्ता, पृ. २३४

१०४) ceo.maharashtra, gov.in, 24/03/2018

१०५) उपरोक्त पृ.२३५

१०६) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२२४

१०७) ceo.maharashtra, gov.in, 25/03/2018

१०८) ceo.maharashtra, gov.in, 27/03/2018

१०९) ceo.maharashtra, gov.in, 27/03/2018

११०) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२३०

१११) ceo.maharashtra, gov.in, 28/03/2018

११२) ceo.maharashtra, gov.in, 01/04/2018

११३) ceo.maharashtra, gov.in, 03/04/2018

११४) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.क्र.२३४

११५) ceo.maharashtra, gov.in, 06/04/2018

११६) ceo.maharashtra, gov.in, 10/04/2018

११७) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२२६

११८) ceo.maharashtra, gov.in, 15/04/2018

११९) ceo.maharashtra, gov.in, 18/04/2018

१२०) महाराष्ट्रराज्य निवडणुक आयोग अहवाल १९९४–२००३

१२१)उपरोक्त अहवाल २००४–२००९

१२२)उपरोक्त अहवाल २००४–२००९

१२३) महाराष्ट्रराज्य निवडणुक आयोग अहवाल २००४–२००९

१२४)उपरोक्त अहवाल २००९–२०१३

१२५) महाराष्ट्रराज्य निवडणुक आयोग अहवाल १९९४–२००३

१२६)उपरोक्त अहवाल २००४–२००९

१२७) महाराष्ट्रराज्य निवडणुक आयोग अहवाल २००९–२०१३

१२८)उपरोक्त अहवाल १९९४–२००३

१२९) महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोग अहवाल २००४–२००९

१३०) उपरोक्त अहवाल २००९–२०१३

१३१) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.६६

१३२) ceo.maharashtra. gov.in, 20/04/2018

१३३) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२५९

१३४) ceo.maharashtra. gov.in, 25/04/2018

१३५) ceo.maharashtra. gov.in, 30/04/2018

१३६) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.क्र.२५९

१३७) ceo.maharashtra. gov.in, 01/05/2018

१३८) ceo.maharashtra. gov.in, 06/05/2018

१३९) ceo.maharashtra. gov.in, 11/05/2018

१४०) ceo.maharashtra. gov.in, 13/05/2018

१४१) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.क्र.२६४

१४२) ceo.maharashtra. gov.in, 21/05/2018

१४३) ceo.maharashtra. gov.in, 27/05/2018

१४४) ceo.maharashtra. gov.in, 30/05/2018

१४५) ceo.maharashtra. gov.in, 04/06/2018
१४६) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२६५
१४७) ceo.maharashtra. gov.in, 12/06/2018
१४८) ceo.maharashtra. gov.in, 17/06/2018
१४९) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ.२६५
१५०) ceo.maharashtra. gov.in, 23/06/2018
१५१) महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोग अहवाल १९९४–२००३
१५२) कित्ता, अहवाल २००४–२००९
१५३) महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोग अहवाल २००९–२०१३
१५४) कित्ता, अहवाल २००२–२००३
१५५) महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोग अहवाल २००४–२००९
१५६) कित्ता, अहवाल २००९–२०१३
१५७) महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोग अहवाल १९९४–२००३
१५८) कित्ता, अहवाल २००४–२००९
१५९) महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोग अहवाल २००९–२०१३
१६०) कित्ता, अहवाल १९९४२००३
१६१) महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोग अहवाल २००४–२००९
१६२) कित्ता, अहवाल २००९–२०१३
१६३) पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९
१६४) Election Commission of India, 26/06/2018
१६५) Election Commission of India, 30/06/2018
१६६) Election Commission of India, 05/07/2018
१६७) Election Commission of India, 10/07/2018
१६८) Election Commission of India, 18/07/2018
१६९) Election Commission of India, 22/07/2018

१७०) Chief electrol commission Maharashtra, 27/07/2018

१७१) Pune District Map

१७२) ceo.maharashtra.gov.in, 05/08/2018

१७३) ceo.maharashtra.gov.in, 13/07/2018

१७४) ceo.maharashtra.gov.in, 18/07/2018

१७५) Election Commission of India, 25/07/2018

१७६) Satara District Map

# प्रकरण पाचवे

# निष्कर्ष

## प्रस्तावना

मतदारसंघाची पुनर्रचना म्हणजे केवळ भौगोलिक व प्रशासकीय सीमारेषांची पुनर्रचना नव्हे तर मतदारसंघाची पुनर्रचना म्हणजे राज्य, जिल्हा व मतदारसंघातील आर्थिक व सामाजिक संबंधाची फेर जुळणी आहे. महाराष्ट्रातील केवळ मतदारसंघाची पुनर्रचना झाली नाही तर महाराष्ट्राच्या पर्यायाने पुणे व सातारा जिल्ह्याच्या राजकारणाचीच पुनर्रचना झाली. म्हणून प्रस्तुत संशोधनामध्ये लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील बदलत्या राजकारणाचे विश्लेषण केलेले आहे.

मतदारसंघाच्या परिसीमनामुळे पुणे व सातारा जिल्ह्याच्या राजकारणामध्ये नव्या सत्ता समीकरणाचा उदय झाला. मतदारसंघ परिसीमन झाल्यामुळे विविध पातळयावरील राजकारण बदलत असते व त्यानुसार नवीन सत्तासमीकरणे तयार होतात. प्रत्येक निवडणुकीच्यावेळी पक्ष, आघाड्या व नेते यांच्यातील सत्तासमीकरणे बदलली. परंतु मतदारसंघ परिसीमनामुळे आर्थिक, भौगोलिक व सामाजिक समीकरणे आकाराला आली आहेत ती कमीत कमी २०२६ पर्यंततही बदलणार नाहीत. त्यामुळे बदललेला पुनर्रचनेचा व राजकारणाचा अभ्यास २००२ च्या परिसीमन आयोगाच्या संदर्भात पुणे व सातारा जिल्ह्याच्या संदर्भात केल्यानंतर पुढील निष्कर्ष समोर आले आहेत.

१) पुणे जिल्ह्याचा भौगोलिक रचनेचा विचार करता पुणे जिल्हा क्षेत्रफळ व लोकसंख्येच्या दृष्टीने मोठा असल्याने त्या आधारे पुणे जिल्ह्यात लोकसभेचे चार मतदारसंघ निर्माण झाले आहेत तर विधानसभेचे २१ मतदारसंघ निर्माण झाले नाहीत.

   पुणे जिल्ह्याच्या तुलनेत क्षेत्रफळ व लोकसंख्येच्या दृष्टीने सातारा जिल्हा लहान आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यात १ लोकसभा मतदारसंघ व ८ विधानसभा मतदारसंघ तयार झाले आहेत.

२) भौगोलिक रचनेचा विचार करून पुणे जिल्ह्यामध्ये मतदारसंघ निर्माण करताना पठारी भागामध्ये मर्यादा पडलेली आहे. त्यामुळे तेथे मतदारसंघाची संख्या कमी राहिली तरी सपाट भागामध्ये मतदारसंघाची संख्या वाढलेली आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये डोंगराळ भाग जास्त असल्याकारणाने तेथे मतदारसंघ कमी प्रमाणात निर्माण झाले तर काही भाग सपाट असल्याने तेथे मतदारसंघ जास्त आहेत. सातारा जिल्ह्यातील बहुतांशी भाग ग्रामीण स्वरूपाचा आहे.

३) पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर लोकसंख्या हा निकष पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय युनिट नवीन मावळ लोकसभा निर्माण करण्यासाठी उघडले आहे.

४) पुणे जिल्ह्यामध्ये विधानसभा पातळीवर भौगोलिक असलगता दिसून आली. पुनर्रचनेत वडगांव शेरी विधानसभा मतदारसंघामध्ये शहरी व ग्रामीण असे मिश्रण करताना ग्रामीण भागातील मांजरी असे मिश्रण करताना ग्रामीण भागातील मांजरी खुर्दचा समावेश करताना त्यात भौगोलिक सलगतेचा विचार केलेला दिसून येत नाही.

५) पुणे जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही जुन्नर, आंबेगांव, मावळ, मुळशी व भोर या पाच तालुक्यांपुरती मर्यादीत आहे तर अनुसूचित जातीची लोकसंख्या शहरी भागात जास्त असल्याने (७ लाख ६१ हजार) पुनर्रचनेत पुणे कॅन्टोमेंट व पिंपरी हे दोन नवीन विधानसभा मतदारसंघ राखीव झाले.

सातारा जिल्ह्याामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या फक्त २१००० असून अनुसूचित जातीची लोकसंख्या २ लाख असल्यामुळे फलटण हा विधान सभा मतदारसंघ राखीव झाला.

६) मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यात लोकसभेचे ३ मतदारसंघ आणि विधानसभेचे १८ मतदारसंघ होते. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभेचे चार आणि विधानसभेचे २१ मतदारसंघ निर्माण झाले.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभेचे दोन मतदारसंघ आणि विधानसभेचे १० मतदारसंघ होते. मतदारसंघपुनर्रचनेनंतर सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभेचा १ तर विधानसभेचे ८ मतदारसंघ राहिले. त्यापैकी २ मतदारसंघाचा (फलटण व माण) माढा लोकसभा मतदारसंघात समावेश करण्यात आला.

७) नवीन माढा लोकसंख्या मतदारसंघामध्ये सातारा जिल्ह्यातील फलटण व माण या दोन विधानसभा मतदारसंघाचा समावेश केल्यामुळे सोलापूर व सातारा या दोन जिल्ह्याचे पुनर्रचनेनंतर नवे राजकीय संबंध निर्माण झाले.

८) पुणे जिल्ह्यामध्ये मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळीवर कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व होते तर विधानसभा पातळीवर सुद्धा कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेसचे वर्चस्व होते

पुनर्रचनेनंतर लोकसभापातळीवर काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व कमी झाले तर शिवसेनेचे वर्चस्व वाढलेले आहे.

९) सातारा जिल्ह्यामध्ये मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिलेली होते. पुनर्रचनेनंतरसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे. त्याचप्रमाणे विधानसभापातळीवरसुद्धा पुनर्रचनेपूर्वी व पुनर्रचनेनंतर राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे.

१०) पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनपूर्वी शहरी मतदारसंघाची संख्या कमी होती तर ग्रामीण मतदारसंघाची संख्या जास्त होती. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये शहरी मतदारसंघाची संख्या वाढली तर ग्रामीण मतदारसंघाची संख्या कमी झाली आहे.

११) सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी ग्रामीण मतदारसंघाची संख्या जास्त होती तर शहरी मतदारसंघाची संख्या कमी होती. पुनर्रचनेनंतर ग्रामीण मतदारसंघाची संख्या कमी झाली आहे तर शहरी मतदारसंघाची संख्या वाढलेली आहे.

१२) सातारा व पुणे जिल्ह्यामध्ये राजकीय नेतृत्त्व हे स्थानिक तालुका पातळीवर जास्त केंद्रीत झालेले आहे.

१३) पुणे जिल्ह्यामध्ये मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी राजकीय पक्षाचे पक्षीय बलाबल पाहात लोकसभा पातळीवर रा.काँग्रेस पक्ष–०२ व काँग्रेस–०१ अशी विभागणी आहे तर विधान सभा पातळीवर काँग्रेस–०५, रा.काँग्रेस–०७, भाजप–०४, शिवसेना–०२ अशी विभागणी आहे. एकूणच लोकसभा व विधानसभा पातळीवर रा.काँग्रेसचे वर्चस्व राहिलेले आहे. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर राजकीय पक्षाचे पक्षीय बलाबल पाहता लोकसभा पातळीवर काँग्रेस–०१, रा.काँग्रेस–०१, शिवसेना–०२ अशी विभागणी आहे तर विधानसभा पातळीवर काँग्रेस–०४, रा.काँग्रेस–०७, भाजप–०३, शिवसेना–०३, मनसे–०१ तर अपक्ष–०३ अशी विभागणी आहे. यावरून रा.काँग्रेसपक्षाचे लोकसभा व विधानसभा पातळीवर वर्चस्व कमी झाले असून भाजप, शिवसेना यांचे वर्चस्व वाढले आहे.

१४) सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी राजकीय पक्षाचे पक्षीय बलाबल पाहता लोकसभा पातळीवर रा.काँग्रेस–०२, असे प्रमाण असून विधानसभा पातळीवर काँग्रेस –०१, रा.काँग्रेस–०६, भाजप–०१, शिवसेना–०१, अपक्ष–०१ अशी विभागणी आहे. एकूणच या दोन्ही मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचा प्रभाव राहिलेला आहे. पुनर्रचनेनंतर राजकीय पक्षाचे पक्षीय बलाबल पाहता लोकसभा पातळीवर रा.काँग्रेस–०१, विधानसभा पातळीवर

काँग्रेस– ०२, रा.काँग्रेस–०६ अशी विभागणी आहे. यावरून पुनर्रचनेनंतरसुद्धा रा.काँग्रेसचे सातारा जिल्ह्यावर वर्चस्व राहिलेले आहे.

१५) पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा व विधान पातळीवर राजकारण हे ग्रामीण भागापेक्षा शहरी भागाभोवती जास्त फिरलेले आहे.

१६) पुणे जिल्ह्यामध्ये बारामती मावळ व शिरूर या लोकसभेच्या मतदारसंघामध्ये ग्रामीण भाग या मतदारसंघाला जोडलेला आहे. तर पूर्वीचा शहरी भाग या मतदारसंघातून वगळलेला आहे. त्यामुळे तेथील मूळ नेतृत्वाला नेतृत्व टिकविण्यासाठी ग्रामीण भागांचे हितसंबंधाचा विचार करावा लागला यातूनच शहरी व ग्रामीण हितसंबंध जोडणारे नेतृत्व पुढे आलेले आहे.

१७) पुणे जिल्ह्यातील पर्वती विधानसभा मतदारसंघातून २००४ पर्यंत हा मतदारसंघ राखीव असल्याने यातून फक्त पुरूष उमेदवार निवडून दिला जात होता परंतु हा मतदारसंघ २००९ ला (पुनर्रचनेनंतर) सर्व साधारण वर्गासाठी झाल्यानंतर पहिल्यांदाच या मतदारसंघातून स्त्री उमेदवार निवडून आली आहे.

१८) वाई विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी वाई तालुक्यापुरता मर्यादित होता परंतु पुनर्रचनेनंतर या मतदारसंघात महाबळेश्वर व खंडाळा तालुक्यात समावेश केल्याने या तिन्ही तालुक्यांमध्ये राजकीय स्पर्धा निर्माण झाली. यामुळे वाई मतदारसंघातून राष्ट्रवादीचे बंडखोर उमेदवार मकरंद पाटील यांनी विधान सभेची निवडणुक जिंकून आता पर्यंतची या मतदारसंघातील काँग्रेसची विजयी परंपरा मोडीत काढली.

१९) शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघामध्ये पुनर्रचनेपूर्वी शिवसेनेच्या तिकिटावर विनायक निम्हण निवडणुक जिंकले होते. पुनर्रचनेनंतर काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करून सुद्धा पुन्हा या मतदारसंघात विजय मिळविला.

२०) पुणे जिल्ह्यात पुनर्रचनेत मुळशी हा मतदारसंघ रद्द होऊन तो भोर विधान सभेला जोडला गेल्यामुळे मुळशी मतदारसंघातून पुनर्रचनेपूर्वी निवडून आलेले शरद ढमाले यांना भोर विधान सभामतदारसंघामध्ये पराभव पत्करावा लागला.

२१) पुणे जिल्ह्यातील खेड लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेनंतर रद्द झाला. त्यामुळे येथून निवडून येणारे अशोक मोहोळ (राष्ट्रवादी) यांना पुनर्रचनेचा फटका बसला. हा मतदारसंघ नवीन शिरूर लोकसभेला जोडला गेला आहे. पुनर्रचनेनंतर अशोक मोहोळ यांना येथून पराभव पत्करावा लागला. व शिवसेनेची शिवाजी आढळराव पाटील या मतदारसंघातून विजयी झाले.

२२) पुणे जिल्ह्यामध्ये मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी पुरंधर विधानसभा मतदारसंघातून सातत्याने जनता दलाचे उमेदवार दादा जाधवराव हे निवडून यायचे परंतु पुनर्रचनेनंतर प्रथम या मतदारसंघातून शिवसेनेचे विजय शिवतारे विजयी होऊन त्यांना विधानसभेचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली.

२३) पुणे जिल्ह्यातील अनुसुचित जातीच्या विधानसभा मतदारसंघ संख्येमध्ये पुनर्रचनेनंतर बदल झाला त्याचप्रमाण लोकसभा व विधानसभा मतदारसंघामध्येही बदल झाला.

२४) पिंपरी हा मतदारसंघ राखीव झाल्यामुळे येथून अनुसूचित जातीच्या उमेदवाराला विधानसभेमध्ये नेतृत्व करण्याची संधी मिळाली.

२५) सातारा जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीच्या मतदारसंघामध्ये फेरबदल झाल परंतु संख्या एकच राहिली. परंतु लोकसभा व विधानसभा मतदारसंघ संख्येमध्ये बदल झाला.

२६) पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेत चिंचवड, पिंपरी, भोसरी, वडगावशेरी, खडकवासला व हडपसर हे विधान सभेचे सहा मतदारसंघ नव्याने उदयाला आले तर पुनर्रचनेपूर्वीचे मुळशी, हवेली व भवानी पेठ हे मतदारसंघ रद्द झाले तर लोकसभेचे पूर्वी खेड, बारामती, पुणे हे मतदारसंघ होते पुनर्रचनेत खेड हा रद्द होऊन त्याऐवजी शिरूर, मावळ, पुणे व  बारामती असे चार लोकसभा मतदारसंघ निर्माण झाले.

२७) सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेमध्ये जावळी विधान सभा मतदारसंघ रद्द झाल्याने येथून यापूर्वी निवडून येणारे शशिकांत शिंदे यांना कोरेगांव विधानसभा मतदारसंघातून उभे राहावे लागले.

२८) फलटण हा मतदारसंघ पुनर्रचनेमध्ये राखीव झाल्यामुळे या मतदारसंघातून सातत्याने निवडून येणारे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांचे राजकीय पुनवर्सन करावे लागले.

२९) पुनर्रचनेमुळे डॉ.शालिनीताई पाटील, मदन भोसले, शंभुराजे देसाई यांना पराभवाला सामोरे जावे लागले तर पुनर्रचनेनंतर दिपक गायकवाड मकरंद पाटील यांना पहिल्यांदाच विधानसभेत नेतृत्व करण्याची संधी मिळाली.

३०) पुनर्रचनेमुळे दादा जाधवराव, अशोक मोहोळ, बाळासाहेब शिवरकर यांना पराभवाला सामोरे जावे लागले. तर चंद्रकांत छाजेड, कमल उल्हास ढोले पाटील यांना राजकीय स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. तर पुनर्रचनेनंतर संग्राम थोपटे, विजय शिवतारे, माधुरी मिसाळ, यांना पहिल्यांदाच विधानसभेमध्ये मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली.

३१) पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेनंतर लोकसभा व विधान सभापातळीवर शहरी व ग्रामीण हित संबंध जोडून घेणारे नेतृत्व निर्माण झाले आहे.

३२)पुणे जिल्ह्यामध्ये पुणे लोकसभामतदार पुनर्रचनेपूर्वी काँग्रेसचा प्रभाव होता परंतु पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये भाजपाचे वर्चस्व वाढत चाललेले आहे.

३३) बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये पुनर्रचनेपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचे (शरद पवार) यांचे वर्चस्व होते व पुनर्रचनेनंतरसुद्धा बारामती मतदारसंघावर रा.काँ.वर्चस्व कायम राहिले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे शरद पवार यांचे सारखे सक्षम नेतृत्व असेल तर मतदारसंघ पुनर्रचनेचा सुद्धा परिणाम नेतृत्वावर होऊ शकत नाही हेच यातून सिद्ध होते.

३४) सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी कराड व सातारा असे दोन लोकसभा मतदारसंघ होते पुनर्रचनेनंतर माण व फलटण मतदारसंघ सोलापूर जिल्ह्यातील माढा लोकसभा मतदारसंघाला जोडल्यामुळे सातारा जिल्ह्यातील कराड लोकसभा मतदारसंघ कमी झाला त्यामुळे या पुनर्रचनेचा सातारा जिल्ह्याला तोटा झाला आहे.

३५) सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी पुनर्रचनेनंतर सुद्धा लोकसभा पातळीवर राष्ट्रवादी पक्षाचा प्रभाव कायम राखण्याचे प्रमुख कारण म्हणजे रा.काँ. शरद पवार यांनी इतर नेत्यांची दोर बांधल्यामुळे हा प्रभाव कायम राहिला असून विधानसभा पातळीवर मात्र काँग्रेसचा प्रभाव काही प्रमाणात राहिलेला आहे.

३६) पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचपूर्वी राजकीय सहभागाचे प्रमाण लोकसभा व विधानसभा पातळीवर कमी होते परंतु पुनर्रचनेनंतर राजकीय सहभागाचे प्रमाण लोकसभा व विधानसभा पातळीवर वाढलेले आहे.

**समारोप**

पुणे व सातारा जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या राजकीय व सामाजिक बदलांच्या तुलनात्मक अभ्यासाच्या आधारावर निष्कर्षाची मांडणी केली असून या निष्कर्षावरून पुणे व सातारा जिल्ह्यात राजकारणांवर झालेला परिणामकारक आढावा घेण्यात आला आहे. या निष्कर्षाच्या आधारे जी गृहितके मांडलेली आहेत. ती पडताळून पाहणे गरजेचे आहे.

## गृहितकांची पडताळणी

**प्रस्तावना**

गृहितकांची पडताळणी करीत असताना त्यापूर्वी पुणे व सातारा जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतर संदर्भात लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक पातळीवरील विविध संकलित केलेल्या माहितीच्या आधारे गृहितकृत्ये सिद्ध होत असते. त्यानुसार पुणे व सातारा जिल्ह्यातील पुनर्रचनेनंतर झालेल्या राजकीय व सामाजिक बदलांच्या तुलनात्मक माहितीच्या आधारावर पुढीलप्रमाणे गृहितकांची पाडताळणी केलेली आहे.

**१) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे पुणे व सातारा जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेमुळे सत्तास्पर्धा अधिक तीव्र होऊन लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची समीकरणे बदलणार आहेत.**

पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर खेड, बारामती व पुणे या लोकसभेच्या मतदारसंघापैकी खेड व बारामती या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव होता तर पुणे या मतदारसंघावर काँग्रेसपक्षाचा प्रभाव होता. २००४ (पुनर्रचनेपूर्वी) राजकीय पक्षनिहाय तक्ता

| अ.नं | मतदारसंघ | विजेता |
|---|---|---|
| १ | पुणे | सुरेश कलमाडी |
| २ | खेड | अशोक मोहोळ |
| ३ | बारामती | शरद पवार |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते लोकसभेच्या तीन जागांपैकी २ जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे तर १ जागा काँगेस पक्षाकडे होती. एकूण पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर काँग्रेसपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा राष्ट्रवादी काँगेसपक्षाचा प्रभाव राहिलेला आहे.

**२००९ (पुनर्रचनेनंतर)**

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर काही महत्त्वपूर्ण बदल  झाले त्याचा राजकारणावर परिणाम झाला. पुणे जिल्ह्यामध्ये राजकारणावर परिणाम झाला. पुणे जिल्ह्यामध्ये खेड हा मतदारसंघ रद्द झाला त्या ऐवजी शिरूर हा मतदारसंघ नव्याने तयार झाला तसेच मावळ हा नवीन लोकसभा मतदारसंघ रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत, उरण तर पुणे जिल्ह्यातील मावळ चिंचवड व पिंपरी असा तयार झाला.  एकूणच या नवीन लोकसभा

मतदारसंघावर काँग्रेस व रा.काँग्रेसला प्रभाव दाखविता आला नाही. या नवीन मतदारसंघामध्ये भाजप–शिवसेना हे निवडून आल्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादी यांच्यामध्ये सुरुवातीला जी सत्तास्पर्धा होती त्याऐवजी आता काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस भाजप व शिवसेना यांच्यामध्येच सत्तास्पर्धा असलेली दिसून येते. त्यामूळेच लोकसभा पातळीवर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव कमी झाल्यामुळे एकूण लोकसभा मतदारसंघाची सत्ता समीकरणे बदलली आहेत.

**२००९ सालचा पुनर्रचनेनंतर (पक्षनिहाय तक्ता)**

| अ.नं | मतदारसंघ | विजेता |
|---|---|---|
| १ | पुणे | सुरेश कलमाडी |
| २ | बारामती | सुप्रिया सुळे |
| ३ | मावळ | गजानन बाबर |
| ४ | शिरूर | शिवाजीराव आढळराव पाटील |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर काँग्रेस–०१, राष्ट्रवादी काँग्रेस–०१ व शिवसेना–०२ अशी जागेची विभागणी झाली असून चारपैकी ०२ जागा शिवसेनेने जिंकल्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँगेसच्या सत्तास्पर्धेत शिवसेनेनेसुध्दा या ठिकाणी वाटेकरी झाल्यामुळे एकूणच लोकसभा पातळीवर सत्तास्पर्धा आधिक तीव्र झालेली दिसून येतो. त्यामुळेच लोकसभा पातळीवर सत्ता समीकरणे बदलली आहेत.

पुणे जिल्ह्यात विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये सत्तास्पर्धा दिसून येते. विधानसभेच्या एकूण १८ जागांपैकी ५ जागा काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस १८ जागांपैकी ५ जागा काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस ०७ भाजप –०४ तर शिवसेना–०२ अशा जागांची विभागणी दिसून येते. एकूणच काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव राहिला असला तरी शहरी भागामध्ये भाजप शिवसेना या निवडणुकीच्या माध्यमातून शिरकाव करण्यात सुरुवात केलेली आहे. हे वरील जागांच्या विषयावरून लक्षात येते.

पुणे जिल्ह्यात पुनर्रचनेनंतर विधानसभा मतदारसंघ १८ ऐवजी २१ झाले. या २१ विधानसभा मतदारसंघापैकी काँग्रेस ४ राष्ट्रवादी काँग्रेस ०७ भाजप –शिवसेना व मनसे ०१,

अपक्ष –०३ अशा जागा मिळाल्या एकूणच या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाची एक जागा कमी झाली तर भाजप–शिवसेना पक्षाच्या दोन जागा वाढल्या तसेच मनसेनेही या निवडणुकीत खाते उघडले. एकूण काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबरोबरच भाजप–शिवसेना व मनसे हे सुद्धा या सत्तास्पर्धेत सहभागी झाल्याने विधानसभा पातळीवर देखील सत्तास्पर्धा अधिक तीव्र होऊन या मतदारसंघाची सत्तासमीकरणे बदलली आहेत.

सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर पुनर्रचनेपुर्वी सातारा व कराड अशी दोन लोकसभा मतदारसंघ होते. दोन्ही लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव होता. सातारा जिल्ह्यातील लोकसभेच्या दोन्ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकलेल्या होत्या.

सन २००४ ची लोकसभा निवडणुकीतील विजयी उमेदवार

| अ.क्र. | मतदारसंघ | विजेता |
|---|---|---|
| १ | सातारा | लक्ष्मणराव पाटील |
| २ | कराड | श्रीनिवास पाटील |

वरील तक्त्यावरून सातारा जिल्ह्यातील लोकसभेच्या दोन्ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकल्या. त्यामुळे सन २००४ ला इतर पक्षांना या निवडणुकीत प्रभाव दाखविण्याची संधी मिळाली नाही. पर्यायाने एकाच पक्षाचा प्रभाव राहिल्याने सत्तास्पर्धा तीव्र झाली असे म्हणता येणार नाही. त्या बरोबरच सत्ता समीकरणे बदलली गेली.

सातारा जिल्ह्यातील पुनर्रचनेपुर्वी विधानसभेच्या १० जागा होत्या. त्यापैकी काँग्रेस–०१, राष्ट्रवादी काँग्रेस – ०६, भाजप–०१, शिवसेना– ०१, तर अपक्ष ०१, अशा जागांची विभागणी होती. एकूण या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने ६ जागा जिंकून लोकसभेप्रमाणेच विधानसभेच्या जागावरही प्रभाव दाखविला.

पुनर्रचनेनंतर सातारा जिल्ह्यातील विधान सभेच्या १० जागांपैकी ८ जागा राहिल्या. खटाव व जावळी हे दोन मतदारसंघ रद्द झाले या ८ जागापैकी ६ जागा राष्ट्रवादी काँग्रेस तर २ जागा काँग्रेस अशी विभागणी होती. एकूणच या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस विभागणी होती. एकूणच या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पुनर्रचनेनंतरसुद्धा एक हाती जास्त जागा मिळवून

आपला प्रभाव कायम ठेवला. त्यामुळे लोकसभेप्रमाणे विधानसभा पातळीवर देखील सातारा जिल्ह्यामध्ये सत्तास्पर्धा जाणवत नाही. त्याचबरोबर सत्तासमीकरणे बदलली गेली नाहीत.

सातारा जिल्ह्यातील संस्थात्मक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची मोट घट्ट असल्यामुळे इतर पक्षांचा प्रभाव पडला नाही. तरी पण पक्ष मजबूत करण्यासाठी भाजप व शिवसेनेला एकप्रकारे चालना मिळाली.

**गृहितक – २**

**१) पुणे व सातारा जिल्ह्यातील मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रभाव लोकसभा व विधानसभेपुरता मर्यादित न राहता स्थानिक शासनाच्या राजकारणात बदल होऊन नवीन नेतृत्वास चालना मिळाली.**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे व सातारा जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा मतदारसंघावर प्रभाव पडून काही बदल होऊन लोकसभा व विधानसभा पातळीवरील राजकारण हे पूर्णपणे बदलले गेले आहे. जो मतदारसंघ आकाराने मोठा आहे. त्याठिकाणी अपक्ष, बंडखोर यांची संख्या वाढलेली आहे. त्यामुळे नवीन निर्माण झालेल्या मतदारसंघाचे नेतृत्व करणाच्यादृष्टीने अपक्ष, बंडखोर यांची धडपड चाललेली दिसून येते. पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये तालुका पातळीवर नेतृत्व करणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने या स्थानिक पातळीमधून अपक्ष, बंडखोर उमेदवार यांच्यातून नवीन नेतृत्व उदयास आलेले दिसून येते. राज्यपातळीवर नेतृत्व करण्याच्यादृष्टीने तालुका, जिल्हा पातळी ही त्यांचय दृष्टीने त्याचा पाया आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या २००७ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये आंधळी जिल्हा परिषद गटातून प्रथमच जयकुमार गोरे निवडून आले. त्यानंतर माण हा मतदारसंघ २००९ च्या निवडणुकीच्यावेळी सर्वसाधारण झालेला होता. या निवडणुकीच्यामध्ये जयकुमार गोरे यांनी अपक्ष म्हणून निवडणुक लढविली व या मतदारसंघातून निवडून आले. यावरून असे दिसते की मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रभाव फक्त लोकसभ विधानसभा पातळीपुरता मर्यादित न राहता स्थानिक पातळीच्या निवडणुकीमध्ये विजय होऊन एक नवीन नेतृत्व पुढे आलेले पाहायला मिळते.

**गृहितक क्र. ३**

**३) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे पुणे व सातारा जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा व स्थानिक शासनाच्या राजकारणात राजकीय व सामाजिक बदल होत आहे.**

पुणे जिल्ह्याचा व सातारा जिल्ह्याचा तुलनात्मक अभ्यास केला असता

**पुणे जिल्हा व सातारा जिल्हा**

**१) राजकीय प्रभाव–**

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी पुणे, खेड व बारामती या मतदारसंघावर काँग्रेस, राष्ट्रवादी पक्षांचा प्रभाव होता. पुनर्रचनेनंतर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कमी झाला. कारण नवीन शिरूर व मावळ लोकसभा मतदारसंघावर शिवसेनेने वर्चस्व राखले तर पुणे व बारामती याठिकाणी काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचा प्रभाव राहिला. एकूणच पुनर्रचनेनंतर काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचा प्रभाव कमी होऊन शिवसेनेचा प्रभाव वाढलेला आहे.

पुणे जिल्ह्यातील विधानसभा पातळीवर नवीन २१ विधान सभा मतदारसंघापैकी काँग्रेस– ०४, राष्ट्रवादी काँग्रेस–०७, भाजप– ०३, शिवसेना– ०३, मनसे–०१ तर अपक्षाना ३ जागा मिळाल्या होत्या. म्हणजेच विधानसभा पातळीवर विशेषतः शहरी भागामध्ये भाजप–शिवसेनेचा प्रभाव वाढलेला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी सातारा व कराड या दोन लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव होता. पुनर्रचनेनंतरसुद्धा सातारा जिल्ह्यातील सातारा हा एकमेव लोकसभा मतदारसंघ राहिला व या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव कायम राहिला याचे प्रमुख कारण म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार यांनी सातारा जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांची मोट बांधल्यामुळे एकत्रित असा पाठिंबा लोकसभा उमेदवार उदयनराजे भोसले यांना मिळाला.

सातारा जिल्ह्यातील विधानसभा पातळीवर पुनर्रचनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला आहे.

एकंदरित राजकीय पक्षाच्या प्रभावांच्या संदर्भात पुणे व सातारा जिल्ह्याचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे दिसून येते की, पुणे जिल्ह्यामध्ये ज्या पद्धतीने लोकसभा व विधानसभा पातळीवर भाजप व शिवसेनेचा प्रभाव वाढून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा

प्रभाव कमी झाला आहे. त्याच्या तुलनेत सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा विधानसभा पातळीवर इतर कुठल्याही पक्षाचा प्रभाव न वाढता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव कायम राहिलेला दिसून येतो.

## २) राजकीय नेतृत्व–

पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यास राष्ट्रीय स्तरावर पुणे शहरातून मोहन धारिया, विठ्ठल गाडगीळ, सुरेश कलमाडी यासारख्या काँग्रेस नेत्यांचे नेतृत्व या जिल्ह्याला लाभलेले आहे. २००४ च्या निवडणुकीमध्ये पुणे लोकसभा मतदारसंघाचे सुरेश कलमाडी यांनी बारामती लोकसभेचे मतदारसंघाचे शरद पवार यांनी तर खेड लोकसभेचे मतदारसंघाचे अशोक मोहोळ यांनी नेतृत्व केलेले होते.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मात्र लोकसभा मतदारसंघातील बदल व वाढ यामुळे काही मतदारसंघामध्ये नेतृत्व बदल झालेला आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे सुरेश कलमाडी यांचे नेतृत्व पुनर्रचनेनंतरसुद्धा कायम राहिलले आहे. परंतु बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांची कन्या सुप्रिया सुळे या महिला नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या आहेत. हा बदल या मतदारसंघात जाणवतो.

मावळ लोकसभा मतदारसंघ नव्याने तयार झाल्याने यामध्ये निम्मा मतदारसंघ पुणे जिल्ह्यातील व  निम्मा मतदारसंघ कोकणातील आहे. या मतदारसंघावर शहरी भागाचे नेतृत्व पाहायला मिळते. शहरी भागातून (मावळ, पिंपरी, चिंचवड) शिवसेनेचे गजानन बाबर यांचे नवीन नेतृत्व या मतदारसंघाला मिळाले. तर शिरूर लोकसभा मतदारसंघ नव्याने तयार झाला असून यामध्ये खेड लोकसभा मतदारसंघाचा समावेश होतो. या मतदारसंघात शिवसेनेचे शिवाजीराव आढळराव पाटील यांचे नेतृत्व या मतदारसंघाला लाभले.

पुणे जिल्ह्यातील विधानसभा पातळीवर पूर्वीच्या १८ विधानसभा मतदारसंघाऐवजी २१ विधानसभा मतदारसंघ झाले. त्यातील काही मतदारसंघ रद्द झाले तर काही मतदारसंघामध्ये काही बदल झाले तर काही मतदारसंघ नव्याने तयार झाले त्यामुळे राजकीय नेतृत्वसुद्धा बदलले आहे. पुनर्रचनेपूर्वी मुळशी मतदारसंघाचे शिवसेनेचे शरद ढमाले यंनी नेतृत्व केले होते. परंतु पुनर्रचनेत हा मतदारसंघ रद्द होऊन तो भोर विधानसभेला जोडला गेल्याने या पुनर्रचनेचा

त्यांना फटका बसला भोर या विधानसभेचे पुनरर्चनेपूर्णी अनंतराव थोपटे हे नेतृत्व करीत होते. पुनर्रचनेनंतर त्यांचे चिरंजीव संग्राम थोपटे (काँग्रेस) हे तरुण नेतृत्व पुढे आले आहे.

पुनर्रचनेपूर्वी हवेली मतदारसंघाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसचे विलास लांडे करीत होते. परंतु पुनर्रचनेनंतर हवेली या मतदारसंघाचा बराचसा भाग भोसरी (नवीन) विधान सभा मतदारसंघात गेल्याने या मतदारसंघातून विलास लांडे यांनी राष्ट्रवादीचे बंडखोर उमेदवार म्हणून विजय मिळविला.

सातारा जिल्ह्यामध्ये राजकारणामध्ये पुनर्रचनापूर्वी राष्ट्रीय स्तरावर यशवंतराव चव्हाण, लक्ष्मण पाटील यांचे नेतृत्व लाभलेले होते. परंतु दुसऱ्या बाजूला सातारा जिल्ह्याच्या राजकारणामध्ये नेतृत्वासाठी उदयनराजे व अभयसिंहराजे भोसले यांच्यातील राजकीय संघर्ष २००६ पर्यंत कायम राहिले. परंतु अभय सिंहराजे यांच्या निधनानंतर २००६ च्या पालिका निवडणुकीच्या निमित्ताने रयत विकास आघाडी (उदयनराजे) व सातारा विकास आघाडी (शिवेंद्रराजे) यांच्यात मनोमिलन झाले. राजकीय संघर्ष राजकीय संघर्ष संपला. पुनर्रचनेनंतर उदयनराजे भोसले यांचेकडे सातारा लोकसभेचे नेतृत्व आले तर वडिलांच्या निधनानंतर शिवेंद्रराजे यांचेकडे विधानसभेचे नेतृत्व आले.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी १० विधानसभा मतदारसंघ राहिले. जावळी विधानसभेचे ८ मतदारसंघ राहिले. जावळी विधानसभेचे नेतृत्व करणारे शशिकांत शिंदे व खटाव विधान सभा मतदारसंघाचे नेतृत्व करणारे दिलीप येळगांवकर यांचे मतदारसंघ रद्द झाल्याने त्यांना दुसऱ्या मतदारसंघाचा आधार घ्यावा लागला तर ८ पैकी २ मतदारसंघ (माण व फलटण) हे माढा लोकसभेत जोडल्याने तेथील नेत्यांना या पुनर्रचनेचा फटका बसला.

**३) राजकारणातील फेरबदल–**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्याच्या राजकारणामध्ये काही फेरबदल झालेल आहेत. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्याच्या राजकारणामध्ये काही फेरबदल झालेले आहेत. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, मावळ व शिरूर असे चार लोकसभा मतदारसंघ निर्माण झाले आहेत. परंतु पूर्वीचा खेड लोकसभा मतदारसंघ रद्द झाल्यामुळे या मतदारसंघातून निवडून येणारे राष्ट्रवादीचे आमदार अशोक मोहोळ यांचे राजकीय भवितव्य अंधातरी झाले आहे. खेडचा ५० टक्के भाग शिरूर लोकसभा मतदारसंघाला जोडला आहे.

नव्याने निर्माण झालेल्या मावळ लोकसभा मतदारसंघ निम्मा भाग कोकणातील रायगड लोकसभा मतदारसंघातील (पनवेल, कर्जत व उरण) व निम्मा भाग पुणे जिल्ह्यातील (मावळ, पिंपरी व चिंचवड) असल्याने या मतदारसंघावर शहरी भागावे वर्चस्व आहे. रायगड लोकसभा मतदारसंघातील निम्मा भाग मावळ लोकसभा मतदारसंघात आल्याने तेथील शेतकरी कामगार पक्षाचे महत्व कमी झाले व राजकीय समीकरणेसुद्धा बदलली आहेत.

पुनर्रचनेनंतर नव्याने निर्माण झालेल्या शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये खेडचा निम्मा भाग जोडल्याने जुन्या नेतृत्वाचा (अशोक मोहोळ) अस्त होऊन या मतदारसंघात शिवसेनेचे शिवाजीराव आढळराव पाटील हे नवीन नेतृत्व या मतदारसंघातून उदयाला आले.

पुनर्रचनेनंतर विधानसभा पातळीवर सुद्धा पुणे जिल्ह्यामध्ये राजकारणात फेरबदल झाले आहेत. पुनर्रचनेपूर्वी पर्वती विधानसभा मतदारसंघ राखीव होता. या मतदारसंघातून रमेश बागवे निवडून यायचे परंतु पुनर्रचनेत पर्वती ऐवजी पुणे कॅन्टोन्मेंट हा मतदारसंघ राखीव ठेवल्याने तसेच पर्वतीचा काही भाग पुणे कॅन्टोन्मेटला जोडल्याने रमेश बागवे यांनी राखीव जागेतून निवडणुक जिंकली.

पुनर्रचनेपूर्वी पुणे कॅन्टोन्मेंट हा मतदारसंघ खुल्या प्रवर्गासाठी होता. परंतु पुनर्रचनेनंतर हा राखीव झाल्याने या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे बाळासाहेब शिवरकर यांना नव्याने निर्माण झालेल्या हडपसर विधानसभा मतदारसंघातून उभे राहावे लागले. या मतदारसंघातून शिवसेनेचे गजानन बाबर यांनी विजय मिळवून या मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसची परंपरा मोडीत काढली.

पुरंधर विधानसभा मतदारसंघामध्ये पुनर्रचनेनंर पुणे महानगरपालिकोतील हवेली तालुक्याचा काही भाग या मतदारसंघाला जोडला गेल्याने या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे जनता दलाचे दादा जाधवराव यांना या पुनर्रचनेचा फटका बसला कारण या मतदारसंघातून उभे राहिलले शिवसेनेचे विजय शिवतारे यांना मताधिक्य हवेली तालुक्यातून मिळाले.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी कराड व सातारा असे दोन लोकसभा मतदारसंघ होते. परंतु पनर्रचनेत कराड लोकसभा मतदारसंघ रद्द करण्यात आला. व सातारा हा एकमेव मतदारसंघ राहिल्याने येथून पुढे सातारा व कराड असे नवीन समीकरण पुढे आलेले आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळी वरील नेतृत्व हे ज्येष्ठ व्यक्तीकडे राहिलेले होते. स्थानिक पातळी ते राष्ट्रीय पातळीवरील निर्णय सातारा जिल्ह्याच्या बाबतीत जिल्ह्याचे नेतृत्व घेत होती. पुनर्रचनेनंतर मात्र जुना नेतृत्व गट व नवीन नेतृत्व गट निर्माण झालेला दिसून येतो. पुनर्रचनेपूर्वी कराड लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व श्रीनिवास पाटील करीत होते. परंतु पुनर्रचनेत हा मतदारसंघ रद्द झाल्याने ते श्रीनिवास पाटील यांचे राजकीय पुनर्वसन करावे लागले.

पुनर्रचनेनंतर विधानसभा पातळीवर सातारा जिल्ह्याच्या राजकारणात काही फेरबदल झाले. पुनर्रचनेपूर्वी जावळी मतदारसंघाचे नेतृत्व शशिकांत शिंदे करायचे परंतु जावळीचा भाग साताऱ्याला जोडल्याने शशिकांत शिंदे यांनी राष्ट्रवादीच्या तिकिटावर कोरेगाव विधानसभा निवडणुक जिंकली. या मतदारसंघाचे नेतृत्व करणाऱ्या डॉ.शालिनीताई पाटील यांना अपक्ष म्हणून निवडणुक लढवावी लागली.

**मतदारसंघाची तुलना**

**१) भौगोलिक तुलना**

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभेचे पुनर्रचनेपूर्वी ३ मतदारसंघ होते. त्यापैकी खेड लोकसभा मतदारसंघ रद्द होऊन दोन नवीन (मावळ व शिरूर) मतदारसंघ निर्माण झाले. मावळ लोकसभा मतदारसंघाची लोकसंख्या पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय युनिट ओलांडून रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत उरण हा ग्रामीण भाग या मतदारसंघांना जोडला आहे.

विधानसभा पातळीवर वडगांव शेरी विधानसभेच्या बाबतीत भौगोलिक सलगता राहिली नाही. शहरी व ग्रामीण भागाचे मिश्रण करताना मांजरी खुर्द हा भाग त्यात समाविष्ट केल्याने येथे भौगोलिक सलगतेचा विचार केला नाही.

**ब) राखीव मतदारसंघ**

पुणे जिल्ह्यामध्ये विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी पर्वती हा एकच राखीव मतदारसंघ होता. परंतु पुनर्रचनेत पुणे कॅन्टोन्मेट व पिंपरी हे नवीन दोन राखीव मतदारसंघ निर्माण झाले याचे कारण म्हणजे शहरी भागामधे अनु.जाती व अनु.जमातीचे वाढती लोकसंख्या विचारात घेऊन हे मतदारसंघ निर्माण झाले आहेत.

**सातारा**

**अ) भौगोलिक रचना**

सातारा जिल्ह्याची भौगोलिक रचना विचारात घेऊन मतदारसंघाची निर्मीती करण्यात आली असून सातारा जिल्ह्यातील बहुतांशी भाग ग्रामीण स्वरूपाचा आहे. त्यामुळे सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये वाई, पाटण हे मतदार ग्रामीण स्वरूपाचे आहेत तर कराड दक्षिण, कराड उत्तर, कोरेगांव सातारा हे मतदारसंघ निमशहरी स्वरूपाचे आहेत.

**ब) राखीव मतदारसंघ तुलना–**

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी माण हा राखीव होता. पुनर्रचनेनंतर फलटण हा मतदारसंघ राखीव करण्यात आला याचे कारण म्हणजे फलटण तालुक्यात अनु. जाती व अनुसूचित जमातीचे प्रमाण जवळपास २ लाख इतके आहे. त्यामुळे फलटण हा मतदारसंघ या लोकसंख्येच्या आधारावर राखीव करण्यात आला. त्यामुळे या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे रामराजे निंबाळकर यांचे राजकीय पुनवर्सन करावे लागले.

**७) राजकीय सहभाग**

| | पुणे | | सातारा | |
|---|---|---|---|---|
| | पुनर्रचनेपूर्वी (२००४) | पुनरचनेनंतर(२००९) | पुनर्रचनेपूर्वी(२००४) | पुनर्रचनेनंतर (२००९) |
| लोकसभा | ६५ % | ७५ % | ६० % | ६५ % |
| विधानसभा | ७५ % | ८८ % | ६८ % | ७७ % |

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी राजकीय सहभागाचे प्रमाण ६५ % होते. पुनर्रचनेनंतर ते प्रमाण ७५ % इतके झाले तर पुनर्रचनेनंतर हे प्रमाण ८८ % इतके झाले. एकूणच पुनर्रचनेनंतर लोकसभा व विधानसभा पातळीवर राजकीय सहभागाचे ७५ % होते तर पुनर्रचनेनंतर हे प्रमाण ८८% इतके झाले. एकूणच पुनर्रचनेनंतर लोकसभा व विधानसभा पातळीवर राजकीय सहभागाचे प्रमाण वाढलेले आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी राजकीय सहभागाचे प्रमाण लोकसभा पातळीवर ६०% होते ते पुनर्रचनेनंतर ६५ % इतके झाले. विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी राजकीय सहभागाचे प्रमाण ६८ %होते ते ७७ % इतके झाले.

एकूणच पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभापातळीवर व विधानसभा पातळीवर पुनर्रचनेनंतर राजकीय सहभागाच्या प्रमाणात वाढझालेली आहे.

**गृहितक क्र. ४**

**४) मतदारसंघाच्या पुनर्रचनेमुळे पुणे व सातारा जिल्ह्याच्या लोकसभेच्या निवडणुकीबरोबरच विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राखीव जागामधून नवीन नेतृत्व उदयास येत आहे.**

पुणे जिल्यामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी व भोर या पाच तालुक्यांपुरती मर्यादित आहे तर अनुसूचित जातीची लोकसंख्या शहरी भागात जास्त असल्याने ( ७ लाख ६१ हजार) पुनर्रचनेमध्ये पुणे कॅन्टोन्मेंट व पिंपरी हे दोन नवीन विधानसभा मतदारसंघ राखीव झाले. पुनर्रचनेपूर्वी पर्वती हा मतदारसंघ राखीव होता. या मतदारसंघातून रमेश बागवे निवडून यायचे. पुनर्रचनेत हा मतदारसंघ सर्वसाधारण होऊन पुणे कॅन्टोन्मेंट हा राखीव मतदारसंघ झाला. तसेच पर्वतीच्या बराचसा भाग पुणे कॅन्टोन्मेटला जोडला गेला. त्यामुळे रमेश बागवे यांनी या मतदारसंघातून निवडणुक लढवून विजय संपादन केला. या मतदारसंघातून नवीन नेतृत्व या मतदारसंघाला मिळाले.

सातारा जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या फक्त २१००० असून अनुसूचित जातीची लोकसंख्या २ लाख असल्यामुळे फलटण हा विधान सभा मतदारसंघ राखीव झाला. यापूर्वी माण हा राखीव मतदारसंघ होता. फलटण हा मतदारसंघ राखीव झाल्याने या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे रामराजे निंबाळकर यांचे राजकीय पुनवर्सन करावे लागले. परंतु त्यांचे समर्थक असणारे दिपक चव्हाण यांनी या राखीव मतदारसंघातून निवडणुक लढविली व विजय संपादन केला. या नवीन राखीव मतदारसंघातून दिपक चव्हाण यांच्या रूपाने नवीन नेतृत्व उदयाला आले.

वरील पुणे व सातारा जिल्ह्यातील राखीव जागांची तुलना करता पुणे जिल्ह्यांमध्ये शहरी भाागात २ जागा राखीव झाल्या तर सातारा जिल्ह्यामध्ये लोकसंख्येच्या आधारावर एकच जागा राखीव झाली त्यामुळे शहरी भागामध्ये या जातीचे संघटन जास्त प्रमाणात पाहायला मिळते.

तसेच त्या जातीचे प्रतिनिधित्व शहरी भागत जास्त प्रमाणात केलेले दिसते तर ग्रामीण भागात त्याचे प्रमाण कमी राहिलेले आहे.

**गृहितक क्र. ५**

**५) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे पुणे जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण हितसंबंध जोडणारे नेतृत्व निर्माण झाले आहे.**

पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी खेड, बारामती व पुणे असे लोकसभेचे तीन मतदारसंघ होते. पुनर्रचनेमध्ये खेड हा मतदारसंघ रद्द झाला. पुनर्रचनेत पुणे, बारामती, शिरूर व मावळ चार लोकसभा मतदारसंघ निर्माण झाले या चार लोकसभा मतदारसंघापैकी पुणे हा मतदारसंघ शहरी असून बारामती, शिरूर व मावळ हे मतदारसंघ निमशहरी स्वरूपाचे आहेत.

पुनर्रचनेमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये पूर्वीचा शहरी (हवेली, शिरूर पिंपरी चिंचवड) हा भाग वगळण्यात आला त्या ऐवजी भोर, मुळशी व वेल्हे या तालुक्यांचा समावेश बारामती लोकसभा मतदारसंघात करण्यात आला त्यामुळे या मतदारसंघाचे स्वरूप निम्मा ग्रामीण व निम्मा शहरी असा झाला. त्यामुळे या मतदारसंघाचे नेतृत्व करणाऱ्या सुप्रिया सुळे यांना शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील हितसंबंधाचा विचार करावा लागला यातूनच सुप्रिया सुळे यांचे सारखे शहरी व ग्रामीण हितसंबंध साधणारे नेतृत्व  पुढे आलेले आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये जुन्या खेडचा ५० % भाग (जुन्नर, आंबेगाव व खेड–आळंदी) हा आलेला आहे. तसेच भोसरी व शिरूर जुन्या बारामती लोकसभेतील तर हडपसर हा भाग जुन्या पुणे लोकसभा मतदारसंघातील आहे. एकूण शहरी व ग्रामीण असा मतदारसंघ तयार झाल्याने या मतदारसंघाचे नेतृत्व करणाऱ्याला शहरी भागाबरोबरच ग्रामीण (जुन्नर, आंबेगांव, खेड आळंदी) या भागातील हितसंबंधाचा विचार करावा लागला. या हितसंबंधामधून शिवसेनेचे शिवाजीराव आढळराव पाटील हे नवीन नेतृत्व उदयाला आले.

मवाळ लोकसभा मतदारसंघामध्ये निम्मा भाग शहरी (पिंपरी, चिंचवड व मावळ ) तर निम्मा भाग ग्रामीण (पनवेल, कर्जत, उरण) असा मतदारसंघ निर्माण झाला असून विशेषत: ग्रामीण हा मतदारसंघ  (पनवेल, कर्जत, उरण) हे रायगड लोकसभा मतदारसंघातील निम्मा भाग आहे. त्यामुळे या मतदारसंगाचे नेतृत्व करणाऱ्याला शहरी हिताबरोबरच कोकणातील

समाविष्ट भागांच्या समस्यांचा विचार करून हितसंबंध जोपासावे लागले यातूनच शिवसेनेचे गजानन बाबर यांच्या सारखे नवीन नेतृत्व या माध्यमातून उदयाला आलेले आहे.

**गृहितक क्र. ६**

**६) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे लोकसभा व विधानसभा पातळीवरील राजकारणात ग्रामीण भागातील मतदारसंघाच्या तुलनेत शहरी भागातील मतदारसंघ जास्त असल्याने शहरी भागातील मतदारसंघ जास्त असल्याने शहरी भागाच्या मतदारसंघाचे वर्चस्व निर्माण होत आहे.**

**ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना**

| | पुनर्रचनेपूर्वी(२००४) | | पुनर्रचनेपूर्वी(२००४) | | |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी | निमशहरी |
| पुणे | १० | ०८ | ०७ | १० | ०४ |
| सातारा | ०५ | ०५ | ०२ | ०४ | – |

पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी ग्रामीण शहरी मतदारसंघाची तुलना करता पुणे जिल्ह्यात ग्रामीण मतदारसंघाची संख्या १० होती तर शहरी मतदारसंघाची संख्या ८ इतकी होती.

पुनर्रचनेनंतर ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलनाकरता पुणे जिल्ह्यात ग्रामीण मतदारसंघाची संख्या ०७ इतकी झाली तर शहरी–१० ते निमशहरी ४ असे प्रमाण राहिलेले आहे.

एकंदरीत पुणे जिल्यामध्ये ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना करता पुनर्रचनेनंतर ग्रामीण मतदारसंघाची संख्या कमी होऊन शहरी मतदारसंघाची संख्या (हवेली या तालुक्यात) वाढलेली आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी ग्रामीण व शहरी मतदारसंघाची संख्या अनुक्रमे ५, ५ इतकी होती. पुनर्रचनेनंतर ग्रामीण २ तर शहरी मतदारसंघाची संख्या ४ इतकी झाली

एकंदरीत सातारा व पुणे जिल्ह्यामध्ये ग्रामीण मतदारसंघाची संख्या कमी होऊन शहरी मतदारसंघाची संख्या वाढलेली दिसून येते.

लोकसंख्या, झोपडपट्टी, स्थलातंर, शहरी अर्थकरण व शहरी स्थानिक संस्था हे पाच घटक शहरी मतदारसंघाचे प्रमुख आधार आहे. १९६० ते १९८० या दरम्यान राज्यात शहरी मतदारसंघ ग्रामीण मतदारसंघापैक्षा संख्येने कमी होती.

वरील आधारामध्ये पुणे शहराचा समावेश होतो त्यातुलनेत सातारा जिल्ह्यात लोकसंख्या हा घटक सोडल्यास इतर घटकांचा परिणाम फारसा जाणवत नाही. सातारा जिल्ह्यामध्ये लोकसंख्येचेप्रमाण ९,३३ तर पुणेजिल्ह्यात ३३.४३ आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्याच्या तुलनेत सातारा जिल्ह्यामध्ये शहरी व ग्रामीण मतदारसंघ कमी राहिलेले आहे. तरीसुद्धा दोन्ही जिल्ह्यामध्ये शहरी मतदारसंघाचे प्रमाण हे ग्रामीण मतदारसंघापेक्षा जास्त राहिले आहे.

## पुणे व सातारा

## तुलनात्मक अभ्यास

### १) राजकीय पक्षाचा प्रभाव–

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभापातळीवर पुनर्रचनेपूर्वी कॉंग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे प्रभुत्व मतदारसंघावर होते. पुनर्रचनेपूर्वी खेड, बारामती, पुणे असे मतदारसंघ होते. खेड लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे किसनराव बाबरवेले कॉंग्रेसचे विदुरा नवले तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अशोक मोहोळ यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. बारामती मतदारसंघावर राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रभाव राहिलेला आहे तर पुणे शहरासाठी कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला आहे. एकूणच पुनर्रचनेपूर्वी पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंगेस पक्षाचा प्रभाव राहिलेला होता.

पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर पुणे, बारामती, खेड, ऐवजी  पुणे, बारामती, खेड ऐवजी पुणे, बारामती, मावळ, शिरूर असे लोकसभा मतदारसंघ निर्माण झाले. पुणे व बारामती, मावळ, शिरूर असे लोकसभा मतदारसंघ निर्माण झाले. पुणे व बारामती मतदारसंघामध्ये कॉंगेस व राष्ट्रवादी.कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव राहिलेला होता परंतु २०१४ च्या निवडणुकीमध्ये पुणे लोकसभा मतदारसंघामध्ये भाजपने या ठिकाणी सत्ता बदल केलेला आहे तर बारामतीची जागा पुनर्रचनेनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे कायम राहिली नव्याने निर्माण झालेल्या मावळ व शिरूर लोकसभा मतदारसंघावर भाजप व शिवसेना या पक्षाचे वर्चस्व राहिले. या ठिकाणी मावळमध्ये शिवसेनेचे गजाननबाबर तर शिरूरमध्ये शिवाजीराव आढळराव पाटील यांनी विजय संपादन केला एकूणच पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात लोकसभापातळीवर कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाबरोबरच भाजप व शिवसेना यांच्यात सत्तास्पर्धा दिसून आली.

विधानसभा पातळीवर पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव होता. एकूण विधान सभेच्या १८ जागापैकी १२ जागा या काँग्रेस राष्ट्रवादी पक्षाला मिळालेल्या होत्या तर भाजपाला ४ तर शिवसेनेला १ जागा मिळाली होती.

पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात विधानसभा पातळीवर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस बरोबरच भाजपा, शिवसेना, मनसे, अपक्ष, यांनी सुद्धा या मतदारसंघामध्ये शिरकाव करण्यास सुरुवात केली आहे. पुनर्रचनेनंतर विधानसभापातळीवर काँग्रेस ४, राष्ट्रवादी काँग्रेस ७ तर शिवसेना, भाजप प्रत्येकी ३, मनसे १ तर अपक्ष ३ अशा २१ जागांपैकी विजय मिळविला आहे. यावरून विधानसभापतळीवर काँग्रेस–राष्ट्रवादीचा प्रभाव कमी झालेला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर पुनर्रनेपूर्वी सातारा व कराड असे दोन मतदारसंघ होते. या दोन्ही लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचे वर्चस्व होते. सातारा लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व खा.लक्ष्मणराव पाटील करीत होते. तर कराड लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व खा.श्रीनिवास पाटील हे करीत होते.

पुनर्रनेनंतर सातारा जिल्ह्यामध्ये कराड हा लोकसभा मतदारसंघ रद्द झाला सातारा हा एकमेव लोकसभा मतदारसंघ राहिला. पुनर्रचनेनंतर प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसकडून तिकीट मिळालेले श्री. उदयनराजे भोसले विजयी झाले. सातारा लोकसभा मतदारसंघावर पुनर्रचनेनंतरसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव कायम राहिलेला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सातारा जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांची एकत्रित मोट बांधल्यामुळेच सातारा जिल्ह्यामध्ये इतर पक्षांना प्रभाव निर्माण करता आला नाही.

सातारा जिल्ह्यामध्ये विधानसभा पातळीवर पुनर्रचनेपूर्वी विधानसभेचे १० विधानसभा मतदारसंघ होते. पुनर्रचनेनंतर विधान सभेचे ८ मतदारसंघ राहिले त्यापैकी माण व फलटण हे दोन मतदार संग माढा लोकसभा मतदारसंघाला जोडले गेले. राहिलेल्या सहा मतदारसंघावर दक्षिण कराड व माण हा काँग्रेस पक्षाचा तर उर्वरित ६ मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव होता.

### २) राजकीय नेतृत्व–

पुणे जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाचा विचार करता पुनर्रचनेपूर्वी पुणे लोकसभा मतदारसंघाला विठ्ठल गाडगीळ, मोहन धारिया, सुरेश कलमाडी यासारख्या काँग्रेस नेत्यांचे नेतृत्व या मतदारसंघाला लाभलेले होते. खेड लोकसभा मतदारसंघाला शिवसेनेचे किसनराव बाणखेले, काँग्रेसचे विदुरानवले, निवृत्तीशेरकर तर रा.काँग्रेसचे अशोक मोहोळ यांचे नेतृत्व लाभलेले होते. तर बारामती लोकसभा मतदारसंघातून शरद पवार (रा.काँ.) यांचे राष्ट्रीय नेतृत्व लाभलेले होते. एकूणच पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर ज्येष्ठ काँग्रेस नेते व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते यांचे नेतृत्व लाभल्यामुळेच या पक्षांचा प्रभाव या तिन्ही मतदारसंघावर राहिलेला होता.

पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यामध्ये बऱ्याच अंशी नेतृत्वात बदल झालेला आहे. पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा शिरूर व मवाळ तर पुणे व बारामती मतदारसंघकायम राहून खेड लोकसभा मतदारसंघ रद्द झाला. पुणे लोकसभा मतदारसंघामध्ये सुरेश कलमाडी यांना नेतृत्व टिकविता आले नाही. नंतरच्या काळात नेतृत्वात बदल होऊन अनिल शिरोळे यांच्या रूपाने नवीन नेतृत्व पुण्याला लाभले. खेड लोकसभा रद्द झाल्यामुळे येथील नेतृत्वाला शिरूर लोकसभा मतदारसंघाचा आधार घ्यावा लागला. बारामती लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांचे नेतृत्व पुनर्रचनेनंतर सुद्धा कायम टिकून राहिले याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सक्षम नेतृत्व असेल तर पुनर्रचनेचा कोणताही परिणाम नेतृत्वावर होत नाही. हेच यातून सिद्ध होते नव्याने निर्माण झालेल्या मावळ व शिरूर या लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे गजानन बाबर व शिवसेनेचे शिवाजीराव आढळराव पाटील हे नवीन नेतृत्व या मतदारसंघातून उदयाला आले.

पुणे जिल्ह्यामध्ये विधानसभा पातळीवर पुनर्रचनेनंतर २१ विधानसभा मतदारसंघापैकी राज्यपातळीवर नेतृत्व करणाऱ्यामध्ये अजित पवार, रामराजे निंबाळकर, संग्राम थोपटे, विजय शिवतारे, माधुरी मिसाळ यांचे नेतृत्व या जिल्ह्याला लाभलेले आहे.

पुनर्रचनेनंतर जनतादलाचे दादा जाधवराव (पुरंधर ), खेड लोकसभा मतदारसंघाचे नेते (रा.काँ.) अशोक मोहोळ, काँग्रेस बाळासाहेब शिवरकर यांना पराभवाला सामोरे जावे लागले तर चंद्रकांत छाजेड, कमल उल्हास ढोले पाटील यांना राजकीय स्पर्धेतून बाहेर पडावे लागले.

सातारा जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय पातळीवर पुनर्रचनेपूर्वी स्व.यशवंतराव चव्हाण, खा. लक्ष्मणराव पाटील यांचे नेतृत्वाला सीमांचे कुठलेही बंधन नसते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे यशवंतराव चव्हाण यांनी भूषविलेले महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपद, केंद्रामध्ये संरक्षणमंत्री म्हणून भूषविलेले पद यावरून त्यांचे राष्ट्रीय पातळीवरील प्रतिमा तयार झालेली होती.

पुनर्रचनेनंतर कराड लोकसभा मतदारसंघ रद्द झाला. त्यामुळे सातारा जिल्ह्यातून राष्ट्रीय पातळीवर जिल्ह्याचे नेतृत्व म्हणून उदयनराजे भोसले यांचे नेतृत्व लागले.

सातारा जिल्ह्यामध्ये विधानसभा पातळीवर दिपक चव्हाण, मकरंद पाटील यांना विधान सभापातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली. यापूर्वी या जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी डॉ.शलिनीताई पाटील, शशिकांत शिंदे, विक्रमसिंह पाटणकर, विलासकाका उंडाळकर, मदन भोसले, रामराजे निंबाळकर इ. नेत्यांनी सांभाळली होती. पुनर्रचनेनंतर मात्र यातील काही नेत्यांना म्हणजे डॉ.शालिनीताई पाटील, मदन भोसले, शंभुराजे देसाई, यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

**३) ग्रामीण व शहरी मतदारसंघाची तुलना**

पुणे जिल्हामध्ये पुनर्रचनेपूर्वी विधानसभेचे ग्रामीण मतदार संघ १० होते तर शहरी मतदारसंघ ८ होते पर्यायाने ग्रामीण मतदारसंघाची संख्या शहरी मतदारांपेक्षा जास्त प्रमाणात होती. परंतु पुनर्रचनेनंतर मात्र शहरी मतदारांची संख्या वाढल्यामुळे शहरी मतदारसंघाची संख्या वाढली. शहरी मतदारसंघ १० तर निमशहरी ४ तर ग्रामीण मतदारसंघ ७ राहिले. वाढले नागरीकरण, लोकसंख्या यामुळे शहरी मतदारसंघाची संख्या वाढलेली आहे तर ग्रामीण मतदारसंघाची संख्या कमी झाली आहे. यामुळे राज्यपातळीवरील राजकारण हे सुद्धा शहरी मतदारसंघाभोवती फिरत राहिलेले आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी विधानसभेचे ग्रामीण ५ तर शहरी ५ असे समान मतदारसंघ होते. परंतु पुनर्रचनेनंतर मात्र यामध्ये बदल होऊन शहरी मतदारसंघ ४ तर ग्रामीण मतदारसंघ २ राहिले त्यामुळेच एकूणच सातारा जिल्ह्यातील विधानसभा पातळीवरील राजकारण हे शहरी मतदारसंघाभोवती फिरलेले आहे.

एकूणच पुणे व सातारा जिल्ह्याचा शहरी व ग्रामीण मतदारसंघाचा तुलनात्मक आढावा घेतला असता सातारा जिल्ह्याच्या मतदारसंघाचा तुलनात्मक आढावा घेतला असता सातारा

जिल्ह्याच्या तुलनेत पुणे जिल्ह्यामध्ये शहरी मतदारसंघाची संख्या जास्त प्रमाणात वाढलेली दिसते. त्यामानाने सातारा जिल्ह्यात नगण्य स्वरूपात शहरी मतदारसंघाची वाढ झालेली आहे.

**४) राखीव मतदारसंघाची तुलना–**

पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये राखीव मतदारसंघाची तुलना करता पुणे जिल्ह्यात पर्वती हा एकमेव विधानसभा राखीव मतदारसंघ होता परंतु पुनर्रचनेनंतर राखीव मतदारसंघाची संख्या वाढली याचे प्रमुख कारण म्हणजे नवबौद्ध समाजाचा २००२ च्या परिसीमन आयोगाने अनुसूचित जाती गटामध्ये समावेश केला आहे. पूर्वी नवबौद्ध समाजाचा समावेश केला गेला नव्हता त्यामुळे पुणे कॅन्टोन्मेंट व पिंपरी असे नवीन दोन राखीव विधान सभा मतदारसंघानिर्माण झाले.

सातारा जिल्ह्यामध्ये पूर्वीचा माण हा विधानसभा मतदारसंघ राखीव होता. पुनर्रचनेनंतर फलटण हा मतदारसंघ राखीव झाला. पुणे जिल्ह्याच्या तुलनेने सातारा जिल्ह्यातील अनुसूचित जातीची संख्या त्यामानाने कमी असल्याने मतदारसंघ संख्येत वाढ झाली नाही परंतु पुणे जिल्ह्यात ती जास्त असल्याने तेथे एका ऐवजी दोन मतदारसंघ (पुणे कॅन्टोन्मेट व पिंपरी ) राखीव झाले त्यामुळे शहरी भागामध्ये राखीव जागामधून नवीन नेतृत्वाचे प्रमाण जास्त राहिले तर सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातून नेतृत्वाचे प्रमाण कमी राहिलेले आहे.

**६) राजकीय सहभाग–**

पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळीवर राजकीय सहभागाचे प्रमाण ६५%होते तर पुनर्रचनेनंतर ते ७५ % इतके झाले तसेच विधानसभापातळीवर राजकीय सहभागाचे प्रमाण पुनर्रचनेपूर्वी ७५% होते ते पुनर्रचनेनंतर ते ८८% इतके झाले. म्हणजेच लोकसभा व विधान सभापातळीवर पुनर्रचनेनंतर राजकीय सहभागाचे प्रमाण वाढलेले आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी लोकसभा पातळीवर राजकीय सहभागाचे प्रमाण ६०% होते ते पुनर्रचनेनंतर ६५% इतके झाले. विधानसभापातळीवर पुनर्रचनेपूर्वी राजकीय सहभागाचे प्रमाण ६८ % होते. ते पुनर्रचनेनंतर ७७% इतके झाले. एकूणच पुणे व सातारा जिल्ह्यात लोकसभा व विधान सभा पातळीवर राजकीय सहभागाचे प्रमाण वाढलेले आहे.

पुणे व सातारा जिल्ह्याचा राजकीय व सामाजिक तुलनात्मक अभ्यासातून पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये जे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्या प्रश्नांच्या अनुषगांने त्यांचा वेगळा

आढावा या निमित्याने घेतलेला आहे. त्याचा परिणाम पुणे व सातारा जिल्ह्यांच्या मतदारसंघ पुनर्रचनेवर झालेला आहे.

## जात संघटनाचे पक्षनिहाय विभाजन

### मराठा वर्चस्व

महाराष्ट्रातील राजकारणावरील मराठा समाजाचे वर्चस्व ही बाब अभ्यसकांनी अनेकवार पुढे आणली आहे. १९७८ पासून मराठा नेतृत्वात फूट पडून ही मराठा वर्चस्वात फारसा फरक पडला नाही. १९९० च्या दशकात मराठा समाजाचे मतदान ही काँग्रेस, शिवसेना ( व नंतर राष्ट्रवादी काँग्रेस) या पक्षामध्ये विभागले गेले. तसेच अन्य मागास जातींच्या राजकारणाचा उदय झाला या साऱ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील आमदारांच्या सामाजिक वैशिष्ट्याचा विचार केला असता मराठा समाजाने आपले संख्यात्मक बळ कायम ठेवले असल्याचे आढळते.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून (१९६०) झालेल्या नऊ विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या मराठा आमदारांची संख्या १२५ ते १४० दरम्यान आहे. याची सरासरी १३२ आहे. ही टक्केवारी एकूण आमदार संख्येच्या (२८८) ४५ टक्के इतकी आहे. अनुसूचित जातीच्या १८ व अनुसूचित जमातीच्या २२ जागा वेगळ्या तर सर्वसाधारण जागांच्या (२४८) ५४ टक्के आमदार मराठा जातीतील आहेत. ३१ टक्के मराठा लोकसंख्य असलेल्या जातीकडे विधानसभेतील ५० टक्के जागावर नियंत्रण आहे. काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून मराठा आमदार निवडून येत असले तरी कॉग्रेस पक्ष नाजूक व परिस्थितीमध्ये असताना मराठा आमदारांची संख्या बदलली नाही. १९९९ मध्ये काँग्रेस पक्षात फूट पडून शरद पवार गट बाहेर पडला. या निवडणुकीत काँग्रेस यायचे ३० मराठ आमदार व शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ३७ मराठा आमदार निवडून आले. शिवसेना व भाजपचा उदय व वाढ ही मराठा जातीच्या पाठिंब्यामुळे झाली. शिवसेना भाजप युतीकडे अनेक मराठा नेते आकर्षित झालेले दिसतात. १९९०, १९९५, १९९९च्या निवडणुकीत शिवसेर्नाभाजप युतीचे मराठा आमदार अनुक्रमे ३९, ५८ व ५९ इतके होते.

### इतर मागास वर्गीय जाती

महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय ही जाणीव मंडळ आयोगाच्या वादापासून उदयास आली. इतर मागासजातीचे दोन गट आहेत.

१) शेतकरी जाती उदा.माळी, बंजारी, धनगर

२) कारागीर जाती उदा.सुतार, शिंपी, सोनार

या दोन गटांपैकी शेतकरी मागास जाती हा गट प्रभावी आहे कारण त्यांची लोकसंख्या व शेतजमिनीवर असलेली मालकी इतर मागस जाती महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेल्या आहेत. उदा. माळी जात पुणे, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, जळगांव व अकोला जिल्ह्यात, धनगर जात सांगली, सातारा व पुणे जिल्ह्यात आढळते. वंजारी ही मूळात भटकी जमात नाशिक, अहमदनगर व बीड जिल्ह्याच्या काही भागात आढळते. तेली जात विदर्भातील भंडारा, चंद्रपुर व वर्धा जिल्ह्यात आढळते. आग्री व भंडारी हया जाती कोकणात प्रभावी आहेत. लेवा हे जळगांव जिल्ह्यात आढळतात.

१९६२ पासूनच्या निवडणुकांची आकडेवारी पाहिली असता विधानसभेत निवडून येणाऱ्या इतर मागसवर्गीय आमदारांची संख्या सरासरी ३८ आहे. १९७८ ते १९९९ या कालावधीतील इतर मागासवर्गीय आमदारांची संख्या वाढण्याचे कारण म्हणजे मंडल आयोग होय. इतर मागासवर्गीय महाराष्ट्राच्या राजकाराणात महत्त्व वाढले कारण इंदिरा गांधीच्या मराठा विरोधी राजकारणाचा तो एक भाग होता. १९९० नंतर इतर मागास वर्गीय जातीचा पाठिंबा शिवसेनर्भाजपयुतीकडे वळला.

महाराष्ट्रातील १९६२ पासूनच्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या आमदारांचे जातीनुसार व पक्षानुसार विश्लेषण केले असता मराठा जातीच्या आमदारांचे प्रमाण जास्त आहे. मराठा जातीची लोकसंख्या ३१ टक्के असली तरी आमदारांचे प्रमाण ५४ टक्के आहे. याची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतीर्ल

महाराष्ट्र हे भारतातील एकमेव असे राज्य आहे की एका जातीची लोकसंख्या सर्वत्र पसरलेली आहे. काही राज्यांत कर्नाटक, आंध्रप्रदेश व गुजरात राज्यात शेतकरी जातीचे वर्चस्व अर्थव्यवस्थेत व राजकारणात आहे. त्या प्रभावी जाती एकमेकीत राजकीय वर्चस्वासाठी स्पर्धा करतात. कारण एक जात एका भागात तर दुसरी जात दुसऱ्या भागात प्रभावी असते. कोकण व विदर्भात मराठा जातीचा प्रभाव कमी असला तरी तिथे कुणबी जातीचा प्रभाव आहे. कुणबी जात ही मराठा जातीसमुहाचाच एक भाग मानली जाते.

१९९० च्या नंतर महाराष्ट्राचे राजकारण अधिक स्पर्धात्मक बनले असले तरी विविध जात समूह एकाच पक्षात स्थिर झाले आहेत असे झाले नाही. प्रत्येक जाती समुहामध्ये पक्षीय पातळीवर विभाजन झालेले आहे. उदा. स्वातंत्र्यात्तोर काळात मराठा–कुणबी समाजाचे काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून एकीकरण झाले होते. मात्र मंडल आयोगाने प्रथमच या समाजाच्या फुटीला वाट मोकळी करून दिलेली आहे.त्या फुटीचा परिपाक म्हणजेच १९९४–९५ पासून काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना या पक्षात झालेले विभाजन होय. त्यातच १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली आहे. राष्ट्रवादीत सर्वात जास्त मराठा समाजाचे प्रमाण आहे.

१९९९ च्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उदयाने मराठा समाजाच्या मतांचे मोठ्या प्रमाणावर विभाजन झाले आहे. पक्षीय पातळीवर काँग्रेसला मराठा, दलित, आदिवासी व मुस्लीम या समाजघटकांचा पाठिंबा मिळतो. शिवसेना व राष्ट्रवादीला मोठया प्रमाणावर मराठा व ओबीसी समाज घटकांचा पाठिंबा मिळतो २००४ व २००९ च्या निवडणुकीवरून असे स्पष्ट झालेले दिसते. भाजपला ओबीसी समाजाचा व उच्च समाजाचा पाठिंबा मिळताना दिसतो. पक्षीय पातळीवर जरी अशी विभागणी झाली असली असे दिसत असले तरी महाराष्ट्राच्या राजकारणावर बहुसंख्येने मराठा–कुणबी समाजाचे वर्चस्व वाढलेले आहे. त्यामुळे सर्वच पक्षांचे लक्ष हे मराठा व कुणबी या समाजाकडे असते. या प्रयत्नात शिवसेना व राष्ट्रवादीने बऱ्यापैकी यश मिळवलेले आहे.

**तक्ता क्र.१**

**मराठा कुणबी आमदार**

| निवडणुक वर्ष | मराठा | कुणबी | मराठा कुणबी | सर्वसाधारण जागा | एकूण जागा | निवडणुक वर्ष | मराठा | कुणबी | मराठा कुणबी | सर्वसाधारण जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६२ | १७ | – | – | – | ०४ | – | – | ०१ | – | २२ |
| १९६७ | २१ | ०१ | – | ०१ | – | ०४ | ०३ | – | – | ३० |
| १९७२ | २७ | ०१ | – | – | ०१ | ०२ | ०१ | ०१ | – | ३३ |
| १९७८ | २२ | – | – | – | १२ | ०५ | ०२ | ०६ | – | ४७ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८० | २९ | ०१ | – | – | ०१ | ०४ | – | ०२ | – | ३७ |
| १९८५ | ३४ | ०२ | – | – | ०५ | ०४ | – | ०१ | – | ४६ |
| १९९० | १८ | ०८ | – | ११ | ०४ | ०४ | ०२ | ०४ | – | ५१ |
| १९९५ | १३ | ०९ | – | ११ | ०१ | ०३ | ०२ | ०५ | – | ४४ |
| १९९९ | ०९ | ०९ | ०३ | ०९ | – | – | – | – | ०९ | ३९ |
| २००४ | ०९ | ११ | ११ | ११ | – | ०२ | ०१ | – | ०३ | ४८ |

वरील तक्यांवरून असे दिसून येते की १९६२ पासून २००४ पर्यंत झालेल्या निवडणुकांत निवडून आलेल्या मराठा आमदरांची संख्या १२५ ते १४० दरम्यान आहे. याची सरासरी १३२ आहे. ही टक्केवारी एकूण आमदार संख्येच्या (२८८) ४५% इतकी आहे. सर्वसाधारण जागांच्या (२४८) ५४% आमदार मराठा जातीमधील आहे.

**तक्ता क्र. २**

**पक्षनिहाय मराठा व कुणबी आमदार**

| निवडणुक वर्ष | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | शिवसेना | भाजप | शेकाप | जनता पक्ष | कम्युनिस्ट | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६२ | १०९ | – | – | – | – | २७ | – | ०१ |
| १९६७ | १०२ | – | – | ०१ | १० | ०७ | ०२ | ०८ |
| १९७२ | ११५ | – | – | ०१ | ०५ | ०१ | ०२ | ०६ |
| १९७८ | ७२ | – | – | – | ०३ | ३४ | ०२ | १५ |
| १९८० | १०४ | – | – | ०२ | ०४ | १० | ०१ | ०५ |
| १९८५ | १०२ | – | – | ०४ | ०७ | १९ | ०१ | १० |
| १९९० | ७९ | – | २७ | १२ | ०२ | १३ | – | ०७ |
| १९९५ | ४७ | – | ४० | १८ | ०३ | ०४ | – | ०६ |
| १९९९ | ३० | ३७ | ३८ | २१ | – | १० | – | – |
| २००४ | २५ | ३५ | ३७ | १५ | – | – | – | १८ |

वरील तक्यांवरून असे दिसून येते की ३१ % मराठा लोकसंख्या असलेल्या जातीकडे विधान सभेतील ५० % जागांवर नियंत्रण आहे. काँग्रेस पक्षाचा माध्यमातून मराठा आमदार निवडून येत असेल तरी काँग्रेसपक्ष नाजूक परिस्थितीमध्ये असताना मराठा आमदारांची संख्या बदलली आहे.

**तक्ता क्र.३**

**पक्षनिहाय इतर मागासवर्गीय आमदार**

| निवडणुक वर्ष | काँग्रेस | जनसंघ भाजप | राष्ट्रवादी काँग्रेस | शिवसेना | जनता पक्ष | शेकाप | कम्युनिस्ट | अपक्ष | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६२ | १७ | – | – | – | ०४ | – | – | ०१ | – | २२ |
| १९६७ | २१ | ०१ | – | ०१ | – | ०४ | ०३ | – | – | ३० |
| १९७२ | २७ | ०१ | – | – | ०१ | ०२ | ०१ | ०१ | – | ३३ |
| १९७८ | २२ | – | – | – | १२ | ०५ | ०२ | ०६ | – | ४७ |
| १९८० | २९ | ०१ | – | – | ०१ | ०४ | – | ०२ | – | ३७ |
| १९८५ | ३४ | ०२ | – | – | ०५ | ०४ | – | ०१ | – | ४६ |
| १९९० | १८ | ०८ | – | ११ | ०४ | ०४ | ०२ | ०४ | – | ५१ |
| १९९५ | १३ | ०९ | – | ११ | ०१ | ०३ | ०२ | ०५ | – | ४४ |
| १९९९ | ०९ | ०९ | ०३ | ०९ | – | – | – | – | ०९ | ३९ |
| २००४ | ०९ | ११ | ११ | ११ | – | ०२ | ०१ | – | ०३ | ४८ |

वरील तक्त्यांवरून १९६२ पासूनच्या निवडणुक निकालांची आकडेवारी पाहिली असता विधानसभेत निवडणून येणाऱ्या इतर मागसवर्गीय आमदारांची संख्या सरासरी ३८ आहे. १९६२, ६७, ७२ या तीन निवडणुकात निवडून आलेल्या इतर मागसवर्गीय आमदाराचे प्रमाण सर्वसाधारण जागांच्या तुलनेत १२% आहे. १९७८ पासूनच्या ६ विधानसभा निवडणुकांत इतर मागसवर्गीस आमदारांचे प्रमाण १८% इतके आहे. १९७८ नंतर त्यांची संख्या ६ % वाढली आहे.

**पुणे जिल्हा**

**२००४ च्या विधान सभा निवडणुकीत निवडून आलेल्या आमदारांच्या जाती**

| अ.क्र | राजकीय | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | मराठा | १३ |
| २ | मारवाडी | ०१ |
| ३ | माळी | ०२ |
| ४ | ब्राम्हण | ०१ |
| ५ | मातंग | ०१ |
| | एकूण– | १८ |

(आधार विविध पक्षीय कार्यकर्त्यांच्या मुलाखतीतून जमावलेली माहिती )

वरील तक्यांवरून २००४ साली निवडून आलेल्या आमदारांच्या जातींचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, मराठा समाजाचे १३ आमदार निवडून आले होते. मारवाडी, माळी, ब्राह्मण निवडून आले होते. मारवाडी, माळी, ब्राम्हण, मातंग या समाजाचे प्रत्येकी एक आमदार निवडणून आला होता मारवाडी समाजाच्या समाजाच्या आमदार काँग्रेसकडून निवडून आला होता. माळी समाजाचा आमदार हे काँग्रेसकडूनच पुणे कॅन्टोन्मेंट या मतदारसंघातून निवडूण आला होता. भाजपाकडून निवडून आलेल्या तीन आमदारांपैकी दोन आमदार मराठा समाजाचे होते. एक ब्राह्मण समाजाचे होते. शिवसेनेकडून निवडून आलेला दोन्ही आमदार हे मराठा समाजाचे होते. अर्थात राखीव जागा वगळता सेना, भाजपा, राष्ट्रवादी या पक्षांकडून मराठा समाजाच्या उमेदवारास उमेदवारी देण्याकडे कल होता.

**पुणे जिल्हा**

**२००९ च्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या आमदारांच्या जाती–**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १. | मराठा | १७ |
| २. | सोनार | ०१ |
| ३. | ब्राह्मण | ०१ |
| ४. | मातंग | ०१ |
| ५. | नवबौद्ध | ०१ |
| ६. | एकूण जागा | २१ |

(आधार – विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती)

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये पुणे जिल्ह्यातील मतदारसंघातून निवडणून आलेल्या आमदारांच्या जातीतून २१ पैकी १७ मतदारसंघातून मराठा समाजाचे आमदार निवडून आले होते. ब्राह्मण, सोनार, मातंग आणि नवबौद्ध समाजाचे प्रत्येकी एक आमदार निवडून आला होता. मतदारसंघ पुनर्रचना आयोगाने केलेल्या मतदारसंघ पुनर्रचनेत दोन मतदारसंघ राखीव झाले आहेत. खुल्या जागेवरून केवळ एक ब्राह्मण आणि एक सोनार आमदार निवडून आले होते. हे दोन्ही आमदार हे शहरी भागातील कसबापेठ आणि पर्वती या मतदारसंघातून भाजपाकडून निवडून आले होते.

सातारा जिल्हा

**२००४ च्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या आमदारांच्या जाती–**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १. | मराठा | ०८ |
| २. | नवबौद्ध | ०१ |
| ३. | ब्राह्मण | ०१ |
| | एकूण जागा | १० |

वरील तक्त्यावरून २००४ साली निवडून आलेल्या आमदारांच्या जातींचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, मराठा समाजाचे ०८ आमदार निवडून आले होते. नवबौद्ध, ब्राम्हण या समाजाचे प्रत्येकी एक आमदार निवडून आले होते मराठा समाजाच्या (आमदारापैकी ६ आमदार राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडून आले १ आमदार काँग्रेसकडून तर १ आमदार शिवसेनेकडून निवडून आला.

**२००९ च्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या आमदारांच्या जाती–**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १. | मराठा | ५ |
| २. | माळी | ०० |

वरील तक्त्यावरून २००९ साली निवडून आलेल्या आमदारांच्या जातींचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, मराठा समाजाचे ०५ आमदार निवडून आले होते. माळी समाजाचा १ आमदार निवडून आला होता. मराठा समाजाच्या ५ आमदारापैकी ३ आमदार

राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडून आले १ आमदार काँग्रेसकडून तर १ आमदार अपक्ष म्हणून निवडून आला होता.

एकंदरित पुणे व सातारा जिल्ह्यातील २००४ ते २००९ मध्ये विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या आमदारांच्या जातीचा आढावा घेतला असता असे दिसते की, सातारा जिल्ह्याच्या तुलनेत पुणे जिल्ह्यामध्ये मराठा समाजाच्या आमदारांची संख्या जास्त राहिलेली आहे. एकूणच पुणे व सातारा जिल्ह्याच्या विधानसभा पातळीवरील राजकारणावर मराठा जातीचे वर्चस्व कायम राहिलेले आहे.

**विधानसभा निवडणुकीच्या राजकारणात प्रस्थापित नेतृत्वाला प्राधान्य –**

विधानसभा निवडणुकीत १९९० पासून अनेक मतदारसंघात विविध पक्षाकडून कोणत्या जातीची लोकसंख्या त्या मतदारसंघात जास्त आहे. अशाच जातीच्या नेतृत्वाला उमदेवारी देताना प्राधान्य दिलेले दिसून येते. राजकीय पक्षांचा पाठिंबा इतर समाजघटकांना मिळत नसल्याने नेतृत्व पुढे येत नाही. ग्रामीण भागात प्रस्थापित असणाऱ्या मराठा समाजाला उमेदवारीमध्ये प्राधान्य दिलेले दिसून येते. शहरी भागात काहीसे आर्थिक स्थिती आणि अन्य जातीच्या जोरावर ब्राह्मण, मारवाडी समाजाला उमेदवारी देण्याचे उदाहरणे पुढे आलेले दिसून येतात. उदा. काँग्रेसकडून चंद्रकांत छाजेड, भाजपाकडून गिरीश बापट, अण्णा जोशी, प्रदिप रावत अशा काही मराठेतर समाजाचा अपवाद वगळता र्स्व उमदेवारी ही मराठा समाजाकडे राहिलेली दिसून येते. हडपसर परिसरात माळी समाजाचे प्रमाण जास्त असल्यान बाळासाहेब श्विरकर यांना उमदेवारी काँग्रेसकडून वारंवार मिळत राहिलेली होती.

प्रत्येक मतदारसंघात असे दिसून येते की, तालुका पातळीवर नेतृत्व हे प्रस्थापित समाजाकडून पुढे आले आहे. पण जिल्हा पातळीवर नेतृत्वाच्या पाठिंब्याने ओबीसीतील माळी आणि धनगर समाजाचे नेतृत्वदेखील पुढे आलेले दिसून येते. उदा. पुरंधर मतदारसंघ दिगंबर दुर्गाडे यांचे माळी समाजातील नेतृत्व अजित पवार यांनी पुढे आणले होते. हडपसर या परिसरातून महादेव शिवरकर यांचे नेतृत्व प्रथम शरद पवार यांनी पुढे आणले होते.

सातारा जिल्ह्यामध्ये पक्षीय राजकारण जात वास्तवाशी जोडलेले पाहायला मिळते. सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा व विधानसभा पातळीवर मराठा समाजाचे वर्चस्व राहिलेले आहे. सातारा जिल्ह्यातील दलित व मुस्लिम समाज पारंपारिकदृष्ट्या काँग्रेसच्या स्थापनेनंतर दलित व

मुस्लिम समाजाचा पाठिंबा काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विभागलेला दिसून येतो. सातारा जिल्ह्यातील धनगर समाजाचा पाठिंबा शिवसेनेला राहिलेला आहे. तसेच धनगर समाज हा समता परिषद व यशवंत सेनेच्या माध्यमातून संघटित होत आहे. सातार जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने भोसले, पाटील चव्हाण अशा मराठा नेत्यांची नावे सातारा जिल्ह्याच्या राजकारणात अग्रस्थानी राहिलेले आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यातून मराठा जातीचे नेतृत्व कायम पुढे राहिलेले दिसून येते.

**हिंदुत्वाचे राजकारण–**

**हिंदूत्वाच्या राजकारणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी–**

भारतात हिंदुत्वाची संकल्पना सविस्तरपणे मांडण्याचे कार्य प्रथम महर्षी स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद श्री अरविंद आणि वि.दा.सावरकर या महापु षांनी केलेले दिसते. तसेच हिंदूत्वाचे तत्वज्ञान जगाला सांगण्याचे आणि पटवून देण्याचे कार्यही हया महापुरूषांनी केले आहे. त्यांच्या कार्याचा एक भाग म्हणून स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना १८७५ मध्ये मुंबई येथे केली. त्यानंतर १९०९ मध्ये हिंदुसभा, १९१५ मध्ये हिंदूमहासभा १९२१–२२ मध्ये हिंदू संघटन या हिंदुत्वावादी संघटनांची स्थापना करण्यात आली. भारतात प्रथम ' हिंदूत्व'या संकल्पनेला जनमाणसात पोहचविण्याचे आणि हिंदूत्वाचा प्रखर आक्रमकपणा निर्माण करण्याचे कार्य प्रथम स्वामी दयानंद सरस्वती यांनी आणि त्यांच्या आर्य समाजाने केल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राच्या राजकारणात १९८४ मध्ये भाजप–शिवसेना युती अस्तित्वात आल्यानंतर हिंदुत्वाचे राजकारण व्यापक बनल्याचे दिसून येते. यापूर्वीही शिवसेनेने 'हिंदुत्व हा मुद्दा आक्रमकपणे उपयोगात आणला होता. पण तो मर्यादित स्वरूपात होता. पुढे शिवसेनेने १९८७ पासून हिंदूत्वाच्या राजकारणाला खऱ्या अर्थाने सुरुवात केल्याचे दिसून येते. मराठी माणसाच्या प्रश्नाइतकेच महत्त्व शिवसेनेने हिंदुत्वाच्या मुद्दयाला देऊन हिंदुत्वाच्या राजकारणाला प्रारंभ केला होता. असे दिसून येते. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात हिंदुत्वाच्या मुद्दयाला महत्त्व देऊन नव्या राजकारणाला सुरुवात केली. बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या प्रश्नासाठी सर्व हिंदूनी शिवसेनेच्या मागे उभे रहावे असे भावनिक आवाहन केले होते. या आवाहनाला विलेपार्ले विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन

सुरेश प्रभू यांना निवडून दिले होते. महाराष्ट्राच्या राजकारणात प्रथमच 'हिंदुत्व' हा मुद्दा घेऊन विधानसभेचा आमदार विजयी झाला होता असे दिसते. या निवडणुकीत शिवसेनेने जहाल आणि कडवा हिंदुत्वाचा प्रचार आणि प्रसार केला.

भारतीय राजकारणात खऱ्या अर्थाने १९८० नंतरच धार्मिक विषयास अनुसरून राजकारणात अथिक महत्त्व प्राप्त झालेले दिसते. राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदु परिषद, बजरंग दल, जनसंघ, भाजप आणि हिंदुत्वावादी संघटना व राजकीय पक्ष तर महाराष्ट्रात शिवसेना यांनी हिंदुत्व या भावनिक अस्मितेला राजकारणात महत्त्व देऊन राजकीय प्रक्रियेला सुरुवात केली.

महाराष्ट्रात काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची लोकशाही आघाडी आणि शिवसेना भाजप पक्षाची युती या दोन प्रमुख आघाडया महाराष्ट्राच्या राजकारणात राजकीयदृष्ट्या प्रबळ आहेत. असे दिसते. १९९५ च्या काळात युतीमध्ये जो आक्रमकपणा होता तो नंतरच्या काळात कमी होत गेल्याचे दिसून येते. अयोध्येतील राममंदिर, घटनेतील ३७० कलम, समान नागरी कायदा हे मुद्दे युतीने सोयीस्करपण मागे टाकल्याने हिंदू जनतेची युतीवर असलेली विश्वासार्हता कमी झाल्याचे दिसते. युतीची हिंदुत्वाची असलेली पूर्वीची प्रतिमासुद्धा कमी झाल्याचे दिसून येते. १९९९ मध्ये केंद्रा काँग्रेस आघाडीला सरकार स्थापन करता आले नाही. १९९९ मध्ये काँग्रेस पक्षातून शरद पवार बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रवादी काँगेस पक्षाची स्थापना केली. निवडणुकीनंतर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात समझोता होऊन आघाडी स्थापन झाली. जातीयवादी, धर्मवादी, हिंदुत्व, धर्मनिरपेक्षतेला विरोध करणाऱ्या युतीला सत्तेपासून दूर ठेवण्यात काँग्रेस आघाडीला यश आले काँग्रेस आघाडीमुळे आणि युतीच्या बदलत्या भूमिकेमुळे महाराष्ट्रात १९९९, २००४ आणि २००९ च्या विधानसभा निवडणुकीत युतीला महाराष्ट्रात अपयशाला तोंड द्यावे लागल्याचे दिसते.

धर्मनिरपक्षतेच्या नावाखाली काँग्रेस पक्षाने भारतात केलेल्या राजकारणामुळे हिंदुत्ववादी शक्ती राजकारणात उतराण्यास सुरूवात झाली. हिंदुत्ववादी राजकीय पक्ष आणि संघटनानी काँग्रेस पक्षाला पर्याय देण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस पक्ष कसा मुस्लिम धार्जिणा आणि हिंदुत्वाच्या विरुद्ध आहे. हे जनतेला पटवून देण्यात हिंदुत्ववादी शिवसेना भाजप युतीला काही प्रमाणात यश आल्याचे दिसते. त्याचा परिणाम म्हणून १९९६, १९९८ आणि १९९९ मध्ये

भाजप शिवसेना युतीला केंद्रात आणि १९९५ मध्ये महाराष्ट्रासह इतर राज्यांतही सरकारे स्थापन केली होती असे दिसते.

हिंदुत्वाचे राजकारण राष्ट्रीय स्तरावर भाजपने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि इतर हिंदुत्ववादी संघटनांच्या सहकार्याने केले तर महाराष्ट्रात शिवसेनेच्या पाठिंब्याने केले. युतीने हिंदुत्वाचे राजकारण करून राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकारणाला धार्मिक प्रतीके, अस्मिता महापुरुष, धार्मिक तीर्थक्षेत्र आणि स्थळे, यांना राजकीय लाभासाठी महत्त्व प्राप्त करून देऊन त्याचा राजकारणासाठी उपयोग केला असे म्हणत येईल

पुणे जिल्ह्यामध्ये वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून MIDC, ITI निर्माण झालेले आहेत. पुणे जिल्ह्याचा विस्तार झालेला आहे. शहरीकरण वाढलेले आहे. औद्योगिकरणाचा विकासा झालेला आहे त्यामुळे शहरी भागामध्ये भाजप व शिवसेनेचा प्रभाव राहिलेला आहे

सातारा जिल्ह्यामध्ये MIDC, ITI निर्माण करण्यासाठी अनुकूल असे स्वरूपाचे वातावरण नाही त्यामुळे सातारा जिल्ह्यामध्ये पुणे जिल्ह्याप्रमाणे भाजप शिवसेनेचा प्रभाव नाही. त्यामुळे भाजप शिवसेनेचे हिंदुत्व हे शहरी भागापुरतेच मर्यादीत राहिलेले आहे. सातारा जिल्ह्यामध्ये २०१९ पर्यत हिंदुत्वाचे वारे थोपवून धरलेले आहे.

**जलसिंचन**

**महाराष्ट्रातील भौगोलिक रचना व जलसिंचनाची स्थिती**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्र राज्याची भौगोलिक स्थान हे उत्तर अक्षांश १५.४५ ते २२.०० आणि रेखांश ७२.४५ ते ८०.४५ दरम्यान वसलेले आहे. राज्याला ७२० कि.मी.चा किनारपट्टी लाभलेली आहे. सध्या महाराष्ट्रात ३५ जिल्हे, ३५७, तालुके व २६१६ खेडी आहेत. राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३०७७१३ चौ.कि.मी. असून तो भारताच्या एकून क्षेत्रफळापैकी ९.३६ टक्के आहे. म्हणजेच महाराष्ट्राचा भारतात भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसरा क्रमांक लागतो महाराष्ट्रात पीक लागवडीखालील निव्वळ क्षेत्रफळ १७६१हजार हेक्टर असून ते भारताच्या निव्वळ लागवडीखालील क्षेत्रफळापैकी १२.५ टक्के आहे. महाराष्ट्राच्या एकुण क्षेत्रफळापैकी ५७.३४ टक्के आहे. महाराष्ट्रात जमिनीखालील क्षेत्रफळ ३९५२ हजर हेक्टर असून एकूण लागवडीखालील क्षेत्रफळापैकी ९२२५हजार हेक्टर १७.५४

टक्के तर देशाच्या ५ टक्के आहे.

**पुणे जिल्हा – सिंचन**

सन २००१–०२ च्या वर्षाच्या अंतिम आकडेवारीनुसार जिल्ह्यात निव्वळ ओलिताखालील क्षेत्र अनुक्रमे २६९९०१ हेक्टर होते. ते जिल्ह्यातील एकूण पिकाखालील क्षेत्राच्या २४ टक्के आहे. इंदापूर, बारामती, जुन्नर, शिरूर व दौंड तालुक्यामध्ये निव्वळ ओलिता खालील क्षेत्र निव्वळ पोक घेतलेल्या क्षेत्राच्या अनुक्रमे उदा., २८%, ३१%,२४% व ३५ % होते. उरलेल्या तालुक्यात सदर टक्केवारी जिल्हा टक्के कोटीपेक्षा कमी आहे.

**सातारा जिल्हा – सिंचन**

वीर, कन्हेर व धोम पूर्ण झालेले व सिंचनाचा लाभ चालू असलेले जिल्हातील ७ मोठे जलसिंचन प्रकल्प आहेत.या प्रकल्पांकडे १.७७ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. याशिवाय ८ मध्यम प्रकल्प पूर्ण झाले असून सुरू असलेले २ प्रकल्प असे १० प्रकल्पापासून १३ हजार हेक्टर क्षेत्रासाठी जलसिंचन सुविधा उपलब्ध आहे.

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध प्रकल्पाच्या माध्यमातून कालवे काढून सिंचनाची सुविधा निर्माण केलेली आहे. त्यावर आल्याचे पीक येते. सहकार क्षेत्र यामूळेच पुणे जिल्ह्यात वाढले आहे. परंतु ज्या ठिकाणी धरणे आहेत त्या ठिकाणचे धरणग्रस्त व कोरड वाहू शेतकरी पाण्यापासून वंचित आहेत. त्यासाठी नेतृत्वाकडून कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाही. त्याऐवजी आपणच दीर्घकाळ सत्तेमध्ये कसे राहू यासाठी त्यांच्यामध्ये पक्षांतर्गत व विरोधी पक्षामध्ये स्पर्धा असलेली दिसते.

सातारा जिल्ह्यामध्ये मोठे सिंचन प्रकल्प रखडलेले आहेत. त्यामध्ये उरमोडी, तारळी, धोम–बलकवडी, कुडाळी, मोरणा–गुरेघर इत्यादी प्रकल्पाचा समावेश आहे. काही प्रकल्पाची कामे पूर्ण झाली असून प्रकल्पांच्या पुनर्वसनाची कामे मोठया प्रमाणावर अपूर्ण आहेत. या रखडलेल्या प्रकल्पासाठी राज्याकडून निधी मिळाला असला तरी निम्मा निधी रखडलेल्या प्रकल्पावर खर्च केला जाणार आहे.

**पाणी प्रश्न –**

सातारा जिल्ह्यामध्ये मोठ–मोठी धरणे तसेच कालवे असून सुद्धा सातारा जिल्ह्याला काही भागांमध्ये या धरणे, कालव्यांचा प्रकल्पांचा लाभ अजूनपर्यंत मिळू शकला नाही. काही

सिंचनप्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे काही लोकांना जवळ पाणी असूनसुद्धा त्याचा फायदा होत नाही.

सातारा जिल्ह्यामध्ये माण–खटाव हा भाग कायम दुष्काळी आहे. या भागामध्ये जमिनी भरपूर आहेत. शेती भरपूर आहेत. परंतु पाण्याची सुविधा नसल्यामुळे अशा प्रकारच्या मोठ्या शेतीतून उत्पन्न काढता येऊ शकत नाही. त्यामुळे या भागातील लोकांना पावसाच्या लहरीपणावर शेती करावी लागते. परंतु ज्या ठिकाणी साताऱ्याच्या इतर भागात पाण्याची उपलब्धता आहे. त्या ठिकाणाहून म्हणजेच धरण्याच्या माध्यमातून कालव्यांच्या माध्यमातून हे पाणी या दुष्काळी भागाला मिळणे गरजेचे आहे.

माण–खटाव मतदारसंघातील नेते मंडळींनी या संदर्भात ठोस अशी उपाययोजना आजपर्यंत केलेली दिसून येत नाही. त्यामुळे आतापर्यंत पाण्याचा प्रश्न कायम राहिलेला आहे. परंतु पुनर्रचनेनंतर या माण–खटाव मतदारसंघाचे नेतृत्व करणारे काँग्रेसचे जयकुमार गोरे यांनी पाणीप्रश्नांच्या संदर्भात पुढाकार घेऊन उरमोडी धरणाचे पाणी माण–खटावला आणण्याच्यादृष्टिने प्रयत्न केलेले आहेत. त्याचबरोबर निरा देवधर धरणांच्या पाण्याचा लाभ खंडाळा, फलटण, माळशिरस या भागांना होणे अपेक्षित होते. परंतु या पाण्याचा फायदा या भागांना न होता हे पाणी बारामतीला नेलेले दिसून येते. त्यामुळे हा भाग आतापर्यंत कायम कोरडा राहिलेला दिसून येतो. हा भाग माढा लोकसभा मतदारसंघात येतो.

अशा प्रकारे सिंचनाच्या प्रश्नावरून मार्णखटाव तालुक्यांमध्ये नेहमी संघर्ष झालेला दिसून येतो. पाण्याच्या समस्येमुळे त्या तालुक्यातील आर्थिक विकासावर परिणाम झालेला आहे. त्याचबरोबर पुनर्रचनेनंतरसुद्धा या भागातील लोकांच्या पाण्याचा प्रश्न सूटू शकला नाही. मतदारसंघामध्ये पाण्याचे राजकारण केलेले दिसून येते.

**लोकसंख्या वाढ–**

भारतामध्ये आतापर्यंत सन १९५२, १९६३, १९७३ व २००२ या प्रकारे चार परिसीमन आयोग नेमण्यात आले. चौथ्या परिसीमन आयोगाने भारतीय लोकसंख्येच्या सरासरीनुसार सर्व मतदारसंघात समान लोकसंख्या या तत्त्वानुसार मतदारसंघाची पुनर्रचना केलेली नाहीतर राज्यांच्या लोकसंख्येच्या सरासरीनुसार सर्व मतदारसंघात समान लोकसंख्या या तत्त्वानुसार मतदारसंघाची पुनर्रचना केली आहे. म्हणजे परिसीमन आयोगाला राष्ट्रीय

पातळीवर नव्हे तर राज्यातंर्गत बदल करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले त्यामुळे राज्यांमधील जागा कमी जास्त झालेल्या नाहीत. परंतु प्रत्येक राज्याच्या मतदारसंघातील लोकसंख्या मात्र समान राहिली नाही.

पुणे जिल्ह्यामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ९४.२७ लाख असून यामध्ये ४९.४६ लाख पुरुष व ४४.९१ लाख स्त्रिया आहेत. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ३९ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर ६१ टक्के लोकसंख्या नागरी भागात आहे. जिल्ह्याची लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटर मागे ६०३ माणसे एवढी आहे. जिल्ह्यातील २००१–२००२ या दशकातील दशवार्षिक लोकसंख्या वाढीचे प्रमाण ३०.३४ टक्के आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३०.०४ लाख असून २००१ च्या तुलनेत ६.९४ टक्क्यानी लोकसंख्येत वाढ झालेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्ह्याचे क्षेत्रफळ महाराष्ट्र राज्याच्या २.६७ टक्के आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौ.किमी. २८७ व्यक्ती इतकी आहे.

पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यातील एका विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्या तीन लाख ४६ हजार राहिला असे या जिल्ह्यातील प्रमुख सूत्र असल्यामुळे विधानसभेच्या १८ मतदारसंघाऐवजी पुनर्रचनेनंतर विधानसभेचे २१ मतदारसंघ तयार झाले. वाढलेल्या तीन मतदारसंघाची वाढ हवेली तालुक्यात झाली. चिंचवड, पिंपरी, भोसरी, वडगाव शेरी, खडकवासला व हडपसर हे विधान सभेचे मतदारसंघ नव्याने उदयास आले आहेत. एकूणच लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात पुणे जिल्ह्यात शहरी भागामध्ये तीन मतदारसंघाची वाढ झाल्याने मतदारसंघाच्या स्वरूपामध्येही बदल झालेला आहे. या नवीन मतदारसंघातून निर्माण होणारे नेतृत्व, राजकारणाची दिशा यामधून ठरलेली दिसते.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेनंतर विधानसभेचे ८ व लोकसभेचा १ मतदारसंग राहिलेला आहे. पुणे जिल्ह्याच्या तुलनेत सातारा जिल्ह्यामध्ये लोकसंख्यावाढीचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे विधानसभेच्या ८ मतदारसंघापैकी २ मतदारसंघ( माण व फलटण) सातारा जिल्ह्यात असूनसुद्धा प्रत्यक्षात या तालुक्यांाा राजकीय फयदा सोलापूर जिल्ह्यातील माढा लोकसभा मतदारसंघाला झालेला दिसून येतो. त्याचबरोबर हे दोन मतदारसंघ तिकडे गेल्याने

कराड हा लोकसभा मतदारसंघ रद्द करावाला लागला याचा तोटा सातारा जिल्ह्याला झालेला आहे. एकूणच सातारा जिल्ह्यातमुळात लोकसंख्या कमी असताना विधानसभा मतदारसंघाची संख्या वाढणे व त्याबरोबरच जे पूर्वी २ लोकसभा मतदारसंघ होते. त्यामध्ये एकच मतदारसंघ राहणे हे सातारा जिल्ह्याच्या विकासाच्यादृष्टीने घातक असे आहे.

**सत्ता व अधिकार न मिळाल्याने राजकीय असंतोष –**

महाराष्ट्रासंदर्भात मतदारसंघ पुनर्रचना ही अधोरेखित राजकीय क्रांतीच झाली आहे. राजकीय सत्तेचे केंद्रिकरण मुंबई शहर, मुंबई उपनगर, जळगाव, नागपूर, यवतमाळ, लातूर, सोलापूर, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली व कोल्हापूर या बारा जिल्ह्यामधील जुन्या विधानसभा मतदारसंघामध्ये झाले होते. यामध्ये ठाणे व नाशिक जिल्हे नव्याने शिरकाव करणार आहेत. नागपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सत्ता शहरी भागाकडे सरकणार आहे तर जळगांव यवतमाळ, अहमदनगर व सातारा जिल्ह्यातील मतदारसंघांना विकासाच्या मर्यादा पडल्या आहेत. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, धुळे नंदुरबार, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, औरंगाबाद, बीड व उस्मानाबाद या जिल्ह्यामध्ये १९७८ ते २००९ दरम्यान सर्वात कमी मंत्रिपदे मिळाली. त्यामुळे हे जिल्हे सत्ता व अधिकारापासून वंचित होती. सत्ता व अधिकार नसल्यामुळे या जिल्ह्यामध्ये शेती व औद्योगिक क्षेत्राचा विकास झाला नाही. विकासाचा अभाव असल्यामुळे जिल्ह्यामध्ये लोकसंख्येत घट झाली. त्याचा थेट परिणाम होऊन मतदारसंघाची संख्या घटली. ग्रामीण भागातील मतदारसंघातील घट म्हणजे शेतकी हितसंबंधाची भूमिका दुय्यम झाली व शहरी हितसंबंधाची भूमिका दुय्यम झाली. शहरी हितसंबंधाचे महाराष्ट्राचे अर्थकारण व राजकारणावरील नियंत्रण वाढले.

साताऱ्यातील राजघराण्याच्या राजकारणाला मोठा इतिहास आहे. राजघराण्याची राजकारणात पहिला सहभाग उदयनराजे भोसले यांचे वडील प्रतापसिंहराजे भोसले यांच्या रूपाने झाला होता. सातारा नगरपालिकेच्या थेट जनतेतून झालेल्या नगराध्यक्ष पदाच्या निवडीत त्यांनी विजय मिळवला होता. त्यानंतर १९७८ मध्ये अभयसिंहराजे भोसले हे पहिल्यांदाच आमदार म्हणून सातारा विधानसभा मतदारसंघातून जनता पक्षातून निवडून आले होते. त्यानंतर सलग ४० वर्षे एका निवडणुकीचा अपवाद वगळता अभयसिंहराजे आणि त्यांचे

पुत्र शिवेंद्रसिंहराजे यांनी सातारा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. १९७८ ते १९९१ या कालखंडात अभयसिंहराजे यांचे एकतर्फी वर्चस्व सातारा विधानसभा मतदारसंघावर होते. १९९६ च्या निवडणुकीत पहिल्यांदाच काँग्रेसऐवजी शिवसेनेचे हिंदुराव नाईक निंबाळकर निवडून आले. या निवडणुकीत उदयनराजे यांचा जिल्ह्याच्या राजकीय पटलावर उदय झाला. १९९८ मध्ये पुन्हा अभयसिंहराजे भोसले यांनी सातारा लोकसभेची जागा जिंकली. अभयसिंहराजे भोसले व उदयनराजे भोसले यांच्यातील राजकीय संघर्ष अभयसिंहराजेच्या निधनापर्यंत कायम राहिला. त्यानंतर उदयनराजे यांनी २००९ च्या लोकसभेची तर शिवेंद्रसिहराजे यांनी २००४ ला विधानसभेची जागा घेतली.

एकंदरित सातारा व फलटण येथील घराणेशाहीचा विचार केल्यास असे दिसून येते की, अनेक वर्ष सर्वसामान्य कार्यकर्त्यांना नवीन उमेदवारांना सत्तेची दारे या घराणेशाहीमुळे उघडली जात नव्हती. परंतु पुनर्रचनेनंतर या घराणे शाहीला हादरा बसलेला आहे. या घराण्याच्या विरोधात इतर पक्षांच्या उमेदवारांनी कंबर कसलेली आहे. त्यामध्ये दिपक पवार, नरेंद्र पाटील, जयकुमार गोरे यांनी सत्तेची दारे खुली होण्यासाठी प्रयत्न केलेले दिसून येतात.

**जिल्हा नेतृत्वाची नव्याने पुनर्रचना**

पुणे जिल्ह्याच्या राजकारणात १९८० नंतर शरद पवार यांचा प्रभाव कायम असल्याचे दिसून येते. परंतु शरद पवार यांच्या प्रभावाखाली जिल्हा पातळीवरील राजकारणात १९७७ पासून अनेक नेतृत्व पुढे आलेले दिसून येते त्यात काँग्रेसचे अण्णासाहेब मगर, रामकृष्ण मगर, विटु रानवले, निवृत्ती शेरकर, अशोक मोहोळ, संभाजी काकडे, शंकरराव पाटील, अजित पवार, मोहन धारिया, विठ्ठलराव गाडगीळ, अनंतराव थोपटे, विठ्ठल तुपे, सुरेश कलमाडी, आढळराव पाटील, गजानन बाबर, भाजपाकडून अण्णा जोशी, प्रदीप रावत, अनिल शिरोळे असे विविध पक्षांकडून नेतृत्व पुढे आलेले दिसते. परंतु या प्रत्येक नेतृत्वाचा प्रभाव हा पूर्ण जिल्हाभर राहिलेला नाही तर लोकसभेच्या मतदारसंघापुरताच राहिलेला दिसून येतो. पण संपूर्ण जिल्हाभर प्रभाव हा शरद पवार यांचा राहिलेला आहे.

पुणे जिल्ह्याच्या राजकारणावर २००९ पर्यंत शरद पवार यांचा प्रभाव राहिलेला आहे. जिल्ह्याच्या नेतृत्वाच्या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार व काँग्रेसचे हर्षवर्धन पाटील यांच्यात स्पर्धा होती. कालांतराने २०१४ च्या निवडणुकीमध्ये पुरंधर विधानसभा

मतदारसंघातून शिवसेनेचे निवडून आलेले विजय शिवतारे यांनीसुद्धा या जिल्हा नेतृत्वाच्या स्पर्धेत उडी घेतलेली पाहायला मिळते. त्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा जसजसा जिल्ह्यावरील प्रभाव कमी झाला तसतसा जिल्ह्याच्या नेतृत्व बदलाच्या हालचाली वाढलेल्या दिसतात.

सातारा जिल्ह्याच्या राजकारणात यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव कायम असल्याचे दिसून येते. सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर त्यांची मजबूत पकड होती. राज्य–राष्ट्रीय स्तरावरील सूत्रे सातारा जिल्ह्यातून हलवली जात होती. त्यामुळे राज्य तसेच देशाच्या राजकारणामध्ये यशवंतराव चव्हाण यांचा एक वेगळा दबदबा तसेच एक वेगळे नेतृत्व की जे फक्त जिल्ह्यापुरते मर्यादित न राहता राज्याचे नेतृत्व करणारी तसेच केंद्रस्तरावर संरक्षणम्री म्हणून महत्त्वाची जबाबदारी पेलणारे व्यक्तिमत्त्व म्हणून यशवंराव चव्हाण यांचेकडे पाहिले जाते यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर अनेकांनी जिल्ह्याचे नेतृत्व केलेले आहे. त्यात प्रतापराव भोसले(काँग्रेस) शिवसेनेचे हिंदुराव नाईक निंबाळकर, अभयसिंहराजे भोसले, लक्ष्मण जगताप इत्यादी नेत्यांनी नेतृत्व केले.

पुनर्रचनेनंतर सातार जिल्ह्याचे नेतृत्वात बदल झाला. भोसले घराण्यातील तेरावे वंशज श्रीमंत उदयनराजे भोसले हे २००९ च्या निवडणुकीत पहिल्यांदा निवडून आले. पुनर्रचनेपूर्वी व नंतरसुद्धा जिल्ह्यावर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव राहिला असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली उदयनराजे भोसले यांच्याकडे जिल्ह्याची सूत्रे आली. त्यामुळे सातारा जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी उदयनराजे भोसले यांचेकडे आली.

मतदारसंघ राखीव व रद्द होण्यामुळे निर्माण झालेला असंतोष

पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेनंतर मतदारसंघ राखीव होणे किंवा रद्द होण्यामुळे प्रस्थापित नेत्यांना त्याचा फटका बसलेला आहे. त्यामधून त्यांचा राजकीय असंतोष दिसून येतो.

पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी पर्वती हा एकच राखीव मतदारसंघ होता. पुनर्रचनेनंतर पुणे जिल्ह्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या शहरी भागात जास्त असल्याने (७ लाख टन हजार) पुनर्रचनेत पुणे कॅन्टोन्मेंट व पिंपरी हे दोन नवीन विधानसभा मतदारसंघ राखीव झाले

पुनर्रचनेनंतर पर्वती हा मतदारसंघ सर्वसाधारण झाल्याने या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे रमेश बागवे यांना पुणे कॅन्टोन्मेट मतदारसंघातून उभे राहावे लागले तर पुणे कॅन्टोन्मेट

मतदारसंघाचे नेतृत्व करणारे काँग्रेसचे बाळासाहेब शिवरकर यांना नवीन हडपसर विधानसभा मतदारसंघाचा आधार घ्यावा लागला. त्यामुळे मतदारसंघ राखीव झाल्याने प्रस्थापित नेतृत्वामध्ये असंतोष निर्माण झालेला दिसून येतो.

पुणे जिल्ह्यामध्ये लोकसभा पातळीवर पुनर्रचनेनंतर खेड लोकसभा रद्द झाला त्यामुळे या मतदारसंघातून निवडून येणारे अशोक मोहोळ यांचे राजकीय भवितव्य अंधातरी झाले खेडचा ५० टक्के भाग शिरूर लोकसभेला जोडलेला आहे. या मतदारसंघातून अशोक मोहोळ यांना पराभव पत्करावा लागला.

पुणे जिल्ह्यातील विधानसभा पातळीवर पुनर्रचनेनंतर काही विधानसभा मतदारसंघ(मुळशी, हवेली, भवानी पेठ) रद्द करण्यात आले त्यामुळे मुळशी मतदारसंघाचे नेतृत्व करणारे शरद ढमाले यांना भोर विधानसभा मतदारसंघाचा आधार घ्यावा लागला. हवेली विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करणारे विलास लांडे यांना भोसरी विधानसभा मतदारसंघाचा आधार घ्यावा लागला. त्याचबरोबर मतदारसंघ रद्द झाल्याने कमल ढोले पाटील, चंद्रकांत छाजेड यांना राजकीय स्पर्धेतून बाहेर पडावे लागले.

सातारा जिल्ह्यामध्येसुद्धा मतदारसंघ राखीव व रद्द झाल्याने प्रस्थापित नेतृत्वाला त्याचा फटका बसलेला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेपूर्वी माण हा राखीव मतदारसंघ होता. परंतु पुनर्रचनेनंतर हा मतदारसंघ सर्वसाधारा झाला तर फलटण हा मतदारसंघ राखीव झाला. हा मतदारसंघ राखीव झाल्याने या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांना राखीव मतदारसंघाचा फटका बसला व त्यांचे राजकीय पुनर्वसन करावे लागते.

सातारा जिल्ह्यातील विधानसभा पातळीवर पुनर्रचनेनंतर जावळी, खटाव हे मतदारसंघ रद्द झाल्याने जावळी मतदारसंघाचे नेतृत्व करणारे शशिकांत शिंदे यांना तर खटावचे दिलीप येळगावकर यांना या पुनर्रचनेचा फटका बसला. शशिकांत शिंदे यांना कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचा आधार घ्यावा लागला.

सातारा जिल्ह्यातील लोकसभा पातळीवर पुनर्रचनेनंतर कराड हा लोकसभा मतदारसंघ रद्द झाल्याने या मतदारसंघाचे नेतृत्व करणारे खासदार श्रीनिवास पाटील यांचे राजकीय

पुनर्वसन करावे लागले. त्याचबरोबर लोकसभेचा एक मतदारसंघ रद्द झाल्याने सातारा जिल्ह्याच्या विकासावर त्याचा परिणाम झालेला आहे.

एकंदरीत पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये लोकसभा व विधानसभा पातळीवर मतदारसंघ राखीव झाल्यामुळे किंवा मतदारसंघ रद्द झाल्यामुळे त्या मतदारसंघातील सत्ता समीकरणे बदलली आहेत काही नेत्यांना दुसऱ्या मतदारसंघाचा आधार घ्यावा लागला. काही नेत्यांना पक्षांतर करावे लागले. काही नेत्यांना या राजकीय प्रकियेतून बाहेर पडावे लागले. म्हणजेच मतदारसंघ पुनर्रचनेमुळे काही नेत्यांना त्याचा फायदा झाला तर काहींना त्याचा फटका बसलेला आहे. त्यामुळे प्रस्थापित नेतृत्व नष्ट होऊन त्याठिकाणी नवीन नेतृत्वाचा उदय झालेला दिसून येतो. अशा प्रकारचे नवीन नेतृत्व लोकसभा, विधानसभा व स्थानिक पातळीवरील राजकारणात उदयास आलेले दिसते. त्याचबरोबर काही मतदारसंघ नव्याने राखीव झाल्याने त्याठिकाणी नवीन नेतृत्व उदयास आलेले दिसते. एकूण मतदारसंघ राखीव किंवा रद्द झाल्यामुळे त्या मतदारसंघाचे राजकारण पूर्ण बदलले दिसते.

**वाढते शहरीकरण**

शहरीकरण म्हणजे शहराच्या लोकसंख्येची व त्याच्या क्षेत्राची वाढ. वाढते औद्योगिकरण व खेड्यातून शहराकडे होणरे स्थलांतर यांचासुद्धा शहरीकरणामध्ये समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार ३०.१६ टक्के लोकसंख्या शहरामध्ये राहते. २०१२–१३ सालच्या पाहणीनुसार महाराष्ट्राच्या शहरीकरणाची टक्केवारी ४५.२० टक्के होती ती २०३० पर्यंत ५८ टक्के होण्याची शक्यता आहे.

शहरीकरणामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारतो. मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. त्याचबरोबर आजूबाजूच्या खेड्यांच्यासुद्धा विकास होत असतो. परंतु विकासाबरोबर शहरीकरणाची काळी बाजुसुद्धा ठळकपणे दिसून येते. शहरीकरणामुळे शहरातील सोयी सुविधावर मोठ्या प्रमाणावर ताण वाढतो.

शहरीकरणामुळे राजकीय दृष्टिकोनावर सुद्धा परिणाम होण्याची शक्यता आहे. शहरात राहणाऱ्या मतदारांची संख्या खेडयातील मतदारांच्या संख्येपेक्षा जास्त झाल्यामुळे राजकारण्यांना शहर विकासावर जास्त भर द्यावा लागेल.

पुणे जिल्ह्यामध्ये पुनर्रचनेनंतर लोकसभा पातळीवर लोकसभेचे ३ ऐवजी ४ लोकसभा मतदारसंघ झाले. जे नवीन मतदारसंघ निर्माण झाले (शिरूर व मावळ) हे दोन्ही निमशहरी स्वरूपाचे आहेत. म्हणजेच शहरी लोकसंख्या जास्त आहे. त्याचप्रमाणे विधानसभा पातळीवर पुणे जिल्ह्यात नवीन ३ विधानसभा मतदारसंघाची जी वाढ झालेली आहे. ती शहरी भागात झालेली आहे. पर्यायाने शहरात राहणाऱ्या मतदारांची संख्या जास्त प्रमाणात वाढलेली आहे.

पुणे जिल्ह्याच्या तुलनेत सातारा जिल्ह्यात शहरीकरणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. याचे कारण म्हणजे पुणे जिल्ह्याच्या तुलनेत सातारा जिल्ह्यात लोकसंख्येच प्रमाण कमी आहे त्याचबरोबर औद्योगिकरणामध्येही वाढ झालेली नाही परिणामी सातारा जिल्ह्यात पुणे जिल्ह्याच्या तुलनेत जास्त शहरीकरण झालेले जाणवत नाही.

**लोकांचे स्थलांतर –**

भारतासारख्या लोकशाही प्रधान शासनप्रणाली असणाऱ्या देशात लोकांना हवे तिथे राहण्याची व हव्या त्या प्रांतात काम करण्याचे स्वातंफ्र्य आहे सर्वसाधारणपणे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती ही सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय घटकांनी प्रभावित असते.

आधुनिक काळात वाहतूक व दळणवळणाच्या क्षेत्रातील क्रांतीमुळे जग पुष्कळच लहान झाले आहे. देशातल्या देशात स्थलांतर करणाऱ्या व्यक्तींची संख्याही खूप वाढत आहे. विकसनशील देशामध्ये ग्रामीण खूप वाढत आहे. होणारे स्थलांतर हा आर्थिक विकासाच्या प्रकियेतील एक महत्वाचा भाग झाला आहे.

स्थलांतर ही एक अशी घटना आहे की ज्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. भारतामध्ये श्रमिकांची स्थिती, नैसर्गिक आपत्ती, बेकारी, दारिद्र्य इत्यादीमुळे हलाखीची बनली आहे. म्हणून आपल्या उदरनिर्वाहासाठी शहरी भागाकडे किंवा काम उपलब्ध असणाऱ्या ठिकाणी त्यांना स्थलांतर करावे लागते.

जमिनीवर वाढत्या लोकसंख्येचा बोजा, वाढती संधी, शहरी जीवनाचे आकर्षण ही या स्थलांतराची काही महत्त्वाची कारणे आहेत. राज्यांतील स्थलांतर आणि बेरोजगारी २००१–११

| राज्य लोकसंख्या प्रत्यक्ष वाढ | लोकसंख्या नैसर्गिक वाढ | स्थलांतर | शहरी बेरोजगारी | राज्य लोकसंख्या प्रत्यक्ष वाढ |
|---|---|---|---|---|
| तामिळनाडू | १५.६ | ८.५ | ७.१ | ३.२ |
| महाराष्ट्र | १६.० | १०.४ | ५.६ | ३.२ |
| करियाणा | २०.० | १५.३ | ४.७ | २.५ |
| गुजरात | १९.२ | १४.६ | ४.६ | १.८ |
| पंजाब | १३.७ | ९.४ | ४.३ | ४.८ |
| कर्नाटक | १५.७ | ११.७ | ४.० | २.७ |
| प.बंगाल | १३.९ | १०.१ | ३.८ | ४.० |
| केरळ | ४.९ | ८.२ | ३.३ | ७.३ |

सातारा जिल्ह्यातील माणसासरख्या तालुक्यासारख्या तालुक्यातील दुष्काळी पट्टयातील लोकांना मात्र स्थलांतराचा शाप मिळाला आहे. दुष्काळी पट्ट्यात माळरानाच्या जमिनी भरपूर आहेत. अनेकांना भरपूर शेती असली तरी उत्पन्न शून्य आहे. स्थलांतरामुळे आरोग्य, शिक्षण अशा अनेक गोष्टींवर परिणाम होत आहे. शिवाय या ठिकाणी इतर व्यवसायासाठी कोणताही वाव नाही त्यामुळे उदरनिर्वाहाकरिता स्थलांतराशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नाही. पारंपरिक व्यवसाय, शेळी, मेंढी पालनासाठी मुंबई, वसई या भागात मातीकाम करण्यासाठी हैद्राबाद, बेंगलोर या ठिकाणी रंगकाम करण्यासाठी कोल्हापूर, सांगलीसह अनेक साखर कारखान्याच्या पट्टयात ऊस तोडणी करण्यासाठी लहान मोठ्या नोकऱ्या व व्यवसाय करण्यासाठी आसपासच्या जिल्ह्यात चालणाऱ्या वीटभट्टीवर मजूरी करण्यासाठी सिंचनाखाली असलेल्या भागात शेतमजुरी करण्यासाठी अशा अनेक कारणाने या पट्टयातील लोकांचे स्थल
स्थलांतर हे ठरलेले आहे.

## समारोप

आपल्या देशाने लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. आधुनिक लोकशाही ही अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाही आहे. प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये जनतेला आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. मतदारसंघांची पुनर्रचना दर १० वर्षांनी होत असते. बदललेल्या मतदार संघाच्या माध्यमातून मतदारसंघाचे स्वरूप बदलत असते. या बदललेल्या मतदारसंघामुळे त्या मतदारसंघाचे राजकारण बदलते. त्यामुळे या बदललेल्या राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी मी हा संशोधनाचा विषय निवडलेला आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर (१९९० ते २००९) अखेरच्या महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचा विचार करता त्यामध्ये विभागनिहाय पक्षांचा पाठिंब्यातील बदल, विविध जातींचे चार किंवा पाच पक्षांत झालेले विभाजन, शहरी पक्षांची ग्रामीण भागात शिरकावाची मोहीम, ग्रामीण भागात राजकीय अर्थ कारणांवर शहरी राजकीय अर्थकारणाचे नियंत्रण स्थानिक शासन संस्थाच्या निवडणुकीमधील सक्रीय सहभाग या माध्यामातून महाराष्ट्राच्या राजकारणात बदल घेणे म्हणजे महाराष्ट्राचे समकालीन किंवा नवे राजकारण आहे. अशा प्रकारच्या नवीन राजकारणाच्या चौकटीत पुणे व सातारा जिल्ह्यातील मतदारसंघाचा पुनर्रचनेनंतर झालेल्या बदलांचा अभ्यास केलेला आहे.

सातारा जिल्ह्याच्या संदर्भात पुनर्रचनेपूर्वी मतदारसंघाची स्थिती व राजकारण तसेच पुनर्रचनेनंतर बदललेल्या मतदारसंघाची स्थिती व बदललेल्या राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. या बदललेल्या राजकारणाचा अभ्यास करताना जलसिंचन, पाणी प्रश्न समस्यांचा, लोकसंख्या वाढ, राजकीय असंतोष, जातसंघटनांचे विभाजन यासारख्या कारणांचा समावेश होतो. यामुळे मतदारसंघाचे स्वरूप जरी बदलले तरी त्या मतदारसंघातील समस्या सुटू शकल्या नाहीत.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मतदारसंघामध्ये राजकीय, आर्थिक व सामाजिक अशा स्वरूपाचे परिणाम झालेले आहेत. ग्रामीण भागातील आमदार व खासदारांची संख्या घटल्यामुळे निधी कमी झाला. या तुलनेत शहरी भागातील आमदार व खासदारांची संख्या वाढल्यामुळे निधीही वाढला. ग्रामीण भागाच्या विकासाचे धोरण ठराविण्यावर मर्यादा मागे आल्या होत्या. त्यामध्ये शेती, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य इत्यादी क्षेत्रातील धोरण हे शहर केंद्रीत राहिले तर

ग्रामीण भाग म्हणजे मागासलेला असे चित्र निर्माण झाले आहे. मतदारसंघपुनर्रचनेमुळे शहरी भागातील नेतृत्वाने व पक्षाचे नियंत्रण राजकारणावर राहिलेले आहे. तसेच सार्वजनिक धोरण ठरविण्यात शहरी नेत्यांचा पुढाकार राहिलेला असून शहरी धोरणाचा प्रभाव राजकारणावर दिसतो.

ग्रामीण व शहरी भागातील शासकीय यंत्रणांच्या वितरण क्षमतेच्या संकोच झाल्यामुळे असंतोष निर्माण झाला आहे. हा असंतोष प्रत्येक लोकसभा व विधानसभा मतदारसंघात दिसतो या शिवाय सहकारचळवळ, शैक्षणिक संस्था, पाणीवाटप, वीज वितरण, निधीचे विषय वितरण, जिरायत–बागायत शेतीक्षेत्र अशा विविध मुद्दयांवर असंतोष धुमसत आहे.

पुनर्रचेनंतर सामाजिक बदलांचा विचार करता उच्च जाती, मराठा, ओबीसी, अनुसूचित जाती–जमाती व अमराठी हा मतदारसंघाचा आधार एक संघ राहिलेला नाही.सामाजिक आधाराचे पक्षांच्या आधारे राजकीय विभाजन झालेले दिसते.

अशा परिस्थितीत राज्यपुनर्रचना आयोगाचा अभ्यास करताना यासाठी समस्या डोळयासमोर ठेवून पुणे व सातारा जिल्हयातील मतदारसंघाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. पुढील उपाययोजना सुचविण्यात आली आहे. पुढे संशोधनाची दिशा प्राप्त असावी त्याचा उहापोह करण्यात आला आहे.

**उपाययोजना–**

१) दर १० वर्षांनी जनगणेनुसार पुनर्रचना करण्यात यावी.

२) लोकसभेच्या मतदारसंघाच्या भौगोलिक विस्तार जिल्ह्याच्या भौगोलिक सीमेतच मर्यादित असावा.

३) मतदारसंघाची निर्मिती करताना लोकसंख्येबरोबरच भौगोलिक चौ.कि.मी.चा विचार करावा.

४) विधानसभेला मतदारसंघ तहसीलपुरता मर्यादित असावा.

५) अनुसूचित जाती व जमातीचे राखीव मतदारसंघ परिक्रम (रोटेशन) पद्धतीने बदलावेत.

६) परिसीमन आयोगाच्या सदस्यामध्ये राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना स्थान असू नये.

७) लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची संख्या वाढवावी.

**संशोधनाची दिशा**

१) पुढील पुनर्रचनेच्यावेळी आयोगाने परिसीमनाची अमंलबजावणी करताना लोकांशी चर्चा करूनच त्याची अमंलबजावणी करावी.

२) भविष्यकाळात राज्यपुनर्रचना आयोगाच्या संदर्भात मतदारसंघात फेरबदल करताना आमदार व खासदार यांची मते विचारात घेऊन मतदारसंघात फेरबदल करण्यात यावेत.

३) मतदारसंघाच्या पुनर्रचनेचा महाराष्ट्राच्या स्तरावर अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात संशोधन होणे गरजेचे आहे. या पुनर्रचनेचा लोकांवर काय परिणाम होतात. त्यामुळे कोणते प्रश्न समस्या निर्माण होतात. काय बदल घडतात. यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

४) बदललेल्या राजकारणाचा वेगवेगळया कसोटीवर अभ्यास होणे गरजेचे आहे. जेणेकरून पुढच्या राज्यपुनर्रचना आयोग परिसीमन करताना त्यातील त्रुटी लक्षात घेतल्या जातील. राज्यपुनर्रचना आयोगाचे काम अधिक निपक्ष व सदोष होईल.

५) अशाप्रकारच्या विषयाची सखोल चर्चा होणे गरजेची आहे. जेणेकरून शासनालासुद्धा या अभ्यासाची गरज वाटावी. अशा प्रकारचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची

## इंग्रजी संदर्भग्रंथ–


1) Jagtap Harsh L. 1997 Land caste and political power in Maharashtra : A case study of salgaon and Ahumdnagar District, Pune, Ph.D.Thesis Department of POUHCS university of pune.

2) Kashyap Subhash, our parliament (An Introduction of parliament of India) National Book Trust. India 2008.

3) Kothari Rajni, 1970 caste in Indian politics ifyderabad orient Longman.1) Singh C.P., A Century of constituency Delimitation in India. Political Geography-2000

4) Kumar Ashutosh, 2009, Rethinking State politics in India: Regions EPW, VOL. XLIV NO-19, May 9th 2009

5) Lele Jayant 1982, Elite pluralism and class Pule : Political Development in Maharashtra Bombay, Popular prakashan.

6) Mahajan S.G., (2000), “Pune City : It is History, Growth and Development (750 to 1998 A.D.) Mahajan Prakashan Pune.

7) Palshikar Suhas and Nitin Birmal(2003), Maharashtra : Fragmente of Marathas Retain Power, in Paul Wallace and ramashray Roy (ed.), India’s1999 Elections and twentieth century Politis, Ne Dehli, Sage Publiscations.

8) Palshikar Suhas and Rajeshvari Deshpande (2003), Maharashtra challenges before the congress system, Journal of Indian school of political Economy, Vol/ 15 Jan-Jun No. 1 &2

9) Palshikar Suhas and Rajeshwari Deshpande 1999, Maharashtra Electural, competition and structures of Domination occasional paper series 15 Pune. Dept. of Politics and Public Administration University of Pune.

10) Singh C.P., A Century of constituency Delimitation in India. Political Geography-2000

11) Sirsikar V.M., 1970, The Rural Elite in Developing Socity, New Delhi, orient Longman.

12) Mahajan S.G., (2000), “Pune City : It is History, Growth and Development (750 to 1998 A.D.) Mahajan Prakashan Pune.

13) Shakdher S.L., Low & practice of elections’n India Nation publishing House New Delhi 1992

14) Sanjeer Alam ‘Interstate party and seduction of Reserved seats seminar 2008.

15) Srinivas M.N.(ed.) 1996, “Caste its Twentieth century Avatar” New Delhi, Viking Penguin India.

16) Snaramkrishna K. C., A fear of chang. (Seminar) June 2008.

17) Thakkar Usha and Mangesh Kulkarni, 1995, Politics in Maharashtra, Bombay Himalaya Publishing House.

18) Verma A.K., ‘Delimitation in India, Economic & Political Wildly 2006

19) Vora Rajendra , 200, Maharashtra : Virtucl reservation for Marathas & occasional paper series- III, Pune, Department of Politica & publice Adminstration, university of Pune.

20) Vora Rajendra, 1999, Maharashtra Shift of Power from Rural to Urban sector, EPW, January.

21) Yadav Yogendra ‘The Paradox of Political Representation. Seminar June 2008.

**मराठी संदर्भ ग्रंथ–**

१) चपळगांवकर नरेंद्र, ‘विधिमंडळे आणि न्यायसंस्था संघर्षाचे सहजीवन’ मौज प्रकाशन, मुंबई, २००८

२) चपळगांवकर नरेंद्र, ‘राज्यघटनेचे अर्धशतक’, मौज प्रकाशन, मुंबई, २००२

३) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

४) पवार प्रकाश, ‘महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८

५) पळशीकर सुहास, ‘जात व महाराष्ट्रातील राजकारण’, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९८

६) पळशीकर सुहास, ‘समकालीन भारतीय राजकारण’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४

७) पळशीकर सुहास, ‘जमातवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६

८) पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास, ‘महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष –राजकीय पक्षांची वाटचाल’, समकालीन प्रकाशन, पुणे, २००७

९) पळशीकर सुहास, ‘महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ ’ प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७

१०) पळशीकर सुहास, ‘भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण’, साधना प्रकाशन, पुणे, २००९

११) ‘भारताचे संविधान’ भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २००६

१२) भोळे भा.ल. ‘भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पिंपळीपुरे प्रकाशन, नागपूर, २००३

१३) फडके य.दि., ‘विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १ ते २’, श्रीविद्या व मौज प्रकाशन, मुंबई

१४) फडके य.दि., ‘भारतातील निवडणुका १९५२ ते १९९९’, अक्षर प्रकाशन, मुंबई,

१५) व्होरा राजेंद व पळशीकर सुहास, ‘महाराष्ट्रातील सत्तांतर’ ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,

१६) सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

१७) सातारा जिल्हा गॅझेटिअर

१८) सिरसीकर व.म., ‘आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे–३०, २००८

१९) साठे सत्यरंजन, ‘भारतातील राज्यघटनेची ५० वर्षे ’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००५

२०) सुराणा पन्हालाल व बडेकोहाळ किशोर , ‘आजचा महाराष्ट्र’ श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९८

**अप्रकाशित शोधप्रबंध**

१) देठे विजय, चौथ्या परिसीमन आयोगाच्या संदर्भात कोल्हापूर व सोलापूर जिल्हयाचे बदलते राजकारण, पीएच. डी.शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१२

२) वेल्हाळ शं.पा., भारतातील निवडणुका (१९८० ते १९८९)', राजकीय पक्षांचा तुलनात्मक अभ्यास  अप्रकाशित एम.फिल शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९२

**अहवाल**

१) 'जनगणना अहवाल' भारत सरकार २००१

२) पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल२००९-१०

३) 'परिसीमन आयोग अहवाल निवडणुक आयोग भारत सरकार, १९६२

४) 'परिसीमन आयोग अहवाल निवडणुक आयोग भारत सरकार, १९७६

५) 'परिसीमन आयोग अहवाल निवडणुक आयोग भारत सरकार, २००२

६) महाराष्ट्र विधानसभा आयोग निवडणुक अहवाल २००९

७) लोकसभा निवडणुक अहवाल, २००९

८) सातारा जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल २००९-१०

**मासिके**

१) पंदेरे शाताराम, 'स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका समाजप्रबोधन पत्रिका', एप्रिल-जून १९९२

२) पळशीकर सुहास , 'पक्षीय राजकारण' समाज प्रबोधन पत्रिका', ऑक्टो-डिसेंबर १९९९

३) फडके य.दि. 'नव्या लोकसभेची निवडणुक' समाज प्रबोधन पत्रिका, जानेवारी-मार्च १९९०

४) बिरजदार प्रभाकर, पाटील शिवाजी, 'मतदारसंघ पुनर्रचना आयोगाच्या (२००२) शिफारशी व राजकारण परिणाम, प्रबोधन प्रकाशन ज्योती भारती मुद्रणालय, कोल्हापूर, जुलै २००८.

५) लेले जयंत, 'विधानसभा निवडणुका आणि मराठयांच्या धुरिणर व समाजप्रबोधन पत्रिका', एप्रिल-जून १९९२

६) सुराणा पन्नालाल, 'मतदार संघातील परिसीमन प्रबोधन प्रकाशन ज्योती, जुलै, २००८

**संकेतस्थळ**

1) www.eci.gov.in <http://WWW.eci.gov.in>

2) www.eci.gov.in <http://WWW.eci.gov.in> maharashtra

3) www.pune.nic .in

4) www.satara.nic .in

**वर्तमान पत्रे**

१) दैनिक महाराष्ट्र टाईम्स

२) दैनिक सकाळ

३) दैनिक लोकमत

४) दैनिक पुढारी

५) दैनिक लोकसत्ता